# जॉर्ज वॉशिंग्टन

## व्यक्ति आणि विभूति



चरित्र
९६५
REFBK-0010991

अहु० २८२८

दि. १९।२।८१

वा. क्र.
१०९९१

१९८०

# जॉर्ज वॉशिंग्टन

## व्यक्ति आणि विभूति

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रमांक २८८५ वि.
स्थळ क्रमांक ९८११. नों. दि.

लेखक मार्कस कन्लीफ

अनुवादक : अं. शं. अग्निहोत्री

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. १०८८९

REFBK-0010991

मूल्य तीन रुपये

Copyright ©, 1958, by Marcus Cunliffe

प्रथमावृत्ति १९६०

प्रकाशक : केशव विष्णु कोठावळे, मॅजेस्टिक बुकस्टॉल, गिरगाव नाका, मुंबई ४.
मुद्रक : विष्णु गणेश माटे, विश्वकर्मा मुद्रणालय, ३९५ सदाशिव पेठ, पुणे २.

अनुक्रम


| | |
|---|---|
| वॉशिंग्टन : दिनविशेष | ५ |
| वॉशिंग्टन : विभूति | १२ |
| वॉशिंग्टन : सन्मान्य गृहस्थ | ३८ |
| वॉशिंग्टन : सेनापति | ९८ |
| वॉशिंग्टन : राष्ट्राध्यक्ष | १५७ |
| वॉशिंग्टन : संपूर्ण व्यक्तिदर्शन | २१७ |

# वॉशिंग्टन : दिनविशेष ( १७३२ ते १७९९ )

| | | |
|---|---|---|
| १७३२ | फेब्रुआरी ता. २२ (जुन्या पंचांगाप्रमाणें ११ फेब्रु.) | व्हर्जिनियांतील वेस्ट मोरलँड पेट्यांतील ब्रिजेसक्रीक ( वेकफील्ड ) येथें जन्म. |
| १७४३ | एप्रिल ता. १२ | पिता ऑगस्टीन वॉशिंग्टन यांचें निधन. |
| १७४९ | जुलै ता. २० | व्हर्जिनियांतील कल्पेपर पेट्यांत जमीन-मोजणीदार म्हणून नेमणूक. |
| १७५१ | सप्टेंबर ते मार्च १७५२ | सावत्रभाऊ लॅरेन्स वॉशिंग्टन यांच्या-बरोबर बार्बाडोस येथें वास्तव्य. |
| १७५२ | नोव्हेंबर ता. ६ | व्हर्जिनियाच्या जुजबी फौजेंत मेजरच्या हुद्द्यावर नेमणूक. |
| १७५३ | ऑक्टोबर ता. ३१ ते ता. १६ जानेवारी १७५४ | फ्रेंचांना ली ब्यूफ किल्ल्यावर निर्वाणीचा खलिता सादर करण्यासाठीं गव्हर्नर डिन्विडीकडून रवानगी. |
| १७५४ | मार्च-ऑक्टोबर | सरहद्दीवरील मोहिमेंत, जुजबी फौजेंत लेफ्टनंट कर्नलच्या हुद्द्यावर नेमणूक. |
| १७५५ | एप्रिल-जुलै | जनरल ब्रॅडॉकचे लष्करी मदतनीस म्हणून नेमणूक. |
| | ऑगस्ट ( १७५५ ) ते डिसेंबर १७५८ | सरहद्दीच्या संरक्षणार्थ असलेल्या व्हर्जिनिया पलटणीचे कर्नल म्हणून कामगिरी. |
| १७५८ | जून–नोव्हेंबर | डुक्विस्ने किल्ल्यावरील फोर्ब्सच्या स्वारींत सहभाग. |
| | जुलै ता. २४ | व्हर्जिनियाच्या विधानसभेंत फ्रेडरिक पेट्याचे प्रतिनिधि म्हणून निवड. |

| | | |
|---|---|---|
| १७५९ | जानेवारी ता. ६ | सैन्यांतून सेवानिवृत्ति, मिसेस मार्था डॅन्ड्रिज कस्टिसशीं विवाह. |
| १७६१ | मे ता. १८ | विधानसभा-सदस्य म्हणून फेरनिवड. |
| १७६२ | ऑक्टोबर ता. २५ | फेअरफॅक्स पेठ्याच्या ट्रुरो प्रार्थना-मंदिराच्या भांडाराच्या प्रमुखपदीं नेमणूक. |
| १७६३ | ऑक्टोबर ता. ३ | पोहिक प्रार्थनामंदिराच्या प्रतिनिधिपदीं निवड. |
| १७६५ | जुलै ता. १५ | विधानसभेवर फेअरफॅक्स पेठ्यातर्फे निवड ( १७६८, १७६९, १७७१, १७७४ अशा चार वेळां फेरनिवड. ) |
| १७७० | ऑक्टोबर | फेअरफॅक्स परगण्याचे ' जस्टिस ऑफ पीस ' म्हणून नेमणूक. |
| १७७३ | मे-जून | न्यूयॉर्कपर्यंतचा प्रवास. |
| १७७४ | जुलै | करविरोधी ठराव मंजूर करण्यासाठीं फेअरफॅक्स पेठ्यातर्फे भरलेल्या परिषदेचे अध्यक्ष. |
| | ऑगस्ट | विल्यम्सबर्ग येथें भरलेल्या प्रांतिक परिषदेंत उपस्थिति. |
| | सप्टेंबर ते ऑक्टोबर | फिलाडेल्फियाला भरलेल्या पहिल्या सर्व-खंडीय कॉंग्रेसमध्यें व्हर्जिनियाचे एक प्रतिनिधि म्हणून उपस्थिति. |
| १७७५ | मे-जून | दुसऱ्या सर्वखंडीय कॉंग्रेसमध्यें प्रतिनिधि म्हणून उपस्थिति. |
| | जून ता. १६ | युनायटेड स्टेट्स्च्या सरसेनापतिपदावर निवड. |
| | जुलै ता. ३ | बोस्टन परिसरांतील मध्यवर्ती सेनेचें आधिपत्य प्रत्यक्ष स्वीकारलें. |
| १७७६ | मार्च ता. १७ | बोस्टनचा ताबा. |

| | | |
|---|---|---|
| | ऑगस्ट ता. २७ | लाँग बेटावरील संग्राम. |
| | ऑगस्ट ता. २८ | व्हाइटप्लेन्सची लढाई |
| | डिसेंबर ता. २५–२६ | न्यू जर्सीत ट्रेन्टन येथील जर्मन शिबंदीवर विजय. |
| १७७७ | जानेवारी ता. ३ | प्रिन्स्टनचा विजय. न्यू जर्सीत मॉरिसटाउनला हिवाळीं छावणी टाकली. |
| | सप्टेंबर ता. ११ | ब्रँडवाईनचा संग्राम. |
| | ऑक्टोबर ता. ४ | जर्मन टाउनचा संग्राम. |
| | ऑक्टोबर ता. १७ | बर्गोयने याची साराटोगा येथें शरणागति. |
| १७७७–१७७८ | | व्हॅलीफोर्ज येथें हिंवाळी छावणी. |
| १७७८ | जून | ब्रिटिशांनीं फिलाडेल्फिया सोडलें. मॅनमाउथचा संग्राम. |
| १७७८–१७७९ | | न्यू जर्सीत मिड्ल-ब्रुकला हिंवाळी छावणी. |
| १७८० | जुलै | रोचांब्रोच्या आधिपत्याखालीं फ्रेंच आरमार व सैन्य यांचें ऱ्होड बेटावर न्यू पोर्ट येथें आगमन. |
| १७८१ | ऑगस्ट-ऑक्टोबर | व्हर्जिनियांतील यॉर्क टाउनची मोहीम. कॉर्नवालिसची शरणागति. (ता. १९ ऑक्टोबर) |
| १७८३ | मार्च ता. १५ | असंतुष्ट सेनाधिकाऱ्यांच्या 'न्यूबर्ग ॲड्रेस' या नांवानें प्रसिद्ध असलेल्या पत्राला उत्तर. |
| | जून ता. ८ | सर्व संस्थानांना परिपत्रक रवाना. |
| | जून ता. १९ | सो सा य टी ऑ फ सि न सि ना टी च्या अध्यक्षपदीं निवड. |
| | डिसेंबर ता. ४ | न्यूयॉर्क शहरांत फ्रान्सेस टॅवर्नमध्यें सेनाधिकाऱ्यांचा निरोप घेतला. |
| | डिसेंबर ता. २३ | ॲनापोलिस येथें कॉंग्रेसला सरसेनापतिपदाचीं वस्त्रें परत करण्याचा समारंभ. |

| | | |
|---|---|---|
| १७८४ | डिसेंबर | पोटोमॅक नदींतील वाहतुकीबाबत भरलेल्या ॲनापोलिस परिषदेंत उपस्थिति. |
| १७८५ | मे ता. १७ | पोटोमॅक कंपनीचे अध्यक्ष झाले. |
| १७८७ | मार्च ता. २८ | फिलाडेल्फियाला भरलेल्या सर्व वसाहतींच्या घटना परिषदेसाठीं व्हर्जिनियाचे प्रतिनिधि म्हणून निवड. |
| | मे ता. २५ | वरील परिषदेच्या अध्यक्षपदीं निवड. |
| | सप्टेंबर ता. १७ | राज्यघटनेच्या मसुद्यावर स्वाक्षऱ्या. |
| १७८८ | जानेवारी ता. १८ | विल्यम ॲंड मेरी कॉलेजच्या कुलगुरूच्या पदावर निवड. |
| १७८९ | फेब्रुवारी ता. ४ | युनायटेड स्टेट्सच्या राष्ट्राध्यक्षपदावर एकमतानें निवड. |
| | एप्रिल ता. ३० | न्यूयॉर्क शहरांत फेडरल हॉलमध्यें राष्ट्राध्यक्षपदाचीं सूत्रें हातीं घेण्याचा समारंभ. |
| | ऑगस्ट ता. २५ | माता मेरी वॉशिंग्टन हिचें फ्रेडरिक्सबर्ग ( व्हर्जिनिया ) येथें निधन. |
| | ऑक्टोबर ते नोव्हेंबर | ऱ्होड बेट वगळून न्यू इंग्लंडचा दौरा. |
| १७९० | ऑगस्ट | ऱ्होड बेटाला भेट. |
| | सप्टेंबर | हंगामी राजधानी फिलाडेल्फिया येथें आगमन. |
| १७९१ | एप्रिल-जून | दक्षिणेंतील संस्थानांचा दौरा ( ६६ दिवसांत १८८७ मैल. ) |
| १७९२ | डिसेंबर ता. ५ | पुनः राष्ट्राध्यक्षपदावर एकमतानें निवड. |
| १७९३ | मार्च ता. ४ | फिलाडेल्फिया येथें स्वातंत्र्यमंदिरांत राष्ट्राध्यक्षपदाचीं सूत्रें हातीं घेण्याचा समारंभ. |
| | एप्रिल ता. २२ | तटस्थतेची घोषणा. |
| | सप्टेंबर ता. १८ | संघराज्याच्या राजधानीची ( वॉशिंग्टन |

| | | |
|---|---|---|
| | | डी. सी. ) कोनशिला बसविली. |
| | डिसेंबर ता. ३१ | थॉमस जेफर्सन यांचा परराष्ट्रमंत्रिपदाचा राजिनामा. |
| १७९४ | सप्टेंबर ते ऑक्टोबर | पेन्सिल्व्हानियांतील ' व्हिस्की रिबेलियन ' म्हणून जें बंड झालें, त्या संबंधांतल्या परिस्थितीच्या पहाणीसाठीं दौरा. |
| १७९५ | जानेवारी ता. ३१ | ॲलेक्झांडर हॅमिल्टन यांचा अर्थमंत्रि-पदाचा राजीनामा. |
| १७९६ | सप्टेंबर ता. १९ | ता. १७ रोजीं केलेलें निरोपाचें भाषण ' डेली अमेरिकन ॲडव्हर्टायझर ' मध्यें प्रकाशित झालें. |
| १७९७ | मार्च | राष्ट्राध्यक्षपदावरून निवृत्ति. जॉन ॲडम्स यांनीं राष्ट्राध्यक्षपद स्वीकारल्यावर माउंट-व्हर्नॉनला पुनरागमन. |
| १७९८ | जुलै ता. ४ | युनायटेड स्टेट्‌सच्या लष्कराचे लेफ्टनंट जनरल व सरसेनापति म्हणून नेमणूक |
| १७९९ | डिसेंबर ता. १४ | माउंट व्हर्नॉन येथें निधन. ( कुटुंबीय शवघरांत ता. १८ रोजीं दफनविधि. ) |
| १८०२ | मे ता. २२ | जॉर्ज वॉशिंग्टन यांची पत्नी मार्था हिचें निधन. |

जॉर्ज वॉशिंग्टन

व्यक्ति आणि विभूति

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
वि: नों: दि:

प्रकरण पहिलें

# वॉशिंग्टन : विभूति

" प्रदीर्घ कालपर्यंत व्हरनॉनच्या निवांत परिसरांत वावरतांना अत्यादरानें भारल्यासारखें वाटत राहील; पोटोमॅकचा तटाक पवित्र-भू गणला जाईल. "

*—चार्लस पिंकनी सम्नर*
'वॉशिंग्टन-प्रशस्ति' ( १८०० )

वॉशिंग्टन ( डी. सी. ) येथील वॉशिंग्टन-स्मारकाची उंची ५५५ फूट आहे. म्हणजे कोलोन प्रार्थनामंदिरापेक्षां, रोमच्या सेंट पीटर प्रार्थनामंदिरापेक्षां व इजिप्तमधील पिरॅमिडपेक्षांहि तें स्मारक उंच आहे. जॉर्ज वॉशिंग्टन १७९९ च्या डिसेंबरमध्यें निधन पावले, पण तत्पूर्वीच संघराज्याच्या नव्या राजधानीचें नांव त्यांच्या सन्मानार्थ 'वॉशिंग्टन' असें ठेवण्यांत आलेलें होतें. आणखी पूज्यभाव व्यक्त करण्यासाठीं " त्यांच्या लष्करी आणि राजकीय जीवनांतील महान् घटनांना चिरस्थायित्व देणारें " संगमरवरी दगडांचें भव्य स्मारक उभारण्याचा ठराव प्रतिनिधिसभेनें केला होता. या स्मारकांत वॉशिंग्टन यांच्या शवाचें दफन करण्यांत यावयाचें होतें. पण, निरनिराळ्या ज्ञात-अज्ञात कारणांमुळें, हें नियोजित स्मारक उभें राहिलें नाहीं. आज वॉशिंग्टन-स्मारक म्हणून ओळखलें जाणारें जें प्रचंड उत्तुंग धूड उभें आहे, त्याची उभारणी खूप कालांतरानें—म्हणजे वॉशिंग्टन यांनीं विजय संपादून राष्ट्राला स्वातंत्र्य मिळवून दिल्यानंतर शंभरपेक्षां जास्त वर्षांनीं झाली. या स्मारकाचा पाया तयार करण्यासाठीं हजारों टन कॉंक्रीट ओतावें लागलें आहे; पण ज्या पुरुषाचें हें स्मारक आहे त्या पुरुषाचे अवशेष मात्र या पायामध्यें नसून, तेथून कांहीं मैलांवर, माउंट व्हरनॉनच्या वॉशिंग्टन यांच्या निवासस्थानांतील शवघरांत ते अवशेष चिरविश्रांति घेत आहेत.

असंख्य प्रवासी माउंट व्हर्नॉनला भेट द्यावयास जात असतात. त्या निवासस्थानाची पुनर्रचना मोठ्या रसिकतेनें केलेली आहे आणि त्याची व्यवस्थाहि अगदीं निर्दोष आहे. तें एक सुंदर प्रेक्षणीय स्थळ आहे, असें सर्व प्रवासी कबूल करतील. पण या पुनर्रचनेच्या खटाटोपांत आत्मा मात्र हरपला आहे. तें 'घर' वाटत नाहीं. त्याला पदार्थसंग्रहालयाची कळा आलेली दिसते. जॉर्ज वॉशिंग्टन त्या ठिकाणीं रहात होते, तिथेंच त्यांनीं देह ठेवला, हें आपल्याला कळतें; पण ती गोष्ट भावनेला जाऊन भिडत नाहीं. ज्याप्रमाणें स्ट्रॅटफर्ड-ऑन-ॲव्हॉन येथील विल्यम शेक्सपिअरच्या स्मारकस्थानांत खुद्द शेक्सपिअरच्या अस्तित्वाचा पुनराभास अंतःकरणाला होत नाहीं, तसेंच माउंट व्हर्नॉनलाहि घडतें. हे दोन्ही पुरुष आपल्याला अद्भुत वाटतात. आपण गोंधळतों आणि त्यांचें यथार्थ दर्शन आपल्याला होतच नाहीं. "इंग्लंडनें जगाला दिलेली सर्वश्रेष्ठ देणगी म्हणजे शेक्सपिअरच्या नाट्यकृति होत; तद्वतच अमेरिकेची सर्वश्रेष्ठ देणगी म्हणजे वॉशिंग्टन यांचें चारित्र्य होय." असें एका अमेरिकन लेखकानें म्हटलेलें आहे. यावरून त्या दोघांचें मूल्यमापन कोणत्या परिमाणानें केलें जातें हें दिसून येतें. आणि हें परिमाण कांहीं मानवी परिमाण नव्हे.

अर्थात् या दोन्ही पुरुषांबाबतची परिस्थिति पुष्कळच विभिन्न आहे. शेक्सपिअरविषयीं आपल्याला जवळ जवळ कांहींच माहिती मिळत नाहीं; वॉशिंग्टनबद्दलची माहिती प्रचंड प्रमाणांत आपल्याला मिळूं शकते. शेक्सपिअरची फक्त एकुलती एक आणि तीदेखील कळाहीन तसबीर उपलब्ध आहे; याउलट, वॉशिंग्टन यांच्या तसबिरी इतक्या आहेत कीं, सर्व चित्रांचा समावेश करायचा झाला तर तीन चित्रसंग्रह तयार होतील. त्यांच्या कांहीं तसबिरी तर अत्यंत हुबेहूब आहेत. खुद्द शेक्सपिअरच्या हस्ताक्षरांतला आत्मचरित्रात्मक असा मजकूर चार-दोन ओळींचाहि उपलब्ध नाहीं; पण वॉशिंग्टन यांचीं पत्रें आणि दैनंदिन्या इतक्या आहेत कीं, छापील मजकुराचे चाळीसवर ग्रंथ भरतील. शेक्सपिअरच्या समकालीनांपैकीं त्याच्याविषयीं लिहिणारा लेखक औषधालाहि मिळत नाहीं; पण वॉशिंग्टन यांचे मित्र, परिचित व्यक्ति आणि क्वचित् भेटीला आलेले लोकहि— अशा असंख्य व्यक्तींनीं, जॉर्ज वॉशिंग्टनविषयीं आपल्याला काय वाटतें तें लिहून ठेवलेलें आहे. शेक्सपिअरचें व्यक्तित्व एक प्रकारच्या विचित्र गूढतेनें झांकळून गेलेलें आहे; याउलट, जागतिक कीर्तीच्या डोळे दिपवणाऱ्या झगझगीत प्रकाशांत

वॉशिंग्टन उभे आहेत. तथापि, यथार्थदर्शनाच्या दृष्टीनें दोघांच्याहि बाबतींत सारखाच अनुभव येतो. ज्याप्रमाणें काळोखांत दिसूं शकत नाहीं, त्याप्रमाणेंच डोळे दिपविणाऱ्या झगझगीत प्रकाशांतहि नीट पाहतां येत नसतेंच. दोघांचेंहि यथार्थदर्शन घडत नाहींच.

पौराणिक दैवतांप्रमाणें या पुरुषाभोंवतीं व्यक्तिभावविरहित अशा अद्भुत कथांचा जो प्रचंड आणि सतत वाढणारा ढिगारा जमला, तो बाजूला सारून ' खरा माणूस ' अलग करून दाखविण्याचा प्रयत्न निरनिराळ्या चरित्रलेखकांनीं निरनिराळ्या प्रकारें केला आहे. कांहीं जणांनीं शेक्सपिअरकडे त्याच्या नाटकांचें जनकत्व देण्याचेंहि नाकारलें आहे. या लेखकांनीं त्या नाटकांचें जनकत्व बेकन-सारख्या पंडिताला बहाल केलें, तर कांहीं जणांनीं मार्लो हा त्या नाटकांचा लेखक होता, असें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. वॉशिंग्टन यांच्या बाबतींत झालेला प्रकार कांहींसा निराळा आहे. प्रचंड पुरावा समोर असतांना वॉशिंग्टन ही व्यक्ति अवतरलीच नव्हती, असा दावा कोणींच मांडूं शकलें नसतें. किंवा त्यांचें श्रेय दुसऱ्या कोणाला बहाल करणेंहि शक्य नव्हतें. पण, हा पुरुष, त्याच्या स्वतःविषयीं निर्माण झालेल्या अद्भुत कथांच्या ढिगाऱ्याखालीं दडपला गेला आहे. उपमा द्यायची झाली तर भव्य ' वॉशिंग्टन-स्मारका ' खालीं खऱ्या माणसाचे आकृति-विशेष लोपले आहेत. आणि वर्षानुवर्षें त्यांच्या व्यक्तित्वाभोंवतींचें विभूतिमत्त्वाचें वलय सारखें वाढतच गेलें आहे. पुस्तिका, भाषणें, लेख, ग्रंथ, आख्यायिका–दंतकथा, चुटके, छोटे निबंध, स्तुतिपाठ आणि आदरांजलि वाहणारे लेख यांची भर पडून पडून हें रूपकात्मक स्मारक पर्वतप्राय वाढलेलें आहे. पण परिणाम मात्र विपरीत झालेला आहे. लिखाणाचा दर्जा कसाहि असो, पण त्यानें जें उजेडांत आणण्याचा प्रयत्न केला, तेंच धुकाळून टाकलें आहे. या लिखाणापैकीं कांहीं अत्यंत मोलाचें असूनदेखील, खऱ्या माणसाचें यथार्थदर्शन घडविण्याऐवजीं त्या पुरुषाचें व्यक्तित्व झांकळून टाकण्याचेंच कार्य या लिखाणानें केलें आहे.

वॉशिंग्टन हे कोणी अद्भुत पौराणिक पुरुष बनविले गेले आहेत असेंच केवळ नव्हे; तर सार्वत्रिक स्तुतिवर्षावाच्या बळी बनलेल्या या पुरुषावर रचलीं गेलेलीं हीं पुराणें अत्यंत कंटाळवाणीं झालीं आहेत. तींच तीं स्तुतिवचनें, आरत्या पुनः पुन्हा खणखणीत आवाजांत एकविणाऱ्या ' वॉशिंग्टन-पुराणां 'च्या ग्रंथांची संख्या कित्येक मांडण्या भरून उरतील इतकी आहे. ठराविक स्तुति-

पाठांनीं भरलेलें हें लिखाण वाचतांना कंटाळा येऊन जांभया आल्याशिवाय राहत नाहींत. आणि मग अतिगोड खाऊन विटलेल्या तोंडाला कांहीं तरी तिखट-आंबट हवेंसें वाटूं लागतें. अशा वेळीं इमर्सन यांच्या उद्गारांशीं सहमत व्हावेंसें वाटतें. इमर्सननीं म्हटलें आहे : " अति झालें म्हणजे पूजनीय विभूतिही कंटाळवाणी ब्याद वाटूं लागते... वॉशिंग्टनचें गुणगान ऐकून ऐकून कान इतके किटतात कीं, ठराविक चाकोरीबाहेर जाऊन, ' उडत गेला तुमचा तो जॉर्ज वॉशिंग्टन ! ' असें म्हणण्याची इच्छा एखाद्याला होते. " अशा अवज्ञावाचक विचाराचा उतारा मिळाला तरी आपल्या नजरेपुढील तें विभूतिमत्त्वाचें वलय हटत नाहींच. त्या वलयानें दिपणाऱ्या नजरेनेंच ' माणूस ' वॉशिंग्टनचें यथार्थ दर्शन घेण्याचा प्रयत्न आपल्याला करावा लागतो. असें करतांना वाटूं लागतें की पौराणिक दैवत आणि माणूस अशीं संपूर्ण फारकत करणें कदापि शक्य होणार नाहीं. आणि या वस्तुस्थितींतच वॉशिंग्टन यांचें स्वभाववैशिष्ट्य आणि त्यांचे सार्वजनिक जीवनांतील स्थान यांचें मूल्यमापन करण्याची गुरुकिल्ली आहे.

विभूतिमत्त्वाच्या वलयाचा भेद करतांना प्रथमतःच एक गोष्ट लक्षांत घ्यावी लागते, ती ही कीं, वॉशिंग्टनना पौराणिक महापुरुष बनविण्याची प्रक्रिया खुद्द त्यांच्या हयातींतच सुरू झाली होती. " अरेरे ! मी अखेर देव बनविला जाणार असं दिसतंय ! " असे उद्‌गार रोमन सम्राट् व्हेस्पॅशियन यानें मरतांना काढले होते, असें म्हणतात. असा अस्थानीं विनोद करणें आणि दिमाखानें बोलणें जॉर्ज वॉशिंग्टन यांच्या वृत्तींत सुतराम् नव्हतें. पण १७९९ सालीं माउंट व्हरनॉनच्या निवासस्थानीं मृत्युशय्येवर अखेरचे क्षण मोजतांना असा विचार त्यांच्या मनाला चाटून गेला असला तर तें रास्तच होतें. वॉशिंग्टन यांच्याविषयींचा पूज्यभाव व्यक्त करण्यासाठीं मुलांना त्यांचें नांव ठेवण्याची प्रथा १७७५ सालापासूनच सुरू झाली होती. ते राष्ट्राध्यक्षपद विभूषित करीत असतांनाच, त्यांच्या मेणाच्या पुतळ्यांचीं प्रदर्शनें गांवोगांव भरत असत नि लोक पैसे देऊन तीं बघावयास जात असत. त्यांचे चहाते त्यांचा उल्लेख ' देवतातुल्य वॉशिंग्टन ' असा करीत असत. " वॉशिंग्टनना दैवत मानलें जात आहे. त्यांच्यावर टीका करणें राष्ट्रद्रोह ठरला आहे. " अशी तक्रार त्यांचे विरोधक आपसांत करीत असत. १७८३ मध्यें एका प्रार्थनाप्रवचनांत येल येथील इझरा स्टाइल्स यांनीं काढलेले उद्‌गार बघा : " हे वॉशिंग्टन ! तुझं नांव मला अत्यंत प्रिय आहे ! मानवकुलाचा महान्

अलंकार अशा तुला निर्मिणाऱ्या परमेश्वराला मीं असंख्य वेळां धन्यवाद दिलेले आहेत ! ......तुझ्यावर चिखलफेक करणाऱ्या शत्रूंच्या जिभा अडखळतात. ‘माझ्या कृपाप्रसादाला पात्र झालेल्या या अलौकिक विभूतीच्या वाटेला जाऊं नका !’ असा इशारा परमेश्वरानं दिल्यामुळेंच जणूं हे शत्रु आपल्या हीन कृत्यापासून परावृत्त होतात. अरबस्तानांतील नांवाजलेल्या सुगंधी द्रव्यांपेक्षांहि तुझ्या कीर्तीचा सुगंध अवीट आहे. देवदूत हा सुगंध स्वर्गापर्यंत घेऊन जातील आणि सारें विश्व या सुगंधानें भरून टाकतील !”

वरील उद्‌गार म्हणजे वॉशिंग्टनना अद्‌भुत पौराणिक दैवत बनविण्याच्या प्रक्रियेचा खराखुरा मासला होय. त्यांचे समकालीनदेखील त्यांच्यावर स्तुतिसुमनें उधळण्यांत एकमेकांना मागें टाकण्यासाठीं धडपडत असत. जॉर्ज वॉशिंग्टन यांच्यामध्यें कांहीं तरी अतिमानवी आहे, असें सांगण्याचा प्रत्येकाचा प्रयत्न असे. अशा परिस्थितींत, निधनानंतर ‘देवतातुल्य वॉशिंग्टन’भोंवतींचें पौराणिक महापुरुषाच्या विभूतिमत्त्वाचें वलय अधिक मोठें झालें, हें आवर्जून सांगण्याचें कारण नाहीं. त्यांचें नांव एका अमेरिकन संस्थानाला देण्यांत आलेंच; पण सात डोंगर, आठ छोट्या नद्या, दहा सरोवरें, तेहतीस परगणे, नऊ अमेरिकन महाविद्यालयें, एकशेंवीस अमेरिकन शहरें व गांवें – इतक्यांचें नामकरण करण्यासाठीं त्यांचेंच नांव योग्य मानलें गेलें. त्यांचा जन्मदिन कधींपासूनच राष्ट्रीय सुटीचा दिवस मानला गेला आहे. नाण्यांवर त्यांची मुद्रा आहे. कागदी चलनावर आणि पोस्टाच्या तिकिटांवर त्यांचीं चित्रें आहेत. असंख्य दिवाणखान्यांत आणि कचेऱ्यांत त्यांच्या तसबिरी लटकत आहेत. विशेषतः ग्रीक पुराणांतील विद्येच्या देवासारखें–अथीनसारखें–जें धीरगंभीर चित्र गिल्बर्ट स्टुअर्टनें काढलें आहे, तेंच बहुधा असें लावण्यासाठीं पसंत केलें जातें. दक्षिण डाकोटामधील एका डोंगरावर खडकांत त्यांचें मस्तक खोदण्यांत आलें आहे. त्याची उंची हनुवटीपासून डोक्यापर्यंत साठ फूट आहे. त्यांचे पुतळे सर्व युनायटेड स्टेट्समध्यें ठायीं ठायीं उभारलेले आहेतच; पण जगभरसुद्धां आहेत. लंडन, पॅरिस, ब्यूनो एअर्स, रिओ डि जॅनेरियो, काराकास, बुडापेस्ट, टोकिओ,... अशा किती तरी ठिकाणीं त्यांचे पुतळे आहेत.

जगांत वॉशिंग्टन यांना किती महात्मतेचें स्थान प्राप्त झालें आहे, याचीं हीं बाह्य चिन्हें आहेत. तथापि आपण विभूतिमत्त्वाच्या या तेजोवलयाकडे – त्या

रूपकात्मक स्मारकाकडे अधिक बारकाईनें पाहिलें पाहिजे. रूपकात्मक स्मारकाच्या भाषेंतच बोलायचें झालें तर, या स्मारकाला चार अंगें आहेत, असें आपल्याला दिसून येतें; भावी कालसाठीं वॉशिंग्टन यांनीं चार भूमिका बजावल्या, असा देखावा उभा केला गेला आहे. अर्थात् या चार भूमिका अगदीं सुस्पष्टपणें पृथक् नाहींत. खरें म्हणजे, धूसर प्रकाश असलेल्या समाधिस्थानाप्रमाणें, इथेंहि सुस्पष्ट दर्शन घडूंच शकत नाहीं. तथापि, वॉशिंग्टन यांच्याविषयींच्या अद्‌भुत कथा कोणत्या सत्य घटनांतून निर्माण झाल्या, हें पाहण्यास सुरुवात करण्यापूर्वी या रूपकात्मक स्मारकाच्या प्रत्येक अंगाकडे ओझरती नजर टाकणें उपयुक्त ठरेल. याचा अर्थ असा नव्हे कीं, वॉशिंग्टन हे स्तुतीला पात्र नव्हते, असा दावा आपल्याला करावयाचा आहे. त्यांचे गुण जातिवंत होतेच आणि बहुविधहि होतेच. पण महत्त्वाचा मुद्दा असा आहे कीं, त्यांचे खरे गुण फुगविले गेले आहेत; असत्य चित्र समोर उभें करण्याइतके ते गुण विकृत स्वरूपांत मांडले गेले आहेत. आणि वॉशिंग्टन यांचें नांव उच्चारतांच आपल्यासमोर वॉशिंग्टनचें जें व्यक्तिचित्र उभें राहतें तें हेंच भ्रामक आणि भडक नि प्रचंड चित्र होय. हें भ्रामक चित्र पुढील चार प्रकारांपैकीं कोणत्या तरी एका प्रकाराच्या रूपानें आपल्यापुढें उभें रहातें : ( १ ) क्रमिक पुस्तकांतील आदर्श. ( २ ) राष्ट्रपिता. ( ३ ) निष्कामबुद्धीचा देशभक्त. ( ४ ) क्रांतिकारक नेता. हे सर्व मुखवटे वॉशिंग्टन देवतातुल्य पुरुष होते, असें दाखविणारेच आहेत.

## क्रमिक पुस्तकांतील आदर्श

वॉशिंग्टन यांचें सर्व चरित्र अठराव्या शतकांत घडलें; पण आज आपल्यापुढें त्यांची जी मूर्ति उभी आहे, ती मात्र एकोणिसाव्या शतकांतल्या इंग्लिशभाषी जगाची निर्मिति आहे. हा काळ जसा अनेक उलाढाली, घटना यांच्या गर्दीनें वैशिष्ट्यपूर्ण ठरलेला होता, त्याचप्रमाणें नीतिपर शिक्षणावर भर देणारा होता. निबंध, प्रबंध, शालेय पुस्तकें, सुभाषितसंग्रह या सर्वांतून सदुपदेशावरच भर दिलेला असे. डेव्हिड रिसमन यांनीं म्हटल्याप्रमाणें ' अंतःप्रेरित ' व्यक्तित्व-विकासाचें तें शतक होतें. स्माइल्स यांच्या निबंधांचीं शीर्षकेंच ' स्वावलंबन ', ' काटकसर ', ' कर्तव्य ', ' चारित्र्य ' अशीं होतीं, यांत त्या शतकाच्या विचारसरणीचें प्रतिबिंब दिसतें. ' चारित्र्य ' असेंच शीर्षक असलेल्या इमर्सन यांच्या एका

छोट्या कवितेंतहि त्या काळच्या वैचारिक भूमिकेचेंच सार आढळून येतें. चारित्र्यवान् पुरुषाचें वर्णन इमर्सन करतात :

*तारे मावळतात, पण त्याची आशा कदापि मावळत नाहीं. उगवत्या ताऱ्याच्या आधींच त्याची श्रद्धा उदित झालेली असते. विशाल तारांगणावर त्याची सखोल दृष्टि अनादिकालापासून खिळलेली असते. अन् अबोल नम्रतेनें तो जें सोशीत असतो, त्या दिव्य सहनशक्तीची तुलना अबोलपणें व्यतीत होणाऱ्या कालाशींच करतां येईल."*

शालेय पुस्तकांतील जॉर्ज वॉशिंग्टन यांच्या चरित्ररेखेचें मुख्य सूत्र चारित्र्य हेंच असे. शेक्सपिअर व वॉशिंग्टन यांच्याविषयींचे जे उद्‌गार मागें उद्धृत केले आहेत, त्यांत हेंच दिसून आलेलें आहे. * लॉर्ड ब्राउहॅम यांचें मत तसेंच आहे. त्यांनीं म्हटलें आहे : "वॉशिंग्टन यांच्या चारित्र्याचें महत्त्व अधिकाधिक पटत जाणें हेंच मानवी प्रगतीचा टप्पा मापण्याचें परिमाण होय."

पार्सन विम्स हा मोठा कल्पक लेखक होता. त्यानें वॉशिंग्टनच्या चरित्राचा एक सांचा बनविला. आणि मग साऱ्या शतकभर त्याच सांचाचा उपयोग वॉशिंग्टनविषयीं लिहितांना होत राहिला. १८०० सालीं आपल्या प्रकाशकाला लिहिलेल्या पत्रांत, वॉशिंग्टन यांचें छोटें चरित्र लिहिण्यामागील आपला हेतु विशद करतांना विम्सनें लिहिलें होतें : "त्यांचे (वॉशिंग्टन यांचे) महान् सद्‌गुण जगापुढें आणावयाचे आहेत. त्यांची ईश्वरभक्ति वा धर्मप्रेम, त्यांची देशभक्ति, त्यांची भव्यता, त्यांचा दीर्घोद्योग, त्यांचा संयमीपणा आणि विवेकबुद्धि, त्यांची न्यायप्रियता वगैरे गुणांचा आदर्श जगापुढें ठेवावयाचा आहे." वॉशिंग्टन यांच्याविषयीं अमेरिकन जनतेला वाटणारा पूज्यभाव विम्सच्या अंतःकरणांत नव्हता, असा संशय वाटण्याला कांहींच कारण नसलें तरी इतकें मात्र खरें कीं,

* १८४३ मध्यें डॅनिएल वेब्स्टर यांनीं बंकर हिल येथें केलेल्या भाषणांत त्यांचाच पुनरुच्चार केला होता. ते म्हणाले, "जुन्या जगाचें (युरोपचें) फार मोठें ऋण अमेरिकेवर आहे. जगाला चारित्र्यसंपन्न वॉशिंग्टनची देणगी देऊन हें ऋण अमेरिकेनें मोठ्या प्रमाणावर फेडलेलें आहे! आमच्या अमेरिकन सामाजिक संस्थांनीं दुसरें कांहींहि कार्य केलेलें नसतें तरीसुद्धां या एकाच देणगीमुळें त्या संस्था मानवकुलाच्या आदरास पात्र ठरल्या असत्या."

वरील विधानांत वरवर दिसतो तसाच उच्च उद्देश त्याच्या मनांतही होता, असें म्हणतां येणार नाहीं. कारण त्याच प्रकाशकाला त्यानें चक्क सांगितलें होतें कीं, तशा पुस्तकामुळें लेखक नि प्रकाशक या दोघांनाहि "पैसा आणि प्रसिद्धि" मिळूं शकेल! तें कांहीं असो, पण कपोलकल्पित घटना रचण्यास विम्सनें मागेंपुढें पाहिलें नाहीं, एवढें मात्र खरें. माउंट व्हरनॉनला प्रार्थनामंदिर नव्हतें, पण त्या अस्तित्वांत नसलेल्या प्रार्थनामंदिराचे आपण धर्माधिकारी होतों, असा दावा करायलादेखील त्यानें कमी केलें नाहीं. विम्सच्या पुस्तिकेचें स्वरूप प्रत्येक नव्या आवृत्तीगणिक मोठें मोठें होत जाऊन तो एक ग्रंथ बनला. क्रमाक्रमानें त्या पुस्तकांत त्यानें बनावट आख्यायिका समाविष्ट करण्याचा सपाटा लावला... वॉशिंग्टनना बालपणीं एक कुऱ्हाड बक्षीस मिळाली होती. ती कुऱ्हाड त्या मुलानें एका चेरीवृक्षावर चालविली. संतप्त पित्यानें जेव्हां 'कोणीं झाड तोडलें?' असा सवाल केला तेव्हां वॉशिंग्टन पुढें होऊन म्हणाला, "बाबा! मी खोटें बोलूं शकत नाहीं. बाबा, झाड मीं माझ्या कुऱ्हाडीनं तोडलं." मुलाच्या सत्यवचनीपणानं गहिंवरून पित्यानें वॉशिंग्टनला हृदयाशीं धरलें आणि त्याच्या नेत्रांतून प्रेमाश्रु वाहूं लागले... ही सुप्रसिद्ध आख्यायिका खास विम्सच्या कल्पनेच्या कारखान्यांतील तयार झालेला बनावट माल होय. विम्सनें अशा अनेक आख्यायिका तयार केल्या. एका आख्यायिकेप्रमाणें छोटा वॉशिंग्टन प्राथमिक शाळेंत असतांना आपसांत मारामाऱ्या करणाऱ्या सहाध्यायींचा निषेध करतांना म्हणतो, "मुलांनो, असल्या घाणेरड्या संवयी मला कदापि मान्य होणार नाहींत! अरे, कुत्रीं आणि गुलाम यांनादेखील हें वर्तन शोभणारें नाहीं. मग, ज्यांनीं एकमेकांना बंधुभावानें वागवावयास हवें, त्या विद्यार्थ्यांना असलें वर्तन किती शरमेचें वाटावयास हवें बरें!"... ही आख्यायिका घमेंडखोरपणाची द्योतक आहे, असें पुढील पिढ्यांना वाटूं लागल्यावरून नंतर हळूहळू तिचें वॉशिंग्टन-चरित्रांतून उच्चाटन झालें. ब्रॅडॉकच्या पराभवाच्या वेळीं वॉशिंग्टन यांची ईश्वरी कृपेनें झालेली सुटका ही गोष्टहि विम्सछाप काल्पनिक दंतकथेचा विषय झालेली आहे. "त्या भयानक युद्धांत भाग घेणाऱ्या एका रेड इंडियन योद्धयानें वारंवार शपथेवर असें सांगितलें कीं, 'वॉशिंग्टनचा जन्म बंदुकीच्या गोळीनें मरण्यासाठीं नाहीं. मीं माझ्या रायफलनें त्याच्यावर सतरा फेरी झाडल्या. पण त्यांना जमीनदोस्त करण्यांत मी यशस्वी झालों नाहीं!..." अशी ती आख्यायिका आहे. पॉट्स् नांवाचा एक

प्रतिष्ठित क्वेकर कुटुंबांतील गृहस्थ फॉर्ज दरींतून जात होता. तिथें एक व्यक्ति गुडघे टेकून प्रार्थना करण्यांत दंग होती. बघितल्यावर त्याला कोण दिसलें? प्रार्थना करणारी ती व्यक्ति म्हणजे खुद्द युनायटेड स्टेट्सच्या लष्कराचे सरसेनापति जॉर्ज वॉशिंग्टन हे होते...ही गोष्ट पॉट्स्नें स्वतः आपल्याला सांगितली, असें विम्सनें लिहिलें आहे.

जॉर्ज वॉशिंग्टन यांच्या जीवनांत 'कर्तव्य आणि सुसंधि' हातांत हात घालून चालत असल्याचें विम्सनें पानोपानीं दाखवून 'कर्तव्याचें फळ मिळतेंच मिळतें, हा बोध ठसविण्याचा सतत प्रयत्न केलेला आहे. आणि म्हणूनच त्यानें असें दाखवून दिलें आहे कीं, वडील सावत्रभावावर केलेल्या उपकाराचें फळ म्हणूनच माउंट व्हरनॉनची मालमत्ता भावाच्या मृत्यूनंतर जॉर्ज वॉशिंग्टन यांच्या पदरांत पडली. "सुमारें एक लक्ष डॉलर मोलाची मालमत्ता मालकीची असलेल्या" कस्टिसबाईच्या प्रेमाला जॉर्ज वॉशिंग्टन आपल्या आदर्श वर्तनानेंच पात्र कसे ठरले, हेंहि दाखविण्याचा प्रयत्न विम्सनें केला आहे. अशा बोधवादी लिखाणानें जनमनाची पकड न घेतली तरच नवल! १८२५ सालापर्यंत विम्सरचित चरित्राच्या चाळीस आवृत्त्या निघून खपल्या. त्यानंतरच्या काळांतहि आणखी चाळीस आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या. झाडावर कुऱ्हाड चालविण्यासंबंधींची दंतकथा मॅक्गफीच्या क्रमिक पुस्तकांत लौकरच समाविष्ट झाली. आणि मग प्रत्येक क्रमिक पुस्तकमालेची ती दंतकथा अविच्छिन्न घटक ठरली. क्रमिक पुस्तकांतील तिचें स्थान अनन्यसाधारण ठरून गेलें. इतकेंच नव्हे, तर १८६३ सालीं, 'शेतकऱ्याचा मुलगा सरसेनापति कसा झाला?' या शीर्षकाखालीं मॉरिसन हेडी यानें जें वॉशिंग्टन-चरित्र लिहिलें, त्यांत या काल्पनिक कथेला आणखी कल्पनेची जोड देण्यांत आली. झाड तोडण्याचा आरोप वस्तुतः एका निग्रो पोरावर आलेला होता आणि त्या पोराचा फटक्यांच्या शिक्षेपासून बचाव करण्यासाठीं छोट्या जॉर्जनें आपण तो गुन्हा केला असल्याची कबुली दिली, असें वर्णन हेडीनें केलें आहे. संत-चरित्रमालिकेंत ज्याप्रमाणें सेंट लॉरेन्स आणि त्याचें लोखंडी पात्र, सेंट कॅथरिन आणि तिचें चाक यांचा अन्योन्यसंबंध प्रसिद्ध आहे. त्याप्रमाणेंच धार्मिक संत नसलेल्या कांहीं महापुरुषांशींदेखील कांहीं वस्तूंचें जडलेलें नातें असेंच लोकप्रसिद्ध आहे. न्यूटन आणि झाडावरून पडणारें सफरचंद, वॅट आणि त्याचें चहापात्र, ब्रूस आणि जाळ्यांत परत जाण्यासाठीं फिरून फिरून प्रयत्न

करणारा कोळी, कोलंबस आणि त्यानें उभें करून दाखविलेलें अंडें, आल्फ्रेड राजा आणि भाकरी, फिलिप सिडने आणि पाण्याचें भांडें, इत्यादि जोड्यांच्या मालिकेंत वॉशिंग्टन आणि तें झाड यांना कायमचें स्थान प्राप्त झालें.

वॉशिंग्टन यांची महात्मता भडक रंगांत दाखविण्यासाठीं असा एकच प्रसंग उपयोगांत आणण्यांत आला असें नव्हे. त्यांचें सारेंच चरित्र त्यासाठीं राबविण्यांत आलेलें आहे. देशप्रेमानें ओथंबलेली त्यांची काटकसरीची वृत्ति आणि व्यवहारदक्षता सिद्ध करण्यासाठीं, त्यांनीं क्रांतियुद्धाच्या काळांत लिहून ठेवलेल्या जमाखर्चाच्या तपशीलवार टिपणांच्या नकला प्रसिद्ध करण्यांत आल्या आहेत. एकोणिसाव्या शतकाच्या सांचांत बसतील अशा प्रकारें त्यांच्या धार्मिक मतांची पुनर्घडण करण्यालाहि विम्सप्रभृतींनीं कमी केलेलें नाहीं. त्यांनीं अँग्लिकन पंथ सोडून प्रेस्बिटेरिअन पंथ स्वीकारला, अशी एक आख्यायिका प्रसृत आहे. तर दुसऱ्या आख्यायिकेप्रमाणें त्यांनीं गुपचूप बॅप्टिस्ट पंथ स्वीकारला होता. या आख्यायिका विम्सच्या सुपीक डोक्यांत तयार झालेल्या असोत कीं त्या दुसऱ्या कोणीं रचलेल्या असोत; पण तपशीलाच्या दृष्टीनें त्या असत्य आहेत आणि बहुतांशीं त्यांचें स्वरूप अनैतिहासिक आहे, हें पटवून देण्याची तशी फारशी आवश्यकता नाहीं. अभ्यासू पंडित या नात्यानें आपण काय करायला पाहिजे, याचा विचार विम्स आणि त्याच्या परंपरेंतील लेखक यांना करावयाचाच नव्हता. त्यांनीं जाणून बुजून आपल्यासमोर एकच उद्देश ठेवला होता : चरित्रकथा खुसखुशीत बनवायची आणि तिच्या द्वारां बोध द्यायचा, एवढाच त्यांचा उद्देश होता. " तरुणांच्या अंतःकरणांत सद्‌गुणांविषयीं उत्कट प्रेम ठसविण्याचें कार्य करण्याचा प्रधान उद्देश समोर ठेवणाऱ्या विम्स-इतका कोणीहि चरित्रकार प्रशंसेस पात्र नाहीं. या राष्ट्राला अत्यंत प्रिय असलेल्या पुरुषाच्या ठायीं त्या सद्‌गुणांचें मूर्तिमंत दर्शन घडवून विम्सनें हें कार्य केलें आहे." असे उद्‌गार विम्सची प्रशंसा करतांना हेन्री ली यानें काढले आहेत. विम्सकृत वॉशिंग्टन-चरित्राच्या मुखपृष्ठावर हा अभिप्राय पुढें पुढें छापण्यांत आलेला असे. १८४५ सालीं होरेशिओ हेस्टिंग्ज वेल्ड यानें 'जॉर्ज वॉशिंग्टन यांचें सचित्र चरित्र' लिहिलें. त्यांत तो म्हणतो, " बालकानं शिकावयाचा पहिला शब्द 'आई' हा होय, दुसरा 'बाबा' हा होय अन् तिसरा 'वॉशिंग्टन' हा होय." ... विम्स व त्याचे वारसदार चरित्रकार या मताशीं सहमत असावेत.

बोधवादी चरित्रें लिहिणारे विम्स आणि अन्य लेखक, वॉशिंग्टनचें खरें व्यक्तित्व झांकळून टाकण्याच्या दोषाचे बऱ्याच अंशीं वांटेकरी आहेत, असें आपल्याला वाटणें स्वाभाविक आहे. तथापि त्यांची बाजू म्हणून आपल्याला हें म्हणावें लागेल कीं, वॉशिंग्टनना ठोकळेबाज संतमूर्ति बनविण्याचा त्यांचा उद्देश नव्हता. या प्रवृत्तीविरुद्ध तेहि सावध असलेले दिसतात. खुद्द विम्सनेंच एका ठिकाणीं लिहिलें आहे : वॉशिंग्टन यांच्या प्रशंसापर होणाऱ्या बहुतेक अलंकारप्रचुर भाषणांत वॉशिंग्टन यांचें घडणारें दर्शन म्हणजे ढगांच्याहि वर असलेल्या उत्तुंग अशा देवयोनींतील आत्म्याचें दर्शन होय. पूजनीय विभूति म्हणूनच ते आपल्यापुढें साकार केले जातात. त्यापेक्षां खालच्या पातळीवरून त्यांचें दर्शन घडविलेंच जात नाहीं. सभापरिषदांत सूर्यप्रकाशाचा स्रोत आणि युद्धभूमीवर झंझावात हेंच त्यांचें स्वरूप नेहमीं दाखविलें जातें." आदर्श पुरुष आणि 'एक माणूस' अशा दोन्ही स्वरूपांत वॉशिंग्टन यांचें दर्शन घडविण्याची विम्सला इच्छा होती. आपल्या प्रभावी वर्णनशैलीनें त्यानें वॉशिंग्टन यांचें जें आभासचित्र उभें केलें, त्याचा प्रभाव सबंध एक शतकभर अखिल राष्ट्रावर टिकला. तथापि विम्सनें निर्मिलेलें हें आभासचित्र म्हणजे संगमरवरी दगडाची निर्जीव मूर्ति नव्हती. आपण रंगविलेलें चित्र हेंच खरें चित्र आहे, असें मानण्याचा लोकांचाच अट्टाहास नसता तर आपण तसें आभासचित्र रेखाटलेंच नसतें, असा दावा विम्स खासच करूं शकला असता. वॉशिंग्टन यांच्या कुटुंबाचें ध्येयवाक्य '*Exitus acta probat*' ( The event justifies the deed ) असें होतें. 'आपल्या कृत्याचा बरेवाईटपणा परिणामरूप घटनेनें ठरतो' असा याचा आशय सांगतां येईल. या सूत्राचें चुकीचें भाषांतर करून विम्स, 'साध्यावरून साधनाचा बरेबाईटपणा ठरतो,' ( The end justifies the means ) असें म्हणूं शकला असता. तें कांहीं असो, अगदीं निर्दोष, एकोणिसाव्या शतकांत प्रशंसनीय गणल्या जाणाऱ्या ( धैर्यापासून वक्तशीरपणापर्यंत, सौजन्यापासून काटकसरीपणापर्यंत ) माणसांत असूं शकतील अशा सर्व गुणांनीं संपन्न आणि सदा यशवंत असेंच चित्र वॉशिंग्टनची व्यक्तिरेखा म्हणून आपल्यासमोर विम्सनें ठेवलें हें खास.

**राष्ट्रपिता**

एक गोष्ट निर्विवाद आहे कीं, अनेक मोठमोठ्या लोकांच्या दृष्टीनें वॉशिंग्टन हे मर्त्य नव्हेच, तर ढगांत राहणारे देवदूतच होते. हेन्री लीच्या, वारंवार वापरल्या गेलेल्या वाक्प्रयोगाचा उपयोग करून म्हणायचें झालें तर *वॉशिंग्टन हे युद्धआघाडीवर पहिले होते, शांतताआघाडीवरहि त्यांचें प्रथमस्थान होतें आणि देशबांधवांच्या अंतःकरणांतदेखील त्यांचें अग्रस्थानच होतें*—कालानुक्रमाच्या दृष्टीनें असो कीं भावनात्मक दृष्ट्या असो, त्यांचें अग्रस्थान सिद्ध आहे. ते अमेरिकेचे पहिले सरसेनापति होते आणि पहिले राष्ट्राध्यक्ष तेच होते. नवीनच जन्माला येणाऱ्या राष्ट्राला ज्याच्याकडे पाहतां येईल, असा सर्वश्रेष्ठ जननायक स्वजनांतूनच निर्माण होणें अगत्याचें असतें. वॉशिंग्टन हे असे अस्सल राष्ट्रनायक होते. ब्रिटनचा राजा तिसरा जॉर्ज याला जेफर्सन जसें संबोधीत तसें संबोधून म्हणायचें झाल्यास, 'जॉर्ज गुल्फ'चें उच्चाटन होऊन त्याच्या जागीं 'जॉर्ज वॉशिंग्टन'ची प्रस्थापना होणें स्वाभाविकच होतें. आणि न्यूयॉर्कमध्यें प्रत्यक्षतः तसा प्रकार झाला देखील. तेथें असलेला तिसऱ्या जॉर्जचा पुतळा नष्ट करण्यांत आला होता. त्या पुतळ्याच्या पायाचाच उपयोग वॉशिंग्टन यांचा पुतळा उभारण्यासाठीं करण्यांत आला.* आणि १८१५ सालीं युनायटेड स्टेट्सच्या प्रवासाला आलेल्या पॉल स्विनिन या युरोपीय प्रवाशानें म्हटलेलें आहे: "आपल्या घरांत वॉशिंग्टनची तसबीर लावणें हें आपलें पवित्र कर्तव्य आहे, असें प्रत्येक अमेरिकनाला वाटतें. आपण लोक ज्याप्रमाणें धार्मिक संतांच्या प्रतिमा घरांत ठेवतों तसें हें आहे." अमेरिकेच्या दृष्टीनें वॉशिंग्टन हे आद्य प्रणेते आणि विमोचक होते; ते कुलदैवतहि होते आणि धर्मरक्षकहि होते. कालविसंगति दृष्टीआड केल्यास, चार्लेमान, सेंट जोन आणि नेपोलियन बोनापार्ट यांचीं व्यक्तित्वें जणूं त्यांच्या रूपानें एकवटलेलीं होतीं.

वॉशिंग्टन यांच्यानंतर इतक्या राष्ट्रीय गौरवाचा मान लाभलेले पुरुष फक्त

* आणि प्रिन्स्टन कॉलेजच्या नासो हॉलमधील ब्रिटनचा एक राजा दुसरा जॉर्ज याची जी तसबीर होती, ती लढाईच्या वेळीं तोफेचा गोळा पडून छिन्नविच्छिन्न झालेली होती. राजाच्या या तसबिरीच्या जागीं बसविण्यासाठीं वॉशिंग्टनची तसबीर चार्ल्स विल्सन पील याच्याकडून कॉलेजच्या विश्वस्तांनी १७८३ सालीं मागविली होती.

अब्राहाम लिंकन हे होत. कालानुरूप, कांहीं बाबतींत आज वॉशिंग्टनपेक्षां राष्ट्र-नायकत्व लिंकनकडे दिलें जातें. वॉशिंग्टन यांनीं राष्ट्राध्यक्षपदाचीं अधिकार-वस्त्रें उतरवितांना जें निरोपाचें भाषण केलें, तें 'जुना करार' मानल्यास लिंकन यांनीं दुसऱ्यांदा राष्ट्राध्यक्षपद स्वीकारतांना केलेलें उद्घाटनाचें भाषण म्हणजे 'नवा करार' होय, इतकें महत्त्वाचें स्थान राष्ट्रीय कागदपत्रांत त्याला लाभलेलें आहे. तथापि, इतकें होऊनदेखील लिंकन हे माणूसच वाटतात. ते कालातीत ठरलेले नाहींत; उलट कालाची निशाणी त्यांच्या व्यक्तित्वावर उमटलेली दिसते. राष्ट्रीय सभेच्या घुमटावर स्वातंत्र्य आणि विजय यांच्या प्रतीकात्मक मूर्तींच्या मधोमध वॉशिंग्टन यांची ब्रुमिडींनें घडविलेली देवसदृश मूर्ति बसविलेली आहे. लिंकन यांचें असें चित्र कल्पनेनें बघणेंहि अशक्य आहे. 'दि व्हर्जिनिअन्स'-मध्यें थॅकरेनें वॉशिंग्टन यांचें रंगविलेलें शब्दचित्र अमेरिकन टीकाकारांना जसें अत्यंत आक्षेपार्ह वाटलें होतें, तसें शब्दचित्र जर कोणीं ललित कृतींत लिंकन यांचें रेखाटलें तर आजचे अमेरिकन टीकाकार त्या लेखकावर खासच तुटून पडणार नाहींत. तसें पाहिल्यास इतर कोणत्याहि अमेरिकन राष्ट्रपुरुषाच्या बाबतींत असा प्रकार घडला तर अमेरिकन टीकाकार आज रुष्ट होणार नाहींत. पण त्या वेळीं थॅकरेवर संतापून झालेल्या टीकेचे नमुने पाहा: एका संतप्त समीक्षकानें लिहिलें होतें, "हा अनृत लिखाणाचा अगदीं अर्क आहे. वॉशिंग्टन हे इतर सामान्य माणसांसारखे मुळींच नव्हते. सामान्य जीवनाच्या, कनिष्ठ विकारांच्या पातळीवर त्यांचें उदात्त चारित्र्य आणणें म्हणजे मानवजातीच्या सामान्य इतिहासांतील अत्यंत दिव्य पर्व घडलेंच नाहीं असें म्हणण्यासारखें आहे." दुसऱ्या एका टीकाकारानें थॅकरेविरुद्ध अशीच झोड उठविली होती. त्यानें लिहिलें होतें, "वॉशिंग्टन यांचें निष्कलंक चारित्र्य हें आम्हांला लाभलेलें वरदान आहे. अन्य थोर पुरुषांच्या ठायीं असलेले दोष त्यांच्या ठायींहि होते असें म्हणूं नका! नाहीं तर हौदन यांनीं त्यांचा जो निर्मळ नि हिमधवल पुतळा तयार केलेला आहे त्याच्या रूपानें दैवी शक्ति तुमच्यापुढें येऊन उभी ठाकेल आणि आपल्या झगझगीत आणि जळजळीत दृष्टिपातानेंच तुमचें पारिपत्य करील!"

ही धमकी अपूर्वच होय! पण, एक शतकापूर्वीं वॉशिंग्टन यांच्याविषयीं अमेरिकनांच्या भावना किती तीव्र होत्या, याचीच ही धमकी द्योतक आहे. अशाच प्रकारें, वॉशिंग्टनच्या चारित्र्याला धका लागूं नये या कल्पनेनेंच, १८३०

सालीं त्यांच्या पत्रव्यवहाराचें संपादन करतांना जारेड स्पार्क्स यांनीं आदरभावनेचा अतिरेक दाखविला होता. वॉशिंग्टन यांचा मोठेपणा उठून दिसावा म्हणून त्यांच्या पत्रव्यवहारांत स्पार्क्स यांनीं दुरुस्त्या केल्या, अशी टीका नंतरच्या काळांत झाली. स्पार्क्स हे तसे लायक इतिहासकार होते; पण आधुनिक कसोटी लावल्यास, त्यांची संपादनपद्धति अत्यंत गबाळी होती. कांहीं सुस्पष्ट धोरणच त्यांच्या संपादनांत नव्हतें. वॉशिंग्टन यांच्या पत्रव्यवहारांतील जो भाग त्यांना कनिष्ठ दर्जाचा वाटला तो त्यांनीं गाळला असें दिसतें; कांहीं ठिकाणीं दुरुस्त्या देखील केल्या. या दुरुस्त्यांचीं दोन ढळढळीत उदाहरणें म्हणजे 'जनरल पुटनाम' यांचा उल्लेख वॉशिंग्टन यांनीं 'ओल्ड पट' असा केलेला होता, तो बदलून स्पार्क्सनीं 'जनरल पुटनाम' असा केला. आपल्याजवळील साधनसामग्रीच्या अपुरेपणाचें वर्णन वॉशिंग्टन यांनीं 'मच्छराचें देखील पोट भरणार नाहीं इतकी' असें केलें होतें, हा वाक्प्रयोग गाळून स्पार्क्स यांनीं, "आमच्या या क्षणींच्या गरजेच्या दृष्टीनें अत्यंत अपुरी" असे शब्द घातले. असें करतांना, 'वॉशिंग्टन हे अन्य पुरुषांसारखे मुळींच नव्हते' अशी जी अमेरिकनांची श्रद्धा होती, तिचाच प्रतिध्वनि स्पार्क्स यांनीं उमटविला होता. वॉशिंग्टन यांच्यामध्यें अमुक एक न्यून होतें असें मान्य करणें म्हणजे खुद्द राष्ट्राला ढका लावणें होय, अशी भावना होती. ही श्रद्धा जतन करण्याच्या हिरीरीनेंच १९२० सालीं जे. पी. मॉर्गन यांनीं आपल्या हातीं लागलेला वॉशिंग्टन यांचा कांहीं पत्रव्यवहार जाळून टाकला. तें लिखाण 'कनिष्ठ दर्जा'चें होतें, असें वाटल्यावरून त्यांनीं तसें केलें. वॉशिंग्टन यांचे विरोधक असलेल्या बेनेडिक्ट अर्नोल्ड यांच्यासारख्या व्यक्ति मातृभूमीशीं द्रोह करणाऱ्या मानल्या गेल्या आणि त्यांच्यावर लोकांचा राग झाला. या लोकांनीं केवळ राष्ट्रद्रोहच केला असें नव्हे, तर त्याबरोबरच त्यांनीं पावित्र्यविडंबनसुद्धां केलें होतें, असें लोकांना वाटत होतें.

वॉशिंग्टनभक्तीचा पंथ उदयास आलेला कांहीं अमेरिकन लोकांना रुचला नव्हता. विशेषतः जॉन ॲडम्सना या प्रकाराची चीड आलेली होती. साऱ्या राष्ट्राचें पितृत्व वॉशिंग्टन यांनीं स्वीकारावें म्हणूनच परमेश्वरानें त्यांना स्वतःची संतति दिली नाहीं, अशा प्रकारच्या कल्पनांच्या रूपानें वॉशिंग्टनभक्तीचा जो अतिरेक होत होता, तो त्यांना कसासाच वाटत होता. तथापि राष्ट्राचे सद्गुण वॉशिंग्टन यांच्यांत प्रतिबिंबित झाले आहेत, या भूमिकेऐवजीं वॉशिंग्टन यांचेच

सद्गुण राष्ट्राच्या ठायीं प्रतिबिंबित झाले आहेत, या सिद्धान्ताचें शस्त्र हातीं धरून, इतर राष्ट्रांतील विरोधकांविरुद्ध वॉशिंग्टन यांच्या संरक्षणार्थ वादाच्या रणांगणावर उतरावयास स्वतः ॲडम्स हे तयार होते. वॉशिंग्टन महान् होते, याचें कारण त्यांच्या राष्ट्रांत ज्या सद्गुणांचा विकास झाला होता, ते त्यांच्यांत प्रतिबिंबित झाले होते कीं उलट त्यांचेच सद्गुण राष्ट्रांत प्रतिबिंबित झाले, असा प्रश्न निर्माण व्हावा, यांतच त्यांचा मोठेपणा होता! म्हणजे, राष्ट्रपिता म्हणून वॉशिंग्टन यांच्याकडे बघण्याच्या दोन भूमिका होत्या. वॉशिंग्टन म्हणजे राष्ट्राचें प्रतीक ही एक भूमिका; तर दुसरी भूमिका म्हणजे ते स्वयंभू होते ही. तथापि या दोन्ही भूमिकांवरून बघितलें तरीदेखील "ते देशाशीं इतके एकरूप झाले होते कीं, अशा सायुज्यतेला तोडच नव्हती. वॉशिंग्टन म्हणजे राष्ट्राचें मन होतें; राष्ट्र ही जणूं त्यांचीच प्रतिमा होय!" अशा आशयाचे जे उद्गार रुफ़स ग्रिसवोल्ड यांनीं काढले आहेत, तशीच राष्ट्राची भावना होती हें खास. आणि नामकरणाच्या दृष्टीनें तें खरेंच होतें. वॉशिंग्टन यांचें नांव सर्व देशभर इतकें दुमदुमूं लागलें कीं, माणसांच्या जीवनांत त्याला स्थान लाभलें आणि विविध स्थळांशींहि तें निगडित झालें, हें आपण पाहिलें आहेच. *वॉशिंग्टन* आयर्व्हिंग हें नांव त्याचें द्योतक आहे. वॉल्ट व्हिटमन यांच्या एका भावाचें नांव *जॉर्ज वॉशिंग्टन* व्हिटमन असें होतें. गुलामगिरींतून मुक्त झालेल्या बुकर टालियाफोरोसारख्या निग्रो पोराला *वॉशिंग्टन* या उपनांवाचा स्वीकार करणें म्हणजेच अमेरिकन नागरिकत्वाचा स्वीकार केल्याचें द्योतक होय, असें वाटलें.

### निष्काम बुद्धीचा देशभक्त

राष्ट्रपिता म्हणून वॉशिंग्टन यांचें स्थान अनन्य असलें तरी या पदावर, त्यांच्यापेक्षां कमी प्रमाणांत का होईना, बेंजामिन फ्रॅंकलिन यांचा हक्क मानला जातो. या संबंधांत जॉन ॲडम्स यांनीं संत्रस्त भावनेनें पुढील उद्गार काढले आहेत: "आमच्या क्रांतीचा इतिहास म्हणजे अथपासून इतिपर्यंत असत्याची मालिका बनणार आहे. साऱ्या लिखाणाचें सार हें दिसतें कीं, जणूं डॉ. फ्रॅंकलिन यांनीं आपली विजेची कांडी जोरानें जमिनीवर आपटली आणि त्याबरोबर सेनापति वॉशिंग्टन जमिनींतून वर आले! जणूं डॉ. फ्रॅंकलिन यांनीं आपल्या विजेच्या कांडीनें वॉशिंग्टन यांच्यांत तेजाचा प्रवाह खेळविला आणि मग या दोघांनींच

सारें धोरण ठरविलें, कायदे तयार केले आणि युद्धही केलें, असाच सूर साऱ्या लिखाणांत दिसून येतो." तथापि निष्काम बुद्धीचा देशभक्त म्हणून असलेलें वॉशिंग्टन यांचें स्थान मात्र स्वतंत्र आहे. अमेरिकेंतील सत्तेचीं सर्वश्रेष्ठ अशीं दोन्ही पदें विभूषित करून दोन वेळां सार्वजनिक जीवनांतून निवृत्त होऊन खाजगी जीवन व्यतीत करण्याचा मार्ग अनुसरणें याला इतिहासांत जवळ जवळ तोड नाहीं. इतिहासांतील घटनांच्या अगदीं विरुद्ध ही घटना आहे. अशा निर्मम वृत्तीमुळें लोकांनीं थक्क व्हावें हें स्वाभाविकच होतें. सिसिलींत शातता प्रस्थापित करण्याची जबाबदारी पार पाडल्यानंतर उर्वरित जीवन निवांतपणें घालविणाऱ्या कोरिंथच्या टिमोल्न या वीरात्म्याशीं जॉर्ज वॉशिंग्टन यांची तुलना करावीशी वाटणें स्वाभाविक होतें.

१७७९ सालीं वॉशिंग्टन यांना उद्देशून मेरीलँडमधील एक कवि चार्ल्स व्हॅर्टन यांनीं 'पद्यमय पत्र' लिहिलें होतें. त्यांत त्यांनीं वॉशिंग्टनची तुलना अशाच दुसऱ्या निष्काम वृत्तीच्या वीरात्म्याशीं केली आहे :

> *"रोमकडून हातीं शस्त्र धरण्याचा आदेश येतांच, कडव्या वृत्तीचा शेतकरी सिनसिनॅटस आपली वडिलार्जित शेतवाडी मागें ठेवून रणांगणाकडे धावला. बंडखोर वोल्सींना तत्काळ शरण आणून विजय संपादन केल्यावर देश सुरक्षित झाला, हें बघून तो पुनः आपल्या शेतावर पूर्वीप्रमाणें नांगर धरण्यासाठीं परतला."*

ॲडिसनच्या 'कॅटो' या नाटकांतील तरुण वीर कॅटो याच्याशींहि वॉशिंग्टन यांची तुलना होऊं लागली. "यशानें बहकून न जातां, यशस्वी म्हणवून घेण्यास सुपात्र ठरण्याइतकी समतोल वृत्ति माणूस राखूं शकत नाहीं," अशा आशयाचें एक वचन या नाटकांत आहे. "सन्मानाचें स्थान म्हणजे वैयक्तिक कर्तव्य-पालनाची भूमि होय," असेंहि दुसरें वचन त्यांत आहे. जॉर्ज वॉशिंग्टन हीं वचनें मोठ्या आवडीनें उद्धृत करीत असत.

वरील निष्काम वृत्तीच्या वीरांशीं तुलना करतांनाच, ज्यांची देशसेवा इतकी निष्काम नव्हती त्यांच्यापेक्षां वॉशिंग्टन किती निराळे होते, हेंहि दाखविण्याचा प्रयत्न होत होता. हें आगळेपण दाखवून देण्यासाठीं सुला, सिझर, वॅलेन्स्टीन-क्रॉम्वेल यांचीं नांवें पुढें ठेवलीं जातच; पण वॉशिंग्टन यांच्या समकालीन

असलेल्या नेपोलियनशींहि त्यांची तुलना करून त्यांचें आगळेपण दाखविलें जात असे. वॉशिंग्टन आणि नेपोलियन यांच्यामधील गुणवैधर्म्य तर अत्यंत सुस्पष्ट होतें. आणि या दोघांमधील गुणवैधर्म्याबद्दल लिहितांना बायरननें वॉशिंग्टन यांचें वर्णन ' जगाच्या पश्चिम भागांतले सिनसिनॅटस ' असें केलेलें आहे. असें वर्णन करणारा बायरन हा कांहीं एकटाच नव्हता. असे अनेक लेखक होते. शिवाय, निष्काम बुद्धीचे देशभक्त गणल्या जाणाऱ्यांच्या सर्वच कृति कांहीं या कसोटीला उतरणाऱ्या नसतात.

टिमोल्नबद्दल लिहितांना प्लुटार्कनें म्हटलें आहे, " अन्य महान् सेनानींच्या सर्व कृतींकडे पाहिल्यास त्यांचें तेजोवलय हिंसा, शारीरिक-मानसिक यातना आणि कष्ट यांनीं डागळलेलें दिसतें. त्यामुळें त्या सर्वांच्या जीवनांत लज्जास्पद असें कांहीं तरी असतें, पश्चात्ताप वाटावा असें कांहीं तरी असतें. " पण असें लिहिणाऱ्या प्लुटार्कलाहि मान्य करावेंसें वाटलें आहे कीं, टिमोल्न एकदां कां होईना, पण दुष्टपणाकडे झुकला होताच. याचा अर्थ असा कीं, निष्कलंक देश-भक्तांच्या मंडळांतदेखील जवळजवळ पौराणिक अद्‌भुत विभूति बनलेल्या ल्युसिअर किंक्टिअर सिनसिनॅटसखेरीज दुसरी कोणीच व्यक्ति जॉर्ज वॉशिंग्टनशीं तुलना करण्यास सुपात्र नाहीं. आणि या निष्कलंक देशभक्तांच्या यादींत इपॅमिनोंडास, ॲगेसिलॉस, ब्रूटस वगैरे जे पुरुष आहेत, ते सारे प्राचीन इतिहासांतलेच आहेत. ही यादी विद्यमान कालांतील पुरुषांची नाहीं. अशा पुरुषांच्या यादींत वॉशिंग्टन समाविष्ट होणें म्हणजे आधींच त्यांच्याकडे ज्या स्वप्नाळू अवास्तव दृष्टीनें आपण बघतों, ती दृष्टि अधिक स्वप्नाळू नि अवास्तव बनविणें होय. एकोणिसाव्या शतकांतील प्रारंभींच्या काळांतलें अमेरिकेंतलें वातावरण राष्ट्रीय पुनरुत्थानाचें होतें आणि त्या वातावरणांत वॉशिंग्टनना अशा पौराणिक कालाला शोभणाऱ्या निष्कलंक महापुरुषाचें स्थान लाभणें सुसंगतच होतें. अर्थातच विम्सच्या पंथांतील लेखकांनीं वॉशिंग्टन यांची जी व्यक्तिरेखा 'कल्पिली' होती तिच्याशीं हें स्थान थोडेंसें विसंगतच म्हणावें लागेल. तथापि इथें एक लक्षांत घेतलें पाहिजे कीं, १८४० सालीं होरॅशिओ ग्रीनफ यानें तयार केलेल्या वॉशिंग्टनच्या प्रचंड पुतळ्याच्या मुखांत सिगार दाखविला होता, त्याबद्दल सडकून टीका झाली होती. आपल्या 'राष्ट्रपित्या'च्या मुखांत असा सिगार दाखविणें

म्हणजे पावित्र्यविडंबन होय, असें पावित्र्यविडंबन करायला कोणीं धजावें ही निषेधार्ह गोष्ट होय, असाच सूर त्या टीकेंतून निघत होता.

### क्रांतिकारक नेता

एक क्रांतिकारक नेता म्हणून वॉशिंग्टन यांचें जें स्थान आहे, तें युनायटेड स्टेट्सबाहेरच्या जगांत मुख्यतः जास्त मानलें गेलेलें आहे. विशेषतः त्यांच्या आयुष्याच्या अखेरच्या दशकांत त्यांच्याकडे 'क्रांतिकारक नेता' म्हणून बघण्याचा कल फार होता. अर्थात् नंतरहि पुढील शंभर वर्षेंपर्यंत ही भावना वसत होतीच. वॉशिंग्टन म्हणजे लोकनेता, राष्ट्रविमोचक, राष्ट्रवादाचा पुरस्कर्ता, आधुनिक काळांतील पहिल्या महान् क्रांतीचा विजयी वीरात्मा, अशा विविध रंगांनीं काढल्या गेलेल्या त्यांच्या 'क्रांतिकारक नेता' या चित्राला ध्येयवादाची विशेष झिलई दिलेली होती. अर्थातच त्यामुळें लफायेत, थॅडयूस कॉस्क्युस्को, टाउसेंट ला-ओव्हर्चर, बोलिव्हार आणि गॅरिबाल्डी यांच्या यादींत वॉशिंग्टन यांना अग्रस्थान लाभावें, हें स्वाभाविकच होतें.* अमेरिकेच्या क्रांतीचा आदर्श पुढें ठेवून त्या क्रांतीबरहुकूम क्रांति घडवून आणण्याचा प्रयत्न करणाऱ्या फ्रेंच जनतेच्या दृष्टीनें स्वाभाविकपणेंच वॉशिंग्टन यांचें महत्त्व विशेष होतें. फ्रान्समध्यें त्यांचें नांव 'Vasington', 'Vashington' किंवा 'Wassington' अशा निरनिराळ्या प्रकारें लिहिलें वा उच्चारलें जाई. फ्रेंचांना वॉशिंग्टन हे क्रांतीचें प्रतीक वाटत. १७९१ सालीं पॅरिस येथें एका चार-अंकीं शोकात्मिकाचे प्रयोग होत असत. बिलार्दन डि सौविनी या लेखकाच्या या नाटकाचें नांवच 'Vasington ou la Liberte du Nouveau Monde' असें होतें. दक्षिण अमेरिकेंतील देशांनीं जेव्हां स्पेनच्या साम्राज्य-सत्तेविरुद्ध उठाव केला, तेव्हां त्या क्रांतीची स्फूर्तिदेवता त्या जनतेनें वॉशिंग्टन हीच मानली. इतर ज्या ज्या देशांत क्रांति झाली, त्या त्या सर्व देशांमधील जनतेलाहि, 'नागरिकांच्या सेनेचें नेतृत्व करणारा नागरिक सेनानी' वॉशिंग्टन, हेंच स्फूर्तिस्थान वाटत आलेलें आहे. अशा लोकांनीं आपल्या स्फूर्तिदेवतेचें

* १८६० सालीं गॅरिबाल्डीच्या सिसिलीमधील मोहिमेमध्यें त्याच्या मदतीसाठी जहाजांचा जो जथा रवाना झाला होता, त्या जथ्यांतील ध्वजनौकेचें नामकरण '**वॉशिंग्टन**' असेंच करण्यांत आलेलें होतें.

चित्र आपल्यापुढें ठेवावें हें स्वाभाविकच आहे. आपल्या बंडखोर अनुयायांच्या आघाडीवर हा वीर आहे, शत्रु त्याचा पाठलाग करीत आहे, त्यांच्या मार्गांत नाना संकटें उभीं आहेत, तो एकाकी आहे, संख्येनें वरचढ शत्रुसेनेला तोंड देत आहे, हिंवाळ्याच्या थंडींत टेहळणी करीत आहे ! अनवाणी, उपाशी असे वॉशिंग्टनचे सैनिक फाटक्यातुटक्या कपड्यांत आहेत. आणि त्यांच्या पुढ्यांतील सुसज्ज, खाऊन पिऊन तृप्त अशा शत्रुसेनेला ते तोंड देत आहेत ! ... असें तें चित्र होतें. असें म्हणतात कीं, फ्रेंच क्रांतींतील कामगारवर्गांतून उभ्या केलेल्या पलटणींना वॉशिंग्टन यांच्या पलटणींना असलेलींच नांवें देण्यांत आली होतीं.

वॉशिंग्टन यांच्याकडे स्फूर्तिस्थान म्हणून बघणाऱ्या जनतेनें आपल्यापुढें उभ्या केलेल्या त्यांच्या चित्रांत आणखीहि अनेक रंग आहेत ... वॉशिंग्टनचा मार्ग अत्यंत बिकट आहे, पण ध्येयाची तळमळ आणि टॉम पेनचें लिखाण यामुळें त्यांचा धीर खचत नाहीं ! हातांची जुडी करून आणि शिर उन्नत ठेवून डेलावरे नदींतील बर्फखंडांवरून चालत ते पैलतीराला जात आहेत !...अन् अखेर विजयश्री त्यांनाच माळ घालीत आहे ! नवराष्ट्रगीतें, नवराष्ट्रध्वज, इतकेंच नव्हे तर कपड्यांच्या नव्या पद्धति निर्माण होण्याचा तो काळ होता. अमेरिकन राष्ट्रध्वज तयार करण्याच्या कामीं बेस्टी रॉसला वॉशिंग्टन यांनीं मदत केली, अशी एक दंतकथा सर्वविश्रुत आहेच. फ्रेंच क्रांतीचे नेते लफायेत यांनीं ‘ जुल्मशाहीच्या किल्ल्याची ’ म्हणजे बॅस्टिल तुरुंगाची किल्ली वॉशिंग्टन यांना पाठविली होती. तो तुरुंग १७८९ च्या जुलैमध्यें पॅरिसच्या बंडखोरांनीं हल्ला करून फोडला. हा तुरुंगच नष्ट झाला, तथापि लफायेतनें पाठविलेली ती किल्ली अजून माउंट व्हर्नॉनच्या निवासस्थानीं जतन करून ठेवलेली आहे. ही किल्ली पाठविण्याचा उद्देश विशद करतांना लफायेतनें लिहिलें होतें : “ माझ्या मानलेल्या पित्याला श्रद्धांजलि वाहण्याचें पुत्र म्हणून जें माझें कर्तव्य आहे तेंच मी बजावीत आहें. आपल्या सेनापतीविषयीं त्याच्या जासुदानें, स्वातंत्र्याच्या सेनानीला स्वातंत्र्य-सैनिकानें वाहावयाची आदरांजलि म्हणून मी जुल्मशाहीच्या किल्ल्याची ही मुख्य किल्ली पाठवून देत आहें.” अशाच एका स्वातंत्र्याच्या पाइकानें १७८२ सालीं वॉशिंग्टनना आपल्या पद्धतीनें आदरांजलि वाहिली होती. हा स्वातंत्र्याचा पाईक म्हणजे कवि कोलरिज होय. त्या वेळीं कोलरिज केंब्रिजला कॉलेजांत शिकत होता. कॉलेजच्या वसतिगृहांतील त्याची खोली त्या काळांत ‘ जहालांचा अड्डा ’

मानला जात असे. या कोलरिजनें प्रस्थापित व्यवस्थेच्या निषेधाचें, ती धुडकावण्याचें प्रतीक म्हणून आणि प्रतिगामीपणावर स्वातंत्र्याच्या बाजूनें दिलेला टोला म्हणून कॉलेजवसतिगृहाच्या नळावर जाहीर रीतीनें 'वॉशिंग्टन चिरायु होवोत!' अशी घोषणा केली होती. वॉशिंग्टन हे ध्येयवादाचें प्रतीक किती प्रमाणांत बनले होते, याचें हें द्योतक आहे. आणि विल्यम ब्लेकच्या 'अमेरिका' या कवितेंत ज्या वॉशिंग्टनचें दर्शन घडतें, तें खऱ्या माणसाचें नसून, ते कोणी उदासीन द्रष्टे महात्मेच आहेत, असें तें चित्र वाटतें.

त्यानंतरच्या काळांत, दक्षिण अमेरिकेंतील जनतेला स्फूर्ति देण्याचें कार्य 'क्रांतिकारक नेता' वॉशिंग्टन यांची स्मृतिच करतांना आढळते. बोलिव्हार हा क्रांतिनेता वॉशिंग्टन यांची मुद्रा छापलेला ताईत सदैव गळ्यांत घालीत असे. युरोपीय राष्ट्रांच्या गुलामगिरींतून मुक्त होण्याच्या लढ्यांत वॉशिंग्टन आणि युनायटेड स्टेट्स् यांनीं पुढाकार घेतला होता. त्यांच्यां मार्गानेंच जाऊन उरलेल्या अमेरिकन देशांना स्वातंत्र्यसंपादन करणें शक्य होतें. या कामीं वॉशिंग्टन यांच्या वैयक्तिक कृतीच्या आदर्शाऐवजीं त्यांचीं तत्त्वें मार्गदर्शक मानलीं गेलीं. वॉशिंग्टन यांनीं राष्ट्राध्यक्षपदावरून निवृत्त होतांना केलेलें निरोपाचें भाषण दक्षिण अमेरिकेंत ठायीं ठायीं वाचून दाखविण्यांत येत असे. त्या भाषणांत त्यांनीं सांगितलेल्या सूत्रांना खुद्द त्यांच्या देशांत जितकें महत्त्व प्राप्त झालें होतें, तितकेंच दक्षिण अमेरिकेंतहि प्राप्त झालें होतें. राजकारणी लोक आपल्या भाषणांतून वॉशिंग्टन यांचे उद्गार उद्धृत करीत असत. दक्षिण अमेरिकेंतील कित्येक शहरांतील चौकांना, बाजारपेठांना वॉशिंग्टन यांचें नांव देण्यांत आलें. बृहत्-अमेरिकेच्या एकछत्री राज्याचें स्वप्न अद्याप साकार झालेलें नाहीं. पण, तें अशक्य स्वप्न साकार झाल्यास त्याचें मुख्य स्फूर्तिस्थान वॉशिंग्टन होत, असें अंधुक रेखाचित्र रूपकात्मक वॉशिंग्टन-स्मारकांत समाविष्ट करायला हरकत नाहीं.

अर्थातच भावी पिढ्यांपुढें अनुकरणीय आदर्श म्हणून ज्यांचीं चरित्रें सादर करण्यांत आलीं आहेत, अशा अनेक महापुरुषांपैकींच वॉशिंग्टन हे एक पुरुष आहेत. प्रत्येक युग आपलें स्फूर्तिस्थान भूतकाळांतूनच निवडीत असतें. मृत पुरुषांचें पुनरुत्थान करण्याचें आपणच ठरवितों. नाहीं तर मृत पुरुष काळाच्या उदरांत गडप झालेलेच असतात. त्यांचें पुनरुत्थान आपण आपल्या अंतःकरणांत

मराठी ... 22220

करतों. आपल्या द्वारांच ते पुरुष पुनः जगांत अवतीर्ण होत असतात. त्यांच्या विषयींची आपली भक्ति आत्मकेंद्रित अहंभावनेंतून निर्माण झालेली असते. स्फूर्तिस्थानीं स्थापन केलेल्या महापुरुषाकडून आपण जें शिकूं इच्छितों, तें वस्तुतः दुसरेंतिसरें कांहीं नसून आपल्यांतल्या 'अहं'ला जें आवडत असतें, तेंच त्याच्या चरित्रावरून शिकत असल्याचा समज आपण करून घेत असतों.

विद्यमान काळाच्या मानदंडानुरूप वॉशिंग्टनच्या कार्याची अर्थसंगति लावण्यांत कांहीं पाप आहे असें नव्हे. विषय कोणताहि असो, इतिहासकार कमीअधिक प्रमाणांत असेंच करीत असतात. पुरावा हाताळतांना कांहीं इतिहासकार इतरांपेक्षां अधिक काटेकोर दृष्टि ठेवतात इतकेंच. आणि आपण काय करीत आहों, याबद्दल अति सावधान राहण्याचा परिणाम अशा इतिहासकारांना भोगावा लागतो हेंहि खरें आहे. तथापि आजच्या युगाचें परिमाण विम्स किंवा स्पार्क्स यांच्या काळांतलें नाहीं; आज आपण ऐतिहासिक अचूकपणावर जास्त भर देतों. तरी देखील अडॉल्फ हिटलरचें 'निःपक्षपाती' चरित्र लिहिलें जाण्यासाठीं अद्याप किती तरी काळ जाणें अपरिहार्य आहे. इतकेंच काय, पण फ्रॅन्कलीन रूझवेल्ट किंवा विन्स्टन चर्चिल यांचींहि अशीं निःपक्षपाती चरित्रें लिहिलीं जाण्यासाठींहि बराच काळ व्यतीत व्हावयास हवा आहे.

शिवाय, ज्याच्या व्यक्तित्वाभोंवतीं प्रचंड वलय निर्माण केलें गेलें आहे, ज्याची थोरवी फार मोठ्या प्रमाणावर फुगविली गेली आहे, असे जॉर्ज वॉशिंग्टन हे कांहीं एकटेच थोर पुरुष नव्हेत. चौदाव्या ल्युईनें तर आपला भव्यदिव्यपणा अजरामर करण्यासाठीं स्वतःचेंच स्मारक उभारण्याचा खटाटोप केला होता. मार्लबरो यांना त्यांच्या कामगिरीबद्दल सरदारकी देण्यांत आली होती; शिवाय त्यांना इतका विशाल राजवाडा बहाल करण्यांत आला होता कीं, त्याच्यापुढें माउंट व्हरनॉनचें निवासस्थान, विशाल बागेची देखभाल करणाऱ्या माळ्याच्या झोपडीसारखें वाटावें.* कान्सुलो व्हरनॉन नांवाच्या अमेरिकन स्त्रीनें मार्लबरोच्या

* ही परिस्थिति गेल्या कांहीं वर्षांतच बदललेली आहे. कारण, टेक्सासमधील एक कोट्यधीश तेलखाणीमालक हॅरॉल्डसन लफायेत हंट यांनीं डलासनजिक माउंट व्हरनॉनची प्रतिकृति उभारली आहे. हें घर अर्थात् माउंट व्हरनॉनच्या निवासस्थानापेक्षां पांचपट मोठें आहे.

एका वंशजाशीं विवाह केला होता. तिनें अशी माहिती दिलेली आहे कीं, मार्लबरोच्या ब्लेनहीम महालांतील सैंपाकघर आणि भोजनाचा दिवाणखाना यांच्यांतील अंतरच पांचशें यार्ड होतें ! ( याचा परिणाम अर्थातच जेवणाराला गार अन्न खावें लागणें हा होत असे, ही गोष्ट निराळी ! ) नेल्सनविषयीं त्याच्या देशबांधवांनीं अशीच कृतज्ञता सक्रियपणें व्यक्त केली आहे. त्याला सरदारकी बहाल करण्यांत आलीच; पण ट्राफल्गारच्या विजयानंतर लंडनमधील एका चौकांत त्याच्या स्मरणार्थ प्रचंड स्तंभ उभारून त्याचें चिरस्मारक केलें गेलें. वेलिंग्टन यांनाहि सरदारकी लाभलीच आणि त्यांच्यावर इतर पदव्यांची इतक्या प्रचंड संख्येनें खैरात केली गेली कीं, नुसत्या संख्येनेंच दडपल्यागत वाटावें ! ( आणि त्यांना मिळालेल्या देणग्या इतक्या असंख्य होत्या कीं, त्यांच्यांतून एखादें मोठें पदार्थसंग्रहालयहि उभें करतां आलें असतें. ) नेल्सन आणि वेलिंग्टन यांचीं नांवें लष्करी पलटणींना दिलीं गेलीं; शाळा, सार्वजनिक इमारती, युद्धनौका यांनाहि त्यांचीं नांवें ठेवलीं गेलीं. इतकेंच नव्हे तर, कांहीं मान्यवर परदेशी लोकांच्या नांवांतहि त्यांचें ‘ स्मारक ’ झालेलें आहे. उदाहरणार्थ, श्री. नेल्सन रॉकफेलर आणि श्री. वेलिंग्टन कू ! नेपोलियन बोनापार्ट हा तर अद्याप प्रभाव गाजवीत आहे आणि पुढेंहि कित्येक वर्षें गाजविणार आहे. नेपोलियनविषयीं अक्षरशः हजारों पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत. ( वॉशिंग्टनवरील पुस्तकांपेक्षां ही संख्या तिप्पट किंवा चौपट तरी असावी.) त्याचप्रमाणें फ्रान्समध्यें अनेक राजमार्गांना त्याचें नांव देण्यांत येऊन, नाण्यांवर त्याची मुद्रा छापून आणि त्याच्या नांवाची एक विधानपद्धति अनुस्यूत करून त्याचें नांव फ्रान्सनें चिरस्मरणीय केलें आहे. त्या राष्ट्राच्या साऱ्या जीवनांत नेपोलियनला अमर स्थान दिलें गेलेलें आहे. याशिवाय अन्य युरोपीय राष्ट्रांमध्येंहि नेपोलियनचीं स्मारकें आहेतच.

तथापि, कांहीं असलें तरी, वॉशिंग्टन यांच्या व्यक्तित्वाभोंवतीं निर्माण झालेल्या तेजोवलयाशीं - त्या रूपकात्मक स्मारकाशीं तुलना करण्याजोगें इतिहासांत कदाचित् कांहीं सांपडणार नाहीं. वॉशिंग्टनविषयींच्या विविध संकल्पना आहेत; एका पिढींतल्या संकल्पना पुढील पिढीला बदलल्या आहेत. तथापि मुख्य संकल्पना – त्या रूपकात्मक स्मारकाचीं मुख्यांगें – मात्र फारशा बदलल्या नाहींत, त्यांची एकमेकांशीं फारशी फारकत झालेली नाहीं आणि यांपैकीं एकहि संकल्पना निखालस अविश्वसनीय ठरलेली नाहीं. अत्यंत समतोल बुद्धीनें प्रत्येक शब्द

तोलून मापून वापरणाऱ्या ग्लॅडस्टनसारख्या मुत्सद्दयानें वॉशिंग्टनविषयीं जे उद्गार काढले आहेत, तसे उद्गार वॉशिंग्टन यांच्या काळांत किंवा नंतर आतांपर्यंत कोणीं तरी कोणा अन्य थोर पुरुषाबद्दल काढले आहेत काय? ग्लॅडस्टन यांचे उद्गार पुढीलप्रमाणें आहेत:

*" महान् योग्यतेच्या आणि पुण्यश्लोक लोकनेत्यांसाठीं इतिहासानें निर्मिलेल्या सर्वोच्च सिंहासनावर हक्क कोणाचा, असा सवाल मला केला गेला, तर मी क्षणाचा विलंब न लावतां सांगेन कीं, त्यावर बसण्यांची पात्रता वॉशिंग्टन यांचीच आहे. हेंच उत्तर मीं गेल्या पंचेचाळीस वर्षांत केव्हांहि दिलें असतें आणि आजहि माझें उत्तर हेंच आहे!"*

खरोखरच, इतका नितान्त पूज्यभाव इतर कोणाच्याच वांट्याला आलेला नसेल. इतक्या सर्वांगीणपणें कोणीहि पुरुष पौराणिक अद्भुत कथांच्या नायकासारखा बनला गेला नसेल. नेपोलियन हें नांव उच्चारतांच आपल्या डोळ्यांपुढें तेजस्वी सेनानी, निष्ठुर सुलतान, हद्दपारींत तळमळणारा अस्वस्थ पुरुष आणि कदाचित् बेइमान पति अशा मूर्ति साकार होतील. तथापि ही मूर्ति कितीहि भव्य असो, चित्राचा रंग कितीहि भडक असो; चित्र विश्वसनीय वाटतें, तें माणसाचें चित्र आहे, अशी ओळख आपल्याला पटूं शकते. तशीच परिस्थिति निश्चितपणें नेल्सन या नांवाबाबतहि आहे. तें नांव उच्चारतांच आपल्यापुढें गतिमान सार्वजनिक आणि भपकेबाज खाजगी जीवन यांच्या प्रतिमा साकार होतात. वेलिंग्टन या 'पोलादी सरदार' नांवानें ओळखल्या जाणाऱ्या पुरुषाचें अनेक बाबतींत जॉर्ज वॉशिंग्टन यांच्याशीं फारच साम्य आहे. पण त्यांच्याहि बाबतींत वरील विधान सत्य आहे. वेलिंग्टन म्हणतांच आपल्यासमोर एक महान् वीरात्मा, एक बडें प्रस्थ, कडवा आणि दरारा निर्माण करणारा पुरुष अशा व्यक्तिरेखा उभ्या राहतात; पण ती व्यक्ति माणूस आहे हें तत्काळ उमजतें. पण वॉशिंग्टन या नांवाच्या उच्चाराबरोबर कोणता बोध होतो? त्या नांवाच्या उच्चाराबरोबर एखादें स्थळ डोळ्यांपुढें येतें. आम्हांला जॉर्ज वॉशिंग्टन हें नांव अभिप्रेत आहे असें म्हणाल तरी तुम्हांला त्या नांवाची एखादी संस्था अभिप्रेत आहे, असाच समज होईल. आणि जर, 'आम्हांला तें नांव मुळांत ज्याचें होतें,

तो पुरुष अभिप्रेत आहे, ' असें आग्रहपूर्वक म्हणाल तरी तुम्हांला कसला बोध होईल? तुमच्या हातीं काय लागेल? खोट्यानाट्या, मानवी जीवनाशीं कसलेंहि साधर्म्य न दर्शविणाऱ्या आख्यायिकाच तुमच्या हातीं लागतील. प्रशंसनीय वर्तणुकीचे प्रसंग, राजनीतिनिपुणत्वाचे निदर्शक उद्गार या गोष्टीच हातीं लागतील. याचा अर्थ असा कीं, विभूतिमत्त्वाच्या तेजोवलयाखेरीज – त्या रूपकात्मक स्मारकाखेरीज – दुसरें कांहींच आपल्याला दिसणार नाहीं.

वॉशिंग्टन हे खरोखरच अतिमानवी सद्गुणांचा आदर्श पुतळा होते, असा याचा अर्थ आहे काय? असंख्य लेखक आपल्याला टासून सांगतात त्याप्रमाणें ते खरोखरच दोषरहित होते काय? कीं धर्मबुद्धीनें कर्तव्य करणाऱ्या मध्यमवर्गाचे ते प्रतिनिधि होते? योगायोगानें सत्तास्थानीं स्थापन झाले आणि विजयसंपादनाला निमित्तमात्र झाल्यामुळें आपोआपच विभूति अशी मान्यता त्यांना प्राप्त झाली? अमेरिकनांना जें जें प्रिय होतें, तें सर्व त्यांच्यांत प्रतिबिंबित झालेलें असल्यामुळेंच अमेरिकन लोकांना ते पूजनीय वाटले काय? प्रजासत्ताकाच्या प्रारंभींच्या काळांत राष्ट्रीय प्रतीक म्हणून किंवा राष्ट्रपुरुष म्हणून ज्यांच्याकडे बोट दाखवितां येईल, अशी ही एकच व्यक्ति होती, म्हणूनच अमेरिकनांनीं त्यांना आपलें दैवत बनविलें काय? तसें असल्यास स्वतः वॉशिंग्टन यांना याची जाणीव कितीशी होती! या प्रक्रियेला त्यांच्याकडून कितपत हातभार लागला?

आपल्याला त्रस्त करणाऱ्या कांहीं क्रूर प्रश्नांपैकीं हे थोडेसे प्रश्न आहेत. या पुस्तकाच्या अखेरच्या प्रकरणांत या प्रश्नांचीं कांहीं उत्तरें सूचित करणें शक्य होईल. तथापि पुढील तीन प्रकरणांमध्यें आपल्याला ' वॉशिंग्टन : विभूति ' संपूर्णपणें विसरून विचार करण्याचा कसून प्रयत्न करावयाचा आहे. असें करण्यासाठीं, वॉशिंग्टन या पुरुषाचें नांव आपण कधींच ऐकलेलें नाहीं, अमेरिकन वसाहतींनीं ब्रिटनविरुद्ध क्रांति केली आणि स्वतंत्र राष्ट्राची निर्मिति केली हेंहि आपल्याला माहीत नाहीं, असें समजतां आलें तर फारच उत्तम होईल. पण अशी अपेक्षा करणें म्हणजे भलतीच अपेक्षा करण्यासारखें वाटत असेल तर निदान आपण एक जाणीव तरी सतत ठेवली पाहिजे. या सर्व घटना वॉशिंग्टनना अज्ञात होत्या एवढें तरी लक्षांत ठेवण्याची काळजी आपण घेतली पाहिजे. वॉशिंग्टन यांच्या जीवनांतील घटनांकडे सिंहावलोकनात्मक दृष्टीनें पाहतांना अनेक स्तुतिपाठकांना दैवी शक्ति कार्यरत असल्याचा साक्षात्कार झालेला आहे. म्हणूनच ही वरील

जाणीव ठेवणें अगत्याचें आहे. सर्व कांहीं दैवी शक्तीकडून पूर्वनियोजित होतें आणि वॉशिंग्टन यांचें व्यक्तित्व जणूं पुढील भूमिकेसाठींच घडलें जात होतें, असें दाखवून देण्याचा प्रयत्न या लोकांनीं केलेला आहे. वॉशिंग्टन हे स्वतः वारंवार भवितव्यतेचा उल्लेख करीत असत आणि त्यांनीं स्वतःला भवितव्यतेच्या अधीन केलें हें खरें आहे. पण असें करण्यांत त्यांच्या ठायीं नेपोलियनचा अहंकार मुळींच नव्हता. भवितव्यतेनें नियोजित केलेला नेता आपण आहों, अशी त्यांची भावना कधींच नव्हती. जें घडायचें तें घडणारच, एवढेंच ते म्हणत असत. अनेकदां ते भावी परिणामांकडे बोट दाखवीत; पण त्यामागें केवळ इशारा देण्याचा हेतु असे, द्रष्टेपणाचा आव नसे. अमेरिकन जनता अमुक एका बाबतींत सावधगिरी न बाळगील तर त्याचे परिणाम शोचनीय होतील, असा फक्त इशारा देणें एवढाच त्यांच्या भाकितसदृश उद्‌गारांचा अर्थ असे. ते अत्यंत विश्वासपूर्वक पाऊल टाकीत असले तरी त्यांच्यापुढील मार्ग त्यांना अज्ञातच होता. समोरच्या अंधारांतून आरपार बघण्याची दिव्य दृष्टि त्यांना होती आणि अंधारांत पावलें टाकतांना तिचा त्यांना उपयोग होत होता, असें नव्हे. माणसांतील उदात्तता उचंबळून आणणाऱ्या पण गोंधळवून टाकणाऱ्या काळांत वावरणारे ते एक मर्त्य पुरुषच होते. त्यांच्या दृष्टीनें उद्यांचा दिवस समस्यारूप असे, तर पुढील वर्ष म्हणजे एक किचकट कोडेंच असे. वॉशिंग्टनविषयीं विचार करतांना काय वाटेल तें करून या गोष्टी आपण सतत समोर ठेवल्या पाहिजेत. त्यांच्या दृष्टीनें बघायचें तर, त्यांच्या जीवनाचा प्रवास इतिहासाच्या प्रवाहांतून झाला, त्यांनीं इतिहास घडविला असें नव्हे. त्यांना जेवढें म्हणून करणें शक्य होतें तेवढें त्यांनीं केलें इतकेंच.

प्रकरण दुसरें

# जॉर्ज वॉशिंग्टन : सन्मान्य गृहस्थ

*" वॉशिंग्टन यांचा आवडता नांगराचा चकचकीत फाळ आतां कोठें आहे ? गव्हाच्या भरारलेल्या पिकामुळें शेतें झांकून गेलेलीं आहेत आणि खेळकर वायुलहरी भरघोस कणसांच्या पिवळ्या रांगांना डुलवीत आहेत; मेंढ्यांचे कळप चरत असल्यामुळें टेकड्यांना पांढरा रंग दिल्यागत वाटत आहे; ' क्लोव्हर ' वेलींनीं आच्छादिलेल्यां कुरणांमध्यें गुरांढोरांची गर्दी दिसत आहे; नीटनेटका पोषाख केलेले मजूर गाणीं गात पीक-कापणी करीत आहेत; — हें सारें कोठें आहे ?... शांतता, समृद्धि आणि सुख-समाधान यांचें हें असें चित्र बघणें वॉशिंग्टन यांना अत्यंत आनंद-दायी वाटत असे. "*

*— मॅसॉन विम्स*

' वॉशिंग्टन-चरित्र : चरित्रनायकाच्या प्रतिष्ठेला साजेशा आणि तरुण पिढीला आदर्श असलेल्या अपूर्व आख्यायिकांसहित '

## कुळाची पार्श्वभूमि : व्हर्जिनिया

एखादा चित्रपट समाप्तीपासून प्रारंभाकडे असा उलटा दाखवावा तसें आपण मागें मागें जाऊं या. प्रथम तें प्रतीकात्मक स्मारक – तें विभूतिमत्त्वाचें वलय बाजूला सारूं या. असें करतांना काय दिसतें ? ते पुतळे अदृश्य होत आहेत. पुतळ्यांचे चबुतरेहि अदृश्य होत आहेत. माउंट व्हरनॉन येथील प्रासादाच्या

ओवऱ्या, गोलाकार उंच खांब असलेल्या ओसऱ्या, पवनचक्क्या, लाकडी सामान-सुमान हें सारें क्रमाक्रमानें नाहींसें होतां होतां, प्रत्यक्ष प्रासादहि अदृश्य होत आहे, त्याचा पायाहि दिसेनासा झाला आहे. कशाचाहि मागमूस राहिलेला नाहीं. नंतर त्या प्रदेशांतील रस्ते, गुंडाळून ठेवावेत तसे, नाहींसे झालेले दिसत आहेत. शेतें, खाणावळी, प्रार्थनामंदिरें आणि सरकारी कचेऱ्याहि दृष्टीपुढून दूर झालेल्या आहेत. तोडलेल्या झाडांच्या खुंटांना पुनः फांद्या, बुंधे, पानें दिसू लागतात न लागतात तोंच तीं झाडें लहान लहान होत त्यांचें रोपट्यांमध्यें रूपांतर झालेलें दिसत आहे; अखेर त्यांचीं बीजें दिसू लागलीं आहेत. त्या भूमीवरून ज्यांचें उच्चाटन झालें ते रेड इंडियन लोक आणि म्हशी यांच्या हाल-चाली पुनः किनाऱ्यावर दिसूं लागल्या आहेत. लोहचुंबकाकडे लोखंडाचे तुकडे आकर्षिले जावेत, त्याप्रमाणें अमेरिकन किनारा सोडून अटलांटिक पार करून पूर्वेकडे जाणारीं जहाजें युरोपच्या किनाऱ्याकडे आकर्षिलीं जात आहेत. त्या जहाजांवरील माल उतरविला जात आहे. वसाहतीसाठीं गेलेले लोक, त्यांचे नोकर, शिक्षा भोगण्यासाठीं पाठविलेले कैदी आणि गुलाम जहाजांवरून युरोपाच्या किनाऱ्यावर पुनः फेकले जात आवेत. आधीं अंधार होता तेथें सूर्य पश्चिम क्षितिजावरून वर वर येत दुपार होत आहे आणि तो पूर्वेकडे झुकत आहे. आत तो उदयाचलावर आला आहे...

पुरे ! चित्रपट उलटा बघण्याची क्रिया १६५० सालापर्यंत येतांच थांबवूं या. याच सालीं वॉशिंग्टन कुटुंबाच्या पहिल्या पुरुषानें व्हर्जिनियाच्या भूमीवर पाऊल ठेवलें. तत्पूर्वीं अर्धशतकाच्या कालाआधींच ब्रिटिश वसाहत-वाल्यांनीं जेम्स टाउनला वसाहत केली होती. रोगराई, दुष्काळ, रेड इंडियनांशीं होणारीं युद्धें आणि शासनयंत्रांत होणारे खांदेपालट या साऱ्या गोष्टींना न जुमानतां हळूहळू भूशिरांसारख्या किनाऱ्यावरील प्रदेशांत आणि पोटोमॅक, रापाहानॉक, यॉर्क, जेम्स आदि उत्तर-दक्षिण वाहणाऱ्या नद्यांच्या मुखांकडून उगमाच्या दिशेनें वसाहती वाढत गेल्या. ब्रिटनमध्यें यादवी युद्धांत स्टुअर्ट राजघराण्यांतला पहिला चार्ल्स गादीवरून पदच्युत झाला होता आणि त्याचा शिरच्छेद करण्यांत आला होता. व्हर्जिनियाचे वसाहतवाले राजपक्षाचे होते. प्रथम त्यांनीं स्टुअर्ट राजघराण्याचा पक्ष उचलून धरला, पण अखेर त्यांना पार्लमेंटची सत्ता मान्य करावी लागली होती. यामुळें बाह्यतः व्हर्जिनियांतील परिस्थितींत कांहींच बदल झाला

नाहीं. त्यानंतर एका शतकाच्या कालावधीनंतर देखील जॉर्ज वॉशिंग्टन ज्याचें वर्णन 'नवजात जंगलमय देश' असें करीत त्या व्हर्जिनियांत त्या वेळीं अन्न, आसरा, संरक्षण आणि शेतजमीन हेच प्रश्न तांतडीचे आणि महत्त्वाचे होते.

तथापि, ब्रिटनमध्यें घडलेल्या घटना, व्हर्जिनियाच्या दृष्टीनें, आज ना उद्यां महत्त्वाच्या ठरणारच होत्या. ज्या एका घटनेचे परिणाम मोठ्या प्रमाणावर घडले ती घटना म्हणजे आपल्या बापाच्या मृत्यूनंतर थोड्याच महिन्यांनीं दुसऱ्या चार्ल्सनें आपल्या एका निष्ठावंत अनुयायाला पोटोमॅक आणि रापाहानॉक या नद्यांच्या दरम्यानची उत्तर टोकाकडील विस्तृत जमीन बहाल केली. ही देणगी बहाल करून राजनिष्ठेचें चीज करण्याचा दुसऱ्या चार्ल्सचा प्रयत्न अनुकंपनीय वाटण्यासारखा होता. कारण त्या वेळीं तरुण चार्ल्स देशाबाहेर हद्दपारीचे दिवस कंठीत होता. आपल्या हुकुमाची अंमलबजावणी त्याला पुढेंमागें करतां येईल कीं नाहीं, अशी दाट शंका वाटावी अशी परिस्थिति होती. म्हणजे, जी मालमत्ता खुद्द चार्ल्सच्या ताब्यांत नव्हती तीच त्यानें दुसऱ्याला बहाल केली होती. आणि स्वतः चार्ल्सनें आणि त्या भूमीच्या नव्या 'मालका'नें कधींहि ती भूमि डोळ्यांखालून घातलेली नव्हती.

इंग्लंडच्या यादवी युद्धांत घडलेली आणखी एक घटना म्हणजे १६४३ सालीं प्युरिटन राजवटीनें एका ॲंग्लिकनपंथीय धर्माधिकाऱ्याला काढून टाकून व त्याची मालमत्ता जप्त करून अन्नाला मोताद केलें होतें. अशा दुर्दैवाचे बळी होण्याचा प्रसंग हजारोंवर आला, त्यांतलीच ही एक घटना होय. हा धर्माधिकारी तसा सुखवस्तु जीवन व्यतीत करीत होता. नॉर्दम्प्टनशायरमधील सल्ग्रेव्ह गांवीं त्याची वंशपरंपरागत इनामी जमीन होती. शिवाय ऑक्सफर्डच्या ब्रेसनोज महाविद्यालयांत तो एके काळीं विद्यार्थी-संशोधक म्हणून काम करीत होता. वरील प्रकारानंतर त्याला जगणें मुश्किल वाटूं लागलें. आणि १६५३ सालीं त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या दोघां मुलांनीं व्हर्जिनियांत जाऊन नवजीवनाला सुरुवात करण्याचें ठरविलें. त्या दोघांपैकीं जॉन हा एका जहाजावरील अधिकारी म्हणून आला. त्यानें व्हर्जिनियांतील एका जमीनदाराच्या मुलीशीं लग्न केलें आणि तेथेंच तो स्थायिक झाला. लग्न होऊन स्थायिक होणें हा कांहींसा योगायोगाचाहि प्रकार असण्याचा संभव आहे. सर्वसाधारणतः त्याची भरभराट झाली. त्यानें स्वतः जमीन मिळविली. व्हर्जिनिया नधावि सभेचा तो सदस्य म्हणून निवडून आला. त्याला 'जस्टिस ऑफ दि पीस'

देखील करण्यांत आलें. त्याचा भाऊहि पुरेसा यशस्वी ठरला. वॉशिंग्टन घराण्याची प्रस्थापना व्हर्जिनियांत अशा रीतीनें झाली. अद्याप 'घरंदाज' घराणें म्हणण्याइतकें स्थान मात्र त्या कुटुंबाला लाभलेलें नव्हतें. कारण, दोघां भावांपैकीं एकालाहि खूप श्रीमंती प्राप्त करून घेतां आली नव्हती. त्या वेळचें जीवन मोठें बिकट आणि धकाधकीचें होतें. मृत्यूची तलवार नेहमींच टांगलेली असे. उदाहरणार्थ, जॉननें एक पत्नी वारल्यानंतर दुसरी अशीं तीन लग्नें केलीं आणि त्याची तिसरी बायको तर तीनदां वैधव्य ओढवलेली स्त्री होती. जॉनचें वय पंचेचाळीसच्या आसपास असतांनाच १६७७ सालीं तो वारला.

तें कांहीं असलें तरी, व्हर्जिनिया म्हणतांच बियार्ड, कार्टर, कॉर्बिन, फिट्झ्ह्यू, हॅरिसन, ली, पेज, रॅन्डॉल्फ हीं जीं आडनांवें आपल्या डोळ्यांपुढें उभीं रहातात, त्यांच्या यादींत वॉशिंग्टन या आडनांवालाहि स्थान लाभलें हें निश्चित होय. जॉनचा वडील मुलगा लॉरेन्स याच्याकडे वसाहतींत त्या वेळीं प्रचलित असलेल्या वारसा कायद्याप्रमाणें वडिलांच्या मालमत्तेचा वारसा आला. लॉरेन्सहि विधान सभेवर निवडून आला होता. पण १६९८ सालीं वयाच्या एकोणचाळिसाव्या वर्षींच तो मरण पावला. आपल्याभोवतींच्या परिस्थितीवर पकड बसवून डोकें वर काढण्याची संधि मिळण्यापूर्वींच त्याला जगाचा निरोप घ्यावा लागला. आणि त्यानंतर मालमत्तेच्या वारशाबाबतचे वाद, जमीनमालकीचे दावे, कज्जेखटले यांच्या बुजबुजाटाचा कालखंड सुरू झाला. असल्या किचकट भानगडी म्हणजे व्हर्जिनियाच्या वसाहतकाळच्या इतिहासाचें वैशिष्ट्यच होय. लॉरेन्सच्या बायकोनें त्या वेळच्या प्रथेप्रमाणें ताबडतोब पुनर्विवाह केला आणि लॉरेन्सपासून झालेल्या दोघां मुलांना घेऊन ती आपल्या पतीकडे इंग्लंडमध्यें रहावयास गेली. मुलांना वेस्टमोरलँडमधील ॲपल्बीच्या शाळेंत पाठविण्यांत आलें. त्यांच्या सावत्र बापानें त्यांना कदाचित् इंग्लंडमध्येंच ठेवून घेतलें असतें आणि मग व्हर्जिनियांतील त्यांची मालमत्ता त्यांना कायमची अंतरली असती. पण, त्यांची आई अल्पावधींत निधन पावली आणि मग दोन्ही मुलें परत व्हर्जिनियांत आलीं. त्यांच्या मालकीच्या शेतजमिनींबद्दलच्या कायद्याच्या भानगडी हळूहळू मिटल्या. वडील मुलगा ऑगस्टीन हा त्या वेळीं एकोणीस वर्षांचा होता. व्हर्जिनियांत हें वय त्या वेळीं लग्नाचें समजलें जात होतें. त्यानें १७१५ सालीं जेन बटलर नांवाच्या तरुणीशीं

विवाह केला. या जोडप्याला झालेल्या पाहिल्या मुलाचें नांव त्याच्या आजोबाचें आणि खापरपणजोबाचेंच म्हणजे लॉरेन्स हेंच ठेवण्यांत आलें.

ऑगस्टीन कष्टाळू होता आणि त्यानें कांहीं कर्तबगारीहि दाखविली. आपल्या पित्याप्रमाणें आणि आजोबाप्रमाणें तोहि ‘जे. पी.’ झाला होता. त्याची स्वतःची आणि बायकोच्या माहेरची मिळालेली मिळून एकूण १७५० एकर जमीन त्याच्या मालकीची झाली. नॉर्दर्न नेक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विभागांत ही जमीन विखुरलेली होती. १७२६ सालीं त्यानें आणखी २५०० एकर जमीन संपादिली. ही जमीन पोटोमॅक नदीच्या खोऱ्यांत लिटल हंटिंग क्रीकला लागून होती. या जमिनीवर यापूर्वीच त्याच्या आजोबानें – जॉननें मालकी हक्क नोंदलेला होता, ती ऑगस्टीननें प्रत्यक्ष ताब्यांत घेतली इतकेंच. याशिवाय. एका लोखंड गाळण्याच्या कारखान्यांत देखील त्यानें भागीदारी मिळविली.

१७२९ सालीं ऑगस्टीनची पत्नी निधन पावली. त्यानंतर दोन वर्षांनीं त्यानें दुसरें लग्न केलें. त्या काळांत दोन वर्षांचा विधुरावस्थेचा काळ म्हणजे सापेक्षतः प्रदीर्घच होता. त्याच्या दुसऱ्या पत्नीचें नांव मेरी बॉल. त्या वेळीं तिचें वय तेवीस वर्षांचें होतें. तिचे आईबाप हयात नव्हते. इतर नातलग खूप होते. या बाईचीहि माफक मालमत्ता होती. लंडनमधील एका वकिलाचा मुलगा विल्यम बॉल हा १६५० मध्यें व्हर्जिनियांत वास्तव्यासाठीं आला होता. त्याचीच वंशज मेरी बॉल होय. मेरीचा पालक जॉर्ज इस्कीज नांवाचा आनंदी स्वभावाचा वकील होता. त्याच्याविषयीं मेरीला फार पूज्यभाव वाटे. आणि तिनें आपल्या पहिल्याच अपत्याचें नांव जॉर्ज ठेवलें तें त्या वकिलाविषयींचा आदर व्यक्त करण्यासाठींच होय, हें उघड आहे. तसें नसतें तर घराण्यांत चालत आलेल्या नांवांपैकीं जॉन हें .नांव ठेवलें गेलें असतें. कारण, लॉरेन्स आणि ऑगस्टीन हीं अशींच घराण्यांत प्रचलित असलेलीं नांवें जॉर्जच्या सावत्रभावांचीं ठेवलेलीं होतीं.

जॉर्जचा जन्म वेस्टमोरलँड परगण्यांत एका बागवाडींतील घरांत झाला. याच बागवाडीला नंतर वेकफील्ड हें नांव लाभलें. तसेंच हंटिंग क्रीकच्या शेतवाडी-पासून थोड्याच अंतरावर पोटोकमॅच्या प्रवाहाला येऊन मिळणारे जे दोन ओढे आहेत, त्यांच्या दु-आबांत वरील बागवाडी असल्यामुळें तिला पोप्स क्रीक किंवा

ब्रिजेस क्रीक हींहि संशोधनें लाभलेलीं होतीं. जॉर्जचा जन्मदिन ११ फेब्रुआरी १७३२. पण नंतर १७५२ सालीं पंचांगसुधारणा झाली तेव्हां ११ दिवसांची भर घालण्यांत आल्यामुळें, नव्या पंचांगाप्रमाणें जॉर्जची जन्मतारीख २२ फेब्रुआरी १७३२ ही होय. जॉर्जनंतर पांच मुलें भराभर झालीं. इलिझाबेथ, सॅम्युएल, जॉन, ऑगस्टीन, चार्ल्स व मिल्ड्रेड,–पैकीं अखेरचें अपत्य तान्हेपणांतच १७४० सालीं निधन पावलें.

तोंपर्यंत छोट्या जॉर्जची त्रिस्थळी यात्रा झाली होती. १७३५ सालीं स्थानांतर करून त्याचा पिता प्रिन्स विल्यम कौन्टींत रहायला गेला. नंतर तीन वर्षांनीं त्यानें पुनः स्थानांतर केलें. रापाहानॉकच्या तीरावरील फ्रेडरिक्सबर्ग या वसाहतींतील फेरी फार्म या शेतवाडीवर त्यानें घर थाटलें. पित्यामागें अनेक काळज्या लागलेल्या होत्या. अनेक बाबतींत निराशा पदरांत पडली होती. विशेषतः लोखंडाची भट्टी ही एक डोकेदुखी ठरलेली होती. तसें असलें तरी व्हर्जिनियांतील अगदीं वरच्या पातळीवरच्या श्रीमंतांत जरी नाहीं तरी सुखवस्तु वरिष्ठ वर्गांत त्यानें स्थान मिळविलें होतें खास. त्याच्या मालकीचे पन्नास गुलाम होते. मिळवितां येईल तितक्या जमिनीची मालकी त्यानें संपादन केली होती. त्याच्या मृत्युपत्रांतील यादीप्रमाणें दहा हजार एकरांपेक्षां अधिक क्षेत्रफळ त्याच्या मालकीखालीं होतें. पहिल्या पत्नीपासून झालेल्या लॉरेन्स आणि ऑगस्टीन या दोघां मुलांना त्यानें इंग्लंडमध्यें ॲपल्बी येथें शिकण्यासाठीं रवाना केलें होतें. व्हर्जिनियातील सुप्रतिष्ठित सन्मान्य सद्‌गृहस्थ म्हणून आवश्यक तें शिक्षण, वागण्याची सफाई त्यांच्यांत यावी, हा हेतु त्यांना इंग्लंडला पाठविण्यामागें होता. चलाखीनें पैसे गुंतवून आणि धोरणपूर्वक विवाहसंबंध जुळवून या मुलांनीं अफाट संपत्ति मिळविली तर त्या श्रीमंतीला साजेसा शिष्टाचार मुलांत बाणावा हा हेतु होता.

तथापि त्यानंतर परिस्थिति बदलली. जॉर्ज केवळ अकराच वर्षांचा असतांना त्याचा पिता ऑगस्टीन हा निधन पावला. पित्याची बहुतेक मालमत्ता जॉर्जच्या दोघां सावत्रभावांकडे गेली होती. फेरी फार्मचाच फक्त वारसा त्याला वयांत आल्यावर मिळावयाचा होता. तोंपर्यंत त्या शेतवाडीवर आईच्या छत्राखालीं त्याचें आयुष्य व्यतीत झालें. वसाहतींतील बालपण आणि प्रौढपण यांच्या सीमा रहात नसत. मुलांनाहि जबाबदारी अंगावर घ्यावी लागे. जॉर्जलाहि बालपण विसरून जबाबदाऱ्या अंगावर घ्याव्या लागल्या. त्याच्या बाळपणाच्या घटनांसंबंधीं

पार्सन विम्स प्रभृतींनीं रचलेल्या आकर्षक आख्यायिका मान्य करावयाच्या नसतील तर त्याचें बालपण कसें गेलें, याबद्दल तर्कच करीत रहावें लागतें. एक प्रचलित कथा अशी आहे कीं, शिक्षा भोगण्यासाठीं आलेल्या एका कैद्याला जॉर्जच्या बापानें शिक्षक म्हणून जवळ बाळगलें होतें व त्याच्याजवळ जॉर्ज लिहायला-वाचायला शिकला. ही गोष्ट शक्यतेच्या कोटींतील वाटते. कारण, त्या काळांत शिक्षा झालेले कैदी आणि करारानें बांधलेले मजूर मोठ्या प्रमाणावर व्हर्जिनियांत पाठविण्यांत येत असत. त्या कैद्यांतील कांहीं जण चांगले सुशिक्षित असत आणि ज्या गुन्ह्यांबद्दल त्यांना शिक्षा झालेली असे, ते गुन्हे तसे भयंकर स्वरूपाचे नसत. तथापि या कथेला आधार मात्र कांहीं नाहीं. त्याचप्रमाणें फ्रेडरिक्सबर्ग येथील रेव्ह. जेम्स मार्ये यांनीं चालविलेल्या शाळेंत जॉर्ज जात असे, ही हकीकत शक्यतेच्या कोटींतील वाटत असली तरी ती निश्चितपणें खरीच असेल, असें सांगतां येत नाहीं. आपण फक्त एवढाच अंदाज करूं शकतों कीं, वयाच्या सात ते अकरा वर्षांच्या दरम्यानच्या काळांत जॉर्जचें थोड्याबहुत प्रमाणांत शिक्षण झालें. त्याला ॲपल्बीला पाठविण्याचा विचार होता, असा उल्लेख कुठेंच नाहीं. याला कारणहि आहे. तें शिक्षण खर्चिक होतें आणि त्यासाठीं त्याला अनेक वर्षें आईपासून दूर रहावें लागलें असतें. तसें त्याला दूर ठेवण्याची आईची इच्छा नसावी. तें कांहीं असो, जॉर्जचें जें शिक्षण झालें तें अनेक दृष्टींनीं गांवठी पद्धतीनेंच झालें.

पित्याच्या मृत्यूनंतर या ना त्या प्रकारें ज्ञानांत भर घालण्याचा जॉर्जचा प्रयत्न चालू होता, हें उघड दिसतें. त्याच्या पौगंड दशेंतील कांहीं वह्या उपलब्ध आहेत, त्यावरून असें दिसतें कीं, त्यानें लॅटिन भाषा व गणित या विषयांचें कांहीं प्राथमिक ज्ञान संपादन केलें होतें. त्याचप्रमाणें चांगल्या वर्तणुकीचीं तत्त्वेंहि त्यानें आत्मसात् केलीं होतीं आणि इंग्रजी वाङ्मयाचेंहि थोडेंसें वाचन केलें होतें. युरोपीय शिक्षणाच्या कसोटीला लावून बघितल्यास, एका सन्मान्य सद्गृहस्थास आवश्यक असलेल्या शिक्षणाच्या दृष्टीनें जॉर्जचें झालेलें शिक्षण अगदींच तुटपुंजें होतें आणि आपल्या कांहीं समकालीनांप्रमाणें व्हर्जिनियाची राजधानी विल्यम्सबर्ग येथील 'विल्यम ॲंड मेरी' महाविद्यालयांत जॉर्ज प्रविष्ट झालेला नव्हता, हें बघितल्यास त्याचें रीतसर शिक्षण त्यापेक्षां ज्यास्त झालेलें नव्हतें हें उघड आहे. त्याला वरील महाविद्यालयांत जातां येऊं नये, याचें कारण आईचा चिक्कूपणा

आणि त्याला सतत आपल्याजवळ ठेवण्याची इच्छा हें नसेल तर मग दुसरें कोणतें कारण घडलें, तें सांगतां येत नाहीं. सारांश, जॉर्ज वॉशिंग्टन हे उच्च शिक्षित नव्हते. आणि ज्याला बुद्धिमान् विद्वान म्हणतां येईल तसे पंडित ते कधींच होऊं शकले नाहींत. जॉन ॲडम्ससारख्या अमेरिकनांशीं तुलना करतां त्यांच्यांत आणि जॉर्ज वॉशिंग्टन यांच्यामध्यें इतका मोठा फरक होता कीं, जॉन ॲडम्स यांनीं पुढील काळांत एकदां कडवट स्वरांत म्हटलें होतें, "वॉशिंग्टन पंडित नव्हते हें खास, आपल्या जबाबदारीच्या स्थानाच्या दृष्टीनें ते तसे फारच कमी शिकलेले, कमी ज्ञान असलेले आणि फारच कमी वाचन केलेले गृहस्थ होते, ही गोष्ट तितकीच निर्विवाद आहे."

त्याचप्रमाणें बुद्धीची सखोलता आणि झेप या दृष्टीनें तुलना करतां व्हर्जिनियांतील त्यांच्या समकालीन अशा थॉमस जेफर्सन व जेम्स मेडिसन यांच्या बरोबरीलाहि ते येऊं शकत नव्हते. अनेक वर्षांनीं आपल्यांतली ही उणीव जॉर्ज वॉशिंग्टन यांना जाणवूं लागली असावी. विशिष्ट प्रश्नावरील वादविवादाच्या वेळीं किंवा तात्त्विक चर्चेच्या वेळीं उपस्थित असतांना त्यांची परिस्थिति अवघडल्यासारखी होई. प्रदीर्घ काळच्या लिहिण्याच्या सरावामुळें कागदावर आपले विचार ते सुस्पष्टपणें आणि प्रभावीपणें मांडूं शकत असत. त्यांचें शुद्धलेखनहि चांगलें सुधारलें होतें. पण त्यांना प्रभावी लेखक म्हणतां येणार नाहीं.* प्रौढ वयांत वॉशिंग्टन यांच्या ठायीं बोलण्याच्या बाबतींत जी संयमशीलता दृग्गोचर होई, तिचें मूळ स्वतःच्या बौद्धिक मर्यादांबद्दलच्या जाणिवेंत होतें, असें म्हणायला हरकत नाहीं. तरुण वयांत फ्रेंच भाषेच्या ज्ञानाभावीं

* "गुणवंतांसमोर बोलतांना अगदीं वांकून उभे राहूं नका किंवा त्यांच्या चेहऱ्यावर टक लावूं नका. तसेंच त्यांच्या फार जवळ जाऊं नका. थोडें अंतर ठेवून उभे रहा" असें सांगणारे जे 'शिष्टाचाराचे नियम' त्यांच्या तरुणपणाच्या दैनंदिनींतून लिहिलेले आहेत ते स्वतः वॉशिंग्टन यांचें लिखाण असल्याचें सांगितलें जातें; पण हें लिखाण म्हणजे दुसऱ्या पुस्तकांवरून नकलून काढलेलें लिखाण आहे. नंतर प्रौढ वयांतील त्यांच्या नांवावरच्या लिखाणाबद्दल बोलायचें तर कल्पना त्यांच्या असत, पण भाषाशैली त्यांच्या चिटणिसांची असे. कारण वॉशिंग्टन त्या काळांत कामांत अत्यंत व्यग्र असल्यानें लिहिण्याला उसंत मिळणें शक्य नसे. त्यांच्या कांहीं चिटणिसांची लेखनशैली फार सफाईदार असे.

त्यांना अडचणी सोसाव्या लागल्या. आणि नंतरच्या काळांत फ्रान्सला भेट देण्याचें आमंत्रण त्यांनीं नाकारलें याचें कारण हेंच कीं, त्या देशांत दुभाष्याच्या मध्यस्थीनें संभाषण करण्याचा प्रसंग त्यांना नकोसा वाटत होता. म्हणूनच जेफर्सन आणि ॲडम्स यांच्याप्रमाणें, वॉशिंग्टन कधींच युरोपच्या प्रवासाला गेले नाहींत.

पण आपण या मुद्द्यावर फार भर देतां कामा नये. व्हर्जिनियांत त्या काळांत जेफर्सन-ॲडम्सप्रभृतींनीं गांठलेली बौद्धिक पातळी म्हणजे अपवादात्मक घटना होय. तेथील मोठमोठे श्रीमंत मळेवालेसुद्धां पुस्तकी ज्ञानाकडे वळत नसत. सांस्कृतिक पातळी उंचावणें वगैरेबाबत तर ते बेफिकीरच असत. वेस्ट ओव्हरच्या विल्यम बायर्डच्या ग्रंथसंग्रहालयांत फार फार तर तीन हजार ग्रंथ असतील. पण, व्हर्जिनियांतील त्या काळच्या भरभराटीच्या मार्गावर असलेल्या उच्च वर्गांच्या घरांत असा ग्रंथसंग्रह असण्याचें हें एकमेव उदाहरण होतें. हे व्हर्जिनियन श्रीमंत लोक इंग्लंडच्या उमरावांच्या धर्तीवर ऐषआरामी जीवन जगत; उत्कृष्ट खाद्यपदार्थ आणि मद्य यांची त्यांना विशेष आवड असे. परदेशांतून मागविलेलें उत्कृष्ट कापड आणि परदेशी सुबक लाकडी सामान यांचाहि त्यांना षोक असे. पण कांहीं इतिहासकार म्हणतात त्यापेक्षां त्यांचें जीवन कमी सुधारलेलें होतें, रहाणी कमी सफाईदार होती. बहुतेकांचीं घरें, अचंबा वाटावा इतकीं लहान असत. युरोपीय दर्जानें बघतां त्यांच्या विस्तृत शेतवाड्यांचें स्वरूप अव्यवस्थित असे. शेतांतून ठिकठिकाणीं तण माजलेलें असे व इतर बाबतींतहि गैरव्यवस्थाच असे. उदीम-व्यवसाय आणि भावभावना यांच्या दृष्टीनें हे लोक मूळ देशाला जवळ होते. त्यांचे शब्दोच्चारहि मासाच्युसेट्समधल्या लोकांप्रमाणें सानुनासिक नसून ब्रिटनमधील लोकांच्या शब्दोच्चारांशीं जुळणारे होते. फरक इतकाच कीं, निग्रो गुलामांच्या भाषेंतील भ्रष्ट शब्दोच्चार त्यांच्या मुलांच्या तोंडीं रुळलेले असत. तथापि अठराव्या शतकाच्या मध्यकालांतील व्हर्जिनिया म्हणजे आपल्या परीनें एक स्वतंत्रच जग होता; युरोपपासून दूर, तसाच वसाहतींच्या नागरी सुधारणेपासूनहि अलिप्तच होता. विल्यम्सबर्गला 'महान् राजधानी!' असें एकदां वॉशिंग्टननीं विनोदानें संबोधलें होतें. लंडनशीं तुलना राहोच, पण बोस्टन किंवा फिलाडेल्फिया यांच्याशीं तुलना केल्यास देखील विल्यम्सबर्ग हें छोटेंसें गांव होतें. आणि त्या काळांत विल्यम्सबर्ग, यॉर्कटाउन, हॅम्प्टन व

नॉर्फोक हींच काय तीं मोठीं शहरें म्हणतां येतील, अशीं गांवें व्हर्जिनियांत होतीं. अर्थात् दुसरीं शहरें वाढण्याची क्रिया चालूच होती. व्हर्जिनियाची वसाहत शेतकीप्रधान होती आणि लोकांच्या आवडीनिवडींचें स्वरूप ग्रामीणच होतें. व्हर्जिनिया विस्तारानें मोठा होता, मोठी स्वाभिमानी वसाहत होती ती. तथापि वसाहतीच्या जीवनाचीं मुख्य तीन अंगें होतीं–बागवाड्या, प्रार्थनामंदिर आणि त्या त्या पेठ्यांतील कुटुंबें हीं तीं अंगें होत. आणि त्यांना स्थानिक महत्त्वच असे. आमसभेच्या बैठकीसाठीं विल्यम्सबर्गला गेलेले त्या कायदेमंडळाचे सभासद शहरी जीवनाचा भरपूर उपभोग घेत, पण कांहीं थोडे दिवसच. त्या अल्पकाळांत नृत्यें, खाने, जुगार, नाटकें यांचा उपभोग घेत, पण एरव्हीं हे व्हर्जिनियांतील मळ्यांचे मालक नेहमींचें जें जीवन जगत, तें ग्रामीणच असे. स्थानिक प्रतिष्ठित सन्मान्य सद्‌गृहस्थांचेंच पण खेड्यांतल्या माणसांचेंच तें जीवन असे. बहुसंख्य सामान्य गरीब शेतकऱ्यांचें जीवन तर हमखास आणि नेहमींच तसें असे, हें सांगण्याची जरुरी नाहीं.

त्यांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा विषय फक्त जमीन हाच असे. सर्वसाधारण मळेमालकाच्या मालकीच्या अनेक जमिनी असत. त्यापैकीं एखादी जमीन तो स्वतः कशीत असे. तेथें मुख्य पीक तंबाखूचें काढण्यांत येई. इतर कांहीं जमिनी कुळांना देण्यांत येत. आणि पश्चिम भागांतील जमिनी, कोणीं अतिक्रमण करून बळ-कावल्या नाहींत तर तशाच पडीत रहात असत. त्यांची श्रीमंती जमिनीच्या मालकीवर अवलंबून असे. जास्तींत जास्त जमीन संपादण्यावरच त्यांचें स्वतःचें आणि त्यांच्या कुटुंबाचें भवितव्य अवलंबून असे. व्हर्जिनियांतील नॉमिनीच्या रॉबर्ट कार्टरसारखे बडे जमीनदार आपल्या श्रीमंतीची गणती 'अमुक दशसहस्र एकर जमीन' या परिमाणानें करीत असत. त्यानंतर सोनें मिळवण्याची लालसा एखाद्या सांथीसारखी पसरली ती शंभर वर्षांनीं. त्या वेळीं सोनें मिळवण्याची तीव्र तहान लागलेल्या लोकांचा ओघ मोठ्या आशेनें कॅलिफोर्नियाकडे सुरू झाला होता. सोन्याची भूक तीव्र होती, पण ती लवकरच शमली. व्हर्जिनियांतील वसाहतवाल्यांची भूक अशी क्षणभंगुर नव्हती, पण तितकीच तीव्र होती. आणि पश्चिम भागाकडे केवढी तरी विस्तृत जमीन पसरलेली होती. त्या जमिनीसाठीं मालकी हक्काचें भांडण फक्त फ्रेंच वसाहतवाले, रेड इंडियन आणि खुद्द व्हर्जिनियां-तील किंवा मेरीलँड व पेन्सिल्व्हानिया येथील प्रतिस्पर्धी यांच्याशीं असे. तेव्हां

त्यांना अडचणी सोसाव्या लागल्या. आणि नंतरच्या काळांत फ्रान्सला भेट देण्याचें आमंत्रण त्यांनीं नाकारलें याचें कारण हेंच कीं, त्या देशांत दुभाष्याच्या मध्यस्थीनें संभाषण करण्याचा प्रसंग त्यांना नकोसा वाटत होता. म्हणूनच जेफर्सन आणि ॲडम्स यांच्याप्रमाणें, वॉशिंग्टन कधींच युरोपच्या प्रवासाला गेले नाहींत.

पण आपण या मुद्द्यावर फार भर देतां कामा नये. व्हर्जिनियांत त्या काळांत जेफर्सन-ॲडम्सप्रभृतींनीं गांठलेली बौद्धिक पातळी म्हणजे अपवादात्मक घटना होय. तेथील मोटमोठे श्रीमंत मळेवालेसुद्धां पुस्तकी ज्ञानाकडे वळत नसत. सांस्कृतिक पातळी उंचावणें वगैरेबाबत तर ते बेफिकीरच असत. वेस्ट ओव्हरच्या विल्यम बायर्डच्या ग्रंथसंग्रहालयांत फार फार तर तीन हजार ग्रंथ असतील. पण, व्हर्जिनियांतील त्या काळच्या भरभराटीच्या मार्गावर असलेल्या उच्च वर्गाच्या घरांत असा ग्रंथसंग्रह असण्याचें हें एकमेव उदाहरण होतें. हे व्हर्जि-नियन श्रीमंत लोक इंग्लंडच्या उमरावांच्या धर्तीवर ऐषआरामी जीवन जगत; उत्कृष्ट खाद्यपदार्थ आणि मद्य यांची त्यांना विशेष आवड असे. परदेशांतून मागविलेलें उत्कृष्ट कापड आणि परदेशी सुबक लाकडी सामान यांचाहि त्यांना षोक असे. पण कांहीं इतिहासकार म्हणतात त्यापेक्षां त्यांचें जीवन कमी सुधार-लेलें होतें, रहाणी कमी सफाईदार होती. बहुतेकांचीं घरें, अचंबा वाटावा इतकीं लहान असत. युरोपीय दर्जानें बघतां त्यांच्या विस्तृत शेतवाड्यांचें स्वरूप अ-व्यवस्थित असे. शेतांतून ठिकठिकाणीं तण माजलेलें असे व इतर बाबतींतहि गैरव्यवस्थाच असे. उदीम-व्यवसाय आणि भावभावना यांच्या दृष्टीनें हे लोक मूळ देशाला जवळ होते. त्यांचे शब्दोच्चारहि मासाच्युसेट्स्मधल्या लोकांप्रमाणें सानुनासिक नसून ब्रिटनमधील लोकांच्या शब्दोच्चारांशीं जुळणारे होते. फरक इतकाच कीं, निग्रो गुलामांच्या भाषेंतील भ्रष्ट शब्दोच्चार त्यांच्या मुलांच्या तोंडीं रुळलेले असत. तथापि अठराव्या शतकाच्या मध्यकालांतील व्हर्जिनिया म्हणजे आपल्या परीनें एक स्वतंत्रच जग होता; युरोपपासून दूर, तसाच वसाहतींच्या नागरी सुधारणेपासूनहि अलिप्तच होता. विल्यम्सबर्गला 'महान् राजधानी!' असें एकदां वॉशिंग्टननीं विनोदानें संबोधलें होतें. लंडनशीं तुलना राहोच, पण बोस्टन किंवा फिलाडेल्फिया यांच्याशीं तुलना केल्यास देखील विल्यम्सबर्ग हें छोटेंसें गांव होतें. आणि त्या काळांत विल्यम्सबर्ग, यॉर्कटाउन, हॅम्प्टन व

नॉर्फोक हींच काय तीं मोठीं शहरें म्हणतां येतील, अशीं गांवें व्हर्जिनियांत होतीं. अर्थात् दुसरीं शहरें वाढण्याची क्रिया चालूच होती. व्हर्जिनियाची वसाहत शेतकीप्रधान होती आणि लोकांच्या आवडीनिवडींचें स्वरूप ग्रामीणच होतें. व्हर्जिनिया विस्तारानें मोठा होता, मोठी स्वाभिमानी वसाहत होती ती. तथापि वसाहतीच्या जीवनाचीं मुख्य तीन अंगें होतीं–बागवाड्या, प्रार्थनामंदिर आणि त्या त्या पेठ्यांतील कुटुंबें हीं तीं अंगें होत. आणि त्यांना स्थानिक महत्त्वच असे. ग्रामसभेच्या बैठकींसाठीं विल्यम्सबर्गला गेलेले त्या कायदेमंडळाचे सभासद शहरी जीवनाचा भरपूर उपभोग घेत, पण कांहीं थोडे दिवसच. त्या अल्पकाळांत नृत्यें, खाने, जुगार, नाटकें यांचा उपभोग घेत, पण एरव्हीं हे व्हर्जिनियांतील मळ्यांचे मालक नेहमींचें जें जीवन जगत, तें ग्रामीणच असे. स्थानिक प्रतिष्ठित सन्मान्य सद्गृहस्थाचेंच पण खेड्यांतल्या माणसाचेंच तें जीवन असे. बहुसंख्य सामान्य गरीब शेतकऱ्यांचें जीवन तर हमखास आणि नेहमींच तसें असे, हें सांगण्याची जरुरी नाहीं.

त्यांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा विषय फक्त जमीन हाच असे. सर्वसाधारण मळेमालकाच्या मालकीच्या अनेक जमिनी असत. त्यापैकीं एखादी जमीन तो स्वतः कशीत असे. तेथें मुख्य पीक तंबाखूचें काढण्यांत येई. इतर कांहीं जमिनी कुळांना देण्यांत येत. आणि पश्चिम भागांतील जमिनी, कोणीं अतिक्रमण करून बळ-कावल्या नाहींत तर तशाच पडीत रहात असत. त्यांची श्रीमंती जमिनीच्या मालकीवर अवलंबून असे. जास्तींत जास्त जमीन संपादण्यावरच त्यांचें स्वतःचें आणि त्यांच्या कुटुंबाचें भवितव्य अवलंबून असे. व्हर्जिनियांतील नॉमिनीच्या रॉबर्ट कार्टरसारखे बडे जमीनदार आपल्या श्रीमंतीची गणती 'अमुक दशसहस्र एकर जमीन' या परिमाणानें करीत असत. त्यानंतर सोनें मिळवण्याची लालसा एखाद्या सांथीसारखी पसरली ती शंभर वर्षांनीं. त्या वेळीं सोनें मिळवण्याची तीव्र तहान लागलेल्या लोकांचा ओघ मोठ्या आशेनें कॅलिफोर्नियाकडे सुरू झाला होता. सोन्याची भूक तीव्र होती, पण ती लवकरच शमली. व्हर्जिनियांतील वसाहतवाल्यांची भूक अशी क्षणभंगुर नव्हती, पण तितकीच तीव्र होती. आणि पश्चिम भागाकडे केवढी तरी विस्तृत जमीन पसरलेली होती. त्या जमिनीसाठीं मालकी हक्काचें भांडण फक्त फ्रेंच वसाहतवाले, रेड इंडियन आणि खुद्द व्हर्जिनियांतील किंवा मेरीलँड व पेन्सिल्व्हानिया येथील प्रतिस्पर्धी यांच्याशीं असे. तेव्हां

ती जमीन स्वतःच्या स्वामित्वाखालीं आणण्याची लालसा वसाहतवाल्यांनीं बाळगली तर नवल नाहीं.

व्हर्जिनियांतील वसाहतवाल्याचें भूमिप्रेम कितीहि असलें तरी जमिनीबाबतची त्याची वृत्ति निष्काळजीपणाची आणि उधळ्या माणसाला शोभणारीच होती. तो शेती करीत होता; शेती कशी करावी हें त्याला माहीत होतें; पण युरोपीय शेतकऱ्याची काटकसरीची वृत्ति मात्र त्याच्या ठायीं नव्हती. तंबाखूचें पीक काढून काढून जमिनीचा कस नष्ट होत असे. तसा कस नष्ट झाल्यास वसाहतवाल्या व्हर्जिनियन जमीनदाराला खेद वाटत असे; पण नव्या जागीं नवी शेतवाडी लागवडीला आणण्याला नेहमींच वाव असे. आणि म्हणूनच अधिकाधिक जमीन संपादण्याचेंच स्वप्न तो नेहमीं पाहात असे. या पायीं कायद्याच्या किचकट भानगडी निर्माण होत, स्पर्धेला तोंड द्यावे लागे, काळज्या वाढत असत, धोका असे, नुकसान होई; पण कांहीं झालें तरी आणखी आणखी जमीन संपादण्याचें स्वप्न तो पाहातच राही. तेंच त्याचें ध्येय असे. 'स्पेक्युलेशन' या शब्दाचा मूळ अर्थ एखाद्या तात्त्विक प्रश्नाची तर्कशुद्ध उपपत्ति लावण्यासाठीं केलेलें चिंतन असा आहे. या शब्दाचा 'जुगारी सट्टेबाजी' हा नवा अर्थ नंतर प्रचारांत आला. ऑक्सफर्ड शब्दकोशांतील माहितीप्रमाणें हा शब्द १७७४ सालीं प्रथमतः नव्या अर्थानें वापरला गेला. "ज्यांत प्रचंड फायद्याचा मोका आहे असा साहसी व धोक्याचा व्यवहार करणें किंवा तसें काम हातीं घेणें" असा 'स्पेक्युलेशन'चा अर्थ आज प्रचलित आहे. व्हर्जिनियांतील त्या काळच्या मळेमालकाचें वर्णन करण्यासाठीं 'स्पेक्युलेटर'–'जुगारी सट्टेबाज' हाच शब्द योग्य आहे. जेव्हां जरूर वाटेल त्या वेळीं अधिक मूलभूत प्रश्नांचा विचार तो करीत नसे, असा याचा अर्थ नव्हे. प्रत्येक 'सट्टेबाज' मुद्दे कसे मांडावेत आणि कसे खोडावेत, हें चांगलेंच जाणतो.

मळेमालकाचें दैनंदिन जीवन जसें होतें, तसेंच, त्याला अनुरूप असेच त्याच्या करमणुकीचे विषय असावेत, हें स्वाभाविकच होतें. त्याला तासन् तास रोज घोड्यावरून रपेट करावी लागे. ही आवश्यक गोष्टच त्यानें करमणुकीचा विषय बनविली. "माझे देशबांधव, एक मैल लांबपर्यंत घोड्यावरून रपेट करण्याची संधि मिळत असेल तर घोडा मिळवण्यासाठीं दोन मैल चालत जातील," असे उद्गार कर्नल विल्यम बायर्ड यांनीं काढलेले आहेत. मळेमालकाला घोड्यांच्या शर्यती बघण्याचा आणि त्यांवर जुगार खेळण्याचा शौक होता. त्याचप्रमाणें कोल्हे मारणें

आणि हिंस्र श्वापदांची शिकार करणें हेहि त्याचे आवडते छंद असत. अनेकदां क्रूर खेळहि त्याला आवडत. कोंबड्यांच्या झुंजी लावून त्यावरहि तो जुगार खेळे. त्या वेळचें जीवन रांगडें होतें, धोक्याचें होतें, त्यामुळें तें जीवन व्यतीत करणाऱ्यांमध्यें कांहीं प्रमाणांत हृदयशून्यता निर्माण होत असते; पण त्याचबरोबर धैर्यहि बाणत असतें. इतर वसाहतींप्रमाणेंच व्हर्जिनियांतदेखील रेड इंडियनांचीं मुंडकीं कापून आणणारांना बक्षिसें दिलीं जात असत. अनेक बाबतींत येथील फौजदारी कायदा इंग्लंडच्या कायद्यापेक्षां कडक नसला तरी त्याची अंमलबजावणी एकतर्फी आणि तडकाफडकीं होत असे. विशेषतः निग्रोकडून गंभीर गुन्हा घडल्यास शिरच्छेदाची किंवा जाळून टाकण्याची शिक्षा गुन्हेगाराला दिली जात असे.

## व्हर्जिनियानें केलेले संस्कार

तरुण वॉशिंग्टनचें जीवन जिथें व्यतीत होत होतें, तो व्हर्जिनिया हा असा होता. तेथील परिस्थितीला तोंड देण्याला आवश्यक असेंच शिक्षण त्यांना दिलें गेलें होतें. ते निशाणबाजींत चांगलेच तरबेज होते आणि उत्तम घोडेस्वारहि होते. त्या काळांतील उत्कृष्ट निशाणबाजांत आणि घोडेस्वारांत त्यांची गणना होत असे. ते चांगले उंचेपुरे होते, त्यांचा बांधा मजबूत होता आणि ते चांगलेच चपळ होते. मात्र तरुण जॉर्ज ' बिघडला ' नाहीं. जॉर्जवर आईकडून सुसंस्कार झाल्याचें सिद्ध करणारा कांहींच पुरावा उपलब्ध नाहीं. वॉशिंग्टनचें चारित्र्य घडविल्याबद्दल त्यांच्या मातेला तोंड भरून धन्यवाद दिले जात असले तरी असें दिसतें कीं, ती बाई संकुचित वृत्तीची, तक्रारखोर आणि सामान्य बुद्धीची होती आणि नंतरच्या काळांत जॉर्ज वॉशिंग्टन आईला योग्य मान देत असले तरी त्या आदरभावनेला जिव्हाळ्याचा ओलावा नव्हता. जॉर्जच्या पौगंड दशेंत तिनें निश्चितपणें एकच गोष्ट केलेली दिसते, आणि ती गोष्ट शहाणपणाची होती. जॉर्जला जहाजावर नोकरीसाठीं पाठविण्याची कल्पना धुडकावून लावण्याचें श्रेय त्या बाईला आहे.

तथापि सुदैवानें कुटुंबांत दुसऱ्या कांहीं व्यक्ति होत्या. विशेषतः जार्जचा सावत्रभाऊ लॉरेन्स याचा प्रभाव जॉर्जवर चांगलाच पडला. लॉरेन्स जॉर्जपेक्षां चौदा वर्षांनीं मोठा होता, पण तो त्याचा खराखुरा मित्र होता. त्याचें शिक्षण इंग्लंडमध्यें झालेलें होतें; त्याचें व्यक्तिमत्त्व आकर्षक होतें. आणि तो अनुभवी पुरुष होता. जॉर्जच्या पित्याची उणीव त्यानें चांगल्या प्रकारें भरून

काढली. जॉर्ज आठ वर्षांचा असतांना लॉरेन्स, नव्यानेंच उभारलेल्या अमेरिकन पलटणींत कप्तानाच्या हुद्द्यावर नेमला जाऊन वेस्ट इंडीजमध्यें त्या सैन्याबरोबर गेला होता. या पलटणींत कप्तानाच्या हुद्द्याचा मान चार व्हर्जिनियनांना लाभला होता, त्यांपैकीं लॉरेन्स एक होता. वेस्ट इंडीजमध्यें कार्टेजेना भागांतील स्पॅनिश सैन्याविरुद्ध ॲडमिरल व्हरनॉनच्या नेतृत्वाखालीं करण्यांत आलेल्या स्वारींत भाग घेण्यासाठीं लॉरेन्स गेला होता. ॲडमिरल व्हरनॉन यांची कांहीं चूक अपयशाला कारण नसली, तरी ती मोहीम फार मोठी किंमत पडून अपेशी ठरली. अमेरिकन पलटणींतील असंख्य सैनिक पिवळ्या तापाला बळी पडले. या आपत्तींतून वांचलेल्या अन्य लोकांच्या आधींच लॉरेन्स घरीं परतलेला होता व अर्ध्या पगारावर तो सैन्यांतून निवृत्त झाला होता. नंतर त्यानें व्हर्जिनियांतील सैन्याधिपतीच्या मदतनिसाच्या हुद्द्यासाठीं अर्ज केला होता व त्याची त्या हुद्द्यावर नेमणूक झाली होती. यावरून आपल्याला दिसून येतें कीं, तरुण जॉर्जवर, त्याचें भावी जीवन घडविणारा जो संस्कार झाला तो उघड उघड सैनिकी जीवनाकडे कल वळविणाराच होता. त्याच्या सावत्रभावाला लष्करी मानसन्मान न मिळो; पण त्यानें, जी एक गोष्ट भयंकर साहसी प्रयोग ठरली असती ती घडवून आणून आपलें कर्तव्य चोखपणें पार पाडलें, असेंच म्हणावें लागेल. जॉर्जमध्यें लष्करी जीवनाची आवड निर्माण करण्याला कारणीभूत होणें ही ती गोष्ट होय. लॉरेन्सच्या मनांत ॲडमिरल व्हरनॉन यांच्याबद्दलची भावना किती उत्कट होती तें, त्यानें आपल्या हंटिंग क्रीकच्या मालमत्तेचें नामकरण माउंट व्हरनॉन असें केलें, यावरून दिसून येतें. माउंट व्हरनॉनच्या निवासस्थानांत त्यानें ॲडमिरल व्हरनॉन यांची एक तसबीरहि लावली होती.

लॉरेन्सनें जॉर्जवर केलेला दुसरा संस्कार सामाजिक स्वरूपाचा होता, असें म्हणतां येईल. १७४३ सालीं म्हणजे त्यांच्या पित्याचा मृत्यु झाला त्याच सालीं लॉरेन्सनें पत्नी म्हणून जिची निवड केली, तिचें नांव ॲन फेअरफॅक्स. ही निवड अत्यंत स्पृहणीय होती. माउंट व्हरनॉन वाडीला जवळजवळ लागूनच असलेल्या बेल्व्हॉयर वाडीचे श्रीमंत जमीनदार कर्नल विल्यम फेअरफॅक्स यांची ॲन ही मुलगी होय. कर्नल फेअरफॅक्स हे व्हर्जिनियांतील एक बडे प्रतिष्ठित गृहस्थ होते. आणि ते किती वजनदार होते, ही गोष्ट लॉरेन्स व ॲन यांच्या लग्नानंतर लौकरच सिद्ध झाली. व्हर्जिनियाच्या विधानसभेचें वरिष्ठ मंडळ फक्त वसाहतींतील बारा

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

निवडक प्रतिष्ठित व्यक्तींचेंच असे. या वरिष्ठ मंडळांत कर्नल फेअरफॅक्स यांची नेमणूक झाली. जॉर्जच्या जीवनाला आकार देण्याच्या कार्यात लॉरेन्सच्या द्वारें फेअरफॅक्स कुटुंबाकडून फारच मोठा हातभार लागला. सुमारें सोळा वर्षांचा झाल्यावर जॉर्ज जवळजवळ माउंट व्हरनॉनलाच रहायला आला. बिलिअर्ड, पत्ते वगैरे खेळ तो शिकला. त्याला नृत्यहि शिकवण्यांत आलें. आणि कांहींसें मजेनें व कांहींसें मनापासून तो तरुणींकडे लक्ष द्यायलाहि लागला. त्याच्या पत्रांतून आणि दैनंदिन्यांतून मन चाळविणाऱ्या 'प्राण्यां'बद्दलचे थट्टेखोर आणि तितकेच हुरहुर व्यक्त करणारे सूचक उल्लेख आढळतात. या उल्लेखांवर चरित्रकारांनीं बरेंच चर्वितचर्वण केलेलें आहे. त्याचप्रमाणें बेट्सी फॉन्टलेरॉय नांवाच्या तरुणीविषयीं विसाव्या वर्षी वॉशिंग्टन यांना विलक्षण ओढ वाटूं लागली होती व हें प्रेमप्रकरण अखेर निष्फळ ठरलें. या विषयावरहि चरित्रकारांनीं खूप लिहिलें आहे. या गोष्टींविषयीं चरित्रकारांना विलक्षण आकर्षण वाटण्याचें कारण असें कीं, एक तर त्यामुळें वॉशिंग्टन यांचें 'माणूस' म्हणून दर्शन घडतें. दुसरें कारण असें कीं, त्यांच्या पत्रव्यवहारांतील हे सूचक उल्लेख ज्यांच्यासंबंधीं आहेत, त्या व्यक्ति नेमक्या कोण व कशा होत्या, हें आपल्याला गूढ आहे. तथापि त्या उल्लेखां-वरून जॉर्जला तरुणींशीं कसें वागावें हें कळत नव्हतें किंवा अशा प्रसंगीं त्याची वागणूक अगदीं चमत्कारिक होई, असा निष्कर्ष ठामपणें काढतां येणार नाहीं. कदाचित् तरुण जॉर्जची वृत्ति उदास गंभीर असेल आणि विनोदवृत्तीचाहि त्याच्यांत कमी अंश असेल. शिवाय, अशा प्रसगीं वागण्याची सफाई त्याच्यांत आलेली नसेल. पण, गांवांतील इतर तरुणांपेक्षां तो कांहीं निराळा होता काय ? या बाबतीं-तहि खरें काय होतें, हेंहि आपण फक्त तर्कानें ठरवूं शकतों.

सारा (सॅली) कॅरी आणि जॉर्ज यांच्या परस्परसंबंधाचा प्रश्न जॉर्जच्या जीवनाशीं अधिक निगडित आहे, पण तें कोडें सोडवितांना देखील अखेर पदरांत निराशाच पडते. कर्नल विल्सन कॅरी यांची ही मुलगी. हॅम्प्टननजिक जेम्स नदीच्या तीरावर त्यांची जमीनदारी होती. १७४८ च्या डिसेंबरमध्यें सॅली अठरा वर्षांची असतांना तिचें कर्नल फेअरफॅक्सचा वडील मुलगा जॉर्ज फेअरफॅक्स याच्याशीं लग्न झालें आणि ती बेल्व्हॉयर बाग-वाडीवर वास्तव्यास आली. तिचा पति जॉर्ज फेअरफॅक्स हा एक मनमिळाऊ तरुण होता. आणि यापूर्वी थोडेच महिने आधीं आपल्या दैनंदिनींत जॉर्ज वॉशिंग्टननीं त्याचा

उल्लेख फक्त 'श्री. फेअरफॅक्स' असा औपचारिक केलेला असला तरी, जॉर्ज वॉशिंग्टन यांना तो आपला खरा मित्र वाटावा इतके त्यांचे संबंध जुळले. पुढच्या प्रदीर्घ काळांत जॉर्ज वॉशिंग्टन आणि सॅली यांच्या भेटीगांठी वारंवार होत होत्या. जॉर्जचा नि तिचा पत्रव्यवहारहि मधून मधून चालू असे. आणि कदाचित् त्या काळांत या तरुणाच्या मनांत तिच्याविषयीं प्रेमभावनादेखील उद्भवली असेल. जॉर्ज वॉशिंग्टनच्या पत्रांवरून दिसतें कीं, सॅली त्याला फार आवडत होती, तिच्या मैत्रीचें मोल त्याला फार वाटत असे. त्याचबरोबर तिचा-आपला संबंध त्याला अस्वस्थ करणाराहि वाटत असावा, असें त्यानें तिला लिहिलेल्या पत्रांवरून दिसतें. तिनें पाठविलेलीं पत्रें मोजकींच आहेत. पण त्या पत्रांवरून दिसतें कीं, सॅलीला दुसऱ्यांकडून होणारी आपली वाहवा फार प्यार होती आणि तरुण पुरुषाकडून होणारें कौतुक व प्रणयाराधन यांच्यामधील सीमारेषेची जाणीवच तिला नसावी. मग, वॉशिंग्टनचें तिच्यावर खरोखरच प्रेम बसलें होतें काय, हा प्रश्न उभा राहतो. आणि या बाबतींतहि निश्चित विधान करण्याच्या दृष्टीनें पुरावा अगदींच तुटपुंजा आहे. मात्र आपण एक गोष्ट निश्चितपणें सांगूं शकतों आणि ती ही कीं, जरी तसें प्रेम असलें तरी तें केवळ भावनात्मकच होतें, केवळ अंतःकरणांत सलत राहणाऱ्या शल्यासारखें तें अप्रकटच राहिलें होतें.

इतर कांहीं असो, पण सॅली आणि जॉर्ज फेअरफॅक्स, लॉरेन्स आणि ॲन फेअरफॅक्स या दोन जोडप्यांमुळें जॉर्ज वॉशिंग्टनला आनंदी व सुखी जीवनाचा अनुभव चाखायला मिळाला हें खास. या लोकांशीं वागतांना तो कांहींसा संकोचानें वागत असलेला दिसला तर त्याचें कारण तो कुटुंबांतला सर्वांत धाकटा मुलगा होता व सावत्रपणाच्या नात्याचा होता, हें लक्षांत घेतलें पाहिजे. अर्थातच तो कांहीं आर्थिक दृष्ट्या कफल्लक नव्हता. लॉरेन्स आणि ऑगस्टीन या सावत्र-भावांच्या मेहेरबानीवर जगणारा असहाय व अनाथ तरुण अशी त्याची परिस्थिति नव्हती. तरी पण, आपण स्वतःच्या पायावर उभें राहून प्रगति केली पाहिजे, याची जाणीव त्याला होती. निदान, पुढें येणाऱ्या सर्व सुसंधींचा लाभ आपण घेतला पाहिजे, इतकी जाणीव तरी त्याला खास होती. योगायोग म्हणा किंवा कांहीं म्हणा, प्रगति करून घेतां यावी, अशी परिस्थिति त्याला लाभलेली होती हेंहि खरें. तौलनिक दृष्ट्या बघितल्यास फेअरफॅक्स कुटुंबांतील मुलें फार

लाडावलेलीं आणि चैनी होतीं. खुद्द जॉर्जचा सावत्र मुलगा आणि या सावत्र-मुलाचा मुलगा हेहि पुढें असेच निघाले.* वॉशिंग्टनचा स्वभाव याच्या अगदीं उलट होता. दैन्य म्हणजे काय असतं, याची आंच प्रत्यक्षतः त्याला लागलेली नसली तरी ती आंच कशी असते, याची जाणीव त्याला होती. आणि या जाणीवे-मुळेंच त्याची महत्त्वाकांक्षा बोथटली न जातां अधिक तीक्ष्णच झाली. आणि म्हणूनच १७५५ सालीं आपल्या सख्ख्या धाकट्या भावांना पाठविलेल्या पत्रांत त्यानें पुढीलप्रमाणें उपदेश केलेला आहे :

*"फेअरफॅक्स कुटुंबाशीं संबंध गुण्यागोविंदाचे आणि मित्रत्वाचे ठेवाल तर मला आनंद वाटेल. कारण जीवनाची नव्यानें उभारणी करणारे तरुण म्हणून आपल्याला अत्यंत उपयुक्त साह्य करण्याला तें कुटुंब समर्थ आहे. तेव्हां तसे संबंध निर्माण करण्याच्या दृष्टीनें त्या कुटुंबाला वारंवार भेट देत जा, असा माझा तुम्हांला सल्ला आहे."*

जीवनाच्या उंबरठ्यावर पाऊल ठेवणारा एक तरुण या दृष्टीनें जॉर्जच्या आयुष्याला लॉरेन्स आणि फेअरफॅक्स कुटुंब यांच्याकडून आणखी एक वळण मिळालें. १७५० मध्यें व्हर्जिनियांतील एका नेत्यानें ब्रिटनमधील बोर्ड ऑफ ट्रेडकडे असा दावा मांडला कीं, व्हर्जिनियाची पश्चिम सरहद्द थेट 'दक्षिण समुद्रा-पर्यंत' (म्हणजे प्रशांत महासागराला लागून असलेल्या किनाऱ्यापर्यंत) असून वसाहतीच्या हद्दींतच कॅलिफोर्नियाचाहि समावेश होतो. हा दावा भरमसाट होता, मोघमहि होता. बालवयांत जॉर्जनें आपल्या अभ्यासाच्या वह्यांमध्यें जी नोंद केली आहे, ती बघतां ही मागणी किती भरमसाट आणि मोघम होती, याची कल्पना येते. 'आइसलँड', 'ग्रीनलँड', 'बार्बारोस व अन्य कॅरिबियन बेटें' इत्यादींच्या रांगेतच कॅलिफोर्नियाची नोंद जॉर्जनें उत्तर अमेरिकेचें 'मुख्य बेट' अशीच केली आहे. तथापि, आपल्याला काय पाहिजे, याची स्पष्ट जाणीव प्रत्येक महत्त्वाकांक्षी व्हर्जिनियन व्यक्तीला होती. त्याला निश्चित माहीत होतें कीं, पश्चिमे-

* जॉर्जचा सावत्र मुलगा जॅक याच्याबद्दल त्याच्या एका शिक्षकानें म्हटलें होतें. "माझ्या उभ्या आयुष्यांत इतका आळशी व विलासी तरुण मी कधिनला नाही. आशियांतील एखादा राजपुत्र म्हणून जन्माला घालण्याच्या दृष्टीनेंच ईश्वरानें त्याला घडविलें असावें असें वाटतें."

कडे ब्ल्यू रिज डोंगरपट्टीपलीकडे शेनान्डोचें समृद्ध खोरें आहे—तें ॲलिघेनी नदीपर्यंत पसरलेलें आहे. शेनान्डो नदीच्या मुखाच्या आसपासच्या भागाच्या वायव्येकडील प्रदेश हा कोणाचा, हें निश्चित नव्हतें. हा प्रदेश म्हणजे ओहिओ खोरें होय. शिवाय या ओहिओ खोऱ्यापर्यंत आल्यावर मिसिसिपीचें खोरें कांहीं दूर नव्हतें. व्हर्जिनियांतील रहिवाशाच्या स्वतःच्या दृष्टीनें किंवा त्याच्या मुलांच्या, नातवांच्या, पुढील सर्व पिढ्यांच्या दृष्टीनें या प्रदेशाचें मोल फार होतें. हा अमोल ठेवा हातचा गमवायला व्हर्जिनियन लोक तयार होणें शक्यच नव्हतें. तेव्हा आपली मागणी सर्व उपायांनीं पदरांत पाडून घेण्याचा प्रयत्न त्यांनीं चालू ठेवला होता. १७४४ सालीं व्हर्जिनिया, मेरीलँड व आयरोक्वोस संघराज्याचे रेड इंडियन लोक यांच्यामध्यें एक करार झाला होता. गोऱ्या लोकांच्या वसाहतींची सरहद्द ब्ल्यू रिजपर्यंतच आहे, असा रेड इंडियनांचा दावा प्रथम होता. पण वरील करारान्वयें ती सरहद्द ॲलिघेनीच्या किनाऱ्यापर्यंत आहे, असें मान्य करण्यांत आलें. अशा रीतीनें शेनान्डो खोरें वसाहतींसाठीं खुलें झालें होतें. या करारानंतर थोड्याच दिवसांनीं ब्रिटनच्या प्रीव्ही कौन्सिलनें नव्वद वर्षांपूर्वीच्या आणि विस्मृतिप्राय ठरलेल्या प्रश्नावर निकाल दिला. दुसऱ्या चार्ल्सनें राज्यावर येण्यापूर्वी आपल्या एका निष्ठावंत अनुयायाला एक मोठी देणगी—अमेरिकेंतील विस्तृत जमिनीची देणगी दिली होती, हा उल्लेख मागें आलेलाच आहे. गादीवर बसल्यावर दुसऱ्या चार्ल्सच्या हुकुमाची बजावणी व्हायलाच हवी होती आणि त्याप्रमाणें झालीहि होती. त्याचा तो अनुयायी नॉर्दर्न नेक म्हणून संबोधल्या जाणाऱ्या त्या प्रदेशाचा मालक ठरला होता. या मालकीचा वारसा आतां थॉमस लॉर्ड फेअरफॅक्स याच्याकडे आला होता. आणि १७४४ मध्यें प्रीव्ही कौन्सिलनें त्या मालमत्तेच्या सरहद्दीबाबत रेंगाळत राहिलेला वाद निकालांत काढून लॉर्ड फेअरफॅक्सच्या बाजूनें निर्णय दिला. त्याच्या मालमत्तेचें क्षेत्र किती आहे, याचा फेरविचार होऊन पोटोमॅक आणि रापाहानॉक या नद्यांच्या वरच्या पात्रांच्या दरम्यानची विस्तृत जमीन फेअरफॅक्सच्या मालमत्तेत समाविष्ट झाली होती.

हा लॉर्ड फेअरफॅक्स कर्नल फेअरफॅक्सचा चुलतभाऊ होता. त्याचा मुखत्यार म्हणून कर्नल फेअरफॅक्स त्या मालमत्तेची व्यवस्था बघत असे. आणि या स्थानाचा उपयोग, स्वतःचें वजन मोठ्या प्रमाणावर प्रस्थापित करण्यासाठीं कर्नल फेअर-फॅक्सला झालेला होता. या मालमत्तेचा मूळ मालक लॉर्ड फेअरफॅक्स हा मद्-

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
 ग्रंथानुक्रम 26216 दि: ५५
क्रमांक ... नों: दि: ...

बुद्धीचा आणि संशयखोर माणूस होता. त्यानें जॉर्जला फार मदत केली असें सांगितलें जातें, पण खरोखर अशी मदत झालीच असली तर ती फारच मामुली झाली होती. तरीपण, या लॉर्ड फेअरफॅक्सचा मोठा दबदबा वसाहतवाल्यांना वाटे. आणि १८४८ सालीं आपली मालमत्ता प्रत्यक्ष डोळ्यांखालून घालण्यासाठीं हा उमराव अमेरिकेंत आला तेव्हां ती घटना किती खळबळजनक ठरली असेल, हें आपण कल्पनेनें जाणू शकतों. त्यानें आल्याबरोबर आपला मुक्काम बेल्व्हॉयरच्या शेतवाडीवर ठोकला. तोंपर्यंत लॉरेन्स व इतर कांहीं धाडसी रहिवासी यांनीं ओहिओ कंपनीची स्थापना केली होती. पोटोमॅकच्या वरच्या खोऱ्यांतील विस्तृत जमीन लागवडीखालीं आणण्याच्या उद्देशानें व अन्य विकासकार्यासाठीं ही कंपनी अस्तित्वांत आली होती. सरहद्दी वेगानें विस्तारण्याचा तो काळ होता. आणि ओहिओ कंपनीपेक्षांहि अधिक महत्त्वाकांक्षी विकासयोजना पार पाडण्याच्या उद्देशानें दुसऱ्या कांहीं धाडसी रहिवाशांनीं लॉयल कंपनीची स्थापना केली होती.

प्रादेशिक विकासाच्या अशा भव्य योजनांशीं जॉर्ज वॉशिंग्टन यांचा संबंध त्यांच्या कर्तबगारीच्या जीवनाच्या प्रारंभकालांत कसा आला, हें स्पष्ट आहे. त्या काळांत जमिनीचें महत्त्व सर्वांत अधिक होतें. त्यामुळें अर्थातच वॉशिंग्टन यांनीं जमीन मोजणीदार बनावें हें स्वाभाविक होतें. हें काम जॉर्जनें पत्करावें, याला अर्थातच लॉरेन्स बराच कारणीभूत असावा. जॉर्जविषयीं लॉरेन्सला कितीहि प्रेम असो, त्यानें केवळ पोषाखी रिकामटेकडा तरुण म्हणून रहावें असें त्याला वाटणें शक्य नव्हतें. आयुष्यांत कांहीं तरी करतां यावें, या दृष्टीनेंच लॉरेन्सनें जॉर्जची तयारी करून घेतलेली असणारच. जॉर्जनें सागरी जीवन पत्करावें, ही सूचना लॉरेन्सनेंच केलेली असण्याची शक्यता आहे. पण तें जीवन तितकेंसें स्पृहणीय नाहीं, असें जॉर्जच्या चुलत्याचें म्हणणें होतें. आणि जीवनांत पुढें येण्याच्या दृष्टीनें—म्हणजे बढतीच्या दृष्टीनें—पसंत करावें असेंहि तें क्षेत्र नव्हे, असेंहि मत असल्यामुळें जमीनमोजणीचें काम जॉर्जला शिकविलें गेलें असावें. तथापि हें व्यवसायक्षेत्र जॉर्जनें पत्करावें, याची फार विस्तृत कारणमीमांसा करीत बसण्याची आवश्यकता नाहीं. कारण, त्या काळांत व्हर्जिनियांतील मळेवाल्यांना जमीनमोजणीच्या कामाची थोडीबहुत तरी माहिती असायचीच, हें ठरल्यासारखेंच होतें. प्रत्येक मळेवाल्याच्या मुलाला जमिनीच्या खरेदीखताचा मसुदा तयार करणें, मुखत्यारपत्र

तयार करणें, वचनचिठ्ठया लिहिणें, इत्यादि कामें शिकवलीं जात असत. जॉर्जहि अर्थातच या साऱ्या गोष्टी शिकला होता.

जॉर्ज सोळा वर्षांचा झाला; तोंपर्यंत शेताचे पट्टे ठरवून देण्यासाठीं आंखणी करण्याच्या कामांत मदतनीस म्हणून काम करण्याइतकें जमीनमोजणीशास्त्राचें ज्ञान त्यानें संपादन केलेलें होतें. आणि त्याच कामावर १७४८ सालीं तो रुजू झाला. शेनान्डो खोऱ्यांतील जमीनमोजणीसाठीं फेअरफॅक्सतर्फे गेलेल्या मोजणीदारांमध्यें तो सामील झाला होता. ब्ल्यू रिजच्या पल्याड जॉर्जनें केलेला हा आयुष्यांतला पहिला प्रवास होय. त्याच्या पुढील वर्षीच माउंट व्हरनॉनपासून कांहीं थोड्याच मैलांवर उत्तर बाजूला पोटोमॅकच्या तीरावर बेलूहॅवन नांवाचें नवें गांव वसविण्याचें काम चालू होतें, तेथें दुय्यम मोजणीदार म्हणून जॉर्ज रुजू झाला. याच बेलूहॅवनचें नंतर अलेक्झांड्रिया असें पुनर्नामकरण करण्यांत आलें. अलेक्झांड्रियाच्या विश्वस्त मंडळाचा लॉरेन्स हा एक सभासद होता. म्हणजे एक प्रकारें कौटुंबिक छत्राखालींच जॉर्ज आयुष्याची सुरुवात करीत होता असें म्हणतां येईल. लवकरच कल्पेपर पेट्याचा जमीनमोजणीदार म्हणून त्याची नेमणूक झाली. तेथून माफक प्रमाणावर कां होईना, त्याच्या स्वतंत्र जीवनाचा प्रवास वेगानें सुरू झाला, असें म्हणतां येईल व्हर्जिनियाच्या उत्तर भागांतील जमिनी नव्यानें लागवडीखालीं आणण्यासाठीं जी जमीनमोजणी झाली, ती सारी जॉर्जनें पार पाडली. १७५० पर्यंत, म्हणजे वयाच्या अठराव्या वर्षापर्यंत त्यानें स्वतः जमिनीचे तीन पट्टे ( शेनान्डोच्या खालच्या पात्रानजिकच्या विभागांत ) संपादिले होते. त्या जमिनींचें एकूण क्षेत्रफळ १४५० एकर होतें. याशिवाय फेरीफार्मचा वारसा वयांत येतांच त्याच्याकडे येणार होताच. या दृष्टीनें भावी काळाकडे कांहींशा समाधानानें तो बघूं शकत होता. जॉर्ज बुद्धिमान् प्रतिभावंत नसेल, पण एक गोष्ट स्पष्ट होती : तो उत्साही, विश्वासू होता—आणि व्यवहारचतुरहि होता.

१७५१ च्या अखेरीस, जॉर्जच्या अखंड चाललेल्या जीवनप्रवाहाला अडथळा निर्माण करणारी परिस्थिति निर्माण झाली. लॉरेन्स वॉशिंग्टनचीं तीन मुलें वारलीं होतीं. आणि स्वतः लॉरेन्सला जडलेला दम्याचा विकार आतां अत्यंत बळावला होता. त्या काळीं व्यवस्थित वैद्यकीय उपचार उपलब्ध नव्हते. शेवटीं निराश होऊन लॉरेन्सनें बार्बाडोसला जाण्याचें ठरविलें. तेथील सौम्य हवेंत प्रकृति सुधारेल, अशी आशा त्याला वाटत होती. लॉरेन्सच्या बायकोला आपल्या चौथ्या

आणि तान्ह्या असलेल्या मुलाला घेऊन घरींच रहाणें भाग असल्यामुळें जॉर्जच लॉरेन्सबरोबर गेला. भावी काळांत युनायटेड स्टेट्स् हें जें संयुक्त राज्य अस्तित्वांत येणार होतें, त्याच्या प्रादेशिक सीमेच्या पलीकडे जॉर्ज वॉशिंग्टननीं केलेला हा एकमेव प्रवास होय. पण बार्बाडोसला राहण्याचा प्रयोग यशस्वी ठरला नाहीं. लॉरेन्सचा आजार होता तसाच राहिला आणि जॉर्जला मात्र देवीच्या आजाराचा प्रसाद मिळाला. या आजारांतून उठल्यावर जॉर्ज एकटाच व्हर्जिनियांत परत आला. लॉरेन्सची प्रकृति अधिक बिघडलेली होती; आणखी एक उपाय म्हणून तो बहुधा बेरमुडाला जाईल, अशी बातमी जॉर्जनें आणली होती. परत आल्यावर जॉर्जनें पुन्हा आपलें जमीनमोजणीदाराचें काम सुरू केलें. त्यानें शेनान्डो भागांत आणखी एक जमिनीचा पट्टा खरेदी केला. आतां त्याच्या मालकीच्या जमिनीचें क्षेत्र एकूण दोन हजार एकर झालें होतें.

इतर दृष्टींनीं बघितल्यास मात्र १७५२ साल अत्यंत निराशाजनक वर्ष ठरलें. स्वतः जॉर्ज 'फुप्फुसावरणदाहा'नें (प्ल्यूरसी) आजारी पडला. ती कोण कुमारी फॉन्टलेरॉय होती, तिच्याशीं झालेलें प्रेमप्रकरण अपेशी ठरलें. त्या वर्षाच्या उन्हाळ्यांत लॉरेन्स बेरमुडाहून परत घरीं आला; पण आल्यानंतर तो क्षयानें आजारी पडला आणि या आजारांतच त्याचा अंत झाला. जणूं, मृत्यु मानवाच्या स्वकर्तृत्वविषयक अहंकाराची कुचेष्टाच करीत होता. तथापि लॉरेन्सनें आपल्या मृत्युपत्रांत जी तरतूद केली होती, तिच्यामुळें जॉर्जपुढें अनपेक्षित संधि वाढून ठेवली होती खास. लॉरेन्सनें आपल्या मृत्युपत्रान्वयें माउंट व्हरनॉनच्या मालमत्तेचा उपभोग आपल्या पत्नीनें आपल्या उरलेल्या एकमेव मुलाची विश्वस्त या नात्यानें तिच्या हयातींत घ्यावा आणि जर तो मुलगा पुढें निपुत्रिक वारला तर माउंट व्हरनॉनचा वारसा जॉर्जकडे जावा, अशी व्यवस्था करून ठेवलेली होती. त्याचप्रमाणें फेअरफॅक्स पेट्यांत लॉरेन्सची जी दुसरी मालमत्ता होती, ती लॉरेन्सच्या विधवा पत्नीच्या मृत्यूनंतर जॉर्जलाच त्या मृत्युपत्रान्वयें मिळावयाची होती. जॉर्जपुरताच विचार करायचा झाला तर हें मृत्युपत्र म्हणजे त्याला एक उदार वरदानच होतें. कालांतरानें लॉरेन्सचा एकुलता एक उरलेला मुलगाहि मृत्यु पावला व सर्व मालमत्ता जॉर्जकडे वारशानें आली. शिवाय लॉरेन्सच्या मृत्यूमुळें व्हर्जिनियाच्या जुजबी फौजेच्या सेनाधिपतीच्या मदतगाराची जागा रिकामी झालेली होती. जॉर्जनें त्या हुद्दयासाठीं अर्ज केला आणि त्याची त्याप्रमाणें

नेमणूक झालीहि. वसाहतीचे चार विभाग करून प्रत्येक विभागाचा एक असा ' ॲडज्युटंट जनरल ' नेमलेला असे.

१७५२ मध्यें जॉर्ज कायद्याच्या दृष्टीनें वयांत आला. तोपर्यंत तो चांगलाच भक्कम पायावर उभा राहिलेला होता. फ्रेडरिक्सबर्ग परगण्यासाठीं नव्यानेंच स्थापन करण्यांत आलेल्या नागरिकसभेचा तो सभासद म्हणून निवडला गेला. आपल्या पेस्याच्या जमीनमोजणीदाराचा हुद्दा त्याच्याकडेच होता. त्याबद्दल त्याला वार्षिक पन्नास पौंड तनखा होता. शिवाय, जमीनमोजणीच्या खाजगी कामांतदेखील त्याला बरीच कमाई होत असे. शेनान्डो भागांत त्यानें स्वतः संपादिलेल्या एकूण दोन हजार एकर जमिनीव्यतिरिक्त वारसा हक्कानें आणखी चार हजार एकर जमिनीची मालकी त्याला मिळाली होती. आणि सेनाधिकाऱ्याचा मदतगार या हुद्याचा पगार म्हणून त्याला वर्षाला शंभर पौंड मिळत असत. जुजबी फौजेंत त्याला मेजरचा हुद्दा देण्यांत आला होता. लौकरच तो, पेरी फार्मवरील मुक्काम हलवून, माउंट व्हरनॉनला वास्तव्यासाठीं आला. त्यानें आपल्या भावजयीकडून ती मालमत्ता करारानें घेतली होती. तेथून पुढें माउंट व्हरनॉन येथेंच जॉर्ज वॉशिंग्टन आयुष्यभर राहिले. थोड्याच वर्षांनीं त्या मालमत्तेची मालकी– लॉरेन्सचा मुलगा निधन पावल्यावर – संपूर्णतः जॉर्जकडे आली. आणि नंतरच्या चाळीस वर्षांच्या कालावधींत जॉर्ज वॉशिंग्टनच्या खाजगी जीवनाचें केंद्रस्थान माउंट व्हरनॉन हेंच होतें. आतां जॉर्जच्या गृहजीवनाला पूर्णता येण्यासाठीं फक्त गृहिणीचीच काय ती आवश्यकता होती.

### तरुण सैनिक

तथापि विवाहबद्ध होण्यासाठीं योग्य वधूचें संशोधन करण्याचें काम कांहीं दिवस तहकूब राहिलें. कारण या तरुण जमीनदारला नव्या आकांक्षेनें घेरलें. लष्करी क्षेत्रांत पराक्रम गाजविण्याच्या आकांक्षेनें जॉर्जच्या मनाची पकड घेतली. हा लष्करी जीवनाचा कालखंड पांच वर्षांचा ठरला. तथापि त्याबद्दल अधिक तपशीलवार विचार करणें योग्य ठरेल. लष्करी कामगिरीच्या कालखंडांतील कांहीं मुख्य मुख्य घटनांचा थोडक्यांत विचार केला पाहिजे. तसें केलें तर, जॉर्ज वॉशिंग्टन यांच्या, एकूण चारित्र्य आणि आकांक्षा यांच्या दृष्टीनें, या प्रारंभींच्या लष्करी कामगिरीचें महत्त्व किती आहे हें, केवळ वरवर न बघतां, अधिक सखोलपणें आपल्याला जोखतां येईल.

१७५३ सालीं, ब्रिटनचें उत्तर अमेरिकेंतील वासाहतिक साम्राज्य पूर्व किनाऱ्यावर ॲलेघेनीपर्यंत पसरलेलें होतें. ब्रिटनचीं ज्या राष्ट्राशीं तब्बल अर्धशतकाच्या कालांत वारंवार युद्धें होत आलीं होतीं, त्या फ्रान्सचें अमेरिकेंतील साम्राज्य उत्तरेस आणि पश्चिमेस एखाद्या कमानीसारखें पसरलेलें होतें. त्याचा विस्तार एकीकडे सेंट लॉरेन्स नदीपर्यंत होता, तर मिसिसिपी नदीच्या तीरातीरानें तें न्यूऑर्लिन्सपर्यंत येऊन भिडलेलें होतें. या कमानीची रुंदी तशी विस्तृत नव्हती; पण फ्रान्सनें या प्रदेशांत आपलें सामर्थ्य अधिक दृढमूल केलें असतें, तर व्हर्जिनियाला व इतर ब्रिटिश वसाहतींना पूर्व किनाऱ्याच्या पट्ट्यांतील प्रदेशाच्या मर्यादेंत रहावें लागलें असतें; त्या मर्यादा विस्तारणें शक्य झालें नसतें; हातीं असलेल्या तेवढ्याच प्रदेशावर संतुष्ट रहावें लागलें असतें. याउलट, ब्रिटनला ओहिओ खोऱ्यावर आपला कब्जा बसवितां आला असता तर, फ्रेंच साम्राज्याची ही कमान दुभंगली गेली असती आणि मिसिसिपीचाहि ताबा फ्रान्सकडून हिरावून घेतां आला असता. अर्थातच फ्रेंचांशीं व्हर्जिनियाचा, विशेषतः ओहिओ कंपनीचा, तावडतोब खटका उडणें अपरिहार्य होतें. तात्त्विक दृष्ट्या विचार केल्यास १७४८ सालच्या तहानें फ्रान्स व ब्रिटन यांचें भांडण मिटून गेलेलें होतें. पण वस्तुस्थिति मात्र तशी नव्हती. त्यांचा खटका पुनः केव्हां उडेल याचा नेम नव्हता. अगदीं अचूक सांगायचें म्हणजे उभय राष्ट्रांत फक्त युद्धविराम झालेला होता; शांततातह झाला होता, असें म्हणतांच येत नव्हतें. ओहिओ नदीच्या फांट्यावर, जेथें मोनोंगाहेला व ॲलेघेनी या नद्यांचा संगम होतो, त्या ठिकाणीं एक किल्ला बांधण्याचा निर्धार ओहिओ कंपनीनें केला. तथापि कंपनीच्या टेहळणीदारांनीं बातमी आणली कीं, ईरी सरोवरापासून ओहिओच्या तीरापर्यंत उत्तर-दक्षिण रेषेंत प्रेस्क बेट, ली ब्यूफ, व्हेनँगो, लॉग्जटाउन वगैरे ठिकाणीं किल्ले बांधून किल्ल्यांची एक रांगच रांग तयार करण्याचा धडाका फ्रेंचांनीं चालविलेला होता. अर्थात् हा उद्योग फ्रेंचांनीं बंद करावा, असें अंतिमोत्तर ( अल्टिमेटम् ) पाठविण्याचें व्हर्जिनियाच्या लेफ्टनंट गव्हर्नरनें-रॉबर्ट डिन्विडी यानें ठरविलें. हा निर्वाणीचा खलिता फ्रेंचांना सादर करण्याची कामगिरी मेजर वॉशिंग्टनवर सोंपविण्यांत आली

अत्यंत शिष्टाचाराच्या भाषेंत, पण अत्यंत आग्रहीपणानें आपली मागणी सादर करणारा खलिता डिन्विडी यानें तयार केला होता. तो खलिता फ्रेंच

हद्दींतील फ्रेंच सेनानीला पोहोंचता करण्यासाठीं १७५३ च्या ऑक्टोबरमध्यें वॉशिंग्टन यांनीं प्रस्थान ठेवलें. वाटेंत त्यांनीं ख्रिस्तोफर गिस्ट नांवाच्या उच्च इसमाला आपल्याबरोबर घेतलें. गिस्ट हा व्हान ग्राम या नांवानें सर्वश्रुत होता. सरहद्दीच्या रक्षणार्थ असलेल्या पथकांत तो होता. त्याला फ्रेंच भाषा अवगत होती आणि म्हणूनच दुभाष्याचें काम करण्यासाठीं वॉशिंग्टन यांनीं त्याला बरोबर घेतलें होतें. आपला खलिता सादर करून आणि त्याला फ्रेंचांचें उत्तर घेऊन वॉशिंग्टन निघाल्यापासून अडीच महिन्यानीं परत विल्यम्सबर्गला आले. ली ब्यूफच्या किल्ल्यांत छावणी टाकून बसलेल्या फ्रेंच सेनानीनें पाठविलेला उत्तराचा खलिता, डिन्विडीच्या खलित्यासारखाच शिष्टाचाराच्या भाषेंत लिहिलेला होता आणि डिन्विडीनें जितक्या आग्रहीपणें मागणी केली होती, तितक्याच जोरदारपणें ती धुडकावून लावण्यांत आलेली होती.

वॉशिंग्टन यांना अत्यंत खराब हवामानांत बिकट प्रवास करावा लागला होता. प्रथम पोटोमॅकच्या प्रवाहांतून होडग्यांच्या साह्यानें आणि गिस्टच्या पथकानें ओहिओ कंपनीच्या वतीनें तयार केलेल्या पायवाटेवरून घोड्यावर बसून हा प्रवास झाला. पण नंतरचा प्रदेश जंगलमय होता. जंगल तुडवूनच त्यांना ईप्सित स्थळीं जावें लागलें. पोटोमॅकचा किनारा सोडल्यावर यौघिओघेनीचें खोरें ओलांडून ती नदी मोनोंगॅहेलाला मिळते तिथपर्यंत ते आले. नंतर तेथून ओहिओच्या फाट्यानजिक असलेल्या शानोपिन्स टाउन या रेड इंडियन वसाहती-पर्यंतचा प्रवास झाला. तेथून लॉग्ज टाउन, व्हेनँगो या मार्गें ली ब्यूफ गांठण्यांत आलें. म्हणजे हा प्रवास जवळ जवळ ईरी सरोवराच्या किनाऱ्यापर्यंत झाला. साऱ्याच गोष्टी वॉशिंग्टन यांना अपरिचित होत्या. जंगलमय व ओढे, नद्या, खांचखळगे यांनीं तुडुंब असलेल्या भूप्रदेशाचा पूर्वीचा कांहींच अनुभव वॉशिंग्टनना नव्हता. रेड इंडियन लोकांच्या गनिमी हल्ल्यांचाहि यापूर्वीं कधीं अनुभव नव्हता. वागण्यांत नम्र पण वृत्तीनें कणखर अशा फ्रेंच लोकांशींहि त्यांचा परिचय नव्हता. फ्रेंचांचा त्यांना जो अनुभव आला तो लिहून ठेवतांना वॉशिंग्टन यांनीं म्हटलें आहे : "ओहिओ खोऱ्याचा ताबा घेण्याचा आपला पक्का निर्धार आहे, असें त्यांनीं मला स्पष्टपणें सांगितलें आणि खरोखरच ते आपला निर्धार पार पाडतील!" ली ब्यूफ येथून परत फिरणें शक्य होतांच, आपल्या अधिकाऱ्यांना फ्रेंचांच्या कारस्थानाची बातमी शक्य तितक्या लौकर देतां

यावी म्हणून वॉशिंग्टननीं वेगानें मार्गक्रमण करायला सुरुवात केली. परतीचा प्रवास अत्यंत कष्टदायक, तितकाच धोक्याचा होता. एका रेड इंडियनानें तर अगदीं जवळून त्यांच्यावर गोळ्या झाडल्या होत्या. सुदैवानेंच त्याचें निशाण हुकलें. आपल्या मागावर त्याला राहतां येऊं नये, यासाठीं सबंध रात्रभर वॉशिंग्टन आणि गिस्ट वेगानें रस्ता कापीत होते. नंतरहि सबंध दिवसभर त्यांचा प्रवास चालूच होता. अर्धवट गोठून गेलेल्या ॲलेघेनीचें पात्र ओलांडण्यासाठीं त्यांना तराफा तयार करावा लागला. नदी ओलांडतांना जॉर्ज वॉशिंग्टन हे तराफ्यावरून फेकले गेले. अगदीं बुडतां बुडतां वांचले. ओल्याचिंब कपड्यांत सारी रात्र भयंकर थंडींत कुडकुडत त्यांना काढावी लागली. दैवाचा विचित्र खेळ असा कीं, हिमबाधेचा आजार गिस्टला भोंवला, पण जॉर्ज वॉशिंग्टनना मात्र तो मुळींच बाधला नाहीं.

अखेर विल्यम्सबर्गला परतल्यानंतर डिन्विडी यांच्या सांगण्यावरून वॉशिंग्टननीं आपल्या त्या प्रवासाचें वर्णन थोड्याच दिवसांत लिहून काढलें. डिन्विडीनें हें प्रवासवर्णन पुस्तिकेच्या रूपानें छापून प्रसिद्ध केलें. विधानसभेला परिस्थितीच्या गांभीर्याची जाणीव व्हावी, हाच अर्थात् या प्रसिद्धीमागें डिन्विडी यांचा उद्देश होता. हें प्रवासवर्णन लंडन येथें तीन निरनिराळ्या प्रकाशनांत पुनर्मुद्रित करण्यांत आलें होतें. डिन्विडीच्या या उद्योगाचा परिणाम विधानसभेच्या सभासदांवर झाला हें खास. वॉशिंग्टन यांच्या कामगिरीबद्दल त्यांना पन्नास पौंड द्यावेत, असा ठराव विधानसभेनें केला. डिन्विडी यांच्या रूपानें वॉशिंग्टन यांना एक नवा पुरस्कर्ता लाभला. डिन्विडी वॉशिंग्टन यांचा उल्लेख 'शूर छोकरा' असा करीत असे, अशी एक आख्यायिका आहे. मेजर वॉशिंग्टन यांचा भाग्यरवि हळूहळू वर येऊं लागला होता.

त्यानंतरच्या घटना पाहिल्या म्हणजे भवितव्यतेनें आपलें साधन म्हणून त्यांची निवड केली असेल, असेंच वाटावें. ओहिओ प्रांत काबूत ठेवण्यासाठीं डिन्विडीनें एक मोहीम योजिली आणि वॉशिंग्टन यांना व्हर्जिनियाच्या पलटणींत लेफ्टनंट कर्नलचा हुद्दा बहाल करून या मोहिमेसाठीं उपसेनानी म्हणून त्यांची नेमणूक करण्यांत आली. वॉशिंग्टन आपलें दल उभारण्याच्या कामांत दंग असतांना गिस्ट आणि ओहिओ कंपनीचा आणखी एक प्रतिनिधि विल्यम ट्रेंट हे दोघे सरहद्दीवरील तयारी करण्यांत गुंतलेले होते. मोनोंगाहेला नदीच्या कांठीं

कंपनीसाठीं एक वखार उभारण्याचें व ओहिओच्या फांट्यावर कंपनीसाठीं किल्ला बांधण्याचें काम त्यांनीं चालविलें होतें. ट्रेंटला कॅप्टनचा हुद्दा बहाल करण्यांत आलेला होता. सीमारक्षकांची एक तुकडी उभारण्याची कामगिरी त्याच्यावर सोपविण्यांत आलेली होती. त्याच्या मदतीला दोन तुकड्या पुरविण्याचा आदेश लेफ्टनंट कर्नल वॉशिंग्टनना देण्यांत आलेला होता.

१७५४ च्या एप्रिलमध्यें अलेक्झांड्रिया येथून वॉशिंग्टन यांनीं आपल्या कामगिरीसाठीं प्रस्थान ठेवलें. त्यांच्याबरोबर आठ दुय्यम अधिकारी होते. त्या आठ जणांत व्हॅन ब्राम हा होता. वॉशिंग्टन यांनीं त्यालाहि कप्तानाचा हुद्दा मिळवून दिला होता. शिवाय एक शस्त्रवैद्य, 'एक स्वीडिश सद्‌गृहस्थ' आणि दीडशें सैनिक होते. तीन महिने वाटचाल केल्यानंतर वॉशिंग्टनचें पथक पोटोमॅकच्या वरच्या पात्रानजिक असलेल्या विल्स क्रीकपर्यंत येऊन दाखल झालें. याच ठिकाणीं नंतर कंबरलँड किल्ला बांधण्यांत आला. तेथें येऊन पोहोंचल्यावर वॉशिंग्टनना अस्वस्थ करणारी बातमी कळली. ओहिओच्या फांट्यावरून ट्रेंटला फ्रेंचांनीं मागें रेटलें आहे, अशी बातमी होती. फ्रेंच सैन्य संख्याबळानें फारच वरचढ होतें आणि त्याच्यापुढें टिकाव न लागल्यामुळें ट्रेंट विल्स क्रीकच्या रोखानें माघार घेत होता. तथापि या परिस्थितींत एक गोष्ट चांगली होती. आसपासच्या भागांतील रेड इंडियनांनीं ब्रिटिशांच्या पक्षाला एकनिष्ठेनें चिकटून राहण्याचें आश्वासन दिलें. त्यांच्या या आश्वासनानें वॉशिंग्टन यांचा विश्वास दुणावला. शिवाय, स्वतःची पात्रता दाखवून देण्याची उत्कंठा त्यांना होतीच. आणि म्हणून आपल्या हाताखालच्या अधिकाऱ्यांची कल्पना वॉशिंग्टन यांनीं मान्य केली. मोनोंगाहेलाच्या कांठीं असलेल्या वखारीपर्यंत जाण्याचें त्यांनीं ठरविलें. हें ठिकाण ओहिओच्या फांट्यापासून चाळीस मैलांपेक्षांहि कमी अंतरावर होतें. डुक्विस्ने नांवाचा जो किल्ला फ्रेंच बांधीत होते, त्याच्यापासून जवळ असें अत्यंत मोक्याचें तें ठिकाण होतें.

मोनोंगाहेलाच्या किनाऱ्यापर्यंतचा मोर्चा मंदगतीनें पार पडला. कारण मार्ग अत्यंत जंगलमय होता. खांचखळगे, ओढे वगैरेमुळें सपाटीचा प्रदेशहि प्रवासाला बिकटच होता. त्या भागांतून सामानसुमान भरलेल्या गाड्या येणें तर केवळ दुरापास्तच होतें. पंधरा दिवसांत फक्त वीसच मैलांचा पल्ला गांठतां आला, यावरून मार्ग किती बिकट होता, याची कल्पना येईल. अशा परिस्थितींत देखील

वॉशिंग्टननीं आपलें पथक पुढें रेटलेंच. ग्रेट मीडोजचा प्रदेश पार करून ते लॉरेल डोंगरापर्यंत आले तेव्हां, यत्पूर्वी पुढें टेहळणीसाठीं गेलेल्या गिस्टनें परत बातमी सांगितली कीं, फ्रेंचांची एक तुकडी जवळच छपून राहिलेली आहे. दुसऱ्या दिवशीं सकाळींच वॉशिंग्टननीं त्या तुकडीला तोंड दिलें. प्रथम हल्ल्याची सुरुवात कोणीं केली हें सांगतां येत नाहीं. वास्तविक दोन्ही पक्षांपैकीं एकानेंहि हल्ला करावयास नको होता. कारण, ब्रिटन आणि फ्रान्स यांच्यामध्यें अधिकृतपणें रीतसर युद्ध जुंपलेलें नव्हतें — युद्धाची औपचारिक घोषणा कोणत्याच देशानें केलेली नव्हती. पण दोन्ही देशांनीं युद्धाच्या दिशेनें खूप पावलें टाकलीं होतीं आणि दोघेहि युद्धाच्या इतके जवळ आले होते कीं, त्यानंतर पहिला हल्ला कोणीं केला, हा प्रश्नच गैरलागू ठरतो. वस्तुस्थिति अशी होती कीं, वॉशिंग्टन यांच्या सैनिकांनीं फ्रेंचांना अचानक घेरलें आणि थोड्याशाच चकमकींत त्यांचा पुरा पाडाव केला. फ्रेंचांचे दहा सैनिक ठार झाले आणि शिवाय वीस जण कैद झाले. ठार झालेल्यांत फ्रेंचांच्या पथकाचा नायक मॉं. डी जुमॉनव्हिल हा होता. मृत सैनिकांपैकीं कांहीं जणांचीं शिरें वॉशिंग्टन पक्षाच्या रेड इंडियनांनीं कापलीं. वॉशिंग्टन यांच्या तुकडीची हानि अल्प होती. एक ठार व दोन किंवा तीनच जखमी झाले होते.

ही घटना मे महिन्याच्या अखेरीस घडली. वॉशिंग्टननीं युद्धकैदी व्हर्जिनियांत पाठवून दिले. वॉशिंग्टन यांची ही कामगिरी इतकी सर्वमान्य ठरली कीं, व्हर्जिनियाच्या पलटणीचा सरसेनापति वारल्यावर वॉशिंग्टन यांना कर्नलचा हुद्दा देऊन त्या सर्व पलटणीचा ताबा त्यांच्याकडे देण्यांत आला. अन्य वसाहतींकडून मदतीसाठीं येणाऱ्या सैन्याच्या तुकड्यांवर मात्र त्यांची हुकमत नव्हती. पण अशी फक्त एकच तुकडी प्रत्यक्ष आली होती, त्यामुळें त्यांची हुकमत मर्यादित ठेवण्याला तसा कांहींच अर्थ नव्हता. १७५४ च्या जूनपर्यंत, व्हर्जिनियाची जुजबी फौज, उत्तर कॅरोलिना पलटण आणि रेड इंडियन लढवय्यांचें पथक इतक्या विविध सैन्यदलांवरील हुकमत कर्नल वॉशिंग्टन यांच्याकडे आली होती.

डुक्रिस्ने किल्ल्यावर मोठ्या प्रमाणांत फ्रेंचांनीं सैन्याची जमवाजमव केलेली असून, वॉशिंग्टन यांच्यावर हल्ला चढविण्याचा त्यांचा बेत असल्याची बातमी एक दिवस येऊन थडकली. त्या वेळीं वॉशिंग्टन यांच्याजवळील सामुग्रीचा पुरवठा अपुरा होता. रेड इंडियन सैनिक हळूहळू त्यांना सोडून जात होते. इतरहि

समस्या त्यांच्यासमोर होत्या; म्हणून झटपट माघार घेऊन ग्रेट मीडोजमध्यें एक मेढेकोट होता त्याचा त्यांनीं आश्रय घेतला. हा मेढेकोट अगदीं पडझड झालेला होता. वॉशिंग्टन या मेढेकोटाला ' फोर्ट ऑफ नेसेसिटी ' असें संबोधीत असत. ता. ३ जुलै रोजीं फ्रेंचांनीं या मेढेकोटाला गराडा घातला. तोंपर्यंत सर्व रेड इंडियन सैनिक फरारी झालेले होते. पण ही लढाई पूर्वीच्या चकमकीसारखी झटपट संपली नाहीं. अखंड वर्षणाऱ्या पावसांत ही लढाई कित्येक दिवस चालू होती. फ्रेंचांकडून सतत जोराचा भडिमार चालू होता आणि ते क्रमाक्रमानें जवळजवळ सरकत होते. मेढेकोट संरक्षणाच्या दृष्टीनें अगदींच कुचकामी होता. वॉशिंग्टनच्या सैन्याची मोठ्या प्रमाणावर हानि होत होती. त्यांच्याजवळचीं सर्व गुरेंढोरें आणि घोडे तर फ्रेंचांनीं ठार करून टाकले होते. वॉशिंग्टनच्या सैन्याची परिस्थिति अत्यंत निराशाजनक होती. अन्न आणि दारूगोळा फारच थोडा शिल्लक राहिला होता. शत्रूचें संख्याबल खूपच मोठें होतें आणि वसाहतींचें सैन्य कोंडींत पकडलें गेलें होतें. वॉशिंग्टन यांना शरणागति पत्करणें भाग होतें. फ्रेंचांनीं फक्त कांहीं अधिकारी ओलीस म्हणून ठेवून घेतले व वॉशिंग्टन यांना सशस्त्र पहाऱ्यांत आपल्या उरलेल्या सैन्यासह व्हर्जिनियाला जाण्याला त्यांनीं मोकळीक दिली. या ओलीस ठेवलेल्या अधिकाऱ्यांत व्हॅन ब्राम होता. त्यानें शरणागतीचीं बोलणीं करतांना दुभाष्याची भूमिका केली. शरणागतीच्या मसुद्याचें त्यानें भाषांतर करून दिलें व फ्रेंचांनीं त्याच्यावर त्याची स्वाक्षरी घेतली.

तरुण सेनानी वॉशिंग्टन यांना हा पराभव फारच झोंबला. त्यांनीं पुरेशी निर्णयबुद्धि दाखविली नाहीं, अशी टीका कांहीं जणांनीं केली; तरी पण सर्व-साधारणतः, त्यांनीं जें केलें त्याची स्तुतिच झाली. विल्यम्सबर्गच्या अधिकारी-वर्गांत आणि लंडनमधल्या अधिकारी-वर्गांत अशा दोन्ही ठिकाणीं त्यांची कामगिरी स्तुत्य मानली गेली होती. जुमॉनव्हिल चकमकीचें वर्णन करणारें एक खाजगी पत्र त्यांनीं पाठविलें होतें, तें ' लंडन मॅगेझिन ' या नियतकालिकांत प्रसिद्ध करण्यांत आलें. वॉशिंग्टनसंबंधांत राजा दुसरा जॉर्ज याच्याशीं होरेस वॉलपोल यांचें बोलणें झालें, असें वॉलपोल यांनींच लिहून ठेवलें आहे. " आपण अत्यंत महत्त्वाचा विजय संपादिला. मीं बंदुकीच्या गोळ्यांचा शीळ घातल्या-सारखा आवाज ऐकला. अन् मी सांगतों यावर विश्वास ठेव कीं, त्या आवाजांत कांहीं तरी गोडवा आहे ! " अशा उत्साहभरित शब्दांत वॉशिंग्टन यांनीं

आपल्या भावाला पाठविलेल्या पत्रांत लिहिलें होतें. त्यांच्या या उद्गारांना उद्देशून राजा जॉर्ज यानें, "वॉशिंग्टनला असे असंख्य आवाज ऐकावे लागले असते तर त्यानें असें लिहिलें नसतें," या शब्दांत भाष्य केलें होतें असें म्हणतात. हे खवचट उद्गार त्या वेळीं वॉशिंग्टनच्या स्वतःच्या कानीं आले नव्हते किंवा त्यांच्या इतर कोणा समकालीनांनाहि समजलेले नव्हते. पण, वॉशिंग्टन इतके जाणून होते कीं, दूर अमेरिकेंत जें घडत आहे त्याकडे लंडन व पॅरिस येथून अत्यंत बारकाईनें लक्ष ठेवलें जात आहे. ज्या घटनेला आपण स्वतः जबाबदार आहों, अशी एक स्थानिक स्वरूपाची घटना जागतिक महत्त्वाची ठरावी, ही कल्पना कोणाहि तरुण सेनानीला रोमांचित करणारी खासच होती.

आणि, 'फोर्ट ऑफ् नेसेसिटी' हा मेढेकोट सोडतांना चुकून तेथें विसरून राहिलेली वॉशिंग्टन यांची एक खाजगी दैनंदिनी फ्रेंचांनीं प्रसिद्ध केली तेव्हां कांही काळ कां होईना वॉशिंग्टन हे, बरेवाईट म्हणा, 'प्रसिद्ध पुरुष' ठरले होते, हेंहि खरें आहे. अमेरिकेंतल्या सरहद्दीवरील संघर्षांत ब्रिटिश हेच आक्रमक आहेत, असा प्रचार करण्यासाठींच फ्रेंचांनीं वॉशिंग्टन यांची ती रोजनिशी प्रसिद्ध केली होती. त्यांनीं तिचा उपयोग करून असें दाखवून दिलें कीं, त्यांच्या तुकडीचा सेनानी जुमॉनव्हिल हा शांततामय उद्देशानें आला होता. ज्याप्रमाणें कांहीं महिन्यांपूर्वीं वॉशिंग्टन फ्रेंचांकडे आला होता, तसाच जुमॉनव्हिल ब्रिटिशांकडे आला होता. पण ब्रिटिशांनीं—म्हणजे ब्रिटिशांचा हस्तक वॉशिंग्टन यानें त्याचा 'खून' केला! नंतरच्या लढाईत पराभव झाला तेव्हां वॉशिंग्टनकडून शरणागति घेण्यासाठीं फ्रेंचांनीं जो खलिता तयार केला होता, त्यांत 'खून' हा शब्द दोन-तीन ठिकाणीं आलेला होता. मसुद्याचें भाषांतर करतांना त्या शब्दाचें अवधान व्हॅन ब्रामला राहिलें नव्हतें. या गफलतीचा फायदा घेऊन फ्रेंचांनीं ठासून दावा मांडला कीं, त्या खलित्याच्या रूपानें वॉशिंग्टन यांनीं आपल्या गुन्ह्याचीच कबुली दिली आहे. फ्रेंचांनीं अशा रीतीनें वॉशिंग्टन यांना 'पक्का खलनायक' ठरविण्याचा प्रयत्न केला. त्या प्रसंगाला उद्देशून एक दीर्घकाव्यहि रचण्यांत आलें होतें व त्यांतहि वॉशिंग्टनचें 'खलनायक' म्हणूनच चित्र रंगविलें होतें. पण, फ्रेंचांच्या या प्रयत्नांचा परिणाम ब्रिटिशांवर अगदीं उलट झाला. ते वॉशिंग्टनचा पाठपुरावा करण्यास सरसावले. वॉशिंग्टन यांना घाईघाईनें आणि भयंकर दडपणाखालीं माघार घ्यावी लागली, त्यामुळें मसुदा काळजीपूर्वक बघण्यास त्यांना उसंत

मिळाली नाहीं, असें त्यांचें समर्थन करण्यांत येऊं लागलें. शिवाय, पहिल्या चकमकींत पकडलेले फ्रेंच युद्धकैदी सोडण्याचें वचन 'फोर्ट ऑफ् नेसेसिटी' येथील शरणागति, करारान्वयें वॉशिंग्टन यांनीं दिलें होतें, तें व्हर्जिनियाच्या अधिकाऱ्यांनीं पाळलें नाहीं, याचा दोष वॉशिंग्टन यांच्याकडे नाहीं, असाहि मुद्दा त्यांच्या पाठपुराव्यादाखल मांडण्यांत येऊं लागला.

हळूहळू ही सारी कावकाव शमली. वॉशिंग्टन हे पुनः संग्रामांत गुंतले जाण्याचा प्रसंग येण्याच्या दरम्यान कांहीं काळ निघून गेला. सरहद्दीवरील मोहिमेच्या सर्व योजनांच्या बाबतींत इतका गोंधळ माजला कीं, त्याला कंटाळून १७५४ मध्येंच जॉर्ज वॉशिंग्टन यांनीं आपल्या सेनापतिपदाचा राजीनामा दिला होता; पण लगेच १७५५ च्या वसंतऋतूंतच त्यांना पुनः ओहिओच्या फांट्याच्या रोखानें जाण्याची पाळी आली. या वेळीं कोणताहि लष्करी हुद्दा न पत्करतां, एक वर्षापूर्वीच्या त्यांच्या मोहिमेंत सामील झालेल्या 'स्वीडिश गृहस्थाप्रमाणें' ते केवळ स्वयंसैनिक म्हणून दाखल झाले होते. तथापि, ही गोष्टहि फायद्याची ठरली. जनरल एडवर्ड ब्रॅडॉक नांवाचा एक मुरलेला आणि लढाईसंबंधीं निश्चित दृष्टिकोन असलेला सेनानी ब्रिटिश सैन्याच्या दोन पलटणी घेऊन व्हर्जिनियांत आला होता. ब्रिटिश अमेरिकेच्या भूमीवरून फ्रेंचांची हकालपट्टी करण्यासाठीं त्याची रवानगी झालेली होती. ब्रॅडॉकच्या मदतनिसांच्या गटांत विनावेतन सदस्य म्हणून काम करण्याची संधि वॉशिंग्टन यांनीं मिळविली.

पूर्वीच्या मोहिमांप्रमाणेंच या वेळींहि कंटाळवाणा विलंब हें वैशिष्ट्य ठरलेंच. अखेर १७५५ च्या मेमध्यें ब्रॅडॉकचें सैन्य कूच करायला निघालें. या सैन्यांत कायम नोकरींतील सैनिक, स्वयंसेवक आणि जुजबी फौज मिळून दोन हजार माणसें होतीं. हें सैन्य कंबरलँड किल्ल्यापासून डुकिस्ने किल्ल्याच्या रोखानें निघालें. हें अंतर दीडशें मैल होतें. प्रचंड सामग्री आणि तोफखाना यांच्यापायीं ही कूच फारच मंदगतीनें होत होती. वॉशिंग्टन यांच्या सूचनेवरून कमी गतीचीं वाहनें पिछाडीस स्वतंत्र गटानें वाटचाल करीत होतीं. या पिछाडीच्या पथकाबरोबर वॉशिंग्टन होते. वाटेंत त्यांना आमांशाच्या विकारानें पछाडलें. सहा आठवडे रखडत प्रवास केल्यानंतर बंदुकीच्या गोळ्यांचे आवाज ऐकूं येऊं लागले. पण, मागील लढायांप्रमाणें या आवाजांत कमी 'गोडवा' असल्याचा प्रत्यय वॉशिंग्टन यांना आला.

ब्रॅडॉकच्या सैन्यांतील आघाडीवरचीं पथकें डुकिस्नेपासून कांहीं थोड्याच मैलांवर येऊन पोहोंचलीं. जंगलांतून लपतछपत तीं पुढें पुढें सरकत होतीं तोंच फ्रेंच आणि रेड इंडियन यांच्या एका पथकानें त्या तुकड्यांवर हल्ला केला. शत्रूचे सर्व सैनिक रेड इंडियन लोकांच्या पोषाखांत होते. त्यांचा प्रमुख एक धडाडीचा फ्रेंच वीर होता. एकदम झाडाआडून पुढें येऊन त्या सैनिकांनीं भडिमार सुरू केला. कांहीं वेळ ब्रिटिश पथक परिस्थितीवर काबू ठेवूं शकलें; फ्रेंचांचा हल्ला परतविला गेला. त्यानंतर युद्धाचें पारडें फिरलें. परिस्थिति ब्रॅडॉकला प्रतिकूल झाली. ब्रिटिश सैनिकांचे तांबडे गणवेश शत्रूला सहज टिपतां यावे असे होते. अदृश्य शत्रूकडून होणाऱ्या अचूक नेमबाजीमुळें ब्रिटिश सैनिक बावरून गेले. ज्या प्रकारें मोर्चे लावून लढण्याचें शिक्षण त्याना मिळालें होतें, तसें लढणें या प्रदेशांत त्यांना अशक्य झालें. त्यामुळें ब्रिटिश सैनिक म्हणजे असहाय, बावरून-बावरून गेलेल्या जमावाप्रमाणें लढाईला निरुपयोगी ठरले. ते पटापट मोठ्या संख्येनें धारातीर्थी देह ठेवीत होतेच आणि त्यांचे अधिकारी सैनिकांना पुनः पुनः संघटित करण्याची धडपड करीत असतांना शत्रूच्या गोळ्यांना मोठ्या संख्येनें बळी पडले. एकूण अधिकाऱ्यांपैकीं तीन-चतुर्थांश अधिकारी अशा रीतीनें ठार व जखमी झाले. सैन्याची पुनर्रचना करण्याच्या कामांत स्वतः ब्रॅडॉक जातीनें भाग घेत होता. घोड्यावर बसून सारखा मागें आणि पुढें फेऱ्या मारीत तो सैन्याची संघटना करण्याचें काम मोठ्या धैर्यानें चालू ठेवीत होता. पण अखेर प्राणघातक जखमांनीं तोहि कामांतून गेला. ब्रिटिश सैन्यापेक्षां व्हर्जिनियाच्या सैन्याचें वर्तन खूपच समतोल वृत्तीचें होतें, असा अभिप्राय वॉशिंग्टन यांनीं आपल्या दैनंदिनींत लिहून ठेवला आहे. स्वतः वॉशिंग्टन हे पिछाडीपासून वेगानें पुढें येऊन प्रत्यक्ष लढाईत दाखल झाले. पण त्यांच्या किंवा इतरांच्या प्रयत्नांचा कांहींच उपयोग झाला नाहीं. वॉशिंग्टन यांचा जीव बचावला, हें केवळ त्यांचें सुदैव होय. ते घोड्यावर बसलेले असतांनाच घोडा मरण्याचे प्रकार दोनदां झाले. गोळ्या चाटून गेल्यामुळें त्यांच्या कपड्यांच्या चिंध्या चिंध्या झाल्या. असें सुदैव मात्र अनेकांच्या वांट्याला आलें नाहीं. त्या जंगल विभागाला एखाद्या खाटिकखान्याची कळा आली होती. ब्रॅडॉकच्या सैन्यांतील जवळ जवळ नऊशें सैनिक व अधिकारी ठार किंवा जखमी झाले. रेड इंडियनांना शिरें कापण्याचा खेळ खेळण्याला भरपूर संधि मिळाली. "त्यांच्या भयंकर कर्कश गर्जनांचे आवाज

माझ्या मरणघटकेपर्यंत माझ्या कानांवर आदळत राहातील," असे उद्गार एका ब्रिटिश अधिकाऱ्यानें याबाबत काढले आहेत. गलितधैर्य झालेले सैनिक प्राण घेऊन मागें पळत असतांना कित्येक जण रेड इंडियनांच्या हल्ल्याला बळी पडले.

इतकी ससेहोलपट झाली तरीदेखील, जर ब्रॅडॉकच्या मदतनीस उपसेनानींनी उरलेल्या सैनिकांची सुसंघटना करून पुनः डुक्किस्ने किल्ल्यावर चाल केली असती, तर या विनाशाची भरपाई होऊं शकली असती. खरें सांगायचें म्हणजे, विजयाचें पारडें फिरलेंहि असतें. ब्रॅडॉक हा सेनापति या दृष्टीनें मूर्ख होता, अशी जी समजूत चालत आलेली आहे ती खरी नाहीं. त्याच्या सैन्यावर अचानक हल्ला झाला, हें म्हणणेंहि खरें नाहीं. फ्रेंचांपेक्षां त्याचें सैन्य संख्येनें जास्त होतें. आणि जर डुक्विस्नेच्या किल्ल्यावर फ्रेंचांनीं ज्या धडाडीनें मारा केला, तशी धडाडी त्यांनीं दाखविली नसती तर त्यांचा तो हल्ला अपेशीच ठरला असता. तें कांहीं असलें तरी नंतरच्या अशा शवच्छेदनानें, त्या वेळच्या पराजयाची लांछनास्पद वस्तुस्थिति कांहीं बदलूं शकत नाहीं. डुकिस्नेवर अद्याप फ्रेंचांचाच काबू होता. विजयामुळें शेफारून गेलेल्या रेड इंडियनांच्या गनिमी हल्ल्यामुळें सीमा अद्याप असुरक्षितच होती.

वॉशिंग्टन यांच्या वैयक्तिक दृष्टीनें कांहीं गोष्टी समाधानाच्या होत्या. त्या पराजयामुळें जनतेंत नैराश्य पसरलें होतें, आरोप-प्रत्यारोपांची लाट उसळली होती: तरी त्या परिस्थितींत खुद्द वॉशिंग्टन यांच्या लौकिकाला मुळींच धक्का लागला नाहीं. आजारी असूनहि त्यांची वागणूक शौर्यशाली झाली, हें सर्वांना ठाऊक होतें. "आपले प्राण वचावले याबद्दल आणि ओहिओच्या किनाऱ्यावरील लढाईंत आपल्या शौर्यानें आपण जो अविस्मरणीय लौकिक संपादिला त्याबद्दल मी आपलें अभिनंदन करूं इच्छितों," असें पत्र नॉर्थ कॅरोलिनाच्या गव्हर्नरनें त्यांना लिहिलें होतें. अशीं गौरवपर पत्रें त्यांना इतर अनेकांकडून आलीं होतीं. त्यांची नेमणूक पुनः व्हर्जिनियाच्या सेनेवर झाली. त्यांचा हुद्दा कर्नलचाच राहिला, पण या वेळीं त्यांना व्हर्जिनियाच्या सैन्याचे 'सरसेनापति' असा किताब दिला गेला. ही घटना १७५५ च्या ऑगस्टमधील होय. या वेळीं त्यांचें वय अवघें तेवीस वर्षांचें होतें.

हा किताब मोठा गौरवास्पद होता. त्यांच्यापुढील कार्य मात्र अत्यंत बिकट होतें. साडेतीनशें मैलांची सरहद्द त्यांनीं राखायला हवी अशी अपेक्षा होती, पण

त्या कामासाठीं त्यांच्या हाताखालीं कांहीं शेंकडाच सैनिक होते. जुने वसाहतवाले आणि नवीन भूमि लागवडीखालीं आणूं इच्छिणारे धाडसी तरुण या दोघांच्याहि आशांचा चक्काचूर झालेला होता. ब्रिटन आणि फ्रान्स यांच्यामध्यें युद्ध जुंपल्याची अधिकृत घोषणा अद्याप झालेली नव्हती. तशी घोषणा १७५६ च्या मेमध्यें झाली. पण ती घोषणा होण्यापूर्वी आणि नंतर उत्तर अमेरिकेंत ज्या मुख्य चक-मकी झाल्या, त्या सर्वत्र इतरत्र झाल्या. 'विस्मृत सीमेवरील विस्मृतिप्राय बनलेले सैनिक' आपण आहोत, अशी वॉशिंग्टन यांची आणि त्यांच्या सैनिकांची भावना झाली होती. १७५७च्या उत्तरार्धात वॉशिंग्टन पुनः आमांशाच्या विकारानें आजारी पडले. अखेर त्यांची प्रकृति फार बिघडली आणि सेनापतिपदाचा त्याग करून त्यांना माउंट व्हरनॉनला परतावें लागलें. आपल्या वडिलांप्रमाणें आणि सावत्र भावाप्रमाणें आतां लौकरच दफनभूमि हेंच आपले निवासस्थान ठरणार कीं काय असें वाटावें, अशी परिस्थिति होती. अद्याप त्यांचें लग्न झालेलें नव्हतें. वॉशिंग्टन घराणें पुढें चालविणारा सख्खा असा कोणी वारसहि नव्हता. माउंट व्हरनॉनच्या मालमत्तेची दुर्लक्ष झाल्यामुळें दुर्दशा झालेली होती. त्यांच्या इतर मालमत्तेची दशा अशीच शोचनीय झाली होती. विधानसभेच्या सभा-सदांच्या निवडणुकींत दोन वेळां त्यांनीं उमेदवार म्हणून नांव दिलें होतें. पण मतदारांनीं दोन्ही वेळीं त्यांच्या पदरांत पराभवच टाकला होता.

तथापि १८५८ च्या वसंतऋतूंत वॉशिंग्टन पुनः तन्दुरुस्त बनून उभे ठाकले. आणखी एखाद्या मोहिमेंत उडी घेण्याइतकी पुनः त्यांची तयारी झालेली होती. ब्रिगेडिअर जनरल फोर्बस नांवाच्या सेनानीच्या नेतृत्वाखालील ब्रिटिशांच्या एका सेनेला डुक्वेस्ने किल्ल्यावर हल्ला करण्याचा आदेश मिळाला होता. त्याच त्या रस्त्यानें सैन्याबरोबर कूच करण्याची वॉशिंग्टन यांची ही चौथी खेप झाली असती. पण फोर्बसनें वॉशिंग्टनना धक्का देणारा आणि चीड आणणारा निर्णय घेतला. त्या रुळलेल्या मार्गानें कूच न करतां पेन्सिल्व्हानियांतील रेज टाउनपासून पश्चिमेकडे नवीच वाट काढून त्या मार्गानें कूच करण्याचें त्यानें ठरविलें. नेहमींच्या रस्त्यानें जाण्यांत काय फायदे आहेत, हें पटवून देण्याचा वॉशिंग्टन यांनीं प्रयत्न केला; पण तो प्रयत्न निष्फळ ठरला. फोर्बस याचाच शब्द अखेरचा होता. अर्थात् मग वॉशिंग्टन यांच्या अंदाजाप्रमाणें अखेर पदरीं निराशा पडलीच. आठवड्यांमागून आठवडे जातां जातां महिने

लोटले. उन्हाळाहि संपून गेला. फोर्बसचें सैन्य मात्र अद्याप ओहिओच्या फांट्याकडे रखडत वाटचाल करीतच होतें. ब्रिटिशांनीं हिंवाळ्यापुरती ही मोहीम तहकूब ठेवण्याचें जवळ जवळ ठरविलें होतें. तोंच १७५८ च्या नोव्हेंबर-मध्यें फ्रेंचांनीं ओहिओ खोऱ्यांतील लढाईतून अंग काढून घ्यायचें ठरविलें. डुक्विस्ने किल्ल्याला वेढा पडण्याची वाटहि न बघतां त्या किल्ल्याला आग लावून देऊन ते निघूनहि गेले. विनारक्तपात विजय मिळवून देणारी ही घटना म्हणजे साऱ्या घटनांचा धक्का देणारा कळसच होय. तथापि, परिणाम जसा व्हावयास हवा तसा झाला; म्हणजे त्या किल्ल्याच्या जागेवरच ब्रिटिशांचा पिट किल्ला उभा राहिला. या मजबूत किल्ल्याच्या अस्तित्वामुळें व्हर्जिनियाच्या सरहद्दीवर पुनः शांततेची परिस्थिति निर्माण झाली.

फ्रान्सविरुद्ध अमेरिकेच्या अन्य आघाड्यांवर लढा अद्याप चालूच होता; पण वॉशिंग्टन यांनीं मात्र व्यक्तिशः शस्त्रसंन्यास घेण्याची मनाची तयारी केली होती. वास्तविक डुक्विस्नेच्या मोहिमेचा शेवट त्यांच्या पदरांत गौरव पडून झालेला होता. त्यांना ब्रिगेडिअरचा हुद्दा देण्यांत आला होता. १७५८ मध्यें फ्रेडरिक परगण्याच्या वतीनें विधानसभेच्या निवडणुकीला ते उभे राहिले आणि अखेर निवडून आले होते. आणि त्यांचें लग्नहि ठरलें होतें. व्हर्जिनियाच्या सेनेंतील दुय्यम अधिकाऱ्यांना जेव्हां वॉशिंग्टन यांच्या राजीनाम्याचा बेत कळला, तेव्हां त्यांनीं आपल्या पदाचा त्याग करूं नये म्हणून त्या अधिकाऱ्यांनीं त्यांना ‘ नम्र पत्र ’ पाठविलें होतें. त्या पत्रांत त्या अधिकाऱ्यांनीं म्हटलें होतें :

> “ असा उत्कृष्ट सेनानी, असा खरा मित्र आणि असा मनमिळाऊ सांगाती गमावणें ही आम्हांला मोठी हानि वाटते...
>
> “ आणखी दुःखाची गोष्ट अशी कीं, आमची हानि जितकी होईल त्यापेक्षां आपल्या दुर्दैवी देशाची अधिक हानि होईल. आणि ही हानि तितकीच न भरून येणारी ठरेल. लष्करी कामकाजांत इतका अनुभवी असलेला दुसरा पुरुष कोठें मिळेल? देशभक्ति, धैर्य आणि वर्तणूक या सर्व दृष्टींनीं उत्कृष्ट असा दुसरा पुरुष कोठें आहे? .. तुमच्यावर आमची नितान्त श्रद्धा आहे. केवळ तुमच्या सान्निध्या-मुळेंच प्रत्येक सैनिकाचा निर्धार बळावेल, त्याला जोम येईल, भयंकर संकटेंहि त्याला तुच्छ वाटतील आणि कष्ट व हालअपेष्टांना तो हंसत तोंड

देईल. कारण ज्याला आम्ही ओळखतो आणि जो आम्हांला प्रिय आहे असा पुरुष आमचा नेता आहे, या जाणिवेनेंच आमच्यांत आत्मविश्वास बाणेल."

हे गौरवोद्गार अगदीं अंतःकरणापासूनचे आहेत, याबद्दल शंका घ्यायला जागाच नाहीं. त्याचप्रमाणें स्वतः वॉशिंग्टन यांनीं १७५७ च्या सप्टेंबरमध्यें डिन्विडीला सादर केलेल्या निवेदनांतील सारभूत सत्यहि आपण नाकारूं शकत नाहीं. त्या निवेदनांत वॉशिंग्टन यांनीं लिहिलें होतें :

"माझ्यांत दोष आहेत आणि ते अनेक आहेत, हें मी नाकारीत नाहीं. मी संपूर्ण निर्दोषी, परिपूर्ण आहें, असा दावा करीन तर जग मला घमेंडखोर म्हणेलच, पण मीदेखील स्वतःला तसेंच मानीन...पण एक गोष्ट मी जाणून आहें आणि त्याबद्दल मला अत्यंत समाधान वाटतें. ती गोष्ट म्हणजे सार्वजनिक जबाबदारी अंगावर पडलेल्या कोणाहि माणसानें माझ्याइतकी आपली जबाबदारी पार पाडण्याचा प्रामाणिक प्रयत्न देशहिताच्या तळमळीनें केलेला नाहीं, आपल्यावर विश्वासानें सोंपविलेलें कर्तव्य पार पाडण्याचा माझ्याइतका प्रयत्न कोणीं केला नाहीं, अशी माझी भावना आहे आणि तशी भावना बाळगण्याला मी पात्र आहें, ही मला अत्यंत समाधानाची गोष्ट वाटते."

तथापि, या निवेदनांत कांहींसा तऱ्हेवाईकपणा दिसतो. आणि कर्नल वॉशिंग्टन यांच्या सेवानिवृत्त जीवनाच्या कहाणीकडे वळण्यापूर्वी या तऱ्हेवाईकपणाचें परिशीलन करून घेणें अगत्याचें आहे. त्यांच्या लष्करी जीवनाच्या पांच वर्षांच्या कालखंडांतील इतर पत्रव्यवहार वरील निवेदनाच्या पार्श्वभूमीवर ठेवल्यास असें दिसून येतें कीं, हा कालखंड वॉशिंग्टन यांच्या दृष्टीनें मुख्यतः निराशेचा आणि अवहेलनेचाच होता. कित्येकदां ते चिडत असत, याबद्दल त्यांना दोष देतां येणार नाहीं. त्यांच्या हाताखालील अधिकाऱ्यांच्या मतांत तथ्य आहे. सरहद्दीवरील युद्धाचें स्वरूप आणि परिणाम यांची अनुभवानें त्यांना अगदीं यथार्थ जाणीव झालेली होती. विल्यम्सबर्ग या राजधानींत, सरहद्दीपासून दूर बसून विचारविनिमय करणाऱ्या विधानसभेच्या सदस्यांपेक्षां तर त्यांचा अनुभव खूपच सखोल होता. फ्रेंच लोक जास्त पक्का पाय रोवण्यापूर्वीं आणि ओहिओच्या प्रदेशांतील सर्व रेड इंडियन जमाती स्वतःच्या बाजूला वळविण्यांत फ्रेंचांना यश येण्यापूर्वींच

त्यांचें उच्चाटन करण्याची तळमळ वॉशिंग्टन यांना होती. पण, त्यांच्या मार्गांतले अडथळे डोकें सुन्न करून टाकणारे होते. 'विधानसभेला देशहिताची जाणीवच नाहीं' असें वॉशिंग्टन यांना अनुभवानें वाटूं लागलें होतें. एका सभासदानें तर चक्क सांगून टाकलें होतें कीं, ओहिओवर फ्रेंचांचा हक्कच आहे! विधानसभेच्या सभासदांच्या मनांत गव्हर्नर डिन्विडी यांच्याबद्दल आणि ते ज्या कंपनीशीं संबंधित होते तिच्याबद्दल संशयवृत्ति वसत असल्यामुळें विधानसभा मोहिमांसाठीं पैसा मंजूर करण्याला नाखूप असे. स्वतः डिन्विडी हा उदासीन नसला तरी, पैसे मोकळेपणानें सोडणारा नव्हता. निदान, वॉशिंग्टन यांना तसें वाटत असे. शिवाय, त्याचे खाजगी हेतु असत नि त्यांच्या सिद्ध्यर्थ त्याचीं पावलें पडत असत. त्यामुळें इतर दृष्टींनींहि त्याचा उपयोग होत नसे. आणि वॉशिंग्टनविषयींची त्याची आस्था हळूहळू कमी कमी होत होती; स्नेहभावाची वागणूक कमी कमी झालेली होती.

लष्करी प्रशासक या नात्यानें वॉशिंग्टन यांचें कामहि एक प्रकारें निरर्थकच ठरत होतें. सर्व प्रकारच्या सामग्रीचा पुरवठा अगदींच तुटपुंजा होई. सैन्यभरतीची गति अगदीं मंद असे. ज्यांची कशीबशी भरती होई, त्यांपैकीं बहुतेक माणसें त्या दृष्टीनें अगदींच नालायक असत. सैन्यांतून पळून जाण्यापेक्षां निराळें कोणतेंच 'कौशल्य' त्यांच्या अंगीं नसे! या अनुभवामुळें थोड्या मुदतीच्या करारानें सैन्यांत भरती केलेल्या सैनिकांच्या जुजबी फौजेबद्दलची एक प्रकारची तिरस्काराची भावना त्यांच्या मनांत रुजलेली होती. ते स्वतः एक उच्च वर्गांत मोडणारे सन्मान्य सद्गृहस्थ होते; भरती होणारे सारे सैनिक त्यांच्या मानानें कनिष्ठ वर्गाचे होते. आपल्या सैनिकांची काळजी ते चांगल्या प्रकारें वहात असत; पण त्यांनीं अपराध केल्यास शासन करण्याइतके ते कठोर बनत असत. १७५७ च्या ऑगस्टमध्यें त्यांनीं डिन्विडीला लिहिलेल्या पत्रांतील पुढील उतारा पाहा :

"लष्करी न्यायालयापुढील खटल्याच्या कामकाजाच्या वृत्ताची प्रत आपल्याला पाठवीत आहें. इग्नेशिअस एडवर्ड्स् व स्मिथ या दोघांना देहान्ताची शिक्षा झाली होती, त्याप्रमाणें त्यांना गेल्या गुरुवारीं फांशीं देण्यात आलें... त्यांना गोळ्या घालण्याऐवजीं फांशीं दिलें, याबद्दल माफ कराल अशी आशा आहे. फांशीं दिल्यामुळें इतरांच्या मनांत जास्त भीति निर्माण होते. इतरांना इशारा देण्याच्या दृष्टीनेंच हा मार्ग

अवलंबिला. या शिक्षेला ते अगदीं पात्र होते. एडवर्ड्स् हा दोनदां सैन्यांतून पळून गेला होता, आणि स्मिथ हा उभ्या खंडांत अत्यंत नीच माणूस असल्याचें पुराव्यानें सिद्ध झालें होतें ज्यांना फटक्यांची शिक्षा झाली होती, त्यांना ती शिक्षा देण्यांत आली आहे. उरलेल्या आरोपींच्या बाबतींत काय करावयाचें, तें कळविण्याची कृपा करावी. ''

त्या उरलेल्या लोकांना अखेर माफी देण्यांत आली. पण तोंपर्यंत त्यांना वॉशिंग्टन यांनीं '' बंद लोखंडी दरवाजाच्या अंधारकोठडींत डांबून ठेवलेलें होतें.''

अनेकदां वॉशिंग्टनना सुस्पष्ट आदेशच देण्यांत येत नसत. '' मला मिळणारे हुकूम अत्यंत अस्पष्ट, शंका यावी असे आणि अनिश्चित असतात; आज जें मान्य केलें जातें तेंच उद्यां निषेधार्ह ठरतें !'' अशी तक्रार त्यांनीं १७५६ च्या डिसेंबरमध्यें केली होती. त्यांची सारीच परिस्थिति संदिग्ध स्वरूपाची आणि विसंगत होती,—म्हणजे त्यांना अधिकार दिल्याचा देखावा होता, पण प्रत्यक्ष सत्ता मात्र कसलीच नव्हती. १७७४ सालीं त्यांना व त्यांच्या सैनिकांना जो पगार मिळाला तो इतर वसाहतींतील सेनाधिकारी व सैनिक यांना मिळालेल्या पगारापेक्षां कमी होता. त्यांचा हुद्दा कर्नलचा असला तरी रॉयल कमिशन असलेल्या कप्तानाचा दर्जा मात्र त्यांच्यापेक्षां जास्त मानला जाई. १७५४ सालीं कॅप्टन मॅके नांवाचा एक अधिकारी उत्तर कॅरोलिनामधून एक तुकडी घेऊन आला होता, त्यानें कर्नल वॉशिंग्टन यांना आपला प्रमुख अधिकारी म्हणून मान्य करण्यास साफ नकार दिला होता. दुसरा एक कॅप्टन डॅगवर्दी म्हणून होता. या इसमानें सेवानिवृत्त होऊन आपला निवृत्तिवेतनाचा हक्क विकूनदेखील टाकला होता. याचा अर्थ त्याचें ' रॉयल कमिशन ' विस्मृतींत जमा झालेलें होतें. तरी पण त्यानेंहि कर्नल वॉशिंग्टन यांना आपला प्रमुख सेनानी म्हणून मानण्याचें नाकारलें होतें. आणि ब्रिटिश लष्करी अधिकारी, वसाहतींतील लष्करी अधिकाऱ्याकडे तुच्छतेनें पाहतात, ही गोष्ट वॉशिंग्टन जाणून असावेत. व्हर्जिनियाच्या लष्करी अधिकाऱ्यांचा एका ब्रिटिश अधिकाऱ्यानें ' शर्यतीच्या घोड्यांवरील स्वार ' असा उल्लेख केला होता. '' एखाद्या जमीनदाराला त्याच्या नांगरामागून उचलून एका दिवसांत सेनेचा अधिकारी बनविलें म्हणून कांहीं तो सेनानी होत नाहीं, '' असे उद्गार एका ब्रिटिश अधिकाऱ्यानें खाजगी बोलण्यांत काढले होते.

या सर्व गोष्टींची वॉशिंग्टन यांना चीड येणें स्वाभाविक होतें. पण विशेष

लक्षांत येण्यासारखी गोष्ट ही कीं, त्यांची ही चीड वाजवीपेक्षां जास्त असे. त्या गोष्टी एखाद्या शल्यासारख्या त्यांना बोचत रहात असत. त्यामुळें ते संतापानें बेभान बनत असत. ते अगदीं प्रामाणिक आणि कार्यक्षम होते, हें मान्य केलें तरी डिन्विडीला व इतरांना पाठविलेल्या पत्रांतून ते स्वतःच्या सद्गुणांचा नेहमीं नगारा वाजवीत असत,' असें वाटल्यावांचून रहात नाहीं. १७५३ मधील एकाच घटनेमुळें त्यांच्या वृत्तीचें मर्म कळतें. त्या वेळीं फ्रेंचांना डिन्विडीचा निर्वाणीचा खलिता नेऊन पोहोंचविण्याची कामगिरी त्यांनीं स्वेच्छेनें पत्करली होती. त्यांची ती कृति देशभक्तीची आणि धैर्याची होती हें खरें; पण त्याचबरोबर एका अत्यंत महत्त्वाकांक्षी तरुणाची ती कृति होती हेंहि खरें आहे. त्यानंतरच्या त्यांच्या कृति आणि पत्रव्यवहार यांचा विचार केल्यास ते कोणी भरमसाट स्वप्नाळू माणूस नव्हते, हें आढळून येतें. तोफेच्या तोंडासमोर उभें राहून नांवलौकिक मिळवायचा त्यांचा प्रयत्न होता हें खरेंच; पण त्यांच्या दृष्टीनें ती बाब क्षणभंगुर नव्हती. भरीव स्वरूपाची सर्वमान्यता आणि फलप्राप्ति देणारी ती बाब होती. निराळ्या शब्दांत सांगावयाचें तर 'लष्करी कले' वर ते जीवनाचा जुगार खेळत होते. जमीनदार होणें कांहीं कमी नव्हतें. पण त्यांची दृष्टि अधिक झगझगीत लक्ष्यावर केंद्रित झालेली होती. 'सन्मान' आणि 'बढती' हें तें लक्ष्य होय.

'बढती' ( प्रिफरमेंट ) हा शब्द वॉशिंग्टन यांच्या त्या कालखंडांतील पत्रव्यवहारांत, त्यांच्या स्वतःच्या संदर्भांत अनेकदां डोकावतांना दिसतो. मोठ्या राज्यांत सद्गुणी माणसांना कोणा थोरांचा पाठिंबा असण्यावरच त्यांची बढती अवलंबून असते; पण व्हर्जिनियासारख्या वसाहतींतहि तो माणूस डोळ्यांत भरण्याजोगा बनणें आवश्यक असेच. डॅनिएल पार्क या सुप्रतिष्ठित व्हर्जिनियन नागरिकानें ड्यूक ऑफ मार्लबरोच्या सैन्यांत स्वयंसेवक म्हणून प्रवेश करून कामगिरी बजावली होती. त्याबद्दल ॲन राणीकडून त्याला एक हजार गिनींचें रोख बक्षीस मिळालें होतें व हिरेजडित कोंदणांत बसविलेलें राणीचें छोटें चित्र बहाल करण्यांत आलें होतें. नंतर लीवार्ड बेटांचा गव्हर्नर म्हणून पार्कची नेमणूक झाली होती. इतकें सुदैव वांट्याला येणें अपवादात्मकच असतें आणि वॉशिंग्टन यांच्या महत्त्वाकांक्षेची उडी इतकी उंच नव्हती. पण त्यांना एक माहीत होतें कीं, प्रांतिक जुजबी फौजेचा मुख्य अधिकारी या नात्यानें बढतीच्या शिडीवर आपण

अगदींच खालच्या पायरीवर आहेत. खरें म्हणजे त्या शिडीच्या त्याहि पायरीवर ते नव्हतेच, असें म्हणायला हरकत नाहीं.

म्हणून ब्रिटनच्या खड्या फौजेंतील रॉयल कमिशन मिळविण्याची उत्कट इच्छा त्यांना होती. त्यांचा भाऊ लॉरेन्स याला तसें मिळालेंहि होतें. रॉयल कमिशन मिळाल्यास त्यांचें स्थान निश्चित झालें असतें. १७५४ सालीं त्यांच्याकडे जगाचे डोळे वळले होते, पण ती गोष्ट तात्पुरती ठरली होती; शिवाय फ्रान्स आणि ब्रिटन या दोन प्रचंड साम्राज्यांच्या संघर्षाच्या भव्य नाटकांतील ते केवळ एक प्रतीकात्मक पात्र होते. १७५५ मध्यें ब्रॅडॉकच्या हाताखालील तरुण मदतनिसांच्या अंतर्वर्तुळांत स्थान मिळाल्यामुळें ते पुनः एकदां उजेडांत आले होते. त्यानंतरहि त्यांनीं बजावलेल्या कामगिरीबद्दल त्यांचा गौरव झाला. त्यांच्या एकूण जीवनाचें सिंहावलोकन करून पाहिल्यास या तरुण व्हर्जिनियन वीराची कीर्ति सातत्यानें वाढतच राहिली होती, असें आपल्याला दिसतें. १७५५ च्या मोनोंगाहेला आघाडीवरील भयंकर पराभवाच्या वेळींहि, कर्नल वॉशिंग्टन यांच्या इभ्रतीला धक्का लागला नाहीं. उलट, ' भविष्यकाळीं त्यांच्याकडून कांहीं तरी कार्य करवून घ्यावयाचें असल्यामुळेंच त्या वीरात्म्याला ईश्वरानें त्या विनाशांतून वांचविलें, ' असे उद्गार एका धर्माधिकाऱ्यानें प्रार्थनामंदिरांतील प्रवचनाच्या वेळीं काढले होते. या उद्गारांचें भांडवल अनेक चरित्रकारांनीं केलेलें आहे. आपणहि त्या उद्गारांकडे बोट दाखवूं शकूं. पण स्वतः वॉशिंग्टन यांना मात्र निराशेचा झटका येई त्या क्षणीं वाटे कीं, तीं सारीं वर्षें फुकट गेलीं. सर्वच दृष्टींनीं तीं वर्षें फुकट गेलीं, आपण अंधारांतच चाचपडत होतों, असेंच त्यांना अनेकदां वाटे. आपल्या देशसेवेला मान्यता मिळाली नाहीं, सुदैवानें आपल्याला गुंगारा दिला आहे, असेंच त्यांना वाटत राही. ब्रॅडॉक युद्धांत ठार झाला होता आणि त्याच्या जागीं आलेल्या सेनापतीवर वॉशिंग्टन यांच्या हुशारीचा आणि गुणवत्तेचा कांहींच प्रभाव पडलेला दिसत नव्हता. मग, त्यांना आपलें उद्दिष्ट साध्य करण्याचा मार्ग काय होता ? जर आपण अपेशी ठरलों तर त्याचें कारण प्रयत्नांत कसूर झाली हें खास नव्हे, असें त्यांना वाटे. लॉर्ड लाउडोन यांची नेमणूक उत्तर अमेरिकेचे सरसेनापति म्हणून झाल्यावर वॉशिंग्टन यांनीं १७५७ च्या जानेवारींत त्यांना लिहिलेल्या पत्रांत म्हटलें आहे :

" आपल्यासारख्याचा परिचय होण्याचें भाग्य मला लाभलेलें नसलें तरी

आपलें नांव माझ्या दीर्घ परिचयाचें आहे. जगांत इतरत्र आपण महत्त्वाची कामगिरी बजावून जी राजसेवा केली आहे, त्यामुळें आपली कीर्ति सतत माझ्या कानांवर पडत आली आहे. मी फाजील स्तुति करतों असें मानूं नका. आपल्या चारित्र्याबद्दल गाढ आदराची भावना माझ्या अंतःकरणांत वसत असली, तरी हें लिहिण्यांत माझा उद्देश स्तुतिपाठ गाण्याचा नाहीं. मी प्रामाणिक माणूस आहें, माझ्यांत आंतबाहेर असें कांहीं नाहीं आणि कावेबाजपणा माझ्या रक्तांत मुळींच नाहीं......

स्वतः माझ्याबद्दल बोलायचें झाल्यास हें सांगितल्याशिवाय रहावत नाहीं कीं, जनरल ब्रॅडॉक हे त्या दुर्दैवी पराभवांतून जगले-वांचले असते तर मला माझ्या मनाप्रमाणें बढती मिळाल्याशिवाय राहिली नसती. त्यांनीं तसें आश्वासन मला दिलें होतें आणि ते अत्यंत प्रामाणिक व उदारवृत्तीचे पुरुष होते. निरर्थक आश्वासनें त्यांनीं कधींच दिलीं नसतीं, असा विश्वास मला त्यांच्याबद्दल वाटतो."

"लष्करी क्षेत्रांत बढती मिळण्याच्या सर्व आशा मीं सोडून दिल्या आहेत," असे उद्गार वॉशिंग्टन यांनीं १७५८ च्या वसंतऋतूंत काढलेले आहेत. तथापि, त्यांनीं आपल्या परिचयाच्या दोघां ब्रिटिश अधिकाऱ्यांना दोन पत्रें पाठविलीं होतीं. त्या पत्रांत त्या अधिकाऱ्यांना गौरवून, "प्रांतिक अधिकाऱ्यांच्या सामान्य वर्गांतून, विशेष हुद्द्याच्या जागीं नेमणूक होण्याचा मान आनंदानें स्वीकारायला तयार असलेला सैनिक" अशी आपली शिफारस त्यांनीं जनरल फोर्बस यांच्याकडे करावी, अशी विनंती केली होती. १७५८ च्या जूनमध्यें डिन्विडी यांच्या जागीं लेफ्टनंट गव्हर्नर म्हणून फॉकायर याची नेमणूक झाली, तेव्हांहि वॉशिंग्टन यांनीं फॉकायरला खूपच गौरवून लिहिलें होतें आणि आपली पात्रता मोठ्या सौजन्यानें त्याच्या निदर्शनास आणली होती.

दुसऱ्या शब्दांत सांगायचें झाल्यास, बढती मिळविण्यासाठीं जॉर्ज वॉशिंग्टन यांनीं जें जें करण्यासारखें होतें तें तें सारें केलें. बढतीसाठीं कॅप्टन डॅगवर्दी याच्यापेक्षां आपण अधिक पात्र आहोंत, हें सरसेनापतीला पटवून देण्यासाठीं त्यांनीं १७५६ मध्यें थेट बोस्टनपर्यंतचा प्रदीर्घ प्रवास केला होता. अर्थात् आपल्या स्वाभिमानाला बाध येईल अशा कोणत्याहि मार्गाचा अवलंब न करतांच त्यांनीं कसून सर्व प्रकारें प्रयत्न केले. वॉशिंग्टन यांच्या एकूण जीवनाशीं, त्यांच्या

मराठा ग्रं. सं. । म. ठाणे स्वक्रमांक २१२८ दि: ५।३।
अनुक्रम २६० नों. दि.

आयुष्यांतील १७५३ ते १७५८ च्या कालखंडांतील कांहीं गोष्टी थोड्याशा विसदृश वाटतात. त्या काळांतील वॉशिंग्टन हे कांहींसे अपरिपक्व, चिडचिडे वाटतात. ते आपल्या प्रतिष्ठेचा फारच बाऊ करतांना दिसतात; वारंवार तक्रारी करतांना दिसतात; आणि बढतीची तळमळ फारच उघड उघडपणें दाखवितांना दिसतात. त्यांचीं कांहीं गाऱ्हाणीं खरीं होतीं. ते कार्यक्षम होते आणि दृढनिश्चयी होते. पण त्यांचा मुख्य दोष हा कीं, इतरांच्या मनावर आपले गुण ठसविण्याचा प्रयत्न ते फार करीत असत. आणि, जीवनाची सुरुवात मोठी आशावादी आणि रोमांचक झाल्यावर, आपल्या साऱ्या आकांक्षा विफल ठरत आहेत असें दिसूं लागतांच त्यांच्यामध्यें छलगंड निर्माण झाला होता. आपली सर्व बाजूंनीं जांचणूकच केली जात आहे, अशा समजाला ते बळी पडले होते. "माझ्या सर्व कृतींचा आणि हेतूंचा खोडसाळपणानें विपर्यास केला जात आहे, अशी माझी खात्री झाली आहे," असें त्यांनीं डिन्विडीला १७५७ च्या ऑक्टोबरमध्यें लिहिलेल्या पत्रांत म्हटलें होतें. 'धीर धर आणि वाट पाहा' या सुभाषिताची शिकवण अद्याप त्यांच्या गळीं उतरलेली नव्हती. किंवा कटु अनुभवांच्या द्वारेंच हा शहाणपणाचा धडा ते गिरवीत होते, असें म्हणूं या.

शिवाय, वॉशिंग्टन यांचे गुण जितके होते, त्यापेक्षां त्यांच्यांतल्या उणीवा थोड्या जास्तच होत्या, असेंहि म्हणावें लागतें. व्हर्जिनियापुरताच विचार करण्याइतका त्यांचा दृष्टिकोन संकुचित होता. एकूण युद्धाचा विचार सर्व बाजूंनीं न करतां फक्त व्हर्जिनियाच्या हद्दीवरील युद्धाचाच विचार त्यांच्यापुढें असे. त्यामुळें १७५८ सालीं फोर्बसनें रेज टाउनच्या मार्गानें कूच करण्याचें ठरविलें तेव्हां त्याच्या या बेताला वॉशिंग्टन यांनीं इतका विरोध केला कीं, त्या विरोधाची कमान आणखी थोडी वाढली असती, तर वरिष्ठ सेनानीचा आज्ञाभंग करण्याच्या अपराधाचा ठपका वॉशिंग्टन यांच्यावर ठेवला गेला असता. फोर्बस हे पेन्सिल्व्हानियाच्या कारस्थानी डावाला बळी पडले आहेत, असें वॉशिंग्टन यांना ठामपणें वाटत होतें. सैन्यासाठीं नवा रस्ता तयार करण्याचा डाव पेन्सिल्व्हानियाचा आहे. त्यामुळें पश्चिम प्रदेशाकडे दळणवळण ठेवण्याचा मार्ग हातीं येऊन पेन्सिल्व्हानियाला ओहिओ सीमाभागांतील व्यापार बळकावतां येईल, असें वॉशिंग्टन यांचें मत होतें आणि हाच त्या प्रतिस्पर्धी वसाहतीचा डाव आहे, असें त्यांना ठामपणें वाटत होतें. पण, आपल्या मार्गाबद्दल त्यांनीं हट्ट धरणें म्हणजेहि एक

कारस्थानी डावच आहे, असाहि आरोप केला जाईल, व्हर्जिनियाच्या फायद्या-साठींच ते त्या मार्गाचा आग्रह धरतात, असेंहि उलट म्हटलें जाईल. ही गोष्ट त्यांच्या लक्षांतच आली नव्हती. तें कांहीं असो, त्यांना व्हर्जिनियाविषयीं नितान्त निष्ठा होती. फक्त व्हर्जिनियाच्या रक्षणार्थच आपल्याला खड्या फौजेंतील अधिकाऱ्याचा हुद्दा मिळावा, असें त्यांना वाटत होतें. इतर कोणत्याहि अटीवर रॉयल कमिशन त्यांना मिळवावयाचें असतें तर पैसे भरून तसें त्यांना विकतहि घेतां आलें असतें. ब्रायन फेअरफॅक्सनें तें तसें विकतच घेतलें होतें.

बढतीच्या या तीव्र तळमळीइतकीच ' सन्मान ' संपादन करण्याची तहानहि तीव्र होती. कित्येकदां ' बढती'ची आणि ' सन्माना 'ची अशा दोन्ही आकांक्षा त्यांच्या दृष्टीनें एकरूपच होत्या, असें वॉशिंग्टन यांच्या कांहीं उद्‌गारांवरून वाटतें. अर्थात् ' सन्माना 'च्या कक्षेंत ' परिचितांचा स्नेहभाव 'हि समाविष्ट होताच. ( या परिचितांच्या यादींत कदाचित् सॅली फेअरफॅक्सचा क्रमांक सर्वांत वरचा असूं शकेल. ) वॉशिंग्टन यांच्या सर्व जीवनाकडे पाहिल्यास असें दिसून येईल कीं, ते सतत आपल्या नांवलौकिकाला अत्यंत जपत असत. कदाचित् हा त्यांच्या व्यवहारचतुरपणाचा भाग असेल. आपण जें करतां तें आणि इतर आपल्या संबंधांत जें करतात तें, या सर्व गोष्टींची लेखी नोंद केली जाईल, अशी जागरूकता ठेवण्याच्या प्रवृत्तींतून ही गोष्ट निर्माण झाली असेल. शिवाय, लोकमान्यता असण्याचें समाधानहि वॉशिंग्टन यांना अगत्याचें वाटत असे. जें योग्य असेल तेंच करीत राहण्याचा त्यांचा निर्धार होता. आपल्या कृतींचा परिणाम इष्ट न झाला तरी, आपली नैतिक सचोटी लोकांकडून मान्य केली जाईल, अशी त्यांना आशा वाटे. आणि अंतिमतः त्यांना बढतीपेक्षां सन्मानाचें महत्त्व अधिक वाटे. आणि हें सन्मानाचें स्थान आपल्या वसाहतींत आपल्याला असलेंच पाहिजे असें त्यांना वाटे. कर्नल वॉशिंग्टन हे ऊर्जितावस्थेला येण्याच्या मार्गावरील प्रवासी होते. पण त्याचबरोबर मूलतः ते एक संभावित व्यक्ति होते. त्यांना लष्करी क्षेत्रांत उदयास येण्याची महत्त्वाकांक्षा कितीहि मोठी असली तरी ती महत्त्वाकांक्षा अतिरेकी नव्हती. ह्यामुळेंच ती महत्त्वाकांक्षा मनाच्या एका कोपऱ्यांत दाबून ठेवणें त्यांना शक्य झालें. ही महत्त्वाकांक्षा त्यांच्या मनांत खोलवर पण किती जिवंत होती, हें सांगतां येत नाहीं. मात्र आपल्याला एक गोष्ट माहीत आहे. १७५९ सालीं माउंट व्हरनॉनच्या निवासस्थानाची नवी सजावट त्यांनीं केली, तेव्हां त्यांनीं

लंडनहून सहा पुतळ्यांची मागणी केली होती. ॲलेक्झांडर दि ग्रेट, ज्युलियस सीझर, स्वीडनचा बारावा चार्ल्स, प्रशियाचा दुसरा फ्रेडरिक, प्रिन्स यूजिन आणि ड्यूक ऑफ् मार्लबरो या सहा जणांचे ते पुतळे होते. आणि हे सारे पुरुष लष्करी क्षेत्रांतील नेते होते. वॉशिंग्टन यांच्या लंडन येथील दलालाला हे पुतळे मिळवतां आले नाहींत. पण, 'त्या पुतळ्यांऐवजीं कवि आणि तत्त्वज्ञ यांचे पुतळे वा तसबिरी पाठवूं का,' असें त्या दलालानें विचारतांच वॉशिंग्टन यांनीं स्पष्ट नकार दिला होता.

वॉशिंग्टन निराशेच्या मनःस्थितींत असतांना त्यांचें समाधान करतांना कर्नल फेअरफॅक्स यांनीं सीझर, ॲलेक्झांडर यांचींच उदाहरणें दिलीं होतीं. कर्नल फेअरफॅक्स म्हणाले होते, "सीझरचीं टिपणें वाचाल किंवा ॲलेक्झांडरच्या चरित्राचा लेखक क्विंटस कर्टिअस याचें लिखाण वाचाल, तर तुम्हांला आढळून येईल कीं, तुमच्या वांट्याला आलेल्या किंवा येऊं शकणाऱ्या यातनांपेक्षां अधिक यातना त्यांच्या वांट्याला आलेल्या आहेत. कष्टांना सीमा नाहीं, तक्रारींनीं डोकें फुटण्याची वेळ आली आहे, हाताखालचे सैनिक कर्तव्यच्युत बनत आहेत आणि आपल्याविरुद्ध उठाव होत आहेत, अशा घटनांनीं या पुरुषांचें आयुष्य बुजबुजाटलेलें आहे. आणि जर कदाचित् अशा आपत्तींनीं तुम्हांला ग्रासलेंच तर त्या वीरात्म्यांनीं ज्या धीरोदात्तपणानें त्यांना तोंड दिलें, तशाच धीरोदात्तपणानें तुम्हीहि त्या आपत्तींना तोंड द्याल, असा मला निःसंशय विश्वास वाटतो."

सैन्यांतून सेवानिवृत्त झाल्यावर आत्मसमाधानासाठीं आणखी कांहीं गोष्टींची वॉशिंग्टन यांना जरुरीच असती तर तसें समाधान सहज करून घेतां आलें असतें. सीझरचा शेवट खुनानें झाला होता. ॲलेक्झांडर हा वयाच्या केवळ एकोणिसाव्या वर्षी राजपदावर आरूढ होण्याइतका भाग्यवान् असला तरी अल्पवयांतच–बत्तिसाव्या वर्षीच तो निधन पावला होता. जनरल वुल्फ हा वॉशिंग्टन यांचा समकालीन. वुल्फची कारकीर्द अत्यंत तेजस्वी असली तरी तीहि अल्पकालीनच ठरली होती. क्विबेक काबीज करण्याच्या लढाईत तो अवघ्या बत्तिसाव्या वर्षी मारला गेला होता. वॉशिंग्टन यांच्या सहकाऱ्यांपैकीं कोणीच त्यांच्या वरचढ ठरलेला नव्हता–कांहीं जणांनीं तर अपकीर्तिच पदरांत पाडून घेतलेली होती. कांहीं इहलोक सोडून गेलेले होते. उदाहरणार्थ, वॉशिंग्टन यांचा एक जुना सहकारी ख्रिस्तोफर गिस्ट हा देवीच्या आजाराच्या सांथीचा बळी ठरला होता.

बार्बाडोसमध्यें असतांनाच देवी येऊन त्या आजारांतून वॉशिंग्टन बचावलेले असल्यामुळें पुनः देवीच्या सांथीची बाधा त्यांना झाली नाहीं. पैहिल्या आजाराचे हे एका प्रकारें उपकार मानले पाहिजेत.

सेवानिवृत्त जमीनदार

आणि समाधान मानायला आणखीहि किती तरी उघड उघड दिसणाऱ्या गोष्टी होत्याच. फेअरफॅक्स कुटुंबाचा स्नेहभाव अजून कायम होता. चांगली मालमत्ता होती आणि फ्रेंचांशीं चालू असलेला संघर्ष संपल्यावर या मालमत्तेंत भर पडणार होती. याशिवाय ब्रह्मचर्याश्रम संपवून ते गृहस्थाश्रमांत प्रवेश करीत होते. त्यांची नियोजित वधू मार्था डॅन्ड्रिज कर्टिस ही एक सधन व प्रेमळ विधवा होती. तिचा पहिला नवरा डॅनिएल पार्कचा वंशज होता. ब्रिटनच्या ॲन राणीला मार्लबरोकडून खलितें पोहोंचविण्याच्या कामावर असलेला आणि ॲनकडून बक्षीस मिळवणारा व अखेर गव्हर्नरपद मिळविणारा डॅनिएल पार्क हाच होय. मार्था ही वयानें कांहीं थोड्याच महिन्यांनीं वॉशिंग्टनपेक्षां मोठी होती. पहिल्या नवऱ्यापासून झालेलीं दोन मुलें–एक मुलगा व मुलगी–तिला होती. वॉशिंग्टन आणि मार्था यांची प्रथम भेट केव्हां झाली, त्यांच्या ओळखीची परिणति अनुनय, प्रेम अशा पायऱ्यांनीं कशी होत गेली, हें निश्चितपणें सांगतां येत नाहीं. १७५८ सालच्या उन्हाळ्यांत वॉशिंग्टन यांनीं मार्थाला पाठविलेलें म्हणून जें पत्र आहे, तें बनावट दिसतें. उलट या वाङ्निश्चयाच्या वेळींहि जॉर्ज वॉशिंग्टन यांच्या मनांत सॅली फेअरफॅक्सबद्दलची भावनात्मक ओढ वसत होती, असें सूचित करणारा पुरावा उपलब्ध आहे. त्या वेळीं सॅलीला जॉर्ज वॉशिंग्टन यांनीं पाठविलेलें एक पत्र आहे. तें पत्र सॅलीवरील प्रेम व्यक्त करणारें आहे, असा त्याचा अर्थ लावतां येईल. कादंबरीकार ज्या अर्थानें प्रेमविवाह म्हणतात, तशा अर्थानें जॉर्ज आणि मार्था यांच्या हा प्रेमविवाह होता, असें म्हणतां येणार नाहीं. दूरदर्शी शहाणपणाचा विचार करूनच दोन्ही बाजूंनीं हें लग्न ठरलेलें असावें. या विवाहामुळें अन्य अनेक गोष्टी साधल्या तरी एक गोष्ट म्हणजे आपल्या मालमत्तेची देखभाल करणारा व्यवस्थापक मार्थाला लाभला होता. आणि जॉर्जला या विवाहानें संपत्तीचा लाभ झालेला होता. मात्र हें लग्न केवळ एक सोयीची बाब म्हणूनच झालें होतें, असें समजण्याचें कारण नाहीं. त्याचप्रमाणें सॅली मिळत नाहीं तर तिची जागा कोणाला तरी द्यायची, अशा विचारानें जॉर्जनें मार्थाशीं लग्न केलें, असें मानण्याचेंहि

कारण नाहीं. त्यांच्या संसारांत विसंवाद होता किंवा तो संसार चांगला झाला नाहीं, असें एकाहि समकालीनानें म्हटलेलें नाहीं. त्यांच्या संसाराच्या प्रदीर्घ कालावधींत केव्हांहि त्या दोघांत भांडण म्हणतां येईल इतके तीव्र मतभेद आढळून आले असते, तर त्यांचा गवगवा झाला असता आणि मग त्यावर भाष्येंहि झालीं असतीं आणि मग त्यांची नोंद कोणा तरी समकालीनाच्या पत्रांत आढळली असतीच.

१७५९ च्या जानेवारींत जॉर्ज वॉशिंग्टन यांचा विवाह झाला. आणि त्यानंतर सप्टेंबरमध्येंच त्यांनीं लंडनमधील एका नातेवाइकाला लिहिलेल्या पत्रांत म्हटलें होतें :

> " अनुरूप जीवनसाथी लाभून मी आतां संसारारूढ झालों आहें. आणि धकाधकीच्या अफाट जगांत अनुभवावयास न मिळालेलें सुख-समाधान मी सेवानिवृत्तीच्या जीवनांत मिळवूं शकेन, अशी आशा आहे. "

याच पत्रांत त्यांनीं खेदपूर्वक, लंडनला येतां येत नाहीं, याबद्दल लिहिलें आहे हें खरें आहे. " लंडनला भेट देण्याची इच्छा कित्येक वर्षांपासून मनांत आहे. पण आतां माझे पाय खोड्यांत अडकले आहेत. ती इच्छा मला आतां सोडूनच दिली पाहिजे, " असें त्यांनीं म्हटलें आहे. तथापि त्यांना मार्थाच्या संगतींत जीवन कंटाळवाणें वाटत होतें, असा समज करून घेण्याला कांहींच पुरावा नाहीं. उलट, वॉशिंग्टन यांनीं कंबरलँड किल्ल्याच्या परिसरांत किंवा अन्य आवाड्यांवर जें जीवन आतांपर्यंत घालविलें, त्या जीवनाच्या अगदीं विरुद्ध असलेल्या जीवनक्रमाशीं ते तावडतोब समरस झाले, ही गोष्ट विशेष म्हणावी लागेल.

असें कसें झालें, त्याचा खुलासा एका वस्तुस्थितींत सांपडतो. स्वतः त्यांनींच सैनिकी जीवनाचा कंटाळा आला असल्याचें म्हटलें होतें आणि लष्करांत बढती मिळण्याची अपेक्षाहि त्यांनीं सोडून दिली होती. तेव्हां विशेष प्रतिष्ठित दर्जा मिळवावयाचा आणखी एक मार्ग होता. हा मार्ग रोमांचक नसेल पण निश्चित स्वरूपाचा होता. व्हर्जिनियांतील एक बडे जमीनदार हें स्थान प्रस्थापित करणें हा तो मार्ग होय. दुसरें कारण असें दिसतें कीं, आतां वॉशिंग्टन हे अत्यंत कार्यरत होते. त्यांच्या गैरहजेरीच्या काळांत माउंट व्हरनॉनच्या शेतवाडीची

आबाळ होऊन ती फारच खालावलेली होती, तेव्हां तिच्या सुधारणेचें मोठंच काम होतें. घरहि अधिक सुसज्ज बनवावयाचें होतें. त्या काळांत लंडनमधून अनेक गोष्टी वॉशिंग्टन यांनीं मागविलेल्या दिसतात. एक ७॥ फूट लांब छप्पर-पलंग, शेतीविषयक अद्ययावत् आणि तज्ज्ञांना मान्य असें पुस्तक, निग्रो मजुरांना उन्हाळी कपडे करण्यासाठीं ४० वार कापड, नुकत्याच लिहायला-वाचायला लागलेल्या मुलांसाठीं सहा छोटीं पुस्तकें, अशा मागण्या त्यांनीं त्या काळांत केलेल्या दिसतात. नुकतींच लिहायला-वाचायला लागलेलीं मुलें म्हणजे वॉशिंग्टन यांचीं सावत्र मुलें होत. मुलाचें नांव जॉन पार्क (जॅकी) आणि मुलीचें नांव मार्था पार्क (पॅस्टी) कर्टिस. या मुलांसाठीं त्यांनीं विविध प्रकारचीं खेळणींहि मागविलीं होतीं. या मुलांसाठीं आणि नातलगांचीं जीं इतर मुलें त्यांच्याकडे येत, त्या सर्वांसाठींच वॉशिंग्टन यांना फार फार त्रास सोसावा लागला. कुत्सित टीकाकार म्हणतील कीं, जॅकी आणि पॅस्टी म्हणजे मोठी जबाबदारी असली तरी तें एक 'खुपणारें सुख'च होतें; कारण त्या जबाबदारीबरोबरच प्रचंड संपत्तीहि वॉशिंग्टन यांच्या पदरांत पडलेली होती. पण, त्या पोरांविषयींची जी इतर माहिती आपल्याला आहे ती लक्षांत घेतली तर, वरील म्हणणें अत्यंत कठोरपणाचें आहे, असेंच म्हणावें लागेल.

कामाच्या जबाबदाऱ्या खूप असल्या तरी एखाद्या सत्तावीस वर्षांच्या तरुणाला कुटुंबचालक म्हणून संबोधणें विचित्रच वाटेल. पण वॉशिंग्टन यांना कांहीं प्रमाणांत तरी कुटुंबचालकाची जबाबदारी पार पाडावीच लागत होती. पहिली गोष्ट म्हणजे माउंट व्हरनॉनच्या शेतवाडीचे ते मुख्य सूत्रधार होते आणि ही शेतवाडी म्हणजे एक छोटेंसें खेडेंच होतें. हळूहळू माउंट व्हरनॉन हेंच वॉशिंग्टन कुटुंबाच्या दृष्टीनें केंद्रवर्ती स्थान बनलें. सर्व भावांपेक्षां आणि बहिणींपेक्षां जॉर्जच जास्त यशस्वी असल्यामुळें सर्व जण त्यांच्याकडे मार्गदर्शनाच्या दृष्टीनें बघत असत आणि मदत लागल्यास त्यांच्याकडेच धाव घेत असत. स्वतःच्या कौटुंबिक जबाबदाऱ्या, अडचणींत सांपडलेल्या नातलगांना वा परिचितांना मदत करण्याची जबाबदारी, यांतून कदाचित् उसंत मिळालीच तर कर्टिस कुटुंबाकडून आलेल्या मालमत्तेच्या व्यवस्थेचें काम असेच. विधानसभेचे सभासद असल्यामुळें त्यांना विल्यम्सबर्गला अधिवेशनाला उपस्थित राहण्यासाठीं जावें लागेच आणि मतदारांना संतुष्ट ठेवण्या-साठीं इतर कर्तव्येंहि पार पाडावीं लागत असत. लग्न झाल्यानंतर लौकरच त्यांची

नेमणूक त्या पेरिश्यांतील एक न्यायाधिकारी म्हणून झाली होती, तेव्हां त्या कामाचीहि भर पडली होती. त्याचप्रमाणें पित्याच्या पावलावर पाऊल टाकून स्थानिक प्रार्थनामंदिराच्या भांडाराची व्यवस्था त्यांनीं आपल्याकडे घेतली होती आणि नंतर ते प्रार्थनामंदिराचे प्रतिनिधिहि बनले होते. १७६६ मध्यें अलेक्झांड्रा या गांवाच्या विश्वस्तमंडळांतील एक जागा रिकामी झाली होती, ती वॉशिंग्टन यांनीं स्वीकारली. आणि या सर्वांपेक्षां, मिळेल तेवढ्या जमिनीची मालकी मिळविण्याची संधि न दवडणाऱ्यांपैकींच ते एक होते. १७५४ च्या युद्धांत स्वेच्छेनें भरती झालेल्या सैनिकांना विस्तृत जमीन बक्षिसादाखल देऊं करण्यांत आली होती. त्यापैकीं पंधरा हजार एकर जमिनीवर आपला स्वतःचा हक्क आहे, असा त्यांचा दावा होता आणि तो दावा सतत लढवून अखेर त्यांनीं त्या प्रयत्नांत यश मिळविलें. जमिनी लागवडीखालीं आणण्यासाठीं आणि त्या जमिनींतील अन्य नैसर्गिक संपत्ति विकसित करण्यासाठीं ज्या अनेक संस्था स्थापन होत असत, त्यांपैकीं दक्षिण व्हर्जिनियांतील डिस्मल स्वॅंप कंपनींत आणि मिसिसिपी कंपनींत त्यांनीं भागीदारी पत्करली होती. मिसिसिपी कंपनी मिसिसिपीच्या खोऱ्यांतील जमिनीचा एक विस्तृत भाग विकसित करण्यासाठीं स्थापन झालेली होती.

वयाच्या चाळिसाव्या वर्षापर्यंत, कर्नल वॉशिंग्टन हे व्हर्जिनियांतील अत्यंत वजनदार व्यक्ति म्हणून गणले जाऊं लागले नसले तरी त्यांनीं बरीचशी प्रतिष्ठा संपादिलेली होती हें खास. लष्करी जीवनाचीं वर्षें खेदजनक आणि निराशाजनक स्मृतींप्रमाणें अजून त्यांच्या आठवणींत राहिलेलीं असण्याची शक्यता आहे. १७७२ सालीं चार्ल्स विल्सन पील या चित्रकारापुढें तसबीर काढून घेण्यासाठीं बसतांना त्यांनीं, व्हर्जिनिया जुजबी फौजेंत कर्नल असतांना घालीत असलेला गणवेश, खास चित्रासाठीं म्हणून अंगावर चढविला होता, ही घटना कदाचित् वैशिष्ट्यपूर्ण आणि महत्त्वाची मानायला हरकत नाहीं. पण त्यांनीं तसबिरीसाठीं तो गणवेश निवडला याला दुसरें अधिक संभाव्य कारणहि असूं शकेल. वॉशिंग्टन यांना नीटनेटक्या कपड्यांची विशेष आवड होती आणि आपण लष्करी गणवेशांत जास्त उठून दिसतो, हें त्यांना माहीत होतें. म्हणूनच त्यांनीं तसबीर काढून घेण्यासाठीं तो गणवेश अंगावर चढविला असावा. या तसबिरींतला चेहरा भरज्वानींतल्या संतुष्ट माणसासारखा दिसतो. ज्याचें जीवन परिपूर्ण आणि कार्यमग्न आहे, कंटाळवाणेपणा आणि कुढेपणा यांचा स्पर्शहि गतिमान

जीवनामुळें ज्याला होत नाहीं, जो मत्सरानें जळत नाहीं आणि आक्रमक महत्त्वाकांक्षेच्या सैतानानें ज्याला पछाडलेलें नाहीं, कोणी आपला विश्वासघात करील अशी भीति ज्याला नाहीं आणि ज्याची सदसद्विवेकबुद्धि त्याला बोचत नाहीं, अशा संतृत माणसाचा तो चेहरा दिसतो. ज्याला गांवांत जवळ जवळ नेत्याचेंच स्थान लाभलें आहे अशा माणसाचा आणि एखाद्या कुटुंबवत्सल पुरुषाचाच तो चेहरा वाटतो.

वरील वर्णनाला जुळेल असेच जवळ जवळ वॉशिंग्टन होते, म्हणून त्यांची वरील तसवीर हुबेहुब आहे, असें म्हणायला हरकत नाही. त्यांना स्वतःचें असें अपत्य नसलें तरी मार्थाचीं पहिल्या लग्नाचीं मुलें होतीं, हें लक्षांत घेतां त्यांच्याकडे पित्याची भूमिका आली होतीच, असें म्हणायला हरकत नाहीं. पॅस्टी १७७३ मध्यें निधन पावली, पण त्यानंतर थोड्याच महिन्यांत जॅकीचें लग्न झालें होतें. त्याला दोन मुलेंहि थोड्याच काळाच्या अंतरानें झालीं होतीं. त्यामुळें कर्नल वॉशिंग्टन हे आजोबाहि झाले होतेच. याशिवाय, आपल्या नात्यांतील असंख्य मुलांचा काका, मामा वा पालक या भूमिकाहि त्यांच्याकडे आलेल्याच होत्या. त्या दृष्टीनें ते कुटुंबवत्सल गृहस्थ होतेच.

तथापि पीलनें काढलेल्या तसबिरीव्यतिरिक्त, वॉशिंग्टन यांच्या पूर्वायुष्यांतील एखादी तसबीर उपलब्ध असती तर बरें होतें, असें वाटल्यावांचून राहवत नाहीं. जर समजा, १७५७ सालीं वॉशिंग्टन जसे दिसत, तसें त्यांचें दर्शन घडविणारी एखादी तसबीर उपलब्ध असती तर?—तर अद्याप प्रौढत्वाचा परिपक्वपणा ज्याच्या चेहऱ्यावर उमटलेला नाहीं अशा व्यक्तीचें दर्शन आपल्याला झालें असतें. * १७७२ मधील त्यांची ही तसवीर पाहिल्यानंतर मात्र, वॉशिंग्टन यांना चतुर पुरुष वगैरे विशेषणें वारंवार कां देण्यांत येतात, याची कल्पना येते. कारण त्या तसबिरींत ते समतोल वृत्तीचे भले गृहस्थ दिसतात. स्वतःभोंवतींच्या परिस्थितीवर नियंत्रण असलेला आणि संयमी असा पुरुष तो वाटतो. १७५७ मध्यें परिस्थिति

* जे. एम्. कॉप्ले नांवाच्या चित्रकारानें काढलेली तशी एक छोटी तसवीर उपलब्ध आहे देखील. १७५७ मध्यें ती काढण्यांत आली होती, हा समज अनेक वर्षें कायम होता. पण, आतां तें संभवनीय वाटत नाहीं. आणि तो चेहरा इतका सौम्य व निरुपद्रवी दिसतो कीं, वॉशिंग्टन यांच्या स्वभावाचें प्रतिबिंब त्यावर मुळींच दिसत नाहीं.

अगदीं उलट होती. त्या वेळचें चित्र उपलब्ध असतें तर त्यांत त्यांच्या कार्यक्षमतेचें तेज दिसलें असतें तरी, चटकन् रागावणारा हा गृहस्थ असावा असें वाटलें असतें. त्या काळांत त्यांची मुद्रा कांहीशी रागीट आणि उद्धट असावी, असें आपण कल्पनेनें चितारूं शकतों.

मध्यंतरींच्या कालावधींत वॉशिंग्टन यांची नैतिक उंची वाढली, हें त्यांच्या पत्रव्यवहारावरून आपल्याला स्पष्टपणें दिसतें. याचा अर्थ असा नव्हे कीं, त्यांच्यांत मोठी आमूलाग्र वैचारिक क्रांति झाली. युद्धभूमीवरून माउंट व्हरनॉनकडे परतलेल्या कर्नल वॉशिंग्टनना उपरति झाली होती, असा याचा अर्थ नव्हे. इग्नेशिअस लोयोला हा महान् योद्धा होता, पण पाम्प्लोना येथें आजारीपणानंतरची विश्रांति घेत असतांना त्याच्या अंतःकरणांत रक्तपाताबद्दल उबग निर्माण झाली. फ्रान्सिस्को बर्नार्डोन याला ऐन लढाईच्या वेळीं उपरति झाली आणि त्यानें पुनः निरामय जीवनाची सुरुवात 'फ्रान्सिस ऑफ ॲसिसी' म्हणून केली. वॉशिंग्टन यांच्या बाबतींत असें कांहींच घडलेलें नाहीं. ईश्वरी साक्षात्काराचा, उपरतीचा क्षण असा त्यांच्या जीवनांत आलाच नाहीं. ते निष्ठावान् एपिस्कोपालियनपंथीय होते हें खरें, आणि त्यांची धर्मश्रद्धा अत्यंत प्रामाणिक होती हेंहि खरें आहे; पण, धर्माचार हा त्यांच्या बाबतींत एक सामाजिक आचार होता, पार्सन विम्ससारख्यांनीं वॉशिंग्टन यांना ईश्वरी दृष्टान्त झाल्याच्या दंतकथा कितीहि सांगितल्या तरी, त्यांच्या धर्मनिष्ठेंत ईश्वरी दृष्टान्त वा देवदूतांचा वरदहस्त अशा गोष्टींना स्थान नव्हतें. कोणाहि व्हर्जिनियन जमीनदाराला 'ख्रिश्चन असणें' याचा जो अर्थ अभिप्रेत होता, त्याच अर्थानें वॉशिंग्टन हे ख्रिश्चन होते. त्यांनीं 'देवभोजनां'त कधींच भाग घेतलेला दिसत नाहीं. ते गुडघे टेकण्याऐवजीं उभे राहून प्रार्थना करीत आणि, प्रत्येक रविवारीं प्रार्थनामंदिरांत नियमानें जावयाचेंच, असाहि त्यांचा शिरस्ता नव्हता. कदाचित् त्यांच्यावर आजारीपणाचा परिणाम झाला असावा. लोयोला आणि सेंट फ्रान्सिस यांच्यावर झाला तितका नाट्यपूर्ण नसेल, पण वॉशिंग्टन यांच्यावर आजारीपणाचा परिणाम झाला असावा खास. १७५७-५८ च्या हिंवाळ्यांत आणि नंतर १७६१ मध्यें, अशा दोन वेळां ते चिंताजनक आजारानें अंथरुणाला खिळले गेले होते. "एकदां तर मला असें वाटलें होतें कीं, माझ्या सर्व प्रयत्नांवर मृत्युदेव मात करील आणि धीरोदात्तपणें लढूनदेखील मला अखेर त्याला शरण जावें लागेल," असे उद्‌गार या संबंधांत

वॉशिंग्टन यांनीं काढलेले आहेत. मृत्यूची छाया दिसूं लागल्यावर माणूस हटकून अंतर्मुख होतोच.

तथापि, आधीं शूर योद्धे असलेले पुरुष नंतर संत बनले, तसा कांहीं प्रकार वॉशिंग्टन यांच्या बाबतींत झाला असावा, असें मानून त्यांचें तसें चित्र रंगवण्याचा प्रयत्न करण्यापासून फारसें कांहींच हातीं लागणार नाहीं. आपण फार तर असें म्हणू कीं, लोयोला आणि सेंट फ्रान्सिस यांच्याप्रमाणेंच मनोविकासाची पात्रता त्यांनीं सिद्ध केली. आणि तसा खूपच मनोविकास त्यांनीं घडवून आणला हें खरेंच आहे. अगदीं साधुत्वाच्या पातळीवर नसेल, पण त्यांचें चारित्र्य खूपच उजळून निघालें. १७५९ पर्यंतच्या त्यांच्या जीवनाचें परिशीलन करणारा एखादा चरित्रकार म्हणूं शकेल कीं, ते कठोर होते, आणि पैशाचा प्रश्न आल्यास कंजूषहि होते. उदाहरणार्थ, 'फोर्ट ऑफ् नेसेसिटी'च्या पराभवाच्या वेळीं त्यांना व्हॅन ब्राम याला फ्रेंचांकडे ओलीस ठेवावें लागलें तेव्हां, आपल्यापाशीं असलेला एक गणवेश त्याला देतांना त्यांनीं त्याची किंमत वसूल केली होती. हा व्यवहार तसा शरमेचा नसला तरी, चलाख व्यवहारी माणसाला शोभेसा होता हें खास. पण सैन्यांतून सेवानिवृत्त झाल्यानंतरच्या काळांत वॉशिंग्टन बेदरकारपणानें आणि सढळपणानें लोकांना पैसे उसनवार देतांना दिसतात--दिलेले पैसे परत मिळण्याची आशा नसतांनाहि हें औदार्य दाखवितांना दिसतात. कित्येकदां त्यांनीं गुप्तदानहि दिलेलें दिसतें, तर अनेकदां अयाचित दानहि दिलेलें दिसतें. भौतिक यशामुळें बहुतेक माणसें अधःपतित होतात; पण वॉशिंग्टनच्या बाबतींत मात्र तें यश मनोविकासाला पूरक ठरलेलें दिसतें.

तेव्हां पील या चित्रकारानें काढलेल्या चित्रांत वॉशिंग्टन आपल्याला जसे दिसतात, तसेच ते १७७० च्या आसपास होते--संतुष्ट आणि नेकजात गृहस्थ! आपल्या बाग वाड्यांची आणि शेतवाड्यांची देखरेख करण्याच्या कामांत ते गुंतलेले नसत किंवा अन्य कोणतेंच काम नसे तेव्हां ते नृत्याचा आनंद उप-भोगतांना दिसतात, पत्ते खेळून करमणूक करतांना दिसतात किंवा घोड्यावरून शिकारीला जातांना दिसतात. त्याचप्रमाणें त्या काळांत त्यांच्याकडे वारंवार मेजवान्याहि झडत असत. १७७५ पर्यंतच्या सात वर्षांत सुमारें दोन हजार लोक तरी माउंट व्हर्नॉनला भेट देऊन गेले असतील. त्यांपैकीं बहुतेक लोक एकदां तरी पंगतीला जेवून गेलेले असतील. अनेक लोक एखादा दिवस मुक्कामास राहिले

असतील. विल्यम्सबर्गला विधानसभेच्या बैठकीसाठीं जाण्याव्यतिरिक्त, कधीं कामांसाठीं तर कधीं केवळ सहलीसाठीं त्यांनीं ॲनापोलिस, फ्रेडरिक्सबर्ग, डिस्मल स्वॅम्प वगैरे ठिकाणींहि प्रवास केला. १७७० सालीं पिट किल्ल्याच्या पलीकडे सरहद्दीपर्यंतचा प्रदीर्घ प्रवासहि त्यांनीं केला होता. त्या वेळीं ओहिओ नदीच्या खालच्या पात्रापर्यंत ते गेले होते. आणखी कोणकोणत्या जमिनीवर आपल्याला हक्क सांगतां येईल, याची पाहणी करणें हा या प्रवासामागील हेतु होता. असाच आणखी एक पश्चिमेकडचा दौरा १७७५ मध्यें काढण्याचें त्यांनीं योजिलें होतें.

पण १७७५ च्या उन्हाळ्याच्या प्रारंभीं अगदींच निराळी परिस्थिति पुढें ठाकली. पश्चिम भागाच्या दौऱ्याचा कार्यक्रम आंखण्याऐवजीं उत्तरेकडे बोस्टनला जाण्यासाठीं वॉशिंग्टन यांना प्रस्थान ठेवावें लागलें. कारण श्रीयुत जॉर्ज वॉशिंग्टन हे आतां जनरल वॉशिंग्टन झाले होते. हा व्हर्जिनियांतील राजनिष्ठ सद्गृहस्थ बंडखोर बनला होता. आतां वॉशिंग्टन हे केवळ व्हर्जिनियाचे लष्करी नेते नव्हते, तर जॉर्जियापासून मासाच्युसेट्स्पर्यंत पसरलेल्या तेरा अमेरिकन वसाहतींचे ते लष्करी प्रमुख बनले होते.

**निरभिमानी देशभक्त**

परिस्थितीला ही अत्यंत आश्चर्यजनक कलाटणी कशी मिळाली, याचें सविस्तर विवेचन या पुस्तकाच्या मर्यादेंत करण्याला पुरेसा वाव नाहीं. आपण फक्त थोडक्यांतच विचार करूं शकूं. असा विचार करतांना, वसाहतींनीं घेतलेल्या जहाल भूमिकेचीं तीन मुख्य कारणें होतीं, असें आपल्याला दिसून येतें. पहिलें कारण असें कीं, १७५६ ते १७६३ पर्यंत चाललेल्या युद्धांत अखेर ब्रिटनचा जय होऊन, वसाहतींना असलेला फ्रेंचांचा धोका नष्ट झाला होता. १७६३ च्या तहान्वयें, फ्रान्सनें उत्तर अमेरिकेंतील आपल्या स्वामित्वाखालील सर्व प्रदेशावरील सत्ता सोडून दिली होती. फ्रान्सची सत्ता जातांच अर्थात् वसाहतींचें ब्रिटनवरील परावलंबित्व मात्र वाढलें. दुसरें कारण म्हणजे या पहिल्या कारणाची स्वाभाविक परिणति होय. नवा प्रदेश ताब्यांत येतांच ब्रिटननें आपल्या वासाहतिक साम्राज्याची पुनर्घटना करण्याचा प्रयत्न सुरू केला. कॅनडाचा प्रदेश ब्रिटननें काबीज केल्यानंतर अशी कांहीं पुनर्घटना होणें अपरिहार्यच होतें; त्याचबरोबर ॲलेघेनी आणि मिसिसिपी यांच्या दरम्यानचा प्रदेश रेड इंडियन लोक आणि लोकरीचे व्यापारी

यांच्यासाठीं राखून ठेवून ब्रिटननें फ्रान्सची साम्राज्यासंबंधींची कल्पना जशीची तशी उचलली आहे, असें वसाहतवाल्यांचें मत झालें. ॲलेघेनीच्या प्रवाहापलीकडे गोऱ्या वसाहतवाल्यांना पाय पसरण्याची बंदी करणाऱ्या १७६३ च्या जाहीरनाम्याचा उद्देश असाच दिसत होता. त्याचप्रमाणें १७७४ च्या क्विबेक कायद्यान्वयें ओहिओ नदीच्या उत्तरेकडील सर्व मुलूख कॅनडा म्हणून अलग करण्यांत आला. शिवाय, मध्यंतरींच्या कालावधींत, ब्रिटननें अधिक पद्धतशीरपणें साम्राज्याची उभारणी करण्याचा उपक्रम चालविला होताच. या साम्राज्यांत जुन्या वसाहती व नवा जिंकलेला मुलूख या दोन्हींचा अंतर्भाव होत होता. पूर्व किनाऱ्यावरील वसाहतींना आतां साम्राज्याच्या कारभाराचा खर्च चालविण्यासाठीं आपला वांटा निरनिराळ्या करांच्या रूपानें देणें भाग पडूं लागलें. या करांचें स्वरूप व्यापारीहि होतें. म्हणजे, या करांमुळें वसाहतींना ब्रिटनकडे कच्चा माल रवाना करावा लागेच, पण ब्रिटिश मालाच्या बाजारपेठेचेंहि स्वरूप वसाहतींना आलें. संकल्पित करांचें ओझें वसाहतींना तितकें जड वाटण्यासारखें नव्हतें. वसाहती तशा समृद्ध होत्या. खुद्द ब्रिटनपेक्षां त्यांच्यावर आर्थिक बोजा कमी होता.

पण, अमेरिकन वसाहतींना संत्रस्त करणारी गोष्ट निराळीच होती. आणि ती गोष्ट म्हणजेच वसाहतींच्या जहाल भूमिकेचें तिसरें कारण होय. वसाहती म्हणजे ब्रिटनचे घटक प्रदेश नसून, अंकित प्रदेश आहेत, असें जें गृहीत धरून चालण्यांत येत होतें, तेंच शल्य वसाहतींना बोचूं लागलें होतें. खरोखर, जीवनपद्धति, स्वायत्त कारभाराचा अनुभव या सर्व दृष्टींनीं बघतां वसाहती परिणतावस्थेस पोहोंचलेल्या होत्या. पण मातृदेशाची—ब्रिटनची वृत्ति मात्र त्यांना 'लहान मुलें' मानण्याची होती. मुलें आज्ञाधारकपणें वागतील तर त्यांचे लाड करावेत, पण खोड्या करतील तर छडीचा प्रयोग करावा, अशा बापाची ती वृत्ति होती. देशभक्तीवर व्याख्यानें देणारे पुढारी 'जुलूमशाही' म्हणून ओरड करोत, पण खऱ्या अर्थानें ती जुलूमशाही नव्हती. किरकोळ गाऱ्हाण्यांनाच गंभीर स्वरूप आलें होतें. मुलें स्वतंत्रपणें आपल्या पायावर उभीं राहण्याइतकीं वयांत आलेलीं असतांनादेखील बापाची वृत्ति हट्टी, मूर्खपणाची आणि गुर्मीची असल्यामुळें प्रकरण विकोपाला जावें, तसें तें झालेलें होतें. "माणसानें जन्मभर मूलच राहणें त्याच्या हिताचें आहे काय?" असा सवाल टॉम पेन यांनीं १७७६ मध्यें प्रसिद्ध केलेल्या 'सदसद्विवेकबुद्धि' या शीर्षकाखालील पुस्तिकेंत केला होता.

आणि त्यानंतरच्या दहा वर्षांत अनेकांनीं, आपापल्या परीनें या सवालाचीं उत्तरें कांहींहि दिलेलीं असोत, पण ह्याच एक सवाल करण्याचा सपाटा चालविला होता.

सर्वच वसाहतींची कांहीं बाबतींतली भूमिका समान होती किंवा सर्व वसाहतींतील कांहीं वर्गांच्या बाबतींत तरी भूमिकेची ही समानता होती बोस्टनमधील दुकानदाराला फिलाडेल्फियांतील दुकानदाराच्या अडी-अडचणी समजूं शकत होत्या. दक्षिणेकडील जमीनदार आणि न्यूयॉर्कमधील सुस्थित मालक यांची पातळी एकच होती. आणि १७५६ मध्यें जॉर्ज वॉशिंग्टन यांनीं न्यूयॉर्कला भेट दिली होती, तेव्हां तेथील अशा एखाद्या मालकाच्या मुलीकडे 'भावी वधू' या दृष्टीनें त्यांनीं ओझरती नजर टाकली असण्याची शक्यता आहे. सर्वत्र ठिकाणच्या कायदेपंडितांची भाषा सरसकट एकच होती. वसाहतींच्या विस्तृत सीमेवर वास्तव्य करणाऱ्या वसाहतवाल्यांच्या बाबतींतहि हितसंबंधांची समानता होती. प्रत्येक वसाहतींत असमाधानाचीं कारणें परिस्थित्यनुरूप निरनिराळीं असतील. व्हर्जिनियापुरतें बोलायचें तर त्या वसाहतीची अर्थव्यवस्था अत्यंत डळमळीत झालेली होती. माउंट व्हरनॉनची बागवाडी अत्यंत काळजीपूर्वक व व्यवस्थितपणें चालविली जात होती. शेतीच्या उत्पन्नाला जोड म्हणून वॉशिंग्टन यांनीं एक पिठाची गिरणी चालविली होती आणि पोटोमॅक नदींत पकडलेल्या माशांचीं पिपेंच्या पिपें ते निर्यात करीत असत. तरीदेखील त्यांना फायदा असा फारच थोडा होत असे. तंबाखूचे भाव फारच घसरले होते. तंबाखूच्या पिकामुळें जमिनीचा कस कमी झाला होता. चलनाची चणचण होती. आणि व्हर्जिनियाची आयात निर्यातीपेक्षां जास्त असल्यामुळें तेथील जमीनदारांना नेहमीं ब्रिटिश व्यापाऱ्यांच्या ऋणांत रहावें लागे. आणि हे धनको ऋणकोला बहुधा फसवून लुबाडीत असत. व्हर्जिनियांतील इतर जमीनदारांप्रमाणेंच वॉशिंग्टन यांचीहि स्थिति होती. आंतबट्ट्याच्या व्यवहारापायीं शिलकेला लागलेली गळती थांबविण्यासाठीं वॉशिंग्टन यांनीं माउंट व्हरनॉनच्या शेतांत तंबाखूऐवजीं गहूं पिकवायला सुरुवात केली. पश्चिमेकडील नवी भूमि मिळविण्याच्या मोक्याकडे जागरूक पुरुष नजर ठेवून असे, पण ब्रिटिशांच्या जाहीरनाम्याचा अडसर त्याच्या मार्गांत आडवा येत होता. आणि वॉलपोल ग्रँट योजनेमुळें खुद्द ब्रिटनमधील लोकच प्रतिस्पर्धी म्हणून उभे राहण्याचा धोका निर्माण झाला होता.

पेन्सिल्व्हानियांतील दुसऱ्या कोणा जमीनदारांच्या बाजूनें ब्रिटिश सरकारनें निकाल देऊन ओहिओ कंपनीचा दावा काढून टाकला होता.

अर्थात् हें चित्र फार काळेंकुट्ट काढतां कामा नये. एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, व्हर्जिनियाच्या समृद्धीचें पारडें फिरलें, याला ब्रिटन कांहीं सर्वस्वीं जबाबदार नव्हतें. आणि प्रत्यक्ष युद्ध जुंपेपर्यंत तशी संपूर्ण जबाबदारी ब्रिटनवर आहे, असें कोणींहि म्हटलें नव्हतें. तसेंच ब्रिटनचें जमीनविषयक धोरण चीड आणणारें असलें तरी त्यामुळें व्हर्जिनियाची मुस्कटदाबी झाली होती असें नव्हे. खुद्द वॉशिंग्टन हे वसाहतीच्या भागांतील बारा हजार एकर जमिनींव्यतिरिक्त ओहिओ आणि कनाव्हा खोऱ्यांतील चोवीस हजार एकर जमिनीवर आपला हक्क सांगू शकत होते. त्याचप्रमाणें ब्रॅडॉकच्या पराभवामुळें ब्रिटिशांच्या प्रतिष्ठेला धक्का बसला, या म्हणण्याचाहि फार बाऊ करतां कामा नये. वॉशिंग्टन आणि इतर व्हर्जिनियन पुढारी स्वतःच्या वसाहतींतील घटनांना फार महत्त्व देत असले तरी त्यांनाहि माहीत होतें कीं, लुइसबर्ग आणि क्विबेक येथें ब्रिटननें आपल्या शस्त्रबलाचा झगझगीत प्रभाव टाकविला होता. आणि १७६३ नंतर राजा तिसरा जॉर्ज याचा कोणीहि प्रजाजन दिमाखानें सांगू शकत होता कीं, मी जगांतील सर्वांत बलाढ्य राष्ट्राचा नागरिक आहे! ब्रिटनचें जगांतलें हें स्थान व्हर्जिनियाच्या नेत्यांनाहि माहीत होतें. कोणीहि व्हर्जिनियन 'माझा देश' असा शब्दप्रयोग वापरीत असे तेव्हां, ब्रिटन आणि त्याची पांचवी वसाहत असाच अर्थ त्याला अभिप्रेत असे. ब्रिटन आणि व्हर्जिनिया यांचें भव्य एकरूपच त्याच्या मनांत असे. व्हर्जिनियांतील जमीनदाराला दारू, झकपक कपडे किंवा घरगुती सामान यांची किंमत म्हणून ब्रिटिश व्यापाऱ्याचें देणें असलेंच तर तसा देणेदार लंडनला अधिक जवळ असलेला इंग्लिश सद्गृहस्थहि होताच. त्यालाहि कर्ज होतेंच.

१७३५ सालीं विल्यम बायर्ड यानें म्हटलें होतें, "आमचें सरकार इतक्या भक्कम पायावर उभें आहे कीं, आमच्यावर मात केल्याविना कोणाहि गव्हर्नरला आमच्यावर जुलूम करतां येणार नाहीं. आणि आमच्याकडून त्याला पैसे उकळायचे असतील तर ते पैसे घ्यायची आपली पात्रता दाखवून दिली पाहिजे." तीस वर्षांनीं जेव्हां ब्रिटननें स्टॅंप ॲक्ट केला तेव्हां हा कर योग्य आहे, असें मान्य करायला अमेरिका तयार नव्हती. नागरिक स्वातंत्र्याबद्दल प्रेम असलेले ब्रिटिश नागरिक अशा भूमिकेवरून अमेरिकनांनीं नव्या कराराविरुद्ध भूमिका घेतली.

ब्रिटनकडून मिळालेला स्वातंत्र्यभावनेचा वारसा आणि प्रत्यक्ष वसाहतींतील परिस्थिति या दोन गोष्टींची प्रेरणा या विरोधी भूमिकेमागें असल्यामुळें तो विरोध अधिक बोलका बनला. इतरांपेक्षां कांहीं जण अधिक जोरानें बोलूं लागले. व्हर्जिनियांत तरुण पंडित थॉमस जेफर्सन, जोरदार आवेशानें बोलणारे पॅट्रिक हेन्री आणि मुरलेले नेते जॉर्ज मॅसॉन यांनीं जनतेकडून निश्चित प्रतिसाद मिळेल, अशा शब्दांत विरोध व्यक्त करायला सुरुवात केली. तरी पण त्या कराबद्दलची चर्चा कधीं अत्यंत व्यावहारिक पातळीवरून तर कधीं वरच्या तात्त्विक पातळीवरून सर्वच वसाहतींमध्यें होऊं लागली. 'स्पेक्युलेशन' या शब्दाच्या 'तात्त्विक समस्येची उपपत्ति लावण्यासाठीं विचारमंथन' या जुन्या अर्थाप्रमाणें 'स्पेक्युलेशन' सुरू झालें. कर्नल वॉशिंग्टन यांच्यासारख्या गब्बर जमीनदारानेंहि १७६५ सालीं लिहिलें आहे : "सर्व वसाहतींतील वैचारिक मंथनांत स्टॅंप ॲक्टला आज सर्वव्यापी स्थान लाभलेलें आहे."

अर्थात् त्या वर्षी, वॉशिंग्टन यांच्या किंवा इतर कोणाहि वसाहतवाल्याच्या मनाला ब्रिटनपासून फुटून निघण्याची कल्पना शिवलेली नव्हती. अमेरिकेच्या भूमिकेला खुद्द इंग्लंडमध्यें पाठिंबा मिळाला आणि तो कायदा रद्द झाला. इंग्लंडमधील व्यापाऱ्यांशीं पत्रव्यवहार करतांना वॉशिंग्टन दोन इंग्रजांमधील विचारविनिमय या भूमिकेवरून लिहूं शकत असत. याच भूमिकेवरून म्हणजे एकाच राष्ट्राचे नागरिक या नात्यानें एका व्यापाऱ्याला लिहिलेल्या पत्रांत वॉशिंग्टन यांनीं म्हटलें होतें, "ज्यांनीं त्या कायद्याच्या उच्चाटनाला हातभार लावला त्यांना सर्व ब्रिटिश प्रजाजन धन्यवादच देतील. मीहि हार्दिक धन्यवाद देतों." पण याच पत्रांत, त्या कायद्याचें उच्चाटन न झाल्यास होणाऱ्या दुष्परिणामांबद्दलचा इशाराहि त्यांनीं दिला होता. आणि आणखी तीन किंवा चार वर्षांनीं लिहिलेल्या कांहीं पत्रांत हा इशारा अधिक स्पष्ट आणि कडक शब्दांत दिलेला आढळून येतो. कारण स्टॅंप ॲक्ट गेला तरी त्याच्यामागून ब्रिटननें कर लादण्यासाठीं टाउन्स हेन्ड कायद्यासारखे कायदे केले. अर्थातच ब्रिटनमधून माल आयात न करण्याचें धोरण १७६९–१७७० सालीं व्हर्जिनियांतील नेत्यांनीं अवलंबिण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय घेणाऱ्यांत वॉशिंग्टन आघाडीवर होते. गन्स्टनहॉलचे आपले शेजारी रहिवासी आणि मित्र जॉर्ज मॅसॉन यांना लिहिलेल्या पत्रांत वॉशिंग्टन यांनीं म्हटलें होतें, "आतांपर्यंत राजाकडे केलेल्या सर्व अर्ज विनंत्या आणि पार्ले-

मेंटकडे केलेल्या तक्रारी निरुपयोगी ठरल्या आहेत. आपले हक्क आणि सवलती यांची जाणीव त्यांच्या मनांत जागृत करण्यासाठीं त्यांच्या व्यापारावर आणि उत्पादित मालावर बहिष्कार घालण्याचा उपाय करून बघण्याचें बाकी राहिलें आहे." मॅसॉन यांना लिहिलेल्या पत्रांत वॉशिंग्टन यांनीं गंभीरपणें बजावलें होतें, "ग्रेट ब्रिटनमधील आपल्या चढेल सत्ताधाऱ्यांकडून आपल्या परंपरागत नागरिक-स्वातंत्र्यावर जें आक्रमण होत आहे, त्यापासून त्या स्वातंत्र्याचें संरक्षण करण्यासाठीं शेवटचा उपाय म्हणून आवश्यक तर शस्त्र धारण करण्याला अमेरिकनांनीं तयार राहिलें पाहिजे."

ब्रिटन व वसाहती यांचें भांडण मिटविण्यासाठीं उघड उघड हिंसात्मक मार्गाच्या दिव्यांतून जावें लागेल, अशी कल्पना फारच थोड्या लोकांना होती. पुनः एकदां लोकमताच्या दडपणाचा परिणाम होऊन ब्रिटिश सत्ताधारी नमले. टाउन्स हेन्ड कायद्यांखालील सर्व जकाती रद्द करण्यांत आल्या. फक्त वसाहतींकडून आयात करण्यांत येणाऱ्या चहावरील जकात तेवढी कायम राहिली. आतां भानगड मिटेल, असाच बहुतेकांचा कयास होता. वॉशिंग्टनप्रभृति प्रमुख नेत्यांनाहि आपले वैयक्तिक व्यवसाय वा कामें यांकडे लक्ष पुरविणें आवश्यक होतेंच. वादांत तेच ते मुद्दे उगाळले गेल्यामुळें ते मुद्देहि बोथटल्यासारखे झालेच होते.

पण तेवढ्यांत, म्हणजे १७७३ च्या अखेरीस बोस्टनमधील कांहीं जहालांनीं 'बोस्टन टी पार्टी' या नांवानें विख्यात झालेलें निदर्शन केलें. त्यांनीं चहावरील जकात भरण्याला नकार देऊन चहाच्या कांहीं पेट्या समुद्रांत लोटून दिल्या. आपण करीत आहों त्याला प्रतीकात्मक महत्त्व आहे कीं नाहीं, याचा जाणीवपूर्वक विचार करून म्हणा किंवा तसें कांहीं न करतां म्हणा, या निदर्शकांनीं रेड इंडियनांसारखा म्हणजे अमेरिका खंडाच्या मूळ रहिवाशांसारखा पोषाख केलेला होता. हें निदर्शन किंवा त्या पायीं मालाची निरर्थक हानि करणें या दोन्ही गोष्टींना वसाहतींमधून सार्वत्रिक पाठिंबा नव्हता. पण, या निदर्शनाला उत्तर म्हणून पार्लमेंटनें मासाच्युसेट्सविरुद्ध दडपशाहीचा कायदा केला. ही वसाहत सर्व वसाहतींची पुढारी असें समजूनच तिच्याविरुद्ध हा दडपशाहीचा कायदा करण्यांत आला. त्याबरोबर सर्वच वसाहती मासाच्युसेट्सच्या पाठीशीं खड्या उभ्या राहिल्या.

आणि मग चहूंकडून पेटूं लागलेल्या आंदोलनाच्या आघाडीवर व्हर्जिनियांतील प्रमुख नेत्यांपैकीं एक म्हणून वॉशिंग्टन यांची मूर्ति दिसूं लागली. ते जहालांच्या

वर्गांतले नव्हते. " एक सौजन्यशील, समजूतदार, मितभाषी, शांतपणें कृति करणारा, प्रार्थनेंत गढलेल्या बिशपसारखा " असें त्यांचें वर्णन १७७४ मध्येंहि केलें जात होतें. वॉशिंग्टन यांनीं सुवर्णमध्याची भूमिका घेतली. पेट्रिक हेन्री-सारखे ज्वलज्जहाल एका बाजूला होते, तर परंपरागत विचारसरणीचे ॲटर्नी जनरल जॉन रॅन्डॉल्फ दुसऱ्या बाजूला होते. या दोन्ही टोकांपैकीं एकाहि टोकाला न झुकतां मध्यम भूमिका घेणाऱ्या वॉशिंग्टन यांचा 'ब्रिटनमधून आयात करूं नये' या भूमिकेला पाठिंबा होता, पण 'ब्रिटनला माल निर्यात करूं नये' ही भूमिका त्यांना मान्य नव्हती. कारण त्यांचें म्हणणें असें होतें कीं, व्हर्जिनियांतील उत्पादकाला आपला माल निर्यात करण्याला बंदी केल्यास तो आपल्या ब्रिटिश धनकोचें कर्ज फेडूं शकणार नाहीं.

तथापि एकदां मनाचा निर्धार झाल्यावर आपले विचार लपवून ठेवण्याची वृत्ति वॉशिंग्टन यांच्यामध्यें नव्हती. आणि वादविवादांत भाषापांडित्यानें फड गाजविणारे अफाट वक्ते ते नसले तरी जॉर्ज मॅसॉनसारख्या नेत्यांनीं मांडलेले मुद्दे त्यांनीं प्रयत्नपूर्वक आत्मसात् केले होते. १७७४ च्या जुलैमध्यें फेअरफॅक्स परगण्यांतील एका सभेंत तर मॅसॉन यांचे कांहीं 'विचार' मांडतांना ते आमचे 'निर्धार' आहेत, असें त्यांनीं ठासून सांगितलें. व्हर्जिनियाच्या विधानसभेंतील एक जुने सभासद या नात्यानें सर्व सभासदांचें नेतृत्व त्यांच्याकडे आलें. आपल्या अनुयायांसह एकेक पाऊल टाकीत ते उघड बंडाच्या दिशेनें वाटचाल करूं लागले.

बंडाच्या गरम वातावरणानें घाबरून कांहीं मध्येंच गळाले. या मार्गाबद्दल एकटा रॅन्डॉल्फ हाच धनिक साशंक होता असें नव्हे. मग, वॉशिंग्टन स्वतः कां कचरले नाहींत ? ते स्वतः श्रीमंतच होते. मग राजनिष्ठ बनून रॅन्डॉल्फप्रमाणें वसाहत सोडून जाण्याची कल्पना त्यांच्या मनाला कशी शिवली नाहीं ? कांहीं झालें तरी वॉशिंग्टन यांचा पिता आणि दोघे सावत्र भाऊ यांचें शिक्षण इंग्लंड-मध्यें झालेलें होतें. त्यांची शेजारी आणि निकटवर्ती मित्र असलेली फेअरफॅक्स मंडळी ही भावनात्मक दृष्ट्या इंग्लिशच होती. सॅलीचा नवरा कर्नल जॉर्ज विल्यम फेअरफॅक्स याच्या भावानें–ब्रायन फेअरफॅक्सनें पत्र लिहून मातृदेशाशीं तड-जोडीचे प्रयत्न करा, अशी विनंति केली होती. ब्रायनच्या म्हणण्याचा कांहींच परिणाम वॉशिंग्टन यांच्यावर कां होऊं शकला नाहीं ?

या प्रश्नाचें उत्तर उघड होतें. निदान वॉशिंग्टन यांच्या दृष्टीनें तरी हें उत्तर स्पष्ट होतें. केवळ त्यांच्या स्वाभाविक अंतःप्रेरणेनेंच त्यांना प्रतिकारासाठीं प्रवृत्त केलें होतें, असें नव्हे तर 'मानवतेचा पाठिंबा' आपल्याला आहे, अशी त्यांची श्रद्धा होती. त्यांना अभिप्रेत असलेली मानवता म्हणजे अर्थातच व्हर्जिनिया. ते जन्मानें व्हर्जिनियन होते. व्हर्जिनियांतच त्यांचा पिंड पोसला गेला होता. त्यांच्या अंतःप्रवृत्तींचें उगमस्थानहि व्हर्जिनियाच होतें आणि त्यांची मालमत्ताहि व्हर्जिनियांत होती. तीच त्यांची मातृभूमि होती. आपल्या देशबांधवांची भावना आपल्यासारखीच आहे, एवढाच दिलासा त्यांना हवा होता. सरळ वृत्तीच्या कोणाहि गृहस्थाला असें ठाम आश्वासन पुढें पाऊल टाकण्याच्या दृष्टीनें आवश्यक असतेंच.

दुसऱ्या कांहीं संभाव्य पण न घडलेल्या गोष्टींचाहि येथें निर्देश करायला हरकत नाहीं. समजा, डिन्विडीशीं असलेले वॉशिंग्टन यांचे संबंध पूर्वीसारखेच जिव्हाळ्याचे राहिले असते तर? किंवा डुकिस्नेच्या जंगलांतील संग्रामांत ब्रॅडॉक मारला न जातां त्याच्याकडून फ्रेंचांचा पराभव झाला असता आणि, विजयानंदाच्या भरांत त्यानें आपल्या या व्हर्जिनियन मदतनिसाची शिफारस रॉयल कमिशनसाठीं केली असती तर? वॉशिंग्टन यांना मोलाचें वाटणारें रॉयल कमिशन मिळालें असतें तर काय झालें असतें? फ्रेंचांविरुद्ध युद्ध कित्येक वर्षें चालू होतें. व्हर्जिनियाच्या बाहेर अन्य अनेक आघाड्यांवर तलवार गाजविणें वॉशिंग्टन यांना शक्य होतें. जुने संबंध विसरले जावेत आणि नवे संबंध जोडले जावेत, यासाठीं हा कालावधि खरोखर प्रदीर्घ होता. या एकूण प्रश्नांची उकल करूं बघणें म्हणजे चक्रव्यूहांतून बाहेर पडण्याइतकें दुरापास्त आहे.

तथापि, इतिहासांतील बारीकसारीक घटना एकत्र जुळून त्यांनीं निराळेंच स्वरूप धारण केलें. १७७४ च्या ऑगस्टमध्यें विल्यम्सबर्ग येथें भरलेल्या व्हर्जिनिया प्रांतिक परिषदेला उपस्थित राहण्यासाठीं गेलेले कर्नल वॉशिंग्टन संघर्षांत अधिकच ओढले गेले. ते आपलीं मतें ज्या शब्दांत मांडीत ते शब्द म्हणजे एका अर्थानें उसनवार घेतलेलीच परिभाषा होती. 'नैसर्गिक हक्क', 'कायदा आणि राज्यघटना' हे शब्दप्रयोग वारंवार कानांवर पडूनच त्यांच्या जिभेवर नाचूं लागले होते. पण महत्त्वाची गोष्ट अशी कीं, ही परिभाषा त्यांची एकट्यांचीच नव्हती. त्या परिभाषेनें व्यक्त होणाऱ्या भावना सर्वांनाच समान होत्या. त्या अधिवेशनांत त्यांची निवड, सर्व तेराहि वसाहतींच्या परिषदेला

व्हर्जिनियातर्फे पाठवावयाच्या सात प्रतिनिधींमध्यें झाली. सर्व वसाहतींची पहिली कॉंटिनेंटल कॉंग्रेस फिलाडेल्फियांत भरणार होती.

थॉमस जेफर्सन हे फार आजारी असल्यामुळें त्यांना प्रतिनिधि म्हणून पाठविणें शक्य नव्हतें. जॉर्ज मॅसॉन हे विधानसभेचे सदस्य नसल्यामुळें त्यांचें नांव प्रतिनिधींत समाविष्ट होऊं शकत नव्हतें. असें असलें तरी वॉशिंग्टन यांना भरपूर मतें पडलीं होतीं, हें बघितल्यास त्यांच्या सहकाऱ्यांच्या मनांत त्यांना केवढें स्थान होतें, याची कल्पना येते. राजनिष्ठा सोडून, वसाहतींच्या ध्येयाला पाठिंबा देणाऱ्या सर्वांत वजनदार व्हर्जिनियन नागरिकांपैकीं ते एक आहेत, याला जणुं लोकांनीं त्यांची निवड करून मान्यताच दिली होती. त्यांनीं गव्हर्नरबरोबर खाना घेतला तरी हा पुरुष तोंडपुजेपणा करणार नाहीं, असा विश्वास लोकांना वाटत होता. त्यांचा नेतृपदापर्यंतचा प्रवास पुढाकार घेण्याच्या हव्यासांतून झालेला नव्हता; त्याचीं कारणें स्पष्ट होतीं. पॅट्रिक हेन्री हेहि व्हर्जिनियातर्फे जाणारे एक प्रतिनिधि होते. ते कॉंग्रेसमध्यें तेजस्वी भाषण करतील हें सर्वांना माहीत होतें; त्याचप्रमाणें वॉशिंग्टन जें करतील, तें सदसद्विवेकबुद्धि आणि सभ्यता यांना धरून योग्यच असेल, असा सर्वांचा विश्वास होता.

आणि फिलाडेल्फियाच्या कॉंग्रेसमध्यें पॅट्रिक हेन्री यांनीं भव्यदिव्य भाषण केलेंच आणि तें वॉशिंग्टन यांनीं ऐकलेंहि. भावनापूर्ण आवाजांत, " मी व्हर्जि-नियन नाहीं, तर मी अमेरिकन आहे !" असें पॅट्रिक हेन्री यांनीं घोषित केलें. कॉंग्रेसचें अधिवेशन चालू असतांनाच बातमी येऊन थडकली कीं, ब्रिटिश फौजेनें बोस्टनचा ताबा घेतला असून तेथें ती मेढेकोट उभारीत आहे. ब्रिटिशांचें हें कृत्य राक्षसी आहे, अशीच भावना सर्वांच्या मनांत निर्माण झाली. इतर अनेक प्रश्नांवर कॉंग्रेसच्या प्रतिनिधींमध्यें एकवाक्यता होणें विकट ठरत होतें. उद्वेग वाटणें स्वाभाविक आणि ठीक असलें तरी कोणत्या मार्गानें तो व्यक्त व्हावा ?—त्या मार्गाचें निश्चित स्वरूप काय असावें हा प्रश्न होता. जॉन ॲडम्स यांनीं आपल्या पत्नीला लिहिलेल्या पत्रांत म्हटलें होतें : " कॉंग्रेसला आलेले प्रतिनिधि म्हणजे एकमेकांना अपरिचित असलेलीं पन्नास अनोळखी माणसें आहेत. एकमेकांची भाषा एकमेकांना कळत नाहीं. कल्पना, मतें, योजना कोणाच्या कोणालाच माहीत नाहींत, त्यामुळें ते एकमेकांचा मत्सर करतांना दिसतात--एकाची दुसऱ्याला भीति वाटत आहे. भित्र्या, बुजऱ्या लोकांचा तो समुदाय वाटतो." अधिवेशनांत

वक्तृत्वपूर्ण भाषणांची 'आतषबाजी खूप झाली. शाब्दिक कसरतहि खूप झाली. स्वतःच्या भावना किती तापूं शकतात आणि दुसऱ्याच्या भावनाहि किती मर्यादेपर्यंत तापवितां येतील, याची, जणूं चांचणीच प्रत्येक प्रतिनिधि घेत होता. वॉशिंग्टन हे जणूं अबोल राहून भाग घेत होते. अर्थातच ते इतरांपासून फटकून राहत नव्हते, मिळून मिसळूनच वागत होते. ज्या ठिकाणीं सर्वांचीच खूप खूप बोलण्यासाठीं अहमहमिका लागली होती, तिथें वॉशिंग्टन यांचा मितभाषीपणा हाच त्यांचा मोठा गुण ठरला असावा.

अर्थात् हें अधिवेशन इतर अनेक दृष्टींनीं निष्फळ ठरलें नाहीं. निषेध व्यक्त करण्याच्या व प्रतिकाराच्या निरनिराळ्या शांततामय उपाययोजना एकमतानें मंजूर झाल्या. १७७५ च्या वसंतऋतूपर्यंत कॉंग्रेस तहकूब झाली. दुसऱ्या बैठकीसाठींहि व्हर्जिनियातर्फे एक प्रतिनिधि म्हणून पुनः वॉशिंग्टन यांची निवड झाली. १७७५ च्या मेमध्यें माउंट व्हरनॉनहून पुनः फिलाडेल्फियाला दुसऱ्या अधिवेशनासाठीं वॉशिंग्टन आले, तेव्हां त्यांनीं आपला लष्करी गणवेष परिधान केलेला होता. योगायोग असा कीं, सर्व प्रतिनिधींमध्यें लष्करी गणवेष परिधान करणारे ते एकमेव प्रतिनिधि होते. प्रवासांत त्यांनीं अनेक स्वयंसेवक पथकांची पहाणी केली होती. आपण ज्या भागांतून प्रवास केला, त्या भागांतहि जनतेंत अशीच जागृति दिसून येत आहे, अशी माहिती फिलाडेल्फियामधील इतर प्रतिनिधींकडून वॉशिंग्टन यांना समजली. खरोखरच, सर्वच ठिकाणचें वातावरण तापत चाललें होतें. एप्रिलमध्येंच लेक्झिंग्टन आणि कॉन्कॉर्ड या ठिकाणीं मासाच्युसेट्स्‌ची स्थानिक शिबंदी आणि बोस्टन येथील ब्रिटिश खड्या फौजेच्या तुकड्या यांच्या चकमकी झडल्या होत्या आणि त्या चकमकींमध्यें ब्रिटिशांची ससेहोलपट झाली होती. मेमध्येंच, म्हणजे वॉशिंग्टन फिलेडेल्फियाला पोहोंचल्यानंतर थोड्याच दिवसांनीं, वसाहतींच्या स्थानिक शिबंदीच्या एका तुकडीनें कॅनडाच्या मुख्य मार्गावरील, जॉर्ज सरोवराच्या उत्तरेस असलेला टिकोंडेरोगा किल्ला काबीज केला. त्याच सुमारास व्हर्जिनियामध्यें पॅट्रिक हेन्री यांच्या हॅनोव्हर पेठ्यामध्यें लोकांनीं गव्हर्नरच्या सत्तेला उघड उघड आव्हान दिलें होतें.

जनतेच्या असंतोषाच्या या वणव्यांतून कोणती फलनिष्पत्ति होणार, याचा अंदाज करणें कोणालाच शक्य नव्हतें. पण, आतां वसाहतींची एकजूट झालेली होती. कॉंग्रेसमध्यें जे धडाडीचे प्रतिनिधि होते, त्यांनीं शस्त्रबलाला शस्त्रबलानेंच

उत्तर देण्याची तयारी दाखविली. त्यांना त्यासाठीं फक्त सैन्याची आवश्यकता होती आणि सैन्याला सेनापतीची आवश्यकता होती. ता. १५ जून १७७६ या दिवशीं अधिवेशनानें ठराव मंजूर केला : " अमेरिकन स्वातंत्र्याच्या संरक्षणार्थ उभारण्यांत येणाऱ्या सर्व वसाहतींतील सेनेचें नेतृत्व करण्यासाठीं सेनापति नेमण्यांत यावा. " हा ठराव मंजूर होण्याआधीं एक दिवस एक वजनदार नेते जॉन अ‍ॅडम्स यांनीं सूचना मांडली कीं, सेनापतीच्या पदावर कर्नल वॉशिंग्टन यांना नेमावें. आपल्या वक्तृत्वानें श्रोत्यांना आपल्या बाजूला वळविण्याचें सामर्थ्य असलेल्या सॅम्युएल अ‍ॅडम्स यांनीं या सूचनेला पाठिंबा दिला. या सूचनेनें वॉशिंग्टन यांना धक्काच बसला असावा. सूचना मांडतांना झालेल्या प्रशंसेनें तर ते निश्चितच गांगरून गेले. आणि ज्या वेळीं सेनापतिपदासाठीं त्यांचें नांव सुचविणारा औपचारिक ठराव मेरीलँडच्या एका प्रतिनिधीनें मांडला आणि " श्री. जॉर्ज वॉशिंग्टन यांची एकमतानें सेनापति म्हणून निवड करण्यांत येत आहे, " असा निर्णय काँग्रेसनें घेतला त्या वेळीं, म्हणजे ता. १५ च्या बैठकीला स्वतः वॉशिंग्टन उपस्थित राहिलेच नव्हते !

प्रकरण तिसरें

# वॉशिंग्टन : सेनापति

*" आपण अविवेकी साहसप्रिय नसावें किंवा आपल्यांत आत्मविश्वासाचा अभावहि असतां नये. औद्धत्यपूर्ण शौर्य हाहि अखेर दोषच ठरतो आणि सार्वजनिक ठिकाणीं दाखविलेला भ्याडपणा विश्वासघातच ठरतो. दोन्ही दोषांपासून आपण दूर राहूं या. "*

*–ॲडिसनकृत 'कॅटो' :*
अंक २ रा, प्रवेश १ ला

**सेनापतित्व आणि संकटकाल : १७७५–१७७६**

**सरसेनापतिपदासाठीं** जॉर्ज वॉशिंग्टन यांची निवड होणेंच बहुतांशीं अपरिहार्य होतें, असें आज मागें वळून बघणारांना मान्यच करावें लागतें. पण, त्या वेळीं फिलाडेल्फियांत जमलेल्या प्रतिनिधींनीं नेमकी त्यांचीच निवड कां केली ? या निवडीमागें लष्करी कारणें थोडींच होतीं. वॉशिंग्टनइतकाच लष्करी कामगिरीचा अनुभव असलेले आणि ही कामगिरी समाधानकारक बजावलेले इतर अनेक पुरुष होते. एकदोघांना तर सैनिकी जीवनाचा अनुभव वॉशिंग्टन यांच्यापेक्षां जास्त होता. विशेषतः चार्ल्स ली आणि पूर्वी ब्रिटिश खड्या फौजेतील अधिकारी असलेला व आतां अमेरिकेच्या पक्षाला सामील झालेला होरेशिओ गेट्स् हीं माणसं नांव घेण्यासारखीं होतीं. आणि मासाच्युसेट्स्चा आर्टेमस वार्ड हा तर त्या क्षणींहि रणांगणावरच होता– बोस्टनच्या परिसरांतील न्यू इंग्लंडच्या जुजबी फौजेचें मार्गदर्शन करीत होता.

ग्रंथालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम २८... वि: ...
नों: दि: ...

तरीसुद्धां, वॉशिंग्टन यांची निवड एकमुखी झाली. ते स्वतः प्रतिनिधि म्हणून परिषदेला उपस्थित राहिले नसते आणि त्यांच्याविषयीं प्रतिनिधींना विश्वास वाटला नसता, तर कदाचित् त्यांचें नांव कोणाच्या लक्षांत देखील आलें नसतें. आणि जरी ते परिषदेला उपस्थित होते, तरी औपचारिक कामकाजाच्या वेळीं चर्चेत त्यांनीं फारसा भागहि घेतला नाहीं. पण समित्यांच्या बैटकींमध्यें आणि भोजनमेजावरील संभाषणांच्या वेळीं मात्र त्यांची छाप प्रतिनिधींवर चांगली पडली. हा पुरुष चांगली उमज असलेला आणि प्रामाणिक आहे, असें सर्वांना वाटूं लागलें. सॅम्युएल कर्वेन हा कट्टर राजपक्षीय होता. वॉशिंग्टन यांची १७७५–च्या मेमध्यें फिलाडेल्फियांत भेट झाल्यानंतर तो लौकरच इंग्लंडला रवाना झाला. पण त्या राजनिष्ठ कर्वेननें म्हटलें आहे : "व्हर्जिनियांतल्या या कर्नलचें व्यक्तित्व आकर्षक आहे. आणि त्याची संभाषणपद्धति अत्यंत नम्रतेची आहे. त्याचें बोलणें ऐकत बसावेंसें वाटतें." कर्वेनच्या या मताप्रमाणेंच प्रतिनिधींचेंहि मत झालं होतें. "नम्र, सैनिकी डौल असलेला" असें वर्णन करून एका सभासदानें म्हटलें होतें, "वॉशिंग्टन अत्यंत तरुण दिसतात." त्या वेळीं वॉशिंग्टन यांचें वय त्रेचाळीस होतें. तरुणाचा उत्साह आणि प्रौढाचा सखोल अनुभव या दोन्ही गोष्टी एकत्र असण्याच्या दृष्टीनें तें योग्यच वय होतें.

शिवाय, लोकांचा समज होता किंवा स्वतः वॉशिंग्टन यांनाच वाटत होतें, तितके ते फार गब्बर कुबेर नसले तरी श्रीमंत होते खास. न्यूयॉर्कच्या प्रतिनिधींना आधींच सूचना देऊन ठेवण्यांत आलेल्या होत्या कीं–

> *"अमेरिकेचा सेनापति असा असला पाहिजे कीं, ज्याच्यावर लक्ष्मी प्रसन्न आहे. सेनापतीच्या दर्जामुळें जो मोठा ठरेल असा नव्हे, तर ज्याच्या मोठेपणामुळें त्या हुद्द्यालाच महत्त्व प्राप्त होईल असा तो पाहिजे. त्याची मालमत्ता, त्याचे नातलग, त्याचा मित्रपरिवार या सर्व गोष्टींमुळें लोकांना त्याच्याविषयीं विश्वास वाटला पाहिजे कीं, त्या उच्च पदावर आरूढ होणारा पुरुष आपलें कर्तव्य प्रामाणिकपणें पार पाडील आणि वेळ येतांच जनतेच्या इच्छेला मान देऊन सत्तासूत्रें खालीं ठेवील."*

या वर्णनांत चपखल बसूं शकेल असा पुरुष वॉशिंग्टन यांच्याखेरीज दुसरा कोणीच नव्हता. वॉशिंग्टन यांच्याकडे पाहतांच, पुरोगामी मतांकडे झुकलेला हा

कोणी उमरावच असावा असें वाटत असे. तें कांहीं असो, इतकें खास कीं, जी गोष्ट फिलाडेल्फिया परिषदेला आलेल्या इतर वजनदार नागरिकांनीं केली नाहीं, ती करण्याची त्यांनीं तयारी दाखविली. वसाहतींच्या ध्येयासाठीं व्यक्तिशः स्वतः आणि आपली मालमत्ता पणाला लावण्याची त्यांची तयारी होती. ते लष्करी गणवेश परिधान करून आले होते, ही गोष्टच त्या दृष्टीनें बोलकी होती. त्यांचें आचरण आणि नांवलौकिकहि साजेसा असल्यामुळें त्यांच्यावर दिखाऊपणाचा आरोप करणें कोणाला शक्य झालें नव्हतें वॉशिंग्टन यांच्या व्यक्तित्वानें सर्व प्रतिनिधि भारले गेले. वॉशिंग्टन यांना अद्‌भुत कथांचा नायक–पौराणिक दैवत बनविण्याच्या प्रक्रियेला या ठिकाणींच प्रथम सुरुवात झाली. १७७५ मध्येंच त्यांच्याविषयीं एक दंतकथा प्रसृत झाली होती. १७७४ सालींच बोस्टनवर चालून जाणारी हजार सैनिकांची पलटण स्वतःच्या पैशानें उभी करून तिचें नेतृत्व करण्याची तयारी कर्नल वॉशिंग्टन यांनीं दाखविली होती, अशी ती दंतकथा होती. कांहीं चरित्रकारांनीं ही दंतकथा सत्यकथाच म्हणून वारंवार सांगितली असली तरी मुळींच आधार नसलेली ती असत्यकथा असावी, असेंच दिसतें. पण यावरून, फिलाडेल्फिया येथें जमलेल्या प्रतिनिधींना कोणती उत्कंठा लागून राहिली होती, याची कल्पना येते. ज्याच्यांत महात्मतेचा साक्षात्कार होईल, ज्याचें व्यक्तित्व असामान्य आहे, अशा पुरुषाच्या ते शोधांत होते, असेंच यावरून सिद्ध होतें. सॅम ॲडम्स आणि इतर काहीं जण लोकांना जागृत करूं शकणारे प्रभावी देशभक्त आहेत, हें सर्व प्रतिनिधि ओळखून होते. पण त्या खवळलेल्या जमावाला शिस्त लावून त्याला योग्य मार्गदर्शन करूं शकणारा पुरुष अत्यंत आवश्यक आहे, हें कॉंग्रेस जाणून होती. जो पुरुष युरोपीय आदर्श सेनानीसारखा दिसेल आणि वागेलहि, पण त्याचबरोबर खराखुरा अमेरिकन असेल, असाच पुरुष कॉंग्रेसला हवा होता.

वॉशिंग्टन यांचीच निवड होण्याचें आणखी एक महत्त्वाचें कारण होतें. आतांपर्यंत संघर्ष न्यू इंग्लंडपुरताच मर्यादित होता. जर इतर सर्व वसाहतींनीं संघर्षात सर्व प्रकारें सामील व्हावयाचें असेल तर नियोजित मध्यवर्ती सेनेचें सेनापतित्व न्यू इंग्लंडबाहेरील लष्करी नेत्याकडेच सोपविणें आवश्यक होतें. जॉन ॲडम्स सॅम्युएल ॲडम्स यांना ही जाणीव होती, म्हणूनच त्यांनीं वॉशिंग्टन यांचें नांव सुचविलें होतें. सर्व वसाहतींमध्यें मासाच्युसेट्स इतकीच व्हर्जिनिया वसाहत

प्रभावी होती. त्यामुळें एक व्हर्जिनियन लष्करी नेता म्हणून वॉशिंग्टनच सेनापतीच्या पदासाठीं अधिक पात्र ठरत होते. अमेरिकेच्या इतिहासांतील अलीकडच्या काळांतील परिभाषा वापरायची झाल्यास असें म्हणतां येईल कीं, वॉशिंग्टन हेच एक 'उपयुक्त ठरणारे उमेद्वार' सरसेनापतिपदासाठीं उपलब्ध होते. त्यांच्या हाताखालील उपसेनापतींची निवडहि अशीच राजकीय आणि इतर कारणें विचारांत घेऊन करण्यांत आली. मासाच्युसेट्स्‌ला संतुष्ट ठेवण्यासाठीं आर्टेमस वार्ड याची निवड करण्यांत आली. चार्ल्स ली हा खूप प्रवास केलेला आणि लष्करी डावपेचांची परिभाषा सदैव जिभेवर असलेला म्हणून त्याची निवड झाली. न्यूयॉर्कला खूष ठेवण्यासाठीं फिलिप स्क्यूलेर याची निवड झाली. हाहि स्वत: श्रीमंत होता आणि मुरलेला लष्करी अधिकारी होता. कॉनेक्टिकटमध्यें इस्राएल पुटनाम याचें स्थान लोकप्रिय लोकनेत्याचें होतें, म्हणून त्याचीहि नेमणूक उपसेनानी म्हणून झाली. हिरोशिओ गेट्स्‌ हा जन्मानें ब्रिटिश होता, पण आतां त्यानें व्हर्जिनियाचें नागरिकत्व स्वीकारलें होतें. त्याची नेमणूक मदतगार सेनानी म्हणून करण्यांत आली. या उपसेनानींच्या हाताखालीं दुय्यम अधिकारी म्हणून, ब्रिगेडिअर जनरल म्हणून जीं अनेक माणसें नेमलीं गेलीं, त्यांचीहि निवड वरीलप्रमाणेंच अनेक कारणांचा विचार करून करण्यांत आली होती.

वॉशिंग्टनच्या बाबतींत 'उमेदवार' हा शब्द वापरणें गैर ठरण्याचा संभव आहे. त्यांनीं आपली उमेदवारी स्वतःहून लादली नव्हती. "या पदाला मी पात्र आहें असें मला वाटत नाहीं," असें जेव्हां त्यांनीं कॉंग्रेसममध्यें उद्‌गार काढले, तेव्हां ते अगदीं मनापासून काढले होते हें निःसंशय होय. त्याचप्रमाणें पॅट्रिक हेन्री यांच्यापाशीं त्यांनीं कांहीं उद्‌गार काढल्याचीहि एक आख्यायिका प्रचलित आहे. "मी ज्या दिवशीं अमेरिकन सेनेचें आधिपत्य स्वीकारीन, त्याच दिवशीं माझा अधःपात झालेला असेल आणि माझा नांवलौकिक धुळीला मिळाला असेल," असे उद्‌गार वॉशिंग्टन यांनीं डोळ्यांत आंसवें आणून पॅट्रिक हेन्री यांच्याजवळ काढले होते, अशी ती आख्यायिका आहे. ही आख्यायिका खरी नसेलसुद्धां; पण इतकें खास कीं, आपल्या नांवलौकिकाविषयींची विलक्षण बूज त्या वेळींहि वॉशिंग्टन यांना फार वाटत असे. आपल्याला टीका झालेली चालते, टीकेचा राग येत नाहीं, असें पत्रांतून त्यांनीं कितीहि लिहिलेलें असो; पण सार्वजनिक जीवनांत अधिकार स्वीकारणाऱ्या कोणाहि व्यक्तीला टीकेच्या

कसोटीला तोंड द्यावेंच लागतें, हें तत्त्व आयुष्याच्या अखेरपर्यंत कधींच त्यांच्या गळीं उतरलें नाहीं. तशी वॉशिंग्टन यांच्यावर भरपूर टीका झालेली आहे. आपला संताप- मर्यादेंत ठेवायचा संयम त्यांनीं अंगीं बाणविला होता. त्यांच्या अनेक समकालीनांप्रमाणें टीकाकारांशीं दोन हात करण्यासाठीं ते कधीं पुढें सरसावले नाहींत. त्यांच्या सार्वजनिक नीतिमत्तेच्या कक्षेंतून त्यांनीं द्वंद्वासारख्या गोष्टी अगदीं दूर ठेवलेल्या होत्या. तथापि ते आपल्या नांवलौकिकाची कदर फार करीत याचें कारण ते अहंकारी होते, असें नसून ते स्वाभिमानी होते हें आहे. कोणीहि गलिच्छ वागणूक केलेली त्यांना घृणास्पद वाटे. आपल्याला क्षुद्र हेतु चिकटविण्यांत यावेत, ही गोष्ट त्यांना अगदीं असह्य वाटे. यापूर्वीं एकदां, ब्रॅडॉकच्या सैन्यांत ' स्वयंसेवक सद्गृहस्थ ' म्हणून विनावेतन आणि कसलाहि हुद्दा न स्वीकारतां सामील होऊन त्यांनीं आपली निष्काम सेवावृत्ति दाखवून दिलीच होती. आतां हीच वृत्ति त्यांनीं अधिक मोठ्या प्रमाणांत दाखवून दिली. त्यांनीं कॉंग्रेसला कळविलें कीं, फक्त आवश्यक खर्चाशिवाय सेनापतीच्या कामाचा पगार आपल्याला नको ! सरसेनापतीचा पगार आणि भत्ता मिळून दरमहा पांचशें डॉलर इतकी रक्कम कॉंग्रेसनें मंजूर केलेली होती.

अंगावर पडलेल्या प्रचंड जबाबदारीमुळें वॉशिंग्टन यांना अगदीं भारावल्यासारखें वाटत असेल; पण त्याचबरोबर त्या नेमणुकीनें आपला जो गौरव झाला, त्याबद्दल त्यांना कमालीचा संतोष वाटणेंहि स्वाभाविक होतें. तसें न वाटणें, माणसाच्या बाबतींत तरी शक्य नाहीं. पूर्वीं लष्करी जीवनांत ज्या निराशा पदरांत पडल्या, त्यांचें दुःख ते सतत उगाळीत बसले नाहींत. तथापि त्याबद्दलचें एके काळीं सलणारें शल्य जर थोडेंबहुत शिल्लक राहिलेंच असेल, तर तें या नेमणुकीनें समूळ उपटून निघालें होतें. खूप वर्षांपूर्वीं अगदीं तरुण असतांना सॅली फेअरफॅक्सला लिहिलेल्या पत्रांत वॉशिंग्टन यांनीं, " ॲडिसनच्या ' कॅटो ' नाटकांत तूं मार्शियाची भूमिका करावीस व तुझ्याबरोबर मी जुबाची भूमिका करावी अशी माझी एक आवडती कल्पना आहे, " असें म्हटलें होतें. मार्शिया ही कॅटोची मुलगी असून कॅटोच्या पक्षांत असलेला जुबा हा एका छोट्या संस्थानाचा राजपुत्र होय. रंगभूमीवर सॅली फेअरफॅक्सबरोबर काम करण्याचें तें स्वप्न आतां इतिहासजमा झालेलें होतें. सॅली फेअरफॅक्स आपल्या पतीसह १७७३ सालींच इंग्लंडला निघून गेली होती आणि ती पुनः कधींच अमेरिकेला परतणार

नव्हती. तरी पण, हेंच नाटक १७७८ च्या मेमध्यें वॉशिंग्टनची मुख्य छावणी असलेल्या व्हॅली फोर्ज या ठिकाणीं झालें. तेव्हां वरील स्वप्नाळू कल्पना करण्याचा चाळा त्यांनीं केला नसेल; पण त्यांच्या मनाला एक विचार खासच चाटून गेलेला असेल. रोमन नसलेला तरुण जुवा आपल्या स्वतःच्या रूपानें आज अस्सल रोमन बनला आहे; खुद्द लोकमान्य नेता कॅटोच बनला आहे, असा विचार कर्नल वॉशिंग्टन यांच्या मनाला तो नाट्यप्रयोग बघतांना सहज चाटून गेला असेल. बोस्टनच्या सीमेबाहेर असलेल्या क्रांतिकारकांच्या सेनेचें आधिपत्य वॉशिंग्टन यांनीं ता. ३ जुलै १७७५ या दिवशीं स्वीकारलें. ही तारीख एका दृष्टीनें वैशिष्ट्यपूर्ण होती. त्यांचा जीवनप्रवास कोठून कोठपर्यंत झाला आहे, याची आठवण त्यांना देणारा तो दिवस होता. कारण पंचवीस वर्षांपूर्वी 'फोर्ट ऑफ् नेसेसिटी' असें नांव त्यांनीं ज्या मेढेकोटाला दिलें होतें, तेथें फ्रेंचांना त्यांनीं शरणागति दिली होती ती त्या लढाईची तारीख हीच होती. त्या वेळीं आपल्यापेक्षां संख्याबलानें वरचढ असलेल्या शत्रुसैन्याच्या गराड्यांत तो तरुण सेनानी सांपडला होता. आजचा परिपक्व झालेला सेनानी स्वतः शत्रूला वेढा देणारा होता. आणि त्याच्या हाताखालीं आज थोडेथोडके नव्हेत तर जवळ जवळ पंधरा हजार सैनिक होते. बोस्टनमध्यें असलेली ब्रिटिश फौज संख्याबलानें निम्मीसुद्धां नव्हती. ब्रीडस हिल आघाडीवर वसाहतीच्या फौजेच्या पदरांत विजयाचें माप टाकतांना या ब्रिटिश फौजेला आपल्या एक हजार सैनिकांचें प्राणदानहि करावें लागलें होतें. शिवाय आणखी एक विशेष गोष्ट अशी कीं, बोस्टनमधील या ब्रिटिश फौजेचें नेतृत्व ज्याच्याकडे होतें तो जनरल गेज, वीस वर्षांपूर्वी ब्रॅडॉकच्या सेनेंत आघाडीवरील तुकड्यांचा नायक होता आणि त्याच ब्रॅडॉकच्या मदतनिसांत वॉशिंग्टन हेहि होते.

तथापि, अशा आत्मसमाधानाच्या विचारांत गुंग राहण्याची ती वेळ नव्हती. कारण अशा समाधानाच्या गोष्टींपेक्षां समोर उभे असलेले बिकट प्रश्न फारच मोठे होते. प्रथमतः मार्थाच्या विरहाचें दुःख होतें. आपल्या आवडत्या मालमत्तेचा निरोप घ्यावा लागत होता. आणि प्रत्यक्ष सेनानायकत्वाच्या जबाबदारीमुळें तर असंख्य चिंतांचें मोहोळच उठलें होतें. न्यू इंग्लंडमधल्या अनेक अधिकाऱ्यांना वॉशिंग्टन यांच्याविषयीं विश्वास नव्हता, तर वॉशिंग्टनहि त्यांच्याकडे संशयानें बघत होते. त्या वेळच्या पत्रव्यवहारांत बेसावधपणानें त्यांनीं केलेल्या कांहीं विधानांवरून

परस्परांत अशी संशयवृत्ति वसत होती हें दिसून येतें. " परंपरा पद्धति, वक्तशीरपणा आणि शिस्त यांचा अभाव " असल्याची तक्रार वॉशिंग्टन वारंवार करीत असत. गचाळग्रंथीपणा आणि अप्रामाणिकपणा असल्याचीहि त्यांची तक्रार होती. आणि या तक्रारीचा खरेपणा सिद्ध करणारा भरीव पुरावाहि होता. तंबू, ब्लँकिटें, गणवेश, औषधें, अन्नसामग्री, दारुगोळा वगैरे कोणताच पुरवठा पुरेसा नव्हता. सेनापतीच्या हाताखालीं जो नोकरवर्ग लागतो तो नेमलेला नव्हता. तोफखाना नव्हता. कॉंग्रेसनें नंतर तरतूद केली, पण त्याआधीं मुख्य लष्करी छावणींत पगारवांटपाची नीट व्यवस्थासुद्धां नव्हती. कॉंग्रेसनें मध्यवर्ती सेना उभारण्याचा निर्धार केला होता खरा, पण प्रत्येक वसाहतीकडून अपेक्षिल्याप्रमाणें सैनिकांचा पुरवठा होईल कीं नाहीं, हा प्रश्नच होता. या प्रश्नाचें उत्तर होकारार्थी असण्याऐवजीं नकारार्थीच होतें. आणि युद्धाच्या अखेरपर्यंत परिस्थिति तशीच राहिली.

उपलब्ध असलेल्या सेनेच्या मदतीनें काय करणें शक्य होतें ? फार दूरगामी योजना कॉंग्रेसहि आंखूं शकत नव्हती, आणि वॉशिंग्टनहि आंखूं शकत नव्हते. ' फोर्ट ऑफ् नेसेसिटी 'च्या युद्धांत समोरची सेना शत्रुसेना होती, पण आज वॉशिंग्टन यांच्या सामन्याला असलेली फौज आणि त्यांच्या आधिपत्याखालीं असलेली सेना यांच्यांत औपचारिकपणें युद्धघोषणा झालेली नव्हती. बोस्टनमध्यें जनरल गेजच्या आधिपत्याखालीं असलेल्या ब्रिटिश फौजेला अमेरिकन लोक अद्याप ' सरकारपक्षीय फौज ' असेंच संबोधीत असत. वसाहती अद्याप राजा जॉर्ज याच्या निष्ठावंत प्रजाजनच आहेत आणि राजाचे प्रजाजन या भूमिकेवरूनच आपल्या नागरिकस्वातंत्र्याच्या हक्काच्या रक्षणार्थ वसाहती उठून उभ्या राहिल्या आहेत, अशीच तोपर्यंत भूमिका होती. १७७५ च्या अखेरीअखेरीपर्यंत संपूर्ण स्वातंत्र्याची भूमिका असलेला ज्वलज्जहालांचा गट अगदींच अल्पसंख्य होता. बहुसंख्य अमेरिकनांना मातृदेशाबरोबर कांहीं तरी तडजोड हवी होती. ' तडजोडीची व्यवस्था ' कशी असावी, याबद्दल स्पष्ट अशी कांहींच कल्पना नव्हती. पण तशी व्यवस्था होईपर्यंत आणि व्हावी म्हणून भक्कम आघाडी उभारणें आवश्यक होतें. पण अशी आघाडी उभारायची कशी ? कॉंग्रेसनें कॅनडांतील वसाहतींनीं आपल्या आघाडींत यावें म्हणून कांहीं प्रयत्न केले होते. त्या प्रश्नाचा निकाल निश्चितपणें लावण्यासाठीं दडपण म्हणून कर्नल बेनेडिक्ट

अर्नोल्ड याच्या नेतृत्वाखालीं क्विबेक काबीज करण्यासाठीं वॉशिंग्टन यांनीं सैन्य रवाना केलें. त्याच धडाडीनें बोस्टनवर हल्ला करण्याची कल्पना त्यांनीं अनेकदां कॉंग्रेसपुढें मांडली. पण तिकडे अर्नोल्डची मोहीम फसली आणि इकडे वॉशिंग्टन यांच्या छावणींत युद्धमंडळानें बोस्टनवरील हल्ल्याची योजना फेटाळून लावली.

वॉशिंग्टन हे आपल्या दुय्यम अधिकाऱ्यांच्या मतांना फार चटकन् मान तुकवीत, असत अशी टीका केली जाते. ते तसें करीत असतील तर त्यांची ती वृत्ति अगदीं समजण्यासारखी होती. " आमचें सर्वांचेंच लष्करी बाबीं-विषयींचें ज्ञान मर्यादित आणि तोकडें होतें, " असें जें वॉशिंग्टन यांनीं म्हटलें आहे, त्याचा विचार करतां त्यांची तशी वृत्ति असणें स्वाभाविक होतें. चार्ल्स ली हा लष्करी डावपेचांची परिभाषा अस्खलितपणें वापरूं शकत असला तरी त्यालासुद्धां मोठ्या प्रमाणावर रचना केलेल्या सैन्यांच्या हालचालींच्या तंत्राचा प्रत्यक्ष असा कांहींच अनुभव नव्हता. वॉशिंग्टन यांचा लष्करी अनुभव सरहद्दी-वरील युद्धापुरताच होता आणि तेथेंहि त्यांनीं प्रमुखाच्या हाताखालील अधिकारी म्हणूनच काम करून मिळवलेला तो अनुभव होता. घोडदळाच्या हालचालींचें तंत्र त्यांना अवगत नव्हतें किंवा मोठ्या प्रमाणावर तोफखान्याचा उपयोग करण्याचीहि प्रत्यक्ष माहिती नव्हती. आणि मोठ्या संमिश्र फौजा हाताळण्याच्या तंत्राच्या ज्ञानाचा तर गंधहि नव्हता. अनेक गोष्टींबद्दल संपूर्ण अज्ञान असतांना स्वतःच्या एकट्याच्या निर्णयबुद्धीवर विसंबून कांहीं करणें खासच परवडण्याजोगें नव्हतें. शिवाय, युद्धमंडळाच्या बैठकी भरविण्याची प्रथा त्या काळांत सर्वच ठिकाणीं, सर्वच सशस्त्र दलांकडून आणि सेनानींकडून पाळली जात असे, तीच प्रथा अनुसरण्याखेरीज वॉशिंग्टन अधिक कांहींच करीत नव्हते. आणखी एक गोष्ट त्यांना विचारांत घ्यावयाची होती. त्यांच्या हाताखालीं काम करणारे कांहीं अधिकारी त्यांच्यापेक्षां जुने होते. आपल्याला वॉशिंग्टन यांच्या हाताखालीं काम करायला सांगितलें जावें, यामुळें आधींच ते रुष्ट होते. आर्टेमस वार्डच्या बाबतींत ही गोष्ट अधिक ठळक होती. वॉशिंग्टन यांच्यापेक्षां तो पांच वर्षांनीं मोठा होता. फ्रेंचांशीं झालेल्या युद्धांत त्यानेंहि जुनवी फौजेंत कर्नल म्हणून काम केलेलें होतें. शिवाय बोस्टनमधील ब्रिटिश फौजेचा सेनानी गेज याला पुरून उरण्याइतके आपण निष्णात सेनानी आहों असें त्याला वाटत होते. दुसरा इस्राएल पुटनाम

हा होय. बंकर हिलच्या संग्रामानें त्याचें नांव अमर केलें होतें. " शत्रुसैनिकाच्या डोळ्यांतील बुबुळें दिसेपर्यंत गोळ्या झाडूं नका ! " असा त्यानें सैनिकांना आदेश दिल्याची दंतकथाहि प्रचलित झालेली होती. पुटनाम हा वॉशिंग्टन यांच्यापेक्षां चौदा वर्षांनीं वडील होता आणि त्याचें आजवरचें जीवन असामान्य आणि विलक्षण साहसी प्रसंगांनीं भरलेलें होतें. अशा माणसांना वागवून घेण्याची अवघड कसरत वॉशिंग्टन यांना करावयाची होती. एक तर हा माणूस परक्या वसाहतींतला नवखा माणूस आहे, ही भावना होतीच. शिवाय वॉशिंग्टन हे गुलामांचे मालक होते आणि न्यू इंग्लंडमधील लोकांना गुलामीची प्रथा तिरस्करणीय वाटत असल्यामुळें वॉशिंग्टनबद्दल ते अधिकच साशंक होते. कॉनेक्टिकट, न्यू हॅम्पशायर, मासाच्युसेट्स् इत्यादि वसाहतींतील देशभक्तांना दक्षिणेंतील ' नबाबा 'कडून आज्ञा-हुकूम घेणें आवडत नव्हतें. आणि इतर दृष्टींनीं विचार केल्यासहि त्यांनीं आपल्या हाताखालील सेनानींशीं विचारविनिमय करणें रास्तच होतें. वॉशिंग्टन अतिरेकी सावधगिरी बाळगीत असत, अशी टीका त्यांच्यावर कांहीं वेळां केली जाते; पण खरोखर, तरुण वयांतल्याप्रमाणेंच आतांहि ते फार उतावीळ झालेले होते. निष्क्रियपणाचा त्यांना वीट होता. पण आपल्या इच्छेविरुद्ध वॉशिंग्टन यांना, १७७५-१७७६ च्या हिंवाळाभर कांहींहि न करतां प्रतीक्षा करण्यांत दिवस घालविणें भाग पडलें.

१७७६ च्या वसंतऋतूपर्यंत, साऱ्या गोंधळामधून निदान एक गोष्ट तरी हळूहळू स्पष्ट होऊं लागली होती. अमेरिकन स्वातंत्र्याची कल्पना अधिक स्पष्टपणें मूळ धरूं लागली होती. त्यानंतर स्वातंत्र्याची आकांक्षा झपाट्यानें वाढूं लागली. बंडाचा बीमोड करण्याचा निर्धार लॉर्ड नॉर्थ, लॉर्ड जॉर्ज जर्मेन, अर्ल ऑफ सँडविच प्रभृति मंत्र्यांचा केवळ नसून, तिसऱ्या जॉर्जचाहि तोच निर्धार आहे, ही गोष्ट स्पष्ट झाल्यामुळें स्वातंत्र्याकांक्षा अधिक प्रज्वलित झाली. " आमची विनंति धुडकावणें राजाच्या हातांत होतें. आम्हीं तें आव्हान स्वीकारलें आहे. अंतिमतः शस्त्रबलच या भांडणाचा निर्णय लावील, " अशी घोषणा टॉम पेन यांनीं आपल्या ' सदसद्विवेकबुद्धि ' या शीर्षकाखालील पुस्तिकेंत केलें. या पुस्तिकेंत व्यक्त झालेल्या ज्वलंत भावनांना बहुतेक वसाहतींतील नेत्यांकडून प्रतिसाद मिळाला. वॉशिंग्टन यांच्याकडूनहि प्रतिसाद मिळाला. कांहीं थोड्याच वर्षांपूर्वी पेन यांचे विचार राजद्रोही व पाखंडवादी मानले गेले असते. फार

काय, १७७६ च्या प्रारंभीं प्रारंभीं सुद्धां, "तिसरा जॉर्ज हा उत्कृष्ट राजा नाहींच नाहीं, तर इंग्लंडच्या राजपदावरील पाशवी पुरुष आहे," या विधानानें धक्काच बसला. पण हा धक्का, भयचकित राजनिष्ठांव्यतिरिक्त सर्वांना रोमांचकच वाटला असेल. १७७४ सालीं वसाहतींत वास्तव्यासाठीं एक इंग्रज आला होता. त्याचें नांव निकोलस क्रेसवेल. त्यानें आपल्या दैनंदिनींत अशा राजपक्षीयांचा उल्लेख 'King's Friends' या शब्दांतील अक्षरें उलटीं करून 'Sgnik Sdneirf' असा केलेला होता. त्याचप्रमाणें क्रेसवेलनें बंडखोरांचा (Rebels) उल्लेखहि रागानें Sleber असा केलेला होता. या क्रेसवेलला दिसून आलें कीं, टॉम पेन यांनीं, आजवर बरवर व्यक्त केल्या गेलेल्या निष्ठाहि अशाच खालीं डोकें वर पाय करून उभ्या केलेल्या आहेत. मातृदेशाशीं संलग्न राहण्याच्या निष्ठेच्या अगदीं विरुद्ध अशी टॉम पेन यांची ही घोषणा पहा :

"कोणतेंहि योग्य आणि न्याय्य कारण विचारांत घेतलें तर तें अमेरिका स्वतंत्र होण्यालाच पूरक ठरतें. रणांगणावर ठार झालेल्यांचें रक्त, आक्रोश करणारे निसर्गाचे आवाज सांगत आहेत, 'संबंध तोडण्याची वेळ आली आहे!' परमेश्वरानें इंग्लंड आणि अमेरिका यांच्या दरम्यान जें प्रदीर्घ अंतर ठेवलें आहे, तें अंतर सुद्धां सांगत आहे कीं, एकानें दुसऱ्यावर सत्ता गाजवावी, अशी ईश्वराची कधींच इच्छा नव्हती."

ज्या घटना घडत होत्या त्यामुळेंहि टॉम पेन यांचे उत्स्फूर्त उद्गार अंतःकरणाला जाऊन भिडण्याला हातभारच लागत होता. क्विबेक आघाडीवर पराभव होऊन अमेरिकन सेनेला कॅनडांतून माघार घ्यावी लागली तरी त्याची भरपाई झाली. चार्ल्स्टनविरुद्ध समुद्रमार्गें ब्रिटिशांनीं केलेली स्वारी अपेशी ठरली. पण सर्वांत आनंदाची घटना बोस्टन आघाडीवर घडली. १७७६च्या मार्चमध्यें बोस्टन ब्रिटिशांपासून काबीज करण्यांत आलें. त्या आघाडीवर तोफखाना आल्याशिवाय कांहींच हालचाल करणें वॉशिंग्टन यांना शक्य नव्हतें. ही उणीव जनरल हेन्री नॉक्स या उत्साही कार्यक्षम तरुण अधिकाऱ्यानें भरून काढली. मूळ धंद्यानें पुस्तक-विक्रेता असलेल्या या तरुणानें ऐन हिंवाळ्यांत प्रदीर्घ कष्टदायक प्रवास करून त्रेचाळीस तोफा आणि सोळा गरनाळे आघाडीवर पोहोंचविण्याची कामगिरी बजावली. अनेक महिन्यांपूर्वी टिकोंडेरेगो किल्ल्यापाशीं ही सामग्री ब्रिटिशांपासून काबीज करण्यांत आलेली होती, ती तेथून आणण्याचें काम नॉक्सनें केलें. तोफा

आल्यावर रात्रीच्या अंधारांत वेगानें काम करून वॉशिंग्टन यांच्या सैनिकांनीं डोर्चेस्टर टेकड्यांवर उभारलेल्या संरक्षक कोटावर तोफांचे मोर्चे लावले. बोस्टन आणि बंदर भाग यांच्यावर मारा करण्याच्या दृष्टीनें ही जागा मोक्याची होती. या वेळीं बोस्टनमधील सेनानी म्हणून गेजऐवजीं जनरल विल्यम होवे याची नेमणूक झालेली होती. अमेरिकन सेनेच्या मोर्चांवर हल्ला चढविण्याचा विचार होवेचा होता, पण मुसळधार पावसामुळें त्याला तो विचार सोडून द्यावा लागला. पावसांत चापाच्या बंदुका निरुपयोगी ठरतात. बंकर हिलची पुनरावृत्ति होऊं नये, अशी होवेची इच्छा असणारच. तेथील हत्याकांड त्यानें अगदीं जवळून पाहिलें होतें आणि त्याची स्मृति त्याच्या मनांत अद्याप असण्याची शक्यता होती. अमेरिकनांच्या धडाडीमुळें आतां बोस्टन ब्रिटिशांच्या दृष्टीनें असुरक्षित बनलें होतें. प्रत्यक्ष पराभव जरी नाहीं तरी विरोधी सैन्यानें मात केली, हें उमजून होवेनें आपलें सैन्य जहाजांवर चढविलें. राजपक्षाच्या हजारावर लोकांनाहि त्यानें बरोबर घेतलें. नष्ट करतां येईल तेवढी सामग्री नष्ट केली. आणि कांहीं दिवस बंदरांतच रेंगाळून तो पूर्वेकडे नोव्हास्कोशियांतील हॅलिफॅक्सकडे रवाना झाला. वॉशिंग्टन यांना या घटनेनें आश्चर्य वाटलें. आनंदहि झाला. कॉंग्रेसचे अध्यक्ष जॉन हॅनकॉक यांना लिहिलेल्या पत्रांत वॉशिंग्टन यांनीं म्हटलें होतें :

> " कळविण्यास अत्यंत आनंद वाटतो कीं, रविवार ता. १७ रोजीं सुमारें ९ वाजतां सरकारी लष्करानें बोस्टन शहर सोडलें आहे आणि आतां संयुक्त वसाहतींच्या फौजांच्या प्रत्यक्ष ताब्यांत तें शहर आहे. या आनंददायक घटनेबद्दल मी आपलें आणि कॉंग्रेसचें अभिनंदन करतों. विशेषतः शहरांतील उरलेल्या दुर्दैवी प्रजाजनांच्या प्राणांची वा मालमत्तेची हानि न होतां ही गोष्ट घडून आली, याबद्दल आनंद वाटतो. "

कॉंग्रेसनेंहि वॉशिंग्टन यांचें अभिनंदन करणारा ठराव करून त्यांना सुवर्णपदक बहाल केलें. वॉशिंग्टन यांचें गुणगान सर्व देशभर होऊं लागलें.

अशा रीतीनें उन्हाळ्याच्या मध्यकाळांत तेराहि वसाहतींमध्यें ब्रिटिशांच्या लढ्या फौजेचा मागमूस उरला नव्हता. याला अपवाद फक्त एकच होता. सर गे कार्लटन याच्या नेतृत्वाखालील फौज कॅनडाच्या हद्दीपासून निघून उत्तर न्यूयॉर्क विभागांत उतरत होती. कॉंग्रेसमधील वातावरण उत्साहाचें होतें. आणखी एक बातमी कळली असती तर हा उत्साह दुणावला असता. फ्रान्स या संघर्षांत

तटस्थ असलें तरी आपल्या जुन्या शत्रूला–ब्रिटनला–टोला हाणण्याची योजना फ्रान्स आंखीत होतें. त्यासाठीं गुप्तपणें वसाहतींना दारूगोळा पुरविण्याचा फ्रान्सचा बेत होता. तथापि कांहीं भागांत, विशेषतः दक्षिणेकडील भागांत, राजपक्षीय लोकांच्या देखील हालचाली चालू होत्या. अमेरिकनांमधील असंख्य लोक अद्याप 'टोरी' होते, अगदीं कट्टर टोरी नसले तरीदेखील, वॉशिंग्टन यांच्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे, "तडजोडीच्या विचाराच्या रवंथ मोठ्या चविष्टपणें करून पोट भरीत असलेले" हे लोक होते. अर्थात् या परिस्थितींत खऱ्या देशभक्तांना प्रोत्साहन देणें आणि अशा संशयात्म्यांवर दडपण आणणें या दोन्ही गोष्टींची आवश्यकता होती. १७७६ च्या मेपर्यंत वॉशिंग्टन यांनीं आपली यासंबंधींची भूमिका निश्चित ठरवून टाकली. कॉंग्रेसमधील बहुमताचा कल याच भूमिकेकडे होता. आतां जपून शिष्टाचाराची भाषा वापरली जाणार नव्हती. सरकारपक्षीय फौजा म्हणजे राजाच्याच फौजा होत, हें आतां स्पष्टपणें समजून चालायचें असें ठरलें. मुख्य खलनायक तिसरा जॉर्जच आहे, असें स्पष्ट करण्यांत आलें. जर्मन भाडोत्री फौजा बंड दडपून टाकण्यासाठीं जॉर्जनें वापरल्या, असा आरोपच केवळ करण्यांत येऊं लागला असें नव्हे तर, कोणाहि सुपीक डोक्याच्या अमेरिकनाला सुचेल त्या त्या गुन्ह्याबद्दल राजा तिसरा जॉर्ज याला गुन्हेगार धरण्यांत येऊं लागलें. थॉमस जेफर्सन यांच्यासारख्या अत्यंत बुद्धिमान् माणसाला इतरांपेक्षां अधिक गुन्हे तिसऱ्या जॉर्जच्या अंगीं सहज लावतां आले असते. कॉंग्रेससाठीं स्वातंत्र्याचा जाहीरनामा जेफर्सन यांनींच इतर कांहीं जणांच्या मदतीनें तयार केला. या जाहीरनाम्याचें सविस्तर प्रास्ताविक आणि सर्व परिच्छेद वाचून त्या शब्दांपलीकडील अर्थ जर आपण लक्षांत घेतला तर वरील विधानाची सत्यता पटेल.

थॉमस जेफर्सन यांनीं तयार केलेला स्वातंत्र्याचा जाहीरनामा ता.४ जुलै १७७६ रोजीं मंजूर झाला. मतदानाच्या वेळीं फक्त न्यूयॉर्कचे प्रतिनिधि तटस्थ राहिले होते. स्वातंत्र्याचा जाहीरनामा मंजूर केल्यानंतर आतां अमेरिकन नेत्यांना मागें फिरतां येणार नव्हतें. संपूर्ण स्वातंत्र्य हें त्यांचें ध्येय होतें. जर अपयश आलें तर त्यांच्या पुढ्यांत सर्वनाशच मांडून ठेवलेला होता. बहुधा फांशीच्या दोरीनेंच त्यांचा शेवट होणार होता. पेन यांच्या स्फूर्तिदायक प्रचारानें त्यांचें धैर्य टिकून राहिलें होतें. आतां त्यांचा निर्धार अधिक दृढमूल करण्यासाठीं जेफर्सन सरसावले

होते. पत्रांमधून अत्यंत रुक्ष भाषा लिहिणाऱ्या वॉशिंग्टन यांच्यासारख्यांनींसुद्धां नव्या वातावरणापासून स्फूर्ति घेतली आणि स्वातंत्र्ययुद्धाविषयीं भव्य-दिव्य शब्द वापरायला सुरुवात केली. आमचें ध्येय ' उदात्त ' आहे, ' न्याय्य ' आहे, अशी आपली ' नितान्त धार्मिक श्रद्धा ' असल्याची भाषा ते वापरूं लागले. ' परमेश्वर शूरांच्याच मदतीला येईल, ' अशी श्रद्धा ते बोलून दाखवूं लागले आणि या लढ्यामुळें भौतिक सुखाचाहि लाभ पदरांत पडेल, असें म्हणूं लागले.

पण नंतरच्या पांच महिन्यांत वॉशिंग्टन यांना हा शब्दसंग्रह पार बदलावा लागला. त्यांचें धैर्य मुळींच खचलें नव्हतें; पण इतर अमेरिकन नेत्यांप्रमाणेंच त्यांचीहि आशा जवळ जवळ मावळली होती. त्यांची सेना मोडकळीस आली होती. अवमान आणि विनाश यांचें ताट पुढें वाढून ठेवलेलें दिसत होतें. ता. १० डिसेंबरला आपला भाऊ लुंड वॉशिंग्टन याला लिहिलेल्या पत्रांत वॉशिंग्टन यांनीं कबुली दिली होती, " नवीन सेनेची तांतडीनें भरती करण्यावरच आतां आपली सारी मदार आहे. जर या कामीं अपयश आलें तर खेळ संपलाच असें समजावें लागेल."—खेळ संपलाच हा शब्दप्रयोग परिस्थितीचें वर्णन करायला इतका नेमका होता कीं, इतर अनेक पत्रांतून त्यांनीं, त्या वेळीं भयंकर अर्थपूर्ण असलेला, हा शब्दप्रयोग वापरलेला आढळून येतो. या शब्दप्रयोगाप्रमाणेंच ' निवड करण्याला बिकट इतक्या असंख्य अडचणी ' हा वाक्प्रयोगहि अनेकदां वापरलेला आढळून येतो. ता. १८ डिसेंबरला आपला दुसरा एक भाऊ जॉन ऑगस्टिन याच्याशीं बोलतांना ते म्हणाले होते, " ज्यांच्यांतून निवड कशी करावी हें सुचूं नये, इतक्या असंख्य अडचणी उभ्या आहेत आणि त्या दूर करण्याचीं साधनें मात्र तुटपुंजीं आहेत. असा प्रसंग माझ्याप्रमाणें कुणावरच आला नसेल. माझी परिस्थिति किती तारांबळ उडविणारी आहे, याची तुला कल्पनाच करतां येणार नाहीं."

जुलै ते डिसेंबर या कालावधींत काय घडलें तें सांगायला मुळींच गुंतागुंतीचें नाहीं. बोस्टन आघाडीवर होवेवर वॉशिंग्टन यांनीं मात केली हें खरेंच; पण त्याचबरोबर कोणत्याहि परिस्थितींत बोस्टन सोडण्याचा त्याचा इरादा होताच. अधिक मध्यवर्ती अशा ठिकाणीं तळ हलविण्याचा त्याचा विचार होता. स्वसामर्थ्याबद्दल त्याला खात्री असती तर सरळ न्यूयॉर्कवर किंवा फिलाडेल्फियावर हल्ला करण्यासाठींच त्यानें आपलीं जहाजें हाकारलीं असतीं. पण, कुमक

येण्याची वाट बघण्यासाठीं त्यानें हॅलिफॅक्सकडे प्रयाण केलें. ही कुमक लौकरच मिळेल, असें आश्वासन त्याला मिळालेलें होतें आणि त्याप्रमाणें ता. १२ जुलैलाच या मदतीचा पहिला हप्ता आला. त्याचा भाऊ ॲडमिरल लॉर्ड होवे हा एक आरमारी काफिला घेऊन न्यूयॉर्कला येऊन दाखल झाला. त्याआधींच, म्हणजे कॉंग्रेसनें स्वातंत्र्याचा अंतिम निर्णय घेतला त्याच दिवशीं ता. २ जुलै रोजीं जनरल होवे स्टॅटन बेटावर उतरला होता. पुढील कांहीं आठवडे ब्रिटिश, जर्मन आणि स्थानिक राजनिष्ठ सेना यांनीं भरलेलीं जहाजें एकामागून एक येत होतीं आणि स्टॅटन बेटावर सैन्य उतरत होतें. चार्लस्टनहून क्लिन्टनची पलटणहि या बेटावर आली होती. ऑगस्टच्या मध्यापर्यंत जनरल होवेच्या हाताशीं तीस हजारांपेक्षां अधिक संख्याबल असलेली सुसज्ज फौज जमा झाली होती.

वॉशिंग्टन हे, होवेच्या डावपेचांचा अंदाज बांधून एप्रिलपासूनच न्यूयॉर्कमध्यें येऊन दाखल झाले होते. "न्यूयॉर्क आघाडीवर येत्या उन्हाळ्यांत भयंकर रण-संग्राम होईल, असा अंदाज आहे." असें जॉन ऑगस्टिन याला ता. ३१ मे रोजीं लिहिलेल्या पत्रांत वॉशिंग्टन यांनीं म्हटलें होतें. वॉशिंग्टन यांचा तळ न्यूयॉर्कमध्यें असला तरी ब्रिटिशांची स्टॅटन बेटावर उतरणारी कुमक थोपवून धरण्यासाठीं कांहींहि करण्यास ते असमर्थ होते. सैन्य उतरविण्याचें कार्य अत्यंत बेडरपणानें आणि निर्धारानें चालू होतें. ब्रिटन म्हणजे समुद्रावरची सर्वश्रेष्ठ शक्ति. अमेरिकन आरमार तुलनेनें किरकोळ होतें. कांहीं थोडींच जहाजें आणि तींहि अननुभवी अधिकाऱ्यांच्या हातीं होतीं. ब्रिटन समुद्राप्रमाणेंच भूमीवरहि आपलें श्रेष्ठत्व सिद्ध करण्याच्या निर्धारानें जणूं बद्धपरिकर झालेलें होतें. शिवाय, त्यांचें संख्याबल वॉशिंग्टन यांच्या सेनेच्या संख्याबलापेक्षां कित्येक हजारांनीं जास्त होतें. वॉशिंग्टनच्या सेनेंत कांहीं भाग नागरिकांमधून भरती केलेल्या जुजबी फौजेचा होता. त्या सैनिकांची भरतीहि अल्प मुदतीची करण्यांत आलेली होती. आणि या सैनिकांवर वॉशिंग्टन यांचा फारच थोडा भरंवसा होता. उरलेला भाग म्हणजे मध्यवर्ती तुकड्या—यांतील सैनिकांच्या नोकरीची मुदतहि फक्त डिसेंबर-पर्यंतचीच होती.

तथापि, सेनापति या नात्यानें त्यांनीं दिलेल्या दैनंदिन हुकुमांचें परिशीलन करून पाहिल्यास असें वाटतें कीं, वॉशिंग्टन यांना बराच विश्वास वाटत होता. कदाचित् वॉशिंग्टन यांचा विश्वास वाजवीपेक्षां जास्त असावा. डोचेस्टर टेकड्यां-

वरून मिळविलेला विजय हा खरोखर बघतां लुटुपुटीचाच होता. सबंध वर्षभर सेनाप्रमुख राहिल्यानंतर एक तरी खरीखुरी लढाई खेळण्याची खुमखुमी त्यांना असणारच. खऱ्याखुऱ्या पराक्रमाची चुणूक दाखवायची उत्कट इच्छा त्यांना असणारच. कारण कांहीं असो, या बाबतींत त्यांना स्पृहणीय अशी कामगिरी मुळींच करतां आली नाहीं. ऑगस्टच्या अखेरीसच पहिला हबका बसला. आघाडीवरील सामसूम होवेनेंच संपुष्टांत आणली. त्यानें आपल्या फौजेपैकीं वीस हजार सुसज्ज सैनिक लॉंग बेटाच्या टोकावर उतरविले. उत्तरेस जाऊन ईस्ट नदीच्या मार्गें मॅनहॅटन ओलांडण्याचा त्याचा उघड उघड उद्देश होता. ब्रुक-लीन टेकड्यांवर अमेरिकनांनीं भक्कम बुरूज उभारल्यामुळें त्याचा मार्ग रोखलेला होता. पण तेथें असलेल्या आठ हजारांच्या अमेरिकन सेनेपैकीं बहुसंख्य सैनिक या तटबंदीच्या बाहेर उंचवट्यांच्या जागीं एकवटलेले होते. त्यांचें नेतृत्व जनरल पुटनामकडे होतें. अमेरिकन संरक्षणरेषेची डावी बाजू नजरचुकीनें असुरक्षित ठेवली गेलेली असल्याचें होवेच्या ध्यानीं आलें. म्हणून त्यानें अमेरिकन सेनेच्या उजव्या व मध्य भागावर दोन तुकड्या पाठविल्या आणि स्वतः होवे मुख्य ब्रिटिश सैन्य घेऊन डाव्या बाजूला चालून गेला. पहिल्या दोन तुकड्यांनीं जोराच्या चकमकीनंतर थोडेंसें यश मिळविलें; पण स्वतः होवेनें सणसणीत विजय संपादिला. त्यानें अमेरिकनांची डावी फळी फार उधळून लावली. हजार एक युद्धकैदी आणि जखमी व ठार मिळून हजार इतकी कमाई त्यानें त्या संग्रामांत केली. युद्धकैद्यांत न्यू हॅम्पशायरचा मेजर जनरल जॉन सलिव्हान हा होता. शत्रुसैन्य होवेच्या अगदीं मुठींत सांपडल्यासारखें होतें. मागें पूर्व नदी असल्या-मुळें तें जागच्या जागीं डांबलें गेलें होतें. अमेरिकन सैन्याच्या चुकीच्या रचने-बद्दलच्या दोषाचा कांहीं वांटा वॉशिंग्टन यांच्याकडे जातोच. नंतर मिळालेल्या पहिल्याच संधीला उरलेलें सैन्य माघारीं काढून घेण्याऐवजीं ब्रुकलिनच्या अमेरिकन सेनेला कुमक पाठवून त्यांनीं आणखी एक चूक केली.

वॉशिंग्टन यांच्या सुदैवानें जनरल होवेनें हल्ला पुढें रेटण्याचा प्रयत्न केला नाहीं. या संधीचा फायदा वॉशिंग्टन यांनीं घेतला. वॉशिंग्टन यांना आपली चूक चटकन् उमजली आणि रात्रीच्या अंधारांत ब्रुकलिन आघाडीवरील सैन्य काढून घेऊन त्यांनीं आपली पहिली चूक सुधारली. त्याच वेळीं समुद्रावर तुफान झाल्यामुळें होवेच्या युद्धनौका जागच्या जागीं डांबल्या गेल्यामुळें निसर्गानेंहि

वॉशिंग्टन यांना पूर्वीची चूक सुधारण्याला हातभारच लावला असें म्हणतां येईल. वॉशिंग्टन यांचें सारें सैन्य आतां मॅनहॅटनवर होतें. पण तेथेंहि तें कोंडींत सांपडण्याचा धोका होताच. कांहीं काळ मनांत चलबिचल चालू होती, पण अखेर वॉशिंग्टन यांनीं न्यूयॉर्क शहर सोडून जाण्याचा निर्णय घेतला. सप्टेंबरच्या मध्यास वॉशिंग्टन यांची विस्कळित झालेली सेना उत्तर मॅनहॅटनमध्यें हालेंम टेकड्यांवर मोर्चे लावीत होती, तर होवे न्यूयॉर्कमध्यें दबून बसला होता. दोघांच्या हालचाली उंदीर नि मांजर यांच्या डावपेचांसारख्या चालू होत्या. वॉशिंग्टन हे भेदरलेल्या उंदरासारखे मानले, तर होवे हा पेंगत बसलेल्या मांजरासारखा होता. मांजरानें थोडीशी चुळबूळ केली कीं उंदरानें पळ काढावा तसें चाललें होतें. मॅनहॅटनहून व्हाइट प्लेन्सकडे आणि तेथून नॉर्थ कॅसलकडे अशी कूच चालू होती. हुलकावण्या देत हालचाली चालू होत्या. वॉशिंग्टन यांनीं आपलें कांहीं सैन्य चार्लस ली याच्या आधिपत्याखालीं ठेवलें आणि स्वतः ते न्यू जर्सीपलीकडे गेले. मॅनहॅटनच्या उत्तर टोकाला वॉशिंग्टन किल्ला रोखून धरण्यासाठीं ठेवलेल्या तीन हजार देशभक्त स्वयंसैनिकांना ब्रिटिशांनीं गिरफदार केलेलें असहायपणें उघड्या डोळ्यांनीं पाहण्याचा प्रसंग वॉशिंग्टन यांच्यावर आला. नोव्हेंबरच्या मध्यास एकूण नैराश्यपूर्ण वातावरणांत अवमानकारक माघार घेण्याखेरीज वॉशिंग्टन यांच्यापुढें दुसरा कोणताच मार्ग नव्हता. होवेच्या हाताखालचा एक फील्ड कमांडर लॉर्ड कॉर्नवॉलिस सतत त्यांचा पाठलाग करीत होता आणि न्यू जर्सीमधून पलीकडे दक्षिणेकडे जाणाऱ्या वॉशिंग्टनची आणि चार्लस ली याची झालेली ताटातूट अद्याप कायमच होती. या परिस्थितींत आशादायक गोष्ट इतकीच कीं, स्क्यूलर, होरोशिओ गेट्स् आणि बेनेडिक्ट अर्नोल्ड यांच्या नेतृत्वाखालील फौजा अद्याप सुसंघटित होत्या. चम्प्लेन–हडसन रस्त्यानें उतरून न्यूयॉर्क गांठण्याची कार्लटन याची मोहीम त्यांनीं सफल होऊं दिली नव्हती. इतर आघाड्यांवरील परिस्थिति निराशाजनक होती. अखेर, चार्लस ली आपलें सैन्य घेऊन न्यू जर्सीमध्यें येण्यांत यशस्वी झाला. आणि अल्बनी येथील सेनेंतील बाराशें सैनिक कुमक म्हणून मिळविण्यांत वॉशिंग्टन यांना यश आलें. या घटना घडल्या नसत्या तर डिसेंबरच्या सुरुवातीसच 'खेळ संपलाच असता.' वॉशिंग्टन देलावरे नदी ओलांडून पलीकडे तळ देऊन राहिले. नदीवरील सर्व होड्या पांगवून दूर नेण्याची व्यवस्था करण्याचा दूरदर्शीपणा वॉशिंग्टन यांनीं दाखविला. त्यांनीं तसें केलें नसतें तर

फिलाडेल्फियावर चालून जाण्याच्या ब्रिटिश फौजेच्या मार्गांत दुसरा कांहींच अडथळा नव्हता. मध्यभागांतील वसाहतींमधील लोकांचें मनोधैर्य अजिबात ढांसळलें होतें. जनरल इस्राएल पुटनाम आणि जनरल थॉमस मिफ्लिन यांच्या सल्ल्यावरून कॉंग्रेसनें आपली कचेरी फिलाडेल्फियांतून बाल्टिमोरला हलविली, त्याचा जनतेच्या मनोधैर्यावर मोठासा अनुकूल परिणाम झाला नाहीं. शिवाय, चार्लस ली हा टेहेळणी करतांना गैरसावधपणा केल्यामुळें ब्रिटिश गस्तवाल्या सैनिक टोळीच्या हातीं लागला. अमेरिकन शिबंदींतील सैनिक मोठ्या प्रमाणावर सैन्य सोडून पळून जात होते. मध्यवर्ती सेनेंतील सैनिकांच्या नोकरीची मुदत लौकरच संपणार होती.

पण या ना त्या कारणानें संकट टळलें. होवेनें हिंवाळ्याच्या हंगामापुरती विस्तृत प्रमाणावरील मोहीम तहकूब ठेवली. क्लिंटनच्या नेतृत्वाखालीं सहा हजार सैनिक देऊन त्याला र्‍होड बेटांतील न्यू पोर्ट व्यापण्यासाठीं त्यानें रवाना केलें. इकडे, बक्षिसें देऊं केल्यामुळें, मुक्त झालेले कांहीं सैनिक पुनः अमेरिकन सेनेंत भरती झाले. फिलाडेल्फियामधून दोन हजारांची शिबंदी आघाडीवर रवाना करण्यांत आली.

या सर्वांपेक्षां महत्त्वाची गोष्ट म्हणजे ख्रिसमसच्या रात्रीं ट्रेंटनवरील तेजस्वी छापा घालून वॉशिंग्टन यांनीं आपलें जातिवंत पाणी दाखवून दिलें. देलावरे नदीच्या अर्धवट गोठलेल्या पाण्यांतून तीन तुकड्या पलीकडे नेऊन नदीच्या किनाऱ्यापासून दूर असलेल्या जर्मन शिबंदीच्या चौक्यांवर अचानक झडपी हल्ला करण्याची योजना वॉशिंग्टन यांनीं आंखली होती. १७५४ मध्यें भल्या पहाटे त्यांनीं फ्रेंचांवर जसा झडपी हल्ला चढविला होता तसाच, पण त्यापेक्षां खूपच महत्त्वाकांक्षी असा हा बेत होता. योजना मोठी स्पृहणीय होती, आणि ठरल्याप्रमाणें तीनपैकीं दोन तुकड्यांना नदी ओलांडण्यांत यश आलें नाहीं तरी वॉशिंग्टन यांच्या नेतृत्वाखालील मुख्य तुकडी मात्र नदीपार जाण्यांत यशस्वी झाली. ट्रेंटन येथील शिबंदींत पंधराशें सैनिक होते. थोड्याशा चकमकींत त्यांच्यावर मात करण्यांत आली. त्यांच्यापैकीं पांचशें सैनिक निसटून पळून जाऊं शकले. ख्रिसमस असल्यामुळें त्या शिबंदींतील कांहीं सैनिक दारू प्यालेले होते. त्यामुळें त्यांच्या प्रतिकाराचा दर्जा अत्यंत हलका होता. अर्थात् याचा अर्थ असा नव्हे कीं, हा हल्ला करण्यांत वॉशिंग्टन यांनीं दाखविलेल्या धडाडीचें महत्त्व कमी होतें.

त्यानंतर आणखी एकाच आठवड्यानें त्यांनीं शत्रूला दिलेला टोलाहि तितकाच धाडसी होता. देलावरे नदी ओलांडल्यावर कॉर्नवॉलिसनें वॉशिंग्टन यांना जवळ जवळ कोंडींत पकडलें होतें. पण ती कोंडी वॉशिंग्टन यांनीं प्रिन्स्टन येथें यशस्वीपणें शत्रूला तोंड देऊन फोडली आणि पुढें कूच केलें.

वॉशिंग्टन यांच्या या धडाडीच्या कृतींचा परिणाम लोकांच्या मनोधैर्यावर झाला आणि वॉशिंग्टन यांच्या नांवलौकिकांतहि त्यामुळें भर पडली. म्हणून त्या घटनांचें महत्त्व फार होतें असें म्हणणें खात्रीनें अतिशयोक्तीचें ठरणार नाहीं. ता. १७ जानेवारी १७७७ या दिवशीं, मागें एकदां ज्याचा उल्लेख आलेला आहे तो ब्रिटिश इसम निकोल्स क्रेसवेल हा व्हर्जिनियांत लीसबर्ग येथें होता. तेथील एका परिचित व्यक्तीशीं झालेल्या संभाषणाला अनुलक्षून त्यानें आपल्या दैनंदिनींत पुढील नोंद केलेली आहे :

> "सहाच आठवड्यांपूर्वी हा सद्गृहस्थ अमेरिकनांच्या शोचनीय परिस्थितीबद्दल हळहळ व्यक्त करीत होता आणि त्यांच्या अत्यंत प्रिय सेनापतीच्या शोचनीय परिस्थितीबद्दल, त्या सेनापतीबद्दल कींव व्यक्त करीत होता. या सेनापतीच्या अंगीं असलेल्या कौशल्याच्या अभावामुळें आणि लष्करी क्षेत्रांतील अनुभवाच्या अभावामुळें सर्वांना विनाशाच्या दरीच्या कांठावर आणून ठेवलें आहे, असें त्याचें मत होतें. त्याच्या मतें, सर्व आशा नष्ट झाली होती. पण आतां एकदम पारडें फिरलें आहे. वॉशिंग्टनचें नांव पुनः आकाशापर्यंत दुमदुमूं लागलें आहे... हा साऱ्या त्या हल्कट हेसियनांच्या (जर्मनांच्या) नालायकीचा परिणाम आहे. त्यांना इथें पाठविणाऱ्या हरामखोरांचा सत्यानाश होवो !"

प्रिन्स्टनच्या विजयानंतर साऱ्या हिंवाळ्याभर कांहीं हालचाल न करतां मॉरिसटाउनच्या आपल्या छावणींत वॉशिंग्टन मुक्काम ठोकून होते. देलावरे नदीच्या किनाऱ्यावरील चौक्या काढून घेऊन होवे आपलें सैन्य न्यू ब्रन्सविकच्या आसपास केंद्रित करीत होता. जणूं झालेल्या घटनांचें सिंहावलोकन करून एकूण ताळेबंद बघण्याचा तो काळ होता. आपणदेखील असा ताळेबंद मांडूं या. प्रथम अमेरिकन बाजूचा विचार करूं.

**समस्या आणि संधि**

बहुतेक चरित्रकारांनीं वॉशिंग्टन यांच्या सेनापतित्वाच्या कारकीर्दीची प्रशंसा केलेली आहे. असें करतांना त्यांनीं कोणतीहि कसोटी लावण्याचा प्रयत्न केलेला नाहीं किंवा केलाच असला तर फारच थोडा प्रयत्न केला आहे. खरें पाहतां न्यूयॉर्कच्या परिसरांतील मोहीम हाताळतांना वॉशिंग्टन यांच्याकडून गंभीर निर्णयप्रमाद घडलेले होते. या क्रांतियुद्धाच्या उत्तरार्धात केली गेलेली एक टीका या ठिकाणीं नमूद करण्यासारखी आहे : " जनरल होवेच्या जागीं जगांतला दुसरा कोणीहि सेनापति असता तरी त्यानें जनरल वॉशिंग्टन यांचा संपूर्ण पाडाव केला असता; आणि जनरल वॉशिंग्टन यांच्या जागीं जगांतला दुसरा कोणीहि सेनापति असता तरी त्यानें जनरल होवेला पराभूत केलें असतें," असें भाष्य ब्रिटिश गोटांतून केलें गेलें होतें. १७७६ सालीं वॉशिंग्टन यांच्या हाताशीं जेवढी फौज होती, तेवढीच मदतीला असतांना ते ब्रिटिशांचा पराभव कदापि करूं शकले नसते; पण त्यांनीं चुका केल्या हें मात्र खरें. ब्रुकलिन टेकड्यांवरील फौजेचा पराभव झाल्यानंतर त्या फौजेला कुमक देऊन पुनः संघटित करण्याचा प्रयत्न निष्फळ असूनहि त्यांनीं तसें करण्याची चूक केली. त्यांचा प्रतिस्पर्धी जास्त चलाख असता तर ती चूक सुधारण्याचा मोका त्यानें वॉशिंग्टनना कधींच दिला नसता. त्यानंतरच्या त्यांच्या हालचाली घबराटींतून निर्माण झालेल्या नसल्या तरी त्यांत गोंधळ आणि अनिश्चितता दिसून येतातच. वॉशिंग्टन किल्ला हातचा गमावणें किंवा त्यापेक्षांहि तेथील असंख्य सैनिक आणि मौल्यवान् तोफा व अन्य पुरवठा गमावणें या दोषांत वॉशिंग्टन यांचा वांटा कांहीं अंशीं तरी निदान ग्वासच होता.

शिवाय, आपल्या चुका कदापि कबूल करायच्या नाहींत, असा हटवाद त्यांच्यांत होता. गुणवत्ता आणि आत्मगुणनिष्ठा यांच्यांतील सीमारेषा अत्यंत पुसट असते. आणि व्हर्जिनियाच्या सरहद्दीवरील सैनिकी जीवन व्यतीत करणाऱ्या तरुण कर्नल-पेक्षां आजचे जनरल वॉशिंग्टन हे परिपक्व बुद्धीचे प्रौढ गृहस्थ असले तरी गुणवत्ता आणि आत्मगुणनिष्ठा यांच्यांतील भेद लक्षांत न घेतां दोन्ही एकरूप मानण्याचीच प्रवृत्ति त्यांच्यांत अजूनहि दिसून येत होती. ज्या वेळीं त्यांच्यावर टीका होई किंवा टीका होईल असें त्यांना वाटे, तेव्हां ते अत्यंत अस्वस्थ होत

असत. योग्य टीकेला आपली मुळींच हरकत नाहीं, असें १७७६ मध्यें आणि १७७७ मध्येंहि लिहिलेल्या पत्रांतून त्यांनीं ठांसून सांगितलेलें आढळत असलें, तरी इतरांची टीका त्यांना कधींच योग्य वाटत नसे. 'आपल्यापुढें किती अडचणींचा डोंगर आहे, याची कल्पना आपल्याला स्वतःला आणि आपल्या सहकाऱ्यांनाच असूं शकेल. दूर असणाऱ्यांची टीका योग्य असण्याची शक्यताच कशी असणार?' अशी त्यांची भूमिका होती. स्वतःच्या सन्मानाची-प्रतिष्ठेची बूज अतिरिक्त वाटत असल्यामुळें टोपांचें खापर दुसऱ्याच्या डोक्यावर फोडायला ते सहज प्रवृत्त होत असत. वॉशिंग्टन किल्ल्याच्या शरणागतीचा अहवाल तयार करतांना आपले एक विश्वासू सहकारी जनरल नाथानील ग्रीन यांना अन्याय करण्याचा दोष वॉशिंग्टन यांच्याकडून घडलेला होता. कॉंग्रेसकडून आपली गांजणूक होते, अशी जादा ओरड करण्याचीहि वृत्ति त्यांच्यांत दिसून येत होती.

लष्करी दृष्ट्या वॉशिंग्टन यांना अद्याप शिकण्यासारखें खूपच होतें. स्वभाव-प्रकृति विचारांत घेतां ते पूर्णपणें परिपक्व झालेले नव्हते. तथापि शिकण्याची पात्रता त्यांच्या ठिकाणीं होती आणि त्यांच्यावरील जबाबदारीला त्यांचा स्वभाव धर्म फारच अनुरूप होता. प्रारंभीं प्रारंभीं त्यांच्या हातून ज्या चुका झाल्या, त्यांतच त्यांच्या अंतिम विजयाचीं बीजें होतीं, असाहि निष्कर्ष आपण काढूं शकूं. कारण कांहीं झालें तरी ते लढवय्ये होते. त्यांच्या हातून चुका झाल्या त्या भित्रेपणामुळें मुळींच झालेल्या नाहींत. कारण त्या चुकांचें बीज भित्रेपणांत असतें तर अंतिमतः तें विनाशकच ठरलें असतें. त्यांच्या चुकांचें मूळ त्यांच्या लढाऊपणांतच होतें. अमेरिकेच्या दुर्बलतेमुळें त्यांना डावपेंच म्हणून एक गोष्ट स्वीकारणें भाग होतें, ती म्हणजे फार मोठ्या युद्धाला तोंड देण्याचें टाळणें आवश्यक होतें. पण ही आवश्यकता डावपेंच म्हणून मान्य करणेंहि त्यांना असह्य वाटत होतें. तथापि हळूहळू त्यांनीं हें सत्य पचविलें. १७७६ च्या सप्टेंबरमध्यें कॉंग्रेसला पाठविलेल्या खलित्यांत, "आपल्या बाजूनें हें युद्ध बचावाचेंच युद्ध असलें पाहिजे," असें त्यांनीं लिहिलें होतें. त्यानंतरची त्यांच्यापुढील कामगिरी (म्हणजे केवळ बचाव करीत रहाणें ही कामगिरी) समाधान देणारी नव्हती किंवा अभिमान वाटावा अशीहि नव्हती. तथापि कांहीं असलें तरी अखेरपर्यंत तगून राहिलेंच पाहिजे, ही जाणीव त्यांना स्पष्टपणें होऊं लागली होती. आपण तगून राहिलें पाहिजे, आपली सेनाहि तगविली पाहिजे-शत्रूला संघर्षाचा कंटाळा येईपर्यंत टिकून राहिलें

पाहिजे, ही जाणीव त्यांना स्पष्टपणें होऊं लागली होती. त्यांच्यांत जसा लढाऊपणा होता, तसाच सुदैवानें चिवटपणाहि होता. आपल्या व्हर्जिनियांतील जमिनीवरचा हक्क शाबीत करण्यासाठीं ज्यानें सतत पंधरा वर्षें नेटानें प्रयत्न केला, तो पुरुष, त्या जमिनीपेक्षांहि प्रचंड असें कांहीं पणास लागलेलें असतांना हार कशी मानील? आणि त्यांनीं ट्रेन्टनवर केलेल्या हल्ल्याचें इंगित यांतच आहे. अधिक महत्त्वाकांक्षी आघात करण्याची तळमळ त्यांना लागलेली होती. प्रिन्स्टन येथें त्यांनीं केलेलें साहस अंगाशीं येण्याचा धोका थोडक्यांत टळला. तथापि त्या आघाडीवर कॉर्नवालिसच्या सैन्याच्या कचाट्यांतून ते ज्या युक्तीनें निसटले, ती पाहिल्यास, गनिमी सैनिकांच्या नायकाची भूमिका आपल्याला वजावावयाची आहे, याची जाणीव त्यांना होऊं लागली होती असें दिसतें. त्यांनीं छावणींतील शेकोट्या शिलगावल्या आणि त्या तशाच जळत्या ठेवल्यामुळें शत्रु तिकडे वळणार, हें जाणून दुसऱ्या बाजूनें अंधारांतून निसटून जाण्याचा गनिमी डावपेंच प्रिन्स्टन येथें यशस्वी करून दाखविला.

वॉशिंग्टन कांहीं वेळां कॉंग्रेसकडे तक्रारी करीत, अशा अर्थाचा उल्लेख वर आलेला आहे. या तक्रारींना अर्थातच कारणें असत. कॉंग्रेसची कार्यपद्धति कित्येकदां सुस्तपणाची – विलंबकारी असे. अपुरेपणा आणि मूर्खपणा यांपासूनहि ती अलिप्त नसे. कांहीं प्रतिनिधि अगदींच माफक बुद्धीचे आणि संकुचित वृत्तीचे होते. युद्ध जसजसें लांबत गेलें, तसतसा हा गलथानपणा फारच वाढत गेला. वास्तविक, इकडून तिकडून जमा झालेल्या नागरिकांची भरती करून उभारलेली मध्यवर्ती सेना आणि वसाहतींतील जुजबी फौज यांच्याऐवजीं जास्त पद्धतशीर खडी फौज उभी करण्याचा प्रयत्न कॉंग्रेसला करतां आला असता आणि तिनें तसें करणें आवश्यकहि होतें. तथापि कॉंग्रेसपुढेंहि कांहीं अनिवार्य अडचणी होत्या. त्यांची पुरेशी जाणीव वॉशिंग्टन यांना नव्हती. युद्धाचा खर्च प्रचंड होता आणि 'आंतरखंडीय' कागदी चलनाची पत इतकी घसरली होती कीं, न्यूयॉर्कच्या एका राजपक्षीय वृत्तपत्रानें कुचेष्टा करण्यासाठीं जाहिरात छापून "एका इंग्लिश गृहस्थाला भिंतींना चिकटविण्याचे कागद म्हणून उपयोगांत आणण्यासाठीं नोटा पाहिजेत!" असें जाहीर केलें होतें. वॉशिंग्टन आपल्यावरील जबाबदारीच्या दृष्टीनें जसे नवखे होते, तशीच कॉंग्रेसहि नव्या परिस्थितीला तोंड देण्याच्या दृष्टीनें नवखीच होती. शिवाय, वॉशिंग्टन

यांना ज्या प्रश्नांची चिंता करावी लागत नव्हती, अशा परदेशांशीं वाटाघाटी करण्यासारख्या प्रश्नांकडे काँग्रेसला लक्ष द्यावें लागत होतें.

मुख्य मुद्दा असा आहे कीं, काँग्रेसकडून वॉशिंग्टन यांना चांगली वागणूक मिळाली होती, हें त्यांचे कांहीं चरित्रकार कबूल करावयास तयार नसले तरी, त्यांच्या म्हणण्यापेक्षां काँग्रेसनें वॉशिंग्टन यांना खूपच चांगली वागणूक दिली होती. सरकारी पातळीवरून काँग्रेसचे त्यांच्याशीं असलेले संबंध प्रामाणिकपणाचे आणि सौजन्याचे होते आणि काँग्रेसच्या बहुतेक सभासदांचे व वॉशिंग्टन यांचे संबंध चांगले होते. ज्या बाबतींत वॉशिंग्टन यांचे अधिकार आणि काँग्रेसचे अधिकार यांच्यांतील भेद स्पष्ट नसेल तेथें थोडासा खटका उडणें स्वाभाविक होतें. वॉशिंग्टन हे थोडे अधिक कडक वृत्तीचे सरसेनापति असते तर मात्र काँग्रेसमध्यें आणि त्यांच्यांत गंभीर स्वरूपाचे मतभेद होण्याची शक्यता होती. पण त्यांचा काँग्रेसवर विश्वास होता, काँग्रेसच्या म्हणण्याला मान देण्याची त्यांची वृत्ति होती. आणि आपण हें मान्य केलेंच पाहिजे कीं, काँग्रेसनेंहि त्यांच्याबद्दल तशीच वृत्ति दाखविलेली होती. तसें नसतें तर, परिस्थिति अत्यंत नैराश्य निर्माण करणारी होती, हें मान्य करूनहि विचारावेंसें वाटतें कीं, १७७६ च्या डिसेंबरमध्यें काँग्रेसनें वॉशिंग्टन यांना जे अमर्याद अधिकार दिले, त्या लोकविलक्षण निर्णयाचा अर्थ काय होता ? सैन्य उभारून त्याचा कारभार चालविण्याबाबतचे सर्वाधिकार काँग्रेसनें वॉशिंग्टन यांना बहाल केले होते. हे अधिकार किती दिवस त्यांनीं वापरावयाचे, याची मुदत ठरवून दिलेली नव्हती. ही मुदत अखेर सहाच महिने ठरली ही गोष्ट निराळी. पण त्या काळांत त्यांचा उल्लेख खरोखरच ' हुकूमशहा ' असा करण्यांत येत होता. हा उल्लेख नेहमींच वाईट अर्थानें नसे. कांहीं लोक तर क्रॉमवेलचें उदाहरण डोळ्यांपुढें ठेवून म्हणा किंवा तें उदाहरण मनांतहि न आणतां वॉशिंग्टन यांचा उल्लेख ' लॉर्ड प्रोटेक्टर ' असाहि करूं लागले होते.

काँग्रेस आणि वॉशिंग्टन यांच्यापुढें जशा समस्या होत्या, तशाच ब्रिटिशांपुढेंहि त्यांच्या समस्या होत्याच. मातृभूमींतच खुद्द तट होते, त्यामुळें धोरणांतहि तट होतेच. पार्लमेंटमध्यें आणि पार्लमेंटबाहेरहि तिसरा जॉर्ज आणि त्याचे टोरी पुरस्कर्ते यांना निश्चित विरोध करणारे लोक होते. समजूतदारपणाच्या गोष्टींनीं न वळतील तर शस्त्रबलानें वसाहती आपल्या साम्राज्यांत पुनः ओढून आणल्याच पाहिजेत, अशी राजाची निर्विवाद भूमिका होती. ' मखमलीच्या हातमोज्यांत

लपलेला पोलादी पंजा ' या वाक्प्रचाराप्रमाणें वरवर आव सौम्य धोरणाचा असला तरी मूळ भूमिका निर्दयतेची होती. पण युद्ध जसजसें रेंगाळत चाललें, तसतशी या उपमेची उलटापालट झाली. म्हणजे पंजा पोलादी दिसत असला तरी आंतील लपलेलें मनगट नुसतें फोफसें व कमजोरच होतें. लष्करी आणि आरमारी सामर्थ्यांत ब्रिटन वरचढ होतें. पण तें सामर्थ्य निर्णायकपणें वापरण्याला तें असमर्थ असल्यासारखें दिसत होतें. किंवा तसें तें सामर्थ्य निर्णायकपणें वापरण्याची ब्रिटनच्या मनाची तयारी नसावी. जनरल गेज आणि त्याच्यामागून आलेले इतर ब्रिटिश सेनानी वसाहतवाल्यांबद्दल मनांतून सहानुभूति बाळगणारे होतें, असें म्हणणें चूक आहे. किंवा ते ( आणि तिसरा जॉर्ज देखील ) उन्मत्त राक्षस होते, असें दाखविण्याचा प्रयत्न वसाहतींतल्या देशभक्त प्रचारकांकडून होत होता तसेहि ते नव्हते. त्यांचा मुख्य दोष हा कीं, मनांतून अमेरिकन वसाहतवाल्यांबद्दल कौतुकभावना असण्याऐवजीं तिरस्काराचीच त्यांची वृत्ति होती. लॉर्ड सँडविच यानें अमेरिकन वसाहतवाल्यांचें वर्णन ' अपरिपक्व, बेशिस्त, भ्याड माणसें ' असें केलें होतें. सँडविचच्या या उद्‌गारांना खूपच कुप्रसिद्धि लाभली होती. गेजनें बंकर हिलवर सरळ पुढून हल्ला केला होता, याचें कारण तोहि सँडविचशीं सहमत होता हेंच होतें. अर्थातच, त्या लढाईत मार खाल्ल्यावर त्याचें मत बदललें असणारच. लाँग बेटावरील विजयाबद्दल उमरावकी संपादणाऱ्या सर विल्यम होवेच्या ठिकाणीं गेजचा उत्साह नसेल, पण १७७६ सालांत लढाईचीं सूत्रें हालवितांना, वसाहतवाल्यांबद्दलचा तिटकारा मनांत बाळगूनच तो पावलें टाकीत होता.

होवे बेदरकारपणें पावलें टाकीत नव्हता, याचें कारण तो तितका उलट्या काळजाचा नव्हता, असें थोडेंबहुत म्हणतां येईल. गेजची बायको अमेरिकन होती, ही गोष्टहि मर्यादित प्रमाणांत जमेला धरतां येईल. क्लिंटनचा बाप न्यूयॉर्कचा गव्हर्नर होता आणि होवेचा वडील भाऊ १७५८ सालीं टिकांडेरोगाच्या संग्रामांत फ्रेंचांशीं लढतांना ठार झाल्यामुळें वसाहतवाल्यांच्या दृष्टीनें हुतात्मा ठरला होता, ही वस्तुस्थितिहि जमेस धरतां येईल.

तथापि या ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या भूमिका दुटप्पीपणाच्या होत्या व हा दुटप्पीपणा अनर्थावहहि ठरला, ही वस्तुस्थिति आपल्याला दृष्टीआड करतां येणार नाहीं. याचा एकच दाखला द्यावयाचा झाल्यास होवे-बंधूंचा देतां येईल.

जनरल होवे आणि ॲडमिरल होवे हे दोघे न्यूयॉर्कला आले ते आपलें सर्व विनाशक शस्त्रबल घेऊन बंडखोरांशीं लढण्यासाठीं होय. पण त्याच वेळीं तड-जोडीचीं बोलणीं करण्याचे अधिकार देऊन तिसऱ्या जॉर्जनें त्यांना शांतिदूताची भूमिका बजावण्याचाहि आदेश दिलेला होता. लॉंग बेटावर जनरल होवेनें विजय संपादिल्यावर शत्रूशीं बोलणीं करतां यावींत म्हणून पुढील हालचाली लांबणीवर टाकल्या होत्या. त्यानंतर १७७८ सालींहि युद्धाचें मार्गदर्शन करणारे सेनानी आणि शांतिदूत अशा दुटप्पी भूमिका या दोघां भावांवर सोपविण्यांत आलेल्या होत्या. त्यांचे विजय मिळमिळीत होते, पण तडजोडीच्या अटी मात्र अत्यंत कठोर होत्या.

अर्थातच या ब्रिटिश सेनानींपुढील विकट परिस्थितीचें कारण कांहीं अंशीं असें होतें कीं, लष्करी क्षेत्रांतील असामान्य बुद्धिवैभव असलेला पुरुष त्यांच्या-पैकीं कोणीच नव्हता. ब्रिटननें क्लेकला जन्म दिला होता आणि त्याच ब्रिटन-मध्यें नेल्सन निर्माण होणार होता. ब्रिटननें मार्लबरो निर्माण केला होता आणि तेंच ब्रिटन वेलिंग्टनला जन्माला घालणार होतें. पण लॉर्ड होवे, ग्रेव्हज् रॉडने यांपैकीं मात्र कोणीहि नेल्सन नव्हता. त्याचप्रमाणे गेज, ‘ बिली ’ होवे, क्लिंटन, ‘ जॉनी ’ बर्गोयने यांच्यापैकीं देखील एकहि जण वेलिंग्टन नव्हता. याचा अर्थ असा नव्हे कीं, ते कार्यक्षमतेंत कमी होते. लंडनहून क्रांतिविरोधी लढ्याचें मार्गदर्शन करणारा वसाहतमंत्री लॉर्ड जॉर्ज जर्मेन हा निर्बुद्ध नाठाळ होता, असें कांहीं जण आग्रहानें प्रतिपादितात. पण तोदेखील कमी कार्यक्षम नव्हता. रणां-गणावरील सर्वच सेनानी सामान्यतः चांगले योद्धे होते. धडाडी, पद्धतशीरपणा, युद्धकौशल्य या गोष्टी त्यांच्या अंगीं खासच होत्या. त्यांच्यांतला उत्कृष्ट सेनानी असलेला कॉर्नवॉलिस पुढील काळांत जगाच्या इतर भागांत अत्यंत यशस्वी ठरलेला आहे. या ब्रिटिश सेनानींचें दुर्दैव हें कीं, ते योद्धे असले तरी महान् प्रतिभाशाली असामान्य सेनानी नव्हते. त्यांना दूरदृष्टि नव्हती असेंहि नव्हे. आपल्यापुढील समस्यांची त्यांना सुस्पष्ट जाणीव होती. पण एखाद्या परीकथेंत ज्याप्रमाणें नायकाला फक्त तीनच पर्याय सत्त्वपरीक्षेला उतरण्यासाठीं दिलेले असतात, तशी त्यांची स्थिति होती. त्या पर्यायांपैकीं पहिला उत्कृष्ट, दुसरा मध्यम व तिसरा कनिष्ठ असतो. परीकथेंतल्या नायकाप्रमाणेंच ब्रिटिश सेनानींना, युद्धाचा एकाच फटक्यांत कायमचा निकाल लावण्यासाठीं तीनच सुवर्णसंधि लाभल्या

होत्या. पहिली संधि १७७५ च्या जूनमध्यें गेजला चार्ल्स टाउन पटारावरील लढाईत लाभली होती. त्या वेळीं ब्रीड्स हिलवर हल्ला चढविण्याचें व्यवहारचातुर्य त्यानें दाखविलें असतें आणि नंतर मिळेल त्या अनुकूल संधीचा फायदा घेण्याची तत्परता दाखविली असती, तर आर्टेमस वार्डच्या नवशिक्या फौजेला वॉशिंग्टन कुमक घेऊन येण्याच्या पूर्वींच त्या फौजेची धुळधाण गेजला उडवतां आली असती. दुसरी सुवर्णसंधि होवेला लाँग बेटावरील युद्धांत व त्यानंतरच्या चकमकींच्या वेळीं मिळाली होती. वॉशिंग्टन यांनीं उभारलेली ब्रुकलिन टेकड्यांवरील संरक्षक फळी फोडून वेगानें आंत घुसून नंतर तितक्याच वेगानें त्यानें पाठलाग चालू ठेवला असता तर, पुनः उठून उभें राहणें अशक्य ठरावें इतकी मध्यवर्ती सेना जमीनदोस्त झाली असती. त्यानंतर तिसरी सुवर्णसंधि होवेलाच १७७७ सालीं मिळाली.

एकेक संधि हुकत गेली तसतशा अडचणी वाढत गेल्या. वरवर पाहिल्यास परिस्थिति ब्रिटिशांना अनुकूल दिसते. पण अधिक बारकाईनें परिशीलन केल्यास ही अनुकूल परिस्थिति हळूहळू नाहींशी होत गेली असें आढळून येतें. युद्धाचा खर्च अफाट येत होता. ब्रिटनमध्यें या युद्धाला प्रतिकूल लोकमत बनत होतें. आरमाराचें मनुष्यबळ अपुरें होतें. आणि त्या आरमाराला झेपेल त्यापेक्षां अधिक जबाबदाऱ्या, सर्व जगभर पसरलेल्या ब्रिटिश साम्राज्यांत, पार पाडाव्या लागत होत्या. लष्कराचें मनुष्यबळहि कमी होतेंच, शिवाय तेंहि जगभर विखुरलेलें होतें. त्यामुळें इतर युरोपियन राजांकडून भाड्यानें सैन्य घ्यावें लागत होतें. शिवाय तीन हजार मैल लांबीवरून ब्रिटनमधून अमेरिकेंतील युद्धाचें धोरण ठरवावें लागत होतें आणि दळणवळण अत्यंत मंदगति व अनियमित होतें. लष्करी सैनिक आणि आरमारी सैनिक यांना एकमेकांशीं सहकार्य कसें करावें, याचें शिक्षण मिळालेलें नव्हतें. ज्या अफाट देशांतील हवामान खुद्द अमेरिकनांनाच असह्य वाटण्याइतकें उकाड्याचें होतें, त्या देशांत एक प्रकारच्या गनिमी युद्धाला तोंड देण्याचा प्रयत्न होवे आणि त्याचे सहकारी यांच्यावर आलेला होता. त्या वेळीं अमेरिकेंत रस्ते अगदीं हाताच्या बोटांवर मोजण्याइतके अपुरे होते. प्रत्यक्ष वसाहतींचा भाग सोडल्यास अन्य प्रदेश दाट जंगलाचा होता. १७५४ सालीं ॲलेघेनीच्या जंगलांतून फक्त वीस मैल अंतर कापायला वॉशिंग्टन यांना तब्बल

पंधरा दिवस लागले होते, हें लक्षांत घेतलें म्हणजे कल्पना येईल. आजसुद्धां युरोपियन प्रवाशांना अमेरिका देश अफाट आणि दुःसाध्य वाटतोच.

वॉशिंग्टन यांच्यापुढें, ' इतक्या असंख्य अडचणी होत्या कीं, त्यांतून कोणत्या निवडाव्यात अशी समस्या ' होती हें खरें, पण १७७६ च्या शरदृतूपर्यंत त्यांच्यापुढें ठळक नि मोजक्याच समस्या उरल्या होत्या. अर्थात् त्यांचा ताण कमी नव्हता, पण आतां त्यांना मुख्यतः तीनच गोष्टींवर लक्ष केंद्रित करावयाचें होतें. टिकाव धरून राहणें, शत्रूला हुलकावण्या देत राहणें आणि जनतेला प्रोत्साहित करीत राहणें या त्या तीन मुख्य गोष्टी होत. त्या मानानें होवेला करतां येण्याजोग्या अनेक गोष्टी होत्या. आरमाराच्या मदतीनें अमेरिकेच्या विस्तृत किनाऱ्यावर कोठेंहि उतरणें त्याला सहज शक्य होतें. डावपेंचाच्या योजना पार पाडण्याच्या बाबतींत त्या काळांत पुरेशी गुप्तता राखली जात असल्याचें दिसून येत नाहीं. पण, तसें पाहिलें तर त्या बाबतीत गुप्तता ही तशी महत्त्वाची गोष्टच नव्हती. अमेरिकेंतल्या सर्वच महत्त्वाच्या शहरांवर होवेचाच काबू होता. न्यू पोर्ट त्याच्या हातीं होतें. तेथून तो न्यू इंग्लंडवर दहशत बसवूं शकत होता. न्यूयॉर्क ताब्यांत असल्यामुळें तेथील असंख्य राजपक्षीय प्रजाजनांचें संरक्षण त्याला करतां येत होतेंच; शिवाय कॅनडाकडे व ग्रेट लेक्सकडे जाणाऱ्या मार्गांवर नियंत्रण ठेवणें त्याला शक्य होत होतें. अमेरिकेंतील त्या वेळचें सर्वांत मोठें शहर आणि काँग्रेसचें मुख्य ठाणें असलेलें फिलाडेल्फिया जर त्याला काबीज करतां आलें असतें, तर मध्य भागांतील वसाहतींवर त्याला वर्चस्व स्थापन करतां आलें असतें. चार्ल्स्टनचा ताबा मिळवितां आला असता, तर दक्षिण भागाकडे जाण्याचा मार्ग त्याला खुला झाला असता.

पण, असें होऊनहि अधिक काय घडलें असतें ? सर्वच बंदरें एकाच वेळीं ताब्यांत ठेवणें कांहीं त्याला शक्य झालें नसतें. आणि तसें शक्य झालें असतें तरी सुद्धां बंडाचा पुरा बीमोड करतां येणें शक्य झालें नसतेंच. अफाट जंगलें, प्रदीर्घ पायवाटा तुडवीत पाठलाग करीत राहणें निरर्थकच ठरलें असतें. जे युद्धाचे परंपरागत नियम पाळीत नाहींत किंवा तसे नियम असूं शकतात, हें सुद्धां ज्यांना ठाऊक नव्हतें, अशा शत्रूच्या गनिमी सैनिकांकडून छुपे हल्ले होण्याचा धोका होताच. शिवाय, अशा कित्येक वसाहती होत्या कीं, ज्यांची अद्याप नकाशावर नोंदसुद्धां झालेली नव्हती. वॉशिंग्टन हे स्वतः ग्रामीण विभागांतले होते; ज्या व्हर्जिनियांत

शहर म्हणतां येईल इतकें मोठें गांव अद्याप अस्तित्वांत आलेलें नव्हतें, अशा खेडवळ प्रदेशांतले ते होते. त्यामुळेंच त्यांच्याकडे आलेली गनिमी युद्धाच्या नेत्याची भूमिका सुलभतेनें पार पाडण्याला ते समर्थ होते. आणि अमेरिकन सैन्याला सतावण्यासाठीं पाठलाग करीत वणवण हिंडण्यापेक्षां प्रमुख शहरांच्या दरम्यान हालचाली करीत राहणेंच होवेला अधिक पसंत होतें. सुखसोयींची आवड, आरामशीर निवासस्थानाची आवड, सुंदर स्त्रीचा सहवास आदि गोष्टी याच्या मुळाशीं असल्या तरी तें एकच कारण नव्हतें. दुसरीं अनेक कारणें त्याच्या हालचालींचें स्वरूप ठरण्यामागें होत्या. फार मोठ्या प्रमाणावर हानि पत्करणें किंवा सैन्याला सतत गळती लागूं देणें आपल्याला परवडणारें नाहीं, असें होवेचें म्हणणें होतें. अमेरिकन सेना विखुरली गेली तरी ती पुनः एकत्र संघटित होऊं शकत होती. त्या सेनेंत सतत भरती होत राहणें शक्य होतें. पण होवेचें सैन्य म्हणजे पोसायला पांढऱ्या हत्तीइतकें खर्चाचें होतें. काटकसरी वृत्तीनेंच त्याचा उपयोग करणें आवश्यक होतें, असें होवेला वाटे. पण त्याचें हें म्हणणें चुकीचें होतें. होवेनें वॉशिंग्टन यांच्यावर हल्लाच केला पाहिजे, असा आग्रह धरणारा त्याचा दुय्यम अधिकारी सर हेन्री क्लिंटन हा चढाईखोर योद्धा नव्हता. शिवाय स्वभाववैधर्म्यामुळें होवे आणि क्लिंटन यांच्यांत तेढ इतकी होती कीं, त्यांपैकीं एक जण दुसऱ्यानें योजलेल्या गोष्टी कशा फसतील, हें बघण्यालाच उत्सुक असे. "कोणता दुर्दैवी शाप होता कोण जाणे, पण त्यामुळेंच आमचें कधींच एकमत झालें नसावें." असे उद्‌गार क्लिंटननें १७७७ च्या जुलैत काढले होते.

या वैयक्तिक तेढीच्या पार्श्वभूमीला आणखी एक वस्तुस्थिति होती. हे ब्रिटिश सेनानी यादवी युद्धाला तोंड देत होते. अन्य स्वरूपाच्या युद्धापेक्षां यादवी युद्धाचें वातावरण अधिक किचकट असतें. फार निर्दयपणानें उपाययोजना केली तर अधिक प्रमाणांत तिरस्काराचे धनी व्हावें लागतें. दिलदारपणानें मऊपणा स्वीकारला तर त्याची दुर्बलता म्हणून कुचेष्टा होण्याची शक्यता असते. या विशिष्ट यादवी युद्धांत क्रमाक्रमानें ब्रिटिश सेनानींना जाणीव होत गेली कीं, हें युद्ध संपूर्णपणें जिंकणें कदापि शक्य होणार नाहीं. खरें म्हणजे, खुद्द वॉशिंग्टन यांना निकालांत काढणें याखेरीज दुसरा कोणताच उद्देश या ब्रिटिश सेनानींच्या मनांत बहुधा नसावा. आणि म्हणूनच वॉशिंग्टन ब्रिटिशांचे कैदी बनले आहेत, अशा अफवा सतत पसरत राहिल्या तर नवल नाहीं. या अफवा केवळ इच्छा-

रंजनात्मकच असत. वॉशिंग्टन यांचा खून करण्याचा कट १७७६ मध्यें शिजला होता. ब्रिटिशांच्या दृष्टीनें ही खुनाची कल्पना फारच उत्कृष्ट होती; कारण 'ज्याची जागा दुसऱ्या कोणालाहि घेतां येणार नाहीं,' असें फक्त एकट्या वॉशिंग्टन-बद्दलच वाटत होतें. असा अपवादात्मक पुरुष दोन्ही पक्षांतहि दुसरा कोणी नव्हता. १७७६ मध्यें एक प्रख्यात अमेरिकन सेनानी चार्ल्स ली हा युद्धकैदी म्हणून ब्रिटिशांच्या हातीं लागला होता. पण या घटनेचा उघड परिणाम कांहींच दिसला नाहीं. त्याचप्रमाणें ब्रिटिश सेनानी क्लिंटन याला पळविण्याचा डाव रचला गेला होता, पण त्याचें महत्त्व ब्रिटिशांना कांहींच वाटलें नव्हतें. "त्याच्या जागीं दुसरा चांगला सेनानी इंग्लंडमधून पाठवितां येईल," असें भाष्य करून या कटाचें महत्त्व कमी लेखलें गेलें होतें. पण, वॉशिंग्टन हे एकमेवाद्वितीय असेच वाटत असल्यामुळें ब्रिटिशांचें मुख्य लक्ष्य स्वत: वॉशिंग्टन हेंच होतें.

वॉशिंग्टन यांना एखादें दुःस्वप्न पडलें होतें कीं नाहीं, हें समजण्याला कांहींच पुरावा नाहीं. पण तसें दुःस्वप्न त्यांना पडलें असण्याची शक्यता आहे. त्यांचें सैन्य म्हणजे वसाहतींतून इकडून तिकडून जमा केलेल्या उमेदवारांचा गळाठा होता. सरकारी छत्राखालीं पद्धतशीरपणें भरती करून सैन्य उभारणें १७८१ मध्यें मान्य झालेल्या संयुक्त राज्य करारानंतरच शक्य झालें. तेव्हां वॉशिंग्टन यांना असें दुःस्वप्न पडलें असावें कीं, आपण एका छोट्या गलबतांत बसलों आहों, त्या गलबताचें शीड कागदाचें आहे. पाऊस आला आणि शीड भिजून नष्ट झालें! होवे यालाहि जर असें एखादें दुःस्वप्न पडलें असेल— आणि पडलें असावें असें धरून चालायला हरकत नाहीं—तर तें असें असेल: आपण असेच समुद्रावर आहों, पण आपलें जहाज मोठें आहे आणि त्याचें शीड न फाटणाऱ्या जाड कॅन्व्हासचें आहे. पण वादळ सुरू झालें आणि शीड उडून गेलें— तें आवरून पुनः बांधायला पुरेसे हात मात्र आपल्याला नाहींत! सारांश, वॉशिंग्टन यांच्यापुढील समस्या होती, पुरेशा साधनांच्या अभावीं खंडप्राय प्रदेशाचा बचाव कसा करायचा ही! तर होवेवर प्रसंग आला होता तो असा कीं, बंडाचा वणवा पुरा भडकल्यावर तो विझविण्यासाठीं कितीहि साधनसामग्री असली तरी अपुरीच ठरेल, अशा परिस्थितींत तो वणवा विझविण्याचें काम त्याला करावयाचें होतें. ज्या देशांतील जनतेची अस्मिता जागी झाली आहे, त्या प्रचंड देशांतील जनतेचा उठाव दडपून टाकणें बिकट आहे, हें तत्त्व स्वतः झळ सोसून सिद्ध करण्याची पाळी

ब्रिटनवर आली होती. त्यानंतरहि हें तत्त्व सिद्ध करणारे प्रसंग इतिहासांत अनेक घडले. स्पेनमधील आक्रमणांत या तत्त्वाचा साक्षात्कार नेपोलियनला झाला. आणि रशियांत त्याला असाच झालेला साक्षात्कार यापेक्षांहि भयंकर महाग पडला होता. महायुद्धांत युरोप व्यापणाऱ्या जर्मनांनाहि हाच धडा शिकावा लागला. बोअर युद्धांत आफ्रिकन वसाहतींनीं तीन वर्षें लढून ब्रिटनला हाच धडा शिकविला.

**संकटकाल आणि कारस्थान : १७७७-१७७८**

१७७७ साल म्हणजे होवेच्या दृष्टीनें अत्यंत आशावादी व अनुकूल कालखंड होय. वसंतऋतूच्या प्रारंभीं वॉशिंग्टन आपल्या सेना बाहेर काढण्याच्या तयारींत होते, तर होवे निरनिराळ्या योजनांचा विचार करींत होता. वॉशिंग्टन यांच्या सैन्याला तोंड देत न बसतां, कॅनडामधून दक्षिणेकडे येणाऱ्या ब्रिटिश सेनेला अल्बनी येथें जाऊन मिळायचें, अशी त्याची कल्पना होती. या योजनेंतच ऱ्होड बेटावरून बोस्टनवर हल्ला करण्याची योजनाहि समाविष्ट होती. ही योजना त्यानें वसाहतमंत्री जर्मेन याला सादर केली. ही योजना सादर केल्यानंतर त्यानें पुनः बेत बदलला. फिलाडेल्फियावर चालून जावें, असें त्यानें आतां सुचाविलें. याच वेळीं दुसऱ्या लहानशा फौजेनें न्यूयॉर्कपासून उत्तरेकडे चढाई करावी, असेंहि त्यानें सुचविलें. जर्मेननें दुसरी योजना पसंत केली. कारण ही योजना काटकसरीची होती. नवी कुमक पाठविणें शक्य नव्हतें आणि पहिली योजना पार पाडण्यासाठीं आणखी पंधरा हजार सैनिकांची जरुरी आहे, असें होवेचें म्हणणें होतें. त्याचप्रमाणें हिंवाळ्यांत इंग्लंडमध्यें रजेवर गेलेल्या बर्गोयने याच्या म्हणण्याचा प्रभावहि जर्मेनवर पडला होता. आपल्याला स्वतंत्र सेनेचें आधिपत्य मिळविण्याचा उद्देश मनांत ठेवून बर्गोयनेनें जर्मेनला आपली एक योजना पटवून दिली होती. तीन फौजांनीं तीन बाजूंनीं अल्बनीवर चालून जावयाचें, अशी ही योजना होती. मॉन्ट्रीलच्या बाजूनें उत्तरेकडून होणाऱ्या या चढाईचें नेतृत्व आपल्याकडे असावें, असें बर्गोयने यानें सुचविलें होतें. जर्मेननें हीहि योजना संमत केली होती.

सेनाधिपत्याचीं क्षेत्रें, ठरविण्याच्या ब्रिटिश पद्धतीचा दोष या बाबतींत पराकोटीला गेलेला दिसतो. एखाद्या नवशिक्या नाटककाराला शोभेल, अशी बर्गोयनेची योजना नाट्यतंत्राच्या दृष्टीनें समतोल बांधीव कथानकासारखी वाटली, तरी अशा नवशिक्या नाटककाराचें प्रत्यक्ष नाटक जसें प्रभावशून्य असतें, तसा

प्रकार बर्गोयनेच्या योजनेच्या तपशिलाबाबत झालेला होता. तीन बाजूंनीं केलेल्या चढाईची सांगड कशी घालावयाची, याचा विचारच त्यानें केलेला नव्हता. मॉन्ट्रील आणि अल्बनी यांच्या दरम्यानच्या उंचसखल भागांतून सामग्रीचा पुरवठा आणि सैन्याची कूच पद्धतशीरपणें कशी करतां येईल, याकडेहि या योजनेंत लक्ष दिलेलें नव्हतें. जणूं, अल्बनींत येऊन दाखल झालें कीं विजय पदरांत पडलाच, असें या योजनेंत गृहीत धरण्यांत आलें होतें. कारण अल्बनी गांठली कीं न्यू इंग्लंड अलग पडेल; गुबगुबीत कोंबड्याच्या पोटांतलें रसदार मांस कुरतडून घेतल्यागत वसाहतींची अवस्था होईल, असा त्याचा होरा होता. पण खरोखर तसें घडलें असतें काय? आपलीं दळणवळणाचीं साधनें अबाधित राखणें ब्रिटिशांना शक्य झालें असतें का? व्यास प्रदेशांतून आपली फळी ओलांडून अमेरिकन लष्करी तुकड्या पलीकडे जाणार नाहींत, असा बंदोबस्त करणें ब्रिटिशांना शक्य होतें काय?

त्यापेक्षां, होवेची दुसरी योजना, वॉशिंग्टनच्या सेनेचा बंदोबस्त करण्याच्या हेतूनें आंखलेली असल्यास, जास्त चांगली होती. कारण, बंडाच्या प्राणभूत केंद्रा-वरच ही चढाई झाली असती. वसंतऋतूंत आणि उन्हाळ्याच्या प्रारंभीं कॉर्न-वालिसनें वॉशिंग्टनना जाऊन भिडण्याचा कांहींसा प्रयत्न केला. पण, प्रतिकूल परिस्थितींत आव्हान स्वीकारूं नये, हें वॉशिंग्टन आतां चांगले शिकले होते. त्यांनीं कॉर्नवालिसला कौशल्यानें झुकांडी दिली.

मध्यतरींच्या काळांत होवेनें पुनः एकदां आपला बेत बदलला. त्याचा नवा बेत मोठी आरमारी चढाई करून फिलाडेल्फिया काबीज करण्याचा होता. समुद्र-मार्गें नेण्यासाठीं म्हणून त्यानें निवडक पंधरा हजार सैनिक बाजूला काढले. याचा अर्थ न्यूयॉर्क शहरापासून उत्तरेस चढाई करण्यासाठीं खडी फौज उपलब्ध होणार नव्हती; तर राजपक्षीय लोकांच्या तुकड्यांचाच त्या आघाडीवर हालचाली करण्या-साठीं उपयोग करावा लागणार होता. तसेंच अल्बनीवर चाल करण्यासाठीं तीन-ऐवजीं दोनच फौजा जाऊं शकल्या असत्या. त्यांच्या परिणामीं अमेरिकेच्या उत्तर विभागांतील सेनेला डांबून ठेवण्याऐवजीं स्वतः बर्गोयनेच वेढ्यांत अडकण्याचा धोका होता. फिलाडेल्फिया काबीज करण्याच्या योजनेनें होवेला इतकें पछाडलें होतें आणि त्या योजनेंतील शक्याशक्य गोष्टींची गुंतवळ सोडविण्यांत तो इतका दंग झाला होता कीं, क्लिंटनच्या विरोधाकडे लक्ष द्यायला त्याला वेळच नव्हता.

क्लिंटनला न्यूयॉर्कमध्येंच असून रहावें लागणार होतें. शिवाय बर्गोयने आणि जर्मेन या दोघांनाहि होवेच्या बदललेल्या बेताचा पत्ताच नव्हता. जेव्हां त्यांना हा डाव कळला तेव्हां फार उशीर झाला होता. इतकें झालें तरी जर्मेन विनाकारण चिंता करीत बसला नाहीं. फिलाडेल्फिया काबीज केल्यानंतर लगेच होवे बर्गोयनेच्या योजनेंत त्याच्या मदतीला धावला म्हणजे जर्मेनला पुरेसें होतें.

ब्रिटिशांच्या असल्या डावपेंचांचें गूढ वॉशिंग्टन यांना न उकलावें यांत कांहीं आश्चर्य नाहीं. या योजनांमागील तर्कशास्त्र समजून घेणें त्यांना कठीण वाटलें. तथापि हळूहळू त्यांना स्पष्ट कल्पना आली. शत्रूचे दोन मुख्य उद्देश त्यांना स्पष्ट दिसूं लागले. एक उद्देश म्हणजे कॅनडाच्या बाजूनें चढाई करणें व दुसरा उद्देश म्हणजे समुद्रमार्गें मध्य किंवा दक्षिण प्रदेशावर आक्रमण करणें. शत्रूच्या संख्याबलाचा जास्तींत जास्त अचूक अंदाज वॉशिंग्टन काढूं शकले. बर्गोयनेचें सैन्य आठ हजारांचें होतें; त्याला उत्तरेकडील सेना तोंड देऊं शकली असती. क्लिंटनचें सैन्य सात हजारांचें होतें. पण त्यांतले निम्मेच सैनिक खड्या फौजेंतले होते. तो न्यूयॉर्कच्या तळावरून मधून मधून चकमकी करण्यासाठीं पुढें येण्या-व्यतिरिक्त जास्त कांहीं करूं शकणार नव्हता. अति उत्साह दाखवावयाचें मनांत आणल्यास गोष्ट निराळी होती. या परिस्थितींत होवेला तोंड द्यायला वॉशिंग्टन मोकळा होता. तोंड देणें म्हणजे अर्थातच हुलकावण्या देत रहाणें. वॉशिंग्टन यांच्या सैन्याचें संख्याबळ कमी असलें तरी अगदींच कमी असण्याची शक्यता नव्हती. कारण उन्हाळ्याच्या मध्यास वॉशिंग्टन यांच्या हाताशीं सुमारें नऊ हजार सैनिक होते. शिवाय स्थानिक जुजबी फौजहि बरीच होती. १७७७ च्या फेब्रुआरींत बेनेडिक्ट अर्नोल्डला लिहिलेल्या पत्रांत वॉशिंग्टन यांनीं म्हटलें होतें, " जर शत्रूकडून आम्हांला युद्धाला पुरेसें सैन्य जमविण्याइतकी उसंत लाभली तर आम्ही आमच्या या पूर्वीच्या सर्व चुकांची भरपाई करूं शकूं. " पण, त्यांनीं अपेक्षा केली होती त्याच्या अल्पांशहि सैन्य त्यांना भरती करतां आलें नाहीं. मध्यवर्ती सेनेंतील नोकरीसाठीं तीन वर्षांच्या करारानें किंवा युद्ध संपे-पर्यंतच्या मुदतीच्या करारानें भरती होणारांना रोख बक्षिसें आणि जमिनी इनाम देण्याचें कॉंग्रेसनें जाहीर केलें होतें, तरी पुरेशी भरती होऊं शकली नाहीं. प्रत्येक वसाहतीकडून अल्पमुदतीसाठीं आणि वसाहतीच्या प्रदेशांतर्गत शिबंदींत नोकरी-साठीं भरती होणाऱ्यांना यापेक्षांहि अधिक आकर्षक बक्षिसें ठेवलेलीं असल्यामुळें

कॉंग्रेसनें ठेवलेल्या बक्षिसांचें प्रलोभन प्रभावी ठरत नव्हतें. त्यामुळें मध्यवर्ती सेनेचें संख्याबल नेहमींच कमी राहावें, अशी शोचनीय परिस्थिति होती. तथापि या सैन्याच्या रूपानें चांगल्या मुरलेल्या सैनिकांचा ताफा वॉशिंग्टन यांच्या हातांशीं उपलब्ध होता. आणि हें सैन्य व जुजबी फौज यांचा अवतार गबाळग्रंथी दिसत असला तरी 'दिसतें तसें नसतें' हें तत्त्व त्यांनाहि लागू होतें. याशिवाय फ्रान्स आणि स्पेन या राष्ट्रांकडून होणारी मदत, ब्रिटिशांच्या पुरवठ्यापैकीं हातीं लागणारी सामग्री आणि स्वतःचें तुटपुंजें उत्पादन, यांतून अमेरिकन फौजा त्यांतल्या त्यांत सुसज्ज ठेवणें शक्य झालें होतें.

शत्रूनेंहि वॉशिंग्टन यांना भरपूर उसंत दिली. होवेचा आरमारी जथा जुलैच्या अखेरीपर्यंत न्यूयॉर्क बंदर सोडूं शकला नाहीं. आणि त्यानंतरहि सबंध एक महिनाभर तें सैन्य किनाऱ्यावर उतरलें नाहीं. होवे चेसापीक बे-मधील हेड ऑफ एल्कच्या किनाऱ्यावर उतरला. फिलाडेल्फियापासून जितक्या अंतरावर त्यानें उतरणें आवश्यक होतें, त्यापेक्षां जास्त लांब अंतरावर तो उतरला होता. तथापि एकदां हालचाली सुरू केल्यावर मात्र तो अगदीं विश्वासपूर्वक पावलें टाकूं लागला. एकेक टप्पा गांठीत, चकमकी लढवीत त्यानें शहराच्या दिशेनें कूच सुरू केलें. होवेच्या प्रारंभींच्या हालचाली वॉशिंग्टन यांना आकलन झाल्या नव्हत्या. त्यांना अचंबा वाटत होता. त्यांना हें कळेना कीं, आधींच त्या शहरापासून साठ मैल अंतरावर न्यू ब्रन्सविक येथें असतांना त्यानें चारशें मैलांचा समुद्रप्रवास करून कां यावें ? आणि त्या शहरापासून सत्तर मैल लांब उतरण्यासाठीं या प्रवासाची आवश्यकता काय होती, हेंच वॉशिंग्टन यांना कळेना. म्हणून त्यांना प्रथम वाटलें कीं, होवेचें लक्ष्य चार्लस्टन हें असावें. पण नंतर लक्षांत आलें कीं, त्याचा रोख फिलाडेल्फियावरच आहे. होवेनें समुद्रमार्गें सैन्य आणण्यांत जो वेळ घालविला, त्यामुळें त्याचा डाव ओळखण्याइतकी उसंत वॉशिंग्टन यांना मिळाली आणि त्या संधीचा फायदा घेऊन त्यांनीं होवेचें सैन्य आणि त्याच्या चढाईचें लक्ष्य– फिलाडेल्फिया– यांच्या दरम्यान अमेरिकन सेनेचा अडसर घातला.

आतांपर्यंत दैव जणुं वॉशिंग्टन यांच्यावर खूप होतें. पण पुढील कांहीं आठवड्यांत दैवाचें चक्र उलटें फिरूं लागलें. आणि यापूर्वीच्या मोहिमांप्रमाणेंच या वेळींहि त्याच्या दोषाचा वांटा वॉशिंग्टन यांच्याकडे होताच. कणखरपणें टिकाव धरला नाहीं आणि कसून सामना दिला नाहीं तर फिलाडेल्फिया हातून जाणार, हें निश्चित

होतें. तेवढें एक शहर जाणें म्हणजे संपूर्ण पराभव नव्हे हें जरी खरें असलें तरी त्यामुळें, वॉशिंग्टन यांच्याच शब्दांत सांगायचें झाल्यास, अमेरिकेच्या उद्दिष्टावर 'धैर्य खच्ची करणारा' प्रतिकूल परिणाम झाला असता एवढें खास. तेव्हां, होवेला तोंड देणें हें वॉशिंग्टन यांचें कर्तव्यच होतें. आणि वॉशिंग्टनशीं प्रत्यक्ष सामना होणार होता, या दृष्टीनें होवेची ही मोहीमहि सार्थकीं लागणार होती. संख्याबलाच्या दृष्टीनें वॉशिंग्टन यांची बाजू डावी होती. होवेचें सैन्य पंधरा हजारांचें, तर वॉशिंग्टनचें सैन्य अकरा हजारांचें होतें. पण लढा कोठें द्यावयाचा, हें ठरविणें वॉशिंग्टन यांच्या हातीं होतें. वॉशिंग्टन यांनीं विलिमिंग्टनपासून कांहीं मैलांवर ब्रँडीवाईन ओढ्याच्या पल्याड आघाडी उभारली. ती सप्टेंबरची १० तारीख होती. वॉशिंग्टननीं उजव्या फळीचें नेतृत्व सलिव्हानकडे दिलें. लाँग बेटावरील पराभवाच्या वेळीं सलिव्हान युद्धकैदी झाला होता. नंतर झालेल्या युद्ध-कैद्यांच्या देवघेवींत तो परत स्वपक्षाकडे आला होता. आघाडीच्या मधल्या फळीचें नेतृत्व नाथानील ग्रीनकडे देण्यांत आलें होतें. डावी फळी लढविण्याची जबाबदारी पेन्सिल्व्हानियाच्या जुजबी फौजेकडे होती. ब्रॅन्डीवाईन ओढ्याला अनेक ठिकाणीं उतार होते; पण इतर दृष्टीनें तो नैसर्गिक तटबंदीसारखा उपयुक्त होता. विशेषतः अमेरिकन आघाडीच्या डाव्या फळीला त्याचा विशेष उपयोग झाला असता.

होवेची हल्ल्याची योजना ब्रुकलिनच्या चढाईच्या वेळच्या सारखीच होती. अमेरिकनांच्या मधल्या फळीवर कांहीं सैन्य सोडायचें, पण मुख्य हल्ला डाव्या किंवा उजव्या फळीवर चढवायचा, हेंच तें तंत्र होतें. या वेळीं त्यानें उजव्या फळीवर मुख्य हल्ला चढविण्याचें योजिलें होतें. होवे याचें हें तंत्र तसें ठराविक होतें. त्याचा अंदाज बांधण्याची तत्परता वॉशिंग्टन यांनीं दाखविली नाहीं किंवा त्या दृष्टीनें टेहळणी पथकाचीहि योजना त्यांनीं केली नाहीं. त्याचा परिणाम प्रतिकूल असा झाला. ता. ११ ला प्रत्यक्ष लढाईला तोंड लागलें तेव्हां कांहीं चकमकी झडल्या, पण त्यांतील एकहि निर्णायक ठरली नाहीं. कॉर्नवॉलिसला मात्र उजव्या फळीभोवतीं जाळें विणणें शक्य झालें. त्याच्या दहा हजार सैनिकांनीं सलिव्हानला बेसावध असतांना आणि तयारी करण्याला अवसर न देतांच कैचींत पकडलें आणि ती फळी डळमळीत करून टाकली. सलिव्हानच्या माघार घेणाऱ्या सैन्याच्या पिछाडीला दुसरी फळी म्हणून ग्रीनच्या नेतृत्वाखालीं ठरलेली फौज पाठवून वॉशिंग्टननीं वाइटांतून चांगलें काढण्याचा प्रयत्न केला. ग्रीनच्या नेतृत्वाखालील

फौजेनें कसून प्रतिकार केला आणि अंधार पडेपर्यंत आघाडी टिकवून धरली. पण, मधल्या फळींतील सेना उजव्या फळीकडे गेल्यामुळें ती दुबळी झाली होती. त्यामुळें होवेच्या दडपणाखालीं मधली आघाडी कोसळली. लढाई पार बारगळली. फटफटण्याच्या वेळेपर्यंत गोळीबार थंडावला. थकलेभागलेले सैनिक कसेबसे धडपडत माघार घेऊं लागले. रणांगणावर मृत आणि जखमी मिळून हजार सैनिकांना तसेच टाकून त्यांना माघार घ्यावी लागली.

हा पराभव, आवश्यक त्यापेक्षां मोठी किंमत देऊन पदरांत घ्यावा लागला. अर्थात् तो निर्णायक पराभव होता, असें मात्र खास म्हणतां आलें नसतें. 'वॉशिंग्टनचे सैनिक वेगानें पळाल्यामुळें शत्रूच्या हातीं युद्धकैदी फारच थोडे लागले,' अशी कुत्सित टीका दोषैकदृष्टीच्या माणसाला करतां येईल. पण त्याला चोख उत्तर असें कीं, पुनः दुसऱ्या दिवशीं सकाळीं व्यवस्थित संघटित होतां येईल इतक्याच लांब अंतरावर ते पळून गेले होते. आणि ग्रीनच्या नेतृत्वाखालील ज्या सैनिकांनीं आघाडी रोखून धरली त्यांनीं कामगिरी उत्कृष्ट बजावून आपलें पाणी दाखवून दिलें. या लढाईत ब्रिटिशांचे पांचशें सैनिक ठार व जखमी झाले. रीतसर युद्धांत ब्रिटिश सेनेला पराभूत करण्याइतकी अमेरिकन सेना समर्थ नसली तरी गनिमी युद्धांत ( आणि माघार घेण्यांत ) ती जितकी चपल होती, त्याचप्रमाणें खड्या फौजेप्रमाणें लढा देण्याचा धीमेपणाहि तिच्यांत होता हें सिद्ध झालें. लष्कराच्या संमिश्र घटकांची व्यवस्थित रचना करून लढाई करण्याचें तंत्र अगदीं आदर्शपणें अमेरिकन सेनेनें अद्याप आत्मसात् केलेलें नसलें, तरी सर्वविनाश टाळण्यापुरतें कौशल्य तिनें खासच दाखविलें होतें.

त्यानंतर पुनः एकदां लढाईतल्या त्याच त्या घटनांची पुनरावृत्ति झाली. अमेरिकेचें भवितव्य आणि स्वतःचा नांवलौकिक धोक्यांत आहे, असें दिसतांच वॉशिंग्टन यांची लढाऊ वृत्ति नेहमींच उचंबळून येत असे. या वेळीं पुनः त्यांचा हा विशेष गुण उसळून वर आला. होवेनें फिलाडेल्फियापर्यंत कूच केलें. कॉंग्रेसची कचेरी घाईघाईनें लँकॅस्टरला नेण्यांत आली व तिथून पेन्सिल्व्हानियांतील यॉर्क गांवीं नेण्यांत आली. वॉशिंग्टन यांनीं दुसऱ्यांदा लढा देण्याचा बेत आंखला, पण मुसळधार पाऊस सुरू झाल्यामुळें तो बेत रद्द करावा लागला. होवेनें शहरांत प्रवेश केला. वॉशिंग्टन यांनीं थोड्याच दिवसांनीं दहा मैलांवरील जर्मन टाउनपाशीं होवेशीं सामना दिला. या वेळीं लढाई झाली, पण ती गोंधळां-

तच संपली. या वेळचें वॉशिंग्टन यांचें जादा धाडस महागांत पडलें. त्यांच्या सैन्यांतील हजार सैनिक कामास आले. होवेची हानि मात्र त्याच्या निम्म्यानें झाली. या पराभवानंतर पुनः दुसऱ्या लढाईचा धोका पत्करण्याचा चंग वॉशिंग्टन यांनीं बांधला. पण या वेळीं होवेनेंच त्यांना साद दिली नाहीं. डिसेंबर सुरू झाला. डिसेंबरबरोबरच हिंवाळा आला. हिंवाळा म्हणजे ब्रिटिशांच्या गोटांत किरकोळ अस्वस्थतेचा काळ, तर देशभक्तांच्या गोटांत असंतोषाची खळबळ माजण्याचा काळ. होवे फिलाडेल्फियाच्या उबदार निवाऱ्याखालीं रहात होता, तर वॉशिंग्टनच्या सैनिकांना व्हॅली फोर्जमधील फाटक्या-तुटक्या तंबूंत मुक्काम ठोकून स्क्यूलकिलच्या परिसरांत वीस मैल आघाडीवर टेहळणी ठेवून दिवस कंठावे लागत होते.

तथापि देशभक्तांच्या बाजूला १७७७-१७७८ च्या हिंवाळ्याच्या कालावधींतला ताळेबंद पाहिला तर तो अगदींच कांहीं आंतबट्ट्याचा होता, असें म्हणतां येणार नाहीं. खर्चाच्या बाजूला होवेनें फिलाडेल्फिया काबीज केलें, ही मोठी घटना मांडलेली दिसते. तिच्या पोटांत ब्रँडीवाईन आणि जर्मनटाउन येथील पराभव आहेत. याउलट, वॉशिंग्टन यांचें सैन्य दुर्बल झालें होतें आणि थंडी, तुटपुंजा पुरवठा आणि पगार थकणें यांमुळें सैनिक तक्रार करीत असले तरी तें सैन्य अद्याप अस्तित्वांत होतें, ही गोष्ट जमेच्या बाजूला मांडलेली दिसते. प्रत्येक हिंवाळ्यांतच वॉशिंग्टन यांचें सैन्य रोडावत असे; पण त्याच कालावधींत ब्रिटिश सैन्य अगदीं निष्क्रिय असल्यामुळें ही उणीव भरून निघत असे. कॉंग्रेसदेखील रोडावली होती. यॉर्क येथील अडचणींचा तो परिणाम होता. कॉंग्रेसच्या बैठकींना कित्येकदां वीसपेक्षां देखील कमी सभासद उपस्थित असत. पण, तरीदेखील महत्त्वाची गोष्ट ही कीं, कॉंग्रेस अद्याप अस्तित्वांत होती. रोपट्याचा पुनः वृक्ष झाला आणि वृक्ष वठून गेला नाहीं हेंच विशेष. होवेच्या दृष्टीनें, मोहीम अपेशीच ठरली होती. फिलाडेल्फिया काबीज केलें, पण अंतिम विजय कांहीं पदरांत पडला नाहीं. त्याची अपेक्षा होती कीं, राजपक्षीय प्रजाजन आपल्या झेंड्याखालीं संघटित होतील. पण, पेन्सिल्व्हानियांतील लोक होवेला धान्यधुन्य व अन्य सामग्री विकत द्यायला तयार असले आणि ही सामग्री सोन्याच्या मोबदल्यांत द्यायला तयार असले ( राष्ट्रीय कागदी चलन मात्र त्यांना नको होतें ), तरी प्रत्यक्ष होवेच्या सैन्यांत हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेच लोक भरती झाले. नाउमेद झालेल्या होवेनें सेनापतिपदाचा राजीनामा सादर केला.

यापेक्षां अमेरिकन बाजूच्या जमेला अधिक भरीव घटना मांडली गेली ती म्हणजे उत्तरविभागीय सैन्यानें बर्गोयने या ब्रिटिश सेनानीवर दणदणीत विजय संपादिला होता. जुलैच्या प्रारंभीं बर्गोयने यानें सुरू केलेली चढाई, प्रारंभींच टिकांडेरोगा किल्ला त्यानें जिंकल्यामुळें, अमेरिकनांच्या दृष्टीनें प्रारंभीं मोठी अशुभसूचक वाटली, पण त्यानंतर त्याला अत्यंत मंदगतीनें आणि अत्यंत कष्टपूर्वकच कूच करावें लागत होतें. शिवाय, दुसऱ्या बाजूनें मोहॉक आघाडीवर सुरू झालेली चढाई प्रारंभींच्या किरकोळ यशानंतर पार बारगळली. ऑगस्टच्या मध्यास बर्गोयनेच्या सैन्याचा कांहीं भाग बेनिंग्टन (दक्षिण व्हरमॉंट) येथील देशभक्तांच्या शिबंदीनें नेस्तनाबूद केला. बर्गोयनेला सामग्रीची चणचण फारच भासत होती. अल्बनीच्या रोखानें दक्षिणेकडे घुसण्याखेरीज त्याच्यापुढें दुसरा पर्यायच नव्हता. न्यूयॉर्क शहरांतून कांहींहि सैन्य आपल्याला येऊन मिळणार नाहीं, हें कळूनदेखील त्याला पुढें रेटीत जाणें भागच होतें. त्याला साराटोगाच्या दक्षिणेस थोड्याच मैलांवर अमेरिकेच्या उत्तर सेनेनें थोपवून धरलें. हें सैन्य प्रथम स्क्यूलरच्या आधिपत्याखालीं होतें, आतां त्याचें सेनापतित्व होरेशिओ गेट्सकडे होतें. सप्टेंबरमध्यें आणि पुनः ऑक्टोबरच्या प्रारंभीं बर्गोयनेनें शत्रूची फळी फोडून पुढें घुसण्याचा प्रयत्न केला, पण तो निष्फळ ठरला. पुढील पराभवाच्या संकटानें तिकडे क्लिंटनहि चिंतातुर झाला होता. अखेर जेवढे सैनिक सोबत घेणें शक्य होतें तेवढे घेऊन तो हडसन नदीच्या मार्गानें बर्गोयनेच्या कुमकेला निघाला. अमेरिकनांकडून होणारा अटकाव दूर सारीत तो कसाबसा ऑक्टोबरच्या मध्यापर्यंत इसोपसपर्यंत (किंग्जटन) आला. तरी त्याच्यांत आणि बर्गोयने याच्यांत ८० मैलांचें अंतर होतें. पण, बर्गोयने जितका बेदरकार होता, तितकाच क्लिंटन सावधगिरी बाळगणारा होता. शिवाय, फिलाडेल्फिया काबीज करण्याच्या कल्पनेनें पछाडलेल्या होवेनें क्लिंटनपाशीं न्यूयॉर्कमध्यें फारशी खडी फौज ठेवलेली नसल्यामुळें आधीं बर्गोयनेच्या कुमकेला जाण्याला क्लिंटन कचरत होता. आतां मदतीला तो आला पण फार उशीर झाला होता व त्याच्यापाशीं सैन्यहि कमीच होतें. क्लिंटनच्या आघाडीच्या तुकड्या इसोपस येथें पोहोंचल्या. त्याच्या दुसऱ्याच दिवशीं, साराटोगा येथें अडकून पडलेल्या बर्गोयने यानें शरणागति पत्करून उरलेल्या सैन्यासह तो देशभक्तांच्या सेनेच्या स्वाधीन झाला. त्याचे फक्त पांच हजार सातशें सैनिक उरले होते. ब्रिटिश सैन्याच्या दृष्टीनें हा हाबका भयंकर होता. या घटनेनें खळबळ उडून

गेली. क्लिंटन न्यूयॉर्ककडे परतला आणि हिंवाळा संपेपर्यंत तेथेंच राहिला. होवे, सावधपणानेंच पण राजीनामा मंजूर होण्याची वाट बघत फिलाडेल्फियांत स्वस्थ बसून राहिला. १७७८ च्या मेमध्यें त्याचा राजीनामा मंजूर झाला. सरसेनापतित्वाचीं सूत्रें त्यानें क्लिंटनच्या हातीं सोंपविलीं आणि तो स्वदेशीं रवाना झाला. गेज गेला, बर्गोयने कैदी झाला, होवेहि हात टेकून परतला. पण वॉशिंग्टन मात्र सर्वांना पुरून अद्याप उरले होते.

याचा परिणाम युरोपवर झाल्याशिवाय राहिला नाहीं. वसाहतींचें स्वातंत्र्य मान्य करायला ब्रिटन अद्याप तयार नसलें तरी लंडनमध्यें लॉर्ड नॉर्थ यांनीं शांततेसाठीं शिष्टाई करण्याकरितां शांतिदूत पाठविण्याची तयारी सुरू केली. पॅरिसमध्येंहि जोरांत हालचाली चालू होत्या. सिलास डीन आणि बेंजामिन फ्रॅंकलिन हे अमेरिकेचे प्रतिनिधि पॅरिसला ठाण मांडून बसले होते आणि त्यांनीं फ्रेंच सरकारशीं संधान बांधल्यामुळें आतांपर्यंत फ्रान्सकडून वसाहतींना कांहीं मदत मिळालीच होती. या मदतीचा एक भाग म्हणजे वॉशिंग्टन यांच्या मदतीसाठीं कांहीं लष्करी अधिकारी पाठविण्यांत आले होते. कांहीं स्वेच्छेनें अमेरिकन सेनेंत कामगिरी बजावण्यासाठीं गेले होते. पण, यांपैकीं बहुसंख्य अधिकाऱ्यांना उच्च हुद्देच हवे असल्यामुळें त्यांच्या उपयोगापेक्षां त्यांच्याकडून वॉशिंग्टन यांच्यापुढील अडचणींत भरच पडत होती. तथापि कांहीं अधिकाऱ्यांकडून मात्र अमेरिकेच्या ध्येयाला पोषक अशी अमोल कामगिरी पार पडली. अशा अधिकाऱ्यांमध्यें मुख्यतः, थादेऊ कॉस्क्यूस्को, उत्साही तरुण मार्क्विस ऑफ् लफायेत, बॅरन डी काल्ब, 'बॅरन' व्हॉन स्ट्यूबे यांचीं नांवें ठळकपणें घ्यावीं लागतील. स्ट्यूबेची उमरावकी बनावट असेल, पण तो खराखुरा योद्धा होता हें खास. साराटोगाच्या विजयाची बातमी येतांच फ्रान्सनें अधिक मदत करण्याचा निर्धार केला. हा निर्धार अर्थात् भावनात्मक पातळीवरचा नव्हता. वसाहतींच्या धडाडीचें आणि वॉशिंग्टन यांच्या दृढ निर्धाराचें फ्रान्सला कौतुक वाटत होतें हें खरें, पण फ्रान्सचा निर्णय काटेकोर व्यवहारी दृष्टिकोनावर आधारलेला होता. अमेरिकेचें पारडें जड होत आहे, हें स्पष्ट दिसत होतें. पण सर्वांत ब्रिटनचें सामर्थ्य खच्ची करण्याचा मोका बघूनच फ्रान्स अधिक मदत करायला तयार झालें. अनियंत्रित राजेशाहीशीं लढा करणाऱ्या प्रजासत्ताकाला साह्य करण्याला सरसावलें याचें कारण हें होतें. १७७८ च्या फेब्रुआरीच्या अखेरीस फ्रॅंकलिन

यांनीं कळविलें, "अत्यंत निष्ठावंत ख्रिश्चन असलेल्या राजानें युनायटेड स्टेट्सशीं समान उद्दिष्टासाठीं सहकार्य करायचें मान्य केलें आहे... आणि युनायटेड स्टेट्सचें स्वातंत्र्य, सार्वभौमत्व अबाधित आणि अनिर्बंध असल्याची हमी त्यानें दिली आहे." उन्हाळ्याच्या मध्यासच फ्रान्सनें ब्रिटनविरुद्ध युद्धाची औपचारिक घोषणा केली. त्यानंतर एक वर्षानें स्पेननें फ्रान्सच्या पावलावर पाऊल ठेवलें. मात्र फ्रान्सप्रमाणें युनायटेड स्टेट्सला स्वतंत्र राष्ट्र म्हणून मान्यता देण्याची मात्र स्पेनची तयारी नव्हती.

वरील कराराची बातमी वॉशिंग्टन यांना एप्रिलमध्यें समजली. "इतका अंतःकरण भरून टाकणारा आनंद यापूर्वी कोणत्याच घटनेनें वाटलेला नाहीं," असें वॉशिंग्टन यांनीं काँग्रेसला लिहिलेल्या पत्रांत म्हटलें होतें. आणि डोक्यावरचें प्रचंड ओझें उतरल्यासारखी सुटकेची भावना त्यांच्याइतकी कोणालाच वाटली नसेल. पण, हा करार तयार होत होता तेव्हांचा कांहीं आठवड्यांचा काळ वॉशिंग्टन यांच्या उभ्या जीवनांतला सर्वांत वाईट कालखंड म्हणतां येईल. व्हॅली फोर्ज येथील लाकडें रचून उभारलेल्या झोपडींत राहावें लागत असल्यामुळें होणाऱ्या शारीरिक हालअपेष्टांच्या जोडीला अत्यंत मानसिक यातना त्या कालावधींत वॉशिंग्टन यांना सोसाव्या लागल्या. कारण वॉशिंग्टन यांना सरसेनापतिपदावरून काढून तेथें होरेशिओ गेट्स् यांची स्थापना करण्याचा 'कॉनवे कॅबाल' नांवाचा जो तथाकथित कट झाल्याचें सांगितलें जातें, त्या कटाचा हा कालखंड होता.

या कटाची खरीखुरी माहिती आपल्याला बहुधा कधींच उपलब्ध होणार नाहीं. वॉशिंग्टन यांच्या दृष्टीनें या कटाचें स्वरूप पुढीलप्रमाणें होतें : लष्करांतील कांहीं असंतुष्ट लोक आणि काँग्रेसमधील कांहीं सदस्य यांनीं एकत्र येऊन वॉशिंग्टन यांची अप्रतिष्ठा करण्याचा गुप्त बेत रचला होता. या कटांतले लष्करी गोटांतले म्होरके म्हणजे गेट्स्, मिफ्लिन आणि थॉमस कॉनवे हे होते असें दिसतें. कॉनवे हा पूर्वी फ्रेंचांच्या नोकरींत असलेला वसाहतीचा एक आयरिश नागरिक होय. या कटाची सर्वश्रुत कहाणी आहे ती अशी कीं, हा कट वॉशिंग्टन यांच्या कांहीं निष्ठावंत अनुयायांनीं उघडकीस आणला. वॉशिंग्टन यांचा कट्टर चहाता आणि मित्र बनलेला फ्रेंच सेनाधिकारी लफायेत हाहि हा कट उघडकीस आणणाऱ्यांत होता. कट उघडकीस आल्यावर वॉशिंग्टन यांनीं पुरावाच पुढें ठेवून गेट्सला जाब विचारला. त्यामुळें कटवाले इतके वचकले कीं, त्यांनीं अखेर आपलें

कृष्णकारस्थान रद्दच केलें. तथापि या कहाणीसंबंधांत बर्नहार्ड नॉलेन्बर्ग व अन्य आधुनिक विद्वान् यांनीं संशय व्यक्त केलेला आहे. त्यांचें म्हणणें असें कीं, गेट्सनें बर्गोयनेवर विजय मिळवून त्याचा धुव्वा उडविलेला असल्यामुळें त्याच्या-वर त्या वेळीं स्तुतीचा वर्षाव व्हावा हें स्वाभाविकच होतें व त्या प्रमाणांत वॉशिंग्टन यांची प्रशंसा कमी व्हावी हेंहि स्वाभाविक होतें. कारण, होवेकडून वॉशिंग्टन यांचा त्याच वेळीं पाडाव झालेला होता. कदाचित् गेट्स् तितक्या स्तुतीला पात्र नसेल आणि वॉशिंग्टनना तितकाच दोष दिला जावा हेंहि योग्य नसेल. पण, समाजाकडून, विशेषतः युद्धकाळांत स्तुति-निंदेचा वर्षाव अशा रीतीनेंच नेहमीं होत असतो. सुदैवी सेनानी वरच्या हुद्दयावर चढविले जातात. दुर्दैवी सेनानी बाजूला सारले जातात. वॉशिंग्टन यांच्याबद्दल कुरकुर करणें कृतघ्न-पणाचें असेल असें मानूं या, पण त्यांच्या कांहीं सहकाऱ्यांनीं त्यांच्यांतील उणीवा व दोष यांची चर्चा खाजगी पत्रांमधून करणें इतकें लांछनास्पद आहे कीं काय? वॉशिंग्टन यांच्यापेक्षां गेट्स् अधिक चांगले आहेत, असें मत कॉनवेनें गेट्सना लिहिलेल्या पत्रांत व्यक्त केलें, याचा अर्थ तो स्वतःचा स्वार्थ डोळ्यांपुढें ठेवणारा होता, असा असेल किंवा असें लिहिण्यांत त्याचा अप्रामाणिकपणाहि असेल. पण म्हणून काय त्याला कोणीं भयंकर दुष्ट प्राणी समजावयाचें? स्वतः वॉशिंग्टन यांना तसें वाटत होतें असें दिसतें. आणि त्यांच्या बहुतेक चरित्रकारांचें असेंच मत आहे. असें करण्यांत या चरित्रकारांनीं अंधभक्तिच दाखविलेली आहे. आणि म्हणून मग, त्यांनीं या संबंधांतल्या साऱ्या कल्पना शंभर टक्के स्वीकारल्या आहेत. गेट्स् प्रभृतींचें वर्तन देशद्रोहीपणाचें होतें, गेट्स् नालायक होता, तसाच निग्रहीनहि होता, कॉंग्रेसचे बहुतेक सभासद मूर्ख आणि तत्त्वहीन लबाड माणसें होतीं, हे समजहि या चरित्रकारांनीं शंभर टक्के ग्राह्य धरले आहेत.

वॉशिंग्टन यांचे मित्र तर, प्रत्यक्ष कट होताच अशीच भाषा ठासून वापरीत असत. "कट याचा जो विस्तृत अर्थ आहे त्या अर्थानें कट होता याबद्दल मला तिळमात्र शंका नाहीं," असें कर्नल अलेक्झांडर हॅमिल्टन यांनीं म्हटलें होतें. कॉंग्रेसचे कांहीं सभासद हीन वृत्तीचे आणि बेजबाबदार होते हें अर्थात् खरेंच. "व्हॅटिकनप्रमाणेंच या सभागृहांतहि कारस्थानांचा बुजबुजाट आहे," असे उद्गार जॉन जे यांनीं काढलेले होते. आणि वॉशिंग्टन यांच्या हाताखालच्या जुन्या सेनाधिकाऱ्यांमध्यें एकमेकांच्या निंदानालस्तीचा बुजबुजाट झालेला होता

हेंहि खरें. पण जिथें सन्मान आणि बढती यांसाठीं स्पर्धा असते, तिथें असा प्रकार नेहमींच आढळतो. ब्रिटिश सेनानी क्लिंटन, होवे आणि बर्गोयने यांच्यांत परस्परांत कशी कटु भावना वसत होती, याची येथें आठवण केल्यास हें पटेल. स्वतः वॉशिंग्टन हे सरसेनापति असण्याऐवजीं इतर कोणा मेजर जनरल-सारखे खालचे अधिकारी असते तर ते सुद्धां मत्सरभावनेपासून अगदीं अलिप्त राहिले असते काय? या सर्व गोष्टी विचारांत घेतल्या तर, त्या तथाकथित कटा-बाबतची त्यांची वर्तणूक प्रतिष्ठितपणाला सोडून नव्हती आणि त्यांच्या वागण्याचा परिणाम झाला हें खरें असलें तरी, त्यांना त्या कटामुळें आलेला संताप अतिरिक्त होता, असेंच म्हणावें लागेल. कित्येक महिनेपर्यंत गेट्स्वरील त्यांचा राग धुमसतच राहिला होता. आणि त्या दोघांना अगदीं एकमेकांपासून दूर ठेवण्यांत कॉंग्रेसनें खरोखरच शहाणपणा दाखविला होता.

**मॉनमाउथ ते यॉर्कटाउन : १७७८–१७८१**

कट झालेला असो वा नसो, पण तो प्रश्न अधिक निकडीच्या प्रश्नांमुळें मागें पडला. १७७८च्या जूनमध्यें क्लिंटननें वॉशिंग्टन यांना आश्चर्याचा धक्का दिला. त्यानें आपली लालडगलेवाली सेना फिलाडेल्फियांतून बाहेर काढली. पण ती लढाईसाठीं नव्हे तर न्यू जर्सी प्रांत ओलांडून ईशान्येस नेण्यासाठीं! क्लिंटन कांहीं वेडपट नव्हता. त्याला होवेची कल्पना कधींच पसंत पडली नव्हती. इंग्लंडमधून फारच थोडी कुमक पाठविण्याचें आश्वासन मिळालेलें होतें; उलट फ्रेंच आरमार अमेरिकेकडे यावयास निघालें आहे, अशी बातमी होती. म्हणूनच आपली फौज न्यूयॉर्क शहरांत एकत्रित करण्याचा मार्ग त्यानें अधिक पसंत केला. दोन वर्षांपूर्वी बोस्टनमधून जशी माघार घेण्यांत आली होती, त्याप्रमाणेंच फिलाडेल्फियांतून माघार घेऊन तें शहर अमेरिकन फौजांना कबजा घेण्यासाठीं मोकळें करण्यांत आलें होतें. तें शहर नुसतें खालीं केलें ही घटनाच म्हणजे युनायटेड स्टेट्सच्या दृष्टीनें एक नैतिक विजय होता. वॉशिंग्टन यांनीं व्हॅली फोर्ज येथील छावणी उठवून क्लिंटनच्या पाठलागावर निघण्याचें ठरविलें. त्याला पुरेपूर अद्दल घडविण्याच्या निर्धारानें ते बाहेर पडले.

ता. २८ जूनच्या सकाळीं त्यांना संधि मिळाली. क्लिंटनच्या सेनेच्या पिछाडी राखणाऱ्या तुकड्या मॉनमाउथ कोर्ट हाउसपासून पुढें सरकत होत्या. तो रविवार

होता. अगदीं भाजून काढणारें कडक ऊन पडलें होतें. भयंकर उष्मा होत होता. वॉशिंग्टन यांच्या आघाडीच्या तुकड्यांना आदेश देण्यांत आला होता कीं, ब्रिटिशांना गांठून त्यांच्याशीं दोन हात करा! ही कामगिरी वॉशिंग्टन यांनीं चार्ल्स लीवर सोपविली होती. चार्ल्स ली १७७६ च्या डिसेंबरमध्यें युद्धकैदी म्हणून ब्रिटिशांच्या हातीं सांपडला होता; कैद्यांच्या देवघेवींत नुकताच तो सुटून परत आलेला होता. दोन्ही सैन्यें तशीं तुल्यबल होतीं. पण डावपेंचांच्या दृष्टीनें वॉशिंग्टन यांना परिस्थिति अनुकूल होती. क्लिंटनचें सैन्य कूच करीत होतें, त्यामुळें मागें वळून लढा देण्याच्या दृष्टीनें त्याला परिस्थिति प्रतिकूल होती. पण, लहरी वृत्तीच्या लीला वॉशिंग्टनची योजना नापसंत होती असें दिसतें. तो मनापासून चालून गेलाच नाहीं आणि क्लिंटननें पिछाडीच्या संरक्षक तुकड्यांना कुमक देतांच फारसें युद्धकौशल्य न दाखवितां ली परत फिरला. या प्रकारानें वॉशिंग्टन घाबरल्यासारखे झाले. त्यांना चीडहि आली. लीच्या माघार घेणाऱ्या सैन्याला थोपवून त्यांनीं आघाडी नीट सांधली. तथापि नंतर दोन्ही सैन्यांत सर्वार्थानें लढाई जुंपलीच नाहीं. उभय बाजूंना प्रत्येकीं साडेतीनशें सैनिक जखमी व ठार झाले. क्लिंटनचें सैन्य न्यूयॉर्ककडे कूच करीतच राहिलें. सँडी हूकला जहाजांवर चढून उरलेला प्रवास त्या सैन्यानें समुद्रमार्गें संपविला. वॉशिंग्टनच्या हातची संधि गमावली गेली. त्यानंतर लीवर लष्करी कोर्टांत खटला चालला तरी त्यामुळें वस्तुस्थितीची कटुता कांहीं नष्ट झाली नाहीं. लीवर वरिष्ठांचा आज्ञाभंग करण्याचा आरोप शाबीत होऊन त्याला सेनाधिकारीपदावरून पदच्युत करण्यांत आलें होतें. तथापि मॉनमाउथच्या लढाईबद्दल कोणी कांहीं म्हणो, पण त्यामुळें वॉशिंग्टन यांच्या चढाईखोर लढाऊ वृत्तीचा आणखी एक पुरावा मिळाला हें खास. ट्रेंटन किंवा जर्मनटाउन येथील प्रसंगीं ज्याप्रमाणें त्यांचें वैयक्तिक धैर्य तेजस्वीपणानें प्रकट झालें, तसेंच या वेळींहि पुनः चकाकून दिसलें, इतकाच या घटनेचा अर्थ नाहीं. आपल्या युद्धमंडळाच्या सल्ल्याविरुद्ध त्यांनीं एक मोठी लढाई घडवून आणण्याचा पवित्रा टाकला होता, हें या घटनेचें वैशिष्ट्य होय. असें करण्यांत त्यांचा उद्देश व्यावहारिक असेल. न्यू जर्सीच्या तुजबी फौजेंतील सैनिक शेत-कापणीच्या कामासाठीं सैन्य सोडून जातील, असा त्यांना संशय वाटत होता. आणि नंतर त्या सैनिकांनीं तसें केलें देखील. किंवा अमेरिकेच्या पक्षाचें मनोधैर्य टिकून रहावें म्हणून कांहीं तरी डोळे दिपवणारी कृति करण्याची आवश्यकता त्यांना

वाटली असावी. कारण कांहीं असो, पण आपल्या सैन्याला प्रत्यक्ष रीतसर लढाईत गुंतविण्याची उत्कंठा त्यांना होती, हेंच या घटनेचें वैशिष्ट्य होय.

सिंहावलोकनात्मक दृष्टीनें आज बघतांना आपल्याला कळूं शकतें कीं, फ्रान्सशीं झालेला तह म्हणजे क्रांतीला निर्णायक वळण देणारी घटना होती. पुनः एकदां ब्रिटनवर जुन्या शत्रूशीं सामना करण्याचा प्रसंग आला होता. शिवाय स्पेनहि ब्रिटनविरुद्ध युद्धात उतरल्यामुळें ब्रिटनच्या आरमारी वर्चस्वाला आव्हान निर्माण झालें होतें. १७७८ सालीं कॉम्टे द् इस्टेन याच्या नेतृत्वाखालीं अमेरिकेकडे रवाना झालेल्या फ्रेंच आरमाराला अडविणें ब्रिटिशांना शक्य झालें नाहीं. शिवाय जगाच्या पाठीवर इतरत्रहि ब्रिटनला अडचणींना तोंड द्यावें लागतच होतें. जिब्राल्टरला वेढा पडल्यामुळें भूमध्यसमुद्रांत, वेस्ट इंडीजमध्यें, खूप दूर हिंदी महासागरांत, अशा अनेक ठिकाणीं संकटांना तोंड देणें ब्रिटनला भाग पडलें होतें. फ्रान्स व स्पेन यांच्याकडून ब्रिटनवर आक्रमण होण्याची शक्यता कधींच प्रत्यक्षांत उतरली नाहीं हें खरें, पण तोहि धोका त्या वेळीं होताच. १७८० च्या डिसेंबरमध्यें ब्रिटनच्या शत्रुपक्षांत हॉलंडची भर पडली. आणि त्याच वर्षी रशियाच्या पुढारीपणाखालीं इतर अनेक युरोपियन राष्ट्रांनीं तटस्थांचा संघ स्थापून एक प्रकारें ब्रिटिशविरोधी धोरणच अवलंबिलें.

पुनः सिंहावलोकनात्मक दृष्टीनें पाहिल्यास व्हॅली फोर्जमध्यें आश्रय घेण्याचा प्रसंग म्हणजे अमेरिकन युद्धांत अमेरिकेचें पारडें जास्तींत जास्त खालीं जाण्याची मर्यादा होय, असें दिसून येईल. त्यानंतरच्या काळांत वॉशिंग्टन यांचें लष्करी नायक म्हणून असलेलें अग्रस्थान निर्विवाद होतें. वॉशिंग्टनना पुरेपूर नेस्तनाबूद करण्याची तिसरी व अंतिम सुवर्णसंधि होवेला ब्रँडीवाईन व जर्मनटाउन या आघाड्यांवरच मिळालेली होती. कदाचित् व्हॅली फोर्जच्या वॉशिंग्टन यांच्या तळावर हिंवाळ्यांत एकदम झडपी हल्ला चढवून ही संधि होवेला मिळाली असती. पण किरकोळ यशावर खूप राहून होवे स्वस्थ बसल्यावर वॉशिंग्टन यांना किंवा त्यांनीं ज्या ध्येयाचा झेंडा उंच धरला होता, त्या ध्येयाला जमीनदोस्त करण्याची संधि पुनः केव्हांच मिळणार नव्हती. आणि नंतर, फ्रेंचांकडून दिलेला शब्द पाळला गेला तर युनायटेड स्टेट्सला अंतिम विजय आणि स्वातंत्र्य मिळण्याचा क्षण मुळींच दूर नव्हता. यशाचे किरण क्षितिजाआडून आपल्या अस्तित्वाची जाणीव देऊं लागले होते.

व्हॅली फोर्जनंतर वॉशिंग्टन यांचा मार्ग निर्वेध राहिला असता तर उरलेली कथा अगदीं साधी नि सरळ उलगडत गेली असती. पण आज मागें वळून पाहतांना आशावादी सुरांत बोलणें आपल्याला सुलभ जात असलें तरी प्रत्यक्ष त्या वेळीं वॉशिंग्टननीं मॉनमाउथपासून कूच करून, न्यूयॉर्कला वळसा घालून जाऊन व्हाइट प्लेन्सवर मोर्चे बांधले तेव्हां भौगोलिक दृष्ट्या बघतां त्यांचें सैन्य दोन वर्षांपूर्वी होतें तिथेंच होतें असें म्हणावें लागतें. आठवड्यांमागून आठवडे, महिन्यांमागून महिने, वर्षांमागून वर्षें रेंगाळत रखडत व्यतीत होत होतीं. पुढील मार्ग न संपणारा असल्यास, क्षितिजें दिसूं लागल्याची भाषा समाधान देऊं शकत नाहीं. त्यांची पत्नी मार्था ही दर हिंवाळ्यातले कांहीं दिवस त्यांच्या सहवासांत घालवूं शकत होती. पण, माउंट व्हरनॉन मात्र त्यांना किती दूर वाटत असेल? त्यांचा भाऊ लुंड वॉशिंग्टन हा त्या वेळीं त्यांच्या मालमत्तेची व्यवस्था बघत होता. कित्येकदां माउंट व्हरनॉनचा विचार त्यांच्या मनाची पकड घेत असे. आणि म्हणूनच घरचा विचार करण्याची वेळ नव्हे, अशा क्षणींहि आपल्या कामाचे विचार दूर सारून ते भावाला घरच्या बाबींबद्दल पत्रें लिहितांना आढळतात. शेतीचा एखादा प्रयोग करून बघण्याच्या सूचना, घरांत काय काय घ्यावयास पाहिजे याच्या याद्या त्यांच्या पत्रांतून दिसतात. "यंदा किती कोकरें जन्माला आलीं?" "तेल आणि रंग मिळविण्याची व्यवस्था करूं शकलास का?" "कुरणासाठीं आणखी जमीन मिळविण्याचा प्रयत्न केलास का?" असले सवाल त्यांच्या त्या वेळच्या – म्हणजे लष्करी तळावरून लिहिलेल्या पत्रांतून केलेले आढळतात. "स्वतःच्या शेतवाडीवरील द्राक्षलतांच्या आणि अंजिरांच्या झाडांच्या छायेखालीं आराम करण्याचें स्वप्न" त्यांनीं आपल्या पत्रांतून कितीदां उल्लेखिलेलें आहे. जणूं "स्वतःच्या द्राक्षलतांच्या नि अंजिरांच्या झाडांच्या छायेंत आराम करणें" हा बायबलमधील वाक्प्रयोग म्हणजे जीवनांतील समाधानाचें सर्व मारच होतें त्यांच्या दृष्टीनें!

पण, त्या स्वप्नाच्या अगदीं उलट स्थिति तत्कालीन परिस्थितींत त्यांच्या वांट्याला येत होती. मनःशांतीचा अंशहि त्यांना उपभोगायला मिळत नव्हता. फ्रेंचांशीं तह झाल्याची बातमी मोठी उल्हसित करणारी होती. पण मदतीचा प्रत्यक्ष पहिला प्रयोग जो झाला, तो मात्र निराशा करणारा होता. द-इस्टेनचें आरमार १७७८ च्या जुलैंत रीतसर येऊन दाखल झालें. न्यूयॉर्कवर हल्ला चढविणें

निकट असल्यामुळें ऱ्होड बेटावरील ब्रिटिश शिबंदीवर हल्ला करण्यासाठीं सलिव्हानच्या नेतृत्वाखालील अमेरिकन सैन्य आणि आलेलें फ्रेंच आरमार यांनीं सहकार्य करण्याची योजना वॉशिंग्टन यांनीं ठरविली; पण फ्रेंच आरमाराच्या तोंडावर ब्रिटिश आरमार चालून गेल्यामुळें द-इस्टेनला माघार घेऊन वेस्ट इंडीज गांठावें लागलें. आरमाराचें पाठबळ नसल्यामुळें सलिव्हानला ब्रिटिश सैन्यावर मात करण्याच्या कामीं अपयश आलें. अमेरिका-फ्रान्स तहाच्या अंमल-बजावणीचा हा प्रारंभ कांहीं शुभसूचक वाटण्यासारखा नव्हता. संयुक्तपणें युद्ध चालविण्याच्या तंत्रामुळें वॉशिंग्टन यांच्यापुढें नव्याच समस्या उभ्या राहिल्या होत्या आणि त्या समस्यांची उकल करण्यासाठीं त्यांना सारी कल्पकता व चतुराई पणास लावणें भाग होतें. फ्रेंच आरमार हें उसनवारीच्या तत्त्वावर मदतीला मिळालेलें होतें. त्याच्या मदतीनें व सहकार्यानें लढाईची योजना फार आधीं-पासून निश्चित करणें अत्यंत कठीण होतें. डावपेचविषयक निर्णय घेतांना आतां केवळ कॅांग्रेसचाच विचार घेऊन भागणार नव्हतें. तर फ्रेंच मंत्रिमंडळ आणि अमेरिकेंतील फ्रेन्च सेनानी यांच्याशींहि सल्लामसलत करणें आवश्यक होतें.

आणि खरोखरच वॉशिंग्टन यांना आणखी एक अशी भीति वाटूं लागली कीं, फ्रेंचांची मदत मिळणार, असें दिसतांच खुद्द आपल्याच देशबांधवांकडून प्रयत्नांत घातक ढिलाई होऊं लागणार तर नाहीं ना? अमेरिकन लोकांनींच अनास्था आणि कार्यक्षमतेचा अभाव दाखविणें ही गोष्ट, क्लिंटनच्या ब्रिटिश फौजेइतकीच शत्रुतुल्य आणि विघातक ठरणारी होती. किंवा वॉशिंग्टन यांना तरी तसें वाटत होतें प्रत्यक्ष लढण्यापेक्षां वॉशिंग्टन यांना कारभारविषयक प्रश्नांतच फार लक्ष घालावें लागत होतें. त्यांच्या पत्रव्यवहाराचा व्याप इतका होता कीं, कांहीं वेळां पत्रें तयार करण्यासाठीं त्यांना अनेक सेक्रेटरी कामाला जुंपावे लागत असत. आणि बहुतेक पत्रांचे विषय ठरलेले असत. अन्नसामग्री, शस्त्रास्त्रें, दारूगोळा, कपडे, पांघरुणें, घोडे यांचा पुरवठा; पगार बहुधा थकलेले असत, त्यासाठीं पैशाची वारंवार मागणी; सैन्यभरती; बढत्या देणें वा बढत्या नाकारणें; गुन्हे-गारांना शिक्षा; कामगिरी बजावणारांना बक्षिसें, जुजबी फौजेची मागणी, या व अशाच अनेक भानगडी असत. वॉशिंग्टन यांना वाटत असे कीं, जर कॅांग्रेस, संस्थानें व व्यक्तिशः अमेरिकन नागरिक कंबर कसून कार्याला नेट लावतील, तर आपल्याला करावा लागणारा हा सारा उपद्व्याप करण्यांत आपला वेळ जाणार

नाहीं. वॉशिंग्टन फार तक्रारी करीत असतील आणि सामग्रीच्या पुरवठ्याची चणचण होती त्यापेक्षां वाढवून सांगत असतील, तर हें शक्य आहे. पण तसें करणें व्यवहारचतुर माणसासारखेंच होतें. आपण मागणी करूं तितकें पदरांत पडत नसतें, म्हणून गरज असेल त्यापेक्षां जास्त मागावें, असें धोरण व्यवहारचतुर पुरुष ठेवतो-तसें त्यांचें धोरण असण्याची शक्यता आहे. तथापि १७८१ च्या एप्रिल-मध्यें जेव्हां, "आमच्या सहनशक्तीची सीमा संपत आली आहे," असा इशारा त्यांनीं दिला, तेव्हां तें विधान मुळींच अतिशयोक्तीचें नव्हतें. फोर्ज व्हॅलीमध्यें काढलेल्या हिंवाळ्यापेक्षांहि १७७८-१७७९ चा व १७७९ १७८० चा असे दोन्ही हिंवाळे जास्त आणीबाणीचे गेले. त्या वेळीं मध्यवर्ती सेनेच्या कांहीं सैनिकांनीं थोड्या प्रमाणावर बंडें करण्याचेहि प्रकार झाले होते. १७८१ च्या जानेवारींत, दक्षिण भागांतील परिस्थितीबद्दल नाथानील ग्रीन यानेंहि, "या सैन्याला जर अधिक चांगला पुरवठा झाला नाहीं तर देश ( म्हणजे दक्षिणेकडील प्रदेश ) कायमचा गमावण्याचा प्रसंग आल्यावांचून राहणार नाहीं," या शब्दांत भविष्यसूचक इशारा दिला होता.

ब्रिटिश आणि त्यांना पाठिंबा देणारे अमेरिकेंतील लोक यांच्याविषयीं तीव्र कटुता वॉशिंग्टन यांच्या मनांत निर्माण झाली होती. आणि तसें कां झालें, हें आपण समजूं शकतों. खरोखर निष्ठावान् कोणाला म्हणायचें? क्लिंटन आणि वॉशिंग्टन या दोघांचीं उत्तरें परस्परविरुद्ध होतीं आणि त्यांच्या त्यांच्या दृष्टीनें प्रत्येक उत्तर योग्यच होतें. क्लिंटनला राजपक्षीय हे देशभक्त वाटत, तर वॉशिंग्टनना तेच लोक देशद्रोही वाटत असत. वॉशिंग्टन यांची गुप्त संघटना चांगलीच तयार झालेली होती. आणि या यंत्रणेचें कार्य सनदशीर आहे, असेंच त्यांना वाटणें स्वाभाविक होतें. पण क्लिंटनतर्फे होणारी हेरगिरी म्हणजे नीच कारस्थानी चाळे, असें त्यांना वाटे. कांहीं राजनिष्ठ लोकांच्या सैनिक तुकड्या क्लिंटनला खूप उपयुक्त ठरल्या तरी त्याला टोरीपक्षीयांकडून पुरेसा पाठिंबा मिळत नाहीं, याबद्दल निराशा वाटे, तर मनांतून राजनिष्ठ असलेल्या लोकांची वॉशिंग्टन यांना उबग वाटे. त्यांना वाटे, देशद्रोही वृत्तीचा बुजबुजाट झाला आहे. चार्ल्स ली हा युद्धकैदी असतांना त्याला ब्रिटिशांनीं आपल्या बाजूला वळविण्यात यश मिळविलें होतें कीं काय, याबद्दल कोणालाच कल्पना नाहीं. पण त्याला पकडणारें पथक, तो एके काळीं ज्या पथकांत ब्रिटिशांचा अधिकारी होता, तेंच होतें. १७७८ च्या जूनमध्यें व्हर्जिनियांतील

वातावरणासंबंधांत पॅट्रिक हेन्री यानें कॉंग्रेसमधील एका व्हर्जिनियातर्फेच्या सभासदाला कळवळून लिहिलें होतें, " ब्रिटनपासून आपण संपूर्ण स्वतंत्र होईपर्यंत आपल्या देशाच्या कारभारांतून लक्ष काढून न घेण्याची कृपा करा! अजून दासकेंकुजकें खाणाऱ्यांना वाण नाहीं!"—आणि आणखी दोनच वर्षांनीं त्यांचे हे शब्द खरे ठरले. क्विबेकच्या व साराटोगाच्या रणांगणावर वीरात्मा ठरलेला बेनेडिक्ट अर्नोल्ड हा वेस्ट पॉइंट भागांतील हडसन नदीवरील तटबंदीचा भेद क्लिंटनला कळवीत असल्याचें उघडकीस आलें. अर्नोल्ड देशभक्तांच्या हातून निसटला. पण, सर्वांत वाईट गोष्ट अशी कीं, तो ब्रिटिश सैन्यांत ब्रिगेडिअर जनरल म्हणून दाखल झाला, आपल्या नेतृत्वाखालीं कॉनेक्टिकट आणि व्हर्जिनिया भागांत छापे घालण्याचीं कृत्यें त्यानें केलीं, आणि म्हणूनच आपल्या स्वभावाशीं विसंगत अशी अत्यंत कठोर उपाययोजना करायला वॉशिंग्टन प्रवृत्त झाले. त्यांनीं मेजर ॲन्ड्रे नांवाच्या तरुण ब्रिटिश अधिकाऱ्याला फांशीची शिक्षा ठोठावली. अर्नोल्ड आणि क्लिंटन यांच्या दरम्यान हस्तकाचें काम तो करीत होता व त्याच्या अटकेमुळेंच अर्नोल्डच्या विश्वासघातकी कारस्थानाचा सुगावा लागला.

काळ खरोखरच विकट होता. मॉनमाउथमध्यें उन्हाळ्याच्या मध्यास झालेल्या चकमकीनंतरच्या प्रदीर्घ काळांत वॉशिंग्टन यांनीं लिहिलेल्या पत्रांमधून " कैचींत सांपडणें," " दुर्दैव ", " चैतन्यहानि " इत्यादि शब्दांचा सर्रास उपयोग केलेला आढळून येतो. आणि प्रत्यक्ष मोहिमांच्या बाबतींत व छावणींतील जीवनाच्या बाबतींत ही वस्तुस्थितिच होती. अमेरिकनांनीं रणभूमीवर कांहीं किरकोळ स्वरूपाचें यश संपादिलें होतें. अमेरिकेच्या नवजात आरमारांतील जॉन पॉल जोन्ससारख्या कांहीं कप्तानांनीं कांहीं चकमकींत कर्तबगारी खरी दाखविली होती. तथापि या गोष्टींचा युद्धाच्या एकूण प्रदीर्घ कालावधीच्या दृष्टीनें विशेष परिणाम झालेला नव्हता. १७८० च्या अखेरीस ब्रिटिशांनीं न्यू पोर्ट खालीं करून आपल्या साऱ्या हालचाली दक्षिण भागांत केंद्रित केल्या. एका वर्षापूर्वीच जॉर्जियांतील सावानोहा ब्रिटिशांनीं काबीज केलें होतें. १७८० च्या शरदृतूंतच क्लिंटननें समुद्रमार्गें येऊन चार्ल्स्टनला सैन्य उतरविलें होतें व त्या ठाण्याला वेढा दिलेला होता. त्याचा हेतु सिद्धीस गेला होता. चार्ल्स्टन पडलें. आणि या पाडावाबरोबरच साऱ्या युद्धांतला सर्वांत मोठा आघात अमेरिकन सेनेला भोगावा लागला होता. पांच हजारांपेक्षां अधिक सैनिक शत्रूच्या हातीं लागले होते. क्लिंटननें जॉर्जिया

व दक्षिण कॅरोलिना हा राजपक्षीयांचा बालेकिल्ला म्हणून गणला गेलेला भाग बंदोबस्तासाठीं कॉर्नवॉलिसकडे सोपविला आणि तो न्यूयॉर्कला परतला. हडसन आघाडीवर डांबून राहून क्लिंटनच्या हालचाली बघत बसणें वॉशिंग्टन यांना भाग पडलें. त्या परिस्थितींत शक्य होतें तेवढें सैन्य त्यांनीं दक्षिण भागांत रवाना केलें. काँग्रेसनें त्या भागांतील सेनेचें आधिपत्य होरेशिओ गेट्स्कडे सोपविलें.

आतां निदान युद्धाला नाट्यपूर्ण गति येऊं लागली. या नाटकाची रंगभूमि हजार मैल रुंद होती. पण अखेरच्या अंकासाठीं सर्व मुख्य पात्रें एकत्र येण्याची प्रक्रिया सुरू झाली. दुय्यम पात्रें हळूहळू रंगभूमीवरून काढून घेतलीं जाऊं लागलीं. गेट्स् हा आतांपर्यंत मुख्य पात्रांमध्यें गणला जात होता. पण कॅमडेन (दक्षिण कॅरोलिना) येथील रणांगणावर कॉर्नवॉलिसकडून त्याला दणदणीत पराभव खावा लागला आणि तीनच महिन्यांत त्याला बाजूला सारून त्याची जागा दुसऱ्यानें घेतली. कॅमडेनच्या आघाडीवरच बॅरन डी काल्ब हा कर्तबगार सेनानीहि प्राणघातकपणें जखमी होऊन बाद झाला. चार्लस ली हा आधींच पडद्या-आड गेलेला होता. क्लिंटन जागच्या जागीं चुळबुळत होता, पण न्यूयॉर्कमध्यें डांबून पडल्यामुळें त्याचें युद्धाच्या नाटकांतलें काम जवळजवळ संपल्यासारखें होतें. इतिहासांत होऊन गेलेल्या सुदैवी सेनानींच्या यादींत क्लिंटनला स्थान नाहीं.

आतां फक्त मुख्य पांचच पात्रें रंगभूमीवर उरलीं होतीं. तीं म्हणजे कॉर्नवॉलिस, लफायेत, वॉशिंग्टन आणि रंगभूमीवर खूप उशीरा आलेले कॉमटे डि रोचांबो आणि ॲडमिरल डि ग्रस हीं होत. ग्रीन, स्ट्यूबेन वगैरे कांहीं दुय्यम पात्रेंहि रंगभूमीवर अद्याप वावरत होतीं.

नाटकाच्या कथानकांतील रहस्याची उकल करणाऱ्या अखेरच्या प्रवेशाची सुरुवात कॉर्नवॉलिस यानें १७८०-१७८१ च्या हिंवाळ्यांतील मोहिमेनें केली होती. ही मोहीम खरोखरच त्यानें कार्यक्षमतेनें हाताळली. तो द्रुतगतीनें हालचाली करीत होता, हालचालींत कल्पकता दाखवीत होता; अमेरिकेंतल्या परिस्थितीला अनुरूप डावपेंच लढवीत होता. त्यानें आणि त्याचा सहकारी, घोडदळाचा नायक बानास्ट्रे टार्लटन यानें कॅमडेन आघाडीवर गेट्स्चा पाडाव केला होता. नंतर १७८१ च्या मार्चमध्यें गिलफोर्ड कोर्ट हौस आघाडीवर ग्रीनच्या सैन्यावर जोराचा आघात केला होता. पण, पाण्यावर लिहिलेल्या अक्षरांप्रमाणें त्याचे प्रयत्न फोल ठरत होते. तो वेगानें उत्तरेस, पुनः दक्षिणेस

आणि पुनः उत्तरेस अशा सारख्या हालचाली करीत होता, पण त्याचबरोबर त्याला वाढत्या आणि नव्या नव्या प्रतिकाराला तोंड द्यावें लागत होतें. मे महिन्यांत तो व्हर्जिनियांत येऊन दाखल झालेला होता. तेथें टार्लेटननें गव्हर्नर थॉमस जेफर्सन यांना जवळ जवळ पकडून, विधानसभेच्या सभासदांना हादरवून टाकलें होतें. कॉर्नवालिस धडाडीचा होता, बुद्धिमानहि होता. पण लफायेत आणि स्टयूबेन यांच्या आधिपत्याखालील चपल हालचाली करणाऱ्या अमेरिकन दलांची वासलात लावण्यांत त्याला अपयश आलें, तेव्हांच त्याचें भवितव्य निश्चित झालें. या अपयशानंतर त्यानें किनारा गांठून क्लिंटनशीं दळणवळण प्रस्थापित करण्यासाठीं कूच केलें, तेव्हांच त्याचें अंतिम अपयश निश्चित झालें. त्यानें तळ देण्यासाठीं यॉर्कटाउन निवडलें. आणि इथेंच तो फसला. पूर्वीच्या मोहिमांत, होवेचें अपयश अतिसावधपणांत होतें, तर बर्गोयनेचें अपयश सावधपणाच्या अभावांत होतें. क्लिंटन याला होवे मानल्यास कॉर्नवॉलिसला बर्गोयने मानावें लागेल. आणि "कॉर्नवॉलिसचा संपूर्ण बर्गोयने झाला!" असे उद्‌गार त्याच्या एका समकालीनानें काढलेच होते. यॉर्कटाउन बचावाच्या दृष्टीनें चांगलें शहर नव्हतें. आणि कॉर्नवालिसपाशीं आठ हजारांपेक्षांदेखील कमी सैनिक होते.

माणसाच्या स्वत्वाची कसोटी पाहणारा तीन वर्षांचा काळ वॉशिंग्टन यांनीं व्यतीत केला होता. त्यानंतर माणसाच्या सहनशक्तीचा अंत बघणारा आणखी तीन वर्षांचा काळ त्यांनीं व्यतीत केला होता. आणि आतां दैवानेंच धाडलेल्या संधीचा योग्य व पुरेपूर फायदा घेण्याची आपली पात्रता सिद्ध करण्याचा काळ त्यांना लाभला होता. आतांपर्यंत रणांगणावर त्यांनीं दिलेल्या सत्त्वपरीक्षेपेक्षां ही परीक्षा अवघड होती. अत्यल्प शक्तीच्या जोरावर आतांपर्यंतच्या यशापेक्षां अधिक यश त्यांना संपादन करावयाचें होतें. "त्या खंडांतील संयुक्त शस्त्रबलाच्या जोरावर त्या संयुक्त प्रयत्नाचें महान् उद्दिष्ट प्रत्यक्षांत उतरविण्यासाठीं" कसून प्रयत्न करण्याला वॉशिंग्टन यांना पवित्रा टाकायचा होता. ही संधि रोचांबो आणि डि ग्रेस यांच्यामुळें लाभली होती. रोचांबो हा मोठा कार्यक्षम आणि सुस्वभावी योद्धा होता. तो त्या वेळीं पांच हजार फ्रेंच सैनिकांसह न्यू पोर्ट येथें होता. डि ग्रेस हा फ्रेंचांच्या वेस्ट इंडीजमधील आरमारी जथ्याचा सेनानी होता. त्यानें कळविलें कीं, आपलें आरमार आणि आणखी तीन हजार फ्रेंच सैनिक मर्यादित काळापुरते

वापरायला मिळतील. आपण चेसापीस उपसागराकडे जात आहों, असेंहि त्यानें कळविलें.

रोचांबोच्या मदतीनें न्यूयॉर्कवर हल्ला चढविण्याचा विचार चालूच होता. डि ग्रेसचा निरोप कळतांच त्यांनीं बेत बदलला आणि व्हर्जिनियाच्या रोखानें कूच केलें. डोर्चेस्टर टेकड्यांवरील मोहिमेनंतर पुनः एकदां सर्व हालचाली अगदीं सुरळीतपणें होत असल्याचें समाधान वॉशिंग्टन उपभोगीत होते. जणूं या डाव-पेंचांच्या हालचालींत भाग घेणाऱ्यांनीं यापूर्वी रंगीत तालीम केली होती असें वाटावें, इतकी सफाई साऱ्या हालचालींत दिसून येत होती. डि ग्रेस चेसापीक उपसागराच्या मुखाशीं इतक्या नेमक्या योग्य क्षणीं पोहोंचला कीं, त्यानें कॉर्नवालिसचा समुद्रमार्गें जाण्याचा दरवाजाच बंद करून टाकला. थोड्याच दिवसांत वॉशिंग्टन, रोचांबो, लफायेत आणि डि ग्रेस यांचीं दलें जवळ जवळ आलीं, त्यांच्यांत दळणवळण प्रस्थापित झालें. आठ हजार फ्रेंच सैनिक धरून दोस्त सेनेचें संख्याबळ सतरा हजार होतें. या सेनेनें यॉर्कटाउनला वेढा दिला. त्या वेळेपुरतें तरी आरमारी वर्चस्व फ्रान्सकडे होतें. दैवी चमत्कार प्रत्यक्ष घडत होता. वॉशिंग्टन यांच्यापुरतें बोलायचें तरी ती एक दैवी घटनाच होती. फ्रेंचांनीं व्हर्जिनियाच्या सरहद्दीवर अतिक्रमण करण्याचें कारस्थान रचलें आहे, हा इशारा डिन्विडीला देण्यासाठीं ओहिओ विभागांत जाऊन परत आलेले वॉशिंग्टन ज्या ठिकाणीं डिन्विडीला भेटले होते, तें विल्यम्सबर्ग फक्त कांहीं थोड्याच मैलांवर होतें.

वॉशिंग्टन यांच्या सैनिकांनीं फ्रेंच खड्या फौजेशीं कर्तबगारी दाखवण्यांत स्पर्धा सुरू केली. आजवरच्या प्रदीर्घ कालांतील दुर्दिनांची भरपाई करण्याचे दिवस आतां आले होते. दोस्तांच्या तोफा आणि गरनाळे शहरावर भडिमार करूं लागले. प्रतिस्पर्ध्याचें बळ आपल्या दुप्पट आहे आणि यॉर्क नदींतून ग्लूसेस्टर पॉईंटकडे जाण्याचा मार्ग वादळामुळें बंद झाला आहे, हें बघून कॉर्नवालिसचा धीर खचला. ता. १७ ऑक्टोबरला वॉशिंग्टन यांना एक छोटी चिठ्ठी पाठवितांना त्याला किती वेदना झाल्या असतील, याची कल्पनाच केलेली बरी. तो दिवस म्हणजे साराटोगाच्या विजयाचा तृतीय वर्षदिन होय. कॉर्नवालिसची चिठ्ठी पुढील-प्रमाणें होती :

" महाराज,

चोवीस तास युद्धविराम करण्याची विनंति मी करूं इच्छितों त्यासाठीं प्रत्येक बाजूने दोन अधिकारी, यॉर्क आणि ग्लूसेस्टर ताब्यांत देण्याबाबतच्या अटी ठरविण्यासाठीं नेमावेत.

आपला
*कॉर्नवालिस*."

'आपला' या शब्दापुढें कॉर्नवालिसनें, 'दुर्दैवी', 'खची झालेला', 'कैचींत सांपडलेला' इत्यादि वॉशिंग्टन यांच्या पत्रव्यवहारांत वारंवार येणाऱ्या शब्दांपैकीं एखादा वापरला असता तर तें उचितच ठरलें असतें. जनरल वॉशिंग्टन यांच्या दृष्टीनें नाटकाचा उत्कर्षबिंदु गांठला गेला होता. ब्रिटिश आणि जर्मन फौजांच्या तुकड्यांमागून तुकड्या शस्त्रास्त्रें स्वाधीन करण्यासाठीं पुढें येत होत्या. सारें जग—ब्रिटनसुद्धां—नाटकांतील त्या मुख्य पात्राच्या कामाबद्दल टाळ्या देऊन त्याचें अभिनंदन करीत असतांनाच आपणहि आपल्या कहाणीची समाप्ति करणें उचित ठरलें असतें.

तथापि, अद्याप नाटक संपलें नव्हतें. नाटकाचा उत्कर्षबिंदु गांठल्यानंतरहि कंटाळवाणें 'भरतवाक्य' तब्बल दोन वर्षें चालूंच होतें. युद्ध संपलें, पण संशय, दोषारोप, शाब्दिक वाद यांचें वातावरण निर्माण झालें. त्यांत पुनः यॉर्कटाउनच्या विजयाच्या आनंदावर जॉर्ज वॉशिंग्टन यांच्यापुरतें तरी विरजण पडलें. त्यांचा सावत्र मुलगा जॅक कर्टिस सेनानीचा लष्करी मदतनीस म्हणून काम करीत होता. त्याचा तापांत अंत झाला होता. त्याचप्रमाणें शेवटच्या संग्रामांत आपल्या मध्यवर्ती फौजेनें उत्कृष्ट कामगिरी बजावली, हें वॉशिंग्टन यांना मिळालेलें समाधानदेखील नंतरच्या घडामोडींनीं हिरावून घेतलें. कारण थोड्याच महिन्यांत त्या सैन्यांत कुरकुर आणि दोषारोप करणें यांचा बुजबुजाट झाला. या सैनिकांचें म्हणणें असें कीं, इतरांच्या पदरांत फायदे पडत असतांना आम्हांला मात्र उपासमारीला तोंड द्यावें लागत होतें आणि आतां युनायटेड स्टेट्सला स्वातंत्र्य मिळवून दिल्यानंतर आम्हांला पगाराची थकबाकी मागण्यासाठींहि कॉंग्रेसपुढें तोंडें वेंगाडावीं लागावींत काय? वॉशिंग्टन हे कॉंग्रेसप्रमाणेंच आपल्या सैनिकांनादेखील जबाबदार होते. शिवाय, त्यांची सहानुभूति सैनिकांकडेच असणार. संतप्त सेनाधिकाऱ्यांना शांत करण्यासाठीं वॉशिंग्टन यांना आपलें सारें कौशल्य खर्चीं

घालवें लागलें. खरोखर, त्यांनीं ब्रिटिशांचा पराभव केला तो अखेर आपसांत दोन हात करण्यासाठीं खास नव्हे !

तथापि, युद्ध जिंकलें होतें ही वस्तुस्थिति निर्विवाद होती. यॉर्कटाउनच्या लढाईनंतर गंभीर स्वरूपाची लढाई कुठेंच झाली नाहीं. साराटोगाचीच पुनरावृत्ति क्लिंटनकडून पुनः झाली होती. कॉर्नवालिसच्या कुमकेसाठीं क्लिंटन आरमार घेऊन आला होता, पण फार उशीरा. त्याला पुनः न्यूयॉर्कला हात हालवीत परत जावें लागलें. त्यानंतर त्यानें होवेच्या पावलावर पाऊल ठेवून राजीनामा दिला आणि इंग्लंडला प्रयाण केलें. उरलेल्या ब्रिटिश सैन्यांनेहि हळूहळू चंबूगबाळें आवरून, बंदरें व किल्ले खालीं करून मायदेशाकडे प्रयाण करण्याला सुरुवात केली होती. आतां सर्वांचें लक्ष पॅरिसवर केंद्रित झालें होतें. तेथें जॉन ॲडॅम्स, फ्रँकलिन, जे, लॉरेन्स हे अमेरिकेचे राजप्रतिनिधि पूर्वीच्या तहापेक्षां अधिक किफायतशीर तह घडवून आणण्याची खटपट करण्यांत गर्क होते. फ्रान्सकडून युनायटेड स्टेट्स्च्या स्वातंत्र्याला मान्यता देण्यांत आली होती आणि आतां त्या राष्ट्राच्या सीमाहि ठरविणारा तह झाला. किनाऱ्यापासून मिसिसिपीपर्यंत आणि ग्रेट लेक्सपासून स्पॅनिश फ्लोरिडापर्यंत असा प्रदेश युनायटेड स्टेट्स्चा असल्याची मान्यता देणाऱ्या त्या तहावर कँग्रेसनें १७८३ च्या सप्टेंबरांत शिक्कामोर्तब केलें.

युद्धामागोमाग शांतताहि 'जिंकली' होती. १७७५ च्या जुलैंत सरसेनापतिपद स्वीकारतांना वॉशिंग्टन यांनीं मार्थाला लिहिलें होतें, "पानझडीच्या मोसमापर्यंत मी पुनः तुझ्यापाशीं येऊं शकेन, अशी अपेक्षा आहे." मनांतून त्यांना कदाचित् वाटत असावें कीं, इतक्या लौकर आपली जबाबदारी संपणार नाहीं, अधिक काळ आपल्याला दूर रहावें लागेल. पण हा काळ साडेआठ वर्षांचा असेल, अशी कल्पना मात्र त्यांच्या मनाला चाटूनसुद्धां गेली नसेल. म्हणून आतां घरीं जाण्यासाठीं निघतांना त्यांना अत्यानंद झालाच असणार. तथापि सेनापतीची भूमिका सोडून पुनः नागरिक सद्गृहस्थ या भूमिकेंत अवस्थांतर करतांना आणि "सार्वजनिक जीवनांतील सर्व जबाबदाऱ्यांना रामराम" ठोकतांना विलक्षण भावनात्मक खळबळ उडाल्यावांचून राहिली नसेल. त्या साडेआठ वर्षांत किती तरी घटना घडल्या होत्या. १७८३ च्या डिसेंबरमध्यें न्यूयॉर्क येथें फ्रॉन्सेस टॅव्हर्नमध्यें आपल्या हाताखालच्या अधिकाऱ्यांचा निरोप घेतांना वॉशिंग्टन यांचे

डोळे भरून आले, तसेंच त्या अधिकाऱ्यांच्या डोळ्यांतहि आंसवें जमलीं. त्यानंतर थोड्याच दिवसांनीं ॲनापोलीस येथें कॉंग्रेसला आपलीं सरसेनापतित्वाचीं वस्त्रें वॉशिंग्टन यांनीं परत केलीं, तेव्हां तेथें उपस्थित असलेल्या सर्वांचींच अंतःकरणें भरून आलीं. घडलेल्या अपूर्व इतिहासाबद्दलचे आणि घडत असलेल्या इतिहासाबद्दलचे विचारच, माउंट व्हरनॉनला ख्रिसमसच्या पहिल्या दिवशीं पोहोंचण्याच्या दृष्टीनें प्रवास करतांना वॉशिंग्टन यांच्या मनांत घोळत असतील. सर्वत्र अमेरिकनांच्या मनांत तेच विचार घोळत असतील.

### सरसेनापतीची कामगिरी

एक लष्करी नेता या दृष्टीनें वॉशिंग्टन यांचें स्थान कोणतें ? त्यांच्याबद्दलचा पूज्यभाव आणि दूषित दृष्टिकोन या दोन्ही गोष्टी शक्य तितक्या टाळून त्यांनीं संपादिलेल्या सिद्धीचें योग्य मूल्यमापन आपल्याला कसें करतां येईल? ज्या युद्धाचें मार्गदर्शन त्यांनीं केलें, त्याच्याशीं तुलना करण्यजोग्या एखाद्या प्रसिद्ध युद्धाचा दाखला इतिहासांत नाहीं. या युद्धाचें वैशिष्ट्य हें कीं, अमेरिकनांनीं बहुतेक सर्व लढाया गमावल्या, पण फक्त शेवटचीच लढाई खऱ्या अर्थानें जिंकली. त्याआधींच्या कांहीं थोड्या लढाया जिंकल्या असल्या, तरी त्या विजयांचें स्वरूप अत्यंत मोठें कधींच नव्हतें. त्याचप्रमाणें वॉशिंग्टन यांना आपल्या प्रतिभेचा विलास दाखविण्याला संधि मर्यादित असली तरी त्या मर्यादेंतहि सेनानी या नात्यानें फार मोठें बुद्धिवैभव त्यांनीं रणक्षेत्रावर प्रकट केलें नव्हतें.

अलेक्झांडर, फ्रेडरिक किंवा नेपोलियन यांच्याशीं तुलना करण्यापेक्षां अमेरिकन यादवी युद्धांतील अमेरिकन सेनानींशींच वॉशिंग्टन यांची तुलना करणें योग्य होईल. स्टोनवॉल जॅक्सनप्रमाणें वॉशिंग्टन यांचे लष्करी गुण प्रकर्षानें तळपणारे नव्हते किंवा रॉबर्ट ई. ली याच्याप्रमाणें त्यांचें लष्करी कौशल्य निर्दोषहि नव्हतें. ली किंवा मॅक्लेलानप्रमाणें सामान्य सैनिकांच्या मनांत स्वतःविषयीं उत्कट प्रेम निर्माण करण्यालाहि ते असमर्थ ठरले असतील. उमराव वर्गांचा तिटकारा करणाऱ्या टॉम पेन यांच्या लिखाणामुळें स्वतः वॉशिंग्टन यांना स्फूर्ति लाभली असली तरी सेनाधिकारीपदाला पात्र ठरण्यासाठीं माणसें आधीं 'सन्मान्य सद्गृहस्थ' असलींच पाहिजेत, असा त्यांचा आग्रह होता. आणि वॉशिंग्टन यांच्या भगतगणांत मुख्यतः सेनाधिकारीच होते. सामान्य सैनिकांशीं त्यांचें जिव्हाळ्याचें नातेंच जुळलें

नव्हतें. इतक्या वर्षांच्या काळांत त्यांचें एखादें टोपणनांव सैनिकांत प्रचलित होऊं नये, ही गोष्ट नमूद करण्यासारखी आहे. असें टोपणनांव आपलेपणा वाटत असण्याचें द्योतक असतें. आपल्या बरोबरीच्या लोकांबरोबर भोजनोत्तर मद्याचे घुटके घेतांना व सुका मेवा खातांना ते मनमिळाऊपणानें बातचीत करीत असत हें खरें, पण खेळीमेळीचा थट्टाविनोद मात्र कधींच करीत नसत. सामान्य सैनिकांना तर ते कडक वृत्तीचे वाटत आणि त्यांना त्यांचा दरारा वाटत असे. सैनिकांच्या गरजांकडे ते लक्ष पुरवीत असत. त्यांच्याबरोबर संकटांत सहभागी होत, अडचणीहि सोशीत असत; तरी देखील सैनिकांना ते आपल्यापैकींच एक वाटत नसत. जरा अंतर राखून वागण्याची त्यांची पद्धति होती. दैनंदिन हुकुमांमध्येंहि त्याचा प्रत्यय येतो. त्या हुकुमांची भाषा रुक्ष आणि उपदेशाची असे. त्यांत ' असुक करूं नका,' ' तमुक कां केलें नाहीं ? ' अशा ताकिदी किंवा कानपिचक्याच जास्त असत. आणि कधीं कौतुकाचे शब्द असलेच तर ते अगदीं थंडपणानें लिहिलेले असत. त्यांच्या प्रशंसेंत उत्स्फूर्तपणा नसे, कर्तव्यबुद्धीनें बहाल केलेल्या मेहेरबानीसारखी ती वाटे.

हा मुद्दा फार ताणणें अर्थातच मूर्खपणाचें ठरेल. अठराव्या शतकांतील एका व्हर्जिनियन जमीनदारानें विसाव्या शतकांतील जनतासंबंधाच्या तंत्रांत मुरलेल्या पुढाऱ्यासारखें वागावयास हवें होतें, अशी अपेक्षा करणें खुळेपणाचें आहे. तथापि त्यांच्या सहकाऱ्यांच्या दृष्टीनेंहि वॉशिंग्टन हे खुल्या दिलाचे पुरुष नव्हते. त्यांच्या दृष्टीनें युद्ध हें त्यांना सर्वस्व वाटत होतें, पण त्यांतहि विशिष्ट घटनांच्या वेळीं प्रसंगोचित वर्तन त्यांना जमत नसे. साराटोगाच्या विजयाची बातमी त्यांना कळली त्या वेळीं तसबीर काढून घेण्यासाठीं ते चार्ल्स विल्सन पील या चित्रकारासमोर बसलेले होते. खलिता वाचून, " छान ! बर्गोयनेचा पराभव झाला काय ? " असे उद्‌गार त्यांच्या मुखांतून बाहेर पडले आणि पुनः ते तसबिरीला योग्य अशी बैठक मारून बसले. यापेक्षां जास्त आनंद वा उत्साह कांहीं त्यांनीं दाखविला नाहीं. आणि कॉर्नवॉलिस शरण आला तेव्हां इतकी महत्त्वाची बातमी स्वतःच्या हस्ताक्षरांत काँग्रेसला कळविण्याऐवजीं त्यांनीं खलिता तयार करण्याचें काम एका मदतनिसाकडे सोंपविलें होतें.

तथापि, यादवी युद्धांतील एक सेनानी जॉर्ज बी. मॅक्लेलान याच्याशीं तुलना करतां, वॉशिंग्टन यांचे हे दोष मोठे गंभीर स्वरूपाचे होते, असें समजण्याचें

कारण नाहीं. जॉर्ज बी. मॅक्लेलान यांनीं संयुक्त राज्याला जीवदान दिलें, असा समज यादवी युद्धाच्या काळांत प्रचलित होता. वॉशिंग्टन आणि मॅक्लेलान या दोघांच्यामध्यें सौजन्य आणि आत्मविश्वास यांचें चमत्कारिक मिश्रण झालेलें होतें. फरक इतकाच कीं, मॅक्लेलानचे हे गुण अस्थानीं प्रकट होत असत. जॉर्ज वॉशिंग्टन यांच्यापेक्षां तो सैन्य तयार करणारा शिक्षक या दृष्टीनें चांगला होता. पण योद्धा म्हणून मात्र त्याच्यांत नमूद करण्याजोगें कांहीं नव्हतें. त्याचें सौजन्य शत्रूच्या बाबतींत प्रकट होई आणि हाताखालचे अधिकारी व सहकारी यांच्या बाबतींत त्याचें आत्मविश्वासाचें वागणें उद्धटपणांत जमा व्हावें इतकें अतिरेकी असे. तो मनुष्य गुणी होता; पण कधीं तो अत्यंत घाबरटपणें वागे, तर कधीं ईश्वरी संदेश घेऊन येणाऱ्या देवदूतासारखा त्याचा आव असे. वॉशिंग्टन यांची गोष्ट निराळी होती. ते स्वतः लढवय्ये होते आणि कांहीं अपवाद वगळल्यास आपल्या उद्दिष्टाची स्पष्ट कल्पना सदैव त्यांच्या मनांत जागृत असे. लढवय्या या दृष्टीनें त्यांच्या हातून ज्या चुका होत, त्या अतिरेकी धडाडीमुळें होत असत. भ्याडपणाचा आरोप कदापि येतां कामा नये, याबद्दल ते सदैव जागृत असत. त्यांचे डावपेंच हूणांशीं सामना देण्यासाटीं फेबिअस कन्क्टेटर यानें लढविलेल्या डावपेंचांसारखे होते, असें इतरांनीं म्हटलें असलें तरी त्यांनीं स्वतः आपल्या-पुढें फेबिअसचा आदर्श असल्याचें कधींच म्हटलें नव्हतें.

अगदीं निर्दोष परिपूर्ण योद्धा हें वर्णन त्यांना लागू करतां येणार नाहीं. तथापि सरसेनापतीबद्दलच्या कॉंग्रेसच्या ज्या असंख्य आणि अशक्य कोटींतल्या अपेक्षा होत्या, त्या पूर्ण करणारा एकमेव पुरुष वॉशिंग्टन होते, असें कॉंग्रेसला तरी वाटलें खास. ज्याच्यामुळें आपल्या उद्दिष्टाला उजळा मिळेल, असा सेनापति कॉंग्रेसला पाहिजे होता. ही अपेक्षा वॉशिंग्टन यांनीं इतकी पुरी केली कीं, होवे-सारख्या त्यांच्या शत्रूवरहि त्यांच्या व्यक्तित्वाची छाप पडली होती. चॅथमसारख्या सहानुभूति बाळगणाऱ्या लोकांना तसें वाटल्यास नवल नाहीं. १७७७ च्या फेब्रु-आरींत उमराव सभेंत बोलतांना लॉर्ड चॅथम म्हणाला होता, "अमेरिका म्हणजे ज्यांना कांहीं गमवावयासारखें नाहीं, पण जनक्षोभांतून स्वार्थ साधायचा आहे, अशा गुंड बेडरखोरांचा देश नाहीं. त्यांच्या कित्येक नेत्यांनीं आपलें सर्वस्व पणाला लावलेलें आहे. त्यांच्या सैन्याचें नेतृत्व करणाऱ्या सद्गृहस्थाची मालमत्ता तर वार्षिक पांच हजार पौंड उत्पन्नाची आहे." यापेक्षांहि फ्रेंचांवर वॉशिंग्टन यांचा अधिक

महत्त्वपूर्ण असा प्रभाव पडला होता. बहुधा फ्रेंचांचें मत चांगलें व्हावें म्हणून त्यांनीं मुद्दाम काळजी घेतली असेल. पण तसें असलें तरी त्यांत त्यांनीं आश्चर्यजनक यश मिळविलें होतें हें खास. फ्रेंचांच्या दृष्टीनें 'वॉशिंग्टन अत्यंत निर्भय आणि अदूषणीय' पुरुष ठरले होते. असामान्य समतोलपणा आणि अभंगशील असलेला सद्गृहस्थ, असाच फ्रेंचांचा वॉशिंग्टन यांच्याबद्दलचा एकमुखी अभिप्राय होता.

दुसरी गोष्ट अशी कीं, युरोपियन सैन्याच्या नमुन्याबरहुकूम सैन्य उभारून त्याचें मार्गदर्शन करूं शकणारा सेनानी कॉंग्रेसला पाहिजे होता. सैनिकी जीवन हा ज्यांचा जीवनव्यवसाय, त्यांच्याशीं सामना देण्याला लायक अशी, युनायटेड स्टेट्सला साजेशी मध्यवर्ती सेना उभारूं शकणारा व तिचें मार्गदर्शन करूं शकणारा सेनानी कॉंग्रेसला हवा होता. आणि अशी आदर्श सेना असावी, ही तर खुद्द वॉशिंग्टन यांचीच तळमळ होती. 'परंपरा-पद्धति, वक्तशीरपणा आणि शिस्त' यांबद्दलचा त्यांचा विशेष आग्रह होताच. वॉशिंग्टन हे मुख्यतः पायदळाचाच विचार करीत असत; घोडदळ आणि अन्य प्रकारचीं सशस्त्र पथकें यांकडे त्यांचें कांहींसें दुर्लक्ष होई हें खरें आहे. पण त्यांना कसलेल्या सैनिकांचें सैन्य उभारण्याचीच तळमळ होती, ही वस्तुस्थिति महत्त्वाची आहे आणि या तळमळीपायींच युद्धाच्या काळांत त्यांना भरपूर मनस्ताप झाला.

तिसरी गोष्ट अशी कीं, कॉंग्रेसकडून आपल्या सेनापतीबद्दल आणखीहि एक अपेक्षा होती. अल्पमुदतीच्या करारानें भरती झालेल्या जुजबी सैनिकांचाच भरणा ज्या सैन्यांत आहे, अशा सैन्याचा जास्तींत जास्त उपयोग करून घेणारा सेनापति कॉंग्रेसला हवा होता. इकडून तिकडून जमवलेल्या अशा लोकांची म्हणजे ब्रिटिशांच्या भाषेत बोलायचें तर जवळ जवळ 'गुंड' असलेल्यांचीच भरती करून त्यांच्यांतील विशेष गुणांचा उपयोग करून घेतला पाहिजे, ही कॉंग्रेसची अपेक्षा होती. ही अपेक्षा मात्र वाजवीपेक्षां जास्त होती. स्वभावधर्माच्या दृष्टीनें वॉशिंग्टन यांचा पिंड खरोखरच सैन्य हाताळणाऱ्या युरोपियन सेनानींचा होता. शिवाय व्हर्जिनियाच्या सरहद्दीवरील लढाईच्या काळापासूनच जुजबी सेनेबद्दलचा त्यांचा अनुभव मोठासा सुखकारक नव्हता. स्वातंत्र्ययुद्धांत प्रत्यक्ष लढाईच्या वेळीं जातीनें उपस्थित नसल्यामुळें बंकर हिल किंवा ब्रिड्ल हिल किंवा काउपेन्स या आघाड्यांवर जुजबी फौजेनें किती चोख कामगिरी बजावली, हें वॉशिंग्टन यांनीं पाहिलें नव्हतें. तेव्हां

अशा जुजवी फौजेंतदेखील कांहीं गुणवत्ता असूं शकते, हें मान्य करायला ते तयार नव्हते. निदान योग्य रीतीनें शिकवून शिस्त लावल्याशिवाय अशी सेना उपयुक्त नव्हे, असें त्यांना वाटे. कांहीं वर्षांनीं, युनायटेड स्टेट्सूची पद्धतशीर फौज संघटित करण्याच्या वेळीं, खडी फौज असण्याबरोबर राष्ट्रीय संरक्षणाचा पाया म्हणून व्यवस्थित शिकविलेल्या नागरिकांच्या लष्करी संघटना असाव्यात, हें तत्त्व त्यांनीं प्रतिपादिलें होतें. तें तत्त्व प्रत्यक्षांत उतरलेलें त्यांना व नंतरच्या कित्येक पिढ्यांना बघावयास मिळालें नाहीं. तथापि स्वातंत्र्ययुद्धाच्या काळांत या प्रश्नाबाबत त्यांच्या मनांत गोंधळ होता हे खास. शत्रूला प्रत्यक्ष लढाईत सामना देण्यावर त्यांचें लक्ष असे. ब्रिटिश सैनिकांना सतावीत राहण्याच्या तंत्राबद्दल त्यांच्या मनांत विशेष प्रेम नव्हतें. तथापि, असें असून देखील त्यांनीं कॅाँग्रेसची अपेक्षा पूर्ण होईल, अशी वृत्ति दाखविली. अमेरिकनांवर युरोपीय लष्करी शिष्टाचार लादण्याचा आग्रह आंधळेपणानें धरणारे कडक शिस्तीचे भोक्ते असे ते नव्हते. त्यांना पूर्ण जाणीव होती कीं, अमेरिकेच्या विशिष्ट परिस्थितींत, लष्करी समस्या सोडविण्याची पद्धतहि विशिष्ट आणि पूर्वपरंपरेला थोडी सोडूनच असणें अपरिहार्य होतें. अर्थात् हा नवा प्रयोग मर्यादेबाहेर करण्याचें धाडस मात्र त्यांना नको होतें. सैनापत्य करण्याच्या पद्धतीच्या दृष्टीनें त्यांचें कॉर्नवॉलिसशीं साम्य होतें.

श्रीमंत सद्गृहस्थ, निर्दोष सरसेनापति, गनिमी युद्धांत निष्णात् योद्धा, या सर्व गोष्टी कॉंग्रेसच्या अपेक्षेप्रमाणें जॉर्ज वॉशिंग्टन यांच्यामध्यें होत्या. शिवाय आपण आधीं नागरिक आहों, अशी जाणीव ठेवणारा आदर्श पुरुषहि कॉंग्रेसला हवा होता. जवळ जवळ स्वायत्त असलेल्या तेरा निरनिराळ्या वसाहतींतून एकत्रित केलेल्या खड्या व जुजवी फौजेवर अधिकार गाजविण्यास समर्थ असलेल्या लोकप्रिय सेनानीनें कॉंग्रेसची सर्वश्रेष्ठ सत्ता खुषीनें मानली पाहिजे, अशीहि अपेक्षा होतीच.

अत्यंत आश्चर्यजनक घटना ही कीं, कॉंग्रेसनें इतक्या असंभाव्य अपेक्षा बाळगल्या आणि जॉर्ज वॉशिंग्टन यांनीं त्या सर्वच अपेक्षा पुऱ्या केल्या! याशिवाय, त्यांच्यांत असामान्य चिकाटीचा जो गुण होता, त्याचाहि लाभ कॉंग्रेसला झाला. फिट्झ् पॅट्रिकनें वॉशिंग्टन यांच्या लिखाणाचे जे खंड प्रसिद्ध केले आहेत, ते अथपासून इतिपर्यंत वाचणें केवळ अशक्य आहे. फक्त युद्ध-

काळांत लिहिलेल्या लिखाणानेंच सुमारें दहा हजार पानें व्यापलेलीं आहेत. त्यांत ग्रथित केलेले कागदपत्र अत्यंत तपशिलानें भरलेले असून त्यांत पुनरावृत्तीहि फार आहे. पण, त्या पुरुषाचें व्यक्तित्व पारखण्याच्या दृष्टीनें त्या पुनरावृत्तीलाहि महत्त्व आहे. आपलें ईप्सित पदरांत पडेपर्यंत किंवा तें प्राप्त होणार नाहीं अशी बालंबाल खात्री पटेपर्यंत साध्या गद्य भाषेंत आपली मागणी सतत करीत राहण्याची त्यांची चिकाटी त्या ग्रंथांमधून दिसून येते. विशेषतः युद्धाचा अंत घडवून आणण्याच्या मार्गांबाबतचें त्यांचें विवेचन याची साक्ष प्रकर्षानें देते. विजय संपादन करणें हें ध्येय त्यांनीं सतत दृष्टीसमोर ठेवलेलें होतें. ब्रिटिश सेनानींप्रमाणें, दुय्यम महत्त्वाचे विजय आणि प्रमुख उद्दिष्ट यांचा गोंधळ त्यांनीं मनांत कदापि होऊं दिला नाहीं. मोठ्या व व्यापक डावपेंचांची कल्पना त्यांनीं १७७५-१७७६ मधील कॅनडाच्या चढाईत अपयश आल्यानंतर कधींच डोळ्यांपुढें ठेवली नाहीं. व्यापक डावपेंचांचा प्रश्न कॉंग्रेसनें हाताळावयाचा आहे, असेंहि कदाचित् त्यांचें मत असावें. इतकें मात्र खरें कीं, कॅनडाच्या प्रयोगानंतर त्यांनीं फार मोठ्या स्वरूपाच्या संग्रामाच्या महत्त्वाकांक्षी योजनेचा आग्रह कधींच धरला नाहीं. याउलट, जें अत्यावश्यक होतें त्यावरच त्यांनीं आपलें सारें लक्ष केंद्रित केलें. सैन्यबल मोठें पाहिजे, तें सैन्य चालविण्याचीं साधनें चांगलीं पाहिजेत, संस्थानांकडून तत्परतेनें आणि सढळ हातानें पैसा-सामग्री-मनुष्यबळ यांचा पुरवठा झाला पाहिजे, कांहीं काळ का होईना पण ब्रिटिश आरमारापेक्षां वरचढ ठरणाऱ्या आरमाराचें साह्य पाहिजे, इत्यादि उद्दिष्टांवरच त्यांनीं लक्ष केंद्रित केलें होतें. आणि यॉर्कटाउनच्या संग्रामांत त्यांच्या चिकाटीचें फळ त्यांच्या पदरांत पडलें.

दक्षिण कॅरोलिनामधील डेव्हिड रॅम्से यानें १७८९ मध्यें ' अमेरिकन क्रांतीचा इतिहास ' प्रसिद्ध केला. त्यांत त्यानें म्हटलें होतें, " युद्धासाठीं गुणी माणसें आवश्यक होतीं, इतकेंच नव्हे तर युद्धानें गुणी माणसें निर्माणहि केलीं, असें दिसतें. " हें विधान जॉर्ज वॉशिंग्टन यांना चपखलपणें लागू पडतें. लॉर्ड होवेचा चिटणीस ॲम्ब्रोज सर्ले यानें १७७६ सालीं कुचेष्टेनें म्हटलें होतें, तसे वॉशिंग्टन हे ' जुजबी फौजेंतला खुजा कनिष्ठ कर्नल ' खास नव्हते. वॉशिंग्टन यांचा नांव-लौकिक जितका वाढला तितकी गुणवत्तेच्या दृष्टीनें त्यांची उंची वाढली नाहीं, असें त्यांचे अमेरिकेंतलेच टीकाकार म्हणत असत. पण युद्ध संपल्यावर या

टीकाकारांनाहि कबूल करावें लागलें कीं, वॉशिंग्टन यांना सन्मानपदावर बसविण्यांत आलें, त्याचें त्यांनीं चीज केलें. आणि हें केल्यावरहि त्यांच्यांत अहंकाराचा आढळ झाला नाहीं. त्यांच्या युद्धकालीन लिखाणाचीं तीं दहा हजार पानें चाळतां चाळतां आपल्याला हळूहळू निरनिराळे साक्षात्कार होतात. आत्मविश्वास, शहाणपण, समतोल शांतवृत्ति, इत्यादींचा क्रमाक्रमानें विकास त्यांच्या ठायीं झालेला दिसून येतो. युद्धाच्या शेवटच्या शेवटच्या पर्वांच्या काळांत त्यांच्या सान्निध्यांत आलेल्या फ्रेंच अधिकाऱ्यांचा अभिप्राय असाच आहे. तोंपर्यंत वॉशिंग्टन यांची वृत्ति फारच विनम्र झालेली होती. हा पुरुष सर्वांच्या आदरास पात्र होता, कांहीं जणांच्या ठायीं त्याच्याविषयीं पूज्यभाव होता, असें फ्रेंच नेत्यांनीं म्हटलें आहे. ज्याच्या सान्निध्यांत मौज-गंमत नव्हे पण सुप्रसन्नता वाटेल, ज्याचा पोषाख नीटनेटका आहे पण छानछोकीचा वाटत नाहीं, भोजनमेजावर जो रसास्वाद घेणारा आहे पण अतिरिक्त पान करणारा छाकटा नाहीं, ज्याच्यांत स्वाभिमान आहे पण दिमाख नाहीं, असा पुरुष– ' हिज एक्सलन्सी ' या पदवीप्रमाणेंच प्रत्यक्षतः ज्याचें व्यक्तित्व उत्कृष्ट आहे असा पुरुष वॉशिंग्टन असल्याचा अभिप्राय फ्रेंच सेनानींनीं व्यक्त केलेला होता.

युद्धामुळें ज्याची गुणवत्ता सिद्ध झाली, असे वॉशिंग्टन हे कांहीं एकमेव पुरुष नव्हते. कदाचित् होरेशिओ गेट्स्सारख्यांना अन्याय करून वॉशिंग्टन यांचा गाजावाजा अवास्तव झालेला असेलहि. त्यांच्या जागीं दुसऱ्या कोणाला स्थापन केलें असतें तरीदेखील ती व्यक्ति कसोटीला उतरली असती, असा मुद्दाहि मांडतां येईल. न्यू इंग्लंड व इतर वसाहतींविषयीं व्हर्जिनियांतील लोकांत जे दूषित पूर्वग्रह होते, त्यांच्यावर वॉशिंग्टन यांनीं जशी मात केली, तशीच मात न्यूयॉर्कचा फिलिप स्क्यूलर आपल्या उमरावी वृत्तीवर आणि वागणुकीवर करूं शकला असता. अत्यंत प्रामाणिकपणें कर्तव्य पार पाडणारा ऱ्होड बेटाचा रहिवासी व क्वेकरपंथीय सेनानी नाथानील ग्रीन हा देखील सेनापतीबद्दल जनतेच्या असलेल्या अपेक्षा पुऱ्या करूं शकला असता. बुद्धिमान् पण खिन्नस्वभावी आणि माणूसघाण्या चार्ल्स ली हा सुद्धां कदाचित् सेनापतित्वाची जबाबदारी पार पाडूं शकला असता, असें मानणें कठीण असलें तरी ली ज्याला ' चर्चचा प्रतिनिधि ' म्हणून तुच्छतेनें हिणवीत असे, त्या आर्टेमस वार्ड याच्या ठिकाणीं नेतृत्वाचे गुण होते, हें खास. १७७५ मध्यें सरसेनापतित्वाच्या पदावरचा आपला हक्क

डावलला गेला, असें वाटल्यावर त्यानें आपल्या त्या नेतृत्वाच्या गुणांचा प्रत्यय कधीं दाखविला नाहीं ही गोष्ट निराळी. फार काय, बेनेडिक्ट अर्नोल्ड याला तो मान मिळाला असता तर कदाचित् त्याचा असंतुष्टपणा देशद्रोह करण्याला प्रवृत्त झाला तसा झाला नसता, असेंहि म्हणतां येईल. अर्थात् हे सारे अंदाज आहेत. पण निश्चित आणि धक्का देणारें नितान्त सत्य एकच आहे : जॉर्ज वॉशिंग्टन यांची निवड करण्याची बुद्धि काँग्रेसला (आणि अमेरिकेला) व्हावी, हें दोघांचेंहि सुदैवच होतें. कारण, कांहीं किरकोळ दोष असूनसुद्धां या 'उपलब्ध' उमेदवारानें सिद्ध करून दाखविलें कीं, ज्याची जागा दुसरा कोणीहि भरून काढूं शकणार नाहीं, असाच सरसेनापति अमेरिकेला लाभला होता. या बाबतींत अपेक्षेबाहेर अमेरिका सुदैवी ठरली होती.

प्रकरण चवथें

# वॉशिंग्टन : राष्ट्राध्यक्ष

*" वॉशिंग्टन यांना दुसरा सिनसिनाटस बनण्याची पाळी कदाचित् येईल. शेतकरी बनलेल्या वॉशिंग्टनना नांगर सोडून देऊन महान् राष्ट्राच्या शासनाचीं सूत्रें हातीं घेण्यासाठीं कदाचित् पाचारण केलें जाईल. "*

[ १७८८ सालीं विल्मिंग्टन येथें झालेल्या ता.४ जुलैच्या स्वातंत्र्यदिन-समारंभाच्या वेळीं ]

### जगापासून अलिप्त

जनरल वॉशिंग्टन यांना पुनः ' शेतकरी वॉशिंग्टन ' केव्हां होतों अशी फार तळमळ लागून राहिलेली होती. शारीरिक आणि मानसिक दृष्ट्या ते फारच थकून भागून गेलेले होते. त्यांची प्रकृतिहि चांगली नव्हती. दांतांच्या दुखण्यानें त्यांना हैराण केलेलें होतें. जवळ जवळ नऊ वर्षें जबाबदारीचें ओझें शिरावर वाहण्याचा परिणाम फार झाला होता. ते खचून गेल्यासारखे झालेले होते. वस्तुतः १७८३ नंतरचे वॉशिंग्टन हे, ज्याला कदापि खाजगी जीवन अनुभवतां येत नाहीं असे ' खाजगी नागरिक ' बनले होते. त्याचा प्रत्यय त्यांना लौकरच आला. तरी पण, निरामय एकांत जीवनाची आस त्यांना असावी हें अगदीं स्वाभाविक होतें. ग्रामीण जीवनाचें काव्यमय चित्र रेखाटून तें जीवन जगण्याची लालसा त्यांनीं धरावी हें स्वाभाविकच होतें. आणि त्यांनीं रेखाटलेलें हें चित्र रम्य होतेंच.

पण, परिस्थितीनें हें चित्र कधींच पुरें होऊं दिलें नाहीं ही गोष्ट वेगळी. तथापि १७८४ च्या प्रारंभीं प्रारंभीं त्यांनीं लिहिलेलीं पत्रें पाहिल्यास त्या चित्राची पुसट

कल्पना आपल्याला येऊं शकते. त्या काळांत व्हर्जिनियांतला हा मातबर जमीनदार माउंट व्हरनॉनचा उल्लेख नम्रपणानें ' पर्णकुटी ', ' छोटी बंगली ' असा करतांना आढळतो. त्यापूर्वी असा आगळा उल्लेख त्यांनीं कधींच केलेला दिसत नाहीं. " पोटोमॅकच्या किनाऱ्यावर स्वतःच्या बागेतील द्राक्षवेली आणि अंजिराचीं झाडें यांच्या छायेंत जीवन व्यतीत करणारा; छावणींतील धांदलीपासून दूर, सरकार-दरबारांतल्या भानगडींपासून दूर असें जीवन व्यतीत करणारा अमेरिकन नागरिक " असें स्वतःचें वर्णन त्या काळांत करतांना ते दिसतात. आयुष्याच्या अखेरच्या क्षणापर्यंत जीवनप्रवाहांत संथपणानें आयुष्याची नौका तरंगत ठेवण्याची त्यांची मनीषा होती. ते म्हणत असत, " मी सर्व प्रकारच्या सार्वजनिक जीवनांतून केवळ निवृत्त झालों आहें असेंच नव्हे; तर जगापासून संपूर्ण अलिप्त बनून खाजगी जीवन जगण्याचा माझा प्रयत्न आहे. "

सिनसिनाटसप्रमाणें जीवन व्यतीत करण्याचा प्रयत्न वॉशिंग्टन कदाचित् कांहींशा जाणीवपूर्वक करीतहि असतील. अनेक लोक त्यांची तुलना त्या निरिच्छ रोमन देशभक्ताशीं करीत असत. एक प्रमुख जमीनदार म्हणून त्यांच्याकडे पाहण्याऐवजीं एक साधा शेतकरी असें त्यांचें चित्र रंगविण्याचा प्रयत्न अनेक जण करीत असत. तें कांहीं असलें तरी निरामय जीवनाचें स्वप्न वॉशिंग्टन कांहीं काळ तरी पाहात होते हें मात्र खरें. आतां भरपूर उसंत मिळणार, असें समजून त्यांनीं असंख्य पुस्तकें मागविलीं होतीं. त्या पुस्तकांत कांहीं प्रवासवर्णना-त्मक पुस्तकेंहि होतीं. खूप लांबचा, विशेषतः फ्रान्सचा प्रवास करण्याचें त्यांचें आणखी एक स्वप्न होतेंच. फ्रान्समध्यें वॉशिंग्टन यांचें हार्दिक स्वागत करण्याला लफायेत प्रभृति नेते उत्सुक होतेच. हेंहि स्वप्न अखेर स्वप्नच ठरलें, ही गोष्ट वेगळी. ट्रूरो प्रार्थनामंदिराच्या भांडाऱ्याच्या जागेचाहि राजीनामा त्यांनीं दिला. राजीनाम्याचें कारण त्यांनीं कांहींच दिलेलें नव्हतें. बहुधा ' तेंहि एक सार्वजनिक जबाबदारीचेंच काम ' आहे आणि त्यांतून देखील आपण मुक्त झालेंच पाहिजे, असें त्यांच्या मनानें घेतलें असेल. प्रांतिक विधानसभेवर ते निवडून येणें म्हणजे आतां हातची गोष्ट होती. त्यांना गव्हर्नरचा हुद्दाहि मिळूं शकला असता. पण कोणत्याहि प्रकारें राजकीय जीवनांत प्रवेश करण्याचा प्रयत्नहि त्यांनीं मुळींच केला नाहीं. नाहीं म्हणायला, माजी सैन्याधिकाऱ्यांनीं स्थापन केलेल्या ' सोसायटी ऑफ् सिनसिनाटी ' या संस्थेच्या सन्माननीय अध्यक्षपदाचा मान त्यांनीं स्वीका-

रला होता. पण, या संस्थेचे ते एक संस्थापक मात्र नव्हते. किंवा त्या संस्थेचें कार्य पुढारीपणानें करण्याचाहि त्यांनीं प्रयत्न केला नाहीं. पुढील कांहीं वर्षें तरी आपल्या स्वतःच्या व्यवहाराकडेच पाहावयाचें, असा त्यांचा इरादा होता.

अर्थात् त्यांचा स्वतःचा खाजगी व्यवहार म्हणजेहि कांहीं साधी गोष्ट नव्हती. हें कामच इतक्या विविध स्वरूपाचें आणि पुरून उरणारें होतें कीं, कांहींसें सुखासीन, निवांत जीवन जगण्याची आशाच पार मावळून जावी. सरसेनापति-पदाच्या जबाबदारींतून मुक्त होतांच, त्यांच्या पूर्वीपासून आवडत्या असलेल्या तीन गोष्टींनीं त्यांच्या मनाची पकड घेतली. पहिली गोष्ट म्हणजे माउंट व्हरनॉनचें निवासस्थान. दुसरी गोष्ट म्हणजे जातीनें शेती कसण्याची आवड. तिसरी गोष्ट म्हणजे पश्चिम भागांत असलेल्या जमिनी लागवडीखालीं आणण्याची इच्छा. या तीन आवडी पुऱ्या करायच्या म्हणजे इतका प्रचंड खटाटोप होता कीं, युद्धोत्तर-कालांत निरामय शांततेंत दिवस घालविण्याचें स्वप्न पार विल्याला गेलें.

वॉशिंग्टन यांनीं आपल्या निवासस्थानाची सुधारणा करण्याचें ठरविलें त्यापूर्वी, म्हणजे १७५७ च्या आधीं माउंट व्हरनॉनच्या निवासस्थानाला पर्णकुटी म्हणणें तितकेंसें चुकीचें ठरलें नसतें, पण आतां, म्हणजे १७८३ मध्यें तें घर, अमेरिकेंतल्या परिस्थितीच्या दृष्टीनें बघतां एक विशाल महालच म्हणावें लागलें असतें. शिवाय आसमंतांतील मालमत्ताहि मोठीच होती. चालू काळांत त्याला भेट देणाऱ्या प्रवाशांना त्याचें निर्दोष आणि प्रसन्न स्वरूप पाहायला मिळतेंच. तथापि अनेक वर्षें दूर राहून परतलेल्या वॉशिंग्टनना तें निवासस्थान, अर्धवट काढून झालेल्या अपूर्ण चित्रासारखेंच दिसत होतें. 'स्वतःच्या बागेतील द्राक्षवेलींच्या आणि अंजिराच्या झाडांच्या छायेंत विराम करण्या'ची भाषा ते वापरीत असले, तरी प्रत्यक्षपणें कांहीं त्यांना तसें करण्याची शक्यता नव्हती. कारण त्या द्राक्षवेली आणि तीं अंजिराचीं झाडें होतींच कुठें? त्यांचीं कलमें व रोपटीं लावल्यानंतर जेव्हां तीं वाढतील तेव्हांच प्रत्यक्षतः त्यांच्या छायेखालीं बसणें शक्य होणार होतें ना! आणि म्हणून परत आल्यानंतर महिन्याच्या आंतच वॉशिंग्टन पत्रें लिहिण्यांत गढून गेले. तो पत्रव्यवहार अर्थात् निवासस्थानांतील शेकोट्यांच्या धुराड्यांची दुरुस्ती करणें, घराभोंवतींच्या सज्ज्यांत फरशा बसविणें, नव्या दिवाणखान्याची सजावट करणें, इत्यादि गोष्टींविषयींच होता. त्यानंतरच्या त्यांच्या बहुतेक पत्रांतून आणि (युद्धकाळांत दैनंदिनी लिहिण्याचा उपक्रम बंद पडला होता.) दैनंदिन्यांतून

जे उल्लेख आढळतात त्यांवरून, माउंट व्हरनॉनचें निवासस्थान हाच एक विषय त्यांचें मन सर्वस्वीं व्यापून टाकणारा ठरला होता, याची कल्पना येते. जर्मनींतून नुकतेच आलेले कांहीं मजूर-कामगार त्यांनीं करारानें, विटा तयार करण्यासाठीं आणि सुतारकामासाठीं ठेवले. घरांतील भिंतींना रंगीबेरंगी कागद चिकटविणें, पुस्तकांचीं कपाटें लावणें, खिडक्यांना सुंदर सुंदर पडदे लावणें अशा गोष्टींकडेच ते त्या कालांत अधिक लक्ष देत होते. घराबाहेरहि त्यांनीं खूपच सुधारणा केल्या. बागेंत लावायच्या झाडांचीं रोपटीं वाढविण्यासाठीं उत्कृष्ट कांचघर त्यांनीं बांधवून घेतलें. रस्ते व पायवाटा तयार करविल्या. हिरवळीचीं पटांगणें व उपवनेंहि त्यांनीं तयार करवून घेतलीं. हरणें पाळण्यासाठीं राखलेलें रान कुंपण घालून चांगलें बंदिस्त करवून घेतलें आणि तेथें ठेवण्यासाठीं हरणें आणविलीं. शिवाय एक फळबागहि तयार करविली.

वाडा व त्याच्याभोंवतींची बाग यांच्या अवतींभंवतीं त्यांची शेतवाडी पसरलेली होती. अशा पांच वाड्या होत्या. आपल्या या वाड्यांचा उल्लेख वॉशिंग्टन ' मळे ' किंवा ' शेतवाड्या ' असा दोन्ही प्रकारें करीत असत. कापूस हें ' मळ्या 'चें उत्पादन वॉशिंग्टन काढीत नसत, तर ' शेतमाल ' गणलें जाणारें पीकच – म्हणजे गहूंच ते मुख्यतः पिकवीत असत, त्यामुळें त्या जमिनी ' शेतवाड्या ' होत्या. पण, तेथील नोकरवर्ग म्हणजे मळ्यांत काम करणाऱ्या गुलामांचाच बहुंशीं असल्यामुळें त्या जमिनींना ' मळे ' म्हणणेंहि चूक झालें नसतें. वॉशिंग्टन यांच्या मालकीचे, मुलें व म्हातारे धरून सुमारें दोनशें गुलाम होते. वॉशिंग्टन घरीं परत आले ते ' रिकाम्या हातानेंच ' – त्यांच्यापाशीं रोकड रक्कम अशी कांहींच नव्हती. त्यामुळें आपल्या साऱ्या व्यवहाराची नीट व्यवस्था लावणें त्यांना अत्यंत अगत्याचें होतें. अमेरिकेचे पहिल्या क्रमांकाचे नागरिक या नात्यानें कॉंग्रेसकडून त्यांना कांहीं खास देणगी म्हणून रक्कम द्यावी, अशी सूचना पुढें आली होती; पण ती सूचना स्वीकारणें त्यांच्या स्वाभिमानाला रुचलें नाहीं. आणि त्यांच्या दूरदर्शी व्यवहारी वृत्तीच्या सांगीवरहुकूम सारें लक्ष शेतीकडे देण्याची निकड त्यांना वाटत होती. त्यांच्या मनाचा कलहि शेतीकडेच होता. या बाबतींत वॉशिंग्टन आणि थॉमस जेफर्सन यांच्यांत साम्य होतें. बीं-बियाणें, खतें, शेतीचीं अवजारें या शब्दांनाच त्यांच्या बोलण्यांत अधिक प्राधान्य असे. ' अत्यंत आल्हाददायक जीवनव्यवसाय ' या शब्दांत वॉशिंग्टन शेतीबद्दलची आपली आवड बोलून दाखवीत असत.

बीं-बियाणें, खतें वगैरे शब्दांना वरील दोघां नेत्यांच्या भाषेंत जें प्राधान्य होतें, त्याच्या मुळाशीं हीच उत्कट आवड होती. अर्थात् शेती म्हणजे अत्यंत कष्टमय व्यवसाय असतो, त्यांत अनेकदां निराशाहि पदरांत पडते; पण इतकें असलें तरी निर्विवादपणें वॉशिंग्टनना तोच व्यवसाय प्रिय होता हें खास. आर्थर यंग नांवाच्या इंग्लिश शेतकी तज्ज्ञाचा सल्ला घेऊन, त्यानें सुचविल्याबरहुकूम त्यांनीं आपलें कोठार बांधवून घेतलें. देखभाल ठेवण्यासाठीं एका इंग्लिश शेतकऱ्याला मुद्दाम पाचारण केलें. त्यांनीं दूधदुभत्याच्या जनावरांच्या पैदाशीचीहि व्यवस्था केली. नव्या नव्या पिकांचे प्रयोग केले. एकाच जमिनींत एकामागून एक पिकें काढण्याच्या नव्या नव्या पद्धतींचे प्रयोग केले. जमिनींची धूप थांबविण्यासाठीं करून उपाययोजना केली.

केवळ माउंट व्हरनॉनच्या भोंवतीं पसरलेल्या शेतवाडीपुरतेंच त्यांना बघायचें नव्हतें. पश्चिमेकडील भागांतील जमिनींपासून आतांपर्यंत त्यांना कांहींच किफायत झालेली नव्हती; झालीच असली तर अगदींच मामुली स्वरूपाची झाली असेल. कांहीं जमिनी भूमिहीनांनीं बळकावल्या होत्या, तर कांहीं जमिनींवरची त्यांची मालकी अमान्य असणाऱ्या कुळांनीं त्या बळकावल्या होत्या. तेथील परिस्थिति बघण्यासाठीं १७८४ च्या शरदृतूंत वॉशिंग्टन यांनीं ॲलेघेनीच्या पल्याडच्या भागांत दुसरा दौरा काढला. पहिल्या दौऱ्याच्या वेळीं ज्या मार्गानें ते गेले होते, त्याच मार्गावरून त्यांनीं हा प्रवास केला. किती तरी जुन्या आठवणी या मार्गाशीं निगडित होत्या. पण हा प्रवास तसा यशदायी ठरला नाहीं. जमिनी बळकावून बसलेल्या शेतकऱ्यांशीं यशस्वीपणें तडजोड होऊं शकली नाहीं. त्याचप्रमाणें ओहिओच्या कांठीं व ग्रेट कॅनव्हाच्या परिसरांत असलेल्या जमिनींची पहाणी करण्यासाठीं पुढील प्रवास करणेंहि त्यांना शक्य झालें नाहीं. या प्रवासाचे महत्त्वाचे परिणाम भविष्यकालांत दिसणार होते, पण तूर्त तरी त्याचा एकच मोठा फायदा झाला. माउंट व्हरनॉनमधल्या कामाच्या जंजाळांतून ते कांहीं दिवस कां होईना मुक्त राहूं शकले होते. १७८५ च्या उन्हाळ्यापर्यंत वॉशिंग्टन यांना चांगलासा खाजगी चिटणीसच मिळूं शकला नव्हता. त्यामुळें त्यांना किती त्रास पडे, याची कल्पना त्यांनीं एका मित्रापाशीं काढलेल्या पुढील कुरकुरीच्या उद्गारांवरून येईल,

"खरोखर, आज मला जितकीं पत्रें लिहावीं लागतात, त्याच्या निम्मीं

देखील युद्धकाळांत कधीं लिहावीं लागलीं नव्हतीं. परदेशी लोकांच्या पत्रांचा ढीग पडतो. कित्येक पत्रें निरर्थक असतात, पण त्यांना सर्वांना उत्तरें लिहावीं लागतात. मध्यवर्ती सेनेंत कधीं काळीं आणि कांहीं दिवसच असलेल्या कोणा अज्ञात माजी सैनिकांची विचारपूस करावी लागते. स्वतः-च्या संस्थानाबरोबर व्यवसायानिमित्त जाणाऱ्यांना पत्रें वा शिफारसपत्रें द्यावीं लागतात. कागदपत्रांच्या नकला मागणाऱ्या अर्जांची दाद घ्यावी लागते. ज्या गोष्टींकडे लक्षहि द्यायला नको, अशा हजारों गोष्टींकडे लक्ष द्यावें लागतें. कारण त्या गोष्टींबाबत कांहीं तरी उत्तरें देणें आवश्यक असतें. त्यामुळें माझा नियमित व्यायाम करायलाहि वेळ मिळत नाहीं. विश्रांति नाहीं. याचा परिणाम मला घातक होतोय्, अशीं चिन्हें आजच दिसूं लागलीं आहेत. मनावरचें दडपण वाढत आहे."

लोक त्यांच्याकडे कर्जाऊ पैसे मागत असत. मित्र व शेजारी सल्लामसलतीची अपेक्षा करीत. शिवाय असंख्य नातेवाइकांच्या व्यवहारांवर लक्ष ठेवणें आपलें कर्तव्य आहे असें मानीत असल्यामुळें तेंहि त्यांना करावें लागे. या नातलगांचे अनेक व्यवहार आंतबट्ट्याचे आणि फसलेले असत.

सोसायटी ऑफ् सिनसिनाटी ही संस्थाहि त्यांची एक डोकेंदुखी होऊन बसली होती. ही संस्था स्थापन झाल्यानंतर थोड्याच दिवसांत अनेक संस्थानांमध्यें तिच्याविरुद्ध ओरड सुरू झाली. संस्थेच्या सभासदांच्या दृष्टीनें ती एक निरुप-द्रवी संघटना होती. युद्धाचें कर्तव्य संपतांच निरामय जीवनाकडे वळलेला प्रख्यात रोमन वीरात्मा सिनसिनाटस याच्या स्मरणार्थ स्थापन केलेल्या या संघटनेचें उद्दिष्ट शांततामय आहे, असें आग्रहपूर्वक सांगितलें जात होतें. पण विरोधकांना वाटे कीं, स्वतःला खास हक्कदार वर्गाचे समजणाऱ्यांचीच ती संघटना आहे. संस्थेचें सभासदत्व वंशपरंपरागत आणि फक्त सैन्याधिकाऱ्यांपुरतेंच मर्यादित ठेवण्यांत आलेलें असल्यामुळें विरोधकांच्या दृष्टीनें नव्यानें उदयास येणाऱ्या उमराव वर्गाचेंच तें कोंडाळें होतें. विरोधकांच्या शंकांचें निरसन करण्याचा प्रयत्न वॉशिंग्टन यांनीं खूप केला. त्यांत त्यांना थोडेंबहुत यशहि आलें. तथापि ही संस्था त्यांची डोकेंदुखी होऊन बसली होती हें खरेंच.

आणि वॉशिंग्टन हे संगतीचे लोभी असले तरी त्यांची ही आवड अतिरेका-मुळें नावड बनावी अशी परिस्थिति माउंट व्हरनॉनच्या निवासस्थानांत निर्माण

झालेली होती. असंख्य लोकांच्या दृष्टीनें माउंट व्हरनॉन तीर्थक्षेत्र बनलें होतें व त्याचा मालक दर्शनीय पुरुष बनला होता. पाहुण्यांची प्रचंड वर्दळ सुरू झाली होती. अनेक प्रकारचे लोक येत असत. जुन्या ओळखीचे असत, त्याचप्रमाणें बघण्याच्या उत्सुकतेनें आलेले परदेशी प्रवासीहि असत. या पाहुण्यांनीं आठवड्यांच्या आठवडे पाहुण्यांसाठीं असलेल्या खोल्या गजबजलेल्या असत. उन्हाळा असो कीं हिंवाळा असो, पाहुण्यांपायीं टनावारी धान्य खर्ची पडे आणि गॅलनवारी मद्य संपून जाई. १७८५ मधील एका रात्रीची गोष्ट. त्या दिवशीं अनेक पाहुणे होतेच. रात्रीं स्वतः वॉशिंग्टन, कुटुंबीय मंडळी आणि सर्व पाहुणेमंडळी शांतपणें झोपीं गेलेली होती, तोंच प्रख्यात फ्रेंच शिल्पकार हौदन हा येऊन दाखल झाला. वॉशिंग्टन यांची तसबीर काढण्यासाठीं तो आला होता. अर्थात् झोंप सोडून उठणें भाग होतें. त्याच्यासाठीं आणि त्याच्या तिघां मदतनिसांसाठीं उतरण्याची सोय वगैरे करण्यांत खूप उशीर झाला. हौदनचा मुक्काम वॉशिंग्टन यांच्याकडे असतांनाच वाड्याच्या छपराचा कांहीं भाग तयार करण्याचें काम चालू होतेंच. पण, त्या मुदतींतच वॉशिंग्टन यांचा एक पुतण्या जॉर्ज ऑगस्टीन (लुंड वॉशिंग्टन यांच्या जागीं मालमत्तेचा व्यवस्थापक झालेला) आणि मार्था वॉशिंग्टनची एक भाची फ्रान्सेस बॅसेट यांचा विवाहहि पार पडला. माणसांच्या गराड्यांत सांपडलेले जॉर्ज वॉशिंग्टन, "आज फक्त पत्नीसह जेवण केलें. सेवानिवृत्तीनंतर लाभलेली ही पहिलीच संधि" अशी नोंद आपल्या दैनंदिनींत करूं शकले ते थेट १७८५ च्या जूनमधील एका दिवशीं! त्यांना एकान्तवासाचें सुख कसें दुरावलें होतें, याची कल्पना यावरून येईल.

या सर्व गोष्टी असल्या तरी देखील या काळांत जॉर्ज वॉशिंग्टन जितक्या सुखासमाधानांत होते, तितके बहुधा यापूर्वी कधींच नसतील. पत्रव्यवहार ही एक तापदायक गोष्ट असली तरी अखिल जगांतून गौरवाचा वर्षाव होत रहावा, हीसुद्धां एक समाधानाची गोष्ट त्यांना वाटत असणारच. स्पेनच्या राजानें त्यांना एका गर्दभाची देणगी बहाल केली होती. अशा देणगींतला गर्भित विनोद लक्षांत घेऊनच जणुं कांहीं वॉशिंग्टन यांनीं त्याचें नामकरण 'राजप्रसाद' असें केलें होतें. आणि हा गर्दभराज सुप्रजाजननाच्या कामीं उपयुक्त 'वळू' म्हणूनसुद्धां कसा नालायक ठरतो, याबद्दल ते विनोदानें बोलत असत. दिवाणखान्यांतील वातावरण उबदार ठेवण्यासाठीं प्रत्येक घरांत भिंतीमध्यें शेकोटी बांधलेली असते,

तशी एक संगमरवरी दगडाची शेकोटी (फायर प्लेस) एका इंग्रज चहात्यानें त्यांना बहाल केली होती, तर एका फ्रेंच चहात्यानें कांहीं शिकारी कुत्रे पाठविले होते. आपल्यापाशीं असलेल्या ख्यातनाम योद्धयांच्या चित्रसंग्रहांत समाविष्ट करण्यासाठीं एका युरोपीय उमरावानें वॉशिंग्टन यांच्याकडे त्यांच्या तसबिरीची मागणी केली होती. आपण स्वतःच मागें एकदां अशाच वीरात्म्यांच्या तसबिरी मागविल्या होत्या, पण त्या मिळूं शकल्या नाहींत, ही आठवण जर या वेळीं वॉशिंग्टन यांच्या मनांत जागी झाली असेल तर निश्चितपणें त्यांना वाटलें असेल कीं, एके काळच्या व्हर्जिनियाच्या शिबंदींतील कर्नलला अखेर त्याच्या कष्टांचें बक्षीस लाभत आहे.

आणखीहि समाधानाच्या गोष्टी होत्या. पाहुण्यांना आपल्याकडे दुर्लक्ष होत आहे असें न वाटेल अशा रीतीनें आपले व्यवहार करण्याचें कौशल्य आणि पद्धति वॉशिंग्टन यांनीं आपल्या अंगीं बाणविण्यांत हळूहळू यश मिळविलें होतें. व्यायाम म्हणून ते रोज आपल्या शेतवाड्यांतून घोड्यावरून फेरफटका मारून येत असत. हिंवाळ्यांत कोल्ह्यांच्या शिकारींतहि त्यांना भरपूर व्यायाम लाभत असे. आणि आपण कल्पिल्याप्रमाणें माउंट व्हरनॉन सुंदर दिसूं लागलें आहे, हें बघण्यांत आनंद होताच. अत्यंत अनुरूप संसाराचें सुख त्यांना लाभलें होतें. त्यांच्याकडे येणाऱ्या पाहुण्यांना स्वतः वॉशिंग्टन हे कित्येकदां कडक वृत्तीचे वाटत असत, पण त्या सर्वांकडून मार्थाच्या मनमिळाऊ स्वभावाची प्रशंसाच केली गेलेली आहे. शिवाय, मन रिझविण्यासाठीं आणि उल्हसित करण्यासाठीं बाळगोपाळांची संगत होतीच. सावत्र मुलगा जॅकी कर्टिस वारल्यावर त्याच्या विधवा पत्नीनें पुनर्विवाह केला तेव्हां त्या जोडप्याचीं दोन मुलें वॉशिंग्टन यांनीं दत्तक घेतलीं होतीं.

याशिवाय, वॉशिंग्टन यांना आस्था असलेला आणखी एक विषय म्हणजे विकास-योजना. १७८२ सालीं युद्धाच्या आघाडीवर थोडी सामसूम असताना त्या सवडीचा फायदा घेऊन त्यांनीं न्यूयॉर्कच्या उत्तर भागाचा प्रवास केला होता व तेथें एक जमिनीचा पट्टा विकतहि घेतला होता. डिस्मल स्वॅम्प कंपनीच्या विद्य-मानें व्हर्जिनिया व उत्तर कॅरोलिना यांच्या दरम्यानचा भाग विकसित करण्याची योजना होती; त्या योजनेंतहि अद्याप त्यांना रस वाटत होताच. आणि शिवाय, स्वतःच्या वसाहतीच्या आसपासहि विकासाच्या दृष्टीनें पुष्कळ कांहीं करण्याजोगें होतेंच. खरें बघतां, १७८४ मध्यें त्यांनीं केलेल्या प्रवासामागील उद्देशांमध्यें

हाहि एक उद्देश होताच. या प्रवासानें त्यांची खात्री पटवून दिली होती कीं, व्हर्जिनिया आणि पश्चिम भाग यांच्या दरम्यान जलमार्ग विकसित करणें शक्य आहे आणि अगत्याचें देखील आहे. पोटोमॅक नदीचें पात्र खूप आंतपर्यंत जहाजें नेण्याच्या दृष्टीनें अनुकूल होतें. ओहिओ नदीच्या मुख्य पात्रापासून पोटोमॅकपर्यंत फक्त पडावानें ने-आण करण्यापुरतीच सोय होती. पोटोमॅकच्या धबधब्यापासून कालवा काढून विद्यमान जलमार्गांत सुधारणा केली तर वाढत्या प्रमाणावर अगदीं घराजवळूनच दळणवळण सुरू होईल, असें भव्य चित्र वॉशिंग्टन यांच्या डोळ्यांपुढें होतें. या योजनेचा प्रत्यक्ष फायदा काय होऊं शकेल, याची लांबलचक तपशीलवार माहिती त्यांच्या दैनंदिनींत नोंदलेली आहे. ती माहिती म्हणजे, एखाद्या व्यापारी कंपनीच्या वा कारखान्याच्या उद्देशपत्रकाचा मसुदाच जणूं सादर केल्यासारखा वाटतो. त्या योजनेमुळें व्यापार वाढेल, पिछाडीच्या प्रदेशांत वसाहत होण्याला चालना मिळेल व त्यामुळें त्या भागांत ज्यांनीं आधींपासून जमिनी घेऊन ठेवलेल्या आहेत, त्यांचाहि फायदा होईल; आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे अंतर्भागाचा निकट संबंध संयुक्त राज्याशीं प्रस्थापित होईल, असें वॉशिंग्टन यांना वाटत होतें. अशा रीतीनें संयुक्त राज्याशीं त्या भागांचा निकट संबंध प्रस्थापित झाला नाहीं तर स्पेन आणि ब्रिटन यांच्या कारस्थानाला तो भाग बळी पडेल, अशी भीति त्यांना वाटे. कारण, ओहिओ नदीच्या खोऱ्याबाहेर पडण्याचे मार्ग असलेली मिसिसिपी व ग्रेट लेक्स यांवर स्पेन व ब्रिटन यांचेंच वर्चस्व होतें.

वॉशिंग्टन या योजनेचा जों जों विचार करूं लागले तों तों त्या योजनेनें त्यांच्या मनाची चांगलीच पकड घेतली. आपल्या त्या धाडसाचा परिणाम अंतिमतः काय होईल, याचा विचार न करतांच त्यांनीं त्या योजनेला चालना देण्यासाठीं पवित्रा टाकला. मध्य भागांतील संस्थानांमधून देखील अशा योजना वाऱ्यावर सोडल्या जातच होत्या. जेम्स नदीचा मार्ग विकसित करण्याची योजना होतीच. पोटोमॅक नदीवर व्हर्जिनियाबरोबरच मेरीलॅंडचाहि हक्क असल्यामुळें स्थानिक हेव्यादाव्यांपायीं मूळ योजना अडून रहाण्याचाहि संभव होता. पण वॉशिंग्टन तांतडीनें प्रयत्नांना लागले. त्यांच्या नांवलौकिकाचाहि उपयोग झाला आणि १७८४-१७८५ च्या हिंवाळ्यांत दोन्ही संस्थानांच्या कायदेमंडळांची संमति त्या योजनेला मिळविण्यांत त्यांनीं यश संपादिलें. व्हर्जिनियाचे प्रतिनिधि म्हणून त्यांची व मेरीलॅंडच्या प्रतिनिधींची बैठक होऊन पोटोमॅक रिव्हर कंपनी स्थापन

करण्यांत आली. कंपनीला दोन्ही संस्थानांनीं पाठिंबा व मदत देण्याची हमी घेतली. कंपनीच्या अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारण्यास वॉशिंग्टन नाखूष होते. पण, त्यांनाच कंपनीचें अध्यक्षपद स्वीकारावें लागलें. या कंपनीबरोबरच जेम्स रिव्हर कंपनीहि स्थापन झाली होती.

पोटोमॅक योजनेंतील भागीदार संस्थानांच्या प्रतिनिधींनीं १७८५ च्या वसंत-ऋतूंत माउंट व्हरनॉन येथेंच संयुक्त करारावर स्वाक्षऱ्या केल्या. मेरीलँड व व्हर्जिनिया या दोन्ही संस्थानांची वार्षिक परिषद् भरविण्याच्या सूचनेचें सर्व-साधारणतः स्वागत झालें. हळूहळू या कल्पनेचा विस्तार होत गेला आणि १७८६-च्या जानेवारींत व्हर्जिनियानें संघराज्यांतील सर्वच संस्थानांना निमंत्रणें पाठविलीं. व्यापार व उदीम यांच्या दृष्टीनें सर्वांना समान असलेल्या प्रश्नांची चर्चा करण्यासाठीं संस्थानांनीं आपापले प्रतिनिधि पाठवावे, असें त्या निमंत्रणाचें सार होतें. त्याप्रमाणें १७८६ च्या सप्टेंबरमध्यें ॲनापोलिस येथें परिषद् भरली. व्हर्जिनिया-सह पांच संस्थानांचे प्रतिनिधि उपस्थित होते. व्हर्जिनियाचे एक प्रतिनिधि जेम्स मेडिसन यांनीं, फिलाडेल्फिया येथें १७८७ च्या मेमध्यें दुसरी परिषद् भरवावी, अशी सूचना केली. या परिषदेच्या कल्पनेंतूनच नव्या घटनेचा जन्म झाला, हें सर्वश्रुतच आहे. नव्या घटनेप्रमाणें युनायटेड स्टेट्सला राष्ट्राध्यक्ष असावा असें ठरलें. हा पहिला राष्ट्राध्यक्ष होण्याची जबाबदारी जॉर्ज वॉशिंग्टन यांच्यावर येऊन पडली.

**नव्या राज्यघटनेची मुहूर्तमेढ**

वॉशिंग्टन यांचा अतिगौरव करणारे कांहीं चरित्रकार, वॉशिंग्टन यांचें जीवन आणि त्यांच्या आयुष्यकाळांत घडलेला अमेरिकेचा इतिहास यांच्यांत एकजीवपणा असल्याचें सिद्ध करण्याचा इतका प्रयत्न करतात कीं, जणुं नाटकाचा प्रत्येक प्रवेश एकाच पात्राभोंवतीं गुंफलेला असल्यासारखें दिसतें. त्यांच्या पूर्वायुष्यांतील घटनांचें विवरण करतांनादेखील घटना व परिस्थिति यांची अखंड सांखळीच असल्यागत कार्यकारणभाव दाखविण्याचा प्रयत्न हे चरित्रकार करतात. अगदीं १७५७ मध्यें ली ब्यूफ किल्ल्यावर फ्रेंचांना निर्वाणीचा खलिता पोहोचवायला गेल्यापासून पोटोमॅक कंपनीच्या मुत्सद्देगिरीच्या योजनेपर्यंत आणि तेथून अगदीं १७८९ मध्यें राष्ट्राध्यक्ष होईपर्यंत कार्यकारणभावांची तर्कशुद्ध मालिका दाखविण्यांत येते. असें दाखवून हे चरित्रकार म्हणतात कीं, पाहा,

वॉशिंग्टन हे राष्ट्रपिता कसे आहेत ते ! अगदीं तारुण्यापासून तों प्रौढावस्थे-पर्यंत ते अनाकलनीय पूर्वज्ञानानें आणि संयुक्त राज्याचा खरा अर्थ पूर्णपणें उमजूनच घटनांना वळण देतांना कसे दिसतात, पाहा !

चरित्रकारांचा हा दावा शंभर टक्के खोटाच आहे, असें मात्र म्हणतां येत नाहीं. आपल्याला योगायोगांची एक अजब सांखळी दिसते हें खासच. इतिहास घडत असण्याच्या क्षणीं आणि घडत असण्याच्या स्थळीं नेमके उपलब्ध असण्याचें कसब वॉशिंग्टन यांच्यांत दिसून येतेंच. तथापि, क्रांतियुद्धापूर्वीच्या घटना म्हणजे केवळ अपघाताच्या स्वरूपाच्या दिसतात. त्या काळांत वॉशिंग्टन नांवलौकिकास चढले होते हें खरें, पण त्यांना महात्मता, खऱ्या अर्थानें, निदान समकालीनांच्या दृष्टीनें तरी, लाभलेली नव्हती. ही महात्मता त्यांनीं प्रत्यक्ष क्रांतियुद्धांत संपादन केली होती. सेवानिवृत्त झाल्यानंतर राष्ट्रीय घडामोडींत त्यांना एक घटक म्हणून महत्त्वाचें स्थान होतें. त्यांनीं कांहीं केलें तरी त्याचे परिणाम राष्ट्रीय स्वरूपाचेच व्हावेत, राष्ट्रीय महत्त्वाचेच ठरावे, असें स्थान त्यांना लाभलें होतें. वॉशिंग्टन यांना त्याची जाणीव होती. आणि नसती तर सोसायटी ऑफ् सिनसिनाटीचे सन्माननीय अध्यक्ष म्हणून आलेल्या अनुभवानें ही जाणीव त्यांच्या मनावर चांगलीच ठसविली असणार.

१७८३ ते १७८९ च्या पर्यंतच्या काळांतील वॉशिंग्टन यांचा विचार करतांना एक प्रश्न उभा राहतो : त्यांनीं आपल्या पात्रतेनें अधिक महात्मता संपादिली कीं ही अधिक महात्मता त्यांच्यावर लादली गेली आणि त्यांना बळें बळेंच तो मुखवटा चढवावा लागला ! संयुक्त राज्याची सुव्यवस्थित पुनर्घटना करण्यांत त्यांनीं पुढाकार घेतला, कीं त्या उलाढालींत एक सन्मान्य पुरुष म्हणून फक्त त्यांना समाविष्ट करून घेण्यांत आलें ? कीं या दोन्ही गोष्टींपैकीं एकच नेमकी खरी नसून सत्य दोन्ही टोकांच्या मध्येंच कुठें तरी आहे ? या प्रश्नाच्या पार्श्वभूमीवर आणखी एक प्रश्न आहे आणि त्याचें उत्तर ठरविण्यासाठीं अद्याप इतिहासकारांमध्यें जोराचा वाद चालू आहे. तो प्रश्न असा कीं, जेव्हां सर्व संस्थानांचा एक विस्कळीत असा राज्यसंघ होता, त्या काळांत परिस्थिति खरोखर कशी होती ? तो काळ आणीबाणीचा होता कीं अमेरिकेची खरोखरच त्या काळांत भरभराट होत होती ? युनायटेड स्टेट्सला खरोखरच मध्यवर्ती शासनसंस्थेची निकड होती काय ? आणि राज्यसंघ धोक्यांत आहे, असें स्वतः वॉशिंग्टन यांना वाटत होतें

काय? वाटत असल्यास उपाययोजना त्यांची त्यांनीं स्वतः ठरविली कीं इतर कोणीं ती त्यांच्या मनावर ठसविली ?

या प्रश्नांचीं अंतिम उत्तरें सांपडणें जवळ जवळ अशक्य आहे. पण ते प्रश्न उपस्थित करणें मात्र आवश्यक आहे. जॉर्ज वॉशिंग्टन यांचें परंपरागत आणि ठोकळ चित्र डोळ्यांपुढून जाऊन खरें चित्र उभें राहण्याच्या दृष्टीनें या प्रश्नांचा ऊहापोह उपयुक्त ठरेल. अंतीं आपले निष्कर्ष या परंपरागत चित्राशीं जुळले तरी हरकत नाहीं, पण परिशीलन करून ते निष्कर्ष काढणें उपयुक्त ठरेल.

स्वाभाविक कल आणि युद्धकालांतील सरसेनापति म्हणून आलेला अनुभव यांमुळें समर्थ राष्ट्रीय सरकार असावें असें वॉशिंग्टन यांचें मत झालेलें होतें. निदान युद्धकाळांत काँग्रेस संघटना जशी होती त्यापेक्षां आणीबाणीच्या काळांत अधिक प्रभावी ठरेल, असें राष्ट्रीय सरकार असण्याला त्यांचा पाठिंबा होता. १७८३ च्या जूनमध्यें त्यांनीं प्रदीर्घ निवेदन करणारें जें परिपत्रक सर्व संस्थानांना पाठविलें होतें, त्यावरून वॉशिंग्टन यांच्या मतांची स्पष्ट कल्पना येते. सरसेनापतित्वाचीं वस्त्रें परत करण्याच्या आदल्या दिवशीं फिलाडेल्फिया येथें एका भोजनप्रसंगीं बोलतांना त्यांनीं वापरलेल्या एका वाक्प्रयोगांत या भूमिकेचें सार ग्रथित झालेलें आहे : "सर्वसाधारण कार्य करण्यासाठीं काँग्रेसला योग्य सत्ता पाहिजे," असे ते म्हणाले होते. नम्रपणानें बोलण्याच्या त्यांच्या पद्धतीमुळें याचा अर्थ उशीरा लक्षांत आला. अर्थात् त्यांनीं नंतर लिहिलेल्या पत्रांतूनहि त्यांना निश्चित काय म्हणावयाचें होतें, हें विशद झालेंच. त्यांना म्हणावयाचें होतें कीं, मीं कार्याला चालना दिली आहे; माझ्या उदाहरणानें आणि वेळोवेळीं व्यक्त केलेल्या अभिप्रायांनीं मीं नव्या राष्ट्रानें अनुसरावयाचा मार्ग दिग्दर्शित केलेलाच आहे. संस्थानांचा राज्यसंघ असतांना त्याचे परराष्ट्रमंत्री असलेले जॉन जे यांना लिहिलेल्या पत्रांत त्यांनीं म्हटलें होतें, "अत्यंत पवित्र भावनेनें ज्या भावनांचा आणि मतांचा वारसा मीं दिला, त्यांच्याकडे देशबांधवांनीं दुर्लक्ष केलें आहे." या अशा उद्गारांचा विचार केल्यास अमेरिकेशीं ते एकरूप असल्याचें स्वतःस मानीत असत, असें मर्यादित अर्थानें म्हणतां येतें. त्यांचा वैयक्तिक नांवलौकिक आणि अमेरिकेची प्रतिष्ठा या दोन्ही गोष्टी एकमेकांत गुरफटून एकजीव झाल्यासारख्या होत्या. म्हणूनच बाहेरच्या जगाला अमेरिका म्हणजे दुफळीचा बुजबुजाट असें वाटेल अशी परिस्थिति असणें त्यांना अत्यंत दुःखकारक वाटत असे.

विशेषतः ब्रिटिशांच्या प्रतिक्रियेबद्दल त्यांच्या भावना अत्यंत हळव्या होत्या. आणि म्हणून ज्या शत्रूला आपण पराभूत केलें त्यानें—ब्रिटननें तहाच्या अटींप्रमाणें पश्चिम भागांतील अनेक ठाणीं खाली करूं नयेत, याची त्यांना स्वाभाविकतःच चीड येई. आणि त्यांत अधिक दुःखाची गोष्ट अशी कीं, खुद्द कांहीं अमेरिकन संस्थानेंच तहान्वयें दिलेलीं वचनें पाळीत नसल्यामुळें ब्रिटिशांना वचनभंग करण्यास सबब मिळत होती.

पण, जे यांना पाठविलेलें पत्र १७८६ च्या उन्हाळ्यांतलें आहे आणि तत्पूर्वीच्या दोन वर्षांतील वॉशिंग्टन यांच्या मनःस्थितीचें यथार्थ प्रतिबिंब त्या पत्रांत उमटलेलें नाहीं. त्या काळांत ते सार्वजनिक जीवनापासून अलिप्त झालेले होते. कॅरोप्रमाणें म्हणा किंवा सिनसिनाटसप्रमाणें म्हणा, आपली भूमिका बजावून सार्वजनिक जीवनाला रामराम ठोकून ते स्वतःच्या निरामय जीवनाकडे वळलेले होते. आपल्या मालमत्तेकडेच उर्वरित आयुष्यभर लक्ष द्यावयाचें व जगांत जें चाललें आहे तें केवळ तटस्थपणें बघावयाचें, अशी त्या काळांत त्यांची वृत्ति होती. त्यांना स्वतःचें अपत्य नसलें तरी व्हर्जिनियांतील इतर मातबर जमीनदारांप्रमाणें आपलीहि मोठी जमीनदारी असावी, असें त्यांना उत्कटतेनें वाटत होतें. राष्ट्र म्हणजे काय, याबद्दलची जागृत आणि सुप्त जाणीव इतर कोणापेक्षांहि वॉशिंग्टन यांना तीव्र होती हें खरें. पण त्याचबरोबर पोटोमॅक योजनेला त्यांनीं हात घातला होता, तो 'व्हर्जिनियाचा एक नागरिक' या अभिमानानेंच होय. दुसरे एक व्हर्जिनियन, जेफर्सन यांनीं वॉशिंग्टन यांना ती योजना प्रथम सुचविली होती व तिचें नेतृत्व हातीं आल्यानंतरहि राष्ट्रीय दृष्टिकोनांतून त्या योजनेकडे न बघतां प्रादेशिक दृष्टिकोनांतूनच वॉशिंग्टन बघत होते. उत्तरेकडील परिचितांना पत्रें लिहितांना ब्रिटनचे डाव हाणून पाडण्याच्या भाषेवर भर असे, पण आपल्याच प्रांतांतील लोकांशीं बोलतांना ' यॉर्कर्सना ' हडसन-मार्गें अंतर्गत भागांत रेटलें पाहिजे, अशा प्रकारच्या प्रतिस्पर्ध्याला शोभेशा भाषेंत ते बोलत असत.

याचा अर्थ असा नव्हे कीं, वॉशिंग्टन अप्रामाणिक होते. पण १७८४ तें १७८५ या कालखंडांत विशाल सार्वदेशीय दृष्टिकोनांतून ते विचारच करीत नव्हते. अमेरिकेच्या एकूण हितसंबंधांशीं त्यांच्या प्रांतीय अभिमानाचें वाकडें खास नव्हतें. पण, कांहीं काळ तरी प्रांताचे हितसंबंध वरचढ होते; राष्ट्रीय हितसंबंधांचा प्रभाव त्यांच्या मनावर त्या काळांत नव्हता इतकें मात्र खरें. कॉंग्रेसमधील मित्रांकडून

पत्रें येत व कामाकाजाची माहिती त्यांना सतत मिळत असे. थेट मासाच्युसेट्स्‌पासून जॉर्जियापर्यंत संयुक्त राज्याच्या सर्व भागांतून आलेल्या पत्रांनीं त्यांची टपालपेटी गच्च भरून गेलेली असे. पण, कांहीं झालें तरी कॉंग्रेस फार दूर होती, आणि दूर दूर जात होती. प्रथम ॲनापोलिसला असलेली कॉंग्रेस ट्रेंटनला गेली व तिथून बस्तान उचलून तिनें न्यूयॉर्कला ठाण मांडलें. घरगुती प्रश्नांत गढल्यामुळें, सेवानिवृत्त जीवन यथार्थपणें जगण्याची तळमळ असल्यामुळें, पत्रें लिहिणाऱ्यांच्या म्हणण्याचें खरें महत्त्व काय असावें, याबद्दल निश्चित मत बनूं शकत नसल्यामुळें तंट्याबखेड्यांचा वीट असल्यामुळें, – अनेक कारणांमुळें असेल, पण त्यांच्या त्या काळांतील पत्रव्यवहारांतील मतप्रदर्शन फारच अस्पष्ट, मोघम स्वरूपाचें आहे. जरा विचकत कां होईना, नव्या शासनयंत्रणेची कल्पना ज्यांनीं मांडली आणि तसें सरकार अस्तित्वांत आणण्यासाठीं ज्यांनीं पुढाकार घेतला, तीं माणसें म्हणजे जॉन जे, हेन्री ली, जेम्स मेडिसन प्रभृति नेते होत. त्यांना वॉशिंग्टन आपल्या बाजूला हवे होते ते त्यांच्या प्रभावी लेखणीसाठीं नव्हे किंवा बुद्धिमत्तेसाठीं नव्हे; तर वॉशिंग्टन यांचा नांवलौकिक त्या पुढाऱ्यांना आपल्या बाजूला बळकटी आणण्यासाठीं हवा होता. अमेरिकनांच्या दृष्टीनें वॉशिंग्टन हे विजयाचें प्रतीक होते, नैतिकतेची मूर्ति होते, कोणताहि आंकडा त्यावर शून्य देतांच दसपट किंमतीचा होतो तशा शून्यासारखें त्यांना त्या क्षणीं महत्त्व होतें. १७८६ च्या मार्चमध्यें जॉन जे यांनीं पत्रांतून त्यांना बजावलें होतें कीं, "अमेरिका विस्कळीत असलेली त्रयस्थ प्रेक्षकाप्रमाणें बघत रहातां येणार नाहीं तुम्हांला!" जे यांनीं पुढें लिहिलें होतें, "राज्यसंघाच्या करारनाम्याचा फेरविचार निकडीचा आहे व त्यासाठीं अखिल राष्ट्रीय परिषद् भरविण्यांत यावी, असें सर्वांचें मत होऊं लागलें आहे." या पत्राला एक महिन्यानें पाठविलेल्या उत्तरांत 'वस्त्र' 'विरत' चाललें आहे, याबद्दल सहमत व्यक्त करूनदेखील वॉशिंग्टन यांनीं कांहीं निश्चित अभिप्राय व्यक्त न करतां सावधपणें मोघम भाषाच वापरली होती.

तथापि याचा अर्थ ते मट्ठ वा बेजबाबदार होते असा नाहीं; तर याचा अर्थ असा कीं, निश्चित अशी कोणतीच उपाययोजना त्यांच्या डोळ्यांसमोर नव्हती. शेतकरी आणि दुकानदार यांचा एक जमाव म्हणूनच केवळ अमेरिकेकडे पाहिल्यास त्या वेळीं अमेरिका भरभराटत होती, असें म्हणतां आलें असतें. कॉंग्रेस म्हणजे कांहीं वेडगळांचा बाजार नव्हता, देशाचें सनदशीर सरकार हें

तिचें स्थान होतें. कॉंग्रेसच्च स्वतःची सुधारणा करून घ्यावयास तयार नसेल, तर एखादी परिषद् भरवून तशी सुधारणा कॉंग्रेसवर लादतां येणें शक्य होतें काय ? लोकांनीं काय म्हटलें असतें ? संस्थानांनीं काय भूमिका घेतली असती ? उलट, परिस्थिति अशी होती कीं, राज्यसंघाच्या करारनाम्यांत व्यवहारतः समर्थ राष्ट्रीय सरकारचें तत्त्व ग्रथित झालेलें नव्हतें. संस्थानांची कॉंग्रेसकडे बघण्याची बेफिकिरीची वृत्ति घातक होती. संस्थानासंस्थानांत एक प्रकारचा शत्रुभावच वसत होता. कांहीं तरी केलेंच पाहिजे, अशी परिस्थिति होती.

प्रत्यक्ष वादाच्या आखाड्यांत उतरलेल्या पुढाऱ्यांच्या मागें असलेल्या वॉशिंग्टननीं हळूहळू आपल्या कल्पनांचें परिशीलन करण्यास सुरुवात झाली. १७७५ सालीं अशाच मानसिक प्रक्रियेंतून त्यांनीं निश्चित निर्णय घेतला होता. अखेर त्यांनीं ता. १ ऑगस्ट १७८६ रोजीं तीन पत्रें लिहिलीं. दोन पत्रें फ्रान्सला रवाना झालीं होतीं. त्यांतलें एक शेविलिअर डी ला लुझर्ने याला लिहिलें होतें, तर फ्रान्समधील अमेरिकन प्रतिनिधि थॉमस जेफर्सन यांना दुसरें पत्र लिहिलें होतें. तिसरें पत्र न्यूयॉर्कमध्यें असलेल्या जॉन जे यांना लिहिलेलें होतें. पहिल्या दोन पत्रांचा सूर आशावादी होता, तर तिसऱ्या पत्राचा सूर चिंतेचा होता. ही अशी विसंगति कां ? याचें बहुतांश कारण असें कीं, परदेशांत अमेरिकेच्या इभ्रतीला धक्का लागूं नये, अशी वॉशिंग्टन यांची इच्छा होती. लफायेत हे त्यांचे जिगरदोस्त, पण त्यांनाहि अमेरिकेविषयीं लिहितांना वॉशिंग्टन बळें बळेंच मोठ्या आशावादी सुरांत लिहीत असत. वरील विसंगतीचें दुसरें कारण असें कीं, वॉशिंग्टन यांचें मन द्विधा होतें व त्याचींच निरनिराळीं प्रतिबिंबें पत्रांत उमटलीं होतीं. त्यांनीं जॉन जे यांना लिहिलेल्या पत्रांत स्पष्ट कबुली दिली होती, " मी स्वतःला त्रयस्थ प्रेक्षक मानूं शकत नाहीं. आपल्या देशाच्या जीवनांत झपाट्यानें संकट येत आहे, अशी जी चिंता तुम्हांला वाटते, तशीच चिंता मलाहि वाटत आहे."

वॉशिंग्टन यांना त्या संकटाची कल्पना मासाच्युसेट्स्मधील शेजच्या बंडावरून आली. १७८६ च्या शरदृतूंत झालेलें हें बंड निष्फळ ठरलें हें खरें आणि कांहीं असंतुष्टांचाच तो उठाव होता हें खरें; पण तें बंड आणि ज्या पद्धतीनें तें प्रकरण हाताळण्यांत आलें ती पद्धति या दोन्ही गोष्टी वॉशिंग्टन यांना भयंकर अव्यवस्थेच्याच द्योतक वाटल्या. आपल्या पत्रांतून स्फोटक भाषा ते क्वचितच

वापरीत असत. पण आतां त्यांनीं इशाऱ्याचा आवाज उठविला : 'तुम्हां लोकांचीं माथीं फिरलीं आहेत काय? या सर्व गोंधळाचें कारण काय? हें संपणार केव्हां आणि कसें? टोरीपक्षीय किंवा ब्रिटिश लोक यांच्याखेरीज कोणाला कधीं असल्या अभद्र गोष्टी सुचल्या असत्या काय? देवा! माणूस असा कसा झाला? इतकी विसंगति आणि बेइमानपणा त्याच्या वर्तणुकींत असावा ना? आपण वेगानें अराजकाच्या दरीकडे धांव घेत आहों!'... अशीं वाक्यें भराभर वॉशिंग्टन यांच्या लेखणींतून बाहेर पडूं लागलीं.

अशा परिस्थितींत आपण काय केलें पाहिजे? अनेक दिवस त्यांनीं काळजींत घालविले–करूं कीं नको, अशा अवस्थेंत घालविले. दरम्यानच्या काळांत जास्त धडपड्या पुढाऱ्यांनीं फिलाडेल्फिया येथें १७८७ च्या मेमध्यें भरावयाच्या परिषदेची पूर्वतयारी केली. व्हर्जिनियाचे प्रतिनिधि म्हणून परिषदेला उपस्थित रहावें काय, असा प्रश्न वॉशिंग्टन यांच्यापुढें होता. त्यांनीं उपस्थित रहावें, असा आग्रह त्यांना करण्यांत येत होता. त्यांच्या मनांतील अस्वस्थतेचें एक कारण १७८७ च्या प्रारंभींच नष्ट झालें. कॉंग्रेसनें त्या परिषदेला आपला आशीर्वाद दिला. तथापि कांहीं शंका वॉशिंग्टन यांच्या मनाला सतावीत होत्याच. त्यांचें वय पंचावन्न वर्षांचें झालें होतें आणि त्यापेक्षांहि आपण वृद्ध असल्यासारखें त्यांना वाटत होतें. संधिवातानें त्यांना पछाडलें होतें आणि त्यांना पैशाची चणचण भासत होती. शिवाय त्याच सुमारास सोसायटी ऑफ् सिनसिनाटीची वार्षिक बैठक फिलाडेल्फियाला भरणार होती. त्या बैठकीला उपस्थित रहातां येणार नाहीं, असें त्यांनीं कळविलें होतें. त्या नकारासाठीं दिलेलीं कारणें म्हणजे केवळ सबबी होत्या, असें आतां सांगायचें कीं काय? शिवाय १७८६ च्या सप्टेंबरमध्यें ॲनापोलिस येथें झालेली परिषद् जशी कुचकामी ठरली, तशीच निष्फळ ठरणाऱ्या दुसऱ्या परिषदेशीं संबंध येऊं देण्याला जर या परिषदेपासूनहि ईशान्येकडील संस्थानें, ॲनापोलिस परिषदेप्रमाणेंच फटकून राहिलीं, तर फिलाडेल्फिया परिषदेला कांहींच करतां येणें शक्य नव्हतें. उलट, त्यामुळें त्या परिषदेच्या प्रतिनिधींकडून देशाच्या इभ्रतीला आणि स्वतःच्याहि लौकिकाला बाध येण्याचा धोका होता. ज्याला कट म्हणतां येईल किंवा हास्यास्पद तमाशा म्हणतां येईल, अशा उपद्व्यापांत सहभागी होण्याची वॉशिंग्टन यांची इच्छा नव्हती.

वॉशिंग्टन यांच्या चरित्रकारांपैकीं अग्रमान असलेला चरित्रकार डग्लस

साउथॉल फ्रीमन यांच्या मतें, त्या वेळची वॉशिंग्टन यांची वागणूक खेदजनक आणि आत्मकेंद्रित वृत्तीची होती. जर अमेरिका संकटांत होती तर तिचा बचाव करण्यासाठीं त्यांनीं धांव कां घेतली नाहीं असा फ्रीमन सवाल करतो. पण त्याचा सवाल म्हणजे फारच कठोर अभिप्राय आहे. आपण जास्तींत जास्त असें म्हणूं शकूं कीं, कांहीं झालें तरी वॉशिंग्टन एक माणूस होते. स्वयंसिद्ध देशोद्धारकाची आदर्श भूमिका सतत डोळ्यांपुढें ठेवणारे ते कांहीं नव्हते. त्यांच्या मनांतील हेतु मोठे शूरत्वाचे नसतील, पण ते आपण समजूं शकतों. शिवाय, अतिरिक्त सौजन्य अखेर त्या सद्गुणाच्या अगदीं विरुद्ध टोकाला असलेल्या दुर्गुणांत–अतिरेकी अहंकारांत परिणत होतें कीं काय, असा विचार मनांत येतोच. वॉशिंग्टन यांच्या बाबतींत असें झालें होतें काय ?

तसें झालें असणेंहि शक्य आहे. पण, मुख्य वस्तुस्थिति ही आहे कीं, अखेर वॉशिंग्टन फिलाडेल्फियाच्या परिषदेला गेले होते. मेच्या प्रारंभींच त्यांचा मुक्काम फिलाडेल्फियामध्यें होता. सर्व प्रतिनिधींच्या एकमतानें त्यांची निवड परिषदेचे अध्यक्ष म्हणून झाली. सप्टेंबरच्या मध्यापर्यंत चाललेल्या या परिषदेच्या प्रदीर्घ वादविवाद, शाब्दिक चकमकी यांनीं ठासून भरलेल्या कामकाजाचें संचालन त्यांनीं अध्यक्षीय खुर्चीवर ठाण मांडून इतक्या दीर्घकाल केलें, ही महत्त्वाची गोष्ट आहे. ऑगस्टमध्यें कांहीं दिवस अधिवेशन तहकूब होतें. वॉशिंग्टन यांनीं ही मिळालेली उसंत कारणीं लावली. व्हॅलीफोर्ज येथील छावणीच्या जागेला त्यांनीं भेट दिली. जर्मन शिबंदीवर ऐन खिसमसच्या दिवशीं अचानक छापा घालण्याचें धडाडीचें कृत्य त्यांनीं ज्या ठिकाणीं केलें होतें, त्या ट्रेंटनलाहि त्यांनीं भेट दिली. यामुळें त्यांचें मन पुनः ताजेंतवानें झालें. जुन्या आठवणींनीं त्यांचें मन हेलावलें असेल; पण त्यांच्या दैनंदिनींत याबाबतचे उल्लेख नाहींत. इतर गोष्टींचीच नोंद आढळते.

उन्हाळ्याच्या उकाड्यांत चालू असलेल्या फिलाडेल्फियाच्या परिषदेंतील त्यांची भूमिका त्यांना शंभर टक्के मानवणारी होती. एखादा मुद्दा मताला टाकण्याची वेळ आली कीं प्रतिनिधि म्हणून अनुकूल वा प्रतिकूल मत नोंदण्यासाठीं ते अध्यक्षीय खुर्चीवरून उतरत असत. इतर वेळीं मात्र ते तटस्थपणा राखीत असत. वादविवादाच्या किचकट झटापटींत सहभागी न होतां सारें ऐकून घेत असत आणि सावकाशपणें आपलीं मतें बनवीत असत. त्यांची भूमिका अमुक बाजूच्या

पुरस्कर्त्यांची नसून मध्यस्थाची होती. वॉशिंग्टन यांच्याप्रमाणेंच अध्यक्षीय खुर्चीला पात्र असलेली एकच व्यक्ति अधिवेशनाला उपस्थित होती. ती व्यक्ति म्हणजे बेंजामिन फ्रँकलीन होत. पण त्यांचें वय आतां ऐंशीं वर्षांचें होतें व ते आजारींहि होते.

कांहीं वेळां वॉशिंग्टन यांनीं अल्पमतवाल्या पक्षाच्या बाजूनें परिषदेंत-मतदान केलें. हा अल्पमतवाला पक्ष म्हणजे जो पुढें फेडरॅलिस्ट पक्ष म्हणून ओळखला जाऊं लागला तो. सत्ताशाली राष्ट्रीय सरकार असलें पाहिजे व त्या सरकारांत प्रभावी मंत्रिमंडळ असलें पाहिजे, अशी त्या पक्षाची भूमिका होती. हळूहळू त्या पक्षाचा जोर वाढत गेला. परिषदेनें अखेर तयार केलेल्या मसुद्यानें कोणाहि सभासदाचें संपूर्ण समाधान झालें नाहीं. स्वतः वॉशिंग्टन यांचेंहि संपूर्ण समाधान झालें नाहीं. कांहीं सभासद तर इतके विटले कीं, त्यांनीं फिलाडेल्फियाला रामराम ठोकला. मसुद्यावर स्वाक्षऱ्या करण्यास ते तयार नव्हते. मध्यवर्ती सरकारकडे प्रांतिक सरकारांचे अधिकार सोंपविणें ही उघड उघड शरणागति होय, असा कांहीं जणांचा अभिप्राय होता. व्हर्जिनिया, मासाच्युसेट्स् वगैरेसारख्या बड्या वसाहतींच्या प्रतिनिधींना भीति वाटत होती कीं, आपल्या कांहीं अग्रहक्कांचें दान आपल्याला मध्यवर्ती सरकारलाच करावें लागेल असें नव्हे, तर देलावरे व न्यूजर्सी यांसारख्या छोट्या संस्थानांच्या हातावरहि त्या अग्रहक्कांच्या दानाचें पाणी सोडावें लागेल. याउलट छोट्या संस्थानांचे प्रतिनिधि, राज्यसंघाच्या करारान्वयें असलेल्या समान प्रतिनिधित्वाच्या तत्त्वाचा आग्रह सोडायला तयार होईनात. अनेकदां परिषद् संपुष्टांत येण्याइतका पेंचप्रसंग निर्माण होत होता. तथापि हळूहळू एकेक पाऊल पुढें पडत होतें. परिषदेनें तडजोडीचा मार्ग मोठ्या कौशल्यानें काढला आहे, असें अखेर अनेकांचें मत झालें. वॉशिंग्टन या मताशीं सहमत होते. अंतिमतः राजकारण म्हणजे शक्य असेल त्यांतूनच उभारणी करण्याची कला होय. प्राप्त परिस्थितींत जितकी जास्तींत जास्त चांगली राज्यघटना तयार करणें शक्य होतें, तितकी उत्कृष्ट राज्यघटना तयार करण्यांत परिषद् यशस्वी झाली होती.

कांहीं असो, वॉशिंग्टन यांना तरी तसेंच वाटत होतें. घटनेंतील मुख्य तरतुदी त्यांना मान्य होत्या. कारभारप्रमुख म्हणून राष्ट्राध्यक्ष असावा, काँग्रेसचीं सीनेट व प्रतिनिधिसभा अशीं दोन सभागृहें असावींत, सर्वोच्च न्यायालयाच्या

प्रमुखत्वाखालीं न्याययंत्रणा असावी, अशा मुख्य तरतुदी असून प्रत्येक शाखा दुसऱ्यापासून अलग असावी, असें ठरलें होतें. वॉशिंग्टन यांना स्वानुभवावरून ही योजना पटली. म्हणजे राष्ट्राध्यक्ष हा व्हर्जिनियाच्या गव्हर्नरसारखा असणार होता. फरक इतकाच कीं, त्याला लंडनहून येणारे आदेश ऐकावे लागणार नव्हते. सीनेट हें गव्हर्नरच्या कार्यकारी मंडळासारखें असणार होतें. प्रत्येक संस्थानांतील दोन अशा सव्वीस मुरब्बी सभासदांची ती समिति असणार होती. प्रतिनिधि-सभा म्हणजे व्हर्जिनियाच्या विधानसभेसारखीच, पण सर्व राष्ट्राची विधानसभा... आणि व्हर्जिनियाच्या मताचा कॉंग्रेसच्या कामकाजांत चांगलाच प्रभाव पडण्याची शक्यता होती. कारण व्हर्जिनियाला इतर कोणत्याहि संस्थानापेक्षां जास्त म्हणजे दहा प्रतिनिधि पाठविण्याचा हक्क लोकसंख्येच्या प्रमाणांत मिळणार होता. सर्वांत कमी–म्हणजे एकच–प्रतिनिधि पाठवायचा हक्क असलेलें घटकराज्य म्हणजे ऱ्होड बेट होय.

संस्थानांना कांहीं प्रमाणांत स्वायत्तता देण्यांत येणार होती, तरी संयुक्त राज्याच्या शासनयंत्रणेच्या हातीं भरीव सत्ता आली होती, यावर वॉशिंग्टन खूष होते. आजवर कॉंग्रेसच्या हातीं जे अधिकार फक्त तात्त्विक दृष्ट्या होते, ते हळूहळू पायंडा पाडून प्रत्यक्ष वापरतां आले असतेच; शिवाय कांहीं नवे अधिकारहि आतां कॉंग्रेसच्या हातीं येणार होते. आतां कॉंग्रेस परदेशांशीं व्यवहार करतांना एकजुटीची भूमिका घेऊं शकणार होती. महसूल वसूल करण्याची सुसंघटित यंत्रणा उभारून त्याच्या खर्चाचें योग्य नियमन करूं शकणार होती. जमीनदार असो, शेतकरी असो, उत्पादक कारखानदार असो, कीं व्यापारी असो, कायदा पाळणाऱ्या प्रत्येक अमेरिकन नागरिकाला निर्वेध जीवन जगण्यासारखी सर्वसाधारण परिस्थिति निर्माण करण्याला आतां कॉंग्रेस समर्थ बनणार होती.

आपण आपलें कर्तव्य बजावलें आहे, अशा खात्रीनें वॉशिंग्टन त्या सप्टेंबर महिन्यांत परत माउंट व्हरनॉनकडे यावयास निघाले. त्यांचें स्वतःचें निवासस्थान आतां जवळ जवळ बांधून पुरें झालेलें होतें. फक्त छपरावर शांततेचें प्रतीक असलेल्या कबुतराच्या आकाराचा वायुदिशानिदर्शक बसविण्याचेंच काम काय तें बाकी राहिलें होतें. पण नवी राज्यघटना एका दृष्टीनें अद्याप अपूर्णच होती. संस्थानांच्या परिषदा भरून त्यांच्या मान्यतेचा शिक्कामोर्तब होऊन ती प्रत्यक्ष अमलांत यावयाचें अद्याप बाकी होतें. फिलाडेल्फियाला जावयास निघण्यापूर्वींचा

कालखंड जसा अनिश्चित आणि मानसिक अस्वस्थतेचा गेला, तसाच अनिश्चिततेचा आणि मानसिक अस्वस्थतेचा कालखंड वॉशिंग्टन यांच्या जीवनांत पुनः एकदां सुरू झाला. घटनेला पाठिंबा देण्याला ते स्वतः वचनबद्ध होते आणि जेवढें करतां येणें शक्य होतें तेवढें त्यांनीं केलें होतें. खुद्द त्यांच्या व्हर्जिनियांत त्यांच्या प्रभावामुळें घटनेला अनुकूल लोकमत तयार झालें होतें. पण एकामागून एका संस्थानांकडून विरोध व्यक्त होऊं लागला, तसतसे ते अस्वस्थ होऊं लागले. फिलाडेल्फियाला गेलेल्या प्रतिनिधींनीं आपल्या संस्थानांतर्फे देण्यांत आलेल्या आदेशांचें अतिक्रमण केलें, असे आरोप केले जाऊं लागले. आणि तसें थोडेंसें घडलें होतेंच. या प्रतिनिधींनीं गुप्त बैठका भरविल्या व अखेरपर्यंत आपले निर्णय गुप्त ठेवून शेवटीं जाहीर केले, असें म्हटलें जाऊं लागलें. कारस्थानी, स्वतःस द्रष्टाचार्य समजणारे, इत्यादि दूषणें या प्रतिनिधींना देण्यांत येऊं लागलीं. फार घाईनें निर्णय घेण्यांत आले, फेरविचारासाठीं आणखी परिषद् भरविली पाहिजे, अशी मागणी करण्यांत येऊं लागली. घटना तयार करणारांविरुद्ध अशा प्रकारें रान उठलें होतें. जहालवाद्यांचा जोर असलेल्या ऱ्होड बेटातर्फे फिलाडेल्फिया परिषदेला मुळांत प्रतिनिधीच पाठविण्यांत आलेला नव्हता. आणि घटनेच्या मसुद्यावर कित्येक संस्थानांकडून शिक्कामोर्तबच होणार नाहीं, असा रंग दिसत होता. नव्या घटनेच्या निर्मात्यांवर टीका करणाऱ्यांत केवळ भुक्कड लोक नव्हते. न्यूयॉर्कचा गव्हर्नर क्लिंटन, मासाच्युसेट्स्चा गव्हर्नर जॉन हॅनकॉक, फार काय खुद्द वॉशिंग्टन यांच्याच संस्थानांतील पॅट्रिक हेन्री, रिचर्ड हेन्री ली, एडमंड रॅन्डॉल्फ आणि वॉशिंग्टनचे मित्र व शेजारी जॉर्ज मॅसॉन यांच्यासारख्या वजनदार लोकांचाहि घटनेला विरोध होता.

तेरापैकीं नऊ संस्थानांची मंजुरी मिळाली तरच नवी राज्यघटना अमलांत यावयाची होती. १७७८ च्या जानेवारीपर्यंत पांच संस्थानांनीं घटनेवर शिक्कामोर्तब केलें. फेब्रुवारींत मासाच्युसेट्स्नें अत्यल्प बहुमतानें कां होईना मंजुरी दिली. फेडरॅलिस्टांनीं गव्हर्नर हॅनकॉकला उपाध्यक्षपदाचें आमिष दाखविलें; इतकेंच नव्हे तर, व्हर्जिनिया संयुक्त राज्याबाहेर राहिल्यास वॉशिंग्टन आपोआप गळतील व हॅनकॉकलाच राष्ट्राध्यक्ष होण्याची संधि लाभेल, अशीहि आशा दाखविली. हॅनकॉक वळला. त्यानें एक महत्त्वाची सूचना मांडली व ती नंतर इतर संस्थानां-कडूनहि पुढें आली. घटनेच्या मसुद्यावर जी टीका झाली, ती लक्षांत घेऊन

घटनेंत दुरुस्ती करण्याच्या अटीवर घटनेला मान्यता देणारी ती सूचना होती. निरनिराळ्या संस्थानांच्या राज्यघटनेंत समाविष्ट असलेल्या तरतुदीप्रमाणेंच ' बिल् ऑफ् राइट्स् ' मंजूर करण्यांत येईल, या अटीवर घटना-मंजुरीचे ठराव अनेक संस्थानांनीं मान्य केले.

आणखी दोन संस्थानांनीं घटना मंजूर केली. आतां घटना मान्य करणाऱ्या संस्थानांची संख्या आठ झाली होती. व्हर्जिनिया हें सर्वांत महत्त्वाचें संस्थान. त्या संस्थानानें खूप तीव्र वादावादीनंतर जूनच्या अखेरीस मान्यता दिली. हा निर्णय घेण्यापूर्वींच न्यू हॅम्पशायरनेंहि मंजुरी दिल्याची बातमी आली होती. म्हणजे आतां दहा संस्थानांची मंजुरी लाभली होती. किमान आवश्यकतेपेक्षां आणखी एका संस्थानाची मान्यता लाभली होती. या बातमीचा उपयोग करून घेऊन अॅलेक्झांडर हॅमिल्टन प्रभृति फेडरॅलिस्टांनीं न्यूयॉर्क संस्थानांतील विरोध मोडून काढण्यांत यश मिळविलें. अशा रीतीनें फिलाडेल्फिया येथें परिषदेनें घटना मंजूर केल्यानंतर वर्षभराच्या कालावधीनें बिनशर्त म्हणा किंवा सशर्त म्हणा, अकरा संस्थानांची घटनेला मंजुरी लाभली. फक्त नॉर्थ कॅरोलिना व ऱ्होड बेट हींच संस्थानें अलग राहिलीं होतीं. त्यांचा दुराग्रह शोचनीय असला तरी घातक ठरण्याचा संभव नव्हता.

आतां पुढें काय ? आतां विद्यमान कॉंग्रेसचें विसर्जन होऊन साऱ्या राष्ट्राकडून नव्या कॉंग्रेसची निवड व्हावयाची होती. भावी राजधानीबद्दल पुनः थोडा बखेडा माजला. पण सध्यां राजधानी न्यूयॉर्कलाच असावी, असें तात्पुरतें ठरून हा बखेडा मिटला. वॉशिंग्टन यांच्यापुरतें बोलायचें तर, पहिले राष्ट्राध्यक्ष म्हणून त्यांचीच निवड होणार, हें अगदीं ठरल्यासारखेंच होतें. घटनेवर शिक्कामोर्तब करून घेण्या-साठीं चाललेल्या प्रचारांत फेडरॅलिस्ट पक्षीयांकडून वॉशिंग्टन यांच्या नांवाचा सर्रास उपयोग केला गेला होता. फेडरॅलिस्टांना ' वॉशिंग्टनवादी ' म्हणावें आणि विरोधकांना मासाच्युसेट्स्मधील बंडखोर डॅनिएल शेजच्या नांवानें ' शेजवादी ' म्हणावें, अशी सूचनाहि एकानें केली होती. घटनेचा मसुदा प्रसिद्ध झाल्यापासून राष्ट्राध्यक्षपदाला उमेदवार म्हणून वॉशिंग्टन यांच्याकडेच सर्वांचे डोळे लागले होते. सर्व संस्थानांतील लोकांना माहीत असलेली, त्यांच्या आदरास आणि विश्वासास पात्र असलेली एकमेव व्यक्ति म्हणजे वॉशिंग्टनच होते. वयोवृद्ध बेंजामिन फ्रॅंकलिन सोडले तर, आकर्षक व्यक्तिमत्त्व, नांवलौकिक आणि प्रतिष्ठा,

त्या उच्च पदाला जितक्या प्रमाणांत पाहिजे तितक्या प्रमाणांत असलेला एकमेव पुरुष वॉशिंग्टनच होते. वृत्तपत्रें हेंच गर्जून सांगत होतीं. मित्रहि वॉशिंग्टन यांना हेंच बजावीत होते. १७८८ च्या जानेवारींत फ्रेंच नेता लफायेत यानें पत्र पाठवून वॉशिंग्टनना विनंति केली होती, "अमेरिकेसाठीं, अखिल मानवकुलासाठीं तुमच्यापाशीं, माझ्या प्रिय सेनानीपाशीं माझी एकच मागणी आहे : पहिले राष्ट्राध्यक्ष होण्याला नकार देऊं नका. नव्या शासनयंत्रणेला कार्यप्रवण करण्याला तुम्हीच एकटे समर्थ आहांत."

वॉशिंग्टन यांच्या मनांत संमिश्र भावना होत्या. सर्वांच्या विश्वासाच्या वर्षावानें त्यांचें मन कृतज्ञता व समाधान यांनीं भरून आलें होतें; तर संकोचानें त्यांना दडपल्यागत वाटत होतें; आणि एक प्रकारच्या भीतीनें तें मन हादरलेंदेखील होतें. त्यांना मिळणार असणारा मान फारच भव्य होता. पण ती गोष्ट प्रत्यक्ष घडण्यापूर्वीं कोणाशीं चर्चा तरी ते कशी करूं शकणार होते? ती गोष्ट अगदीं ठरून गेल्यासारखी असली तरी, प्रत्यक्ष निवडणूक होणें निराळें होतें. राष्ट्राध्यक्षपद देऊं करण्यांत आलें तर तें स्वीकारणें भाग आहे, हें वॉशिंग्टन जाणून होते. पण तसें झालें तर प्रसिद्धीच्या झगझगीत प्रकाशांत आणखी चार वर्षांच्या जीवनक्रमाचा ताण आपल्याला कितपत सोसवेल, हा प्रश्न त्यांच्यापुढें होता. ती जबाबदारी स्वीकारण्यास त्यांच्याइतका पात्र पुरुष दुसरा नव्हता हें निश्चित. पण, आपली तरी तशी पुरेपूर तयारी आहे का, असा प्रश्न त्यांचें मन त्यांना विचारीत होतें. "सर्व बाजूंनीं अंधार आणि ढग यांनीं झाकळून टाकलेल्या अज्ञात प्रदेशांत मी शिरत आहें असेंच वाटतें." असे उद्गार त्यांनीं यासंबंधांत काढले होते. तथापि हे शब्द त्यांनीं ज्या काळांत लिहून ठेवले, त्याच काळांत म्हणजे १७८८ च्या शरदृतूंतच, त्यांची राष्ट्राध्यक्षपदीं निवड होणारच, असें धरून चालण्यास सर्वांनीं सुरुवात केली होती. प्रत्येक परिचित व्यक्ति त्यांच्याशीं बोलतांना त्यांना त्यांच्या भावी कर्तव्याची जाणीव देत असे, तर आपल्या आगामी सत्त्वपरीक्षेचा विचार स्वतः वॉशिंग्टन, कोणत्याहि प्रकारें उत्साहित न होतां करीत असत. १७८९ च्या एप्रिलमध्यें अपेक्षित बातमीची प्रतीक्षा करीत असतांना माउंट व्हरनॉनला आलेले आपले जुने मित्र हेन्री नॉक्स यांच्याजवळ मन मोकळें करीत वॉशिंग्टन म्हणाले होते :

"शासनप्रमुखाच्या खुर्चीवर माझी अवस्था फांशीं जाणाऱ्या गुन्हे-

गाराच्या अवस्थेपेक्षां कांहीं निराळी असणार नाहीं. जवळ जवळ सारें आयुष्य सार्वजनिक जबाबदाऱ्या वाहण्यांत गेल्यावर जीवनाच्या या सायंकाळीं शांत निरामय निवारा सोडून अडचणींच्या महासागरांत उडी घ्यायला मी अगदीं नाखूष आहें. आणि राजकीय कौशल्य, पात्रता आणि आवड अशा श्रेष्ठ जबाबदारीला आवश्यक गोष्टी माझ्या ठायीं नसतांना मला हें करावें लागत आहे. या सागर-यात्रेंत माझ्या देशबांधवांच्या व माझ्या नांवलौकिकाच्या नौकेंतून मी जात आहें हें मी जाणूं शकतों. पण या लोकप्रेमाचा मोबदला मी काय देऊं शकेन, हें एक देवालाच माहीत !"

**पहिली कारकीर्द : १७८९-१७९३**

पंधरा दिवसांनीं अत्युत्कंठेचा काळ संपला; पण मनांत निर्माण झालेल्या धास्तीचें मात्र निवारण होणार नव्हतें. वॉशिंग्टन यांनाच प्रत्येक मतदार गटाचें मत मिळालें. मासाच्युसेट्स् संस्थानांतले नेते जॉन ॲडम्स यांची उपाध्यक्षपदीं निवड झाली. वॉशिंग्टन न्यूयॉर्कला जावयास निघाले. धुळीनें भरलेल्या रस्त्यांवरून आठ दिवस त्यांचा प्रवास चालू होता. मार्गांत सर्वत्र त्यांचें प्रचंड स्वागत होत होतें. पुष्पवृष्टि होत होती. त्यांच्या मार्गावर पताका लावण्यांत आल्या होत्या. कमानी उभारण्यांत आल्या होत्या. ठिकठिकाणीं त्यांना मानपत्रें समर्पण करण्यांत येत होतीं. लष्करी सलाम्या दिल्या जात होत्या. "आपल्या प्रिय नेत्याचा आणि राष्ट्रसूत्रधाराचा" वृत्तपत्रांतून प्रचंड जयजयकार चालू होता.

बघणाऱ्यांच्या दृष्टीनें वॉशिंग्टन एक भव्य पुरुष होते; पण आंतल्या आंत मात्र त्यांना धास्तीनें पछाडलेलें होतें. जनतेच्या प्रेमाचा इतका धोधो वर्षाव झाल्यावर, त्यांच्या लोकप्रियतेबद्दल शंका घेणेंच शक्य नव्हतें. पण लोकांच्या या प्रेमाच्या प्रत्येक वर्षावागणिक त्यांच्या मनांतील चिंता मात्र सारखी वाढत होती. आपल्याला अतिमानव, पुरुषोत्तम म्हणून गौरविणारे आपले देशबांधव आपल्याकडून अतिमानवी कर्तृत्वाची अपेक्षा करतील, हें ते जाणून होते. आपल्यापुढील ज्या कार्याची निश्चित कल्पनाहि अद्याप पुरेशी साकार झालेली नाहीं, तें कार्य करण्याच्या कामीं आपण अपेशी ठरलो तर आपलें तें अपयश किती भयानक ठरेल, या नुसत्या कल्पनेनेंच त्यांना हादरा बसत होता. अटलांटिक किनाऱ्यापासून पंधराशें मैलपर्यंत पसरलेल्या अफाट प्रदेशांतील तेरा संस्थानांना राज्यघटनेच्या बंधनांत

अनुक्रम .................... दि: ...... ..........

गुंफण्याचें तें प्रचंड कार्य होतें. तेरापैकीं दोन संस्थानें अद्याप संघराज्याबाहेर होतीं. प्रत्येक संस्थान आपल्या 'परमप्रिय सार्वभौमत्वाला' जपण्यासाठीं धडपडत होतें. अशा आग्रही संस्थानांना ज्या घटनेच्या बंधनांत गोवावयाचें, तिचें स्वरूपहि अद्याप स्पष्ट झालेलें नव्हतें. नक्की लोकसंख्या किती असेल, याची मोजणी झालेली नव्हती; पण सुमारें चार कोटि लोकसंख्येचें शासन करण्याचा प्रश्न होता. त्यांत पुनः लोकसंख्येंत पांचांत एक असें निग्रोंचें प्रमाण होतें. राष्ट्रीयत्वाची भावना नुकतीच कुठें रुजूं लागली आहे असें राष्ट्र प्रजासत्ताकाचा प्रयोग करण्याला सरसावलेलें होतें. शिवाय तें राष्ट्र कर्जबाजारी होतें, बाहेरच्या शत्रूंचा उपद्रव होताच, – उद्यां या सर्व प्रयोगांतून वाइटांत वाईट फलनिष्पत्ति हातीं पडली तर ?...... वॉशिंग्टन यांच्या मनांतील चिंतेचें स्वरूप हें असें होतें.

तथापि, वॉशिंग्टन यांच्या मुख्य गुणांपैकीं, धीर खचूं न देणें हा एक गुण होता. अतिचिंतेमुळें कांहीं माणसें निष्क्रिय बनतात किंवा दिशाहीन कार्योत्साहानें एकदम पछाडलीं जातात. वॉशिंग्टन यांच्यावर अतिचिंतेचा परिणाम मात्र असा झाला नाहीं. विशिष्ट प्रकारची जादा सावधानता त्यांच्यांत आली, पण त्याचबरोबर आपल्या पुढील कार्यावर लक्ष केंद्रित करण्याचा त्यांचा निर्धार खूपच कडवा बनला.

१७८९ मध्येंहि वॉशिंग्टनसारख्या जनतेच्या दृष्टीनें महापुरुष ठरलेल्या व्यक्तीकडे अश्रद्धेनें बघणारे एक दोघे तरी होतेच. अशा एखाद्या कडवट टीकाकाराला अमेरिकेच्या इतिहासांतील अत्यंत महत्त्वाच्या वेळीं, तिचा शासनप्रमुख सर्व अपेक्षा पूर्ण करणार नाहीं, असें वाटण्याची शक्यता होतीच. कारण, त्या वेळींहि अनेक खाजगी प्रश्नांत वॉशिंग्टन यांचें मन गुरफटलेलें होतें. खाजगी कर्जाचा बोजा होता. आपल्या गैरहजेरींत माउंट व्हरनॉनची योग्य व्यवस्था कशी राहील, ही चिंता होती. न्यूयॉर्क येथील निवासस्थानाच्या सजावटीकडेहि त्यांचें लक्ष गुंतलेलें होतें. शिवाय, सेवानिवृत्त जीवन जगण्याची जी घोषणा त्यांनीं केली होती ती खोटी ठरली, अशी टीका प्रत्यक्षांत कोणी करीत नसलें तरी देखील स्वसमर्थनाची गरज वाटत असल्यामुळें वॉशिंग्टन त्याबाबत खुलासे करण्यांत गुंतलेले असत. त्यामुळें मुख्य गोष्टींकडे दुर्लक्ष करून किरकोळ तपशीलाकडेच लक्ष देण्यांत शक्ति व वेळ यांचा अपव्यय करणाऱ्या माणसासारखें त्यांचें वर्तन दिसे. निदान पेन्सिल्व्हानियाचा सिनेटर विल्यम मॅक्ले याच्या मर्मभेदी आणि आदरभावशून्य

नजरेला तरी वॉशिंग्टन तसेच दिसले. राष्ट्राध्यक्षपदाचा स्वीकार करतांना वॉशिंग्टन यांनीं केलेल्या भाषणाबद्दल कांहींशा आश्चर्यानें आणि कुत्सितपणानें मॅक्ले यानें पुढील उद्‌गार काढले होते :

"अगदीं तोफेच्या तोंडीं असतांना किंवा बंदूक रोखलेली असतांना-सुद्धां हा थोर पुरुष जितका घाबरला किंवा बावरला नसेल तितका बोलतांना घाबरट वाटत होता. त्यांचें शरीर थरथरत होतें आणि जें भाषण त्यांनीं अनेकदां वाचून काढलेलें होतें, तें वाचतांनादेखील ते सारखे अडखळत होते."

आणि वॉशिंग्टन यांचे हावभाव अडाणी माणसासारखे होते व त्यांचा पोषाख विक्षिप्त वाटत होता, अशीहि टीका मॅक्ले यानें केलेली होती. अमेरिकेंत तयार झालेल्या लोकरीच्या कापडाचा पोषाख त्यांनीं परिधान केला होता व युरोपांत राजदरबारी समारंभाच्या वेळीं धारण करतात तशी तलवार त्यांनीं कमरेला लटकावलेली होती आणि पांढरे पायमोजे घातलेले होते. त्यांच्या भाषणांतहि विशेष संस्मरणीय असें कांहींच नव्हतें. अत्यंत विचारपूर्वक लिहिलेलें, समाधान-कारक, पण औपचारिक असें तें भाषण होतें. त्यांत भव्यता वा दिव्यता कोठेंच प्रतीत होत नव्हती.

तथापि मॅक्लेवर झाली तशी प्रतिक्रिया बहुसंख्य लोकांवर मुळींच झाली नाहीं. उलट, वॉशिंग्टन राष्ट्राध्यक्षपदावर आरूढ झालेले बघण्यासाठीं समारंभाला उपस्थित झालेल्या असंख्य लोकांचीं हृदयें उचंबळूनच आलीं होतीं. त्याच्या हालचालींत सफाई न दिसो, पण लोकांच्या दृष्टीनें त्यांचा हा 'गुन्हा' सर्वस्वीं माफ होता. इतकेंच नव्हे तर वॉशिंग्टन यांच्यावरील त्यांची श्रद्धा अधिकच बळावली. राष्ट्रांत आपल्याला अद्वितीय स्थान लाभलें आहे, त्याची जाणीव वॉशिंग्टन यांना कधींपासूनच झाली होती. पण या प्रसंगानें त्यांची निर्विवाद खात्री पटली, तें स्थान हेंच आपलें अमोल भांडवल आहे, हें त्यांना पुरेपूर कळून चुकलें. इतरहि कांहीं गोष्टी त्यांना अनुकूल होत्या. सरकारी जमाबंदीविषयक प्रश्नांचे ते तज्ज्ञ नव्हते कीं राजकीय डावपेंचांत तरबेज नव्हते. राज्यघटनाविषयक प्रश्नांचे ते पंडित नव्हते कीं परराष्ट्रीय राजकारणाचा प्रत्यक्ष अनुभव असलेले मुत्सद्दी नव्हते. पण सरसेनापति या नात्यानें आणि घटना तयार करणाऱ्या परिषदेचे अध्यक्ष या नात्यानें काम करतांना शासनयंत्रणेच्या या व इतर अंगांशीं त्यांचा कांहींसा

परिचय झालेला होता. शिवाय, विधानसभेचे सदस्य या नात्यानें विल्यम्सबर्ग येथें व अन्यत्रदेखील कांहीं अनुभव त्यांनीं गांठीला बांधलेला होताच. आणि उच्च राजकारणाच्या कलेच्या बाबतींत त्यांच्यामध्यें कांहींहि उणीवा असल्या तरी ते एक प्रामाणिक, व्यवहारचतुर आणि पद्धतशीरपणें काम करणारे प्रशासक खास होते. नव्या सरकारांत नोकऱ्या वा अधिकाराच्या जागा मिळाव्यात म्हणून अनेक लोकांकडून त्यांच्यावर विनंतीपत्रांचा वर्षाव झाला होता; पण आपल्या सराईत नम्रपणानें पण स्पष्टपणानें त्यांनीं याबाबत कोणालाच कसलींच आश्वासनं देण्यास नकार दिलेला होता. न्यूयॉर्कला येतांना त्यांच्या अंतःकरणावर प्रचंड दडपण असलें तरी त्यांचे ' हात अगदीं स्वच्छ होते '.

सुदैवानें १७८९ च्या उन्हाळ्यांत कोणत्याच महासंकटाची तलवार राष्ट्राच्या डोक्यावर लटकत नव्हती. कॅांग्रेसच्या अधिवेशनाची सुरुवात अगदीं सावकाश झाली आणि पहिले कांहीं दिवस कामकाजाची पद्धति वगैरे किरकोळ प्रश्नांच्या चर्चेंतच निघून गेले. कॅांग्रेसमधील वातावरण संपूर्णपणें खेळीमेळीचें आणि प्रसन्नतेचें मात्र मुळींच नव्हतें. मध्यवर्ती सरकारची राजधानी कोठें असावी, याबद्दल जी प्रदीर्घ रस्सीखेच चालू होती ती बघतां, प्रांतीय हेवेदावे, मत्सर, स्पर्धा या गोष्टी अद्याप जिवंत आहेत, हें सिद्ध होत होतें. याशिवाय अधिक मूलभूत स्वरूपाचे मतभेद होण्याचीं चिन्हेंहि दिसत होतीं. असें असलें तरी कॅांग्रेसनें आणि एकूण राष्ट्रानें फारसा घोळ न घालतां राज्यघटनेला मान्यता दिली होती, हें विशेष होतें. घटनेंत आवश्यक असलेल्या दुरुस्तीचें ' बिल् ऑफ् राइट्स् ' तयार झालें, संस्थानांकडे पाठविण्यांत आलें व फारशा भानगडी न माजतां संस्थानांनीं त्यावर शिक्कामोर्तबमुद्रा केलें. पाठोपाठ उत्तर कॅरोलिना आणि -होड बेट हीं संस्थानेंहि संघराज्यांत सामील झालीं. सार्वदेशीय न्याययंत्रणा उभारण्याची घटनेंतील तरतूद प्रत्यक्ष अमलांत आणणारा न्यायालय-विषयक कायदादेखील १७८९ मध्यें मंजूर झाला. वॉशिंग्टन राष्ट्राध्यक्षपदावर आरूढ झाल्यापासून थोड्याच महिन्यांच्या आंत, घटनेचा प्रत्यक्ष अंमल सुरू झाला. फिलाडेल्फिया येथें तयार झालेला आराखडा जणुं स्वयंप्रेरणेनें भव्य इमारतींत साकार होऊं लागला. राष्ट्राच्या राजकीय व्यवहाराच्या तत्त्वांची संहिता या दृष्टीनें निर्विवादपणें घटनेचा स्वीकार होत होता. अमेरिकेच्या ऐक्याचें प्रतीक म्हणून वॉशिंग्टन यांच्याकडे जसें पाहिलें जात होतें, तद्वतच घटनेला ऐक्याचें

एक पवित्र आणि अधिक चिरस्थायी प्रतीक असें स्वरूप प्राप्त होऊं लागलें होतें. अमेरिकन जनता जॉर्ज वॉशिंग्टन यांच्याकडे जितक्या आदरानें बघत होती, त्यापेक्षांहि अधिक आदरभावनेनें प्रातिनिधिक शासनसंस्थेची कल्पना जनता शिरोधार्य मानूं लागली होती. त्या कल्पनेचा अर्थ निरनिराळे लोक निरनिराळ्या प्रकारांनीं लावीत होते. अनेकदां कॅाँग्रेसमधील वादविवाद द्वेषभावनेनें डागळलेले असत, तर कधीं कधीं या वादविवादांचें स्वरूप अगदींच क्षुद्र असे. पण ही सारी चर्चा घटनेच्या चौकटींत असे. संसदीय व्यवस्थेचा अमेरिकनांना अनुभव तसा पाहिला तर दीर्घकालीन होताच; त्याच चौकटींत सर्व चर्चा होत असे. राज्यघटना अमलांत आणतां येत होती, कारण तिची अंमलबजावणी करण्याची इच्छा बहुसंख्य अमेरिकनांची होती. घटनात्मक चौकटींत काम करण्याचें संवयीनें लागलेलें कौशल्य लोकांत नसतें आणि घटना राबविण्याला सुसंवादी असें लोकमत अनुकूल नसतें, तर वॉशिंग्टन यांची सारी मेहेनत आणि आवाहनें फोलच ठरलीं असतीं.

आणखी एका गोष्टीमुळें वॉशिंग्टन यांचा मार्ग सुलभ झाला होता. जुन्या शासनयंत्रणेच्या ठळक ठळक अशा सर्व अंगांचा वारसा नव्या सरकारकडे आला होता. त्यामुळें प्रत्यक्ष कारभारांत एक प्रकारें सातत्य राहूं शकलें. निरनिराळ्या खात्यांचा कारभार खंड न पडतां पुढें चालू राहिला. कारभारासाठीं चांगली माणसेंहि राष्ट्राध्यक्षांना मिळूं शकलीं. पूर्वीच्या कॅाँग्रेसचा चिटणीस विल्यम जॅक्सन याच्यासारखा माणूस एक चिटणीस म्हणून राष्ट्राध्यक्षांना मिळूं शकला. टोबियास लिअर, डेव्हिड हम्फ्रेज, वगैरे मोजक्या पण कार्यक्षम चिटणिसांच्या जोडीला ही भर चांगलीच होती. कारभाराचीं सर्व खातीं जशींच्या तशीं चालवायला मिळणें हा फायदा होताच, पण विशेष म्हणजे या खात्यांच्या कांहीं प्रमुख अधिकाऱ्यांचा वॉशिंग्टन यांना पूर्वानुभवहि होता. घटनेंत सरकारी खात्यांचा उल्लेख असला तरी तो अप्रत्यक्ष स्वरूपाचा होता. तीं खातीं राष्ट्राध्यक्षांच्या अधिकारकक्षेंत आणण्यासाठीं कॅाँग्रेसला आवश्यक तो कायदा करावा लागला. कोणाहि खातें-प्रमुखाला काढून टाकण्याची वा नवा खातेंप्रमुख नेमण्याची महत्त्वाची सत्ता राष्ट्राध्यक्षाकडे असावी कीं नसावी, यावर बरीच भवति न भवति होऊन अखेर ती सत्ता राष्ट्राध्यक्षाकडेच असावी, असें त्या कायद्यांत नमूद करण्यांत आलें.

मासाच्युसेट्सचे हेन्री नॉक्स हे युद्धमंत्री होते, त्यांना त्याच जागेवर वॉशिं-

ग्टन यांनीं ठेवलें. युद्धकाळांत नॉक्स हे तोफखान्याचे मुख्याधिकारी होते. १७८४ पासून कॉंग्रेसचे परराष्ट्रमंत्री असलेले न्यूयॉर्क परगण्याचे जॉन जे यांना सर्वोच्च न्यायालयाचे पहिले सरन्यायाधीश नेमण्यांत आलें. परराष्ट्रखात्याची पुनर्रचना करण्यांत आली व जे यांच्या जागीं परराष्ट्रमंत्री म्हणून वॉशिंग्टन यांनीं आपले तल्लख बुद्धीचे मित्र आणि व्हर्जिनियाचे रहिवासी थॉमस जेफर्सन यांची नेमणूक केली; दुसरे एक व्हर्जिनियाचे रहिवासी एडमंड रॅन्डॉल्फ यांचें घटनेबद्दल असलेलें प्रतिकूल मत मध्यंतरींच्या काळांत निवळलें होतें. त्यांची नेमणूक ॲटर्नी जनरल म्हणून करण्यांत आली. परराष्ट्रखात्याइतकेंच महत्त्वाचें खातें म्हणजे अर्थखातें. या खात्याच्या कारभारासाठीं एक छोटी समिति आतां-पर्यंत होती. समितीऐवजीं तें खातें वॉशिंग्टन यांनीं एकाच व्यक्तीकडे सोपविलें. ती व्यक्ति म्हणजे न्यूयॉर्कचे ॲलेक्झांडर हॅमिल्टन हे होत. हॅमिल्टन यांचें वय त्या वेळीं पसतीसपेक्षां जास्त नव्हतें. पण, योद्धा या नात्यानें, वकील या नात्यानें आणि घटनापंडित या नात्यानें हॅमिल्टन यांनीं आपली योग्यता सिद्ध केलेली होती. टपालसंघटना, पूर्वीच्या अर्थखात्याच्या समितीचे एके काळचे सदस्य सॅम्यु-एल ओसगुड यांना पोस्टमास्तर जनरल म्हणून नेमून, त्यांच्याकडे सोंपविण्यांत, आली. हीं सर्व माणसें समाजांतलीं सुप्रतिष्ठित व वजनदार माणसें होतीं आणि आपल्यावर सोंपविण्यांत आलेल्या जबाबदारीचा सर्वांना थोडाबहुत अनुभवहि होता. ज्यांनीं अमेरिकेला स्वातंत्र्य प्राप्त करून देण्याच्या कार्यांत आणि संयुक्त-राज्य-निर्मितीच्या कार्यांत या ना त्या प्रकारें आपला वांटा उचलला होता, अशीं बहुतेक प्रमुख माणसें त्या वेळीं न्यूयॉर्कला एकवटलीं होतीं. व्हर्जिनियाचे जेम्स मेडिसन हे सीनेटवर निवडून येऊं शकले नसले तरी, प्रतिनिधि-सभेंतील अग्रेसर नेत्यांपैकीं ते एक होते.

घटनेंत अलिखित असलेल्या गोष्टी प्रत्यक्ष अमलांत आणण्यासाठीं कॉंग्रेसनें केलेल्या कायद्यांची अंमलबजावणी करण्याव्यतिरिक्त वॉशिंग्टन यांना आतां-पर्यंत दुसरें कांहीं करावें लागलं नव्हतें. अद्याप कांहीं गोष्टी विवाद्यच होत्या. राष्ट्राध्यक्षपदाचें निश्चित स्वरूप काय असावें, या प्रश्नाचा अजून निकाल लागलेला नव्हता. कांहीं अधिकार आणि कर्तव्यें या बाबतींत कॉंग्रेसच्या उभय शाखांबरोबर राष्ट्राध्यक्ष सहभागी असला तरीदेखील, त्यानें कांहींसें अलिप्त असलें पाहिजे, हें तत्त्व ढोकळ मानानें वॉशिंग्टन यांना व इतरांना मान्य होतें.

फिलाडेल्फियाच्या घटनापरिषदेंत राष्ट्राध्यक्षाची जागा पगारी जागा ठेवण्याच्या कल्पनेला बेंजामिन फ्रँकलिन यांनीं विरोध केला होता. ब्रिटनमधील अनुभव बघतां, 'सन्मानाचें पद', 'उत्पन्नाची जागा' झाल्यास अतिरिक्त महत्त्वाकांक्षा आणि द्रव्यलालसा यांचें थैमान सुरू होतें, असा मुद्दा फ्रँकलिन यांनीं आपल्या भूमिकेच्या समर्थनार्थ मांडला होता. सरसेनापति असतांना वॉशिंग्टन यांनीं खर्चापुरता भत्ता घेण्याव्यतिरिक्त वेतन घेतलेलें नव्हतें. आणि आतांहि राष्ट्राध्यक्षपदाचा स्वीकार करण्याच्या वेळीं केलेल्या उद्‌घाटनाच्या भाषणांत त्यांनीं विनावेतन काम करण्याची तयारी दाखविली होती. त्यांची ही सूचना कॉंग्रेसनें स्वीकारली असती तर आर्थिक दृष्ट्या त्यांनीं सर्वनाशच ओढवून घेतला असता. पण त्यांच्या सुदैवानें आणि त्यांच्या मालमत्तेचा वारसा नंतर ज्यांच्याकडे गेला, त्यांच्या सुदैवानें कॉंग्रेसनें, राष्ट्राध्यक्षाचा वार्षिक तनखा पंचवीस हजार डॉलर असावा, असा निर्णय घेतला. १७८९ सालच्या मानानें हा तनखा म्हणजे खूपच मोठी रक्कम होती. कॉंग्रेसच्या सभासदांना दैनिक सहा डॉलर भत्ता मिळे. अर्थमंत्री व परराष्ट्रमंत्री यांचा तनखा ३५०० डॉलर ठरविण्यांत आला होता. या मंत्र्यांपेक्षां राष्ट्राध्यक्षाची आर्थिक पातळी खूपच उंच ठेवण्यांत आली.

आतां अर्थातच मग, राष्ट्राध्यक्षानें पुरेशा उच्च राहणीमानानें राहिलें पाहिजे, अशी अपेक्षा केली जाणें स्वाभाविकच होतें. पण, उंच म्हणजे किती उच्च राहणीमान, हा कूटप्रश्नच होता. या प्रश्नाचें अचूक आणि निर्दोष उत्तर मिळणें शक्यच नव्हतें. वैभवांत राहिल्यास मॅक्लेसारख्या माणसांचा विरोध ओढवून घेण्याचा धोका होता. कांहीं अमेरिकन लोकांना राजेशाही पाहिजे आहे, अशी टीका मॅक्लेसारखे लोक करीतच असत. याउलट, फार काटकसरीची राहणी ठेवली तर राष्ट्राध्यक्षाच्या पदाबद्दल तिरस्कार निर्माण होण्याचा धोका होता. या दोन्ही टोकांमधला सुवर्णमध्य वॉशिंग्टन यांनीं काढला. त्यामुळें बहुतेक देशबांधव खूष झाले. उद्‌घाटनाच्या भाषणाच्या वेळीं वॉशिंग्टन यांनीं जो पोषाख केला होता, तो सुप्रतिष्ठित अमेरिकन सद्‌गृहस्थाचा होता. वॉशिंग्टन यांनीं अशा सुप्रतिष्ठित अमेरिकन सद्‌गृहस्थाला शोभेल अशीच राहणी ठेवली. त्यानंतर राष्ट्राध्यक्षाचा किताब काय असावा, असा प्रश्न होता. "हिज हायनेस, युनायटेड स्टेट्स् ऑफ् अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष आणि त्या राष्ट्राच्या स्वातंत्र्याचे संरक्षक"

असा राजपदाला शोभेसा किताब असावा, अशी सूचना जॉन ॲडॅम्स यांनीं सीनेटच्या अध्यक्षपदावरून केली. पण, हा किताब अगदीं साधा असावा, असें सभागृहाचें मत होतें. त्याप्रमाणें फक्त 'प्रेसिडेंट ऑफ् दि युनायटेड स्टेट्स् ऑफ् अमेरिका' म्हणावें, असा सूर सभागृहांत दिसला. स्वतः वॉशिंग्टन यांच्या मतें " हिज मायटिनेस, दि प्रेसिडेन्ट ऑफ् दि युनायटेड स्टेट्स् ऑफ् अमेरिका " असें संबोधन असावें असें होतें. तथापि त्यांनीं शहाणपणानें या चर्चेपासून अलिप्त राहून वाद तसाच थंड होऊं दिला. अखेर, " मिस्टर प्रेसिडेन्ट " असें साधेंच संबोधन प्रचारांत आलें.

मेजवान्या, सार्वजनिक स्वरूपाच्या भेटीगांठी यांसंबंधींचें धोरणहि वॉशिंग्टन यांनीं व्यवहारचातुर्यानें ठरविलें. माउंट व्हरनॉन येथें त्यांच्या घराचे दरवाजे सर्वांना सदासर्वदा खुले असत. ती परिस्थिति न्यूयॉर्क येथें ठेवणें शक्य नव्हतें. म्हणून आपल्या सल्लागारांच्या सल्ल्याप्रमाणें त्यांनीं भेटायला येणाऱ्यांसाठीं ठराविक वेळीं कचेरींत उपस्थित राहण्याचा उपक्रम सुरू केला. ही औपचारिक भेटीची वेळ संपल्यानंतर खास पाहुण्यांसाठीं मेजवान्या दुपारीं असत. खाजगी निमंत्रणांचा ते कधीं स्वीकार करीत नसत. फक्त नाटकांची आवड असल्यामुळें मित्रांसमवेत कधीं कधीं ते नाट्यगृहांत उपस्थित रहात असत. त्याचप्रमाणें, सल्लागारांच्या सल्ल्याप्रमाणेंच संयुक्तराज्याच्या निरनिराळ्या भागांत दौरे काढण्याचा कार्यक्रम, त्यांनीं ठरविला होता. त्याप्रमाणें १७८९ मध्यें न्यू इंग्लंडमध्यें दौरा काढला तर त्यानंतर दोन वर्षांनीं दक्षिण भागाचा दौरा काढला होता.

या साऱ्या गोष्टींत औपचारिकता फार आहे, असें कोणी कदाचित् म्हणेल. आणि कॉंग्रेस व वॉशिंग्टन यांच्या संबंधांना औपचारिक हेंच विशेषण योग्य ठरलें असतें खास. तसें पाहिल्यास कॉंग्रेस आणि राष्ट्राध्यक्ष यांचें परस्परांशीं वर्तन चांगलें असे; पण चांगली वागणूक म्हणजे कांहीं खेळीमेळीची वागणूक नव्हे. राष्ट्राध्यक्षांच्या निवेदनाला कॉंग्रेसकडून औपचारिक स्वरूपाचीं उत्तरें येत असत. आणि मग उत्तराला प्रत्युत्तर, प्रयुत्तराला प्रत्युत्तर असा प्रकार चालू राही. राज्य-घटना तयार करणाऱ्यांनीं कधीं अपेक्षा केली नव्हती असा प्रकार हळूहळू प्रत्यक्षांत दृग्गोच्चर होऊं लागला. राष्ट्राध्यक्ष आणि सीनेट यांच्यामधील अंतर हळूहळू वाढत चाललें. कदाचित् असें होणें अपरिहार्य होतें. सरकारच्या सर्व खात्यांना आपले हक्क आणि सवलती यांची तीव्र जाणीव झालेली होती व कांहीं पायंडे, परंपरा

पडत चालल्या होत्या. तथापि राष्ट्राध्यक्ष व सीनेट यांच्यांतील वाढत्या अंतरामुळें अनेकांना आश्चर्य व चिंता वाटत होती. वास्तविक सीनेट म्हणजे राष्ट्राध्यक्षाचें अंतर्वर्तुळ ठरावें अशी अपेक्षा होती; पण सीनेटच वॉशिंग्टन यांच्यापासून चार हात दूर राहण्याचा प्रयत्न करूं लागले. वॉशिंग्टन स्वतः जातीनें एकदांच सीनेटच्या बैठकीला उपस्थित राहिले होते. परराष्ट्रीय राजकारण ही शासनप्रमुख आणि सीनेट यांची संयुक्त जबाबदारी मानली गेली होती व त्याच प्रश्नावरील विचारविनिमयासाठीं ते स्वतः बैठकीला उपस्थित राहिले होते. पण ही बैठक निराशाजनक आणि अपेशी ठरली. मॅक्ले यांच्या म्हणण्यावर विश्वास ठेवून बोलायचें झाल्यास, त्या बैठकींत वॉशिंग्टन फार तापलेले आणि अधीर वृत्तीचे दिसले. त्यांच्या म्हणण्याला तावडतोब रुकार देण्याला सीनेट नाखूष दिसतांच ते चिडून निघून गेले.

तथापि मॅक्लेसुद्धां एक गोष्ट कबूल करतो. ती ही कीं, सभातहकुबीनंतर जेव्हां वॉशिंग्टन परत आले तेव्हां त्यांची वृत्ति चांगलीच खेळीमेळीची दिसली. सीनेटच्या बैठकीला उपस्थित रहाण्याचा प्रयोग वॉशिंग्टन यांनीं पुनः कधींच केला नाहीं. त्याचप्रमाणें सीनेटशीं असलेले संबंध घातक ठरण्याइतके दुरावतील, असेंहि कांहीं करण्याचा हट्टीपणा त्यांनीं कधीं दाखविला नाहीं. कांहीं असलें तरी, वॉशिंग्टन यांना सल्ला देण्यासाठीं फार चांगलीं माणसें त्यांच्या हाताशीं होतीं. राष्ट्राध्यक्षीय कारकीर्दीच्या पहिल्या एक-दोन वर्षांत जेम्स मेडिसन यांच्याशीं वॉशिंग्टन यांचे संबंध अत्यंत घनिष्ठ होते. मेडिसन वारंवार वॉशिंग्टन यांच्याकडे येत असत, त्यांचे कागदपत्र तयार करून देत असत आणि घटनाविषयक प्रश्नावर सल्लाहि देत असत. पहिली राष्ट्राध्यक्षीय कारकीर्द संपल्यावर सेवानिवृत्त होण्याचा वॉशिंग्टन यांचा इरादा होता. त्या वेळीं करावयाच्या निरोपाच्या भाषणाचा मसुदा १७९२ सालीं मेडिसन यांनींच तयार केला होता. आणि नंतर चार वर्षांनीं वॉशिंग्टन यांनीं जें निरोपाचें भाषण केलें आणि संस्मरणीय भाषण म्हणून ज्याला स्थान लाभलं आहे, तें भाषण म्हणजे मेडिसन यांनींच तयार केलेला वरील मसुदा होय. वॉशिंग्टन हे सल्ल्यासाठीं ॲलेक्झांडर हॅमिल्टन यांच्यावरहि फार अवलंबून असत. हॅमिल्टन यांच्या खालोखाल जॉन जे आणि उपाध्यक्ष ॲडॅम्स यांच्यावरहि ते अवलंबून असत. हळूहळू निरनिराळ्या खात्यांच्या प्रमुखांवर ते अधिकाधिक विसंबूं लागले. ही गोष्ट ठरवून झाली असें

नव्हे. कारण राष्ट्राध्यक्षाचें स्थान पंतप्रधानाचें आहे, अशी कोणाचीच कल्पना नव्हती. तथापि प्रत्यक्ष व्यवहारांत तसेंच घडलें. त्यांच्या पहिल्या कारकीर्दीच्या अखेरीअखेरीस खातेंप्रमुखांची गणना 'मंत्रिमंडळ' म्हणूनच होऊं लागली. मंत्रिमंडळ हा शब्दहि उपयोगांत येऊं लागला. अर्थात् त्या वेळीं ती कल्पना बाल्यावस्थेंत होती.

त्याचप्रमाणें पूर्वनियोजित नसलेली अशी आणखी एक घटना घडत होती. राष्ट्राच्या क्षितिजावर पक्षपद्धतीचा उदय होऊं लागलेला दिसूं लागला होता. विरोधी गटांमधील तीव्र तेढीचें केंद्रस्थान वॉशिंग्टन बनले. इतकें कीं, अखेर वॉशिंग्टन आणि मेडिसन यांचे संबंध पूर्णपणें तुटले गेले. मेडिसन यांना वाटूं लागलें कीं, कोणत्याहि सुधारलेल्या राष्ट्रांत पक्षीय स्पर्धा आणि गटबाजी यांचें अस्तित्व अपरिहार्यच होतें. अशा विविध गटांचा समन्वय साधणें अपरिहार्यपणें कॉंग्रेस व राष्ट्राध्यक्ष यांचें काम आहे, असें मेडिसन यांना वाटत होतें. वॉशिंग्टन यांनाहि पक्षपद्धतीच्या उदयाची कल्पना आलीच होती. नेहमींच्या प्रांतिक चढाओढीच्या जोडीला आतां सर्व देशांत घटनेच्या प्रश्नावरील गंभीर मतभेदामुळें तट पडले आहेत, ही गोष्ट राष्ट्राध्यक्ष होण्यापूर्वीच त्यांना आढळून आलेली होती. त्यांची तर कल्पना होती कीं, निवडणुकींत फेडरॅलिस्टांना विरोधी असलेले लोक आपल्याविरुद्ध मतदान करण्याची शक्यता आहे.

राज्यघटना मंजूर झाल्यानंतर मतभेद कमी होतील, अशी वॉशिंग्टन यांची व त्यांच्या मताच्या इतर पुढाऱ्यांची कल्पना होती. पण त्यांची निराशा झाली. मतभेद निवळण्याऐवजीं अधिक विकोपालाच जाऊं लागले. १७८७-१७८८-मध्यें राज्यघटनेला पाठिंबा देणारे होते त्यांचा एक गट पडला; तर राज्यघटनेवर आक्षेप घेणाऱ्यांचा दुसरा गट पडला. एक गट स्वतःला फेडरॅलिस्ट म्हणवून घेऊं लागला, तर दुसरा गट ॲन्टी-फेडरॅलिस्ट या नांवानें वावरूं लागला. आपल्या नवजात राष्ट्राचें स्वरूप कसें असावें, याबद्दलच्या आपपाल्या कल्पना दोन्ही गट ठासून उंच आवाजांत मांडूं लागले. तशी पक्षविभागणी खऱ्या अर्थानें अद्याप झालेली नव्हती. मेडिसन आणि रॅन्डॉल्फ यांच्यासारख्या कांहीं नेत्यांचीं मतांतरें झालीं. एकाच कुटुंबांत भिन्न राजकीय भूमिका घेणारे लोक होते. उदाहरणार्थ, प्रतिनिधि-सभेंतले फेडरॅलिस्टांचे कट्टर पुरस्कर्ते फिशर एम्स यांचा कडवा राजकीय शत्रु खुद्द त्यांचा भाऊ नाथानील एम्स हाच होता. फिशर वारले तेव्हां

त्यांच्या दफनविधीला नाथानील उपस्थित राहिला नाहीं. त्या अंत्यविधीचा उपयोग फेडरॅलिस्ट आपल्या प्रचारासाठीं करीत आहेत, असें कारण त्यानें आपल्या अनुपस्थितीबद्दल दिलें होतें. नाथानील याच्या दृष्टीनें फेडरॅलिस्ट म्हणजे मुरब्बी लोकांचा गट ( Prigarchy ) होता. पण वस्तुतः हे लोक सधन वर्गाचे होते. मुख्यतः व्यापारी, वकील वर्गांतले आणि पूर्व भागांतले हे लोक होते. त्यांचे विरोधक ( त्या वेळच्या परिभाषेंतील 'मोबोक्रॅट्स्'–फेडरॅलिस्टांना 'मोनोक्रॅट्स्' म्हटलें जाई ) निरनिराळ्या कारणांसाठीं एकत्र आले होते. या लोकांना अद्याप सत्ताशाली राष्ट्रीय शासनयंत्रणेची कल्पना नावडती होती. प्रशासकीय सत्ता असावी हेंहि त्यांना मंजूर नव्हतें. "सरकार या संस्थेनें सोज्वळतेचा गुण गमावला आहे," असें टॉम पेनप्रमाणेंच त्यांचें मत होतें. इतर कांहीं विरोधकांचा, विशेषतः पश्चिम आणि दक्षिण विभागांतील लोकांचा फेडरॅलिस्टांवर आक्षेप होता तो असा कीं, ते स्वार्थी धंदेवाले आहेत.

या मतभेदांतून माजलेला संघर्ष वॉशिंग्टन यांना वीट आणणारा आणि अस्वस्थ करणारा वाटे, याचीं किमान चार कारणें होतीं. संघराज्याच्या स्थैर्याला धोका निर्माण व्हावा, ही त्यांना खेदाची गोष्ट वाटत होती. दुसरें कारण असें कीं, हें भांडण त्यांच्या स्वतःच्या कार्यक्षेत्रांत म्हणजे शासनयंत्रणेच्या आखाड्यांत चालू होतें. तिसरें कारण म्हणजे त्या भांडणाची झळ परराष्ट्रीय धोरणाला लागत होती. चवथें कारण म्हणजे खुद्द त्यांच्या स्वतःच्या नांवलौकिकाला त्या भांडणापायीं बाध येत होता.

राष्ट्राध्यपदावर आपण आरूढ होणेंच अत्यावश्यक आहे, असें वाटल्यावरूनच वॉशिंग्टन यांनीं १७८९ मध्यें त्या पदाची जबाबदारी स्वीकारली होती. तसें वाटण्याच्या मुळाशीं त्यांचा स्वतःचा अहंकार होता असें नव्हे, तर असंख्य अमेरिकनांनीं त्यांना तसें बजावलें होतें. नौकानयनाची उपमा वापरावयाची झाल्यास, गलबताच्या मध्यभागीं कप्तानाची जागा असते त्या जागेवर वॉशिंग्टन यांनीं उभें राहाणें अत्यावश्यक होतें. अमेरिकेची पहिली निकड आत्मविश्वास बाणणें ही होती, असें वॉशिंग्टन यांना वाटत होतें. 'जसजसा काळ जाईल तसतसा विकास होईल,' हें संयुक्तराज्याचें सूत्रवाक्य होतें, असें म्हणायला हरकत नाहीं. आपल्या निरोपाच्या भाषणांत वॉशिंग्टन यांनीं म्हटलें होतें, "कोणत्याहि मानवी संस्थेचें स्वरूप निश्चित होण्यासाठीं कालावधि जावा लागतो आणि सवयी बाणाव्या लागतात.

सरकारच्या बाबतींतहि हीच किमान आवश्यकता आहे. " संयुक्त राज्याची वाटचाल एकदां योग्य मार्गावर सुरू झाली कीं पुढें सारें कांहीं ठीकठाक होईल, असा त्यांचा होरा होता. शांतता व संरक्षण यासाठीं थोडेंसें आरमार, सैन्य आणि पोलिसदल असलें, महसूल वसूल करण्याची व्यवस्था असली, कायद्याचें पालन होत असलें, राष्ट्रीय भावना जागृत झाली कीं मग इतर गोष्टी आपोआप आकारतील, असें वॉशिंग्टन यांना वाटे. तें त्यांचें तत्त्वज्ञान होतें असें म्हणा. अमेरिका आणि संघराज्य यांचा पाया भक्कम आहे, महान् राष्ट्राचे सारे गुण या राष्ट्रांत आहेत, याबद्दल त्यांना शंका नव्हती. अत्यंत सूक्ष्म परिशीलन करून शैलीदार भाषेंत मांडलेला सिद्धान्त असें त्यांच्या मताचें स्वरूप नसलें तरी केवळ स्वतःचा उत्साह कायम ठेवण्यासाठीं कांहीं ते अशीं मतें घोषित करीत राहात नसत. त्यांना मनापासून वाटत असलेल्या त्या गोष्टी होत्या, तशी त्यांची श्रद्धा होती.

आणि म्हणून, काँग्रेसनें केलेल्या कायद्यांपुरता विचार केल्यास वॉशिंग्टन प्रशासनप्रमुख या भूमिकेपेक्षां ' चीफ मॅजिस्ट्रेट 'चीच भूमिका वजावीत असत. त्यांचे अर्थमंत्री ॲलेक्झांडर हॅमिल्टन यांची भूमिका अधिक निश्चित स्वरूपाची होती. " राज्यघटना म्हणजे एखादी अचल इमारत नव्हे; तिनें प्रगतीचीं पावलें टाकीत राहिलेंच पाहिजे; नाहीं तर तिची परागति होईल, " असें त्यांचें म्हणणें होतें. ' देशाच्या व्यवहाराच्या आघाडीवर रहाणें ' आणि ' परिस्थिति निर्माण करणें ' हें राजकीय नेत्याचें कर्तव्य आहे, असें डेमॉस्थेनिसच्या भाषेंत हॅमिल्टन प्रतिपादीत असत. राष्ट्रांत आत्मविश्वास निर्माण केला पाहिजे, त्याचा परिपोष केला पाहिजे, असें ते म्हणत. आणि ' राजकीय नेता ' म्हणजे आपण स्वतःच, अशी त्यांची भूमिका होती.

अमेरिकेच्या इतिहासांतील अत्यंत आकर्षक व्यक्तिमत्त्वाच्या पुरुषांमध्यें हॅमिल्टन यांची गणना होते. अविश्वसनीय वाटावा इतक्या चांगुलपणामुळें वॉशिंग्टन हे आपल्याला रहस्यमय पुरुष वाटतात. तर त्याच्या अगदीं विरुद्ध कारणांसाठीं हॅमिल्टन हे रहस्यमय पुरुष वाटतात. अत्यंत आश्चर्यजनक विरोधी गुण आणि विसंगति यांनीं यांचें व्यक्तिमत्त्व घडविलें गेलेलें दिसतें. ते कधीं सेवाभावी वाटतात, तर कधीं संधिसाधू; कधीं व्यवहारचतुर, तर कधीं बेदरकार; कधीं व्यवहारी, तर कधीं स्वप्नाळू; कधीं अतिचिकित्सक, तर कधीं गचाळ; कधीं तिरसट तर कधीं सात्त्विक; – अशीं आलटूनपालटून त्यांच्या व्यक्तित्वाचीं अंगें दिसून

येत असत. कोणत्याहि काळांतील कोणत्याहि राष्ट्राध्यक्षाला असा माणूस तापदायकच वाटला असता. सरकारी यंत्रणेचा सारा तपशील ठरलेला नसतांनाच त्या अत्यंत आत्मविश्वासू आणि असामान्य कार्यक्षम तरुणानें शासनयंत्रणेवर इतकें वर्चस्व प्रस्थापित केलें होतें कीं, ते पंतप्रधान असून वॉशिंग्टन हे केवळ घटनात्मक राजा आहेत, असेंच वाटावें.

हॅमिल्टन यांची महत्त्वाकांक्षा काय होती, तो प्रश्न बाजूला ठेवला तरी आपलें स्थान पंतप्रधानासारखें आहे, असें त्यांना वाटावें याला कारणें होतीं. ब्रिटिश राज्यव्यवस्थेचा त्यांनीं सखोल अभ्यास केला होता आणि ब्रिटिश राज्यघटनेविषयीं त्यांच्या मनांत आदरभाव होता. हॅमिल्टन यांच्या काळांत ब्रिटनचा पंतप्रधान असलेला विल्यम पिट हा त्यांच्यापेक्षांहि वयानें लहान होता आणि पंतप्रधानकीबरोबरच अर्थखात्याची देखील जबाबदारी पिटकडेच होती. अमेरिकेच्या जमाबंदीविषयक व्यवहाराला कांहीं तरी नियमित वळण लावणें अगत्याचें होतें, त्यामुळें वॉशिंग्टन यांच्या पहिल्या कारकीर्दींत हॅमिल्टनप्रणीत योजनांना महत्त्व येणें अपरिहार्य होतें. शिवाय, हॅमिल्टन यांच्या नेमणूकपत्राची भाषा अशी होती कीं, सर्व खातें-प्रमुखांत त्यांच्याकडे एक खास कामगिरी–राष्ट्राध्यक्ष व काँग्रेस यांच्यामधील मध्यस्थाची भूमिका – आहे, असें सहज गृहीत धरतां यावें. शिवाय दुसरे महत्त्वाचे खातेप्रमुख म्हणजे परराष्ट्रमंत्री म्हणून नेमले गेलेले थॉमस जेफर्सन पहिले सहा महिने आपल्या पदावर रुजू होऊं शकले नव्हते. हे पहिले सहा महिने अत्यंत महत्त्वाचे होते. त्या कालावधींत सर्वच महत्त्वाच्या प्रश्नांवर वॉशिंग्टन यांना हॅमिल्टन यांचाच सल्ला घ्यावा लागे; परराष्ट्रीय धोरणाबाबतहि सल्ला घ्यावा लागे. हॅमिल्टन अर्थातच सल्ला देण्यास सदैव तत्पर असत.

याचा परिणाम अंतिमतः भयानकच ठरला. कारण लौकरच जेफर्सन आणि हॅमिल्टन यांचे खटके उडूं लागले. अमेरिकेच्या इतिहासांत मूलभूत स्वरूपाचे राजकीय तट पडण्याला जेफर्सन-हॅमिल्टन तेढ फार मोठ्या प्रमाणांत कारणीभूत झाली, असें म्हणतां येणार नाहीं. इतिहासांतील अनेक संघर्षांच्या मानानें या दोघांतील ध्येयवादात्मक मतभेद फार मोठ्या स्वरूपाचे होते असें नव्हे. तथापि त्यांचा संघर्ष तीव्र होता आणि अमेरिकेंतील राजकीय मतभेदांचें प्रतिबिंब दोघांच्या संघर्षांत उमटलेलें होतें, हें नाकारतां येणार नाहीं. थॉमस जेफर्सन यांचें व्यक्तिमत्त्व हॅमिल्टनपेक्षांहि भव्य होतें, असें म्हणतां येईल. पण ते हॅमिल्टन-

पेक्षां कमी भांडखोर होते. एखाद्या भांडणांत व्यक्तिशः गुरफटले जाण्याची हॅमिल्टन यांच्यासारखी हौस जेफर्सन यांना नव्हती. आणि उच्चस्थानीं विराजमान होण्याची आकांक्षा तर मुळींच नव्हती. धोक्याच्या उच्चपदाचें आकर्षण त्यांना नव्हतेंच. हॅमिल्टन यांची वृत्ति याच्या उलट होती. हॅमिल्टन यांनीं चढाई करणाऱ्या लष्करी तुकड्यांचें नेतृत्व केलें होतें. यॉर्कटाउनच्या संग्रामांत तेथील तटबंदीवर तुफानी हल्ला चढविण्याचें नेतृत्व करणारा हा पुरुष पुनः हात पोळून घ्यायला सदैव सज्ज असे. आणि आपल्या अर्थमंत्रिपदाच्या जबाबदारीबरोबरच युद्धमंत्र्याचें काम आणि परराष्ट्रमंत्र्याचें काम सांभाळण्याचा प्रसंग येतांच त्यांनीं मागेंपुढें पाहिलें नव्हतें. जेफर्सन यांनीं योद्धा म्हणून कधीं रणांगण गाजविलें नव्हतें कीं लष्करी गुणांचा दिमाखहि त्यांच्यांत नव्हता.

तें कांहीं असलें तरी, या दोघां पुरुषांचे खटके उडूं लागले. हे खटके वारंवार उडत आणि त्यांचें स्वरूप अत्यंत भडक असे. राज्यघटनेंत 'बिल ऑफ् राइट्स्'चा अंतर्भाव केल्यानंतर जेफर्सन यांचें घटनेबाबत पूर्ण समाधान झालेलें होतें. तथापि जेफर्सन, मेडिसन प्रभृतींच्या मतें हॅमिल्टन यांचीं धोरणें अतिरिक्त फेडरॅलिस्ट होतीं व कमालीचीं नाठाळ होतीं. त्या धोरणांना वॉशिंग्टन यांनीं संमति दिली, त्यांतलीं बरींचशीं धोरणें अमलांतहि आलीं आणि अमेरिकेच्या जीवनांत त्यांचें स्थान इतकें सर्वसाधारण स्वरूपाचें ठरून गेलें आहे कीं, त्या धोरणांवर इतकें वादळ कां उठावें, हें आज आपल्याला आकलन होऊं शकत नाहीं.

वादळ उठण्याचें मुख्य कारण असें होतें कीं, हॅमिल्टनप्रणीत धोरणांकडे परंपरावादी व व्यापारी वर्गांतील लोक जास्त आकर्षिले गेले, तर पुरोगामी गटांना आणि शेतकरी वर्गाला तीं धोरणें नापसंत होतीं. त्या वेळच्या परिस्थितींत दोन्ही गटांत तडजोड घडवून आणणें अत्यंत बिकट होतें. कारण हा ना तो गट असंतुष्ट राहाणें अपरिहार्यच होतें. १७९० सालीं हॅमिल्टन यांनीं मुख्यतः अमेरिकेला असलेल्या कर्जाचा प्रश्न हाताळला. हें कर्ज अमेरिकेच्या क्रांतियुद्धाच्या वेळीं झालेलें होतें. एकूण कर्ज आठ कोटी डॉलर होतें. त्यांपैकीं पंचवीस टक्के कर्ज संस्थानांचें होतें. या कर्जाच्या विविध रोख्यांची किंमत आतांपर्यंत खूपच घसरलेली असली तरी त्या सर्व कर्जांच्या परतफेडीची जबाबदारी सरकारनें स्वीकारावी, अशी हॅमिल्टन यांची भूमिका होती. राष्ट्रीय कर्जाच्या रोख्यांची दर्शनी किंमत

ठराविक व्याजाच्या कायम स्वरूपाच्या कर्जरोख्यांच्या रूपानें द्यावी आणि संस्थानांच्या कर्जांची जबाबदारी राष्ट्रीय देणें म्हणून दर्शनी किमतींतच, मध्य सरकारनें घ्यावी, असें हॅमिल्टन यांनीं सुचविलें. हा प्रश्न राष्ट्राच्या स्वाभिमानाचा आहे आणि राष्ट्रांत विश्वास निर्माण करण्याचा आहे, या मुद्द्यावर हॅमिल्टन यांनीं फड जिंकला. दोन्ही मुद्दे वॉशिंग्टन यांना पटले. हॅमिल्टन यांच्या योजनेविरुद्ध अनेक मुद्दे मांडण्यांत येत होते. पण सर्वांत ज्या मुद्द्यावर तीव्र स्वरूपाचें रण माजलें तो मुद्दा असा होता कीं, हॅमिल्टन यांची योजना शेअर बाजारांतील सट्टेवाल्यांना श्रीमंत बनविणारी आहे. त्या वेळीं कर्जरोखे ज्यांच्या मालकीचे होते, ते कांहीं मूळ मालक नव्हते. लोकांनीं देशप्रेमानें युद्धकाळांत कर्जरोखे विकत घेतले होते व अडचण येतांच बट सोसून विकून टाकले होते. म्हणजे आतां त्या रोख्यांची दर्शनी किंमत सरकारनें मान्य करणें म्हणजे कावेबाज पूर्वप्रांतीय लोकांच्या पदरांत फायद्याचें माप टाकणें होय, असें विरोधकांचें म्हणणें होतें. आपल्या योजनेचा परिणाम असा होणार आहे, याची जाणीव हॅमिल्टन यांना चांगलीच होती. तथापि या प्रश्नाकडे ते निराळ्या दृष्टीनें बघत होते. आर्थिक हितसंबंध गुंतल्यामुळें प्रत्येक गट संयुक्त राज्याला अधिक चिटकून राहील आणि त्यामुळें संयुक्त राज्याचा पाया अधिक भक्कम होईल, असा त्यांचा कयास होता. आणि हा कयास बरोबर होता.

हॅमिल्टन यांच्या योजनेचा तपशील जसजसा उजेडांत येऊं लागला, तसतसा जेफर्सन यांच्या रागाचा पारा चढत गेला. कारण, कायम स्वरूपाच्या ठराविक व्याजाच्या कर्जरोख्यांच्या रूपानें जुनें कर्ज दर्शनी किमतीला फेडावें आणि संस्थानांच्या कर्जांची जबाबदारी स्वीकारावी, या योजनेला कॉंग्रेसनें संमति द्यावी, यासाठीं जेफर्सन यांनीं वजन खर्चीं घालावें म्हणून जी तडजोड झाली होती, तिचा जमाबंदीविषयक प्रश्नांशीं सुतराम् संबंध नव्हता. म्हणून, जेफर्सन यांना वाटूं लागलें कीं, हॅमिल्टननें आपल्याला हातोहात बनविलें आहे. जी तडजोड झाली होती ती राष्ट्राच्या राजधानीचें ठाणें असावें याबाबतची होती. राजधानीच्या प्रश्नावर उत्तर भागांतील प्रतिनिधींनीं दक्षिण भागांतील प्रतिनिधींच्या बाजूनें मत दिलें होतें. त्यामुळें राजधानीचें ठिकाण फिलाडेल्फियासारखें दूर न राहतां पोटोमॅकच्या तीरापर्यंत जवळ येऊं शकणार होतें. खरोखर हा निकाल दक्षिणेंतील संस्थानांना अनुकूल होता. वॉशिंग्टन यांना तर तो मोठाच समाधानकारक वाटला असेल. कारण

त्यांच्या वास्तव्याच्या ठिकाणापासून पोटोमॅक फक्त थोड्याच मैलांवर होती. पण हॅमिल्टन राज्यघटनेला फेडरॅलिस्टांच्या भूमिकेवरून जें वळण देत होते, त्याच्या पार्श्वभूमीवर हा विजय अगदीं पोकळ वाटण्यासारखा होता.

१७९१ च्या प्रारंभीं एक दिवस तर राष्ट्राध्यक्षांच्या पुढाऱ्यांतच अर्थमंत्री आणि परराष्ट्रमंत्री यांचा भयंकर खटका उडाला. राष्ट्रीय बँक स्थापन करण्याचा हॅमिल्टन यांचा इरादा होता. ही बँक सरकारच्या छत्राखालीं स्थापन व्हावयाची होती. आपली योजना त्यांनीं प्रतिनिधि-सभेला सादर केली. ही योजना म्हणजे त्यांनीं तयार केलेल्या अनेक मसुद्यांतला अत्यंत उत्कृष्टपणें कौशल्यानें तयार केलेला मसुदा होय. या योजनेविरुद्ध इतकी प्रचंड ओरड सुरू झाली कीं, वॉशिंग्टन यांनीं आपल्या खातेप्रमुखांना आपापलीं निवेदनें लेखी सादर करण्यास सांगितलें. राष्ट्रीय बँक स्थापणें इष्ट कीं अनिष्ट या प्रश्नापेक्षां तशी बँक स्थापणें घटनेला धरून होईल कीं नाहीं, याबाबतच लेखी मतें सादर करावींत, असें त्यांनीं सांगितलें. हॅमिल्टन यांनीं अर्थातच नेहमींच्या कौशल्यानें बँक स्थापणें घटनेला धरूनच होईल, असें सिद्ध करून दाखविण्याचा प्रयत्न केला. याउलट तितक्याच किंबहुना जास्त बौद्धिक कौशल्यानें जेफर्सन यांनीं सिद्ध करून दाखविलें कीं, घटनेची चौकट इतक्या मर्यादेपर्यंत ताणतां येणार नाहीं. आतां वॉशिंग्टन यांच्यापुढें प्रश्न पडला कीं, अशा परिस्थितींत आपण काय करावें ? कारण, दोन नेत्यांच्या मतांत दोन ध्रुवांइतकें अंतर होतें. दोघांच्या भूमिकांतील अमुक एक संपूर्णतः समर्थनीय आहे, असें वॉशिंग्टन यांना वाटत नव्हतें. पण, काँग्रेसनें तद्विषयक विधेयक मंजूर देखील करून टाकलेलें असल्यामुळें त्याच्यावर शिक्कामोर्तब करणें किंवा तें फेटाळून परत पाठविणें हे दोनच पर्याय राष्ट्राध्यक्षांपुढें होते. आणि त्या विधेयकाचा कर्ताकरविता जेफर्सनऐवजीं हॅमिल्टन असल्यामुळें वॉशिंग्टन यांनीं त्यावर शिक्कामोर्तब करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर लौकरच आयातकराच्या उत्पन्नाच्या जोडीला नवी भर महसुलांत पडावी म्हणून हॅमिल्टन यांनीं अबकारी कराबाबतचें विधेयक काँग्रेसला सादर केलें. या कायद्यानें दारूवर जकात बसणार होती. बऱ्याचशा पश्चिमी शेतकऱ्यांचा दारू गाळणें हा मुख्य धंदा असल्यामुळें पुनः मतभेदांना एक कारण मिळालें.

राष्ट्रीय कर्जफेडीची योजना, संस्थानांच्या कर्जाची जबाबदारी स्वीकारण्याची योजना, राष्ट्रीय बँकेची योजना, अबकारी कराची योजना; — या सर्व गोष्टी

म्हणजे हॅमिल्टनच सर्वसत्ताधीश आहेत, असें ठामपणें सिद्ध करणाऱ्या आहेत, असें जेफर्सन आणि मेडिसन यांना वाटूं लागलें. हॅमिल्टनना जर आपल्या योजना देशावर लादण्यांत असेंच यश येत गेलें, तर ते अमेरिकेला खड्ड्यांत घालतील, असें त्यांना वाटूं लागलें. असें झालें म्हणजे मग, सुबुद्ध शेतकऱ्यांची सुशांत भूमि अमेरिकेला बनविण्याचें स्वप्न पार विरून जाईल आणि 'मोनो-क्रॅट्स्'ची पकड देशावर पक्की बसून युरोपमधील देशांची कळा अमेरिकेला येईल, अशी भीति वरील पुढाऱ्यांना वाटत होती. त्यांना आणखीहि भयानक चित्र दिसत होतें : कॉंग्रेसमध्यें मिरासदारांचा वुजबुजाट होईल आणि हा विषवृक्ष असाच वाढत राहिला तर वारसा हक्कानें राज्यावर येणाऱ्या घराण्याची राजसत्ता अमेरिकेच्या बोकांडीं बसेल, असें भावी काळाचें चित्र त्या लोकांपुढें होतें. यावर त्यांच्या दृष्टीनें उपाय एकच होता. तो म्हणजे हॅमिल्टन यांचा बीमोड करणें. पण या कामीं पुढाकार घेण्याला जेफर्सन नाखूष होते. वॉशिंग्टन यांच्याप्रमाणेंच आपल्या व्हर्जिनियांत परत जाऊन खाजगी नागरिकाचें निरामय जीवन जगण्याची तळमळ त्यांनाहि होती. पण, घटनांची गति स्वयंप्रेरित असते. हळूहळू स्वतःला ॲंटी फेडरॅलिस्ट म्हणविणाऱ्या लोकांचें नेतृत्व जेफर्सन, मेडिसन आणि त्यांच्या अन्य कांहीं सहकाऱ्यांच्या शिरावर येऊन पडलें. या ॲंटी-फेडरॅलिस्ट लोकांची युति योगायोगानें झालेली होती व प्रथम तो गट तसा संघटित नव्हता. पण तशा संघटितपणाची जाणीव आतां निर्माण होऊं लागली. या गटानें नवें नांव धारण केलें. ते स्वतःला डेमोक्रॅटिक रिपब्लिकन म्हणवूं लागले, किंवा नुसतेंच रिपब्लिकन म्हणवूं लागले.

वाढत्या फाटाफुटीचें एक चिन्ह म्हणजे १७९१ ऑक्टोबरमध्यें रिपब्लिकनांचें मुखपत्र 'नॅशनल गॅझेट' निघालें. फेडरॅलिस्टांवर टीका करणारीं पत्रें यापूर्वी अस्तित्वांत नव्हतीं असें नाहीं; पण जास्त परिणामकारक, नव्हे विदारक टीका करणारें हें पहिलेंच पत्र जन्माला आलें होतें. फेडरॅलिस्टांच्या 'गॅझेट ऑफ् दि युनायटेड स्टेट्स्'ला राष्ट्रीय पातळीवरून आव्हान देणारें हें पहिलेंच पत्र होतें. 'गॅझेट ऑफ दि युनायटेड स्टेट्स्' हें फेडरॅलिस्टांचें पत्र नवें सरकार अस्तित्वांत आलें तेव्हांच म्हणजे १७८९ सालींच निघालें होतें. या पत्राचा संपादक जॉन फेनो हा होता. हें पत्र हॅमिल्टन यांना सदैव पाठिंबा देत असें. विरोधी पत्राचा संपादक फिलिप फ्रेनो हा कवि होता. तो मेडिसन यांचा

मित्र असून कट्टर रिपब्लिकन होता. फेनोपेक्षां फ्रेनो अधिक धडाडीचा पत्रकार होता. परराष्ट्रखात्यांत तो भाषांतरकाराची अर्धवेळची नोकरी करीत होता. १७९२ च्या वादांत फ्रेनोच्या टीकेपुढें फेनोचा टिकाव लागेना, तेव्हां फेनोसाठीं निरनिराळ्या टोपण नांवांनीं लिहिणाऱ्या हॅमिल्टननीं फ्रेनोवर 'जेफर्सन यांचा साजिंदा' अशी टीका केली. या टीकेला फ्रेनोनें तितकेंच जळजळीत उत्तर दिलें.

नंतरच्या काळांतील लोकांना त्या वेळची परिस्थिति भयानक वाटणें स्वाभाविक आहे. राष्ट्राध्यक्षांचे दोन प्रमुख मंत्री, अत्यंत कडवट आणि मूलभूत वादांत प्रतिस्पर्धी म्हणून उभे होते. सार्वजनिक रणभूमीवर चाललेल्या या वाग्युद्धांत ते दोघे मंत्री पडद्याआड राहण्याचा कितीहि आव आणीत असले तरी तें उघडें गुपित सर्वांनाच माहीत होतें. इतर मंत्रीहि या ना त्या पक्षाला सामील होत होते. नॉक्सनें हॅमिल्टनचा पक्ष घेतला, तर रॅन्डॉल्फ आपल्या व्हर्जिनियन दोस्ताला-जेफर्सन यांना जाऊन मिळाले. परराष्ट्रीय राजकारणांत लक्ष घालण्याचा हॅमिल्टन यांचा प्रयत्न ( कदाचित् गुप्तपणें ) चालूच असे. इतर बाबतींतहि सुस्पष्ट लक्ष्मण रेषा आंखलेल्या नव्हत्या. पोस्टमास्टर जनरलच्या नियंत्रणाखालील दळण-वळण-संघटना हॅमिल्टन यांनीं आपल्या हातीं घेतली. वास्तविक ही संघटना परराष्ट्रमंत्र्याकडे सोंपविणें अधिक सुसंगत ठरलें असतें. याउलट, मध्यवर्ती सरकारनें सुरू केलेली नवी टांकसाळ वास्तविक अर्थखात्याकडे द्यावयास पाहिजे असतांना ती जेफर्सन यांच्याकडे सोंपविण्यांत आली होती. हा प्रकार म्हणजे सांवळा गोंधळ आणि वैमनस्य यांचा परिणाम होता काय ?

वॉशिंग्टन यांच्या काळाच्या दृष्टीनें बघितल्यास तसें म्हणतां येणार नाहीं. 'मंत्रि-मंडळा'ला आवश्यक ती सुसंबद्धताच आलेली नव्हती किंवा 'पक्षहि' तसे सुसंबद्धपणें संघटित झालेले नव्हते. शासकीय शाखांच्या प्रमुखांनीं तयार केलेले कार्यक्रम वा योजना स्वतः राष्ट्राध्यक्षांच्या आहेत, असें ढोबळमानानें आणि मोघमपणें म्हटलें जात असे. आणि या योजनांच्या मागें शासनयंत्रणेची एकमुखी भूमिका असली पाहिजे, ही कल्पना तर फारशी नव्हतीच. जेफर्सन आणि हॅमिल्टन हे दोघेहि राष्ट्राध्यक्षांविषयीं आदर बाळगणारे होते. आपण राष्ट्राध्यक्षांशीं एकनिष्ठ आहोंत आणि संघराज्याविषयींच्या आपापल्या भूमिकेशीं एकनिष्ठ आहोंत, अशी त्यांची दृढ भावना होती. वॉशिंग्टन यांच्या उपस्थितींत ते भांडत नसत. आणि त्यांच्या तक्रारी एकमेकांविरुद्ध होत्या; वॉशिंग्टन यांच्याविरुद्ध त्यांची कांहींच तक्रार

नव्हती. आणि त्या दोघांचा एकमेकांवर विश्वास नसला तरीसुद्धां त्यांच्या मनांत एकमेकांविषयीं आदर होता, हेंहि आपल्याला कबूल केलें पाहिजे. आणि दुफळी असली तरी अत्यंत भयंकर पेंचप्रसंग कांहीं निर्माण झालेला नव्हता. वॉशिंग्टन हे बरेचसे अलिप्त असत आणि कायद्याचे मसुदे तयार करणें व विधेयकें काँग्रेसपुढें मांडणें या गोष्टींशीं त्यांचा प्रत्यक्ष संबंध येत नसे. तथापि ते कांहीं मूर्ख किंवा बोटचेपे नव्हते. त्यांच्या पहिल्या कारकीर्दीत कोणीहि त्यांच्यावर हॅमिल्टन यांच्या हातच्या बाहुल्यासारखे भोळसर गृहस्थ असल्याचा आरोप कदापि केलेला नव्हता. क्रांतियुद्धाच्या काळांत हॅमिल्टन यांच्याशीं वॉशिंग्टन यांचा चार वर्षांचा निकट परिचय होता. त्या काळांत हॅमिल्टन हे वॉशिंग्टन यांच्या मदतनीस सेनाधिकाऱ्यांपैकीं एक होते. शासनयंत्रणेबद्दलचे हॅमिल्टन यांचे 'रूढिप्रिय' विचार फिलाडेल्फियाच्या घटनापरिषदेंत वॉशिंग्टन यांनीं ऐकलेले होते. हॅमिल्टन यांच्या तत्त्वप्रणालीबद्दल फ्रेनोसारखे टीकाकार काय म्हणतात, तें वाचण्याची भरपूर संधि वॉशिंग्टन यांना मिळत असे. त्या तरुण माणसाच्या बौद्धिक सामर्थ्याबद्दलची चांगलीच जाणीव वॉशिंग्टन यांना होती कदाचित् युद्धकाळांतच, म्हणजे १७७६ पासूनच वॉशिंग्टन यांना आढळून आलें असेल कीं, आपल्या या तरुण मदतनिसाला जमाबंदीविषयक आणि व्यापारविषक प्रश्नांकडे लक्ष देण्याची फार आवड आहे. त्याचप्रमाणें हॅमिल्टन यांच्या स्वभावांतील दोषांची जाणीव वॉशिंग्टन यांना होती, याबद्दलहि शंका नाहीं. खूप वर्षांपूर्वीं, म्हणजे १७८१ सालीं एका प्रसंगीं आपला अनादर झाला, असा गैरसमज करून घेऊन हॅमिल्टन चिडून ताबातोबानें वॉशिंग्टन यांच्या कचेरींतून बाहेर पडले होते, तेव्हांच त्यांच्या स्वभावाची कल्पना वॉशिंग्टन यांना आली असेल.

कांहीं असो, १७९२ साल म्हणजे वॉशिंग्टन यांच्या जीवनांतला एक अस्वस्थतेचाच काळ ठरला. ज्या पदावर आरूढ झाल्याचा आनंद त्यांना कधींच उपभोगतां आला नाहीं, त्या राष्ट्राध्यक्षपदावरून निवृत्त होण्याचा निर्णय त्या वर्षाच्या उन्हाळ्यांतच त्यांनीं घेतला होता. १७८९ सालीं मांडींत झालेल्या गळवाचें दुखणें आणि १७९० सालीं न्युमोनिया असे दोन मोठे आजार यापूर्वीं होऊन गेलेले होते. आणि आपली स्मरणशक्ति कमी होत आहे, अशा आशयाचे उल्लेख त्यांच्या या काळांतील पत्रांतून दिसतात. ते थकत चालले होते. जेफर्सनना त्यांच्या मॉटि-

सेलोची जितकी ओढ होती तितकीच, नव्हे अधिकच माउंट व्हरनॉनची ओढ वॉशिंग्टन यांना लागून राहिली होती. कॅंग्रेसचें अधिवेशन नसतांना त्यांचा मुक्काम माउंट व्हरनॉनलाच असे. आणि दूर असतांनाहि आपल्या नोकरांना, मुकादमांना पत्रें पाठवून सविस्तर सूचना ते देत असत.

पण, सेवानिवृत्त होणें शक्य होतें काय? संयुक्त राज्याची भरभराट होत होती. सरहद्दीवर रेड इंडियन लोकांशीं कटकटी चालू असल्या तरी या भरभराटीला अडथळा येत नव्हता. पण फेडरॅलिस्ट विरुद्ध रिपब्लिकन हें भांडण कमी होण्या-ऐवजीं वाढतच चाललें होतें. वॉशिंग्टन यांच्याशीं एकांतांत बोलतांना मेडिसन यांनीं त्यांना अगदीं गळ घालून विनविलें कीं, काय वाटेल तें झालें तरी राष्ट्राध्यक्षपदावरून निवृत्त होऊं नका. वॉशिंग्टन यांच्याखेरीज कोणीहि पुरुष–मेडिसन यांचे निकटवर्ति मित्र जेफर्सन सुद्धां–ऐक्य टिकवूं शकणार नाहीं, असें मेडिसन यांनीं मत व्यक्त केलें. उपाध्यक्ष जॉन ॲडॅम्स हे फेडरॅलिस्ट असल्याचा समज होता. शिवाय ते न्यूइंग्लंडचे रहिवासी होते आणि सामान्य वर्गातले गणले जात होते. जॉन जे यांना शत्रु कमींत कमी असले तरी त्यांचाहि कल फेडरॅलिस्टांकडेच होता. हॅमिल्टन हे कट्टर फेडरॅलिस्ट असल्यामुळें त्यांचा प्रश्नच नव्हता. मेडिसन यांनीं आपलें नांव त्या दृष्टीनें सुचविलें नाहीं; तरीसुद्धां ते स्वतः त्या दृष्टीनें ऐक्य टिकविण्याची करामत करूं शकणारे गृहस्थ नव्हते. कारण ते रिपब्लिकन होते. अपक्ष असे वॉशिंग्टन हे एकमेव पुरुषच त्या दृष्टीनें उपलब्ध होते.

वॉशिंग्टन यांनीं पुनः राष्ट्राध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारण्याचा निर्णय निश्चितपणें केव्हां घेतला, हें सांगतां येत नाहीं. कदाचित् त्यांनीं अशी आशा बाळगली असेल कीं, आपण जेफर्सन आणि हॅमिल्टन यांच्यांतील भांडण मिटवूं शकलों तर ती जबाबदारी स्वीकारूं शकणारा उमेदवार पुढें आणणें शक्य होईल. कांहीं असो, पण परिस्थिति सुधारण्यासाठीं त्यांनीं अतोनात कष्ट घेतले एवढें खास. हॅमिल्टन यांच्याविरुद्ध जवळ जवळ एकवीस आरोपांची लांबलचक यादी जेफर्सन यांनीं वॉशिंग्टन यांना सादर केली. "हॅमिल्टन प्रभृति फेडरॅलिस्टांना व त्यांच्या अधःगतित बगलबच्च्यांना विद्यमान व्यवस्थेंत बदल घडवून आणा-वयाचा आहे, शासनयंत्रणेचें प्रजासत्ताकीय स्वरूप बदलून त्यांना ब्रिटिश घटनेच्या धर्तीवर राजेशाही स्थापन करावयाची आहे," असा एक आरोप होता. वॉशिंग्टन यांनीं त्या यादीची नक्कल तयार केली आणि ती हॅमिल्टन यांना दिली. जेफर्सन

यांचें नांवहि त्यांनीं घेतलें नाहीं. निरनिराळ्या लोकांकडून केली जाणारी टीका आपल्यापर्यंत आली तीच सारांशरूपानें नमूद केलेली आहे, असेंच त्यांनीं हॅमिल्टन यांना सांगितलें. या यादीला हॅमिल्टन यांनीं सप्रमाण पण सात्त्विक संतापाच्या जोरदार प्रभावी भाषेंत उत्तर देऊन प्रत्येक आरोपाचा ठासून इन्कार केला.

तथापि वॉशिंग्टन यांनीं दोघां नेत्यांना जनहितासाठीं मतभेद मिटविण्याला प्रवृत्त करण्याचा प्रयत्न चिकाटीनें चालूच ठेवला. पण त्यांचीं उत्तरें निराशाजनक आणि अत्यंत ताठर स्वरूपाचीं होतीं. जेफर्सन यांनीं हॅमिल्टन यांच्याविरुद्ध असलेल्या पूर्वीच्या आरोपांचा पुनरुच्चार तर आपल्या उत्तरांत केलाच, पण आणखीहि नवे आरोप त्याला जोडले. हॅमिल्टन यांनीं दुफळीचा सारा दोष जेफर्सन यांच्यावर ढकलला आणि रिपब्लिकनांविरुद्ध चालविलेली मोहीम थांबविण्याचा प्रयत्न करण्यास साफ नकार दिला. वॉशिंग्टन यांना अधिक कांहींच करतां येणें शक्य नव्हतें. दोन्ही बाजूंना परस्परांविषयीं सहिष्णुवृत्ति ठेवा, अशी विनंति ते पुनः पुनः करीत राहिले. जेफर्सन यांनीं परराष्ट्रीय मंत्रिपदावरून निवृत्त होऊं नये, यासाठीं त्यांचें मन वळविण्यांत वॉशिंग्टन यांना यश आलें इतकेंच. दोघांपैकीं एकालाहि गमवावयाची वॉशिंग्टनना इच्छा नव्हती. दोघेहि असामान्य योग्यतेचे पुरुष होते. त्यांच्या सल्ल्यावांचून आपलें अडेल, असें वॉशिंग्टन यांना वाटे. शिवाय अधिकारपदावरून दूर झाल्यावरदेखील दोघे स्वस्थ बसणार नाहींत. दोघेहि आपापल्या चळवळी सारख्याच नेटानें चालू ठेवतील आणि जबाबदारीच्या पदाचें बंधन नसल्यामुळें अधिक बेदरकारपणें एकमेकांविरुद्ध तुटून पडतील, ही गोष्ट वॉशिंग्टन जाणून होते.

आणि कदाचित् वॉशिंग्टन यांना असेंहि वाटलें असेल कीं, हीं दोन टोकाचीं माणसें अधिकारपदावर असल्यामुळें एक प्रकारचा समतोल राखला जाईल. जेफर्सन जर मंत्रिमंडळांत नसतील तर हॅमिल्टन यांना हातपाय पसरायला अधिक वाव मिळेल आणि राजेशाही स्थापन करण्याचा प्रयत्न चालू आहे, या आरोपाला अधिकच बळकटी येईल, असेंहि वॉशिंग्टन यांना वाटलें असेल. राजेशाही स्थापण्याचा डाव आहे, हा आरोप फार गंभीरपणें विचार करण्याइतका भरीव आहे, असें त्यांना वाटत नव्हतें. १७८३ मध्यें कांहीं सेनाधिकाऱ्यांनीं जेव्हां अशी एक कल्पना सुचविली होती, तेव्हां वॉशिंग्टन यांना आश्चर्याचा धक्काच बसला होता.

आपल्या मदतीनें वॉशिंग्टन यांना युनायटेड स्टेट्सचा राजा बनतां येईल, असें या अधिकाऱ्यांनीं सुचविलें होतें. तें कांहीं असो, स्वतः वॉशिंग्टन यांना, स्वतः राजा बनणें किंवा इतर कोणाला राजा बनविणें ही कल्पना कधीं व्यवहार्य वाटली असेल, असें समजण्याला कांहींच कारण दिसत नाहीं. घटनेप्रमाणें एखाद्या राष्ट्राध्यक्षाला अनेकदां पुनः पुनः निवडून येणें तत्त्वतः शक्य होतें. पण यांत धोका आहे, असें जेफर्सन यांना वाटे, तसें वॉशिंग्टन यांना मात्र वाटत नसावें असें दिसतें. तथापि राजेशाहीच्या धोक्याबद्दल संशय व्यक्त केले जात होते आणि त्या संशयांचें निराकरण करण्याची वॉशिंग्टन यांची इच्छा होती. म्हणून जेफर्सन यांना सोडायला ते तयार नव्हते. याच्या उलट हॅमिल्टन हे मंत्रिमंडळांत नसतील तर हॅमिल्टन यांनीं केलेल्या कांहीं चांगल्या गोष्टींचें उच्चाटण करण्याची संधि रिपब्लिकन साधतील असें वाटत होतें. हॅमिल्टन यांच्या उपाययोजना चांगल्या ठरल्या आहेत, असें वॉशिंग्टन यांना वाटत होतें. शिवाय प्रांतीय पक्षपात आणि गटबाजी यांचा आरोप जर हॅमिल्टन यांच्यावर करावयाचा, तर जेफर्सन तरी कुठें त्या आरोपांतून मुक्त होते! जेफर्सन यांनीं दक्षिणेकडील संस्थानांचा पक्ष उचलून धरण्याची घोषणाच केलेली होती.

सारांश, आपल्या दोघां प्रमुख मंत्र्यांना त्यांच्या त्यांच्या पदावर ठेवणें वॉशिंग्टन यांना आवश्यक वाटत होतें आणि स्वतः राष्ट्राध्यक्षपदावर राहणेंहि भाग होतें. १७९२ च्या निवडणुकींतहि मतदार त्यांनाच निवडून देतील, ही गोष्ट उघड उघड सिद्धच होती. एकाच गटाला आपलें पारडें जड करतां येऊं नये, म्हणून दोन्ही गटांचीहि जरुरी होती. तद्वतच त्या दोन्ही गटांना आपली जरुरी आहे असें समाधान मानायलाहि वॉशिंग्टन यांना जागा होती. जेफर्सन आणि हॅमिल्टन या दोघांनींहि वॉशिंग्टन यांना राष्ट्राबद्दलच्या कर्तव्यापासून दूर जाऊं नका अशी गळ घातली. तसाच आग्रह रॅन्डॉल्फ, मेडिसन प्रभृति त्यांच्या निकटवर्ती असलेल्या नेत्यांनींहि केला. पुनः एकदां चार वर्षें त्या मोठेपणाच्या बेड्या घालून घेण्याला वॉशिंग्टन यांना तयार व्हावें लागलें. त्यांच्याबरोबर उपाध्यक्ष म्हणून जॉन ॲडॅम्स यांनाहि पुनः जबाबदारी स्वीकारावी लागली. भवितव्य इतकें भयाण दिसत होतें कीं, तो मोठेपणा म्हणजे सक्तमजुरीचीच शिक्षा होय, असेंच कोणीं म्हटलें होतें. स्वतःच्या आरोग्याचा बळी देऊन वॉशिंग्टन यांना राज्यघटनेचें जतन करण्याचें कर्तव्य करायलाच हवें होतें.

## दुसरी कारकीर्द : १७९३–१७९७

वॉशिंग्टन यांना पूर्वकल्पना आलेली होती किंवा नाहीं कोण जाणे, पण त्यांना साऱ्या आयुष्यभरांत जितकी टीका सोसावी लागली असेल, तिच्यापेक्षां जास्त टीकेचा भडिमार त्यांना आपल्या दुसऱ्या राष्ट्राध्यक्षीय कारकीर्दींत सोसावा लागणार होता. पहिल्या कारकीर्दीतच एकूण देशांत माजलेली दुफळी व प्रत्यक्ष शासनक्षेत्रांतील दुफळी यांमुळें ते आधींच चिंताग्रस्त होते. आतां तर परराष्ट्रीय धोरणाविषयींच्या गंभीर प्रश्नावर राष्ट्रांत तट पडल्यामुळें हा विसंवाद अधिक कर्कश बनण्याची शक्यता होती.

१७८९ सालीं वॉशिंग्टन यांची पहिली राष्ट्राध्यक्षीय कारकीर्द सुरू झाल्यानंतर थोड्याच काळांत फ्रान्समध्यें क्रांतीचा डोंब उसळला होता. १७९२ च्या शरद्-ऋतूंत इकडे वॉशिंग्टन हे हॅमिल्टन आणि जेफर्सन यांचे मतभेद मिटविण्याच्या प्रयत्नांत गर्क असतांना तिकडे फ्रान्सनें प्रजासत्ताक राज्य स्थापन केल्याची घोषणा केली होती. फ्रान्समध्यें कांहीं अतिरेकी प्रकार झाले होते हें खरें, पण फ्रान्सनें युनायटेड स्टेट्सच्या क्रांतीचा आदर्श समोर ठेवूनच क्रांति केली आहे, असें फ्रेंच क्रांतीबद्दल आस्था बाळगणाऱ्या अमेरिकनांना वाटत होतें. फ्रान्सची मानवी हक्कांची सनद म्हणजे जेफर्सन यांनीं तयार केलेल्या अमेरिकेच्या स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्याची सही सही नक्कल होती. आतां जगांत अमेरिका हें एकाकी प्रजासत्ताक राज्य राहिलेलें नव्हतें. पण १७९३ च्या मार्चमध्यें वॉशिंग्टन दुसऱ्यांदा राष्ट्राध्यक्षपदावर आरूढ होण्यापूर्वी कांहीं आठवडे आधींच फ्रेंच क्रांतिकारकांनीं सोळाव्या लुईचा शिरच्छेद केला होता आणि ब्रिटनबरोबर युद्ध पुकारलें होतें.

अमेरिकेसारख्या नवजात राष्ट्रापुढें खरोखरच गंभीर पेंचप्रसंग उभा राहिलेला होता. अमेरिकेला इतिहासांत केव्हांहि तटस्थता पाळणें इतकें सोपें ठरलेलें नाहीं. युरोपांतील महायुद्धांच्या वावटींत तर तटस्थता पाळणें अमेरिकेला अशक्य आहे, हेंच इतिहासानें सिद्ध केलेलें आहे. १७९३ सालीं परिस्थिति कमालीची तंग आणि नाजुक बनलेली होती. एका बाजूला फ्रान्स हें अमेरिकेचें दोस्त राष्ट्र होतें. यॉर्कटाउनच्या संग्रामांत फ्रान्सनें अमोल साह्य केलें होतें, याविषयीं वाटणाऱ्या कृतज्ञतेमुळें जुन्या जगांत जन्माला आलेल्या त्या प्रजासत्ताकाला नव्या जगानें

पाठिंबा दिलाच पाहिजे, असें वाटणें स्वाभाविक होतें. शिवाय तहकारारानेंहि साह्य करायला अमेरिका बांधलेली होतीच. आपलें शत्रुराष्ट्र जुलमी ब्रिटन आणि प्रजासत्ताक मित्रराष्ट्र फ्रान्स यांची जुंपली असतांना आपला पक्ष कोणता, हें दाखविण्याची टाळाटाळ करणें अमेरिकेला कसें शक्य होतें ?

दुसऱ्या बाजूला परिस्थिति अशी होती कीं, अमेरिका ब्रिटनशीं अधिक निकटवर्ती बंधनांनीं जखडलेली होती. स्वातंत्र्ययुद्धाच्या वेळेपर्यंत वसाहती आपल्या मूळ देशाप्रमाणेंच ब्रिटनप्रमाणेंच फ्रान्सला आपला परंपरागत शत्रु मानीत असत. स्वातंत्र्य संपादिल्यामुळेंहि ब्रिटनशीं सर्व प्रकारचे संबंध तोडल्यासारखें झालेलें नव्हतें. अनेक अमेरिकनांना ( त्यांत हॅमिल्टन प्रमुख होते ) तिसरा जॉर्ज आणि विल्यम पिट यांची ती भूमि, तिच्या सर्व दोषांसह, अद्याप जवळच्या नात्याची वाटत होती. अमेरिकेच्या परदेशी व्यापारांतला बहुतांश व्यापार बंद पडला असता, तर हॅमिल्टन यांनीं उभारलेली सर्व महसूल व्यवस्था कोलमडूनच पडली असती. शिवाय अमेरिकेंतील प्रजासत्ताक व्यवस्था आणि युरोपांत निर्माण झालेली प्रजासत्ताक व्यवस्था यांच्यांत फरक होता. युरोपांतलें प्रजासत्ताक रक्तमय क्रांतींतून जन्माला आलेलें होतें. अमेरिकेंतल्या टोरींना स्वातंत्र्याग्रांनीं कडकडीत निषेधाचा वर्षाव व कुचेष्टा याखेरीज दुसरी कसलीच शिक्षा केलेली नव्हती. फ्रान्समध्यें राजाबरोबरच राजपक्षीयांचीहि कत्तल झाली होती. वॉशिंग्टन यांचा प्रिय मित्र लफायेत हा कांहीं दिवस फ्रेंच क्रांतींतला एक नेता होता. पण १७९२ सालीं क्रांतीच्या सूत्रधारांच्या मर्जीतून तो उतरला आणि चार वर्षें त्याला ऑस्ट्रिया-मधील तुरुंगांत खितपत पडावें लागलें. इतर कांहीं सहकाऱ्यांप्रमाणें त्याचें डोकें उडविलें गेलें नव्हतें, हेंच त्याचें सुदैव म्हणावें लागेल.

अमेरिकेपुढील उघड उघड मार्ग एकच होता : तो म्हणजे तटस्थ रहाणें. वॉशिंग्टन यांना हाच एकमेव मार्ग दिसत होता आणि परस्परांशीं भांडणाऱ्या त्यांच्या सल्लागारांचेंहि या बाबतींत एकमत होतें. वॉशिंग्टन यांनीं तेंच धोरण घोषित केलें होतें. फ्रान्समधील लोकमताच्या समाधानासाठीं 'तटस्थता' हा शब्द न वापरण्याची सूचना जेफर्सन यांनीं केली होती. ती सूचना मान्य करून वॉशिंग्टन यांनीं आपल्या जाहीरनाम्यांत 'तटस्थता' या शब्दाचा कोठेंहि प्रत्यक्ष उपयोग केला नव्हता. नव्या फ्रेंच सरकारला त्यांनीं मान्यता दिल्याचें घोषित केलें होतें व त्या मान्यतेचें द्योतक म्हणून नव्या सरकारचा राजप्रतिनिधि

अमेरिकेंत ठेवण्याला मान्यता दिली होती. त्याप्रमाणें जेने हा नव्या फ्रान्सचा प्रतिनिधि अमेरिकेंत आला होता. अशा रीतीनें परिस्थिति स्पष्ट आणि निश्चित होती. पण थोड्याच कालांतरानें अमेरिकेंत या प्रश्नावर तीव्र वैचारिक गोंधळ माजला. अमेरिका सरकाररीत्या तटस्थ असेल, पण व्यक्तिशः अमेरिकन नागरिक कांहीं तटस्थतेच्या धोरणाला बांधले गेलेले नव्हते. फ्रेंच राज्यक्रांतीचा डोंब उसळल्या दिवसापासूनच अमेरिकन नागरिकांत या प्रश्नावर तट पडले होते. आणि आतां ही तणातणी बेफाम स्वरूपांत सुरू झाली होती. फ्रेंचांच्या पुरस्कर्त्यांनीं टॉम पेन यांचा 'मानवी हक्क' हा प्रबंध आपलें धर्मपुस्तक बनविलें आणि उमराव वर्गाच्या निषेधाचें आणि स्वातंत्र्याच्या जयजयकाराचें रान उठविलें. या लोकांनीं 'डेमॉक्रॅटिक क्लब' स्थापन केले. फ्रेंच प्रजासत्ताकाचा राजप्रतिनिधि जेने अमेरिकेंत आला, तेव्हां या लोकांनीं त्याचें प्रचंड स्वागत केलें. या दृश्यानें ब्रिटनविषयीं आपुलकी बाळगणारे लोक भयचकित झाले आणि त्यांनीं विरोधकाचा 'फूटपाडू माथेफिरू' म्हणून निषेध केला.

दीड शतकाच्या कालावधीनंतरहि सिंहावलोकनात्मक दृष्टीनें बघून या घटनांचें यथार्थ चित्र रेखाटणें किंवा वॉशिंग्टन यांच्या त्या परिस्थितींतील भूमिकेचें योग्य मूल्यमापन करणें त्रिकट ठरतें. अगदीं कडवे फेडरॅलिस्ट वगळले तर सर्व फेडरॅलिस्टांच्या दृष्टीनें त्यांचें स्थान नायकाचें आणि राष्ट्रीय प्रतीकाचेंच होतें. कोणत्याहि वादांत त्यांच्या नांवाचें आवाहन करून त्यांना फड जिंकतां येत असे. याउलट, नेमस्त वृत्तीचे रिपब्लिकन वगळले तर सर्व रिपब्लिकनांच्या दृष्टीनें वॉशिंग्टन यांना एक लांछन लागलेलें होतें--कळत वा नकळत ते फेडरॅलिस्टांच्या डावपेंचांना आणि कारस्थानांना बळी पडलेले आहेत असें त्यांना वाटे. आतांपर्यंतच्या आयुष्यांत पहिल्या प्रथमच अखंड आणि उघड टीकेचें लक्ष्य बनण्याचा प्रसंग वॉशिंग्टन यांच्यावर १७९३ सालांत आला होता. 'ईश्वर राजाचें रक्षण करो!' या सुरांत अमेरिकन लोक १७८९ सालीं 'ईश्वर आमच्या थोर वॉशिंग्टनचें रक्षण करो!' असें गाणें गात होते. पण १७९३ सालीं रिपब्लिकनपक्षीय वृत्तपत्रांतून, "वॉशिंग्टन दैवत नाहींत, ते स्खलनशील माणूसच आहेत. त्यांच्याभोवतीं नकली उमरावांचा आणि पावसाळ्यांतल्या छत्र्यांप्रमाणें उगवलेल्या सरदारांचा गराडा पडलेला आहे," अशी टीका होऊं लागली होती. आणखी दोनच वर्षांनीं फिलाडेल्फियांतील एका पत्रकारानें, 'राजकीय म्हातार-

चळ झालेला माणूस' आणि 'मिजासखोर सुलतान' या शब्दांत वॉशिंग्टन यांच्यावर टीका केली होती. याच पत्रकारानें १७९६ च्या अखेरीस लिहिलें होतें, "एखादी व्यक्ति एखाद्या राष्ट्राला भ्रष्ट करण्यास यापूर्वी कधींच जितकी समर्थ झाली नसेल तितकें वॉशिंग्टन यांनीं अमेरिकन राष्ट्राला भ्रष्ट केलें आहे."

इतकी अनादराची टीका हा अपवाद होता. बहुतांश समकालीन टीकेचा सूर आदरयुक्तच असे. तथापि, हे अपवाद म्हणजे त्या काळांत भावना किती भडकल्या होत्या, याचे द्योतक आहेत. कॉंग्रेसनें केलेल्या कायद्यांची अंमल-बजावणी करण्यासाठीं असलेल्या 'चीफ मॅजिस्ट्रेट'ला पक्षाचा म्होरक्या बनविण्यांत येत आहे आणि निःस्वार्थ देशभक्तीच्या नांवाखालीं फेडरॅलिस्ट ब्रिटनच्या हातांतील बाहुली म्हणून वागत आहेत, अशी भावना रिपब्लिकन पक्षीय लोकांच्या मनांत निर्माण झाली होती. फ्रान्सचें वर्तन गोंधळांत पाडणारें आहे आणि उबग आणणारेंहि आहे, हें त्यांनाहि मान्य होतें. उदाहरणार्थ, फ्रेंच प्रतिनिधि जेने इतक्या मर्यादेबाहेर वागूं लागला कीं, त्याला फ्रान्सनें परत बोलवावें, अशी विनंती करण्यांत जेफर्सन यांना वॉशिंग्टन यांच्याशीं सहमत होणें भाग पडलें. तथापि भूतकालापेक्षां भविष्यकाल आमचा आहे, या त्यांच्या भूमिके-प्रमाणेंच ब्रिटनपेक्षां फ्रान्स परवडलें, अशीच रिपब्लिकनांची भूमिका होती. अमेरिका खऱ्या मित्राशीं थंडपणानें वागते आणि खऱ्या शत्रूला मात्र पक्षपात दाखविते, असें रिपब्लिकनांना वाटत होतें. १७९४ मध्यें वॉशिंग्टन यांनीं जॉन जे यांना लंडन येथें, कांहीं अडून पडलेल्या प्रश्नांबाबत वाटाघाटी करण्यासाठीं पाठविण्याचें ठरविलें, तेव्हां त्या बातमीनें रिपब्लिकनांचा पारा चढला. कारण त्यांच्या दृष्टीनें फेडरॅलिस्ट असणारे जॉन जे हे 'इंग्रजाळलेले' होते. आणि झालेल्या तहाचा तपशील १७९५ च्या मार्चमध्यें अमेरिकेंत जाहीर झाला, तेव्हां तर आपल्या अशुभ शंका पक्क्या खऱ्या ठरल्याचें त्यांना आढळून आलें.

कारण, अमेरिकेच्या हक्काबद्दल आग्रह धरण्याऐवजीं जॉन जे यांनीं नमतें घेतलें आहे, असेंच त्या तहावरून वाटत होतें. पश्चिम अमेरिकेंतील जीं ठाणीं अद्याप ब्रिटनकडे होतीं आणि ज्या ठाण्यांचा उपयोग ब्रिटन रेड इंडियनांना चिथावण्या देऊन गडबड माजविण्याला प्रवृत्त करण्यासाठीं करीत असे, तीं सर्व ठाणीं खालीं करण्याचें ब्रिटननें या तहान्वयें मान्य केले होतें हें खरें. पण एवढी एकच नमूद करण्याजोगी अट ब्रिटननें मान्य केलेली होती. आणि तें सुद्धां

कांहीं नवें वचन नव्हतें. जुन्याच पण आजवर न पुऱ्या केलेल्या अभिवचनाची पूर्तता ब्रिटन करणार, एवढाच याचा अर्थ होता. याउलट तहांतल्या बाकीच्या साऱ्या अटी म्हणजे अमेरिकेनेंच ब्रिटनला दिलेल्या सवलती होत्या. शिवाय अनेक महत्त्वाचे प्रश्न पुढील वाटाघाटींचा हवाला देऊन तसेच लोंबकळत ठेवण्यांत आलेले होते. अर्थात् रिपब्लिकन पक्षीय लोकांकडून टीकेचा भडिमार सुरू झाला. इंग्रजाळलेले फेडरॅलिस्ट अमेरिकेचा जन्मसिद्ध हक्क ब्रिटनला विकून टाकीत आहेत ! जॉन जे हा देशद्रोही आहे ! ( जेच्या प्रतिमा जाळण्याची निदर्शनेंहि झालीं. ) फेडरॅलिस्ट हे खलपुरुष आहेत ! वॉशिंग्टन हे ' राजकीय भोंदू ' आहेत ! ते राष्ट्रपिता नसून राष्ट्राचे ' सावत्र बाप ' आहेत !...अशी टीका सुरू झाली. १७९५ साल आणि १७९६ चे कांहीं महिने या तहावर वाग्युद्ध चालू होतें. म्हणजे सिनेटनें त्या तहाला मान्यता दिल्यावर व राष्ट्राध्यक्षांनीं शिक्कामोर्तब केल्यावर देखील दीर्घकाल शाब्दिक तणातणी चालूच होती. ही तणातणी फुकट होती. तहाची अंमलबजावणी व्हायची ती झाली. जॉन जेचा विजय व्हायचा तो झालाच. याउलट, फ्रान्समधील अमेरिकन वकील जेम्स मन्रो या रिपब्लिकन गृहस्थांना १७९६ मध्यें वॉशिंग्टन यांनीं त्यांच्यावर ठपका ठेवून परत बोलावलें. जॉन जे यांनीं घडवून आणलेला तह हा फेडरॅलिस्ट पक्षापुरता नसून साऱ्या अमेरिकन राष्ट्रातर्फे झालेला तह आहे, अशी फ्रेंचांची खात्री पटवून देण्याची अशक्यप्राय कामगिरी बजावण्यांत मन्रो अपेशी ठरले म्हणूनच त्यांना परत बोलावण्यांत आलें होतें हें उघड आहे, असें रिपब्लिकनांना वाटलें.

वॉशिंग्टन यांच्या दुसऱ्या कारकीर्दीतील परराष्ट्रीय धोरणासंबंधांत रिपब्लिकन पक्षाची भूमिका वरीलप्रमाणें होती. अंतर्गत राजकारणांतहि त्यांचा फेडरॅलिस्टांविषयींचा दूषित ग्रह अनेक प्रकारें दिसून येत होताच. जेफर्सन यांचा शब्द वापरून म्हणायचें झाल्यास हॅमिल्टन यांच्या ' तिरस्करणीय ' अबकारी कायद्याविरुद्ध इतका प्रचंड विरोध उभा राहिला कीं, त्या कायद्याच्या अंमलबजावणीसाठीं १७९२ सालीं वॉशिंग्टन यांना कडक भाषेंत वटहुकूम काढावा लागला. त्यानंतर दोनच वर्षांनीं, पश्चिम पेन्सिल्व्हानियांतील ' व्हिस्की बंडखोरां 'मुळें संयुक्त राज्याच्या सुरक्षिततेला धोका आहे, असें मत हॅमिल्टन यांनीं व्यक्त केल्यावरून वॉशिंग्टन यांनीं तिकडे मोठ्या प्रमाणावर जुजबी फौजेंतील तुकड्या रवाना केल्या होत्या. त्या ठिकाणीं प्रत्यक्षतः चकमकी झाल्याच नाहींत. कारण, रिपब्लि-

कनांचें म्हणणें असें कीं, बंडखोर झालेच नव्हते. हॅमिल्टन यांनीं आपल्या हेतूच्या सिद्धयर्थ बंडाचा फक्त बागुलबुवा उभा केला होता. सुमारें दीडशें पेन्सिल्व्हानियन नागरिकांना अटक करण्यांत आली. त्यांपैकीं दोघांना फांशीची शिक्षा ठोठावण्यांत आली. त्यांची शिक्षा नंतर वॉशिंग्टन यांनीं माफ केली, तथापि हॅमिल्टन यांचा दृष्टिकोन त्यांना पटलेला होता असें दिसतें. " डेमोक्रॅटिक सोसायट्यांचा संबंध बंडाशीं जोडून त्यांच्यावर ठपका ठेवायचा – त्या सोसायट्यांशीं कॉंग्रेसमधील रिपब्लिकनांचा संबंध जोडायचा- आणि आपल्या पक्षाचें नेतृत्व राष्ट्राध्यक्षांच्या गळ्यांत बांधण्यासाठीं या गोष्टींचा बाऊ करायचा हॅमिल्टन यांचा डाव आहे, " असें मत मेडिसन यांनीं व्यक्त केलें होतें. त्याआधीं एक वर्षापूर्वीच जेफर्सन यांनीं, ' तुम्हांला राष्ट्रप्रमुख म्हणून असलेल्या स्थानावरून भ्रष्ट करून पक्ष-प्रमुख बनविण्याचा हॅमिल्टनचा हेतु आहे, " असें वॉशिंग्टन यांना सांगितलें होतें. १७९४ च्या नोव्हेंबरमध्यें कॉंग्रेसपुढें केलेल्या वार्षिक भाषणांत वरील बंडाला जबाबदार म्हणून वॉशिंग्टन यांनीं " कांहीं स्वयंप्रेरित सोसायट्या " असा उल्लेख केला, तेव्हां त्यावर मतप्रदर्शन करतांना मेडिसन म्हणाले, " हा उल्लेख म्हणजे वॉशिंग्टन यांच्या जीवनांतली सर्वांत मोठी चूक कदाचित् ठरेल. "

त्या वेळच्या परिस्थितीचें स्वरूप रिपब्लिकनांच्या दृष्टीनें वरीलप्रमाणें होतें. स्वतः वॉशिंग्टन यांचा दृष्टिकोन काय होता ? ते स्वतः फ्रान्सच्या बाजूचे नव्हते कीं ब्रिटनच्या बाजूचे नव्हते. स्वातंत्र्यसंपादनानंतर देखील चालू असलेलें ' स्वातंत्र्ययुद्ध 'च आपल्याला करावयाचें आहे; पण त्यासाठीं प्रत्यक्ष युद्ध करावयाचें नाहीं, रणांगणाविना हा झगडा करावयाचा आहे, असा त्यांचा दृष्टिकोन होता. अमेरिकेच्या स्थैर्याला मुख्य धोका होता तो बाहेरूनच होय. कारण, अद्यापि स्वतःच्या इच्छेप्रमाणें कांहीं करण्यास असमर्थ अशी कांहींशी शरमेची अवस्था त्या वेळीं अमेरिकेची होती. अमेरिका पूर्णार्थानें अजून स्वतंत्र नव्हती; परिपक्व अवस्थेस पोहोंचलेलें राष्ट्र बनलेली नव्हती. एखाद्या जुन्या नाटकांतील, वयांत न आलेल्या नायिकेसारखी अमेरिकेची अवस्था होती. ही नायिका फार मोठ्या संपत्तीची वारस होती. पण तिचे लबाड पालक तिची संपत्ति लुबाडण्याचें कारस्थान करीत होते. नायिकेला आपल्याशीं लग्न करायला लावून किंवा तिचा खून करून आपलें कारस्थान साधण्याचा त्या खलनायकांचा डाव होता.

अमेरिकेच्या अशा स्वयंसिद्ध पालकांपैकीं फ्रान्स अधिक धोकेबाज पालक

होतें. ब्रिटन हा दुसरा स्वयंसिद्ध पालकहि खाष्ट व तिरस्करणीय होता. आपल्या विशिष्ट पद्धतीनें ब्रिटन अमेरिकेचा तटस्थतेचा हक्क धुडकावीत होतें. पण ब्रिटनला आव्हान देऊन अमेरिकेला भागणार नव्हतें. व्यापारी संबंध कायम ठेवून वाढवायचे होतें. पश्चिम भागांतील किल्ल्यांमधून ब्रिटिश सैन्य निघून जावयास पाहिजे होते. जबाबदाऱ्यांत गुरफटण्याचें टाळायचें होतें. आणि सर्वसाधारणतः वेळ निभावून न्यावयाची होती. जॉन जेनीं घडवून आणलेल्या तहानें वॉशिंग्टन यांचें समाधान झालेलें नव्हतें. पण त्यांना जाणीव होती कीं, कांहीं भव्य दिव्य घडवून आणण्याच्या दृष्टीनें अमेरिका अद्याप दुर्बल होती.

फ्रान्सचा धोका अधिक अनाकलनीय आणि तोंड देण्याच्या दृष्टीनें अधिक दुराराध्य होता. वॉशिंग्टन यांचा भर तटस्थतेवर होता, तर फ्रान्सला अमेरिकेनें स्नेहभावाची तटस्थता ठेवायला हवी होती. त्यासाठीं अस्तित्वांत असलेल्या तहाची ढाल पुढें करायला मात्र फ्रान्सची तयारी नव्हती. कारण युनायटेड-स्टेट्सशीं असलेले संबंध शक्य तों मोघम स्वरूपाचे राखून त्यांचा फायदा करून घेण्याचा फ्रान्सचा डाव होता. त्यांना सामग्रीचा पुरवठा हवा होता. शिवाय कॅरिबियन भागांत आणि अमेरिकेच्या पार्श्व प्रदेशांत साधावयाच्या साम्राज्य-विषयक डावासाठीं अमेरिकेचा तळ म्हणून अमेरिकेचा उपयोग करून घेण्याची फ्रान्सची इच्छा होती. फ्रान्सचा वकील जेने यानें हे दोन्ही हेतु मनांत ठेवलेले होते. त्याच्यामागून आलेल्या फ्रेंच वकिलांचे तेच हेतु होते. जेने व त्याच्या-मागून आलेल्या फ्रेंच राजप्रतिनिधींना, अमेरिकेंतील क्रांतिकारक प्रवृत्तींचा उप-योग आपलें स्तोम माजविण्यासाठीं होईल, असें वाटलें होतें. वॉशिंग्टन आणि फेडरॅलिस्ट याचाच अडथळा असला तर त्यांना डावलून जनतेला आवाहन करतां येईल, असा फ्रेंचांचा कयास होता. आणि खरोखरच १७९६ सालीं निवडणुकींत रिपब्लिकनांची सरशी व्हावी म्हणून अमेरिकेंतील फ्रान्सच्या हस्तकांनीं कसून प्रयत्न चालविला होता.

दोन्ही पक्षांच्या लोकांच्या डावपेंचांमुळें वॉशिंग्टन यांच्यापुढील समस्या अधिक गुंतागुंतीच्या बनत होत्या. हॅमिल्टन हे जाणूनबुजून तारतम्य न ठेवतां ब्रिटिश राजप्रतिनिधींच्या निकट संधान ठेवीत असत, तर रिपब्लिकन नेते फ्रान्सशीं अगदीं गट्टी आहे असें धरूनच त्यांच्या प्रतिनिधींशीं संबंध ठेवीत. स्वतः जेफ-र्सन मात्र या दोषापासून अलिप्त होते. १७९३ च्या अखेरीस जेफर्सन यांनीं

मंत्रिपदाचा राजीनामा दिला. त्यानंतर हॅमिल्टन यांनीं १७९५ च्या सुरुवातीस मंत्रिपदाचा राजीनामा दिला. तथापि या दोघांनींहि आपापल्यापरी राष्ट्राच्या राजकारणावर आपली पकड कायम ठेवलीच होती. विशेषतः हॅमिल्टन यांची पकड कायमच होती. अर्थात् याला वॉशिंग्टन कारण होते, हें मान्य केलें पाहिजे. न्यूयॉर्कला वकिली करीत असतांनाच हॅमिल्टन हे जणूं पडद्याआडचे मंत्रीच, असे वागत होते. जेफर्सन यांच्या जागीं परराष्ट्रमंत्र्याच्या पदावर एडमंड रॅन्डॉल्फ हे आले. पण त्यांना १७९५ मध्यें विशिष्ट कारणासाठीं बडतर्फ करण्यांत आलें. वॉशिंग्टन यांचें मत वस्तुस्थितीला धरून असो वा नसो; पण जॉन जे यांनीं ब्रिटनशीं केलेल्या तहाला सुरुंग लावण्याचें कारस्थान रॅन्डॉल्फ यांनीं फ्रेंच राज-प्रतिनिधींच्या संगनमतानें केलें, असा त्यांच्यावर वॉशिंग्टन यांचा आरोप होता.

डावपेंच चालू असोत, एका बाजूनें गौरव तर दुसऱ्या बाजूनें उघड उघड शिवीगाळ चाललेली असो, पण वॉशिंग्टन आपल्या धोरणाला चिकटून राहिले. नंतरच्या इतिहासावरून आपलें करणें बरोबर होतें हें समाधान मिळण्याची संधि वॉशिंग्टन यांना न मिळो; पण त्यांचें धोरणच बरोबर होतें, हा निष्कर्ष आपण इतिहासावरून काढूं शकतों. कडव्या रिपब्लिकनांच्या धोरणामुळें अमेरिका फ्रान्सच्या कक्षेंत ओढली गेली असती. त्यांचे हेतु कितीहि चांगले असोत, पण त्यांचा मार्ग चुकीचा होता, हा निष्कर्ष आपण मान्य केलाच पाहिजे. वॉशिंग्टन सुजाण होते, धडाडीचे होते. मधून मधून त्यांचें डोकें भडकत असलें तरी परिस्थिती-वरील पकड ते कधींच ढिली होऊं देत नसत. फलश्रुतीच्या दृष्टीनेंहि त्यांचें धोरण केवळ नकरणात्मक नव्हतें. जॉन जे यांनीं ब्रिटनशीं केलेल्या तहानें फारच अत्यल्प फायदा अमेरिकेच्या पदरांत पडला होता. पण त्याची भरपाई १७९५ मध्यें थॉमस पिंकनी यांनीं स्पेनशीं केलेल्या तहामुळें झाली. या तहानें अखेर अमेरिकेला मिसिसिपींत मुक्त जलसंचार करण्याचा हक्क मिळाला. मिसिसिपीचा मुखाकडला भाग स्पॅनिश हद्दींत असल्यामुळें आतापर्यंत अमेरिकन जहाजांना त्या नदीचा पुरेपूर फायदा घेतां येत नसे. शिवाय अमेरिकेची पश्चिम हद्द मिसिसिपीच्या तीरापर्यंत आहे, असेंहि या तहानें मान्य करण्यांत आलें होतें. सध्यांच्या ओहिओ प्रांतांत जनरल ॲन्थनी वायनेनें रेड इंडियनांवर निर्णायक विजय मिळविल्यावर झालेल्या तहानें वायव्य सरहद्द अधिक सुरक्षित झाली. हा तहहि १७९५ सालींच झाला. वॉशिंग्टन यांनीं आपल्या दुसऱ्या कारकीर्दीनंतर

केलेल्या निरोपाच्या भाषणांत म्हटलें होतें, "आपल्या नवजात राष्ट्राच्या सार्वजनिक जीवनाच्या विविध अंगांना दृढमूल होऊन समर्थ बनविण्यासाठीं पुरेसा अवधि मिळावा, हा माझा प्रधान हेतु होता. मानवी सामर्थ्याला शक्य आहे तितक्या मर्यादेपर्यंत आपलें भवितव्य आपल्या हातीं ठेवण्याचें सामर्थ्य आणि स्थैर्य निर्माण होण्यासाठीं अखंड प्रगति करण्याकरितां अवधि मिळावा हाच माझा प्रधान हेतु होता." वॉशिंग्टन यांनीं आपला हेतु साधला असें म्हणावेंच लागतें.

अनुकूल परिस्थिति निर्माण झाल्यावर देशाची प्रगति होणें अपरिहार्य होतेंच. सर्वत्र प्रगति आणि विकास चालू आहे असें दृश्य वॉशिंग्टन यांना दिसत होतें. त्यांच्या दुसऱ्या कारकीर्दीच्या अखेरीअखेरीस व्हरमॉन्ट, केंटकी, टेनेसी हीं तीन संस्थानें संयुक्त राज्यांत सामील झालीं. आणखीहि संस्थानें सामील होण्याचें घाटत होतें. मोठेमोठे रस्ते तयार करण्याचें काम चालू होतें. पेन्सिल्व्हानियांत कोळशाच्या खाणी सांपडल्या होत्या. पोटोमॅक कंपनीचें कार्य मंदगतीनें चाललेलें असलें तरी तें चालू होतें खास. इतरहि विकास-योजनांचें कार्य चालूच होतें. राष्ट्राच्या नव्या राजधानीची उभारणी चालू होती. एक प्रकारच्या भव्यतेबरोबरच क्षुद्रतेच्या अशा संमिश्र वातावरणांत उभ्या राहूं लागलेल्या या राजधानीनें जणुं भावी काळासाठींहि त्या संमिश्र वातावरणाचा वारसा कायम ठेवलाच आहे!

या साऱ्या श्रेयाचा भला मोठा वांटा वॉशिंग्टन यांचा आहे. त्यांनीं त्या श्रेयावर कधीं हक्क सांगितला नसला तरी त्यावर त्यांचा हक्क आहे, हें मान्य केलेंच पाहिजे. त्यांनीं परराष्ट्रीय धोरणाचें सातत्य राखण्यांत थोडी कसूर केली असती तर वर नमूद केलेल्या गोष्टी घडल्या नसत्या. जॉन जे यांनीं ब्रिटनशीं केलेला तह कॉंग्रेसनें स्वीकृत केल्यापासून फ्रेंचांची वर्तणूक वाढत्या प्रमाणांत तापदायक होऊं लागली होती. शेवटीं अमेरिकेंत आणि परदेशांतहि तणातणी असह्य होण्याइतकी वाढली होती. उपाध्यक्षांचा मुलगा जॉन क्विन्सी ॲडॅम्स हा हॉलंडमध्यें अमेरिकेचा वकील होता. १७२५ च्या अखेरीस लिहिलेल्या पत्रांतून त्यानें अभिप्राय व्यक्त केला होता, "आपल्या राष्ट्राचें तटस्थतेचें धोरण अद्याप जिवंत असेल, तर त्याचें श्रेय एकट्या राष्ट्राध्यक्षांनाच दिलें पाहिजे. अटलांटिकच्या पलीकडेहि ज्यांचे निनाद उमटतात अशा भयंकर खवळलेल्या लाटांपुढें भक्कमपणें तगून रहाणें कदापि शक्य झालें नसतें. राष्ट्राध्यक्षांचें

चारित्र्य आणि नांवलौकिक व त्याच्या जोडीला त्यांचा निर्धार आणि राजकीय निर्भय वृत्ति या गोष्टीच टिकाव धरण्यास समर्थ ठरल्या आहेत. ”

त्या आणीबाणीच्या कालखंडांत वॉशिंग्टन यांच्या नेतृत्वशक्तीचा उत्कृष्ट आविष्कार झाला हें मान्य केलें तरी, हा आविष्कार एका पक्षाचे नेते म्हणूनच झाला, हेंहि तितकेंच खरें आहे काय ? त्यांची प्रकट झालेली ही नेतृत्वशक्ति निःपक्षपाती प्रशासकाची नसून पक्ष-प्रमुखाची होती व तो पक्ष म्हणजे फेडरॅलिस्ट पक्ष होय हें खरें काय ? आपल्या बहुतेक समकालिनांप्रमाणेंच, पक्षीय राजकारण ही अनिष्ट गोष्ट आहे, असेंच वॉशिंग्टन यांचेंहि मत होतें, हें आपण यापूर्वी पाहिलें आहेच. राष्ट्राध्यक्ष हा राजकारणापासून अलिप्त असावा असें त्यांना वाटे. आणि इतर सर्व गोष्टींपेक्षां राष्ट्रांत शांतता व सुव्यवस्था ठेवण्याचीच त्यांची इच्छा होती. रिपब्लिकनांच्या विरोधाचा कडवेपणा अनपेक्षित आणि खेदजनक होता. पण जोंपर्यंत रिपब्लिकनांच्या टीकेचा भडिमार हॅमिल्टन यांनाच लक्ष्य मानून होत होता, तोंपर्यंत राजकीय समतोल राखण्यास आपण समर्थ आहों, असें वॉशिंग्टन यांना वाटे. पण वॉशिंग्टन यांच्या दुसऱ्या कारकिर्दीत राजकीय स्पर्धा व मतभेद अधिक वाढले आणि टीकेचा भडिमार खुद्द त्यांच्यावरच होऊं लागला. परिणामीं, त्यांचीं मतें हळूहळू ठाम बनत गेलीं. “ इतर कोणाही व्यक्तींपेक्षां या टीकेचा परिणाम वॉशिंग्टन यांच्या मनावर अधिक होतो, ” असे उद्‌गार जेफर्सन यांनीं काढले होते. १७९३ मध्यें मंत्रिमंडळाच्या एका बैठकींत क्रोधाविष्ट होऊन वॉशिंग्टन म्हणाले होते कीं, फ्रेनो (रिपब्लिकन गॅझेटचा संपादक) ‘ हरामखोर ’ आहे, त्याचा बंदोबस्त केला पाहिजे ! त्याच वर्षी कांहीं दिवसांनीं फ्रेनोचें पत्र बंद पडलें, पण इतर रिपब्लिकन पक्षीय वृत्तपत्रांनीं टीकेचा भडिमार चालूच ठेवला होता. वॉशिंग्टन यांना टीका कधींच सहन होत नसे. रिपब्लिकन लोक हे बेजबाबदार आणि दुष्टबुद्धि आहेत, असेंहि त्यांना वाटूं लागलें. असें वाटणें कांहींसें सकारण होतेंच. हळूहळू फेडरॅलिस्ट मताशीं वॉशिंग्टन सहमत होत गेले. फेडरॅलिस्टांचें म्हणणें असें होतें कीं, रिपब्लिकन पक्ष हा तशा दृष्टीनें दुसरा पक्ष नव्हताच. तो एक गट होता. भावी काळांत शासनयंत्रणेचा वारसा घेणारा ‘ विरोधी पक्ष ’ नसून रिपब्लिकन पक्ष हा एक द्रोही गट आहे, तो कटबाजांचा अड्डा आहे, फ्रेंचांच्या पित्त्यांचें तें कोंडाळें आहे, असें फेडरॅलिस्ट म्हणत असत. वॉशिंग्टन यांनाहि हळूहळू तसेंच वाटूं लागलें. आणि म्हणूनच त्यांनीं बहुतांशीं

मराठी ... संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम . वि: .......२११
क्रमांक ........ नों. दि. ........


निरुपद्रवी राजकीय क्लब असलेल्या डेमोक्रॅटिक सोसायट्यांचा कडकडीत निषेध करायला ते सरसावले. १७९८ मध्यें लिहिलेल्या एका पत्रांत त्यांनीं उद्वेगानें म्हटलें होतें, "एखाद्या काळ्याकुट्ट शिद्द्याला घासून घासून गोरे करणें शक्य होईल, पण स्वतःला डेमॉक्रॅट म्हणविणाऱ्या या इसमांना सुधारणें शक्य नाहीं."... "अशीं माणसें या देशाचें सरकार उलथून पाडण्यासाठीं काय वाटेल तें केल्याशिवाय रहाणार नाहींत," असेंहि उद्गार वॉशिंग्टन यांनीं काढले होते. अखेरी-अखेरीस त्यांच्या मंत्रिमंडळांतील सर्वच मंत्री फेडरॅलिस्ट पक्षाचेच होते.

आतां, आपण स्वतः फेडरॅलिस्ट आहोंत, असें मान्य करण्याच्या दृष्टीनें एकच पाऊल टाकण्याची जरुरी होती. आणि हें पाऊल त्यांनीं कांहींसें कळत न कळत टाकलें. १७९९ सालीं, म्हणजे त्यांच्या जीवनाच्या अखेरच्या वर्षांत राष्ट्राध्यक्ष-पदावरून निवृत्त झाल्यानंतर दोन वर्षांनीं, त्यांना १८०० सालच्या राष्ट्राध्यक्षीय निवडणुकीसाठीं उभें रहाण्याची विनंती करण्दांत आली होती. राष्ट्राला धोका आहे, असें कारणच या विनंतीसाठीं पुढें करण्यांत आलें होतें. ही विनंती नाकारतांना त्यांनीं खुलासा केला होता कीं, "आतां माणसांपेक्षां तत्त्वांनाच राजकीय वादांत स्थान असायला पाहिजे." त्यांनीं पुढें म्हटलें होतें, "जरी मी उमेद्वार म्हणून उभा राहिलों तरी फेडरॅलिस्टविरोधी गटाकडून मी एकहि मत अपेक्षितां कामा नये. आणि अर्थातच इतर कोणीहि फेडरॅलिस्ट ज्या भूमिकेवर उभा असेल त्यापेक्षां माझी भूमिका कोणत्याहि कारणासाठीं जास्त भक्कम नसावी. याचा अर्थ वैयक्तिक नांवलौकिक भरीस घालून निवडून येण्याची त्यांची तयारी नव्हती. रिपब्लिकन पक्ष हा सनदशीर पक्ष आहे, असें मान्य करावयास वॉशिंग्टन तयार नसले तरी सुद्धां त्यांच्या पत्रांतील 'इतर कोणीहि फेडरॅलिस्ट' हे शब्द सूचक आहेत. याचा अर्थ, ते स्वतःला फेडरॅलिस्ट मानूं लागले होते असाच होतो. हे शब्दच सांगतात कीं, अमेरिकन राजकारणाच्या बदलत्या स्वरूपाची जाणीव त्यांना झालेली होती.

त्या वेळीं ते राष्ट्राध्यक्षपदावरच असते तर कदाचित् स्वतःला फेडरॅलिस्ट म्हणवून घ्यायला ते तयार झाले नसते. राष्ट्राध्यक्ष हा पक्षबाजीपासून अलिप्तच असला पाहिजे, असा आग्रह कदाचित् त्यांनीं धरला असता. पण, आतां ही पक्षीय भूमिका घेण्यांत फार मोठा दोष होता असें खास नव्हे. या प्रश्नावर त्यांनीं मनाची उच्च पातळी राखून गूढ मौन पाळलें, असें जें कांहीं चरित्रकारांकडून

अट्टाहासानें सांगितलें जातें, तें मात्र खरें नव्हे. केवळ वॉशिंग्टन यांच्या किंवा फेडरॅलिस्टांच्या दृष्टीनें त्या दहा वर्षांचें परिशीलन केलें तर आपल्याला मान्य करावें लागेल कीं, त्यांनीं राजकीय समीकरण अगदीं योग्य प्रकारें केलेलें होतें.

### अंतिम सेवानिवृत्ति

पुढील गोष्टींची फक्त तार्किक उपपत्ति लावतां येणें शक्य आहे. तथापि, इतर गोष्टींबद्दल कांहीं शंका असो, एक गोष्ट निःसंशयपणें सत्य होती. ती म्हणजे राष्ट्राध्यक्षपदावरून निवृत्त होतांना वॉशिंग्टन यांना कमालीचा आनंद वाटला होता. त्यांनीं तिसऱ्यांदा राष्ट्राध्यक्षीय जबाबदारी पत्करावी, अशी अनेकांची अपेक्षा होती आणि ते पुनः अगदीं सहजपणें निवडून आले असते हें प्रत्येकाला ठाऊक होतें. विरोधी टीका होत असली तरी ते अद्याप सर्वांत जास्त लोकप्रिय अमेरिकन नेते होते. पण झालें तें पुरेसें आहे—नव्हे 'फारच झालें', असें त्यांना वाटत होतें. त्यांचे वारस जॉन ॲडम्स, राष्ट्राध्यक्षपदाच्या मानानें आनंदित झाले असले तरी आपल्यापुढें कसलें ताट वाढून ठेवलें आहे, याची त्यांना पूर्ण कल्पना होती. १७९७ च्या मार्चमध्यें राष्ट्राध्यक्षपदाचीं वस्त्रें धारण करण्याचा जो समारंभ झाला, त्याचें वर्णन पत्नीला लिहिलेल्या पत्रांत करतांना जॉन ॲडम्स यांनीं लिहिलें होतें, "प्रसंग खरोखरच गंभीर होता. आणि माझ्या दृष्टीनें त्या प्रसंगाची परिणामकारकता वाढली ती सेनापतींच्या (वॉशिंग्टन यांच्या) उपस्थितीमुळें. त्या दिवशीं आकाश जसें निरभ्र नि वातावरण जसें प्रसन्न होतें, तशीच त्यांची मुद्रा दिसत होती. जणुं, माझ्यावर विजय मिळविल्याचा आनंद ते उपभोगीत होते. 'मी निसटलों अन् तूं बरा अडकलास ! आतां आपल्या दोघांत कोण सुखी आहे तेंच पहा !' असें जणु ते मला म्हणत होते. प्रतिनिधि-सभेच्या सभागृहांत मावूं शकतील इतकीं माणसें गर्दीनें उभीं होतीं. आणि सर्वांच्या डोळ्यांत प्रसंगानुरूप पाणी आलेलें होतें. पण वॉशिंग्टन यांचे डोळे जितके कोरडे होते, तितके कोणाचेच नसतील." अन्य महान् प्रसंगीं ऊर भरून येऊन वॉशिंग्टन यांचे डोळे कित्येकदां ओलावलेले होते. १७८३ मध्यें न्यूयॉर्कच्या फ्रान्सेस टॅव्हर्न-मध्यें आपल्या हाताखालील सेनाधिकाऱ्यांचा निरोप घेतांना त्यांचे डोळे पाणावले होते. तसे महत्त्वाचे प्रसंग कित्येकदां घडले होते. पण आतां मात्र तसें घडलें नव्हतें. त्या दिवशीं— ॲडम्स यांनीं राष्ट्राध्यक्षपद स्वीकारलें त्या दिवशीं

वॉशिंग्टन यांच्या दैनंदिनींत नोंद आहे, ती फक्त एवढीच : "सर्वच दृष्टींनीं कालच्यासारखाच दिवस. उष्णतामान ४१ वर..."

राष्ट्राध्यक्षीय जबाबदारीचीं वस्त्रें त्यांनीं ॲडम्सना बहाल केलीं तीं दुर्मुखलेल्या चेहऱ्यानें खासच नव्हे. पण, ज्याची जागा कोणीच कधींच भरून काढूं शकणार नाहीं, असा एकमेव पुरुष हें अमेरिकेंतील आपलें स्थान आहे, असें त्यांना आतां कोणीहि आणि काय वाटेल तें करूनहि पटवून देऊं शकलें नसतें. नुकताच त्यांचा पासष्टावा वाढदिवस साजरा झाला होता. त्या वेळच्या भव्य मेजवानीला बाराशेंवर लोक त्यांचें शुभचिंतन करण्यासाठीं उपस्थित होते. असे वाढदिवस यापुढें फार साजरे करतां येतील, अशी अपेक्षा त्यांना नव्हती. आणि जीं कांहीं मोजकीं वर्षें उरलीं असतील, तीं माउंट व्हरनॉन येथेंच व्यतीत करण्याचा त्यांचा विचार होता. त्यांचें प्रौढ जीवन उत्कृष्टपणें व्यतीत झालें होतें. पण कालचक्रानें प्रकृतीवर परिणाम केलेला होता. सार्वजनिक सेवेंतल्या कष्टांचाहि परिणाम झालेला होता. वॉशिंग्टन यांचे अनेक जुने दोस्त कालवश झालेले होते. फेअरफॅक्स कुटुंबांतील एक पुरुष व्हर्जिनियांत पुनः परत आला होता. पण बेल्व्हॉयरची आतां खूपच पडझड झालेली होती. आणि सॅली फेअरफॅक्स इंग्लंडहून पुनः कधींच परत अमेरिकेला आलेली नव्हती. लफायेत तुरुंगांत असतांना वॉशिंग्टन यांनीं आपल्या उपजत औदार्याला अनुसरून त्याच्या बायकोला पैसे पाठविले होते. आतां लफायेत मुक्त झालेला होता; पण दोघांत एका विशाल महासागराचें अंतर होतें. आतां फक्त माउंट व्हरनॉन आणि मार्थाची आल्हाददायक संगत हाच विसावा होता. नात्यांतली कांहीं छोटी मंडळीहि सहवासाला होती.

चरित्र हें एखाद्या उत्कृष्ट नाटकाप्रमाणें बांधीव रचना असती तर वॉशिंग्टन हे निरामय शांततेंत उर्वरित आयुष्य घालवायला लागले आहेत, अशा वेळींच नाटक संपल्याप्रमाणें पडदा टाकतां आला असता. निरामय जीवन घालविणारी, शुभ्र केस डोक्यावर आहेत अशी मूर्तिच अखेर आपल्यापुढें उभी असतांना पडदा पडूं शकला असता. पण वॉशिंग्टन यांचें जीवन एखाद्या नाटकासारखें रेखीव नव्हतें. टाकलेला पडदा पुनः पुनः वर जातच होता. वाद्यांचे सूर विरत विरत ऐकूं येईनासे होतात न होतात तोंच पुनः संगीतानें वातावरण भरून जातच होतें. १७९८ सालीं असेंच घडलें. अर्थात् तसें घडण्याला स्वतः वॉशिं-

ग्टनच कारणीभूत होते. ते वार्धक्यानें थकल्यासारखे दिसले असते तर कोणीच त्यांच्या वाटेला गेले नसते. पण, त्यांची वागणूक पूर्वीचा सारा जोम कायम असल्यासारखी होती. ते उत्साहानें आपल्या शेतवाडीची देखरेख करीत, पाहुण्यांचें आदरातिथ्य करीत, पत्रव्यवहार करीत असत. आतां त्यांचीं पत्रें अधिक तिखट भाषेंत लिहिलेलीं दिसतात. कदाचित् मनमोकळेपणानें लिहायचें स्वातंत्र्य मिळाल्याचा तो परिणाम असेल. आतांपर्यंत अधिकारपदाच्या जबाबदारीमुळें सावधगिरी बाळगून जपून भाषा वापरावी लागत असे. ते कांहीं असो, त्यांचें उत्साही वागणेंच १७९८ सालीं पुनः लष्करी गणवेश अंगावर चढण्याला कारणीभूत झालें. फ्रेंचांची वागणूक इतकी मर्यादातिक्रम करणारी झाली होती कीं, त्यांनीं जवळ जवळ युनायटेड स्टेट्सशीं युद्धच पुकारलें होतें. निदान आर-मारी युद्ध तरी पुकारल्यासारखें होतें. वॉशिंग्टन यांनीं थोडीशी खडी फौज आग्रहपूर्वक कायम ठेवली होती. तेवढी सोडल्यास अमेरिकेची सेना अशी मुळींच नव्हती. आतां सैन्य उभारून त्याचें आधिपत्य स्वीकारण्यासाठीं त्यांना पाचारण करण्यांत आलें होतें. त्या जबाबदारीचा नुसता विचारसुद्धां दुःख देण्यास पुरेसा होता. पुनः कर्तव्य बजावण्यासाठीं निमंत्रण येण्याची नुसती कल्पना हॅमिल्टन यांनीं मागे बोलून दाखविली होती, तेव्हां त्यावर वॉशिंग्टन उत्तरले होते, "अशी पाळी आलीच तर, माझ्या वंशजांच्या समाधिगृहाकडे मी जितक्या नाखुषीनें जाईन, तितक्याच नाखुषीनें आजचा माझा निवांत निवारा सोडून मी कर्तव्यभूमीकडे जाईन." त्यांची आधीं सल्लामसलत न घेतांच राष्ट्राध्यक्ष ॲडम्स यांनीं त्यांची सरसेनापति म्हणून नेमणूक केल्याची घोषणा केली, तें वॉशिंग्टन यांना आवडलें नव्हतें. पुनः सार्वजनिक जबाबदारी पत्करण्यास सरसावण्याचें आपलें कृत्य महत्त्वाकांक्षेचें द्योतक आहे, अशी टीका विरोधक करतील हा विचार पूर्वीच्या प्रसंगाप्रमाणेंच त्यांच्या मनाला संत्रस्त करूं लागला. निरोपाच्या भाषणाच्या पार्श्वभूमीवर आपलें हें करणें दांभिकपणाचें आहे, असें विरोधक म्हणतील अशी शंका त्यांना टोचूं लागली. पण तें कर्तव्य टाळतां येणें शक्य नव्हतें. सदसद्विवेकबुद्धीची प्रेरणा, सारासारविचार या गोष्टी त्यांना तांतडीनें कामाला लागण्यास प्रवृत्त करण्यास कारणीभूत झाल्या. पूर्वीप्रमाणेंच या वेळींहि हॅमिल्टन वॉशिंग्टन यांच्या मदतीला सरसावलेच. पडद्याआड सूत्रें हलवून वॉशिंग्टन यांचे दुय्यम अधिकारी म्हणून स्वतःची नेमणूक

करवून घेण्यांत हॅमिल्टन यांनीं यश मिळवलें. तो काळ अत्यंत खळबळीचा होता. विशेषतः बिचाऱ्या अॅडम्सना टीकेचा भडिमार फार सोसावा लागत होता. अर्थातच त्यांच्या जागीं वॉशिंग्टन असते तर यापेक्षांहि अधिक चिखलफेक त्यांना सोसावी लागली असती. तथापि, त्याचबरोबर, अॅडम्सनीं राज्यकारभारांत डाव-पेंचांच्या दृष्टीनें ज्या चुका केल्या, त्या यांनीं टाळल्या असत्या, असें पुष्कळशा खात्रीपूर्वक आपण म्हणूं शकतों. अॅडम्स यांची राष्ट्राध्यक्षीय कारकीर्द आणि वॉशिंग्टन यांची कारकीर्द यांची तपशीलवार तुलना केल्यास वॉशिंग्टन यांची गुणवत्ता अधिक ऐनजिनसी होती, हें दिसून येईल.

तथापि १७९८ मध्यें युद्ध जुंपलेंच नाहीं. १७९९ मध्येंहि युद्ध झालें नाहीं. वॉशिंग्टन यांच्या जीवनाचा प्रवाह नेहमींच्या गतीनें पुनः सुरू झाला. त्यांच्या दैनंदिनींतलीं त्यानंतरच्या कांहीं महिन्यांतलीं पानें चाळल्यास त्यांवर अगदीं त्रोटक नोंदी आढळतात : आज उकाडा होता, आज हवामान थंड होतें, पाऊस पडला, हिमवृष्टि झाली, घोड्यावरून रपेट केली, पाहुणे आले होते, मेजवानी झाली, भाची वेटी लेविस हिला कन्यारत्न झालें, अशाच नोंदी आढळून येतात. नंतर ता. १३ डिसेंबरपासून पुढें दैनंदिनीचीं पानें कोरीं आहेत. त्या दिवसाची नोंद, ‘ उष्णतामान फारच खालीं आलें होतें. धुकें पडलें होतें. ’ इतकीच आहे, आणि, खरोखरच त्यानंतर या महान् जीवननाट्याच्या शेवटच्या अंकाचा पडदा फारच घाईनें टाकला गेला. वॉशिंग्टन यांना पडशानें व घसादुखीनें पछाडलें. डॉक्टरांनीं रक्त काढण्याचा उपाय करून बघितला, पण कांहीं उपयोग झाला नाहीं. ता. १४ डिसेंबरच्या रात्रीं दहा वाजतां वॉशिंग्टन यांचे प्राण देहाला सोडून गेले. पार्सन विम्स यांनीं कल्पनेनें तयार केल्यासारखा नाटकाचा उत्कर्षबिंदु गांठून नाटक संपलें नाहीं. त्यांनीं कसलेहि अखेरचे संस्मरणीय उद्‌गार काढले नाहींत. त्या काळीं उपलब्ध असलेले गांवठी वैद्यकीय उपचार कितीहि सद्‌हेतूनें केलेले असोत, पण त्या उपचारांना अत्यंत वेदना सोशीत ते बळी पडले.

त्यापेक्षां थोडी जरी चांगली वैद्यकीय उपचार-योजना झाली असती, तरी वॉशिंग्टन आणखी कांहीं वर्षे जगले असते. त्यांच्या नांवानेंच (वॉशिंग्टन, डी. सी.) स्थापलेल्या संयुक्त राज्याच्या नव्या राजधानीच्या शहरांत मध्यवर्ती सरकारचें सचिवालय हलविण्यांत आलें आहे, हें बघण्यांत त्यांना आनंद वाटला असता. पुढील निवडणुकींत रिपब्लिकनांचा जय होऊन थॉमस जेफर्सन यांची

राष्ट्राध्यक्षपदावर स्थापना झालेली १८०१ मध्यें त्यांना बघायला मिळाली असती. हें दृश्य त्यांना अर्थातच आनंददायी वाटलें नसतें. लुसियाना-खरेदीची बातमी त्यांना कदाचित् वाचायला मिळाली असती. त्याचबरोबर हॅमिल्टन द्वंद्वयुद्धांत ठार झाल्याचीहि बातमी त्यांच्या कानांवर आली असती. चांगल्या-वाईट अशा अनेक संमिश्र भावना निर्माण करणाऱ्या गोष्टी त्यांना अनुभवायला मिळाल्या असत्या. पण त्यांना आणखी कांहीं अनुभवायची इच्छा होती का? त्यांचें जीवन ज्या शतकांत व्यतीत झालें तें शतक संपलें होतें. त्या शतकाबरोबर त्यांचं जीवनहि समाप्त झालें. त्यांच्या मृत्यूनंतर राष्ट्राच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत त्यांना श्रद्धांजलि वाहण्यासाठीं असंख्य आवाज घुमूं लागले. वक्ते, पत्रकार ( त्यांत टीकाकार फ्रेनोहि होता ) यांनीं खणखणीत शब्दांत जयजयकार सुरू केला. पण या सर्व जयजयकारापेक्षां स्पेन्सर यांनीं लिहिलेल्या ओळीच जास्त समर्पक आहेत.

> "अतिकष्टांनंतरची निद्रा, समुद्रावरील भयंकर तुफान शमल्या-नंतरचें बंदर, चिंताग्रस्ततेनंतर लाभणारें सुटकेचें समाधान, जीवना-नंतरचा मृत्यु—या गोष्टी अत्यंत आल्हाददायक असतात."

प्र क र ण पां च वें

# वॉशिंग्टन : संपूर्ण व्यक्तिदर्शन

*" आपला देश स्वतंत्र केल्याबद्दल निरभ्र कीर्ति जॉर्ज वॉशिंग्टन यांना लाभली. तीहि थोड्याच पुरुषांच्या वांट्याला येते. तथापि याखेरीज वॉशिंग्टन यांच्या पदरांत धन्यवादाशिवाय दुसरें कांहींच पडलें नाहीं."*

बायरनकृत ' डॉन जुआन ' :
अध्याय ९ वा.

## मुग्ध वृत्ति

जॉर्ज वॉशिंग्टन यांच्याविषयीं माहिती देणारें कागदपत्र चाळून त्यांचें मंथन केल्यावर आणि त्यावरून मनःपटलावर उमटलेली व्यक्तिरेखा काढून झाल्या-वर, बहुतेक चरित्रकारांना, अद्याप कांहीं तरी हुकलें असावें, असा अस्वस्थ कर-णारा विचार सतावीत राहतोच. उपलब्ध माहिती त्रोटक आहे किंवा विसंगत आहे, हें याचें खासच कारण नाहीं. बालपण संपल्यानंतरच्या वॉशिंग्टन यांच्या जीवनांत, ते कोणत्या वेळीं काय करीत असतील हें सहज सांगतां यावें, इतकी तप-शीलवार माहिती उपलब्ध आहे. इतकेंच नव्हे तर विशिष्ट क्षणीं त्यांच्या मनांत कोणते विचार घोळत असतील हें सुद्धां बरेंचसें अचूकपणें सांगणें शक्य होईल. वॉशिंग्टन यांचा पत्नीशीं – मार्थाशीं झालेला पत्रव्यवहार जतन करून ठेवण्यांत आला असता किंवा तीस वर्षांपूर्वी जे. पी. मॉर्गन यांनीं ' कनिष्ठ दर्जाचीं पत्रें ' म्हणून वॉशिंग्टन यांचीं कांहीं पत्रें जाळून टाकलीं नसतीं तर कदाचित् आपल्याला

वॉशिंग्टन यांच्या व्यक्तित्वाचें अधिक सखोल ज्ञान मिळालें असतें. तथापि त्यामुळें व्यक्तिरेखेंत विशेष फरक पडला असता कीं नाहीं, याबद्दल शंकाच आहे. वॉशिंग्टन यांच्या जीवनांतील कांहीं घटनांचें, विशेषतः त्यांच्या राष्ट्राध्यक्षीय कारकीर्दीतील घटनांचें योग्य परिशीलन अजून झालेलें नाहीं. तथापि, संपूर्ण चित्र काढण्या-इतकें साहित्य, खुद्द वॉशिंग्टन यांच्या शब्दांत आणि त्यांच्याविषयींच्या विपुल लेखनाच्या रूपानें उपलब्ध आहे.

मग, हें कोडें कां पडावें? वॉशिंग्टन आम्हांला गोंधळांत टाकतात, अशी कबुली कां द्यावी लागते? सर्व आकृति-विशेष ठळक असतांनादेखील चित्र मात्र पुसट दिसावें, हा चमत्कार कसा घडतो? असें होण्याचीं मुख्य कारणें दोन आहेत : एक म्हणजे, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचें स्वरूपच तसें आहे. दुसरें कारण म्हणजे वॉशिंग्टन यांचें अद्‌भुत पौराणिक दैवतासारखें जें भव्य चित्र उभें राहिलें आहे, त्यामुळें मूळ चित्र झाकळून जातें. प्रतीकात्मक वॉशिंग्टन-स्मारकाची सावली त्या चित्रावर पडली असल्यामुळें तें स्पष्ट दिसूं शकत नाहीं. आणि त्यांचें व्यक्तिमत्त्व आपल्याला गोंधळवून टाकतें याचें कारण, 'कसलेंच गूढ नसणें हेंच गूढ' हा प्रकार या बाबतींत झालेला आहे. थोर पुरुषांच्या जीवनाचें परिशीलन करतांना, त्यांच्यांत मनोदौर्बल्याच्या कांहीं खुणा दिसतात कीं नाहीं, हें बघण्याची आपल्याला संवय असते. तशा लपलेल्या खुणा वा पुरावा शोधून काढण्याचा प्रयत्न आपण नेहमीं करतों. अत्यंत सामान्य परिस्थितींतून वर डोकें काढून आघाडीवर येण्याची बलवत्तर महत्त्वाकांक्षा कांहीं जणांच्या ठिकाणीं आपल्याला दिसून येते. ठेंगणा शरीरबांधा असणाऱ्या माणसांत बहुधा जो रासवटपणा असतो, त्याचा आविष्कार कांहीं व्यक्तींमध्यें प्रकर्षानें झालेला दिसून येतो. नेपोलिअन, अॅलेक्झांडर, हॅमिल्टन प्रभृतींसारख्या पुरुषांच्या वर्तणुकीमागें हीं दोन्ही कारणें असल्याचें दिसून येतें. कांहीं पुरुषांना ध्येयवादाच्या पिशाच्चानें पछाडलेलें असतें. त्यांना ' दिव्य संदेश ' मिळालेले असतात. या अज्ञात शक्तीच्या संदेशानुसार आवश्यक तर मृत्यूला-देखील कवटाळण्यास हे पुरुष तयार होतात. कांहीं जणांच्या कृतीच्या मुळाशीं सुप्त मानसिक कारणे असतात. उदाहरणार्थ, प्रख्यात ब्रिटिश योद्धा जनरल गॉर्डन याच्या शौर्याचें मूळ त्याच्या सुप्त लैंगिक विकृत प्रवृत्तींत होतें. बहुतेक थोर पुरुषांच्या भव्यपणाला एखाद्या दोषाचें तरी लांछन असतेंच. स्वैरपणा, तीव्र लालसा किंवा आढ्यताखोरीची वृत्ति या किंवा अशाच कोणत्या तरी दोषाच्या

आढळ बहुतेक थोर लोकांत होतो. पण, वॉशिंग्टन यांची खरी ओळख करून देण्यासाठीं असा एखादा धागादोरा आवश्यक आहे काय किंवा आपल्याला तसा धागादोरा शोधून काढतां येईल काय ? तारुण्यांत सॅली फेअरफॅक्सबद्दल त्यांना ओढ असावी, अशी एक परिस्थितिजन्य शंका सोडल्यास आपल्यासमोर एक उंच बांध्याचा, मिताहारी व मितविहारी, नम्र, सर्वसामान्य माणसासारखा दृष्टिकोन असणारा देखणा सद्गृहस्थच उभा राहतो. मग, हा पुरुष एक सामान्य माणूस होता काय ? निश्चित उत्तर देण्याआड तें प्रतीकात्मक स्मारक उभें राहतें. कोणाहि निःपक्षपाती इतिहासकाराला परंपरागत चालत आलेला भक्तिभाव तरी स्वीकारला पाहिजे किंवा किरकोळ दोष धुंडाळण्याची दोषैकदृष्टि तरी स्वीकारली पाहिजे– या शिवाय अन्य मार्गच नाहीं असें दिसतें. वॉशिंग्टन यांच्या समकालीनांनादेखील, भक्तिभाव किंवा दोषैकदृष्टि यांपैकीं कांहीं तरी एक स्वीकारलें पाहिजे, असाच पेंच पडला होता. असें मानून स्वस्थ बसणें ही कांही फारशी समाधानाची गोष्ट नव्हे.

वॉशिंग्टन यांचें यथार्थदर्शन कसें घ्यावयाचें, ही समस्या कांहीं लोकांनीं अजब उपायानें निकालांत काढली आहे. तशी कांहीं समस्या आहे, हीच गोष्ट मुळांत अमान्य करून वॉशिंग्टन यांच्यांत 'मानवी' गुणदोष असल्याचें ठासून सांगण्याचा प्रयत्न या लोकांनीं केला आहे. "वॉशिंग्टन हे पायापासून डोक्यापर्यंत माणूसच होते. त्यांना खाण्यापिण्याची फार आवड होती. त्यांचा स्वभाव उग्र होता. ते आग्रही होते. लढाऊ आणि चढाऊ वृत्तीचे होते." असें ब्रॅडले टी. जॉनसन यानें म्हटलें आहे; तर रुपर्ट ह्यूजेस म्हणतो, "आतांपर्यंत होऊन गेलेल्या अत्यंत उतावळ्या, पण अष्टपैलू माणसांपैकीं वॉशिंग्टन हे एक होते."... "झटकन् संतप्त होणारे, हळवे, ऐहिकसुखवृत्तीचे, भावनाप्रधान माणूस" असें वर्णन सॉल के. पॅडोव्हर यानें केलें आहे; तर १९५३ सालीं प्रसिद्ध झालेल्या हॉवर्ड स्विगेट यांच्या 'दि ग्रेट मॅन : जॉर्ज वॉशिंग्टन अॅज अ ह्यूमन बीइंग' या पुस्तकांत लेखकानें चरित्रनायकाचें जीवन "आकर्षकता आणि भव्यता, तीव्र क्रोध आणि खोचक विनोद, चांगुलपणा आणि उदारपणा, कष्ट आणि दुःख यांचें मिश्रण" होतें, असें वर्णिलें असून पुढें म्हटलें आहे, "वॉशिंग्टन यांना प्रतिष्ठा आणि शिष्टाचार यांची चाड होती, पण त्याचबरोबर या गोष्टींची थट्टा उडवायला किंवा प्रसंगीं त्या गोष्टी बाजूला ठेवायलाहि ते तयार असत."... अशाच दृष्टिकोनांतून त्यांच्या बेदरकार धाडसीपणाचे किंवा चिडल्यावर ते कसे

तोंडसुख घेत असत, याचें वर्णनहि अनेकांनीं केलें आहे. मॉनमाउथला चार्लस-लीनें क्लिंटनच्या सेनेवर चढाई करण्यांत कुचराई केली, तेव्हां त्या दिवसाचा अत्यंत उकाडा आणि लीची वर्तणूक यांनीं संत्रस्त झालेल्या वॉशिंग्टननीं लीला 'तिरस्करणीय नामर्द!' अशी शिवी हांसडली होती, असें सांगून कांहीं जण त्यांचा 'मनुष्यपणा' सिद्ध करण्याचा प्रयत्न करतात; तर कांहीं जण, ते स्त्री-वर्गांत फार प्रिय होते, त्यांना नृत्याची फार आवड होती, वगैरे सांगून तें सिद्ध करण्याचा प्रयत्न करतात.

हा अट्टाहास अगदींच निरर्थक ठरत नाहीं. यामुळें मार्शल, विम्स, स्पार्क्स यांसारख्या प्रारंभीच्या चरित्रकारांनीं अतिरिक्त स्तुतिसुमनांचा जो ढीग रचला आहे, तो बाजूला सारण्याला मदत होते. चेरी वृक्षावर कुऱ्हाड चालविणें वगैरे दंतकथा आपण दृष्टीआड करूं शकतों. तथापि स्टुअर्टनें सेनापति वॉशिंग्टन यांचें जें चित्र काढलें आहे, त्याच्या आरपार पाहण्याची आवश्यकता आहे. समाजांत अद्याप स्थान न लाभलेल्या त्या तरुणाची, उत्साही जमीनमोजणीदाराची, व्हर्जि-नियाच्या तुजबी फौजेच्या धडपड्या कर्नलची, आपल्या नव्या मालमत्तेवर प्रेम करणाऱ्या मळेमालकाची ओळख करून घेणें विशेष अत्यावश्यक आहे.

कारण, वॉशिंग्टन यांच्या पूर्वजीवनांतील कालखंडांतच, तेजोवलयांकित महा-पुरुष आणि प्रत्यक्ष व्यक्ति अलग करून त्यांच्या चारित्र्याची घडण कशी झाली, हें पाहण्याला लागणारी सामुग्री मिळूं शकते. त्यांचें घराणें प्रतिष्ठित असलें तरी, वसाहतींतील घरंदाज प्रस्थांमध्यें वॉशिंग्टन घराण्याची गणना होत नव्हती. 'तोंडांत चांदीचा चमचा धरून जन्माला येणें' हा वाक्प्रचार वापरून म्हणायचें झालें तर वॉशिंग्टन जो चमचा तोंडांत धरून जन्माला आले तो चांदीचा नसून, चांदीचा मुलामा दिलेलाच चमचा होता आणि पित्याच्या मृत्यूनंतर तोहि त्यांच्या तोंडांतून काढून घेतला गेला होता. आपल्या जीवनाचा पाया घालण्यासाठीं त्यांना नातेवाइकांची व वजनदार फेअरफॅक्स कुटुंबाची मदत घ्यावी लागली होती. ते महत्त्वाकांक्षी होते. त्यांची महत्त्वाकांक्षा कशी बनत गेली, लष्करी क्षेत्रांत कर्तबगारी गाजविण्याच्या आशेबरोबर ती महत्त्वकांक्षा कशी वाढत गेली आणि ब्रिटिश खड्या फौजेंत हुद्दा मिळविण्यांत अपयश येतांच त्या महत्त्वाकांक्षेला कशी मुरड बसली, हें आपण त्यांच्या पूर्वायुष्याकडे पाहून जाणुं शकतों. मोनोंगाहेलाच्या रणांगणावर वॉशिंग्टन यांनीं व्यक्तिशः कांहींहि कर्तबगारी गाजविलेली असो, पण

त्या युद्धांत ब्रॅडॉक मारला गेला, या घटनेचा त्यांच्या महत्त्वाकांक्षेवर जबरदस्त प्रतिकूल परिणाम झाला, हें खास. वैवाहिक जीवनांत रमल्यावर त्यांचें व्यक्तित्व अधिक परिपक्व बनलें. तेथून पुढें ते प्रतिष्ठित सद्गृहस्थ, नवजागृतीच्या युगाला शोभेसें वर्तन असणारे नागरिक म्हणून आपल्याला दिसूं शकतात. मातृभूमीच्या बाजूला जायचें कीं विरुद्ध उभें ठाकायचें, याबाबत तर्कशुद्ध पद्धतीनें आणि मनाला फारशा वेदना न होतां निर्णय घेण्याइतका त्यांचा मनोविकास झालेला आपल्याला दिसून येतो. अपरिपक्वतेच्या परिणामीं त्यांनीं चुका कोणत्या केल्या आणि त्या कशा सुधारल्या हें आपण बघूं शकतों आणि प्रतिष्ठितपणा आणि आत्मसंयमन या गुणांची वाढ कसकशी होत गेली, हें आपण त्यांच्या पूर्वायुष्यावर नजर टाकून बघूं शकतों.

प्रत्येक व्यक्तीमध्येंच भूतकालांतील संस्कारांमुळें घडले गेलेले स्वभावधर्म दडून राहिलेलेच असतात. त्याप्रमाणेंच व्हर्जिनियांतील अनुभवाचे संस्कारहि असेच वॉशिंग्टन यांच्या मनांत खोलवर रुजलेले होते. ऐन उमेदींतील उत्कट भावनांचे अवशेष त्यांच्या मनांत नेहमींच टिकून होते, असें म्हटल्यास तो कांहीं केवळ कल्पनेचा विलास ठरणार नाहीं. वुड्रो विल्सन हे असेच दुसरे एक व्हर्जिनियन पुढें राष्ट्राध्यक्ष झाले. त्यांनीं १८८४ मध्यें आपल्या नियोजित वधूला लिहिलेल्या पत्रांत म्हटलें होतें, " फार तीव्र भावना असणें नेहमींच सुखद वा सोयीस्कर नसतें. मला तर सारखें वाटतें कीं, मी सतत बरोबर एक जागृत ज्वालामुखीच बाळगीत आहें. अन् ही भावना मला स्वस्थता लाभूं देत नाहीं." हेंच वर्णन तरुण वॉशिंग्टननाहि लागू पडतें. अर्थात् हे दोन्ही पुरुष प्रौढावस्थेंत अत्यंत सरळ वृत्तीचे पुरुष म्हणूनच जगांत ओळखले गेले.

तथापि, वॉशिंग्टन यांच्यांत 'मानवी बाजू' कशी होती, हें सिद्ध करण्याच्या भरांत एक ढोबळ चूक होण्याचा संभव आहे. तरुण पिढीपुढें आदर्श म्हणून ठेवण्यालायक पुरुष म्हणून त्यांचें जें चित्र एकोणिसाव्या शतकांत रेखाटलें गेलें, तें पुसून टाकून त्या जागीं विसाव्या शतकाला साजेसें आदर्श पुरुषाचें चित्र रेखाटण्याची चूक आपल्या हातून होण्याचा धोका आहे. आणि अठराव्या शतकांतल्या व्यक्तीचें असें चित्र रेखाटलें, तर तेंहि चित्र पहिल्या चित्रासारखेंच फसवें ठरेल. वॉशिंग्टन यांच्या आवडीनिवडी अत्यंत सुसंस्कृत उमरावी वृत्तीच्या सन्मान्य सद्गृहस्थाला शोभण्यासारख्या होत्या; त्यांना खाण्यापिण्याची आवड

होती; ते संगतीचे लोभी होते; पत्ते खेळणें, नाटकें बघणें, शिकार करणें यांची त्यांना आवड होती; थोडीशी गांभीर्याकडे झुकलेली असो, पण त्यांच्यांत विनोद-वृत्ति होती; आणि क्वचित् डोळे भरून येण्याइतके ते भावनाप्रधान होते; – या सर्व गोष्टी मान्य केल्या तरीसुद्धां विद्यमान काळांतील चित्रपटांच्या किंवा ऐतिहासिक कादंबऱ्यांच्या अमेरिकन नायकासारखें त्यांचें व्यक्तित्व होतें, असा त्याचा अर्थ होऊं शकत नाहीं.

ते शूर होते, पण बेदरकार साहसी वीर नव्हते. सरहद्द त्यांना परिचित होती आणि सीमारक्षकाचा गणवेश योग्य वेळीं अंगावर चढविण्याचे फायदे त्यांना माहीत होते; तरीसुद्धां ते कांहीं ' डेव्ही क्रॉकेट ' नव्हते. ब्रिटिशांच्या दृष्टीनें ते बंडखोर होते, पण स्वतःला ते बंडखोर समजत नव्हते. ते स्वतःला क्रांतिकारक-देखील मानीत नसत. अनियंत्रित सत्तेच्या उच्चाटनाचें प्रतीक म्हणून लफायेतनें त्यांना बॅस्टिल तुरुंगाची किल्ली पाठविली, तेव्हां त्यांनीं त्याला सौजन्यपूर्ण भाषेंत आभारनिदर्शक पत्र पाठविलें, पण उलट कोणती देणगी पाठविली तें पहा !

> " तुमच्या देणगीच्या मानानें माझी देणगी तितकी मौल्यवान् आहे असें नव्हे, पण एक स्मृतिचिन्ह म्हणून आणि माझ्याच गांवांत तयार झालेली वस्तु म्हणून मी बुटाच्या पट्ट्याला लावायच्या कड्यांची (बकल्स) एक जोडी पाठवीत आहें. "

असें वॉशिंग्टन यांनीं लिहून खरोखरच बकलसची जोडी पाठविली होती ! हा साधेपणा खरोखरच अभिजात म्हणावा लागेल !

वॉशिंग्टन हे अनेक दृष्टींनीं साधे आणि निरभिमानी गृहस्थ होते. आपल्या शेतवाडीच्या पाहणीसाठीं ते किती साध्या पोषाखांत जात, याबद्दल माउंट व्हर-नॉनला भेट देणाऱ्यांनीं आश्चर्योद्गार काढलेले आहेत. पण त्याचबरोबर भोजनाच्या वेळचा योग्य पोषाख घालण्याचीहि दक्षता ते घेत असत, असेंहि या पाहुण्यांनीं नमूद करून ठेवलेलें आहे. वॉशिंग्टन हे प्रज्ञावान् नव्हते, पण इतर कोणामध्यें प्रज्ञेचा आविष्कारहि न सोसवणारे ते खासच नव्हते. त्यांच्या पत्र-व्यवहाराची भाषा व भाषणपद्धति अनेकदां ओबडधोबड असे; पण असंस्कृत खासच नव्हती. क्वचित् तोंडांत अपशब्द आले तरी असल्या भाषेची आवड त्यांना खासच नव्हती. मॉनमाउथ येथें त्यांनीं लीवर शिव्यांचा भडिमार केला, या दंतकथेला विश्वसनीय आधार नाहीं. वॉशिंग्टन यांच्याविषयींचे समकालीनांचे

अभिप्राय बघतां फारच क्वचित् वेळां अपशब्द त्यांच्या मुखांतून निघून जात, असें दिसून येतें.

ते मनमिळाऊ असले तरी त्यांत ऐसपैसपणा नव्हता. आपल्याला दिसून येतें कीं, त्यांना आयुष्यांत समवयस्क असा जिगरदोस्त कोणीच नव्हता. लफायेतशीं ते अंतःकरण खुलें करून बोलत. या फ्रेंच नेत्याला पाठविलेलीं पत्रें त्यांनीं खूपच रंगून लिहिलेलीं दिसतात. क्रांतियुद्धांतील एक हुतात्मा जॉन लॉरेन्स या तरुण कॅरोलियन सेनाधिकाऱ्याबद्दलहि त्यांना विशेष जिव्हाळा होता. पण लफायेत वा लॉरेन्स यांच्याविषयींचा वॉशिंग्टन यांचा हा जिव्हाळा पितृतुल्य होता.

वॉशिंग्टन यांचें युग विद्यमान युगापेक्षां निराळें होतें. एक प्रकारची मुग्ध वृत्ति हें त्या युगाचें वैशिष्ट्य होतें. तथापि, त्यांच्या समकालीनांशीं तुलना केली तरी त्यांच्या व वॉशिंग्टन यांच्या वागण्याच्या पद्धतींतला फरक जाणवतो. वॉशिंग्टन यांना " विकारवश, संवेदनाक्षम, ऐहिक प्रवृत्तीचे गृहस्थ " म्हणायचें, तर मग फ्रँकलिन, जेफर्सन, मेडिसन, हॅमिल्टन यांना छंदीफंदी आणि दुर्वर्तनीच म्हणावें लागल व पेट्रिक हेन्री किंवा आरॉन बर सारख्यांना काय म्हणावें हा प्रश्नच पडेल! १७८४ मध्यें अमेरिकेंत आलेल्या एका डच गृहस्थानें लिहिलें आहे, " मला त्यांच्याशीं खेळीमेळीनें वागण्याची इच्छा होती, पण तें शक्यच झालें नाहीं. अत्यंत थंड वृत्तीच्या, सावधानपणानें संभाषण करणाऱ्या, पण तितक्याच आर्जवी वृत्तीच्या त्या सेनापतीशीं फार घसट करणें अशक्यच होतें." त्यानंतर चार वर्षांनीं वॉशिंग्टन यांना भेटावयास गेलेल्या एका युरोपीय गृहस्थानें म्हटलें आहे, " त्यांचें वागणें अत्यंत सौजन्यशील वाटलें तरी, त्यांचा थंडपणा माझ्या स्वभावधर्माशीं न जुळण्यासारखा असल्यामुळें मला आवडला नाहीं. हातचें राखून संकोचानें बोलण्याची त्यांची पद्धत होती." याचें पुष्कळसें कारण अर्थात् त्यांच्यांतला लाजाळूपणा हेंच होतें. निकटपरिचितांशीं ते अधिक मोकळेपणानें बोलत असत. पण त्यांच्या उभ्या जीवनांत ते मोठ्या खुषींत येऊन ऐसपैस गप्पा मारीत असतील, ही कल्पना मान्य करणें अशक्य आहे. आयुष्याच्या अगदीं अखेरच्या काळांत राजद्रोहविषयक कायद्यासारख्या कठोर कायद्याला संमति देऊन रूढिप्रियतेंत त्यांनीं हॅमिल्टन यांच्यावरहि मात केली, असें त्या विशिष्ट कायद्याकडे बोट दाखवून म्हणणें, वॉशिंग्टन यांना अन्याय करण्यासारखें आहे. तथापि ऐन तारुण्यांत, व्हर्जिनियाच्या जुजबी फौजेंतून सेवानिवृत्त होण्याच्या वेळींसुद्धां, त्यांच्या हाता-

खालच्या अधिकाऱ्यांना–त्यांच्यापेक्षां वयानें मोठ्या असलेल्या अधिकाऱ्यांना देखील त्यांच्याविषयीं एक प्रकारचा आदरयुक्त दराराच वाटत असे. वॉशिंग्टन कोणालाच कधीं 'आपल्या बरोबरीचे' वाटलेले नाहींत. 'इतरांसारखे' ते कधींच वाटलेले नाहींत.

तेव्हां, वॉशिंग्टन हे सर्वसामान्य माणसासारखे होते, असें सिद्ध करण्याच्या भरांत चुकीचें व्यक्तिचित्र रेखाटलें जाण्याचा धोका आहे. त्यांच्या व्यक्तित्वाचें मूलभूत सत्यज्ञान यामुळें होऊं शकणार नाहीं. वॉशिंग्टन यांच्याभोंवतीं तेजोवलय निर्माण होण्याच्या प्रक्रियेंत त्यांच्यांतील 'मानवी' वैशिष्ट्यें दडपलीं जाऊन तीं दिसेनाशीं झालीं हें खरेंच आहे. पण त्याचबरोबर त्यांच्यांतील या वैशिष्ट्यांमुळें त्या प्रक्रियेला हातभार लागलेला आहे, हेंहि खरें आहे. खराखुरा माणूस आणि दैवत म्हणून बनविली गेलेली पौराणिक महापुरुषाची मूर्ति या दोन्हींमध्येंहि समान असलेल्या कांहीं महत्त्वाच्या गोष्टी आहेत.

### अभिजात आदर्श मूल्यें

व्यक्ति आणि विभूति यांना समान असलेलीं हीं महत्त्वाचीं वैशिष्ट्यें ग्रीक-लॅटिन युगाला शोभणारीं होतीं; अधिक निश्चितपणें सांगायचें तर रोमन युगाच्या मानदंडानें मोजण्यासारखीं होतीं. वॉशिंग्टन-पुराणांच्या प्रचंड ग्रंथसंग्रहाकडे पाहिलें म्हणजे आपल्या लक्षांत येतें कीं, हा व्हर्जिनियांतला मळेमालक दुसरा सिनसिनाटस होता, हें पुनः पुनः बजावून सांगितलें जात आहे. आणि या अट्टाहासांत खूपच तथ्य आहे. खरोखरच, जों जों विचार करावा तों तों ती तुलना अधिकाधिक योग्य वाटूं लागते. अठराव्या शतकांतला इंग्लिश सद्‌गृहस्थ, मग तो ब्रिटनमध्यें राहणारा असो कीं व्हर्जिनियासारख्या वसाहतींत राहणारा असो, दुहेरी नागरिकत्व धारण करणारा असे, असें म्हणतां येईल. तो जसा इंग्रज होता, तसाच तो 'ऑनररी' रोमनहि होता. आणि तसा तो दिसतहि असे. अठराव्या शतकांतील थोर पुरुषांच्या तजबिरी व पुतळे पाहिल्यास, करारी, दाढीमिशा नसल्या तरी मर्दानी चेहऱ्यांचेच ते पुरुष दिसतात. रोमन थोर पुरुषांच्या पुतळ्यांशीं त्यांच्या तजबिरींचें व पुतळ्यांचें विलक्षण साम्य दिसतें. आणि अठराव्या शतकांतील मूर्ति करण्याच्या पद्धतीवरहि त्या प्राचीन रोमन युगाचीच छाप पडलेली दिसते, ही गोष्ट वेस्टमिन्स्टर ॲबेतील कांहीं स्मारकें बघितल्यास आढळून येतें. जनरल वेड याचा

रौबिलाकनें तयार केलेला ( १७४८ ) पुतळा पहा : काळपुरुष त्या सेनानीचीं विजयचिन्हें नष्ट करण्याचा प्रयत्न करीत असून कीर्तिदेवता काळपुरुषाला रोखीत आहे, असें त्यांत दाखविलें आहे. त्याच शिल्पकारानें ॲडमिरल सर पिटर वॅरन यांचा पुतळा १७५२ मध्यें तयार केलेला आहे. हर्क्यूलस त्या आरमारी वीराला सिंहासनावर बसवीत असून नाविक विद्येची देवता कांहींशा सखेद पण कौतुकाच्या दृष्टीनें त्याच्याकडे बघत आहे, असें दृश्य त्यांत दाखविलेलें आहे. ॲडमिरल वॅटसन यांचें स्मारकहि स्कीमेकर्सनें (१७५७) अशाच धर्तीचें केलेलें आहे. रोमन पद्धतीचा झगा घालून व विजयचिन्ह म्हणून ताडाच्या झाडाची फांदी हातीं घेऊन वॅटसन बसलेले असून त्यांच्या उजव्या बाजूला 'कलकत्ता नगरी' गुडघे टेकून त्यांना अर्ज सादर करीत आहे, असें दृश्य त्या स्मारकांत दाखविलेलें आहे. वॉशिंग्टन यांच्या काळांतील प्रतिष्ठित नागरिक कळत किंवा नकळत रोमचा आदर्श आपल्यापुढें ठेवीत असे. बोलण्यांत आणि वागण्यांत रोमन मूल्यांचीच कसोटी तो पाळीत असे. सर्वच लोक तसे होते असें नव्हे. पण रोमन मूल्यांचा पुरेसा प्रभाव होता हें मात्र खरें. ही गोष्ट लक्षांत घेऊनच आपल्याला वॉशिंग्टन यांचें दर्शन घेतां येईल व त्यांच्या व्यक्तिमत्त्वामागची पार्श्वभूमि बघतां येईल.

वॉशिंग्टन हे ॲडिसनच्या 'कॅटो' नाटकांतील सुभाषितें नेहमीं उद्धृत करीत असत. हा कांहीं केवळ योगायोग नव्हे. त्या शतकांत 'कॅटो' नाटक अत्यंत लोकप्रिय होतें. १७७६ सालीं ब्रिटिशांनीं कॉनेक्टिकटमधील तरुण वीरपुरुष नाथन हेल याला हेर म्हणून फांशीं दिलें तेव्हां त्यानें, "माझ्या देशासाठीं फक्त एकदांच मी प्राण देऊं शकतों, याचेंच मला दुःख होतें," असे उद्गार फांशीं जातांना काढले होते. "देशाचें रक्षण करण्यासाठीं मृत्यूला कवटाळण्याची संधि आपल्याला फक्त एकदांच मिळावी, ही केवढी कींव करण्यासारखी गोष्ट आहे!" या ॲडिसनच्या 'कॅटो'च्या उद्गारांचाच पुनरुच्चार हेलनें केलेला होता, हें उघडच आहे. रोमनकालीन सद्गुणांत 'Virtus' ( धैर्य ) या गुणाला मोठें स्थान होतें. आणि हा गुण तर व्हर्जिनियांतील लोकांत प्रत्यक्ष बाणलेला होताच. धैर्य, गांभीर्य, शिस्त आणि वरिष्ठांचा अधिकार याविषयीं आदर, निर्मळपणा, सचोटी, महत्त्वाकांक्षा हीं गुण-मूल्यें रोमन काळांत मानलीं जात असत.

या गुणांचें मोल वाटावें अशीच परिस्थितिहि होती. रोमन संस्कृति ही

क्षत्रिय-संस्कृति होती. सरहद्दीवरील अशांततेबाबत रोमन लोकांना नेहमींच जागरूक रहावें लागत असे. कायदा आणि सुव्यवस्था यांवर रोमचा विशेष भर असे. रोमन संस्कृतींत मार्दव आणि सूक्ष्मता यांना स्थान नव्हतें. कवीच्या स्वप्नसृष्टींत नव्हे तर भोंवतींच्या वस्तुस्थितींत त्या संस्कृतीचीं मुळें होतीं. धार्मिकता माफक प्रमाणांतच होती. कोणत्याहि बाबतींत अतिरेक अनुचित मानला जाई. गुलामगिरी हें रोमन समाजाचें अविच्छिन्न अंग होतें. मुख्य राजधानी आणि प्रांतिक राजधान्या वगळल्यास एकेक शेतवाडी हेंच एकेक खेडें असें. समाजाला सुसंघटित ठेवणारी शक्ति म्हणून कुटुंबसंस्थेला महत्त्व होतें. जिव्हाळा, आदरभाव, निष्ठा यांचा विकास कुटुंबांत होऊन नंतर समाजांत या गुणांचें प्रतिबिंब पडत असे. देहाचे जसे अन्य घटक, तसाच प्रत्येक कुटुंब हा समाजाचा अविच्छिन्न अवयव असून सर्व समाज म्हणजे एक शरीरच होतें. सद्विचारी व कणखर नागरिक तयार करणें हा समाजाचा आदर्श होता. धन-संपादनाच्या लालसेबरोबरच सामाजिक कर्तव्याची जाणीव असे. त्यांच्या उदात्त वृत्तीला संकुचितपणाच्या मर्यादा असत. पायापुरतेंच न बघतां दूरदृष्टीचा गुण असावा, पण विनाकारण तात्त्विक विचारमंथनानें डोक्याला फार ताण द्यायचा नाहीं, असा त्या लोकांचा स्वभावधर्म होता.

वरील वर्णनांतील 'रोम' हा शब्द काढून तेथें 'व्हर्जिनिया' हा शब्द घालतां येईल कीं नाहीं ? सिनासिनाटसच पुनः जन्माला आला, असें वॉशिंग्टन यांचें वर्णन त्यांच्या जुन्या चरित्रकारांनीं व समकालीन चाहत्यांनीं केल्यास काय नवल ! * योद्धा, जमीनदार, राजकारणी पुरुष असें जें वॉशिंग्टन यांचें ढोबळ चित्र दिसतें तें रोमनकालीनच वाटतें. स्वतः सिनासिनाटस हा रोमन योद्धा असाच होता. वॉशिंग्टन यांच्या कुटुंबांतहि रोमनकालीन वैशिष्ट्यांचें प्रतिबिंब

* संयुक्त राज्यांत दुफळी माजण्याचा धोका निर्माण झाला असतां डॅनियल वेब्स्टर यानें वॉशिंग्टन यांच्या स्मृतीची आठवण देशबांधवांना करून देतांना रोमनकालीन उद्गार आपल्या भाषणांत शेवटीं उद्धृत केले, हा कांहीं केवळ पोकळ भाषाविलास नव्हता : " मला दुसरें कांहीं नको. माझ्या मृत्यूनंतर माझा देश स्वतंत्र राहील हें समाधान मला पाहिजे. ईश्वरानें यापेक्षां मला दुसरें कांहीं नाहीं दिलें तरी चालेल. आपण प्रजासत्ताकाचे नागरिक म्हणून घ्यायला पात्र आहों हें प्रत्येक माणसानें सिद्ध करावें, एवढीच माझी इच्छा आहे ! " अशा आशयाचे ते उद्गार होते.

दिसतें. माउंट व्हर्नॉनबद्दल त्यांना वाटणारी दुर्दम्य ओढ, मातेविषयीं जिव्हाळ्याची नसेल पण कर्तव्यबुद्धीनें वाटणारी आस्था, भाऊ-बहिणी-पुतणे-पुतण्या-भाचे-भाच्या-सावत्रमुलें वगैरे नातलगांकडे विनतक्रार व सतत लक्ष देण्याची वृत्ति आणि कर्तव्यबुद्धि या गोष्टी रोमन वैशिष्ट्यांचेंच दर्शन घडवितात. त्यांचें औदार्यहि त्यांतच जमा होतें. लॅटिन भाषेंतील ज्या 'Genus' या शब्दावरून इंग्रजींतील 'जनरॉसिटी' (औदार्य) हा शब्द बनला आहे, त्या 'Genus'चा मूळ अर्थ कूळ, घराणें असाच आहे.

वॉशिंग्टन यांच्या जीवनांत कर्तव्याला मोठें स्थान होतें. साऱ्या प्राप्त जबाबदाऱ्या पार पाडण्याची वृत्ति या कर्तव्यभावनेंतून निर्माण झालेली होती. आणि या जबाबदाऱ्या वैयक्तिक दृष्टीपेक्षां सामाजिक दृष्ट्या आवश्यक म्हणून मानल्या जात असत. वॉशिंग्टन हे समाजांत फार मिसळणारे नसतील; पण आपण समाजाचे एक घटक आहों, याची त्यांना नितांत जाणीव होती. अशा कर्तव्यतत्पर पुरुषाची व्यक्तिरेखा प्रौढावस्थेंत निर्विकार भासली तरी परिपूर्ण, समतोल आणि प्रसन्नहि वाटते. कर्तव्यतत्परतेला आणि प्रामाणिकपणाला चारित्र्यांत स्थान देणाऱ्या व्यक्तीच्या मनांत आपल्या मार्गाच्या योग्यायोग्यतेबद्दल शंका कधींच उपस्थित होत नाहींत असें नव्हे; पण त्याच्या जीवनांत कोणत्याहि बिकट समस्येचें उत्तर योग्य वर्तनाच्या नियमावलीला धरूनच शोधलें जातें. मग, धैर्य हें उपजत स्वभाव-धर्माप्रमाणें अंगांत मुरतें. मृत्यूविषयींच्या भीतीपेक्षां त्याची अपरिहार्यताच तेवढी दृष्टीपुढें राहते. "मृत्यूकडे वरवर, उतावळेपणानें किंवा तिरस्कारानें न बघतां ती एक निसर्गाची शस्त्रक्रिया आहे आणि ती आपल्याला टाळतां येत नाहीं, या दृष्टीनें बघणें हें प्रत्येक विचारवंताचें कर्तव्य आहे." असे उद्गार मार्कस ऑरेलि-असनें काढलेले आहेत. वॉशिंग्टन देखील, निरोपाचें भाषण केल्यानंतर त्या अपरिहार्य शस्त्रक्रियेसाठीं आपल्या निवासस्थानांतील शवघराकडे संथपणानें सहज चालून गेले असते.

रोमन मूल्यांमध्यें 'ग्लोरिया' – महत्त्वाकांक्षा ही एक सामाजिक प्रेरणा मानली जाई; ती व्यक्तिमनाची न शमणारी तृष्णा मानली जात नसे. तरुणपणीं पुढें येण्याची आणि बढतीची जी हांव होती ती एकदां आटोक्यांत आणल्यावर, वॉशिंग्टन यांची महत्त्वाकांक्षा अशी सामाजिक स्वरूपाचीच बनली होती. आपल्या-बद्दल लोकांचें मत चांगलें असावें, आपल्या नांवलौकिकाला बाध येतां कामा नये,

ही वॉशिंग्टन यांची इच्छा वरील अभिजात आदर्श मूल्यांना धरूनच होती. आजच्या काळांत मोठमोठे पुढारी जसे लोकमताला विचकून लोकप्रियता टिकवण्याच्या जाणिवेनें वागतात, तशा प्रकारच्या वृत्तीपेक्षां वॉशिंग्टन यांची ही वृत्ति अगदीं निराळी होती. युद्धभूमीवर असतांना वॉशिंग्टन आपल्या हाताखालील अधिकाऱ्यांचा सल्ला घेऊनच कोणतीहि योजना आंखीत असत आणि राष्ट्राध्यक्षपदावर असतांना लोकमताचा वारा कसा वाहतो यावर ते लक्ष ठेवीत असत, हें खरें; पण आणीबाणीच्या क्षणीं ते न कचरतां कृति करण्याचें नैतिक धैर्य दाखवीत असत. जॉन जे यांनीं ब्रिटनशीं घडवून आणलेल्या तहाच्या वेळीं वॉशिंग्टन यांच्यांतलें हें पाणी दिसून आलें. जनतेविषयीं बोलतांना त्यांची भावना तुच्छतेची नसे; पण रूसोसारख्या तत्त्वज्ञाप्रमाणें जनतेशीं एकरूप झाल्याची भावना मात्र जनतेविषयीं बोलतांना त्यांच्या ठायीं नसे.

वॉशिंग्टन यांच्या वेळच्या व्हर्जिनियांतील परिस्थिति म्हणजे प्राचीन रोमन युगाची सही सही प्रतिकृति होती आणि त्यांचे सारे समकालीन रोमन आदर्शांच्या मुशींत ओतलेले नमुने होते, असें मानणें अर्थात् बरोबर होणार नाहीं. मुख्य मुद्दा हा आहे कीं, त्यांचें युग विद्यमान युगापेक्षां अगदीं निराळें आहे. वॉशिंग्टन यांची विद्यमान युगांतील माणसाशीं तुलना न करतां रोमन आदर्शांशीं केल्यास त्यांच्या व्यक्तित्वाची ओळख अधिक पटूं शकते. त्या वेळचा व्हर्जिनिया, त्या वेळच्या इंग्लंडसारखा नसून रोमनछाप होता, हें मुख्यतः सांगावयाचें आहे. त्या समाजाच्या मुशींत तयार झालेलें चारित्र्य आपल्या डोळ्यांपुढें साकार होण्याच्या दृष्टीनें रोमनकालीन समाजचित्राची पार्श्वभूमि अत्यंत उपयुक्त ठरते. आपल्या पिढ्यांना हें चित्र अपरिचित आहे. ऐतिहासिक दृष्ट्या वरील तुलना त्यांतल्या त्यांत बरोबर आहे, तर काव्याच्या भाषेंत बोलावयाचें झाल्यास ही तुलना अत्यंत बरोबर वाटते. आपण एक प्रचंड प्रजासत्ताक राष्ट्र नव्यानें उभारूं शकूं, असा विश्वास वॉशिंग्टन यांच्यासारख्या पुरुषांना कसा वाटूं शकला, याचा खुलासा ऐतिहासिक दृष्ट्या वरील तुलनेचा विचार केल्यास मिळूं शकतो. रोमनकालीन जग एका अर्थानें नवजातच होतें. पण त्या जगालाहि प्रजासत्ताकाची कल्पना व्यवहारांत उतरविण्यायोगी वाटली होती. अमेरिकेलाहि आपलें राष्ट्र नवजात असल्याची जाणीव होती. आणि म्हणूनच तिसऱ्या जॉर्जचे निष्ठावंत प्रजाजन असूनहि परिस्थिति आणि विचारपरंपरा यांनीं त्या राष्ट्राला राजे आणि

राजदरबार यांच्यापासून दूर नेलें; युरोपपेक्षां अगदीं नव्या स्वरूपाची पुनर्रचना करण्याला तें राष्ट्र प्रवृत्त झालें. खऱ्या अर्थानें वॉशिंग्टनसारख्या नेत्यांनीं केलेली क्रांति जुनें नष्ट करून नवें उभारणारी नव्हती, तर जें जुनें पण उत्कृष्ट होतें तें ओळखून त्याचें जतन करणारी ती एक प्रक्रिया होती.

रोमचा आदर्श समोर असला तरी त्याच छापाचें नवें राष्ट्र घडविण्याचा तो प्रयत्न नव्हता. राजेशाहींतून प्रजासत्ताक व्यवस्थेंत स्थित्यंतर घडवून आणण्या-साठीं अनेक गोष्टी आवश्यक होत्या. विस्कळीतपणें पसरलेल्या वसाहतींना एका समर्थ संयुक्त राज्यांत संघटित करण्यासाठीं किती तरी गोष्टी आवश्यक होत्या. लढून स्वातंत्र्य मिळवावयाचें होतें आणि मग तें प्रत्यक्ष साकार करावयाचें होतें. अमेरिका भावनात्मक दृष्ट्या राष्ट्र बनण्याआधीं कायदेशीर दृष्टया राष्ट्र बनलें असें म्हणतां येईल. आज 'अमेरिकीकरण' (अमेरिकनायझेशन) या शब्दाचा अर्थ अन्य जगावरचा अमेरिकेचा प्रभाव, असा समजला जातो. पण वॉशिंग्टन यांच्या काळांत तो शब्द प्रथम रूढ झाला तो अमेरिकनांनीं चालविलेल्या संरक्षक लढ्याचें स्वरूप विशद करण्यासाठीं वापरला जात होता. 'युरोपीकरण' या शब्दापेक्षां निराळा अर्थ सूचित करणारा शब्द म्हणून तो शब्द प्रचारांत आला.

तेव्हां वॉशिंग्टन यांनीं ज्या ध्येयाचा पुरस्कार केला, त्या ध्येयासाठीं त्यांनीं केलेल्या प्रयत्नांमुळें आणि त्यांच्या स्वतःच्या चारित्र्यामुळें ते लोकादरास पात्र व्हावेत यांत नवल नाहीं. त्यांच्या हयातींत त्यांच्याभोंवतीं विभूतिमत्त्वाचें तेजोवलय निर्माण झाल्यासहि नवल नाहीं. १७७५ मध्यें सैन्याचें आधिपत्य स्वीकारल्यानंतर थोड्याच दिवसांत जनमनांत त्यांना अनन्यधारण स्थान प्राप्त झालें आणि युद्धकाल जसजसा वाढत गेला, तसतसें हें स्थान अधिकाधिक उंच आणि जास्त जास्त चिरस्थायी होत गेलें. ते चांगले योद्धे होते आणि कार्यक्षम प्रशासक होते म्हणूनच केवळ त्यांना हें स्थान प्राप्त झालेलें नव्हतें. प्रत्यक्षतः त्यांच्याकडून सैनिकांना स्फूर्ति मिळाली असें नव्हे. त्यांचें धैर्य आदर्श होतें, पण दुसऱ्यांत धैर्य निर्माण करण्याचा जो तेजस्वी गुण कांहीं लष्करी नेत्यांत असतो, तो वॉशिंग्टन यांच्यांत नव्हता. त्यांचे दैनंदिन हुकूम ऐकतांच सैनिकांकडून जयजयकाराच्या आरोळ्यांनीं साद दिली जात नसे. स्वातंत्र्याची सनद वाचून दाखविण्यासाठीं ता. ९ जुलै १७७६ रोजीं झालेल्या कवायतीच्या वेळीं आपल्या भाषणाचा शेवट त्यांनीं अगदीं व्यावहारिक पातळीवरच्या घोषणेनें केला होता.

"प्रत्येक सैनिक आतां त्याच्या गुणांचा योग्य मोबदला देण्यास समर्थ असलेल्या आणि स्वतंत्र देशांतील अत्युच्च सन्मानाच्या स्थानापर्यंत जाण्यास संधि देणाऱ्या राज्याच्या नोकरींत आहे," हे त्यांचे शब्द सैनिकांच्या कांहीं रांगांपर्यंतच ऐकूं जातील इतक्या खालच्या पट्टींत उच्चारलेले होते.

त्यांच्या भाषेंत निरसपणा होता का? असेल, पण जेफर्सनसारख्या वक्तृत्वपूर्ण भाषेवर हा योग्य उतारा होता. वॉशिंग्टन लोकांना खूश करण्याच्या फंदांत पडणारे नव्हते. प्राचीन कालांतील लोकनायकासारखें धीरोदात्त वर्तन असणाऱ्या या पुरुषाच्या रूपानें भूतकाल आणि वर्तमानकाल सांधले गेले होते; अमेरिकेचें भवितव्य त्यांच्यावर अवलंबून होतें. पण त्यांनीं वर्तमानकाळावरील पकड कदापि ढिली होऊं दिली नाहीं. ते अमेरिकेचे प्रतीक होते, पण हें प्रतीक वस्तुस्थिति कदापि दृष्टीआड होऊं देणारें नव्हतें. जेफर्सन "जीवन, स्वातंत्र्य, सुखासाठीं प्रयत्न करण्याची संधि" ही भाषा वापरीत; तर वॉशिंग्टन देशभक्तींतच पगार आणि बढती यांचाहि समावेश करीत असत. त्यांनीं स्वातंत्र्याच्या संकल्पनेला व्यावहारिक बैठकीचा आधार दिला. स्वप्नाळूपणाच्या जागीं वास्तव दृष्टिकोनाला स्थान दिलें. ध्येयवाद्यांनाहि ज्याची खात्री नव्हती त्याची खात्री या वास्तववादी पुरुषाला होती. राष्ट्र अस्तित्वांत येईल आणि तें भरभराटेल, अशी त्यांना खात्री होती. दैवाचा दुर्विलास हा कीं, अशा वास्तवाच्या भूमीवर ठामपणें पाय रोवून उभ्या राहिलेल्या पुरुषाला त्याच्या देशबांधवांनीं हळूहळू आकाशाला नेऊन भिडवून त्याचें दैवत बनविलें! "वॉशिंग्टन यांच्या चारित्र्यांत दोष असलेच तर ते सूर्यावरील डागासारखे होते. मूर्तिपूजेच्या युगांत त्यांची पूजाच झाली असती!" असें १७७७ सालीं 'पेन्सिल्व्हानिया जर्नल'नें म्हटलें होतें.

### टीका

कांहीं अमेरिकन लोक खरोखरच त्यांना पूजनीय मानीत होते. "आपणच घडविलेल्या मूर्तीची पूजा करतांना या सभागृहांतील सभासदांना बघून मला दुःख होतें. जनरल वॉशिंग्टन यांचे गुण कितीहि थोर असोत, मी त्यांचा आदरच करतों; पण या सभागृहांत मी त्यांच्यापेक्षां श्रेष्ठ आहें असेंच मला वाटतें," असे उद्गार जॉन ॲडम्स यांनींच १७७७ सालीं कॉंटिनेंटल कॉंग्रेसचे सभासद असतांना काढले होते.

या परिस्थितीचें अधिक जवळून परिशीलन केल्यास आपल्याला वॉशिंग्टन यांची अधिक ओळख करून घेतां येईल. प्रथमतः त्यांचे टीकाकार कोण होते तें बघूं या. युद्धकाळांत मुख्यतः त्यांच्या हाताखालचे सेनाधिकारी व या सेनाधिकाऱ्यांचे कॅांग्रेसमधील मित्र हे ते टीकाकार होते. तेव्हां आणि नंतरहि त्या टीकाकारांत बुद्धिमान् माणसांचा, निदान हजरजबाबी माणसांचा भरणा अधिक होता. या टीकाकारांची भूमिका जेम्स पार्टनच्या खालील उताऱ्यांत ठीक प्रतिबिंबित होते :

"आरॉन बर यांच्या मतें, वॉशिंग्टन हे अत्यंत प्रामाणिक आणि सद्विचारी गृहस्थ असले तरी महान् सेनानी नव्हते. आणि देवतातुल्य तर मुळींच नव्हते. बर यांना भ्याड माणसाइतकाच मंदबुद्धि माणसाचा तिटकारा होता. आणि त्यांच्या मतें वॉशिंग्टन तसे होते. हॅमिल्टन प्रभृति क्रांतियुद्धांतील बुद्धिमान् योद्ध्यांना असेंच वाटे. पण हॅमिल्टन यांच्या मतें, ध्येयाच्या विजयासाठीं वॉशिंग्टन यांच्या लोकप्रियतेचा उपयोग होता. म्हणून ते याबाबतचीं मतें स्वतःपाशींच ठेवणें पसंत करीत."

वरील विधानावरून असें दिसतें कीं, बुद्धिमत्तेची माफक देणगी असणाऱ्या माणसाला इतकी कीर्ति मिळावी, याचें या बुद्धिमंतांना वैषम्य वाटे. १७८७ मध्यें पुनः सार्वजनिक क्षेत्रांत ते आले तेव्हां कांहीं जणांनीं, "वॉशिंग्टन यांच्याविरुद्ध शब्द उच्चारणें म्हणजे अमेरिकेशीं द्रोह करण्यासारखें होऊन बसलें आहे," अशी तक्रार खाजगी पत्रांतून केली होती, तर हॅमिल्टनसारख्यांनीं वॉशिंग्टनना लाभलेल्या जनमनांतील स्थानाचा उपयोग आपल्या भूमिकेला विजय मिळवून देण्यासाठीं करून घेतला. १७८५ मध्यें जॉन ॲडम्स यांनीं म्हटलें होतें :—

"जगानें वॉशिंग्टन यांचा गौरव करण्याऐवजीं त्यांना शिकवून तयार करणाऱ्या राष्ट्राचा गौरव करायला पाहिजे अमेरिकेच्याच गुणवत्तेचें प्रतिबिंब त्यांच्यांत उमटलें आहे. पॉपीच्या काळांत वॉशिंग्टन सीझर झाले असते, चार्ल्सच्या काळांत क्रॉमवेल झाले असते. दुसऱ्या फिलीपच्या काळांत प्रिन्स ऑफ ऑरेंज झाले असते आणि हॉलंडचे काउंट होण्याची इच्छा त्यांनीं बाळगली असती. पण अमेरिकेंत सेवानिवृत्त होण्याखेरीज अन्य कोणतीच महत्त्वाकांक्षा त्यांना बाळगणें शक्य नाहीं."

वॉशिंग्टनभक्ति असमर्थनीय, मूर्खपणाची व घातकहि आहे. अमेरिकन लोक तारतम्य न ठेवतील तर ते पुनः राजेशाही व तिच्याबरोबर येणाऱ्या अनिष्ट गोष्टी ओढवून घेतील, अशी भीति टीकाकारांना वाटे. बहुसंख्य टीकाकारांना हें मान्य होतें कीं, भक्ति हा संवयीचा भाग झाला तरच धोका असतो. आपण देवतातुल्य आहोंच, असें समजण्याइतक्या अहंभावानें वॉशिंग्टन यांना ग्रासलेलें नाहीं आणि ते कदापि तितक्या अहंभावाच्या आहारीं जाणार नाहींत, हेंहि टीकाकारांना मान्य होतें. तथापि त्यांची कीर्ति जसजशी वाढत गेली, तसतसें त्यांच्याभोंवतींचें तेजोवलय वाढत गेलें. 'माणसा'पासून ते दूर दूर जात होते.

टीकाकारांच्या वरील म्हणण्यांतला बराचसा भाग मत्सराचा, पक्षीय दृष्टिकोनाचा म्हणून आपण सोडून दिला तरी सर्वच टीका दृष्टीआड करतां येणार नाहीं. वॉशिंग्टन यांनीं सत्तेला चिकटून राहाण्याची हांव धरली नाहीं, हें त्यांचें निरिच्छपणाचें महान् कृत्य नव्हतें; तर अमेरिकन जनतेचा प्रजासत्ताक राज्यपद्धतीचा निर्धार किती अभंग होता याचें तें द्योतक होतें, असे कांहींसे अनुदार उद्‌गार जॉन ॲडम्सनीं काढले असले तरी त्यांत तथ्य होतेंच. अर्थात् आपल्या निरिच्छतेचा टेंभा वॉशिंग्टन यांनीं स्वतः कधीं मिरविला नाहीं ही गोष्ट वेगळी. त्याचप्रमाणें सरसेनापतीचें काम विनपगारी करण्याची तयारी वॉशिंग्टन यांनीं दाखविली तेव्हां ॲडम्सनीं विरोध केला तोहि योग्यच होता. कारण विनावेतन काम करण्याचें मान्य करून कोणाहि सरकारी अधिकाऱ्यापेक्षां आपण वरच्या पातळीवर आहों, असेंच नकळत दाखविण्याचा प्रयत्न या कृतींत दिसत होता. वॉशिंग्टन यांच्या कृतींमागें उच्च उद्देश असत. अंतिम सत्ता म्हणून ते कॉन्टिनेंटल कॉंग्रेसला मानीत असत हें खरें; तथापि आपल्या हाताखालच्या अन्य सेनानींपेक्षां आपण निराळे आहोंत, असें ते मानीत हेंहि खरें आहे. त्या सेनानींप्रमाणेंच वॉशिंग्टन यांचीहि कॉंग्रेसनेंच नेमणूक केलेली होती व त्यांच्याप्रमाणेंच वॉशिंग्टन यांनाहि बडतर्फ करण्याचा अधिकार ( मधला सर्वाधिकारित्वाचा सहा महिन्यांचा काळ वगळून ) कॉंग्रेसलाच होता हें खरें; पण वॉशिंग्टन हे स्वतःला तसें समजत नाहींत, अशा चुकीच्या कल्पनेंतून गेट्स्, कॉनवे प्रभृतींच्या तथाकथित कटाचा उगम झाला होता, हें विसरतां येणार नाहीं.

आपण सरसेनापतिपदाची जबाबदारी स्वीकारली ती केवळ देशप्रेमापायीं, असें वॉशिंग्टन स्वतः मानीत असत आणि बहुसंख्य अमेरिकनांनाहि तसेंच वाटत

असे. आपली प्रतिष्ठा त्यांनीं अमेरिकेच्या इभ्रतींत विलीन केली होती. तथापि असें समजू या कीं, त्यांच्याकडून कांहीं गंभीर स्वरूपाची चूक झाली असती तर?–तर त्यांना बडतर्फ करणें शक्य झालें असतें काय? ॲडॅम्स व कॉंग्रेसचे अन्य सदस्य यांना हाच प्रश्न भेडसावीत होता. म्हणजे वॉशिंग्टनना बडतर्फ करण्याचा त्यांचा विचार होता असें नव्हे; पण सबंध युद्धकाळांत वॉशिंग्टननीं एकदांहि राजीनामा देण्याची गोष्ट काढली नाहीं, ही वस्तुस्थिति या लोकांना विशेष जाणवत होती. निदान 'कॉनवे कॅबाल' कटाच्या वेळीं तरी स्वतःवरील विश्वासाचा पुनरुच्चार करवून घेण्यासाठीं त्यांनीं राजीनाम्याची तयारी कां दाखविली नाहीं? यॉर्कटाउनच्या संग्रामानंतर प्रत्यक्ष लढा संपल्याबरोबर त्यांनीं राजीनामा कां दिला नाहीं?–असे प्रश्न वरील नेत्यांच्या मनांत उपस्थित होत असत.

या प्रश्नांचें उत्तर सरळ आहे. कर्तव्याच्या जाणिवेमुळें वॉशिंग्टन तसें करायला कधींच प्रवृत्त होऊं शकत नव्हते. आपलें नियंत्रण नष्ट होतांच अमेरिकन प्रतिकार कोलमडून पडेल असें त्यांना वाटत होतें आणि तें बरोबरच होतें. तथापि ते जितक्या दीर्घकाल उच्चपदावर राहिले तितक्या प्रमाणांत ते देशाच्या उलाढालींत अधिक गुंतले गेले आणि तितक्याच जास्त प्रमाणांत राष्ट्रीय प्रतीक म्हणून त्यांचें स्थान अढळ होत गेलें. जास्त स्पष्टपणें सांगायचें म्हणजे जॉर्ज वॉशिंग्टन ही व्यक्ति अंतर्धान पावली आणि तेथें अमेरिकन सेन्ट जॉर्जची प्रतिमा स्थानापन्न झाली. दैवत बनविण्याच्या प्रक्रियेचे ते बळी होतेच, पण त्याचबरोबर कांहीं प्रमाणांत त्यांनीं तो प्रसंग स्वतःहून ओढवूनहि घेतला होता, असें म्हणतां येईल. त्यांनीं विजय संपादिला, त्यांची राजकारणधुरंधराला शोभेशी वागणूक होती, त्यांचा दृष्टिकोन स्वार्थनिरपेक्ष राष्ट्रहिताचा होता हीं कारणेंच केवळ माणसाची विभूति बनण्याचीं नसून, आपलें खाजगी अस्तित्व जाणून बुजून आणि पूर्णपणें विसरून राष्ट्रकार्याशीं संपूर्ण समरस होण्याचाहि परिणाम झालेला होता. अर्थात् वॉशिंग्टन यांचा पिंड जसा होता तसेंच घडलें होतें. यापेक्षां निराळें घडूंच शकलें नसतें. आणि जें घडलें त्याचे परिणाम स्वीकारणें त्यांना भागच होतें. एकदां अमेरिकेशीं इतकें एकरूप झाल्यानंतर सार्वजनिक जीवनाच्या खोड्यांत अडकणें अपरिहार्यच होतें. सरसेनापतिपदावरून राष्ट्राध्यक्षपदाकडे–या मार्गांत मृत्यु, गंभीर आजार किंवा लांछन या तीन गोष्टींपेक्षां चवथा कोणताच अडथळा येऊं शकत नव्हता. आणि एकदां राष्ट्राध्यक्ष झाल्यावर तर वॉशिंग्टन ही व्यक्ति त्या प्रतीकात्मक

वॉशिंग्टन-स्मारकाखालीं संपूर्णपणेंच गाडली गेली. या बाबतींतहि त्यांच्या टीकाकारांचें म्हणणें अगदींच अयोग्य नाहीं. माणसांच्या मेळाव्यांत उपदेवता वावरणें माणसांना गैरसोयीचें वाटणारच. आणि ती उपदेवता जर फेडरॅलिस्टांची मालमत्ता झाली तर मग स्वाभाविकतः चीड येणारच. ज्या माणसाकडे कानाडोळा करून बघण्याची सोय नाहीं, तो पुरुष आपल्याला अत्यंत नावडत्या असलेल्या पंथाचें कुलदैवत ठरत आहे, असें रिपब्लिकनांना वाटूं लागलें. राष्ट्राध्यक्षपदावर असेपर्यंत आपण फेडरॅलिस्ट आहोत, असें वॉशिंग्टन यांनीं कधींच मानलें नाहीं. अन्य योग्य भूमिकाच नाहीं, अशा समजुतीनेंच त्यांनीं केवळ फेडरॅलिस्टांची बाजू उचलून धरली होती, आपल्या अभंग प्रतिष्ठेचा आधार त्यांना दिला होता इतकेंच. वॉशिंग्टन यांच्या मृत्यूनंतर फेडरॅलिस्टांनीं वॉशिंग्टन बेनिव्होलंट सोसायट्या स्थापून त्यांच्या तेजोवलयांकित स्मृतीचा फायदा उठविण्याचा प्रयत्न केला. या संस्था केवळ वॉशिंग्टन यांच्या स्मरणार्थ असलेल्या सामाजिक संस्था असल्याचा आव आणला गेला तरी त्या संस्था राजकीयच होत्या. या संस्थांच्या प्रचारपुस्तिकांमध्यें वॉशिंग्टन यांचें निरोपाचें भाषण हटकून पुनर्मुद्रित केलेलें असे. अमेरिकन पुढारी वॉशिंग्टन यांच्यावर सरळ हल्ला चढवायला नाखूप असत. काँग्रेसमधील रिपब्लिकन नेत्यांचीं भाषणें पाहिल्यास त्यांना वॉशिंग्टन यांच्या प्रशंसेची झालर लावलेली दिसेच. अर्थात् जी कांहीं टीका होई ती केवळ एखाद्या पोटदुखींतून निर्माण झालेली नसे. वॉशिंग्टन यांची स्तुति करावी, अशीच टीकाकारांचीहि इच्छा असे, पण अशा स्तुतीच्या संभाव्य परिणामांबद्दल त्यांना चिंता वाटत असे. फेडरॅलिस्टांच्या कोंडाळ्यांत वॉशिंग्टन यांची वृत्ति अधिक आग्रही बनत गेली. प्रत्यक्ष त्यांच्याजवळ जाऊन त्यांना कांहीं सांगणें अशक्य होऊं लागलें आणि उघड उघड विरोधानें ते अधिक लौकर संतप्त होऊं लागले. १७९४ मध्यें पेन्सिल्व्हानियांत जें ' व्हिस्की बंड ' झालें, त्यांत पकडलेले निम्मे लोक, खुद्द वॉशिंग्टन यांच्या सन्मानार्थ वॉशिंग्टन असें नामकरण करण्यांत आलेल्या परगण्यांतलेच होते, हा दुःखजनक दुर्विलास नव्हे काय !

> " सरसेनापति जड प्रवृत्तीचे वाटतात. प्रजासत्ताकाचे सेनापति होण्यापेक्षां पूर्वेकडील देशाचा बादशहाच शोभेल असा त्यांचा स्वभाव व संवयी आहेत."

असें मत वॉशिंग्टन यांचा एक मदतनीस लष्करी अधिकारी रिचर्ड मीड याचा

भाऊ डेव्हिड मीड यानें व्यक्त केलें होतें. रिपब्लिकन विरुद्ध फेडरॅलिस्ट संघर्षाच्या काळांत हें मत फारच लागू पडणारें होतें. टांकसाळ काढण्याबाबतचा जो कायदा १७९२ मध्यें हॅमिल्टननीं तयार केला त्यांत, सर्व नाण्यांवर वॉशिंग्टन यांची प्रतिमा छापण्याची सूचना त्यांनीं समाविष्ट केली होती. या सूचनेला वॉशिंग्टन यांचा जोरदार पाठिंबा असावा, असें वाटण्याच्या दृष्टीनें कांहींच पुरावा नाहीं. पण ती सूचना हाणून पाडण्यांत यशस्वी झालेल्या रिपब्लिकनांना वाटणें स्वाभाविक होतें कीं, ही सूचना म्हणजे वीरपूजेच्या वृत्तीचें अनिष्टसूचक चिन्ह आहे.

कारुण्य

तथापि, वॉशिंग्टन यांच्या टीकाकारांत मनाच्या औदार्याची एकूण उणीवच होती. त्यांना एका गोष्टीची जाणीव कधींच झाली नाहीं किंवा ती गोष्ट कबूल करण्याला ते नाखूष होते. वास्तविक, वीरपूजेच्या वृत्तीची अपरिहार्यता जाणून तिला प्रोत्साहन देण्याची त्या वेळीं आवश्यकता होतीच. अमेरिकेला खरोखरच सेंट जॉर्जची–कुलदैवताची जरुरी होती. राष्ट्रीय ऐक्याचें कोणतेंहि प्रतीक मोलाचेंच होतें. आणि वॉशिंग्टन कांहीं केवळ फेडरॅलिस्टांच्या हातचें बाहुलें नव्हतें. जवळ जवळ सर्वच अमेरिकनांच्या समान आकांक्षांचें ते मूर्तिमंत प्रतीक होते. ते भोळसट, मूर्ख वा कंटाळवाणे पुरुष खासच नव्हते. पण ते तसे असते तरीसुद्धां वॉशिंग्टन यांची लोकप्रियता अत्यंत बहुमोल उपयोगाची ठरलीच असती. डाव्या पक्षाचे अमेरिकन लोक ज्याबद्दल तक्रार करीत होते, ती अनिष्ट गोष्ट नसून वरदानच होतें. त्यांतून अधिक कांहीं तरी चांगलेंच निष्पन्न झालें असतें. त्यांच्या अनादरभावनेंत निर्दयपणा होता, बेजबाबदारपणा होता. ती भावना अन्याय्य होती–अर्थात् खऱ्याखुऱ्या अमेरिकन प्रथेला धरून बघितल्यास निरोगीहि होती.

अधिक सखोलपणें विचार केला तर, वॉशिंग्टन यांच्या एकूण यशांत आणि सर्वसाधारणतः अमेरिकेच्या इतिहासांत असलेलें जें कारुण्य युरोपियनांना ठळकपणें दिसतें, त्याची दखलहि वॉशिंग्टन यांच्या समकालीनांनीं घेतली नाहीं असें म्हणावें लागतें.

उदाहरणार्थ, वॉशिंग्टन यांच्या वैयक्तिक परिस्थितीची असमाधानाची बाजू विचारांत घेऊं या. आपलें कर्तव्य बजावल्याचें समाधान त्यांना होतें. त्याबद्दल मोठ्या प्रमाणावर गौरव होण्याचेंहि समाधान त्यांना लाभलें. पण इतर कांहीं

नेत्यांप्रमाणें त्यांना सार्वजनिक जीवनाची आवड मुळींच नव्हती. त्यांच्या अभिजात आदर्श मूल्यांमध्यें स्वसुखावर भर नव्हता. इतरांना आपापल्या मनाप्रमाणें सुखाचा मार्ग अनुसरण्याला हातभार लावणाऱ्या वॉशिंग्टनना मात्र आढळून येत होतें कीं, आपलें स्वतःचें खाजगी जीवन एखाद्या रिकाम्या पोकळ टरफलासारखें आहे. हा राष्ट्रपिता स्वतः अपत्यहीन होता. त्यांना ऐतिहासिक नाट्याचा नायक बनविण्यासाठीं ही वस्तुस्थिति कितीहि उत्कृष्ट असली तरी हाडामाणसाच्या माणसाला औरस वारस नसणें ही अत्यंत निराशाजनक गोष्ट वाटत राहाणारच. ज्या माउंट व्हर्नॉनच्या निवासस्थानाची व आसमंतांतील शेतवाडीची सुधारणा करण्यासाठीं त्यांनीं जिवाचें रान केलें, त्या माउंट व्हर्नॉन-पासून उत्तर आयुष्याचा दीर्घ काल दूर रहाणें त्यांना भाग पडलें. १७९७ च्या एप्रिलमध्यें, राष्ट्राध्यक्षीय जबाबदारीवरून सेवानिवृत्त होऊन परत आल्यानंतर त्यांना आढळून आलें कीं, निवासस्थानांत अनेक दुरुस्त्या अत्यावश्यक आहेत. त्याबद्दल कांहींशा विनोदानें पण विषादानेंच त्यानें लिहून ठेवलें आहे: "गवंडी, सुतार, रंगारी यांचा इतका गराडा पडला आहे कीं, कोणी मित्र आल्यास त्याची सोय करण्यासाठीं किंवा खुद्द मला बसण्यासाठीं, जिथें हातोड्यांचे आवाज येत नाहींत किंवा रंगाचा दर्प येत नाहीं अशी एकहि खोली नाहीं." आणि पुढेंहि जी काय थोडी निरामय शांतता उपभोगायला मिळूं लागली, तिलादेखील युद्धाच्या धोक्यानें सुरुंग लागलाच.

प्रत्येक माणसाच्या जीवनांत अर्थातच कारुण्याचा भाग असतोच, पण वॉशिंग्टन यांच्या जीवनांतील कारुण्याचें वैशिष्ट्य हें कीं, त्यांच्या जीवनाची सार्वजनिक बाजू व खाजगी बाजू यांत कमालीचा विरोध आहे. राष्ट्रासाठीं म्हणून त्यांनीं जें जें केलें तें तें यशस्वीच ठरलें. पण स्वतःसाठीं म्हणून जें जें केलें तें तें आश्चर्यजनक रीतीनें क्षणभंगुर ठरलेलें आहे. वेस्टमोर लँडमधील त्यांचें जन्मस्थान १७७९ च्या आगींत जळून भस्मसात् झालें. माउंट व्हर्नॉनची मालमत्ता त्यांची फार आवडती; पण ती बिनकिफायतशीर ठरली होती. क्रांतीनें किंवा नंतरच्या घटनांनीं किनाऱ्याजवळच्या वसाहतींतील मळेवाल्यांची स्थिति सुधारण्याला मुळींच हातभार लागला नव्हता. कनिष्ठ जमीन आणि कडक उन्हाळा यांचे परिणाम नष्ट करण्याला वॉशिंग्टन यांची धडपड उपयोगी पडत नव्हती. दुर्भिक्ष्य, पिकांवरील कीड आणि रोग या गोष्टी मानवी शत्रूपेक्षा अजिंक्य ठरत होत्या.

१७८५ च्या उन्हाळ्यांतील अत्यंत वाईट हवामानाच्या परिणामांचें वर्णन त्यांनीं जुलैमधील एका दिवशीं दैनंदिनींत पुढीलप्रमाणें केलें आहे :—

" गतवर्षीप्रमाणेंच या वर्षीहि लोकस्ट वृक्षांचीं पानें झडूं लागलीं आहेत व कांहीं वृक्ष वठून जात आहेत. गोदाच्या झाडांना प्रथम पानें फुटून तीं बहरणार असें दिसत होतें, पण तींहि सर्व झाडें मेलीं. हिवराच्या झाडांची व बहुतेक तुतीच्या झाडांची तीच अवस्था आहे. गावठी सफरचंदाचीं झाडें, सासाफ्रास, देवदारूचीं झाडें, औषधी वनस्पति या सर्वांची हीच अवस्था आहे. "

तो उन्हाळा नेहमींपेक्षां फारच वाईट होता, तरी अन्य ऋतूंतहि नुकसान होतच असे. तांबड्या तुतींचीं झुडुपें नष्ट झालीं. सोनेरी भरदार पिसें असलेले तित्तिर पक्षी वॉशिंग्टननीं मागविलेले होते तेहि मरून गेले. हरणांसाठीं नीट कुंपण घालून त्यांनीं मोठें वन राखलें होतें, पण तेथील हरणें निसटून बाहेर पडत आणि कोंवळीं रोपटीं खाऊन टाकीत. अखेर त्यांनीं हरणें पाळण्याचा नाद सोडून दिला. जणुं, ज्या ईश्वरी शक्तीला वॉशिंग्टन नेहमीं आवाहन करीत, त्या शक्तीनें त्यांना मनपसंत निवासस्थान तयार करूं द्यायचें नाहीं, असा निर्धारच केला होता. साऱ्या धडपडीला यश न येतां पदरीं निराशाच पडत होती. समजा, औरस वारस लाभला असता, खर्चिक पण चांगली व्यवस्थापनयंत्रणा असती तरीसुद्धां अखेर माउंट व्हर्नॉनला पुनः जंगलाचेंच स्वरूप आलें असतें किंवा कृत्रिम उपायांनीं सुबक बनविलेल्या समाधिस्थानाचेंच स्वरूप त्याला आलें असतें.

कारण, अमेरिकन लोकवस्ती पश्चिमेस आंत आंत सरकूं लागली होती. या बाबतींतहि वॉशिंग्टन यांनीं केलेल्या प्रयत्नांना यश आलेंच नाहीं. पश्चिम भागांत त्यांच्या मालकीचे विस्तृत जमिनीचे पट्टे होते. पण मृत्यूपूर्वीच कांहीं वर्षे आधीं त्यांनीं बिनकिफायतीच्या म्हणून त्या जमिनींचा नाद सोडून दिलेला होता. पश्चिम भागाशीं जलमार्गांचें दळणवळण विकसित करण्यासाठीं स्थापन झालेल्या पोटोमॅक कंपनीचें काय झालें ? या योजनेसाठीं त्यांनीं आपली सारी शक्ति खर्ची घातली होती व या योजनेबद्दल मोठी आशा बाळगली होती. ही योजना म्हणजे ' वॉशिंग्टन यांचें चिरस्थायी स्मारक ' ठरेल, असें व्हर्जिनियाच्या विधानसभेचें मत होतें. पण दुर्दैव असें कीं, त्यांच्या मृत्यूच्या आधींपासूनच पोटोमॅक कंपनीची

परिस्थिति बिघडत चालली होती. त्यांच्या मृत्यूनंतर तीस वर्षांनीं कंपनीनें दिवाळेंच काढलें. वॉशिंग्टन (डी. सी.) आणि पिट्सबर्ग यांना जोडणारा जलमार्ग तयार करण्याच्या इराद्यानें चेसापीक अँड ओहिओ कॅनॉल कंपनीनें पोटोमॅक कंपनी आपल्यांत समाविष्ट करून घेतली. पण अॅलेघेनीच्या डोंगर-पट्टीच्या पायथ्याशीं कंबरलँडपर्यंत आल्यानंतर ही योजना १८५० मध्यें जी अडली ती कायमचीच. याच ठिकाणीं १७५३ मध्यें जनरल डिन्विडीचा खलिता पोहोचविण्यासाठीं वॉशिंग्टन गेले होते. सारांश, प्रयत्न डोंगरभर झाले, पण प्रत्यक्ष फलश्रुति मात्र कांहींच दाखवण्याजोगी झाली नाहीं.

वॉशिंग्टन यांनीं हातीं घेतलेल्या अन्य उपक्रमांबद्दलहि असेंच म्हणतां येईल. याचा अर्थ त्यांच्या योजना वाईट असत असा नव्हे, तर त्या योजनांना जणुं दुर्दैवाचाच शाप बाधत होता. संयुक्त राज्यांतील विविध भागांतील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय करण्यासाठीं कोलंबिया जिल्ह्यांत राष्ट्रीय विद्यापीठ स्थापन करण्या-बद्दलच्या प्रश्नांत त्यांनीं आस्थेनें लक्ष घातलें होतें. त्यांनीं आपल्या मृत्युपत्रांत पोटोमॅक कंपनीचे पन्नास शेअर्स विद्यापीठाला देण्याची तरतूद केली होती. पण अनेक कारणांमुळें मृत्युपत्रांतील या तरतुदीची अंमलबजावणी कधींच झाली नाहीं.

फेडरॅलिस्ट पक्षाशीं असलेल्या त्यांच्या संबंधाबाबतहि असेंच घडलें. आपला त्या पक्षाशीं असलेला संबंध त्यांनीं आयुष्याच्या अखेरीस मान्य केला. पण त्या पक्षाचें काय झालें ? त्यांच्या मृत्यूनंतर लौकरच झालेल्या निवडणुकींत त्या पक्षाला दणदणीत पराभव खावा लागला. पुनः त्या पक्षाला राष्ट्राध्यक्षपद कांहीं मिळवतां आलें नाहीं. इतकेंच नव्हे तर राजकीय शक्ति या दृष्टीनें त्या पक्षाचें पार विघटनच झालें. या विघटनाचा प्रतिकूल परिणाम वॉशिंग्टन यांच्या कीर्तीवरहि कांहीं काळ झाला होता. जणूं नव्या शतकाच्या पहिल्या दशकांत तें प्रतीकात्मक वॉशिंग्टन-स्मारक पार जमीनदोस्तच झालें होतें.

या सर्व गोष्टी लक्षांत घेणें त्यांच्या समकालीनांना कदाचित् शक्य झालें नसेल. ज्याप्रमाणें वॉशिंग्टन यांच्या तथाकथित श्रीमंतीच्या मर्यादा अंदाजणें समकालीनांना जमलें नाहीं, त्याप्रमाणेंच, किंबहुना त्यापेक्षांहि जास्तच या गोष्टींचें मूल्यमापन करणें समकालीनांना विकट असावें. या कारुण्यपूर्ण परिस्थितीची आणखी एक बाजू—अधिक करुण बाजू—दीर्घकाल लोटल्यानंतर अधिक ठळकपणानें दृग्गोचर होऊं लागली आहे. वीरात्मा आणि लोकनेता म्हणून त्यांनीं बजावलेल्या

भूमिकेशीं, विशेषतः राष्ट्राध्यक्ष वॉशिंग्टनशीं ही कारुण्याची बाजू अधिक निगडित आहे. जर अभिजात आदर्श मूल्यांच्या संस्कारांनीं वॉशिंग्टन यांचें व्यक्तित्व घडविलें गेलेलें नसतें किंवा वॉशिंग्टन यांच्या जागीं दुसरा कोणी पुरुष पहिला राष्ट्राध्यक्ष झाला असता, तर त्या पदाचें जें स्वरूप ठरून गेलें तें तसें न घडतां कांहींसें निराळें झालें असतें किंवा नसतें हा प्रश्न फिजूल आहे. वस्तुस्थिति अशी आहे कीं, स्वतः वॉशिंग्टन यांनीं, महत्त्वाच्या बाबींपुरतें तरी राष्ट्राध्यक्षपदाचें स्वरूप आपल्या वागण्यानें नकळत ठरवून टाकलें. त्यांच्या दुसऱ्या कारकीर्दीच्या अखेरी-अखेरीस राष्ट्राध्यक्षाविषयीची संकल्पना तयार झाली. ही संकल्पना तशी ढिसाळ, विसंगत असेल; पण ती कायमची ठरून गेली. राष्ट्राध्यक्ष म्हणजे राजा, पंतप्रधान, पक्षप्रमुख आणि राष्ट्रपिता या चार भूमिकांच्या चौकटींत कुठें तरी अधांतरीं लटकणारा पुरुष आहे. त्याचें स्थान राष्ट्राचा प्रतिनिधि म्हणून आहे, पण त्याच-बरोबर तें स्थान कांहीं तरी अलौकिकहि आहे. डेल्फी या प्राचीन ग्रीक शहरांतील भविष्यदेवतेप्रमाणें त्याची वाणी अमर ठरणारी असते, पण त्याचबरोबर ज्याच्यावर उठल्यासुटल्या टीका करण्याचा मोह कोणालाहि व्हावा असा स्खलनशील मर्त्यहि तो असतो. आणि फिलिप फ्रेनो हा वॉशिंग्टन यांच्या बाबतींत या दोन्ही भूमिका लक्षांत घेऊन आलटूनपालटून वागत होताच.

त्या पदाला शोभतील अशा शिष्टाचाराच्या अतिअवडंबरामुळें वॉशिंग्टन यांनीं आपल्या अडचणींत भर मात्र टाकली होती. विनावेतन काम करण्याची त्यांची सूचना जर काँग्रेसनें मान्य केली असती, तर त्यांच्या अडचणी अधिकच वाढल्या असत्या. तें कांहीं असो; पण अमेरिकेचा भूतकाळ आणि वर्तमानकाळ यांचें ते उत्कृष्ट प्रतीक असले तरी एकदां राष्ट्राध्यक्षपदावरून उतरल्यावर अमेरिकेच्या भविष्यकालाचे प्रतिनिधि ही त्यांची भूमिका संपली असें मानायला हरकत नाहीं. एकोणिसाव्या शतकांत वीरात्म्यांच्या यादींत निराळ्याच प्रकारच्या वीरात्म्यांची भर पडणार होती. असा एक वीर म्हणजे अँड्र्यू जॅक्सन. १७९६ सालीं ते काँग्रेसमधले एक अनुभवी नवे सभासद होते. पण त्यांनीं अकरा जणांच्या एका छोट्या पण अतिकडव्या गटाचें नेतृत्व करून, सेवानिवृत्त होणाऱ्या राष्ट्राध्यक्षाला काँग्रेसनें मान-पत्र देण्याच्या कल्पनेला अत्यंत जोरदार विरोध केला होता. वॉशिंग्टन यांच्या ठायीं असलेल्या गुणवत्तेपेक्षां कांहींशा आगळ्या गुणवत्तेचें मूल्य जॅक्सनछाप सामान्य माणसाच्या युगांत मानलें जाणार होतें.

वॉशिंग्टन यांच्या हातून वागण्याचें धोरण सांभाळण्यांत कांहीं चुका होतहि असत. कोणाला राग येईल असें कांहीं घडणें अगदीं स्वाभाविक होतें. सर्वच माणसांना सारखेंच आवडेल असें वागणें शक्य नसतें. पण त्यांच्याकडून मात्र तशी अपेक्षा केली जात होती. ते तथाकथित ‘ पूर्वेकडील जगांतील बादशहा ’सारखे न वागतां प्रजासत्ताकाच्या सेनापतीसारखे वागले असते तरी त्यांच्यावर टीका झालीच असती. आणि कदाचित् ते तसे वागते तर त्याचा परिणाम युनायटेड स्टेट्स्वर भयंकर झाला असता. अमेरिकन राष्ट्राध्यक्षाची भूमिका मोठी चमत्कारिक आहे. प्राकृत आणि दिव्य अशी संमिश्र संकल्पना आहे ती ! राष्ट्राध्यक्षाकडून एकाच वेळीं धीरगंभीर वृत्तीची आणि फटकळपणाची अपेक्षा केली जाते. फ्रेझरच्या ‘ गोल्डन बो ’ नाटकांतील रानटी टोळ्यांच्या राजासारखी राष्ट्राध्यक्षाची अवस्था आहे. त्या नाटकांतले ते रानटी टोळ्यांचे राजे मोठ्या थाटामाटांत राहतात आणि अखेर लोक त्यांना समारंभपूर्वक बळि देतात ! अमेरिकन राष्ट्राध्यक्षांत आणि या राजांत फरक इतकाच कीं, अमेरिकन राष्ट्राध्यक्ष सेवानिवृत्त झाल्यावरचा प्रदीर्घ काळ एक प्रकारच्या यातना सोशीत अखेर नामशेष होतो. पूजा करण्याची प्रवृत्ति आणि ‘ पादपूजा ’ करण्याची करण्याची वृत्ति एकमेकांना जणुं पूरकच असतात. वॉशिंग्टन यांच्या वांट्याला ही दुहेरी परिस्थिति आली होती. एक अमेरिकन पुढारी म्हणून ते अधिकारपदावर आले नव्हते, तर लोकांच्या दृष्टींनं वीरात्मा असलेले पुरुष म्हणून ते अधिकारपदावर आलेले होते. म्हणूनच त्यांच्या वांट्याला अशी असामान्य पण गैरसोयीची परिस्थिति आली होती. आपल्या कारकीर्दींत राष्ट्राध्यक्षानें दैवी शहाणपण आणि दूरदृष्टि दाखविली पाहिजे आणि त्यानें सामान्य माणूसहि असलें पाहिजे, अशी दुहेरी अपेक्षा असते. वॉशिंग्टनहि अशा अपेक्षेबाबत अपवाद नव्हते. राष्ट्राध्यक्षाकडून सर्वच अपेक्षा केल्या जातात, पण त्याला भरीव असा मोबदला काय मिळतो ? जें मिळतें तें फक्त उसनवारच मिळालेलें असतें. ना पदवी, ना घर, ना सन्मान ! राष्ट्राला अर्पण केलेला जिवंत बलि, अशीच जवळ जवळ त्याची स्थिति असते.

जॉन ॲडम्स यांनीं वॉशिंग्टन यांच्यावर तिरसटपणानें केलेली टीका या संदर्भांत महत्त्वाची आहे. विनावेतन सेवा करण्याची वॉशिंग्टन यांची तयारी म्हणजे अहंकाराचा आविष्कार होय, असें ॲडम्सनीं म्हटलें आहे. त्याचबरोबर आठ वर्षें सेनापतिपदावर राहिल्यावर सेवानिवृत्त होण्याची भाषाहि महत्त्वाकांक्षी

वृत्तीचीच द्योतक आहे, असें ॲडॅम्सनीं म्हटलें होतें. जणुं एखाद्या दिव्य वाऱ्याप्रमाणें सतत लगाम अडकवून त्यांनीं अखंडपणें धांवत राहिलें पाहिजे होतें. याचें पारितोषिक फक्त शाब्दिक सन्मान आणि तोसुद्धां मृत्यूनंतर ! *

अमेरिकनांचा दृष्टिकोन व्यावहारिक आणि ऐहिक असतो असें म्हटलें जातें. अंशतः तें खरें आहे. वॉशिंग्टन यांचा दृष्टिकोनहि असा व्यावहारिकच होता. पण ज्या ब्रिटिश मनोवृत्तींचा वारसा म्हणून हा दृष्टिकोन अमेरिकेला लाभला आहे, त्या ब्रिटिश मनोवृत्तीइतकी अमेरिकेची मनोवृत्ति घट्ट, धूर्त आणि ऐहिक नसून, फारच विरल आणि स्वप्नाळू आहे. दंतकथांचा नायक म्हणून वॉशिंग्टन यांचें रेखाटलें गेलेलें चित्र या मनोवृत्तीचेंच प्रतिबिंब आहे. रिअर ॲडमिरल हॉरेशिओ नेल्सन सी. बी. हे अबाऊकिर उपसागरांतील संग्रामाच्या आधीं कांहीं तासच जेवण संपल्यावर उभे राहून आणि तोंड पुसून म्हणूं शकले होते, " उद्यां मी या वेळीं उमराव झालेलों असेन किंवा माझी रवानगी वेस्टमिन्स्टर ॲबेंत झालेली असेल." आणि ब्रिटिश समाजांतल्या वस्तुस्थितीवर त्यांचे उद्‌गार आधारलेले असल्यामुळें अचूक ठरले. त्यांनीं तें युद्ध जिंकलें. ते बॅरन झाले. इतकेंच नव्हे, तर पार्लमेंटनें त्यांना दोन हजार पौंडांचें वार्षिक निवृत्ति वेतन मंजूर केलें. ईस्ट इंडिया कंपनीनें त्यांना दहा हजार पौंडांचें बक्षीस दिलें. नेपल्सच्या राजानेंहि उमरावकी देऊन तीन हजार पौंडांचा वार्षिक तनखा मंजूर केला. लेडी हॅमिल्टनच्या रूपानें नेल्सनना सुंदर प्रेयसीहि लाभली आणि ट्राफलगारच्या संग्रामांत ते धारातीर्थीं पडल्यावर जरी वेस्टमिन्स्टर ॲबेंत त्यांना स्थान न मिळालें तरी सेंट पॉल कॅथेड्रलमध्यें प्रचंड सन्मानानें त्यांचें दफन झालें.

या परिस्थितीशीं वॉशिंग्टन यांच्या परिस्थितीची तुलना करून पहा. युद्ध-काळांत त्यांना एकाकी आणि त्रस्त अवस्थेंत धडपडावें लागत होतें. सावधगिरी, धीटपणा आणि सौजन्य यांचा कमाल परिपाक दाखविण्याची अपेक्षा करण्यांत येत होती. राष्ट्राध्यक्षपदावरहि ते असेच एकाकी आणि त्रस्त होते. मार्गदर्शक अशा पूर्वपरंपरा कांहीं नसतांना त्यांना मार्ग चोखाळायचा होता. एका अनाथ

* आतां माजी राष्ट्राध्यक्षांना निवृत्तिवेतन मिळतें. पण ती तरतूद करायला अमेरिकेला दीड शतकापेक्षां अधिक काळ लागला. आणि मृत राष्ट्राध्यक्षांच्या विधवा-पत्नींची तरतूद करण्याची जाणीव व्हायला अजून दीर्घ काळ लोटला पाहिजे असें दिसतें !

देशाचे, तेजस्वी पण अनाथच प्रमुख अशी त्यांची अवस्था होती. आणि त्यांना जास्तींत जास्त प्रतिष्ठा राखून आणि कमींत कमी ध्येयवाद किंवा अंतमुर्खता ठेवून त्या दिव्यांतून पार व्हावयाचें होतें. नेल्सन यांच्या कर्तृत्वाबद्दल त्यांना भरपूर आणि भरीव मोबदला लाभला; वॉशिंग्टन यांच्या पदरांत फक्त शाब्दिक गौरवाचा प्रतीकात्मक मोबदला पडला. त्यांच्या छातीवर झगझगीत पदकें लटकत नव्हतीं. त्यांनीं ' आर्डर ऑफ सिनासिनाटी ' हें पदक लावणेंहि अनेक देशबांधवांना गैर वाटत होतें. नेल्सन हे ' बॅरन ' ' ड्यूक ऑफ ब्रँटे ' होते, तर वॉशिंग्टन केवळ ' श्रीयुत राष्ट्राध्यक्ष ' होते. त्यांच्या मृत्यूनंतरच त्यांच्या मस्तकाचा ठसा अमेरिकन नाण्यांवर छापण्यांत येऊं लागला. शासनप्रमुखाचें पद हें कमींत कमी विलोभनीय असावें, कारण माणसें सत्तालोभी व द्रव्यलोभी असतात, हें लक्षांत घेऊन सत्तास्थान हें उत्पन्न मिळविण्याचेंहि स्थान होऊं नये, म्हणून वरील गोष्टी शहाणपणाच्याहि होत्या. तथापि, त्याचबरोबर लक्षांत घ्यावयास पाहिजे कीं, वॉशिंग्टन यांचा घोड्यावर स्वार झालेला पुतळा बसविण्याचा ठराव १७८३ मध्यें होऊन देखील प्रत्यक्षतः तो पुतळा बसण्याला १८६० साल उजाडावें लागलें. त्याचप्रमाणें वॉशिंग्टन ( डी. सी. ) येथील भव्य स्मारक उभाण्याचें ठरूनहि तब्बल सत्याऐंशी वर्षें घोळ घालण्यांत येऊन अखेर १८८५ सालीं तें स्मारक उभारलें जाऊं शकलें. *

माउंट व्हरनॉनची कहाणीदेखील तशीच आहे. कडक उन्हाळ्यामुळें जमिनीला तडे जात आहेत, शेताभोंवतीं काढलेले पाण्याचे पाट पावसानें आंत चिखल आणून बुजवून टाकले आहेत, वादळी वाऱ्यामुळें बागेंतील झाडांची दुर्दशा झाली आहे आणि जिकडे तिकडे तण माजलें आहे, अशी त्याची अवस्था होती. पुतण्याकडून त्याच्या पुतण्याकडे अशा वारसा हक्कानें आलेल्या त्या मालमत्तेची दुर्दशा थांबवायला कॉंग्रेस कांहीं पुढें सरसावली नाहीं; तर माउंट व्हरनॉन लेडीज असोसिएशन नांवाची बिनसरकारी संघटना आणि त्या संघटनेसाठीं निधि उभारणारे प्रचारक यांच्या प्रयत्नांनींच अखेर आजचें माउंट व्हरनॉनचें स्वरूप टिकून राहिलें.

* वॉशिंग्टन यांची माता १७८९ मध्यें वारली. पण तिचें थडगें १८३३ पर्यंत नीट बांधलेलें नव्हतें. त्या सालीं पन्नास फुटी स्तंभ उभारण्याचें ठरलें. पण तो प्रत्यक्ष उभा रहायला १८९४ साल उजाडावें लागलें.

"तो भूप्रदेश, त्यांतील तीं घनदाट वनें, त्या टेकड्या, तीं नद्यांचीं खोरीं, सर्व आहे, पण त्याचे वारसदार कोठें आहेत ? पुराच्या पाण्यावरील फेसाप्रमाणें ते नष्ट झाले. सारें राज्य जमीनदोस्त झालें!"

अशा आशयाच्या ज्या ओळी इमर्सन यांच्या 'ह्रॅमेट्रेया' काव्यांत आहेत, त्यांचीच आठवण करून देणारें करुण नाट्य वरील परिस्थितींत दिसून येतें.

### विजय

तथापि खरोखरच तें 'राज्य' नेस्तनाबूद झालें काय ? खऱ्या अर्थानें बघितल्यास या प्रश्नाचें उत्तर नकारार्थीच द्यावें लागेल. वॉशिंग्टन यांच्यापुरतेंच बोलावयाचें, तर 'राज्य' शाबूद आहे – फक्त तें प्रजासत्ताक राज्य आहे. वारसदारहि जिवंत आहेत, फक्त त्या राज्याचें वारसदार अखिल राष्ट्र आहे.

कोणाहि थोर पुरुषाच्या जीवनाप्रमाणेंच वॉशिंग्टन यांच्या चरित्राला जी कारुण्याची छटा दिसते तिचें कारण त्या पुरुषाच्याच स्वभावधर्मात दिसते. निकट जिव्हाळ्याऐवजीं फक्त आदरयुक्त दरारा वाटावा, हाडामासाच्या माणसाचें व्यक्तित्व संगमरवरी दगडाच्या स्पर्शासारखें थंडगार वाटावें, या गोष्टी मनाला झोंबणाऱ्या असल्या, तरी तो खुद्द त्या पुरुषाच्या स्वभावधर्माचा दोष आहे. आणि खुद्द अमेरिकनांना अशाच प्रकारच्या भव्यतेची अपेक्षा असल्यामुळेंहि असें घडलें आहे. आपल्यांतील उणीवांची जाणीव असलेल्या व्यक्तीवर फार मोठ्या जबाबदाऱ्या पडणें; युद्ध, भांडणें, संकटें यांना सतत तोंड देतां देतां तलवारीच्या धारेवरून चालण्याची कसरत त्या व्यक्तीला करावी लागणें हें एक भयंकर दिव्य आहे.

तें कांहीं असलें तरी, वॉशिंग्टन यांची उभी हयात अत्यंत समाधान वाटावें अशा कर्तबगारीनेंच नटलेली होती. त्यांना जें करायला सांगण्यांत आलें तें त्यांनीं चोखपणें पार पाडलें. त्यांची विवेकी वृत्ति कांहीं लोकांना मंदबुद्धीची द्योतक वाटली तरी, खरें बघतां, ती वृत्ति हेंच त्यांचें सामर्थ्य होतें. आणि स्वतःच्या व्यक्तित्वाच्या रूपानें त्यांनीं अमेरिकेच्या सामर्थ्याचाच प्रत्यय आणून दिला. ते संत नव्हते; सज्जन माणूस होते. महान् योद्धे नसतील; पण कार्यक्षम सेनानी खास होते. प्रतिभावान् राजकारणधुरंधर नसतील; पण सचोटीचे प्रशासक होते. तेजस्वी सुधारक नसले, तरी जुन्यांतलें चांगलें जतन करून ठेवणारे व्यवहारचतुर पुरुष होते. आणि वॉशिंग्टन यांची ही गुणवत्ताहि कांहीं कमी असामान्य नाहीं.

आणि जीवनांत अखेरीस व्यक्तिशः त्यांना एक तरी समाधान मिळालें. हयातभर आपण केलेला जीवनप्रवास योग्य मार्गावरून आणि उदात्तपणें केला आहे आणि अखेर इतरत्र कुठें तरी इहलोकची यात्रा संपविण्याचा प्रसंग न येतां स्वतःच्या घरांत, चाळीस वर्षेपर्यंत जिच्याशीं निष्ठेनें संसार केला त्या पत्नीच्या सान्निध्यांत आपण जगाचा निरोप घेत आहों, हें समाधान त्यांना लाभलें आणि जगाचा निरोप घेतांना आणखीहि एक समाधान त्यांना लाभलें. अमेरिका भक्कम पायावर उभी आहे, ज्या राष्ट्राच्या निर्मितीसाठीं आपण देह झिजविला तें राष्ट्र चिरस्थायी झालें आहे, हें समाधान त्यांना लाभलें. त्यांचें हें यश सर्वांत चिरस्थायी स्वरूपाचें होतें.

साऱ्या श्रेयांत वॉशिंग्टन यांचा योग्य वांटा निश्चितपणें किती, हें सांगतां येणार नाहीं. आणि हा मुद्दाहि अंतिमतः गैरलागू आहे. स्वतः वॉशिंग्टन हे अमेरिकेशीं इतके एकरूप झाले होते कीं, त्यांचें नांव अमेरिकेच्या भूमीशीं आणि वातावरणाशीं एकजीव झालेलें आहे. खरोखरच, प्रतीकात्मक वॉशिंग्टन-स्मारकापासून वॉशिंग्टन ही व्यक्ति अलग करण्याचा चरित्रकाराचा प्रयत्न निरर्थकच आहे. नाण्यांवरील छाप, कागदी चलन व पोस्टाचीं तिकिटें यांवरील चित्रें, राजमुद्रेवरील त्यांची घोड्यावर स्वार झालेली प्रतिमा, पूर्वायुष्यांत वॉशिंग्टन यांचे टीकाकार असणाऱ्या जॅक्सननीं 'दुसरे वॉशिंग्टन' म्हणून राष्ट्राध्यक्षीय निवडणुकीला उभें राहणें या साऱ्या गोष्टी त्या प्रतीकात्मक स्मारकाचा विसर न पडूं देणाऱ्याच आहेत. चेरी वृक्षावर कुऱ्हाड चालविण्याची दंतकथा, राष्ट्रसेवा संपतांच नांगर धरणारा दुसरा सिनसिनाटस, गोळ्या झाडूनहि ज्याला मारणें शक्य झालें नाहीं असा अमर पुरुष म्हणून मोनोंगोहेलाच्या संग्रामांतल्या रेड इंडियनानें ग्वाही दिल्याची दंतकथा;—इत्यादि त्या प्रतीकात्मक स्मारकाच्या अंगापासूनहि खरें व्यक्तित्व अलग करणें अशक्यच आहे. कारण, तें व्यक्तित्व हेंच मुळांत एक भव्य स्मारक आहे — तें स्मारक म्हणजेच अमेरिका !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अनुक्रम 2626
नोंद ९-६-५५
१०९९१